ा० कै० वासुदेवशास्त्री खरे यांच्या स्मरणार्थ प्रसिद्ध केलेला
ग्रंथ सहावा.

भा. इ. संशोधक मंडळ पुरस्कृत ग्रंथमाला ग्रंथांक ४८ वा.
शोदा-चिंतामणि ट्रस्ट पुरस्कृत ग्रंथमाला ग्रंथांक १७ वा.

# ऐतिहासिक-लेख-संग्रह

## भाग पंधरावा.

बाजीरावसाहेबांची कारकीर्द
( इ स. १८०४ जून ते इ स. १८१० अखेर )

यवंत वासुदेवशास्त्री खरे, मिरज

[ इ. स. १९४८

किंमत आठ रुपये.

ती० कै० वासुदेवशास्त्री खरे यांच्या स्मरणार्थ प्रसिद्ध केलेला ग्रंथ सहावा.
भा. इ. संशोधक मंडळ पुरस्कृत ग्रंथमाला ग्रंथांक ४८ वा.
यशोदा-चिंतामणि ट्रस्ट पुरस्कृत ग्रंथमाला ग्रंथांक १७ वा.

# ऐतिहासिक–लेख–संग्रह

## भाग पंधरावा.

बाजीरावसाहेबांची कारकीर्द
( इ. स. १८०४ जून ते इ स. १८१० अखर )

संपादक—यशवंत वासुदेवशास्त्री खरे, मिरज

शके १८७० ] [ इ. स. १९४८

किंमत आठ रुपये.

# एक जुनी आठवण—कै. तात्या केळकर.

सुमारें इ. स. १८८४ सालची हकीकत. त्या वेळीं नाना, आपा आणि तात्या हे तिघे केळकरबंधु मिरज हायस्कुलांत विद्यार्थी होते. आमचे वडील कै. वासुदेवशास्त्री खरे यांचेकडे हे तिघे केळकरबंधु संस्कृत शिकावयास येत असत. गुरु या नात्यानें तिघांही बंधूंना आमच्या वडिलांबद्दल आदर वाटत असे. पुढील आयुष्यांत तात्या 'केसरी'चे संपादक झाले— खंदे लेखक, कवि आणि नाटककार असा त्यांचा फार मोठा लौकिक झाला— साहित्यसम्राट् अशी त्यांची दिगंत कीर्ति झाली— तात्या पुढें अनेक राजकीय आणि सामाजिक चळवळींचे पुरस्कर्ते आणि हिंदी राजकारणाचे पुढारी झाले. असा सर्वांगीण मोठेपणा फार थोड्यांना प्राप्त होत असतो. तात्यांच्या अंगीं इतका मोठेपणा आला तथापि आमच्या वडिलांबद्दल वाटणारें गुरुशिष्याचें नातें तात्या कधीं विसरले नाहींत. तात्यांचा मराठी इतिहासाचा व्यासंग फार मोठा होता. ऐतिहासिक—लेख—संग्रहाच्या सर्व भागांवर तात्यांनीं 'केसरी' पत्रांत परीक्षण-लेख लिहिले आहेत. तात्यांचे हे परीक्षणलेख इतके मार्मिक आणि व्यापक विचारांचे आहेत कीं त्यांना मराठी ऐतिहासिक वाङ्मयांत कायमचें स्थान प्राप्त झालें आहे. तात्यांच्या मृत्यूमुळें मराठी वाङ्मयाचें आणि मराठी इतिहासाचें जें नुकसान झालें आहे तें आतां कशानें भरून निघेल !



कै. नरसिंह चिंतामण उर्फ तात्यासाहेब केळकर

जन्म २४।८।१८७२ ] [ मृत्यु १४।१०।१९४७

# संपादकीय चार शब्द.

**१ योगायोग** – इ. स. १९३०।३१ सालीं आम्हीं वर्ष दोन वर्षें बुधगांव येथें मुक्काम केला. त्या वेळीं मिरजमळा दप्तर तपासून त्यांतून निवडलेले कागद पुढें सोळा वर्षांनीं या पंधराव्या भागांत छापले जात आहेत. मध्यंतरीं मानसिक आणि शारीरिक कष्टाचे अनेक प्रसंग आले– अंगांत अनीमियाचा विकार कायमचा जडला– सर्व प्रकारची महागाई बेसुमार वाढली– छपाई व कागद यांचे दर चौपट आठपट झाले ! अशा स्थितींत छपाईचा सर्व विचार बाजूस ठेवून आम्ही कागद दप्तरांत बांधून स्वस्थ बसलों. हा पंधरावा भाग आमच्या हातून कधीं काळीं छापला जाईल ही गोष्ट आमच्या स्वप्नांतसुद्धां येत नव्हती. दोन वर्षोपूर्वी आमचे मित्र महामहोपाध्याय प्रो. पोतदार यांची सहज गांठ पडली. त्या प्रसंगीं प्रो. पोतदार यांनीं कांहीं मंत्रविद्येचा प्रयोग केला म्हणा– बोलतां बोलतां आम्हीच इर्षेला चढलों म्हणा– त्या वेळीं कांहीं तरी झालें एवढें खरें ! त्या प्रसंगानंतर आम्हीं हा उद्योग पुनः हातीं घेतला. पूर्वापरसंबंध पाहण्यांत, अनेक प्रकारच्या मजकुराची जुळणी करण्यांत, उपलब्ध होणारी सर्व माहिती जमेस धरून ग्रंथाची रचना करण्यांत आमचें वर्ष दीड वर्ष मोडलें. आमच्या सर्व उद्योगाचें फळ आतां या पंधराव्या भागाच्या रूपानें प्रसिद्ध होत आहे.

**२ आयव्ययविचार**–ऐ. ले. संग्रहाला पूर्वीपासून लोकाश्रय अगदींच थोडा आहे– जवळ जवळ नाहींच. त्यांतच छपाई व कागद यांचे दर बेसुमार वाढले. त्यामुळें असलीं ऐति. पुस्तकें छापणें अशक्य होऊन बसलें आहे. आमची ही द्रव्यमूलक अडचण लक्षांत घेऊन पुण्याच्या भा. इ. सं. मंडळानें या ग्रंथाच्या तीनशें रुपयांच्या प्रती घेण्याचें ठरविलें आणि रुपये आगाऊ छापखान्यांत भरले. त्याप्रमाणेंच पुण्याच्या 'यशोदा-चिंतामणि ट्रस्ट' या संस्थेनें चालू वर्षाचें तीनशें रुपयांचें बक्षीस या ग्रंथास देण्याचें ठरविलें आणि रुपये आगाऊ छापखान्यांत भरले. या

दोन संस्थांनीं आम्हांला उदारपणानें ही जी मदत केली त्याबद्दल त्यांचे जेवढे आभार मानावे तेवढे थोडेच ठरणार आहेत. या देणग्या मिळाल्या तरी जमाखर्चाचें कोडें आमच्यापुढें अजून उभेंच आहे. आम्हीं या ग्रंथाच्या पांचशें प्रती छापल्या त्याला जवळ जवळ तीन हजार रुपये खर्च येत आहे. आम्हीं ग्रंथाची किंमत आठ रुपये ठेवली आहे. या किंमतींत पुनः लायब्ऱ्यांसारख्या संस्था सवलती मागणार आणि बुकसेलर कमिशन मागणार. ऐ. ले. सं. च्या सरळ दोनशे प्रती-सुद्धां खपत नाहींत. अशा स्थितींत जमाखर्चाची तोंडामिळवणी कशी होणार?

३ अतः किं? पुढें काय?—कै. तीर्थरूपांनीं आरंभिलेलें कार्य तडीला न्यावयाचें हा आमचा संकल्प सिद्धीस जाईल काय हा विचार या प्रसंगीं मनांत आल्याशिवाय रहात नाहीं. ऐ. ले. संग्रह हा ग्रंथ पूर्ण करावयाचा तर आणखी एक मोठा खंड प्रसिद्ध केला पाहिजे. या सोळाव्या खंडाची पूर्वतयारी तर कांहींच नाहीं. मिरजमळा दप्तर पाहून कागद निवडण्यापासून तयारीचा प्रारंभ करावयाचा आहे. शिवाय मराठी राज्याच्या उत्तरार्धाचे अजून तीन खंड छापावयाचे आहेत. शिवाय ऐ. ले. संग्रह आणि म. रा. उत्तरार्ध या ग्रंथांचा उपसंहार-ग्रंथ तयार करावयाचा आहे. हा उपसंहार-ग्रंथ सर्वांत महत्त्वाचा आहे. या ग्रंथांत मराठी राज्याच्या उत्कर्षापकर्षाची मीमांसा आणि तदनुषंगानें इतिहासाचे सिद्धान्त यांचें विवेचन करण्यांत येणार आहे. आतांपर्यंत पुढील कामाचा नकाशा दिला आहे त्यापैकीं किती गोष्टी आमच्या हातून सिद्धीस जातील? आमच्या वयास चौसष्टावें वर्ष लागलें—त्यांतच ॲनीमियाच्या विकाराचा उपद्रव—बुडित खर्चासाठीं पांच दहा हजार रुपये लागतील तेंही मिळण्याचा मार्ग दिसत नाहीं. या परिस्थितीचें उत्तर योगायोग असेल तें घडेल एवढेंच निघतें.

४ होळकर—पेशवाईंत यशवंत हें नांव फक्त मराठे, प्रभु या क्षत्रिय जातींतच प्रचारांत होतें. ब्राह्मण जातींत तर तें नांव सहसा ठेवीत नसत. पेशवाईंतील ब्राह्मण जातीचीं हजारों नांवें आमच्या वाचनांत आलीं आहेत. परंतु ब्राह्मण जातीपैकीं कुणाचें नांव यशवंतराव असलेलें आमच्या वाचनांत आलेलें नाहीं. पुढें पेशवाईअखेर यशवंतराव होळकर हा

महापराक्रमी पुरुष महाराष्ट्रीयांत निपजला त्यामुळें यशवंत हें नांव लोकप्रिय होऊन तें सर्व जातींत प्रचारांत आलें. ब्राह्मण जातींतही तें अभिमानानें ठेवूं लागले. होळकराचा यशोदुंदुभि महाराष्ट्रांत बरींच वर्षे दुमदुमत होता. इ. स. १८८५ सालीं आमच्या वडिलांनीं यशवंतराव होळकरावर एक काल्पनिक कथानक रचलें आणि त्यावर 'यशवंतराव महाकाव्य' नांवाचा एक काव्यग्रंथ लिहिला. कै. तीर्थरूपांचा हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. आमच्या जन्मकाळीं या ग्रंथास इंदूर दरबारकडून मोठें बक्षीस मिळालें त्यामुळें वडिलांनीं आमचें नांव यशवंत असें हौसेनें ठेवलें. पुढें आमच्या उद्योगामुळें होळकरांचा खराखुरा इतिहास प्रसिद्ध होत आहे हा एक योगायोगच समजला पाहिजे. होळकरांच्या चरित्राबद्दल येथें जास्त विवेचन करण्याचें कारण नाहीं. त्यासंबंधीं ऐ. ले. सं. भाग १२।१३।१४ यांतून पुष्कळच मजकूर छापला गेला आहे. या पंधराव्या भागाचा तर होळकर हा मुख्य विषयच आहे.

५ **राज्यनाशाचें मन्वंतर**— सवाई माधवराव पेशवे यांच्या मृत्यूनंतर मराठी राज्य बुडावें अशी परिस्थिति येत गेली आणि राज्यनाशाची क्रिया अत्यंत झपाट्यानें होऊं लागली. या राज्यनाशाच्या क्रियेबद्दल होळकरानें विचार प्रकट केले आहेत. ते मनन करण्यासारखे आहेत. होळकर म्हणतो, "आजपर्यंत हिंदुराज्य सर्वत्रांनीं एकदिल राहून चालविलें. अलीकडे ज्याचे त्याचे दौलतींत घरकलह होऊन राज्यविपर्यास पडोन हिंदुधर्म नाहींसा होण्यास मूळ जाहलें. त्याचें छेदन करण्यास सर्वांनीं एकदिल जालें पाहिजे. तरच मुळाचें छेदन होऊन स्वधर्माचार पूर्ववत् चालोन हिंदूंची कायमी राहील." घरकलहामुळें मराठी राज्य बुडत आहे हें होळकरानें केलेलें निदान बहुतांशीं बरोबर आहे. ऐ. ले. सं. चा उपसंहार लिहिण्याची संधि आम्हांस प्राप्त झाली तर त्यांत या होळकराच्या विधानाबद्दल विस्तृत विवेचन करण्यांत येईल.

६ **प्रतिनिधि प्रकरण**——या ग्रंथांत वर्णिलेलें प्रति. प्रकरण हें एक राज्यबुडव्या घरकलहाचें उत्कृष्ट उदाहरण होय. भवानराव प्रतिनिधींची स्त्री काशीबाई या महापराक्रमी आणि स्वाभिमानी होत्या. त्यांचे एकुलते एक चिरंजीव परशुरामपंत हेही अत्यंत धाडसी आणि शूर सरदार होते.

अशा स्थितींत आई व मुलगा यांमध्यें जें भांडण जुंपलें त्याला ना आगा ना पीछा! या भांडणाच्या पायांत प्रति. च्या सर्व दौलतीचा नाश झाला– अनेक संकटें येऊन कुटुंबांतील सर्व माणसांचे हाल झाले– कऱ्हाडच्या लढाईत पंतांचा हात तुटला आणि त्यांना 'थोटे पंत' ही पदवी प्राप्त झाली. शेवटीं पंत, काशीबाई आणि दौलतींतील प्रमुख माणसें हीं सर्व पेशव्यांच्या कैदेंत पडलीं! प्रतिनिधि प्रकरणाची पुढें आम्हीं माहिती दिली आहे ती अनेक दृष्टींनीं मनन करण्यासारखी आहे.

**७ ताईच्या पराक्रमाच्या भ्रमाचा भोपळा**––एका विनोदी कवीनें ताई तेलिणीबद्दल एक आर्या लिहून ठेवली आहे. ती अशी––

श्रीमंत पंत प्रतिनिधी यांचा किल्ला अजिंक्य वासोटा।
तेलिण मारी सोटा, बापू गोखल्या, संभाळा कासोटा॥

कवीची ही आर्या एके काळीं महाराष्ट्रांत फार लोकप्रिय झाली होती. या आर्येमुळें बापू गोखल्यांसारख्या विख्यात सरदाराशीं लढाई मारणारी ताई तेलीण ही एक महापराक्रमी स्त्री महाराष्ट्रांत होऊन गेली असा सार्वत्रिक समज रूढ झालेला आहे. पराक्रमाच्या बाबतींत झांशीची राणी लक्ष्मीबाई आणि कर्नाटकांतील कित्तूर चन्नव्वा या स्त्रियांशीं कांहीं-जण ताईची तुलना करतात. आम्हीं चौदा आणि पंधरा भागांत कागद छापले आहेत ते आमच्या वाडिलांच्या पाहण्यांत आले नव्हते त्यामुळें त्यांनाही ताईच्या पराक्रमाबद्दल भ्रम वाटत होता. ताईबद्दल कै० तीर्थरूपांनीं एके ठिकाणीं मजकूर लिहून ठेवला आहे तो असा–"पंतांची नाटकशाळा ताई तेलीण सुस्थळीं सुखरूप ठेवण्याची तजवीज पंतांनीं केली होती. छत्रपतींच्या अष्टप्रधानांपैकीं राजपंडितप्रधान आणि राव-पंडितप्रतिनिधि यांमध्यें जो हा चुरशीचा झगडा झाला त्याला कारण काय? तर तेलिणीची पोरगी! बाकी जिच्याबद्दल एवढ्या बड्या लोकांत झगडा व्हावा अशाच लायकीची ती नाटकशाळा होती, एवढें मात्र खरें! तिच्या पराक्रमाचा भरपूर वृत्तान्त ऐ. ले. सं. ची मजल पंधराव्या किंवा सोळाव्या भागापर्यंत कधीं काळीं पोचलीच तर वाचकांस वाचावयास सांपडेल!" (पहा भाग १२ पृ० ६५५०). कवीनें सहज एक आर्या लिहिली तींत त्यानें 'किल्ला वासोटा' 'तेलिणीचा **सोटा**' आणि

'गोखल्यांचा कासोटा' असा सोटा शब्दावर अनुप्रास जुळविला त्यामुळें हा सर्व घोटाळा माजलेला आहे ! हा घोटाळा दूर करण्यापुरती ताईच्या बंडाची हकीगत पुढें देतों.

८ ताईचें बंड—इ. स. १८०६ सालच्या एप्रिल–मे महिन्यांत कऱ्हाडच्या लढाईनंतर बापू गोखल्यांनीं पंत, काशीबाई आणि प्रति.च्या दौलतींतील प्रमुख माणसें यांना कैद केलें आणि त्यांची रवानगी पुण्यास करून दिली. नंतर गोखले कर्नाटकांत गेले. गोखले दूर गेलेले पाहून वासोटा किल्ल्यावरील गडकऱ्यांनीं ताई तेलिणीला पुढारी बनवून तिच्या नांवावर बंडाचें निशाण उभारलें. चार दोन किल्ले काबीज करून गडकऱ्यांनीं प्रांतांत दंगा मांडला. या बंडाचा बींमोड करण्याकरितां गोखले कर्नाटकांतून स. १८०७ च्या जून–जुलै महिन्यांत पुनः कऱ्हाड प्रांतीं आले आणि त्यांनीं गडकऱ्यांनीं घेतलेले किल्ले पुनः काबीज केले. नंतर गोखले वासोट्याकडे वळले. किल्ल्याखालीं इंदोली गांव आहे तेथें गडकरी आणि गोखल्यांची फौज यांमध्यें लहानशी चकमक झाली. तींत उभयपक्षीं दहा पांच माणसें जायां जखमी झालीं. ही काय ती एकच लढाई या वासोट्याच्या स्वारींत झाली. या चकमकीनंतर गडकरी शरण आले आणि तहाची वाटाघाट सुरू झाली. ताई ही मूळची लढाऊ वृत्तीची स्त्री नव्हती आणि वासोट्याचे गडकरी तर अगदींच नेभळट होते. सामान्य दंगा आणि लुटालूट करण्यापुरतीच त्यांना अक्कल होती. रास्त्यांच्या कुवारी आणि पांडवगड येथील गडकऱ्यांनीं पेशव्यांशीं लढतांना जसें शौर्य प्रकट केलें तसें शौर्य वासोट्याच्या गडकऱ्यांनीं दाखविलें असतें तर गोखल्यांचे डोळे पांढरे झाले असते ! परंतु तसा कांहींच प्रकार घडला नाहीं. तहाचें बोलणें फिसकटून गोखल्यांनीं स. १८०८ च्या फेब्रु.–मार्च महिन्यांत वासोट्याला वेढा घातला. या कामींही गडकऱ्यांनीं गोखल्यांना कांहींच विरोध केला नाहीं. वासोट्यासारखा आजिंक्य पहाडी किल्ला ताब्यांत असूनही गडकऱ्यांनीं लढण्याची कांहींच हिंमत दाखविली नाहीं. दोन तीन महिने वेढ्याचें काम रेंगाळत चालल्यावर गडकऱ्यांनीं बिनशर्त किल्ला गोखल्यांच्या स्वाधीन केला. हेंच काय तें ताईचें बंड आणि हाच काय तो ताईचा पराक्रम ! सारांश, वासोट्याची स्वारी हा

एक इतिहासांत नेहमीं घडणारा सामान्य प्रसंग आहे आणि ताईचा पराक्रम हा बहुतांशीं काल्पनिक आहे ही गोष्ट आम्हांस स्पष्टपणें सांगावयाची आहे.

**९ एक महत्त्वाचा इशारा**— ऐतिहासिक प्रसंगांवर कवि काव्यें, नाटकें, कादंबऱ्या लिहितात ही गोष्ट चांगलीच आहे. परंतु त्यामुळें पुष्कळ वेळां ऐति. सत्याचा विपर्यास होत असतो. असा विपर्यास झाल्याचीं पुष्कळ उदाहरणें आम्हांस दाखवितां येतील. सबब काव्यग्रंथ वाचतांना कवींचीं वर्णनें हा खराखुरा इतिहास आहे किंवा कवींच्या वर्णनांना नेहमीं ऐति. सत्याचा आधार असतो असा कोणीं गैरसमज करून घेऊं नये असा इशारा या प्रसंगीं देणें आम्हांस जरूर वाटतें.

**१० आभार**—पुण्याच्या भा. इ. सं. मंडळानें तीनशें रुपये आणि यशोदा-चिंतामणि ट्रस्ट या संस्थेनें तीनशें रुपये अशा देणग्या या ग्रंथास दिल्या आणि दोन्ही संस्थांनीं रुपये आगाऊ छापखान्यांत भरले या गोष्टीचा उल्लेख आम्हीं पूर्वी केलेला आहेच. या संस्थांच्या देणग्यांमुळेंच आम्हीं अशा दिवसांत हा ग्रंथ छापण्याचें धाडस केलें आहे. आमचे मित्र महामहोपाध्याय प्रो. पोतदार यांनीं या ग्रंथास पुरस्काराचा लेख लिहिला आहे तो सोबत छापला आहे.

कै. तीर्थरूपांचा पुण्यात्मा या अल्पसेवेनें संतोष पावो.

मिरज, ता. १० नोव्हें. १९४८.　　　　यशवंत वासुदेवशास्त्री खरे.

# ऐतिहासिक-लेख-संग्रह.

## भाग पंधरावा.

## कथानुसंधान.

शेवटच्या रावबाजींच्या कारकीर्दीत स्वराज्यरक्षणाचे जे लहानमोठे प्रयत्न झाले त्यांत होळकरानें केलेलें इंग्रजांशीं युद्ध हा सर्वांत मोठा प्रयत्न होय. यशवंतराव होळकर ही एक मराठी इतिहासांतील गूढ शक्ति होय. यशवंतराव हा मराठी परंपरेंतील शेवटचा सेनापति होय. शौर्य आणि धाडस, तत्कालीन नव्या जुन्या युद्धशास्त्राचें ज्ञान, हजारों लोकांवर हुकमत चालविणारा व्यक्तिविशेष (Personality) या बाबतींत होळकराच्या तोडीचा दुसरा सरदार पेशवाईच्या उत्तरार्धांत निपजला नाहीं. होळकर या व्यक्तींत एवढी मोठी जादू होती कीं, होळकर कोठेंही उभा राहिला तरी त्याच्याभोंवतीं हजारों अनुयायी हां हां म्हणतां गोळा होत. होळकर या व्यक्तींत एवढा आकर्षकपणा होता कीं, शत्रुसुद्धां त्याला तात्रडतोब वश होत. अशा लोकोत्तर राष्ट्रपुरुषाच्या राजकीय उलाढालींचें मर्म समजून घेणें आणि त्या त्या व्यक्तींच्या स्वभावाचा ठाव घेणें हें इतिहासलेखकाचें मुख्य काम आहे. हें काम ऐ. ले. संग्रहांतून आतांपर्यंत कांहीं अंशीं पार पाडलें गेलें आहे. चालू प्रकरणांत पुढें मजकूर छापला जाणार आहे त्यावरूनही होळकर या व्यक्तीचें मराठी इतिहासांतील स्थान बरेंच स्पष्ट होणार आहे.

चालू प्रकरणांत अनेक राजकारणांचे संबंध येत आहेत. शिवाय अनेक लष्करी हालचाली, अनेक व्यक्तींचे हितसंबंध, अनेकांचे हर्षामर्षाचे प्रसंग यांची बरीच गुंतागुंत या प्रकरणांत आलेली आहे. सन १७९५ सालानंतर मराठी राजकारणांत एकसूत्रीपणा आणि एकजिनसीपणा राहिला नाहीं. विनाधार आकाशांत सोडलेल्या पतंगाप्रमाणें मराठी

राजकारण हेलकावे खात होतें. एखाद्या चलच्चित्रपटाप्रमाणें दर क्षणीं नवे रंग आणि नवे ढंग त्या राजकारणांत दिसून येत होते. या क्षणीं स्मशानाचा देखावा तर पुढच्याच क्षणीं हर्षोन्माद उत्पन्न करणारा एखादा आनंदाचा प्रसंग दिसावा असा प्रकार त्या राजकारणांत चालला होता. अशा इतस्ततः पसरलेल्या गोष्टींचें राजकीय सूत्र निवडून काढणें हें मोठ्या कष्टाचें काम आहे. असो. या प्रकरणांत आलेल्या हकीगतींचे पूर्वापार संबंध आम्हीं लिहिलेल्या ऐ. लेखसंग्रह भाग बारा, तेरा आणि चौदा या तीन ग्रंथांतून सांगोपांग आणि विस्तृतपणें वर्णिलेले आहेत. बारावा भाग आम्हीं छापला त्याला तेवीस वर्षें झालीं. तेरावा भाग छापला त्याला एकवीस वर्षें होऊन गेलीं. चवदावा भाग छापला गेला त्यालाही सतरा वर्षें होऊन गेलीं. सारांश, ऐ. ले. संग्रहाचें कथानुसंधान तुटल्यासारखें झालें आहे. तें पुन्हां सूत्ररूपानें जोडल्याशिवाय पुढील कथाभाग सांगणें सोईचें नाहीं. सबब हातीं घेतलेला विषय स्पष्ट करण्याकरितां थोडासा विस्ताराचा आणि विषयांतराचा दोष पदरांत घेऊनही थोडी माहिती आम्ही येथें नमूद करतों.

**राज्यनाशाचें मन्वंतरः**— ता. २५ आक्टोबर १७९५ रोजीं सवाई माधवराव पेशवे यांनीं वेडाच्या लहरींत दुमजल्यावरून खालीं उडी टाकली आणि त्या अपघातानें पुढें दोन दिवसांनीं त्यांचा अंत झाला. व्यवहारदृष्ट्या या सामान्य गोष्टीचे पुढें फार भयंकर परिणाम झाले. या प्रसंगासंबंधानें आम्हीं एके ठिकाणीं पुढील मजकूर छापला आहे. "ज्या[1] श्रीमंतांच्या नांवावर नानांनीं आतांपर्यंत मोठमोठे व्यूह रचले आणि ते आपल्या अकलेच्या जोरावर पार पाडले त्या श्रीमंतांचा देह याप्रमाणें अपघातानें नष्ट होतांच नानांच्या मनोरथांचा आणि कर्तृत्वाचा डोलारा एकदम कोसळून जमीनदोस्त झाला. आजपर्यंतचे त्याचे सर्व श्रम मातीमोल ठरले, आणि सुकाणूं मोडलेल्या गलबताप्रमाणें ते स्वतः भवितव्यतेच्या तरंगावर विनाधार हेलकावे खाऊं लागले. राष्ट्रसंवर्धनाला आवश्यक असणाऱ्या सर्व सद्गुणांचा एकाएकीं नाश होऊन शाच-

---

1 नाना फडन. चरित्र पृ. १६६.

बाजीच्या राज्यनाशाच्या नवीन मन्वंतरास सुरवात झाली!" प्रत्येक गोष्ट उलटी सुलटी व्हावी असाच या मन्वंतराचा गुण होता!

**नानांची भविष्यवाणी**—सवाई माधवराव यांच्या मृत्यूमुळें बाळाजी बाजीराव यांचा वंश समाप्त झाला आणि पेशवाईचा वारसा ओघानें रघुनाथराव पेशव्यांचे थोरले चिरंजीव बाजीराव यांजकडे आला. बाजी-रावांविषयीं नानांचें मन अगदीं कलुषित झालेलें होतें. बाजीराव हा नादान, क्षुद्र बुद्धीचा, हलक्या कानांचा, हलकट वृत्तीचा माणूस आहे. अक्कलेचें भांडवल त्याजवळ तिळमात्र नाहीं. रघुनाथराव पेशव्यांनीं नारायणरावाचा खून करून आणि इंग्रजांची मदत घेऊन सर्व मराठी राज्यावर गंडांतर आणलें होतें. त्यामुळें सर्वांचें रघुनाथरावांच्या वंशाशीं अत्यंत वांकडें पडलें होतें. बाजीराव गादीवर आला तर तो पूर्वीचा द्वेष मनांत ठेवून सर्वांचें वाटोळें करील आणि आपल्या बापाप्रमाणें मूर्खपणानें इंग्रजांशीं सख्य जोडून सर्व मराठी राज्य इंग्रजांच्या पदरांत घालील. याप्रमाणें नाना फडणवीसांनीं बाजीरावाविषयीं आगाऊच भविष्य[1] वर्तविलें होतें. आणि तें पुढें शब्दशः खरें ठरलें. असो. पेशव्यांचा असा दुर्दैवी शेवट होतांच क्षणभर सर्वांचीच दिशाभूल झाली आणि कोणास कांहीं सुचेनासें झालें. नानांनीं शिंदे होळकरांसुद्धां सर्व लहानमोठे सरदार व मुत्सद्दी पुण्यास जमा केले आणि अनेक युक्तिवाद सांगून सर्वांची एकवाक्यता करून पुढील मसलत ठरविली ती अशी—
"बाजीराव नालायख आहे. तो गादीवर आला तर राज्याचा घात होईल. माजी पेशव्यांची स्त्री यशोदाबाई हिच्या मांडीवर दत्तक देऊन त्याच्या नांवानें राज्य चालवावें. कांहीं झालें तरी बाजीरावास गादीवर आणूं नये." याप्रमाणें मसलत मुकरर होऊन त्याप्रमाणें एक करारपत्र तयार करण्यांत आलें आणि त्यावर शिंदे होळकरांसुद्धां सर्वांनीं सह्या केल्या.

**शिंदेशाहीचा वरवंटा**:—सन १७८२ सालीं मराठे व इंग्रज यां-मध्यें शिंद्यांच्या मध्यस्थीनें सालबाईचा तह घडून आला. त्या तहानें

---

१ पहा ग्रांट डफ च्याप्. ३८ पृ. ५२१ आणि ऐ. ले. सं. भाग ९ पृ. ४७७४–८०.

दिल्लीच्या पातशाही राजकारणांतून इंग्रजांनीं कसें अंग काढून घेतलें आणि सर्व पातशाही दौलत महादजी शिंद्यांच्या हातांत कशी सांपडली याचें सविस्तर वर्णन आम्हीं नाना फडणवीस चरित्र प्रकरण आठवें यांत विस्तृतपणें केलें आहे. शिंद्यांनीं मिळालेल्या संधीचा पुरेपूर फायदा घेतला आणि पातशाहीं दौलतीच्या जोरावर कवाइती पलटणें आणि तोफखाना उभारला आणि आग्र्यास दारूगोळ्याचा कारखानाही काढला. त्यामुळें शिंदे हे मराठी राज्यांत जबरदस्त सरदार होऊन बसले. पुढें तर शिंदे म्हणतील ती पूर्वदिशा असा प्रकार मराठी राज्यांत होऊन बसला. शिंद्यांचा मराठी राज्याचा अभिमान जाज्ज्वल्य होता. त्यामुळें त्यांच्या सामर्थ्याचें कोणास भय वाटत नसे. पुढें महादजींच्या पश्चात् दौलतराव हे गादीवर बसले आणि सर्व गोष्टी उलटसुलट होऊन शिंद्यांचीं पलटणें हा एक कुऱ्हाडीचा दांडा आणि गोतास काळ होऊन बसला! दौलतराव हा बाजीरावाप्रमाणेंच नादान, भ्याड आणि क्षुद्र वृत्तीचा होता. तो इंद्रियांच्या सुखाला लालचावलेला, अदूरदृष्टीचा आणि अस्थिर बुद्धीचा माणूस होता. बाजीराव मोठा लटपट्या होता. त्यानें शिंद्यांचे कारभारी बाळोबा तात्या पागनीस यांना वश करून घेतलें आणि त्यांच्या मार्फत दौलतरावांशीं बोलणें लाविलें कीं, पेशवाईचा मी वारस असतांना नानांनीं दत्तकाची मसलत उभी केली आहे, हा केवढा अन्याय! तुम्ही मला गादी मिळवून द्याल तर मी तुम्हांस पंचवीस लक्षाची नवीन जहागीर आणि सव्वा कोट रुपये बक्षीस देतों. शिंदे या आमिषाला बळी पडले आणि त्यांनीं आपल्या अकलेची पगडी एकदम फिरविली! शिंदे व बाळोबा हे नानांविरुद्ध एकाएकीं वाटेल तशा वल्गना करूं लागले! राज्यनाशाच्या मन्वंतराचा नानास हा पहिला धक्का बसला.

**घोटाळा व तारांबळः**—मनुष्य कितीही बुद्धिवान् आणि कर्तृत्ववान् असला तरी त्याला वस्तुगतीचा ओघ थांबवितां येत नाहीं किंवा त्याला दैवगतीचे फेरे चुकवितां येत नाहींत हा कटु अनुभव शेवटीं नानांना घ्यावा लागला. शिंदे बाजीरावास अनुकूल झालेले पाहून नाना

१ पहा भाग नववा पृ. ४७७५-८० आणि नाना फडन. चरित्र पृ. १६८-७०.

घाबरले आणि दत्तकाचा नाद सोडून त्यांनीं आपण होऊन बाजीरावास गादीवर बसविलें. नानांनीं आपली मसलत फसविली असें पाहून शिंदे खवळले आणि ते द्रव्याच्या आशेनें जांबगांवाहून पुण्याकडे येऊं लागले. शिंदा पुण्यास येणार असें पाहून पुण्यास एकच गडबड उडाली आणि जो तो आपला वित्तविषय घेऊन पळूं लागला. नानाही पुण्याहून वाईस पळाले. एवढे मोठे नाना फडनवीस परंतु ते वाईस निघाले तेव्हां त्यांना सोबतीला धड दहा माणसेंसुद्धां गोळा करतां आलीं नाहींत. शेवटीं परशुरामभाऊ पटवर्धनांनीं आपले चारपांचशें लोक सखाराम घाटगे याच्या हाताखालीं नानांबरोबर दिले. तेव्हां ते एकदांचे वाईस सुरक्षित पोंचले. नाना पुढें वाईहून महाडास गेले. नानांबरोबर जाणारा सखाराम घाटगे हा मनुष्य विशेष लक्षांत ठेवण्यासारखा आहे. तो कागलकर घाटगे घराण्यापैकीं होता. कागलकर यशवंतराव घाटगे याशीं सखारामाचें भयंकर वितुष्ट वाढलें तेव्हां तो जीव बचावून परशुरामभाऊंच्या आश्रयास पळून आला. पुढें भाऊंच्या वशिल्यानें त्याचा नानांकडे प्रवेश झाला. आणि तेथून त्याचा झपाट्यानें उत्कर्ष होत गेला. सखाराम हा अत्यंत दुष्ट, समयास मायमावशी न ओळखणारा, क्रूरकर्मा, एक नरराक्षस या दृष्टीनें पुढें त्याचें नांव मराठी इतिहासांत अजरामर होऊन बसलें आहे. कागलकर घराण्याला विजापूरकर पातशहाकडून सर्जेराव असा किताब चालत होता. त्यामुळें सखाराम हा सर्जेराव घाटगे या नांवानें ओळखला जातो. दुसरा एक मनुष्य या वेळीं नानांच्या दरबारांत लुडबुडत होता. त्याचें नांव बाळोजी कुंजर. तो पुरंदर किल्ल्याखालील बांगापूर या गांवच्या पाटलाचा लेकावळा होता. तो मोठा लटपट्या आणि थापाड्या होता. तो बाजीरावाच्या नांवावर नानांजवळ वाटेल तशा थापा मारीत असे आणि नानांच्या नांवावर बाजीरावाजवळ थापा मारीत असे. त्याच्या अकलेवर बाजीराव खूष झाला आणि पुढें पेशवाई मिळाल्यावर त्यानें कुंजरास दिवाणगिरी दिली!

**नानांचें महाडचें [1]कारस्थानः**—( १७९६ जून–नोव्हेंबर ) नाना

---

१ नाना फडन. चरित्र प्रकरण १५-१६ आणि भाग ३ पृ. ४८९०-४९२५.

पुण्याहून गेल्यावर शिंद्यांनीं द्रव्याच्या आशेनें बाजीरावास कैद केलें आणि त्याचा धाकटा भाऊ चिमाजी अप्पा यास पेशवेपद देऊन पेशवाईचा सर्व कारभार परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या हवालीं केला. या नवीन कारस्थानाची सर्व उठावणी आणि उभारणी करण्यांत शिंद्यांचे कारभारी बाळोबा तात्या पागनीस हे प्रमुख होते. नानांनीं शिंद्यांची ही जबरदस्ती फार दिवस चालूं दिली नाहीं. त्यांनीं शिंद्यांविरुद्ध महाडास बसून एक मोठें कारस्थान उभारिलें. हें महाडचें कारस्थान इतिहास-प्रसिद्ध आहे. या कारस्थानांत श्रीमंत व शिंदे यांना वश करून घेण्यांत नानांनीं बाळोजी कुंजर आणि सर्जेराव घाटगे यांचा उपयोग करून घेतला. घाटग्यांची मुलगी रूपानें सुंदर आणि उपवर होती. ती मुलगी पुढें दौलतरावास देऊन घाटगे हा एका दृष्टीनें शिंदेशाहीचा मालकच होऊन बसला. शिंद्यांच्या नांवावर तो काय वाटेल तें करूं लागला. नानांचें हें महाडचें कारस्थान मोठें सर्वव्यापी होतें. त्यांच्या प्रेरणेवरून महाराष्ट्रांत जागजागीं नवीन फौजा गोळा होऊं लागल्या. निजाम व भोसले यांच्या फौजाही पुण्याकडे येऊं लागल्या. इंग्रजही लढाईची तयारी करूं लागले. नानांच्या कारस्थानाचें हें विश्वरूप पाहून शिंद्यांनीं पुनः एकदां आपल्या अकलेची पगडी फिरविली! त्यांनीं बाळोबा-तात्या आणि परशुरामभाऊ यांस कैद केलें आणि बाजीरावास मुक्त करून शिंद्यांनीं नानांशीं पुन्हां सख्य जोडलें. या सर्व कारस्थानाची विस्तृत हकीगत आम्हीं नाना फडनवीस चरित्र प्रकरण पंधरा यांत दिलेली आहे. सन १७९६ सालच्या अखेरीस नानांनीं पुन्हां पेशवाईचा कारभार हातीं घेतला.

**नानांचे शेवटचे दिवसः-** ( १७९७:- मार्च १८०० ) शिंद्यांच्या जबरदस्तीपुढें नानांचा कारभार सरळ नांदला नाहीं. शिंद्यांनीं द्रव्याच्या आशेनें शेवटीं विश्वासघात करून नानांस कैद केलें. नंतर शिंदे, सर्जेराव घाटगे आणि त्याचा दोस्त फकीरजी गाढवे आणि बाणाजी शेटया हुजऱ्या यांनीं पुण्यांत नंगानाच घातला. त्यांच्या तावडींत सांपडून शेंकडों मेले, हजारों नागवले गेले आणि हजारों अब्रूस आणि प्राणांस मुकले! सुमारें दोन वर्षें पुण्याची राजधानी साक्षात् यमपुरी बनली

होती! याप्रमाणें पेशवाईतील सर्व अब्रूदार लोकांचें वाटोळें करून बाजी, दौलत, सर्जे हे तीन राव एकदांचे कृतकृत्य झाले. द्रव्याच्या आशेनें शिंद्यांनीं नानांस पुढें कैदेंतून सोडलें. अशा स्थितींत सर्वस्वाचा नाश झालेला पाहून कष्टमय स्थितींत नानांचा ता. १३ मार्च १८०० रोजीं अंत झाला. या सर्व प्रकरणाची सविस्तर हकीगत आम्हीं ऐ. ले. संग्रह भाग दहा, अकरा आणि बारा यांत दिलेली आहे. मराठी राज्य कशानें बुडालें याचें उत्तर या हकीगतींत बरेंचसें सांपडतें.

**शिंद्यांचे किळसवाणे अत्याचार:**—शिंदे बाया ( सन १७९९–१८०२ ) सन १७९१ सालीं महादजी शिंदे दक्षिणेंत आले तेव्हां त्यांजबरोबर त्यांच्या तीन स्त्रिया होत्या. पुण्याकडे येतांना वाटेंत शिंदे तुळजापुरास गेले. तेथें भोपे कदम यांची एक उपवर सुंदर मुलगी होती. शिंद्यांनीं तिच्याशीं सन १७९२ च्या एप्रिल महिन्यांत हौसेनें लग्न केलें. शिंद्यांच्या या चारी स्त्रिया पुढें दौलतरावांच्या तावडींत सांपडून त्यांचे हाल हाल झाले. भोप्यांच्या मुलीवर दौलतरावाची पापदृष्टि होती. सन १८०१ सालीं एकदां संधि साधून त्यांनीं आपला हेतु तडीला नेला. त्यांच्या या नीच कर्माचा पुढें बोभाटा झाला. तेव्हां शिंद्यांनीं त्या मुलीला अहमदनगरच्या किल्ल्यावर नेलें आणि अंधारकोठडींत टाकलें. गरीब बिचारी भोप्यांची मुलगी. सावत्र मुलानें तिच्यावर बलात्कार केला तो केलाच आणि तिलाच पुढें अंधारकोठडीची शिक्षा दिली! दौलतरावाच्या असल्या हलकट लीला पाहून शिंद्यांच्या फौजेंतील मुसलमान, मराठे आणि शेणवी सरदार रागानें बेफाम झाले. शिंद्यांच्या बाकीच्या तिघी स्त्रिया होत्या त्याही खवळल्या. त्यांपैकीं थोरली स्त्री लक्ष्मीबाई ही मोठी पराक्रमी स्त्री होती. तिनें पुकारा केला कीं, आपण दौलतरावाला दत्तक घेतलें आहे तो दत्तक खोटा आहे. आपण आतां दुसरा दत्तक घेणार आहों. त्याला सरकारांतून सरदारी मिळावी. याप्रमाणें बायांचें बंड उभें राहिलेलें पाहून सर्जेराव घाटग्यानें एका प्रसंगीं या तिघी स्त्रियांस चाबकाचा मार दिला. लक्ष्मीबाईनें पुढें फौज जमा करून उघड उघड बंड केलें. हा बंडाचा वणवा दक्षिणेंत आणि उत्तर हिंदुस्थानांत सर्वत्र पसरला आणि त्यांत

शिंद्यांच्या जहागिरीचा सर्व मुलूख उद्ध्वस्त झाला. पुढें सन १८०५ सालीं इंग्रजांनीं मध्यस्थी करून हा बायांचा दंगा शांत केला. पातशाही आणि पेशवाई या दोनी दौलती एके काळीं महादजीबावांच्या अगदीं मुठींत आल्या होत्या. एवढे मोठे पाटीलबावा! त्यांच्या दत्तक मुलानें त्यांच्या स्त्रियांची केलेली ही विटंबना पाहून मनांत आश्चर्य आणि विषाद यांचे अनेक तरंग उदय पावतात! शिंदे बायांच्या या कर्मकहाणीची विस्तृत हकीगत आम्हीं ऐ. ले. संग्रह भाग अकरा, बारा आणि तेरा यांत दिलेली आहे.

**शिंदे होळकरांची चुरस:**—शिंदे व होळकर या उत्तरेकडील दोन मराठे सरदारांत पूर्वीपासून भांडणें चालू असत. महादजी शिंदे आणि तुकोजी होळकर यांच्या कारकीर्दींत या भांडणाला द्वेषाचें स्वरूप आलें. हा द्वेष वाढतां वाढतां सन १७९३ सालच्या मे महिन्यांत माळवा प्रांतीं शिंदे व होळकर यांची लाखेरी मुक्कामीं भयंकर लढाई झाली आणि तींत होळकरांच्या फौजेचा सर्वस्वीं नाश झाला. नाना फडनविसांनीं मध्यस्थी करून हें भांडण तात्पुरतें मिटविलें. पुढें सन १७९५ सालीं तुकोजीराव मृत्यु पावले तेव्हां दौलतराव शिंद्यांनीं आपला शिंदेशाही वरवंटा होळकरांच्या दौलतीवर फिरविण्याची तयारी केली. तुकोजीरावांना काशीराव, मल्हारराव, विठोजी आणि यशवंतराव असे चार पुत्र होते. थोरला काशीराव वेडसर होता. शिंद्यांनीं पेशव्यांना आग्रह करून वेडसर काशीरावालाच सरदारी देवविली आणि काशीरावाच्या नांवावर शिंद्यांनीं होळकरांची सर्व दौलत हातांत घेतली. तुकोजीरावांचे बाकीचे तिघे मुलगे चांगले पराक्रमी होते आणि त्यांच्यामध्यें एकजूट होती. मल्हाररावानें फौज जमा धरून शिंद्यांच्या जुलमाचा प्रतिकार करण्यास सुरवात केली. तेव्हां शिंद्यांनीं ता. १४ सप्टेंबर १७९७ रोजीं भर दिवसां पुणें मुक्कामीं होळकर बंधूंवर छापा घातला.[1] या छाप्याच्या गर्दींत मल्हारराव ठार झाला आणि विठोजी व यशवंतराव हे जीव बचावून पळाले. मल्हाररावाची स्त्री जईबाई आणि अल्पवयी मुलगा खंडेराव यांनाही

---

१ पहा भाग दहावा पृ. ५१८६ आणि पत्र नं. ४०७३.

पेशव्यांनीं पकडून पुण्यांत कैदेंत ठेविलें. पुढें विठोजी हा फौज जमा करून दंगा करूं लागला. तेव्हां पेशव्यांनीं त्यालाही पकडलें आणि ता. १७-४-१८०१ रोजीं त्याचे हाल हाल करून त्याला ठार मारविलें.[१] यशवंतराव होळकरानें मात्र शिंद्यांचा पुरेपूर सूड घेतला. तो माळवा प्रांतीं गेला आणि फौज जमा करून त्यानें होळकरांची जहागीर ताब्यांत घेतली. नंतर शिंद्यांच्या मुलखांत शिरून त्यानें तो प्रांत लुटून उद्ध्वस्त केला. नर्मदे-पलीकडे शिंद्यांची मोठी फौज आणि हजारों कवायती पलटणें होतीं. होळकरानें एकाच सपाट्यांत या सर्व फौजांची अगदीं दाणादाण उडवून दिली.

**होळकरांची दक्षिणेवर स्वारीः**—मोरोबा दादा फडनवीस, बाबा फडके, नारोपंत चक्रदेव, धोंडोपंत नित्सुरे वगैरे नानांच्या वेळचे कांहीं जुने मुत्सद्दी अजून शिल्लक राहिले होते. त्यांनीं सन १८०१ सालीं शिंद्यांविरुद्ध[२] एक मोठें कारस्थान उभें केलें. दादासाहेब पेशव्यांचे दत्तक चिरंजीव अमृतराव पेशवे हे या कारस्थानाचे पुढारी बनले. सर्वांनीं खलबत करून होळकरांशीं बोलणें लाविलें[३] कीं शिंदे व बाजीराव यांच्या हातांत सांपडून मराठी राज्याचा नाश होणार ही गोष्ट स्पष्ट दिसत आहे. तुम्हीं दक्षिणेंत येऊन पुणें दरबार, पेशवे व शिंदे यांचा बंदोबस्त करावा. तुम्ही ही कामगिरी कराल तर आम्ही तुम्हांस एक कोट रुपये आणि दहा लक्षांची जहागिरी देऊं. होळकरानें या आमंत्रणाचा स्वीकार केला आणि तो दक्षिणेंत आला. त्याच्या पाठोपाठ शिंद्यांची फौजही दक्षिणेंत आली. ता. २५–१०–१८०२ रोजीं पुण्याजवळ हडपसर[४] येथें मोठी लढाई होऊन होळकरानें शिंदे व पेशवे यांच्या फौजांची अगदीं दाणादाण उडवून दिली. नंतर पेशवे घाबरून इंग्रजांकडे गेले आणि त्यांनीं ता. ३१ डिसेंबर १८०२ रोजीं वसईचा[५] तह करून सर्व मराठी राज्याचें

---

१ पहा भाग तेरावा पृ. ६८५७–५८ आणि पत्र नं. ६०२७. २ या कारस्थानाचा वृत्तान्त आम्हीं भाग तेरा पृ. ६८५१-५३ यांत दिला आहे. ३ पहा भाग चौदा पृ. ७४०४-८. ४ भाग चौदावा पृ. ७४३०-४०. ५ भाग चौदा पृ. ७४६०-७०.

उदक इंग्रजांच्या हातावर सोडलें. हा सर्व मजकूर आम्हीं ऐ. ले. संग्रह भाग तेरावा आणि चवदावा यांत छापला आहे. याप्रमाणें पेशवाईचे खुद्द मालक इंग्रजांच्या हातांत सांपडले. इंग्रजांचा मराठी राजकारणांत चंचुप्रवेश नव्हे मुसलप्रवेश झाला. हें पाहून होळकर व त्याचे देशभक्त सोबती यांचा राज्यरक्षणाचा सर्व डाव उधळला. एकीकडे शिंदे आणि पेशवे आणि दुसरीकडे इंग्रज अशी दुहेरी लढाई एकाच वेळीं देण्याचें सामर्थ्य होळकरामध्यें नव्हतें. अर्थात् त्यानें आपला स्वतंत्र पंथ काढला. बाजीराव इंग्रजांकडे गेलेले पाहून होळकर वाटेल त्या मार्गानें पुण्याच्या रहिवाश्यांकडून पैसा वसूल करूं लागला. शिंद्यांनीं पूर्वीं पुण्याच्या राजधानीची यमपुरी बनविली होती. जवळ जवळ होळकरानेंही पुढें तोच प्रकार केला ! विशेषतः बाजीरावाच्या प्रेमांतलीं चिंतोपंत देशमुख, वैजनाथभट मामा भागवत असलीं माणसें होळकरांच्या ताव-डींत सांपडलीं. त्यांचे तर त्यानें अत्यंत हाल हाल केले. होळकराच्या सहकाऱ्यांतही पुढें फाटाफूट झाली. मोरोबा फडनवीस पुढें इंग्रजांच्या आश्रयास गेले. बाबा फडके पुढें इंग्रजांच्या कैदेंत पडले. अमृतराव पुढें इंग्रजांच्या वशिल्यानें काशीस जाऊन राहिले. फत्तेसिंग माने हा होळकरांचा सेनापति पुढें पेशव्यांकडे फितूर झाला, आणि मीरखान पठाण हा निजामाकडे फितूर झाला. सन १८०३ च्या मे महिन्याच्या सुमारास इंग्रजी फौजा पुण्याकडे येऊं लागल्या तेव्हां होळकर निराश होऊन माळवा प्रांतीं गेला.

**इंग्रजी वर्चस्वाविरुद्ध शिंदे भोसले यांची धडपड**[1]--पेशव्यांनीं इंग्रजांशीं वसईचा तह केला ही गोष्ट मराठी राज्यांत कोणासच पसंत नव्हती. शिंदे व नागपूरकर भोसले यांनीं इंग्रजांविरुद्ध उघडपणें कंबर बांधली. इंग्रजांशीं लढण्याचा प्रसंग पडला तेव्हां शिंद्यांनीं होळकरांशीं सख्य जोडण्याचा अतिशय प्रयत्न केला. शिंद्यांनीं व पेशव्यांनीं मल्हार-राव व विटोजी हे आपले दोघे भाऊ ठार मारले आहेत ती गोष्ट आतां

---

१ शिंदे-भोसल्यांनीं इंग्रजांशीं युद्ध केलें त्याचा वृत्तान्त आम्हीं भाग चौदा, पृष्ठ ७८०८-७८५० यांत दिला आहे.

परत येत नाहीं. शिंद्यांनीं वेडसर काशीराव हा सरदारीचा वारस म्हणून ठरविला आहे ती गोष्ट खोटी आहे. मल्हाररावाचा मुलगा खंडेराव हाच होळकरांच्या सरदारीचा वारस समजावा असें यशवंतरावाचें म्हणणें होतें. शिंद्यांनीं ती गोष्ट या प्रसंगीं मान्य केली. शिंदे सन १८०० सालीं उत्तर हिंदुस्थानकडे निघाले तेव्हां त्यानीं खंडेरावाला पेशव्यांकडून मागून घेऊन आपल्या ताब्यांत ठेविलें होतें. होळकराला खूष करण्याकरितां शिंद्यांनीं खंडेरावाला मोठ्या सन्मानानें त्याजकडे पाठवून दिलें. शिवाय भोसल्यांनींहि शिंदे व होळकर यांमध्यें मैत्री करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. परंतु शिंदे व भोसले यांचे या बाबतींत सर्व प्रयत्न फोल ठरले. त्यांच्या शिष्टाईचा एवढाच परिणाम झाला कीं, यापुढें झालेल्या युद्धांत होळकर हा पूर्णपणें तटस्थ राहिला. शिंदे व भोसले यांनीं इंग्रजां-विरुद्ध लढण्याचें मोठें अवसान आणिलें परंतु त्यांच्या सर्व वीरश्रीचा शेवटीं बोजवारा झाला. उभय पक्षांत ता. २३ सप्टेंबर १८०३ रोजीं असई येथें मोठी लढाई झाली. तींत पुण्याच्या भटा-भिक्षुकांवर आणि दीनदुबळ्या रयतेवर हत्यार चालविणारे राज्य बुडविणारे दौलतराव शिंदे अलिजहांबहाद्दर हे इंग्रजांशीं लढतांना तोफेच्या पहिल्या बाराबरोबर जीव घेऊन रणांगणावरून पळाले! रघोजी भोसले सेनासाहेब सुभा यांनींही लौकरच तोच कित्ता गिरविला. शिंद्यांच्या पलटणावरचे गोरे अंमलदार हरामखोरी करून ऐन वेळीं इंग्रजांना मिळाले. अर्थात् या लढाईत इंग्रजांना सुलभपणें यश मिळालें.

शिंदे व इंग्रज यांमधील हें युद्ध असेंच वर्षभर रेंगाळत चाललें होतें. शिंद्यांच्या पलटणावरील गोरे अंमलदार मोठे बिलंदर हरामखोर निपजले. शिंद्यांचा तोफखाना, दारूगोळा, कोट्यवधी रुपयांचा खजिना, आग्र्याच्या किल्ल्यावर असलेला शिंद्यांचा दारूगोळ्याचा कारखाना वगैरे शिंद्यांची सर्व दौलत उपटून हे गोरे अंमलदार इंग्रजांना मिळाले. ता. १ नोव्हेंबर १८०३ रोजीं अंबोजी इंगळ्यांनीं इंग्रजांशीं लासवारी येथें लढाई दिली. ही मात्र बरीच चुरशीची झाली. एवढी एक लढाई वगळली म्हणजे या युद्धांत शिंद्यांनीं शत्रूशीं कोठें मोठीशी लढाई दिलीच नाही. हिंदी लोकांशीं लढतांना हे गोरे अंमलदार मोठ्या इमानानें लढत. इंग्रजांशीं

लढतांना मात्र सारे गोरे गोरे एक झाले आणि गोऱ्या लोकांवर विश्वास ठेवणारे काळे दौलतराव आयत्या वेळीं तोंडघशीं पडले. महादजी शिंद्यांच्या वेळींही या पलटणांनीं वेळोवेळीं अशीच हरामखोरी करून त्यांना तोंडघशीं पाडलें होतें. आपल्या अकलेची शेंडी दुसऱ्याच्या हातांत देऊन महादजीबावांनीं पलटणें उभारलीं तीं पुढें शिंद्यांच्या आणि मराठी राज्याच्या नाशास कारण झालीं. असो. सन १८०४ च्या मे जून महिन्यांत शिंद्यांनीं इंग्रजांच्या सर्व अटी कबूल करून या युद्धांतून आपली सुटका करून घेतली.

आतांपर्यंत सन १७९६ पुढील इतिहासाचा त्रोटक सारांश दिला आहे, त्यावरून प्रत्येक गोष्टींत सर्वांना शेवटीं अपेशच येत गेलें ही गोष्ट स्पष्ट दिसते. नानांनीं राज्यरक्षणाचे अनेक प्रयत्न केले ते सर्व त्यांच्या अंगाशीं आले आणि प्रत्येक गोष्ट करावी त्याच्या उलट होत गेली. बाजीरावांनीं सर्वांच्या उरावर बसून राज्य मिळविलें, सर्वांचें वाटोळें करून राज्याचें स्मशान बनविलें आणि शेवटीं सर्व मराठी राज्य इंग्रजांच्या घरांत घातलें. शिंद्यांनीं बाजीरावाच्या नादीं लागून राज्याचा नाश केलाच आणि शेवटीं आपलाही नाश करून घेतला. होळकर व त्याचे शूर सोबती यांचेही राज्यरक्षणाचे सर्व प्रयत्न असेच फुकट गेले. या प्रकरणाच्या प्रारंभीं **राज्यनाशाचें मन्वंतर** या मथळ्याखालीं आम्हीं मजकूर दिला आहे त्याचें प्रत्यंतर यापुढें मराठी इतिहासांत प्रत्येक प्रसंगीं पहावयास सांपडतें.

तत्कालीन दक्षिण महाराष्ट्रांत श्रीनिवासराव भवानराव प्रतिनिधि ही एक अत्यंत धाडसी, शूर आणि स्वाभिमानी विभूति होऊन गेली. यांनाच पंत किंवा थोटेपंत असें म्हणत असत. या ग्रथांत पुढें पत्रव्यवहार छापला आहे त्यांपैकीं बऱ्याच पत्रांतून पंतांच्या हालचालींसंबंधीं पुष्कळ मजकूर आलेला आहे. शिवाय भाग दहा, अकरा, बारा, तेरा आणि चवदा या पांची ग्रंथांतून पंतांसंबंधीं बराच महत्त्वाचा मजकूर जागजागीं आलेला आहे. या प्रतिनिधि प्रकरणाचा सविस्तर वृत्तान्त आम्ही पुढें यथाप्रसंगीं स्वतंत्रपणें एकत्रच देणार आहों.

# ऐतिहासिक-लेख-संग्रह भाग पंधरावा.

( स. १८०४ जून ते स. १८०९ अखेर. )

या ग्रंथांतील प्रमुख विषयः—

**( १ ) होळकर व इंग्रज यांमधील रणसंग्राम**—हा या ग्रंथाचा मुख्य विषय आहे. **( २ ) प्रतिनिधींचा दंगा. ( ३ ) मान्यांचें बंड. (४) सांगलीकरांचे पराक्रम. ( ५ ) ताई तेलिणीचें बंड. (६) पटवर्धन सरदारांची दैना. ( ७ ) कर्नाटकांत पाळेगारांचे दंगे. (८) पुणें दरबार आणि पेशव्यांचा स्वैर कारभार. (९) इंग्रजांचें धूर्त राजकारण. ( १० ) अंतर्गत राज्यव्यवस्था.**

**( १ ) होळकर व इंग्रज यांमधील रणसंग्रामः**—या रणसंग्रामाचें ऐतिहासिक दृष्ट्या यथातथ्य स्वरूप समजण्याकरितां इंग्रज, पेशवे, शिंदे, भोसले वगैरे राजपथकी सरदार यांच्या राजकीय परिस्थितींत फार मोठी क्रांति घडून आली होती. ती प्रथमतः क्रमशः सांगितली पाहिजे.

१ **इंग्रज**—सन १७९५ नंतर पुढील दहा वर्षे इंग्रजांची अकल्पित भरभराट होत गेली. मराठ्यांपैकीं गायकवाड हे सर्वांआधीं इंग्रजांच्या आहारीं सांपडले. त्यानंतर सन १७९९ सालीं इंग्रजांनीं फितुराचा दुष्ट प्रयोग करून टिपूचें राज्य बुडविलें. पुढें सन १८०१ सालीं इंग्रजांनीं त्याच दुष्ट हत्याराचा प्रयोग करून धोंडजी वाघाचा नाश केला. पुढें सन १८०२ अखेरीस इंग्रजांनीं पेशव्यांशीं वसईचा तह केला. या योगानें त्यांच्या वैभवाचा कळस झाला. मराठी आणि मोंगली साम्राज्यांची वारसदारी एका दृष्टीनें पेशव्यांस प्राप्त झाली होती. परंतु 'दैवानें दिलें तें कर्मानें नेलें' अशी त्यांची स्थिति होऊन बसली. वसईच्या तहानें पंतप्रधान पेशवे बहादूर हे इंग्रजांच्या हातांतलें बाहुलें होऊन बसले ! पुढें १८०३-१८०४ सालीं इंग्रजांचें शिंदे भोसल्यांशीं युद्ध झालें. त्यांत इंग्रजांच्या फितुरानें नंगानाच घातला. शिंद्यांची फौज, पलटणें, तोफखाना, अलीगड-आग्र्यासारखीं अजिंक्य स्थळें यांचा इंग्रजांनीं सहजासहजीं विध्वंस केला. याबद्दलचा सविस्तर वृत्तान्त आम्हीं

भाग १४ पृष्ठ ७८०८–७८४० यांत दिलेला आहे. सारांश, इंग्रजांनीं वेळोवेळ केलेले फितुराचे दुष्ट प्रयोग सामान्य लोकांच्या विशेषसे लक्षांत आले नाहींत. त्यांनीं मिळविलेल्या विजयांनीं मात्र त्यांची राजकीय अब्रू अत्यंत मोठ्या प्रमाणावर वाढली आणि इंग्रज हा एक अजिंक्य योद्धा होय अशी सर्व हिंदुस्थानांत सार्वत्रिक समजूत होऊन बसली.

**पेशवे आणि शिंदे**—उलटपक्षीं पेशवे आणि शिंदे यांची राजकीय अब्रू वसईच्या तहानें रसातळाला गेली. हा तह ठरवितांना पेशव्यांनीं एक मनोरथांचा डोलारा उराशीं बाळगला होता. सूर्त इंग्रज म्हणतील त्या अटी कबूल करून त्यांचें साहाय्य घ्यावें आणि नंतर एकीकडून इंग्रज आणि दुसरीकडून शिंदे असा दुहेरी शह देऊन होळकरांचा समूळ उच्छेद करावा हा पेशव्यांचा मुख्य हेतु होता. एकदां होळकरांचा नाश केल्यावर पुढें शिंद्यांच्या साहाय्यानें इंग्रजांना उडवून द्यावें असा पेशव्यांचा दुसरा हेतु होता. त्यांचे हे दोन्ही हेतु जागच्या जागीं थंड पडले. त्यांच्या अपेक्षेप्रमाणें होळकर इंग्रजांशीं लढण्याच्या भानगडींत न पडतां माळव्यांत परत गेला आणि इंग्रजही त्याच्या वाटेला गेले नाहींत. मराठी राज्यांत सर्वांना शिंद्यांच्या सामर्थ्याविषयीं मोठा भ्रम वाटत होता. परंतु पेशव्यांचा तोही भ्रम लवकरच दूर झाला. एवढे मोठे शिंदे अलिजहांबहादूर, पातशाही आणि पेशवाई दौलत त्यांच्या मुठींत होती. परंतु धोंडजी वाघासारख्या सामान्य बंडखोरानें जेवढा पराक्रम गाजविला तेवढा सुद्धां त्यांना रणांगणावर प्रकट करतां आला नाहीं. शिंद्यांचा पराजय झाल्यावर इंग्रजी वर्चस्वाचें खोगीर मराठी राज्यावर कायमचें लादलें गेलें. ही गोष्ट पेशव्यांना समजून चुकली. शिंद्यांना मात्र अजूनही कांहींतरी करून इंग्रजांचा नाश करतां येईल असा भ्रम वाटत होता. होळकर व इंग्रज यांमध्यें युद्ध झालें त्यांत शिंदे चाळीस पन्नास हजार फौज बाळगून उगीच उत्तर हिंदुस्थानात सर्वत्र लुडबुडत होते. रणकौशल्य आणि धाडस या गुणांचा त्यांच्या ठाईं अभाव होता. त्यामुळें त्यांच्या फौजेचा होळकर किंवा इंग्रज यांपैकीं कोणालाही उपयोग होऊं शकला नाहीं.

**राजपथकी आणि सरंजामी सरदारः**—मराठी राज्यांत गायकवाड, नागपूरकर भोसले, अक्कलकोटकर भोसले, पंतप्रतिनिधि, पंतसचीव वगैरे पुष्कळ राजपथकी सरदार पेशव्यांच्या बरोबरीचे होते. शिवाय पेशव्यांच्या पदरीं शिंदे, होळकर, पटवर्धन, रास्ते वगैरे शेंकडों लहान मोठे सरंजामी सरदार होते. त्या सर्वांना वसईचा तह अगदीं नापसंत होता. मराठी राज्यावर इंग्रजी वर्चस्वाचें खोगीर लादलें गेलें याबद्दल प्रत्येकजण आपल्या मनाशीं जळफळत होता. परंतु इंग्रजांशीं प्रत्यक्ष लढण्याची हिंमत मात्र कोणालाच वाटत नव्हती. यासंबंधीं एक प्रसंग चवदाव्या भागांत वर्णिलेला आहे. तो प्रसंग ता. २८ मार्च १८०३ रोजीं घडलेला[1] आहे. त्या दिवशीं पंतप्रतिनिधि हे आप्पासाहेब सांगलीकर यांजकडे आले आणि म्हणूं लागले कीं, पेशव्यांनीं वसईच्या तहानें इंग्रज घरांत आणले ही गोष्ट अगदीं वाईट झाली आहे. राज्याचा नाश करणारा असला हा तह करण्याचा पेशव्यांना काय अधिकार आहे? पेशवे हे कांहीं राज्याचे मालक नव्हेत. राज्याचे खावंद छत्रपति हे आहेत. राज्याचें संरक्षण करून वृद्धि करणें एवढेंच काम पेशव्यांकडे आहे. पेशव्यांनीं अनाधिकारानें केलेला हा तह सर्वांनीं एकजूट करून उधळून लावला पाहिजे. तूर्त शिंदे, होळकर, भोसले आणि नबाब हे इंग्रजांविरुद्ध लढण्याला सिद्ध झाले आहेत. जनरल वेलस्लीची फौज मिरज प्रांतांतून पुण्याकडे जाणार आहे, दाक्षिणेंतील सरदारांनीं लढाई देऊन या इंग्रजी फौजेचा नाश केला पाहिजे. यावर सांगलीकरांनीं उत्तर केलें कीं, इंग्रजांशीं लढण्याचा मजकूर तुम्ही सुचवितां तो योग्य आहे, परंतु तुम्ही मोठ्या गोष्टी बोलतां. त्यांचा व्यवहारांत कांहीं उपयोग नाहीं. होळकर माळव्यांत आहेत, शिंदे उज्जनीस आहेत तर भोसले नागपुरास आहेत आणि नबाब भागानगरांत आहेत. एकाचा एकाशीं मेळ नाहीं. इंग्रज आजच लढाईच्या तयारीनें आमच्या शेजारीं उभा राहिला आहे. 'सर्प डोक्यावर आणि वनस्पति हिमालयांत' अशी आमची स्थिति आहे. आम्हीं स्वतःच्याच बळावर आज कुरापत काढावी तर मधल्या मधेंच

---

१ भाग १४ पृष्ठ ७६७१ आणि पत्र नं. ६६१५.

आमची दामटी वळेल याची काय वाट ? तूर्त इंग्रजांशीं सख्य ठेवून वेळ मारून न्यावी हेंच चांगलें दिसतें. दक्षिणेंतील सरदारांना इंग्रजांविषयीं काय वाटत होतें याचें मर्म या सांगलीकरांच्या उत्तरांत सांपडतें. इंग्रजांविषयीं प्रत्येकजण मनांतल्या मनांत जळफळत होता. परंतु इंग्रजांशीं लढण्याची हिंमत कोणालाच वाटत नव्हती. जो तो आपलें घर कसें बचावेल याच फिकिरींत पडला होता. अशा त्या नामर्दपणाच्या अंधःकारांत पराक्रमाचा एकच तेजस्वी तारा सर्वांना डोळ्यांपुढें दिसत होता. तो तेजस्वी तारा म्हणजे यशवंतराव होळकर होय. होळकर यापुढें काय करणार याकडे सर्वांचें लक्ष लागून राहिलें होतें.

दुराचार, अत्याचार, अविश्वास, अप्पलपोटेपणा, बेहिम्मत वगैरे राज्य-नाशाचे भालदार मराठी राज्यांत सर्वत्र वावरत होते. आणि मराठी राज्याचा नाश होणार—होणार—होणार असा सूर अनेक विचारवंतांच्या हृदयाकाशांत उमटत होता. मराठी राज्यांत सर्वत्र हें जें निराशेचें वातावरण पसरलें होतें त्याचें अचुक निदान होळकरानें ठरविलें होतें. होळकराची राजकारणाची दृष्टि अत्यंत व्यापक होती. इंग्रजांशीं युद्ध करतांना होळकरानें मराठी राज्यांतील सर्व सरदारांस पत्रें पाठविलीं त्यापैकीं एक पत्र आम्हीं पुढें छापलें आहे. त्या पत्रांत होळकर म्हणतो—"आजपर्यंत[1] हिंदु राज्य सर्वत्रांनीं एकदिल राहून चालविलें. अलीकडे ज्याचे त्याचे दौलतींत घरकलह होऊन राज्य विपर्यास पडोन हिंदुधर्म नाहींसा होण्यास मूळ जाहलें. त्याचें छेदन करण्यास सर्वांनीं एकदिल झालें पाहिजे. तरच मुळाचें छेदन होऊन स्वधर्माचार पूर्ववत् चालोन हिंदूंची कायमी राहील. इकडील क्रम ( इंग्रजांशीं लढण्याचा ) जो आरंभिला आहे तो यावद्देह

---

१ हा उतारा आम्हीं पूर्वी भाग १४ पृ. ७८१९ यावर घेतलेला आहे. इ. स. १९१८ सालीं कै. तीर्थरूपांनीं केळकरांच्या 'मराठे व इंग्रज' या पुस्तकास उपोद्धात लिहिलेला आहे त्यांतही त्यांनीं हा उतारा पृ. ९ वर घेतलेला आहे. हें पत्र होळकरानें परशरामपंत प्रतिनिधीस लिहिलेलें आहे असें उतारा देतांना कै. तीर्थरूपांनीं लिहिलं आहे तें मात्र चुकलें आहे. हें पत्र श्रीनिवासराव भवानराव प्रतिनिधि यांस होळकरानें लिहिलें आहे.

चालवावा असें मनांत आहे. यांत परमेश्वर अनुकूल होऊन घडवील तें खरें. परंतु एकानेंच असा प्रकार करून सर्वत्रांनीं तमाशे पाहून आपआपली दौलत सांभाळून असावें याचा परिणाम कसा हें चित्तीं विचारून ज्यांत हिंदूधर्माची कायमी व परिणामास नीट तें करावें. याचा विचार तुम्हासारख्यांनीं न केला तर दुसरें कोण करील ?" होळकराचें हें पत्र अत्यंत महत्त्वाचें आणि त्याच्या विशाल बुद्धीचें निदर्शक आहे. मराठ्यांनीं एकजूट करून मराठी साम्राज्य उभारिलें, आतां ज्याचे त्याचे दौलतींत गृहकलह निर्माण होऊन राज्य मृत्युपंथास लागलें आहे, घरकलह विसरून पुनः मराठ्यांनीं एकजूट केली तरच तरणोपाय आहे, असा इशारा त्यानें मराठी राष्ट्रास दिला आहे. घरकलह हेंच या रोगाचें मूळ आहे हें त्याचें निदान तंतोतंत बरोबर होतें. मी यावद्देह इंग्रजांशीं लढतोंच आहें, एकानेंच लढावें आणि इतरांनीं आपआपल्या दौलती संभाळून तमाशा पहावा याचा परिणाम कसा लागेल याचा चित्तांत नीट विचार करा असा दुसरा एक इशारा त्यानें या पत्रांत मराठे सरदारांना दिलेला आहे. होळकराचें हें म्हणणें शेवटीं अरण्यरुदनवत् ठरलें. मराठी राष्ट्रावर एक प्रकारची अज्ञानतिमिराची झांपड पडली होती. प्रत्येकाला सर्व समजत होतें परंतु कांहींच उमजत नव्हतें. मराठी राष्ट्राच्या स्वातंत्र्याकरितां होळकरानें इंग्रजांशीं जो प्रचंड झगडा केला आणि ज्या रणसंग्रामाचे पडसाद सर्व हिंदुस्थानभर उमटत होते त्यांत एकाही मराठ्यानें होळकराला साहाय्य केलें नाहीं. याला म्हणतात दैवगतीचा सवाई सोटा !

वर दिलेल्या पत्रांत होळकरानें स्वधर्मरक्षणाचा उल्लेख केलेला आहे तो विशेष लक्षांत ठेवण्यासारखा आहे. थोरल्या महाराजांनीं स्वराज्यसंस्थापना केली तेव्हांपासून स्वराज्य आणि स्वधर्मरक्षण यांची सांगड सर्व मराठ्यांच्या मनोभूमिकेंत बद्धमूल होऊन बसली होती. स्वराज्य आणि स्वधर्म हीं एकरूप आहेत, स्वराज्य बुडालें तर त्याच क्षणीं स्वधर्मही बुडणार, अशी मराठ्यांची ठाम समजूत होऊन बसली होती. आजपर्यंत परधर्मीयांशीं मराठ्यांचे शेंकडों युद्धप्रसंग झाले. परंतु त्या त्या प्रसंगीं स्वराज्याचा नाश होणार अशी शंका मराठ्यांना केव्हांही वाटली नव्हती. परंतु वसईच्या तहानें स्वराज्याचा नाश होणार असें

दिसतांच मराठ्यांना स्वधर्मही बुडणार असें वाटूं लागलें तर त्यांत काय आश्चर्य ? पूर्वी चवदाव्या भागात रघोजी भोसल्यांचें एक पत्र छापलें आहे ( पत्र नं. ६७४० ) त्यांतही इंग्रजांशीं युद्ध हें धर्मयुद्ध आहे असा उल्लेख आहे. स्वराज्य आणि स्वधर्म यासंबंधीं विस्तृत विवेचन आम्हीं चवदाव्या भागांत पृ. ७८११–१२ यावर केलेलें आहे.

आत्मरक्षण किंवा स्वार्थसाधन हीं युद्धप्रवृत्तीचीं मुख्य कारणें असतात. होळकर युद्धाला तयार झाला यांत या दोन्ही कारणांचा पूर्णपणें अभाव होता. इंग्रजांनीं त्याच्या मुलुखावर स्वारी केली नव्हती. इतकेंच नव्हे तर होळकरांशीं युद्ध व्हावें अशी मुळांत इंग्रजांची इच्छाही नव्हती. उलटपक्षीं इंग्रजांशीं लढून होळकराला कांहींच मिळवावयाचें नव्हतें. जें त्याला मिळवावयाचें होतें तें त्यानें स्वपराक्रमानें आगाऊच मिळविलें होतें. पेशवे व शिंदे यांजवर त्यानें पुरेपूर सूड घेतला होता. होळकर घराण्याची जहागीर त्याच्या पूर्णपणें ताब्यांत आली होती. त्यानें इंग्रजांशीं सख्य जोडलें असतें तर इंग्रजांनीं पेशवे आणि शिंदे यांचें नुकसान करून त्याचा सर्व बाजूंनीं फायदा करून दिला असता. होळकराला मिळवून घ्यावें अशी इंग्रजांची फार इच्छा होती. इंग्रज आणि शिंदे यांचें युद्ध झालें त्यांत स्वार्थसाधनाची होळकराला सुवर्णसंधि प्राप्त झाली होती. इंग्रजांशीं मिळून त्यानें शिंद्यांच्या मुलखावर स्वारी केली असती तर शिंदेशाही जहागिरीचा भला मोठा लचका त्याला सहज तोडतां आला असता. परंतु असला हा स्वार्थसाधनाचा धोपटमार्ग त्याच्या उदार आणि स्वार्थत्यागी मनाला शिवलासुद्धां नाहीं. इंग्रजांशीं लढण्यांत केवढा मोठा धोका आहे हें होळकराला पूर्णपणें समजत होतें. लढाईंत अपयश आलें तर सर्वस्वाचा नाश होईल आणि नंतर शिंदे किंवा पेशवे यांच्या तावडींत सांपडून आपला प्राण जाईल हें त्याला स्पष्टपणें दिसत होतें. सर्वस्वाचा नाश आणि प्राणघात हे दोन धोके पत्करूनही तो युद्धास सिद्ध झाला याचें कारण त्याचा देशाभिमान हेंच होय. इंग्रजी वर्चस्वाच्या मगरमिठींतून मराठी राज्याचा बचाव करावा एवढी एकच गोष्ट त्याला दिसत होती. आणि या उज्ज्वल ध्येयासाठीं पडेल तो स्वार्थत्याग करावयास तो तयार झाला होता.

स्वार्थत्याग आणि देशाभिमान हे होळकराचे सद्गुण तत्कालीन इंग्रजांना किंवा मराठयांना नीटसे समजत नव्हते. होळकराच्या हालचालींवर नजर ठेवण्याकरितां इंग्रजांचा सरसेनापति जनरल लेक हा दुआब प्रांतांत तळ देऊन राहिला होता. होळकर स्वार्थसाधनाचा सरळ मार्ग सोडून युद्धास प्रवृत्त होईल ही गोष्ट पुष्कळ दिवस इंग्रजांना खरी वाटत नव्हती. युद्धाची भाषा हें नुसतें होळकरानें ढोंग केलें आहे, हें ढोंग करून इंग्रजांकडून शक्य त्या सवलती मिळवाव्या, इंग्रजांमार्फत आपल्या पदरांत शक्य तेवढे फायदे पाडून घ्यावेत, एवढाच त्याचा उद्देश आहे असें इंग्रजांना वाटत होतें. ती गोष्ट करण्याची इंग्रजांची तयारी होती. गोडीगुलाबीनें आणि सामोपचारानें वसईचा तह कायम ठेवून सर्व प्रमुख मराठे सरदारांशीं सख्य जोडावें असें इंग्रजांचें धोरण होतें. परंतु होळकर खरोखरीच युद्धास तयार झाला तेव्हां जनरल लेक याला मोठें आश्चर्य वाटलें. इंग्रजांनीं ठरविलें कीं, होळकर हा लुचा आणि उर्मट मनुष्य आहे ! डफसाहेब यासंबंधीं लिहितात—मराठे[1] लोक हे क्षुद्र बुद्धीचे आणि लहरी, मनमानेल तें करणारे, उलट्या काळजाचे असतात. इंग्रजांचा मोठेपणा आणि नेमस्तपणा त्यांना समजत नव्हता. होळकराला आपल्या सैन्याच्या अजिंक्यपणाबद्दल आणि आपल्या पराक्रमाबद्दल गर्व वाटत होता. तो मोठा घमेंडखोर होता. शिंद्याला जी गोष्ट करतां आली नाहीं ती आपण एकट्यानें करून दाखवावी म्हणजे आपली दिगंत कीर्ति होईल अशी ईर्षा वाटून तो युद्धास प्रवृत्त झाला. **मराठ्यांबद्दल इंग्रजांना सामान्यतः तुच्छ बुद्धि वाटत होती. तिचेंच प्रतिबिंब या डफसाहेबांच्या लिहिण्यांत उतरलेलें आहे.**

शत्रुपक्षांत फितूर उत्पन्न करणें हें इंग्रजी राजनीतींतलें फार मोठें शस्त्र होतें. होळकराशीं युद्ध सुरू होणार असें दिसतांच इंग्रजांनीं ताबडतोब जाहीर केलें कीं, आपण होळकराशीं युद्ध करणार तें केवळ निःस्वार्थीपणानें करणार आहों. होळकराचा मुलूख किंवा द्रव्य यांची आपणांस

१ पहा, ग्रांट डफ च्याप्टर ४४ पृ ५८५–९०.

तिळमात्र इच्छा नाहीं. होळकराशीं लढण्याचे कामीं जे कोणी आम्हांस साहाय्य करतील त्या मित्रांमध्यें होळकराकडून जिंकलेला मुलूख आम्ही वांटून देणार आहों. शत्रूकडून लूट मिळेल ती सर्व आम्ही आमच्या मित्रांना बक्षीस देणार आहों. ही गोष्ट जाहीर करतांना इंग्रजांनीं आपल्या औदार्यबुद्धीची कमाल करून दाखविली. या एका प्रसंगाशिवाय असलें औदार्य इंग्रजांनी प्रकट केलेलें दुसरें उदाहरण हिंदुस्थानच्या इतिहासांत सांपडत नाहीं. होळकराच्या पक्षांत फूट पाडावी म्हणून इंग्रजांनीं हा डाव टाकला होता. परंतु त्यांचें हें सर्व औदार्य परिणामीं फोल ठरलें. होळकर हा उत्तर हिंदुस्थानांत अत्यंत लोकप्रिय होता. दुआबांतील रोहिले पठाण सरदार, बुंदेले आणि रजपूत राजे, जाटवाड्यांतील जाट आणि गिराशिये संस्थानिक आणि पंजाबांतील शीख हे सर्व होळकराचे जिवाला जीव देणारे दोस्त होते. त्यांजवर कसल्याही फितुराची मात्रा चालण्याजोगी नव्हती. होळकराच्या पायदळांत तीन इंग्रज अंमलदार होते. त्यांनीं इंग्रजांकडे पळून जाण्याचा बेत ठरविला. तेव्हां होळकरानें ताबडतोब त्यांना तोफेच्या तोंडीं देऊन ठार मारिलें. याप्रमाणें इंग्रजाचा फितुराचा प्रयोग साधला नाहीं. होळकरानें मात्र शत्रुपक्षांत फितूर केले त्यांत त्याला वेळोवेळ कसें यश आलें हा मजकूर पुढें यथाप्रसंगीं कथन करावयाचा आहे.

होळकर आणि इंग्रज यांमधील लढाईत दक्षिणेंतील कोणी मराठा सरदार हजर नव्हता. ज्यांनीं युद्धांत किंवा राजकारणांत प्रत्यक्ष भाग घेतला त्यांनीं लिहून ठेविलेल्या हकीगती या पुराव्याच्या दृष्टीनें अव्वल दर्जाच्या समजल्या जातात. या युद्धाच्या बाबतींत असलीं पत्रें पटवर्धनी दप्तरांत सांपडत नाहींत किंवा दुसरीकडेहि तशीं पत्रें छापलेलीं उपलब्ध नाहींत. या युद्धाची ऐकीव माहिती देणारीं पुष्कळ पत्रें पुढें छापलेलीं आहेत. ऐतिहासिक दृष्टीनें हा दुय्यम दर्जाचा पुरावा होय. या युद्धाची हकीगत जुळवितांना मुख्यत्वें ग्रांट डफसारख्या परकीय इतिहासकारांचाच आधार घ्यावा लागला आहे. दुय्यम दर्जाचा पुरावा या दृष्टीनें पुढें छापलेल्या पत्रांचाही योग्य प्रसंगीं उपयोग करून घेतलेला आहे.

शिंदे आणि इंग्रज यांमधील युद्ध सन १८०३ अखेरीस संपलें. त्यानंतर सुमारें दोन महिने होळकर आणि इंग्रज हे युद्धाची तयारी करीत आणि युद्धाच्या संभवासंभवाची चर्चा करीत आपापल्या जागीं स्वस्थ होते. मार्च महिन्यांत युद्ध होणार ही गोष्ट उभयपक्षीं समजून चुकली तेव्हां तहाच्या वाटाघाटीला प्रत्यक्ष सुरवात झाली. या वाटाघाटींत होळकरानें मैत्रीच्या अघळपघळ भाषेचीं अनेक पत्रें जनरल लेक याला पाठविलीं. तेव्हां इंग्रजांना वाटलें कीं, होळकर हा लुच्चा उर्मट मनुष्य आहे ! होळकराच्या पत्रासंबंधीं ग्रांट डफसाहेब आपल्या इतिहासांत म्हणतात, " It is frequently the case when insolence is designed on the part of a Marhatha it is difficult to discover whether friendly profession, arrogance or humility predominate." " असें पुष्कळ वेळां घडतें कीं, एखाद्या मराठ्याला आपल्या मनांतील उर्मटपणाचा ताठा दुसऱ्यास दाखवावयाचा असतो, तेव्हा तो बाह्यतः भाषा मात्र अशी वापरतो कीं, त्या भाषेंत त्याचा मैत्रीचा भाव किंवा त्याच्या मनांतील मगरुरी किंवा मनाची नम्रता या तीन गोष्टींपैकीं कोणती गोष्ट प्रामुख्यानें दिसून येते हें समजत नाहीं. " शत्रूविषयीं वागतांना आणि लिहितांना इंग्रज मनुष्य अत्यंत अनुदार वृत्तीचा असतो हें प्रसिद्ध आहे. या वृत्तीस अनुसरूनच डफसाहेबांनीं हें विधान केलें आहे. असो. होळकरानें आपल्या तर्फेच्या तहाच्या अटी इंग्रजांना कळविल्या त्या अशा—( १ ) इंग्रजांनीं आपलें सैन्य आपले हद्दींत आग्र्याच्या बाजूस परत न्यावें. ( २ ) दक्षिणेंत चांदवड वगैरे महाल हे होळकर घराण्याचे आहेत, ते पुन्हां आमच्या ताब्यांत आले पाहिजेत. ( ३ ) रजपूत राजांपासून खंडण्या घेण्याचा आमचा पुरातन हक्क आहे, या आमच्या हक्कांत इंग्रजांनीं लुडबूड करूं नये. ( ४ ) अयोध्य प्रांतांत इटावा वगैरे बारा महाल हे होळकर घराण्याचे आहेत ते आमच्या ताब्यांत पुन्हां आले पाहिजेत. ( ५ ) अंतर्वेदींत हरयाना हा प्रांत होळकर घराण्याचा आहे, तो पुनः आमच्या ताब्यांत आला पाहिजे. होळकराच्या या मागण्यांना इंग्रजांनीं उत्तरें दिलीं तीं अशीं— ( १ ) होळकरानें आपलें सैन्य माळव्यांत परत न्यावें. नंतर आमचें

सैन्यही परत आमच्या हद्दींत येईल. ( २ ) होळकराचा दक्षिणेंतील मुलूख पेशवे सरकारानें जप्त केला आहे, त्या गोष्टीशीं इंग्रजांचा अर्थाअर्थी कांहीं संबंध नाहीं. ( ३ ) जयपूर, जोधपूर, पाचोडी, भरतपूर, गोहद हे रजपूत राजे इंग्रजांचे मित्र झाले आहेत, त्यांना मराठ्यांकडून खंडण्या देण्याबद्दल उपद्रव लागणार नाहीं असें इंग्रजांनीं त्यांना आश्वासन दिलें आहे. त्यामुळें होळकराला या रजपूत राजांपासून खंडण्या मागतां येणार नाहींत. ( ४ ) अयोध्या प्रांतांतील इटावा वगैरे बारा महाल हे सन १७७३ सालीं विसाजी कृष्ण यांची स्वारी परत फिरल्यावर अयोध्येच्या नबाबानें ते महाल पुनः मराठ्यांपासून काबीज केले आहेत. सन १७७३ नंतर हे महाल पुन्हां मराठ्यांच्या ताब्यांत कधींही आलेले नाहींत. हल्लीं अयोध्येच्या नबाबानें सन १८०१ सालीं हे इटावा वगैरे बारा महाल इंग्रजांना बक्षीस दिले आहेत. होळकराला ते महाल परत मागण्याचा कांहींच हक्क नाहीं. ( ५ ) अंतर्वेदीपैकीं हरयाना हा प्रांत पूर्वी महादजी शिंद्यांनीं स. १७८४-८५ सालीं दिल्लीच्या पातशहाकडून मिळविलेला आहे. त्या प्रांताची वांटणी शिंद्यांनीं होळकरांना कधींही दिलेली नाहीं. शिंद्यांशीं नुकत्याच झालेल्या युद्धांत इंग्रजांनीं हरयाना हा प्रांत शिंद्यांकडून जिंकून घेतलेला आहे. इंग्रजांकडे या प्रांताची मागणी करण्याचा होळकराला कांहींच हक्क नाहीं.

होळकर - घराण्याचा ज्यांत हक्कसंबंध आहे असा बराचसा प्रांत इंग्रजांनीं घेतलेला आहे, तो परत मिळवावा असा होळकराचा हेतु होता. त्याच्या या मागण्या इंग्रजांना अगदींच भरमसाट वाटल्या. होळकराशीं युद्ध टाळावें अशी इंग्रजांची फार इच्छा होती. त्यांनीं होळकराला शेवटचा उपदेश केला कीं, तुम्ही युद्धाच्या भानगडींत पडूं नका. युद्ध न करण्यांतच तुमचा फायदा आहे. आमच्याशीं सख्य जोडाल तर आम्ही तुमचा फायदा करून देऊं. तुमच्या जहागिरीसंबंधीं ज्या तकरारी असतील त्या आम्हांपुढें मांडा. सारासारविचार आणि न्याय (Equity and Justice) या दृष्टीनें विचार करून तुमच्या मागण्यांना पेशवे सरकारची मंजुरी मिळेल अशी आम्ही व्यवस्था करूं. इंग्रजांचा हा उपदेश होळकराला खचित उर्मटपणाचा वाटला असेल. जहागिरीच्या बाबतींत मध्यस्थी

करण्याबद्दल होळकरानें तहाच्या वाटाघाटींत मागणी केलेली नव्हती. शिवाय इंग्रजांचा सारासारविचार आणि न्यायप्रियता यांवर विश्वास ठेवण्याचें त्याला कांहीं कारणही नव्हतें. होळकराचा देशाभिमान इंग्रजांना समजत नव्हता. त्याची सर्व घडपड स्वार्थमूलक आहे, त्याच्या जहागिरीच्या मागण्यांना पेशवे सरकारची मंजुरी मिळाली तर तो खूष होईल आणि युद्ध टळेल असें मनाशीं गणित घालून इंग्रजांनीं स्वतः हें न्यायाधिशाचें सोंग घेतलें होतें. परंतु तें परिणामीं फुकट गेलें आणि शेवटीं युद्धापर्यंत मजल यावयाची ती आलीच.

युद्ध होणार ही गोष्ट निश्चित होतांच होळकरानें शिंद्यांशीं समेट करण्याचा फार मोठा प्रयत्न केला. त्यानें शिंद्यांकडे सूत्र लाविलें कीं आजपर्यंत शिंदे-होळकरांचे तंटे झाले ते पुरे झाले. तुमच्या आमच्या भांडणामुळें मराठी राज्याच्या नाशाची वेळ येऊन ठेपली आहे. हा कलहाचा ग्रंथ आतां समाप्त करूं या. इंग्रजांशीं केलेला तह मोडून तुम्ही आम्हांला सामील व्हा. तुम्ही आम्ही एक झालों तर इंग्रजांचा आम्हांपुढें काय पाड लागणार आहे? होळकराचा कोटिक्रम शिंद्यांना विशेषसा पटला नाहीं. होळकर आणि इंग्रज यांशीं नुकत्याच झालेल्या लढायांतून प्रत्येक वेळीं त्यांना अपेश येत गेलें, त्यामुळें त्यांची निर्बुद्ध स्थिति होऊन त्यांना पुढें काय करावें हेंच घड समजत नव्हतें; शिवाय अक्कलेचें भांडवलही त्यांच्याजवळ फारसें नव्हतें. त्यांच्या दरबारांत विठोजी होळकराचा खून करणारा बाळोजी कुंजर हा कलिपुरुष पेशव्यांतर्फे हजर होता. तो शिंद्याला सारखा उपदेश करीत होता कीं, तुम्ही होळकराच्या नादाला लागूं नका. तो लुचा आणि दुष्ट मनुष्य आहे. तो जिवंत राहिला तर सूड घेण्याकरितां तो आम्हां सर्वांचे प्राण घेईल. एक वेळ इंग्रजांच्या वर्चस्वाचें खोगीर पुरवलें परंतु हें होळकराचें बंड नको! कसेंही करून होळकराचा नाशच केला पाहिजे. कुंजराचा हा उपदेश शिंद्यांना मानवला, आणि पुढें होळकराशीं युद्ध झालें. त्यांत शिंद्यांनीं आपली पुष्कळ फौज इंग्रजांच्या मदतीसाठीं पाठविली.

राजकारणांत शत्रुमित्रभाव अत्यंत झपाट्यानें उलट सुलट होत असतात. शिंद्यांचा सासरा आणि सरदार सर्जेराव घाटगे हा होळकरघराण्याचा पुरा द्वेष्टा होता. यानेंच ता. १४ सप्टें. १७९७ रोजीं पुणें

मुक्कामीं मल्हारराव होळकराचा खून करविला होता. यानेंच होळकराची राजधानी जें इंदूर शहर त्याची नुकतीच राखरांगोळी केली होती. तोच घाटगे आतां होळकराचा जिवलग दोस्त बनला ! शिंद्यांचा दुसरा सरदार सदाशिवराव बक्षी. हडपसरच्या लढाईत हा शिंद्यांचा सेनापति होता. त्याची होळकरानें कशी त्रेधा उडवून दिली याचें वर्णन तेराव्या भागांत[1] आलेलें आहे. हडपसरच्या पराजयाचा अपमान विसरून हा बक्षीही होळकराचा पक्षपाती बनला. शिंद्यांचा मुख्य सरदार अंबोजी इंगळे हा पूर्वीपासून होळकराचा पक्षपाती होताच. शिंद्यांच्या दरबारांत होळकरानें इंग्रजांविरुद्ध जो प्रचार चालविला होता त्याला पुष्कळ यश आलें. शिंद्याचे पुष्कळ मराठे आणि मुसलमान सरदार हे आंतून होळकराला अनुकूल झाले. शिंद्यांच्या हुकुमावरून हे सरदार पुढें इंग्रजी फौजेला सामील झाले. परंतु त्यांनीं इंग्रजांना कांहीं मदत न करतां उलट होळकरालाच वेळोवेळ साहाय्य केलें. खुद्द इंग्रजी लष्करांतही होळकरानें फितूर पेरून ठेविला होता. सारांश, होळकराच्या पक्षात भेद करण्याची कला इंग्रजांना साधली नाहीं. होळकरानें मात्र शत्रुपक्षांत भेद करण्याचे कामीं यश मिळविलें एवढें खरें !

कवायती पायदळ आणि तोफखाना आणि दारूगोळा या बाबतींत होळकराची तयारी विशेषसी नव्हती. दारूगोळ्याचा तर त्याच्याजवळ अत्यंत तुटवडा होता. त्याचे घोडेस्वार मात्र अत्यंत नामांकित होते. त्यांनीं आतांपर्यंत अनेक लढायांत मोठमोठे विजय मिळविले होते. शौर्य आणि धाडस या गुणांबद्दल सर्व हिंदुस्थानांत त्यांची ख्याति होती. घोडदळ हेंच होळकराचें मुख्य बळ होतें. मैदानांत इंग्रजांशीं लढण्यामध्यें आपला निभाव लागणार नाहीं, कवायती पायदळ व तोफखाना या बाबतींत शत्रु आपल्यापेक्षां श्रेष्ठ आहे, हें होळकर जाणून होता. सबब गनिमी काव्यानें शत्रूशीं लढावयाचें असा त्यानें निश्चय ठरविला. त्यानें आपली मोठी फौज इंग्रजांच्या तोंडावर जयपूर प्रांतीं ठेविली. दुसरी मोठी फौज बरोबर घेऊन तो अजमीर प्रांतीं गेला. वाटेनें मंदोसर या शिंद्यांच्या

---

१ पहा भाग तेरा पृ. ६८५१-५२.

महालापासून त्यानें लाखों रुपये खंडणी उकळली. शिंद्यांच्या अजमीर प्रांतांतूनहि त्यानें अशाच मोठमोठ्या खंडण्या वसूल केल्या. शिंद्यांनीं तक्रार केल्यावरून होळकरानें उत्तर केलें कीं, मराठी राज्याच्या स्वातंत्र्याकरितां माझा इंग्रजांशीं लढा चालू आहे. या प्रसंगीं द्रव्य वसूल करण्याचे बाबतींत हा माझा मुलूख किंवा हा दुसऱ्याचा मुलूख हा भेद मी जाणीत नाहीं. मिळेल त्या रीतीनें द्रव्य मिळवावयाचें—द्रव्याच्या बळावर फौज उभी करावयाची—फौजेच्या बळावर शत्रूशीं शेवटपर्यंत लढावयाचें—एवढाच मजकूर मी तूर्त जाणतों. होळकराचा हा स्वातंत्र्याचा जयघोष शिंद्यांना ऐकूं येत नव्हता. त्यामुळेंच मराठी राजकारण उलट सुलट झालें होतें.

होळकराशीं लढण्याकरितां इंग्रजांनीं लढाईची तयारी अवाढव्य प्रमाणावर केली होती. शिंद्यांशीं त्यांचें युद्ध नुकतेंच संपलें होतें. त्या युद्धाकरितां तयार केलेली पन्नास साठ हजार फौज अजून रणांगणावर उभी होती. इंग्रजांच्या दक्षिणेंत पांच मोठमोठ्या फौजेच्या टोळ्या होत्या. पहिली टोळी पुण्याशेजारीं शिरूर-कुकडीवर तळ देऊन राहिली होती. दुसरी फौज अहमदनगरास होती. शिवाय त्या ठिकाणीं इंग्रजांचा रणसाहित्याचा मोठा सांठाही होता. तिसरी फौज निजामचें राज्य पाठीशीं घालून जाफराबाद येथें तळ देऊन राहिली होती. दक्षिणेंतील मुख्य फौज मुंबईस होती. पांचवी टोळी गुजराथेंत होती. कलकत्त्याचा हुकूम येतांच गुजराथच्या फौजेनें एकदम माळवा प्रांतांत शिरून होळकराच्या राजधानीवर चाल करावी असा संकेत ठरला होता. दक्षिणेंतील फौजेवर जनरल वेलस्ली हा मुख्य सेनापति होता. दक्षिणेंतील फौजेला कुमक आणि रणसाहित्य यांचा पुरवठा भागानगर, श्रीरंगपट्टण आणि मद्रास या तीन ठिकाणांहून सारखा चालू होता. दक्षिणेंतील फौजेपेक्षां पुष्कळच मोठी फौज उत्तर हिंदुस्थानांत जनरल लेक याच्या हाताखालीं होती. या फौजेच्या लहान मोठ्या सहा सात टोळ्या जागजागीं पसरल्या होत्या. रजपुताना, बुंदेलखंड, दुआब, अंतर्वेदी, दिल्ली, मथुरा या ठिकाणीं इंग्रजी फौजेनें मोठमोठे तळ उभे करून अगदीं नाकेबंदी केली होती.

उत्तरेकडील या फौजेला बंगाल आणि अयोध्या या दोन प्रांतांतून सारखा रणसाहित्याचा पुरवठा चालू होता. सारांश, इंग्रजांची युद्धाची तयारी होळकरापेक्षां कितीतरी पटीनें श्रेष्ठ दर्जाची होती. शिंद्यांनीं आपली तीस चाळीस हजार फौजही बापूजी शिंदे, सदाशिवराव बक्षी, अंबोजी इंगळे या सरदारांच्या हाताखालीं इंग्रजांच्या मदतीसाठीं पाठविली होती.

उलटपक्षीं होळकरानेंहि फौजेची तेयारी प्रचंड प्रमाणावर केली होती. त्याच्या हाताखालीं सुमारें लाख दीड लाख घोडेस्वार होते. घोडदळ हेंच होळकराचें मुख्य सामर्थ्य होतें. जोंपर्यंत आपल्या बुडाशीं घोडा आहे तोंपर्यंत सर्व पृथ्वी आपली आहे, आपण जेथें जाऊं तेथें आपलाच जय होणार, असा होळकर आणि त्याचे इमानी आणि शूर सरदार यांना विश्वास वाटत होता. होळकराचे घोडेस्वार खरोखर अत्यंत पटाईत, विलक्षण धाडसी आणि युद्धाचे कामीं अत्यंत चिवट आणि जिवट होते. होळकराच्या फौजेचा मुख्य तळ इंदूरजवळ काळी नदीवर काळीसिंद येथें होता. त्याच्या फौजेची एक मोठी टोळी रजपुतान्यांत जयपूर प्रांतीं इंग्रजांच्या तोंडावर ठेवलेली होती. होळकराचे हरनाथसिंग आणि हरीपंत भावे हे सरदार गुजराथेंत राहिले. जीवलालसिंग आणि अचेबीसिंग हे दोघे सरदार दक्षिणेंत खानदेशांत आले. मीरखान पठाण आणि राजे महिपतराव हे बुंदेलखंडांत राहिले. शामतखान पठाण हा सरदार अंतर्वेदी प्रांतांत तळ देऊन राहिला आणि नागो जिवाजी हा सरदार अयोध्या प्रांतांत दंगा करीत फिरूं लागला. पुढें प्रत्यक्ष युद्ध सुरू झाल्यावर इंग्रजी फौजेच्या अनुरोधानें होळकर व त्याचे सरदार यांच्या फौजांच्या हालचालीही सारख्या बदलत राहिल्या.

होळकराच्या अंगीं संघटना करण्याची अजब जादू होती. ही त्याची विद्या तत्कालीन इंग्रजांच्या प्रारंभीं नीटशी लक्षांत आली नाहीं. त्यामुळें युद्धाचे शेवटीं त्यांचीं राजकारणाचीं सर्व गणितें चुकीचीं ठरलीं. होळकरानें शिंद्यांचे बहुतेक सर्व दरबार अनुकूल करून घेतले होते. जयपूर, जोधपूर, माचेडी, गोहद येथील रजपूत राजे; भरतपूरचा प्रतापशाली जाठ संस्थानिक; बुंदेलखंड, जाटवाडा, अहिरवाडा येथील संस्थानिक; पंजाबांतील धर्मसिंग, रंजीतसिंग हे शीख राजे; नेपाळचा महाराजा

गोरख, हे सर्व सत्तावीश होळकराचे मित्र बनले होते. या सर्वांचें आपापसांत शत्रुत्व होतें. परंतु सर्वजण होळकराच्या संघटनामंत्रानें भारले जाऊन त्याच्या निशाणाखालीं एकत्र झाले होते. दक्षिणेंतील एकही मराठा सरदार होळकराला अनुकूल करून घेतां आला नाहीं. उत्तर हिंदुस्थानांत मात्र त्यानें केवळ किमया करून दाखविली. नर्मदेपासून तहत काश्मीरपर्यंत त्यानें इंग्रजांविरुद्ध सर्व राजांचा एक अत्यंत बलिष्ठ संघ निर्माण केला. आपलें घोडदळ आणि संघटनेचें सामर्थ्य यांच्या बळावर युद्धांत शेवटीं इंग्रज थकणार आणि शेवटीं आपलाच जय होणार असा होळकराला विश्वास वाटत होता. इंग्रजांची फौज, पलटणें आणि तोफखाना यांची होळकराला कांहींच पर्वा वाटत नव्हती.

एकदां युद्धाचा निश्चय कायम झाल्यावर इंग्रजांनींच प्रथम कुरापत काढून होळकरावर स्वारी केली. रजपुताना आणि बुंदेलखंड या दोन ठिकाणीं इंग्रजांनीं प्रारंभीं रणक्षेत्रें निर्माण केलीं. त्यांची माहिती पुढें देतों—

बुंदेलखंडः—नुकत्याच शिंद्यांशीं झालेल्या युद्धांत बुंदेलखंड हा प्रांत इंग्रजांनीं जिंकून घेतला होता. त्या प्रांतांतील संस्थानिक मोठे बंडखोर होते. अलीकडे होळकराच्या चिथावणीवरून त्यांनीं इंग्रजांविरुद्ध उघड बंडच उभारिलें. बुंदेलखंडांत ले. कर्नल फॉसेट हा मोठी इंग्रजी फौज घेऊन तळ देऊन राहिला होता. भोंवतालच्या बंडखोरांना वठणीवर आणण्याचा उद्योग इंग्रजी फौजेचा हळूहळू चालू होता.

**मे १८०४**

एकदां सेनापति फॉसेट यानें सात पलटणें आणि तोफखाना देऊन कॅप्टन स्मिथ याला एक किल्ला घेण्यासाठीं पाठविलें. इंग्रजी फौज जवळ येतांच किल्लेदारानें घाबरल्याचें सोंग केलें आणि किल्ल्यावर तोफांचा भडिमार करूं नका, आम्ही आपखुषीनें उद्यां सकाळीं किल्ला तुमच्या हवालीं करतों, असा कॅप्टन स्मिथ याला निरोप पाठविला. कॅ. स्मिथ याला हें किल्लेदाराचें मित्रपणाचें सोंग खरें वाटलें आणि सहजासहजीं किल्ला हातीं येणार हें पाहून फौजेंतील सर्व इंग्रज अंमलदार बहुत खूष झाले. किल्लेदाराच्या शब्दावर विश्वास ठेवून कॅ. स्मिथ हा अजागळपणानें अगदींच बेफाम आणि गाफील राहिला आणि त्याच्या मूर्खपणाचें

प्रायश्चित्त त्याला ताबडतोब मिळालें. होळकराचा सरदार मीरखान पठाण हा बुंदेलखंडांत वावरत होता. त्याच्याच सूचनेवरून किल्लेदारानें हें मित्रपणाचें सोंग घेतलें होतें. किल्लेदारास मिळवून घेऊन मीरखानानें रात्रीं एकाएकीं इंग्रजी फौजेवर छापा घातला. हा छापा इतक्या सफाईनें आणि गुप्तपणानें घातला गेला कीं, होळकराची फौज प्रत्यक्ष इंग्रजी फौजेला भिडेपर्यंत कोणाला छाप्याचा पत्ताच लागूं शकला नाहीं. इंग्रजांचीं आघाडीचीं दोन पलटणें ताबडतोब ठार झालीं. पलटणांवरील गोरे अंमलदारही मारले गेले. इंग्रजांच्या सात तोफांपैकीं सहा तोफा होळकराच्या फौजेनें हिसकून घेतल्या. शिल्लक राहिलेलीं चार पांच पलटणें आणि एक तोफ बरोबर घेऊन कॅ. स्मिथ हा शत्रूचे हल्ले परतवीत कसाबसा जीव बचावून ले. कर्नल फॉसेट याच्या सैन्यांत परत आला. नंतर मीरखानानें एकाएकीं काल्पीवर हल्ला केला. नंतर यमुना उतरून दुआबांत शिरावें असा होळकराच्या फौजेनें बेत केला. यमुनाकांठीं इंग्रजांचीं दोन पलटणें आणि अंबोजी इंगळयाची फौज होती. या दोन फौजांनीं मीरखानाची फौज मागें हटविली. त्यानंतर पुढें वर्षभर मीरखान आणि बुंदेले संस्थानिक यांनीं इंग्रजी फौजेभोंवतीं घिरट्या घालघालून बुंदेलखंड हें एक मोठें रणक्षेत्रच बनविलें. त्यामुळें त्या प्रांतांत इंग्रजी फौजेच्या महत्त्वाच्या हालचाली होऊं शकल्या नाहींत.

**होळकराचा गनिमी कावा–इंग्रजांची त्रेधाः—** सरसेनापति जनरल लेक यानें प्रारंभीं मोठी धडाडी दाखविली. एप्रिल महिन्याच्या प्रारंभीं जन. लेक याच्या हुकुमावरून ब्रिगे. जनरल मानसन हा मोठी

८ एप्रिल १८०४ फौज, तोफा आणि कवाइती घोडेस्वार बरोबर घेऊन जयपूरप्रांतीं होळकरांवर चालून गेला. बापूजी शिंदे याच्या हाताखालीं शिंद्यांची फौजही आघाडीवर मानसनबरोबर होती. या पहिल्या फौजेच्या पाठोपाठ लेफ्ट. कर्नल डॉन हा दुसरी टोळी घेऊन पहिल्या टोळीच्या पिछाडीस वाट चालूं लागला. त्यांच्या पाठोपाठ स्वतः सरसेनापति जनरल लेक हा आपली मोठी फौज घेऊन रणांगणावर उतरला. इंग्रजी फौजेपुढें होळकर पीच्छेहाट करूं लागला. इंग्रजी पलटणें आणि घोडेस्वार यांनीं मोठ्या चिकाटीनें आणि शौर्यानें होळकराचा पाटलाग

V2215.K.1418

चालविला. होळकर पीच्छेहाट करीत चंबळा नदी उतरून माळव्यांत परत आला. ले. कर्नल डॉन यानें पराक्रम करून ता. १६ मे रोजीं टोंक रामपुऱ्याचा किल्ला हल्ला करून घेतला. याप्रमाणें एप्रिल आणि मे हे दोन महिने होळकराशीं युद्ध चालवून इंग्रजांचा सर्व बाजूनीं जय होत चालला. इंग्रजी फौजेचें बस्तान बसत चाललेलें पाहून जन. लेक हा आपली फौज घेऊन पावसाळ्यानिमित्त आपल्या मुख्य तळावर परत आला. ब्रिगे. जनरल मानसन आणि बापूजी शिंदे हे होळकराच्या तोंडावर राहिले.

जनरल वेलस्ली याच्या फौजेपैकीं एक टोळी कर्नल मरे याच्या हाताखालीं गुजराथेंत होती. शिंद्यांची फौजही या गुजराथच्या टोळींत सामील झाली होती. मानसनसाहेबानें रजपुतान्यांत होळकरावर चढाई करतांच कर्नल मरे आणि शिंद्यांची मराठी फौज घटाई करून एकदम माळवा प्रांतांत शिरली. माळवा प्रांतीं एकीकडून गुजराथची फौज आणि दुसरीकडून रजपुतान्याची फौज अशा इंग्रजी फौजेच्या दोन टोळ्यांनीं चालून जाऊन मधल्यामधेंच होळकराची दामटी वळवावी असा जन. मानसन यानें नकाशा ठरविला. होळकराच्या फौजेंत कांहींच दम दिसत नाहीं हें पाहून इंग्रजी फौजेला मोठा हुरूप चढला. जनरल मानसन

जुलै १८०४

हा मुकुंदरा घाटानें पुढें सरकून माळव्याकडे निघाला. ता. ७ जुलै रोजीं इंग्रजी फौज चंबळ नदीवर पोंचली. तेथें मात्र तिची प्रगति थांबली. गुजराथ प्रांतीं हरनाथसिंग आणि हरीपंत भावे हे होळकराचे सरदार होते. त्यांनीं हल्ले कर करून कर्नल मरे याची त्रेधा उडवून दिली. त्यामुळें कर्नल मरे हा कसाबसा जीव बचावून माळव्यांतून परत फिरला आणि गुजराथेंत परत आला. कर्नल मरे याच्या पीछेहाटीची बातमी जन. मानसन याला चंबळ नदीवर मुक्काम असतांनाच समजली. याच वेळीं होळकराचे हजारों घोडेस्वार चंबळ नदी उतरले आणि नंतर इंग्रजी फौजेवर हल्ले सुरू झाले. होळकराच्या फौजेचें हें विश्वरूप पाहून जन. मानसन याचे हातपाय गळाले. येथें राहिलों तर होळकर सर्वांची कत्तल करील असें इंग्रज ऑफिसरांना भय वाटूं लागलें. इंग्रजी फौजेनें पीछेहाटीचा बेत ठरविला आणि घाईघाईनें तो दुसरेच दिवशीं अंमलांत

आणला. ता.८ जुलै रोजीं इंग्रजी फौजेच्या दोन टोळया झाल्या. पिछाडी-च्या फौजेंत लेफ्टनंट ल्यूकन हा सेनापति होता. त्याच्या हाताखालीं दोन पलटणें, घोडेस्वारांची एक मोठी टोळी आणि बापूजी शिंद्याची फौज असा सरंजाम होता. बाकीची सर्व फौज घेऊन जन. मानसन मुकुंदरा घाटाकडे निघाला. पाठोपाठ थोड्या वेळानें पिछाडीच्या फौजेनेंही मुकुंदरा घाटाकडे यावें असा संकेत ठरला होता. आघाडीची फौज कोस दोन कोस पुढें जाते तोंच होळकरानें पिछाडीवर हल्ला केला आणि सर्व फौजेची दाणादाण उडवून दिली. लेफ्ट. ल्युकन हा जखमी होऊन होळ-कराच्या हातीं सांपडला. बहुतेक सर्व शिपाई आणि घोडेस्वार ठार झाले. सर्व सामान लुटलें गेलें. ल्यूकन पुढें थोड्या दिवसांनीं होळकराच्या कैदें-तच मरण पावला. पराजयाची ही बातमी सांगत बापू शिंदे जन. मानसन याजकडे धावत आला. दुसरे दिवशीं बापू शिंदे हाही उघड-पणें होळकराला मिळाला. ता. ११ जुलै रोजीं इंग्रजी फौज कशीबशी मुकुंदरा घाटांत पोंचली. घाटांत होळकराच्या फौजेशीं तोंड देण्याचा जनरल मानसन यानें नेटाचा प्रयत्न केला. परंतु होळकराच्या हल्ल्यापुढें इंग्रजी फौजेची त्रेधा उडाली. मुकुंदरा घाट सोडून इंग्रजी फौज पीच्छेहाट करीत ता. १-२ जुलै रोजीं कोटा शहराजवळ आली. कोटयाचा महाराणा जालीमसिंग हा इंग्रजांचा मित्र होता. परंतु होळकराच्या भयामुळें महा-राण्यानें ती मैत्री पार झुगारून दिली. कोटा शहरांत'या पळपुट्या इंग्रजी फौजेला अन्न, पाणी किंवा राहायला जागा सुद्धां मिळाली नाहीं. नंतर इंग्रजी फौज कोट्याहून रामपुऱ्याकडे निघाली. पावसाळ्यामुळें वाटेनें सर्व नद्यानाले तुडुंब भरलेले होते. कोटयापासून सहा मैलांवर एका नदीच्या कांठीं इंग्रजी लष्कराचा दहा दिवस खोळंबा झाला. मिळतील तीं साधनें उपयोगांत आणून बरेंचसें इंग्रजी लष्कर नदीपलीकडे गेलें. नदी उतर-तांना पुष्कळजण पाण्यांत बुडून मेले. अनेकांची होळकरानें कत्तल केली. रामपुऱ्यास जातांना वाटेंत जनरल मानसन यानें आपल्या तोफा फोडल्या आणि दारूगोळ्याचा नाश केला. इंग्रजी लष्कराचें सर्व सामान होळकरानें लुटून घेतलें. अशी चहुंबाजूंनीं दुर्दशा होऊन इंग्रजी लष्कर कसेंबसें मरत झडत ता. २९ जुलै रोजीं टोंक रामपुरा येथें पोंचलें. तेथें सरसेनापति

जनरल लेक याजकडून कुमक येऊन पोंचली. या नवीन आलेल्या फौजेंत तीन ताज्या दमाचीं पलटणें, कवायती घोडेस्वार, तोफखाना आणि मुबलक धान्यसामुग्री असा सरंजाम होता. ही नवी फौज सामील होतांच जनरल मानसन याला थोडासा हुरूप चढला आणि इंग्रजी लष्करानें सुमारें वीस दिवस रामपुरा येथें मुक्काम केला. इंग्रजी लष्करावर होळकराचे सारखे हल्ले चालू होते. त्यामुळें रामपुरा येथें राहाण्याचेंही इंग्रजांस धारिष्ट होईना. तेव्हां खुशालगडाकडे पीच्छेहाट करण्याचा जन. मानसन यानें बेत ठरविला. त्याप्रमाणें पिछाडी आणि आघाडी अशा दोन टोळ्या करून इंग्रजी फौज ता. २२ आगष्ट रोजीं खुशालगडाकडे निघाली. पावसाळ्यामुळें वाटेंतील नद्या सर्व भरलेल्या होत्या. अशी एक नदी उतरत असतांना होळकरानें पिछाडीच्या फौजेवर हल्ला केला. पिछाडीच्या फौजेंत मेजर सिंक्लेअर हा सेनापति होता. तो पहिल्याच चकमकींत ठार झाला. त्याच्या हाताखालचे चौदा इंग्रज ऑफिसर मारले गेले. बहुतेक सर्व शिपाईही मेले. सारांश, ही पिछाडीची फौज होळकरानें धुळीला मिळविली. नदीपलीकडे आघाडीची फौज गेली होती. तिचें सर्व सामान होळकरानें लुटून घेतलें. अशी दशा होऊन इंग्रजी लष्कर ता. २५ आगष्ट रोजीं खुशालगडास पोचलें. तेथें सदाशिवराव बक्षी याच्या हाताखालीं शिंद्यांचीं

ऑगष्ट १८०४

सात पलटणें होतीं. बक्षी आगाऊच होळकराकडे फितूर झाला होता. इंग्रजी फौज जवळ येतांच शिंद्यांच्या फौजेनें उलट इंग्रजांवरच हल्ला केला. खुशालगडच्या मुक्कामीं इंग्रजी लष्करापैकीं दोन पलटणें आणि सर्व घोडेस्वार फितूर होऊन होळकराला सामील झाले. खुशालगडाहून इंग्रजी लष्कर आग्र्याकडे निघालें. वाटेंत हिंदोनचा किल्ला लागला. तेथें या पळपुट्या लष्करानें थोडीशी विश्रांति घेतली. हिंदोनहून हें पळपुटें लष्कर आग्र्याकडे निघालें. त्यावर होळकर तीन टोळ्या करून सारखे हल्ले करीत होता. शेवटीं इंग्रजी लष्कराची दाणादाण झाली. सर्व सामान, बंदुका, कपडे यांची आशा सोडून एकेक शिपाई फुटून फुटून सांपडेल त्या मार्गानें आग्र्याकडे पळूं लागला. जनरल मानसन आणि बरेचसे इंग्रज ऑफिसर हे सर्वांपुढें आग्र्यास पळत गेले. बरेचसे सैनिकही ता. ३१ आगष्ट रोजीं आग्र्यास पोचले. बहुतेक शिपाई

होळकराच्या तावडींत सांपडून ठार झाले. ब्रिगेडियर जनरल मानसन हा घाबरट नादान मनुष्य होता. त्याच्या भित्रेपणामुळें इंग्रजी फौजेचा फुकट संहार झाला. इंग्रजांच्या हिंदुस्थानांतील इतिहासावर मानसन-साहेबाची ही पीछेहाट म्हणजे काळा डागच समजला पाहिजे. असो. आग्र्यास इंग्रजी फौजेचा मोठा तळ होता. त्या ठिकाणीं या पळपुट्या लष्कराला आश्रयाची जागा मिळाली.

**होळकराची भरारीः**—रजपुतान्याच्या रणक्षेत्रावर सबंध सप्टेंबर महिना शांतता नांदत होती. यशवंतराव होळकर आणि त्याचा प्रतिस्पर्धी इंग्रज सरसेनापति जनरल लेक हे दोघेही आपल्या पुढील हालचालींचा नकाशा ठरवीत आपापल्या जागीं स्वस्थ होते. जनरल लेक याच्या हाताखालीं सुमारें पन्नास हजार कवायती पायदळ आणि कवायती घोडेस्वार आणि मोठा तोफखाना आणि दारुगोळ्याचा भरपूर सांठा असा जंगी लष्करी सरंजाम होता. आतांपर्यंत बुंदेलखंड आणि रजपुताना या रणक्षेत्रांवर होळकरानें इंग्रजी फौजेची त्रेधा उडवून दिली. त्यांमुळें इंग्रजांची राजकीय अब्रू कमी झाली होती. आपल्या मर्दुमकीला हा जो काळिमा लागला आहे तो धुऊन टाकावा, अशी जनरल लेक याला फार इच्छा वाटत होती. कसेंही करून होळकराला मैदानांत गांठावें म्हणजे एकाच लढाईंत त्याचा कपाळमोक्ष करतां येईल असा इंग्रजांना भरंवसा वाटत होता. परंतु इतस्ततः भराऱ्या मारणाऱ्या होळकराला मैदानांत गांठावयाचें कसें हें एक कोडेंच होतें. होळकराचा गनिमी कावा विचित्र होता. मैदानांत समोरासमोर इंग्रजांशीं लढण्याच्या भानगडींत तो पडत नसे. पहिल्यानें घोडेस्वारांच्या लहान लहान टोळ्या दिसूं लागत. या लहान टोळ्यांच्या पाठीशीं घोडेस्वारांच्या मोठमोठ्या टोळ्या असत. इंग्रजी फौज चालून आली तर हें घोडदळ पळूं लागे. इंग्रजी फौजेची पाठ वळतांच हजारों मराठे घोडेस्वार चहूंकडून हल्ले करीत आणि पिछाडीवर लांडगेतोड करीत. शत्रूभोंवतीं घिरट्या घाल घालून मराठे संधि सांपडेल तेव्हां शत्रूची कत्तल करीत. अशा स्थितींत होळकराचा पाठलाग करावयाचा आणि केव्हांतरी मैदानांत गांठून त्याचा नाश करावयाचा एवढा एकच मार्ग जनरल लेक याला दिसूं लागला.

आक्टोबर महिन्यांत होळकरानें एकाएकीं मथुरेवर हल्ला केला. होळकराच्या आगमनाची वर्दी लागताच इंग्रजी फौज मथुरेहून जीव घेऊन पळून गेली. होळकर मथुरेहून ता. ८ आक्टोबर रोजीं दिल्लीवर चालून गेला. दिल्लींत इंग्रजी फौजेचें मोठें ठाणें होतें. त्या फौजेंत लेफ्टनंट कर्नल आक्टरलोनी आणि ले. कर्नल बर्न हे दोघे सेनापति होते. त्या दोघांनीं होळकराचा शौर्यानें प्रतिकार करून दिल्लीच्या राजधानीचा बराच वेळ बचाव केला. होळकराच्या पाठोपाठ जनरल लेक हा आग्रा आणि मथुरा या ठाण्यांचा बंदोबस्त करून ता. १८ आक्टोबर रोजीं दिल्लीस आला. तेव्हां दिल्लीचा नाद सोडून होळकर यमुना उतरून अंतर्वेदींत शिरला. होळकराच्या फौजेच्या लहान लहान टोळ्या अंतर्वेदी आणि दुआब या प्रांतांत पसरल्या होत्या. होळकराच्या पाठलागावर ले. कर्नल बर्न हा यमुना उतरून सहराणपुराकडे निघाला. वाटेंत होळकराच्या फौजेनें त्याला गांठलें. इंग्रजी फौज शत्रूचे हल्ले परतवीत शामलीच्या ठाण्याच्या आश्रयास गेली. त्या ठाण्यांतील लोक आगाऊच होळकराकडे फितूर झाले होते. त्यांनीं उलट मराठी फौजेला सामील होऊन इंग्रजांवर हल्ला केला. अशा स्थितींत दिल्लीकडे पीच्छेहाट करण्याचा धाडसी प्रयोग करावा किंवा होळकराच्या सपाट्यांत सांपडून जागच्याजागीं ठार मरावें एवढा एकच मार्ग ले. कर्नल बर्न याच्यापुढें शिल्लक राहिला. अशा आणिबाणीच्या प्रसंगीं या फौजेच्या बचावासाठीं स्वतः जनरल लेक हा धांवत गेला. मोठी इंग्रजी फौज शामली येथें एकत्र झालेली पाहून होळकर मागें सरकून दुआब प्रांताकडे वळला. सुमारें महिनाभर दुआबांत मराठी फौजेनें इंग्रजी फौजेच्या देखदेखत जाळपोळ, लुटालूट आणि कत्तल करून भयंकर धुमाकूळ घातला. इंग्रजी फौजेला होळकराचा कांहींच प्रतिकार करतां आला नाहीं.

आक्टो. ४ सन १८०४

**दीगची लढाई:**—कवायती पलटणें आणि तोफखाना या बाबतींत होळकराची तयारी कांहींच नव्हती. आतांपर्यंत शिंदे आणि इंग्रज यांच्या फौजांची त्यानें वेळोवेळ लूट केली, त्यांत त्याला पुष्कळशा बंदुका आणि

तोफा मिळालेल्या होत्या. होळकरानें आपलें पायदळ दिगच्या किल्ल्याच्या आश्रयाखालीं अत्यंत बंदोबस्तानें ठेविलें होतें. इंग्रजांनीं या फौजेचा माग लावला. जनरल फ्रेझर हा मोठी फौज बरोबर घेऊन ता. १२ नोव्हेंबर रोजीं एकाएकीं या फौजेवर चालून गेला. ता. १२ आणि १३ नोव्हेंबर हे दोन दिवस मराठी घोडेस्वार आणि पायदळ इंग्रजी फौजेशीं अत्यंत शौर्यानें लढलें. परंतु इंग्रजांच्या आगीच्या मारापुढें मराठी फौजेला वेळोवेळ मागें हटावें लागलें. होळकराच्या ऐंशी नव्वद तोफा इंग्रजांनीं काबीज केल्या. काबीज केलेल्या तोफांत सुमारें वीस तोफा खुद्द इंग्रजांच्या होत्या. मानसनच्या पीच्छेहाटींत त्या नुकत्याच होळकराकडे गेल्या होत्या.

नोव्हें. १२।१३ सन १८०४

ता. १३ नोव्हेंबर रोजीं मराठे व इंग्रज यांमध्यें हातघाईच्या लढाया झाल्या. त्यांत उभयपक्षीं भयंकर नुकसान झालें. मराठी फौजेपैकीं दोन अडीच हजार लोक ठार झाले. इंग्रजी फौजेपैकीं हजार बाराशें काळेगोरे सैनिक ठार झाले. कॅ. नारफोर्ड हा नामांकित इंग्रज ऑफिसर एका हल्ल्यांत ठार झाला. सैन्यावरचा मुख्य सेनापति जनरल फ्रेझर हाही एका हल्ल्यांत ठार झाला. होळकराचें पायदळ आश्रयासाठीं दीगच्या किल्ल्यावर जाऊन बसलें. दीगच्या विजयानंतर जन. लेक हा सर्व फौज घेऊन दीग येथें आला. नंतर होळकराचा पाटलाग करून जन. लेक यानें ता. १७ नोव्हेंबर रोजीं होळकराच्या फौजेवर छापा घातला. छाप्याच्या गर्दींत होळकराचे हजार दोन हजार लोक कामास आले. इंग्रजी फौजेचेंही पुष्कळ नुकसान झालें. यानंतर जनरल लेक यानें आपला सर्व तोफखाना एकत्र केला आणि ता. १३ डिसेंबर रोजीं इंग्रजी फौजेनें दीगच्या किल्ल्याला वेढा घातला. हा वेढा दहा बारा दिवस चालला होता. इंग्रजी फौजेच्या आगीच्या मारापुढें किल्ल्यावरील लोकांचा दम उडाला. ता. २५ डिसेंबर रोजीं किल्ल्यावरील लोक सामानसुमान घेऊन किल्ल्याखालीं उतरले आणि दीगचा किल्ला इंग्रजी फौजेच्या हातीं आला.

स्वराज्य आणि स्वधर्म यांच्या रक्षणासाठीं होळकरानें इंग्रजांशीं उत्तर हिंदुस्थानांत प्रचंड झगडा चालविला होता आणि त्यांत जयापजयाचें पारडें सारखें खालीं वर झुकत होतें. सतत नऊ दहा महिने युद्ध चालूनही

शेवटीं जय कोणत्या पक्षास मिळणार याचा अजमास बांधण्याजोगी परिस्थिति अजून निर्माण झाली नव्हती. एकंदर रागरंगावरून भवितव्य-तेची लहरी देवता शेवटीं होळकराला कौल देणार असाच सर्वांना संभव दिसत होता. अशा स्थितींत या युद्धासंबंधीं महाराष्ट्रांत वेळोवेळ सारख्या बातम्या पसरत असत. परप्रांतांतून बातम्या येण्याचीं पूर्वी दोन साधनें असत. पेशवे सरकारचे अंमलदार दूरदूरच्या प्रांतांतून नेमलेले असत. शिवाय पेशवे सरकारचे परदरबारीं वकील असत. हे अंमलदार आणि वकील वेळोवेळ पेशवे सरकारास बातमीपत्रें पाठवीत असत. सरकारी डाकेंतील बातम्या सामान्यतः विश्वसनीय असत. वसईच्या तहानंतर पेशवे हे नामधारी मालक बनले. त्यामुळें सरकारी डाकेचें महत्त्व राहिलें नाहीं. परप्रांतीय बातम्या येण्याचें दुसरें साधन म्हणजे सावकारी डाक हें होय. पुणें शहरांत त्या वेळीं मोठमोठे सावकार असत आणि त्यांच्या पेढ्या सर्व हिंदुस्थानभर पसरलेल्या असत. पेढ्यांच्या मुनिमांमार्फत पर-प्रांतांतून पुण्यास बातमीपत्रें येत असत. सावकारी डाकेंत सामान्यतः बाजारबातम्याच पुष्कळशा लिहिलेल्या असत. होळकराच्या युद्धासंबंधीं पुष्कळशीं बातमीपत्रें आम्हीं पुढें छापलेलीं आहेत. प्रत्येक बातमीपत्रांत होळकराचे विजय आणि इंग्रजांचे पराजय यांचीं भडक आणि विकृत वर्णनें लिहिलेलीं असत. होळकराचे शामतखान पठाण, मीरखान पठाण, हरनाथसिंग, जीवलालसिंग, नागो जिवाजी, हरीपंत भावे वगैरे सरदारां-च्या हालचालींच्या बातम्याही या पत्रांतून लिहिलेल्या असत. अशा सावकारी पत्रांपैकीं कांहीं उतारे पुढें देतों.

(१७ ऑगष्ट १८०४) " मीरखान पठाण [१]श्रीनजीक मिरझापुरास दाखल होऊन प्रांत बेचिराख करोन इंग्रजाकडील आठ पलटणें आलीं होतीं त्यांपैकीं चार गारद करोन बाकीच्यास महसरा[२] करोन लढाई सुरू राखोन यमुनेंतील नावांचा पूल होता तो पठाण याणें कबज केला आहे. पुढें काशीस जावयाची तजवीज आहे. रा. यशवंतराव होळकर मंदोसराजवळोन छत्तीस लाख रुपये घेऊन तेथून झाबडी

१ श्री = काशी, बनारस. २ वेढा.

प्रांताकडे जाऊन तेथून माघारे उलटून जयपूरचीं पलटणें व तुरुकस्वार कोचेनजीक होते त्यासीं गांठ घालोन परस्परें लढाई छ. १८ रबिलाखरीं होऊन चार पलटणें व पांच हजार तुरुकस्वार गारद केले. होळकर यांजकडील पांच सात हजार माणूस जायां झालें. बाकीं पलटणें व तुरुकस्वार मागें हटोन जयपुराकडेस गेलीं. त्यांचे पीच्छावर होळकर फौजसुद्धां जयपुराकडेस गेले. मीरखान याची लढाई जाली ती छ. १३ रबिलाखरीं जाली. म्हणोन दोनी लढायांचीं पत्रें आलीं."

(२० आगष्ट १८०४) "रा. यशवंतराव होळकर यांची व इंग्रजाकडील पलटणें व तुरुकस्वार यांची लढाई छ. ११ रबिलाखरीं कोट्याच्यां मैदानांत मोठी होऊन होळकर याणीं कजाखी करोन दहा पलटणें व दहा बारा हजार तुरुकस्वार व जयपूरकर याजडील दहा हजार फौज इतक्यावर चालोन घेऊन प्रहर सहा घटकापर्यंत समशेरीची लढाई होऊन इंग्रजाकडील पलटणें व तुरुकस्वार व जयपुराकडील फौज कुल[1] गारद करोन बुडवून इंग्रजाकडील सात सरदार कपितान धरोन दोन अडीचशें तोफा व कुल दौलत व इंग्रजांचा तळ डेरे वगैरे, हत्ती घोडे झाडून कबज करोन इंग्रजाकडील खजिना पुतळी वगैरे नगदी चार क्रोडपर्यंत दौलत होळकरास लाभली. त्या प्रांतीं होळकराचा लौकीक मोटाच जाहला. लढाईंत होळकराकडील सात आठ हजारापर्यंत माणूस खेत जाहलें. XXX होळकराकडील मीरखान पटाण अंतर्वेदींत उतरोन श्रीनजीक मिरझापुरास दाखल होऊन चर्नोड वगैरे मिरझापुर आदिकरून प्रांताची खराबी करोन खंडण्या घेऊन काशीकडेस गेले. तिकडून आठ पलटणें इंग्रजाकडील दिल्ली व ग्वालेर व गोहद मिळोन पटाण याच्या मोहऱ्यावर यमुना उतरून येत होतीं. त्यास पटाण याणें मिरझापुराहून दौड करोन पलटणासी लढाई देऊन तीन चार पलटणें गारद करोन बाकीच्या पलटणास महसरा घालोन आहेत. त्यांचेंही पारिपत्य पटाण याचे हातूनच होईल. पटाण याचा रोख बाकीच्या पलटणाचे परिपत्य करोन मकसुदाबाद[2] पटणें येथीज समाचार घेऊन पुढें कलकत्यास जाणार."

---

१ कुल = सर्व. २ मुर्शिदाबाद व पाटणा.

( २२ आगष्ट १८०४ ) " बुंदीकोट्यास होळकर होते. इंग्रजांची पलटणें तिकडून आगरेकडून आलीं. त्याबरोबर शिंदेकडील दोन पलटणें व बापू शिंदे होते. सात आठ पलटणें व चार हजार तुरुकस्वार व पांच हजार शिंदेची फौज ऐसी तिकडून आली. कोट्याहून होळकर पुढें गेले. लढाई जाली. होळकराकडील पांच सात हजार पठाण पडले. तिकडील पांच सहा पलटणें व चार हजार तुरुकस्वार मारले. हजारपर्यंत लोकांचे नाक कान कापले आणि सोडले. शिंदेकडील फौज झाडून[1] लुटली. पळोन लोक बऱ्हाणपुरास आले. फत्ते होळकरानें केली. "

( २७ आक्टोबर १८०४ ) " हल्लीं होळकर याणें आगरे किल्ल्यानजीक सात पलटणें लुटून हल्लयानें किल्ला आगरे घेऊन चार रोज मुक्काम करून पुढें दिल्लीस खासा गेला. अंतर्वेद मथुरा वगैरे अंमल बसला. मीरखान याजला लखनौस पाठविलें. दिल्ली सर करोन काशी प्रयाग ठाणीं घेणार. "

(१२ डिसेंबर १८०४ ) " इंग्रजानीं अल्ली अकबर पातशहा घेऊन भरतपुरास गेले. दिल्लीस ठाणें होळकरानें बसवून इंगळे नि शिंदे यांचे स्वाधीन केलें. पठाण वगैरे फौजा भागीरथीपार जाल्या. लीखासाहेब (जनरल लेक) ठार पडला. लढाई मातबर जाहली. नावांचा पूल इंग्रजानीं बांधला होता, तो फौज जाऊन मोडला. पलटणें गारद जालीं. शिंदे याणीं हुशंगाबादेस ठाणें बसविलें. स्वल्प दिवसांतच उभयतांच्या भेटी होतील. "

( ११ डिसेंबर १८०४ ) " आश्विन मासीं शुद्धांत रा. यशवंतराव होळकर यांची व इंग्रजांची लढाई जाली. होळकराजवळ पाऊण लाख फौज होती. इंग्रजाकडील जमाव पलटणें बारा व आठ हजार तुरुकस्वार. त्यांची यांची गांठ बुंदीच्या मैदानांत पडली. लढाई सुरू जाहली. ते समयीं इंग्रजाकडील मार जबरदस्त बसला. यामुळें फौजेचा टिकाव न निघे. फौजा[2] मागें फिरल्या. नंतर तीन चार कोस होळकर मागें फौजसुद्धां आले. तेथें घोड्याखालीं उडी टाकून सर्वांस बोलावलें. आम्ही

१ सर्व. २ फौज = घोडदळ.

आज इंग्रजापुढें मागें फिरलों. त्यापेक्षां हिंदुपद बुडालें. याजउप्पर तोंड दाखवावयाचें नाहीं. मरणें प्राप्त आहे. तेव्हां सर्वांनीं एक विचार करोन खाशाबरोबर मरण्यास सिद्ध होऊन घोडीं मागें ठेऊन चाळीस हजार पायउतारा होऊन फिरले, आणि एकसहा चालोन घेतलें. मरणाचें भय बाळगलें नाहीं. तेव्हां त्यांची यांची हातघाई जाली. पहिल्या तोंडीं होळकराकडील पांच सहा हजार लोक ठार झाले. नंतर तरवार चालली. त्यांत खासा आहे. दोन प्रहर लढाई हातघाईची जाहली. तेथें इंग्रजाकडील सात पलटणें व तुरुकस्वार झाडून ठार. बाकी राहिलीं त्याणीं पळ काढिला. मार देत चालिते. बुंदीपासून गोकुळवृंदावनपावेतों ते पुढें हे मागें याप्रमाणें तेरा दिवस लढाई होत होती. तेरावे दिवशीं इंग्रजाकडील दोन पलटणें बदलून इकडे आलीं. बाकी एक राहिलें तें जर्जर होऊन आग्र्यानजींक गेलें. होळकर वृंदावनींच मुक्काम करून राहिले. दोन पलटणें होळकराकडे आलीं त्यांत फितूर दृष्टीस पडला. याजकरितां दोन हजार माणसांचे एक हात व नाक याप्रमाणें घेऊन सोडून दिलीं. तीं निघोन आग्र्यास गेलीं. तेथें इंग्रज होते. त्याणीं त्या लोकांस समजोन सांगितलें. तुम्ही येथेंच रहावें, घरीं बसोन तुम्हांस पोटास देऊं. कोणीकडे जाऊं नये. याप्रमाणें भूलथापा देऊन सारे माणूस ठेऊन घेतले. चार दिवस पोटास देऊन त्यांस सांगितलें, तुम्हांस कलकत्त्यास लावून देतों. म्हणून विच्छिन्न झालेले लोक गलबतांत बसवून तितके झाडून यमुनेंत बुडविले. असे जखमी विच्छिन्न गेले असतां अपलौकिक व वाईट म्हणोन बुडवून टाकिले."

( १४ जानेवारी १८०५ ) "होळकरांची व इंग्रजांची डीग भरतपुरावर लढाई जाली. त्यांत इंग्रजांनीं छापा घालून होळकराचा मोड केला. डीगचे किल्ल्यांत बुणगेंसुद्धां हरनाथ होता. तेथें किल्ल्यास मोर्चे लाविले आहेत. लवकरच हस्तगत होईल म्हणोन सरकारांत इंग्रजांनीं वर्तमान कळवून खुषीच्या तोफा करविल्या, व त्यांनींही एकवीस तोफा केल्या. होळकर सडे निघोन गेले. त्यांचेमागें इंग्रजी पलटणें व तुरुकस्वार आहेत."

(जानेवारी १८०५)" रा. यशवंतराव होळकर व इंग्रज यांची लढाई

छ. १३ सवालीं जाहली. इंग्रजांचा नाश बहुत जाहला. इंग्रजांनीं तहाचें बोलणें शामतखान व हरनाथ यांचे विद्यमानें लाविलें. उभयतांही फितुरांत होते. शामतखान डीग व कुंभेरी यांच्या दरम्यान गढी होती तेथें होता. रा. यशवंतराव होळकर यांस खान मजकूर यानीं मेजवानीस बोलाविलें. त्यावरोन हजार खासा घेऊन होळकर गेले. पांचशें लोक बाहेर ठेऊन पांचशेनिशीं गढींत गेले. इंग्रज बावीस कोसावर होते. त्यांस इशारा केला. गढींत गेल्यानंतर होळकर व खान यांचें बोलणें होतच आहे तों इंग्रजाचीं पलटणें दोन दरवाज्याजवळ जाऊन पोचलीं. होळकर याणीं पलटणें यावयाचें प्रयोजन काय म्हणोन विचारिलें. तेव्हां उडवून गोष्ट सांगूं लागले. इतक्यांत खासा होळकर याणीं तरवारीचा वार चालवून शामतखान यास ठार मारिला आणि गढींतून बाहेर निघाले. तों इंग्रज याणीं दोन तोफांचे बार छऱ्याचे केले. तेव्हां होळकराकडील पन्नास असामी कामास आले. होळकर खासा फौजेंत जाऊन इंग्रजी पलटणें चार कापून काढिलीं. हरनाथ याचे पायांत बेडी घातली. इंग्रजांचीं सहा पलटणें कुंभेरीनजीक आहेत त्यास आसपास चौकी दिली आहे. रा. दौलतराव शिंदे कुटुंबासह होळकराकडे गेले. आजपर्यंत भेटी जाहल्याच असतील. होळकराची चाळीस पन्नास हजार फौज कलकत्तेकडे गेली आहे म्हणोन वर्तमान आहे."

(२४ एप्रिल १८०५) "रा. शिंदे भरतपुरास जाऊन दाखल जाहले. सावकारी बातमी आली. भेटी जाहल्याचें पत्र आलें नाहीं. होळकर तह इंग्रजाबरोबर करीत होते. परंतु जाठ हा तह करूं देत नाहींत. तुम्ही तह केला असतां आमचा प्राण घेतील. त्यास तुम्हास व शिंद्यास चार रुपये खर्चास देतों. त्रिवर्गांनीं मिळोन त्यांचें पारिपत्य करूं. तर सर्वांचा परिणाम याप्रमाणें बोलणीं होऊन त्रिवर्ग एक जागीं होणार."

(जून १८०५.) "हिंदुस्थानाकडील पत्रें छ. १६ रबिलावलचीं भवराशेचें मुक्कामचीं आलीं. त्यांतील मजकूर होळकराचे लष्करांत फितूर इंग्रजानीं केला. त्यांत शिंदे यांजकडील लोक व पठाण चाकरी सोडून म्हणोन गेले ते फितुराकरितां गेले. त्याणीं एकदोन लढाया मारल्या.

इंग्रजांस हटविलें असा विश्वास दाखवून मग काल्पीनजीक यमुनातिरीं अगरसर येथें होळकरास सांगितलें, फिरंगी तह करितात. आपलें त्यांचें बोलणें व्हावें. इंग्रजानीं हुंड्या पन्नास लक्षांच्या पाटविल्या. भेट झाल्यावर द्यावी अशी निशा दिली. पठाणानीं पन्नास लक्ष घेऊन होळकरास स्वाधीन करावें, याप्रमाणें बेत होऊन तह जाहला. भेटीचे दिवशीं धरून द्यावें. चार हजार पठाणांचे लोक इंग्रजी चार पलटणें व चार हजार तुरुकस्वार आंत अडीचशें गोरे लखनौपावेतों मुख्य असामी नऊ भेटीस आले. होळकर यास बातमी समजली होती. त्यानीं आपली पागा व शामतखानाचे लोक व मीरखान वगैरे तीस हजार पावेतों तयार केले होते. ते तीन कोशावर रुसून म्हणोन तीन दिवस टेविले. भेटी-समयीं सूचना केली. इंग्रजही डेऱ्यास आले. यशवंतराव शौचाहून येऊन भेट घ्यावी तों पलटणें, तुरुकस्वार व पठाण आंत घेतले. आपण घोड्यावर बसले. शौचाहून आले नाहींत. पठाण व पागा येऊन सभों-वतीं घेरून फितुरी लोकांस बोलावून पारिपत्यें केलीं. पलटणवाले लढले. नाश पांच चार हजार लोकांचा जाहला. गोरे धरोन बेड्या घातल्या. ज्या सावकारांवर हुंड्या ते काल्पींत होते, व इंग्रजांची कोटी होती तेथें पलटणें होतीं. त्यांची लढाई दुसरे दिवशीं होऊन मारलीं. सावकार धरोन घरें नागविलीं. काल्पी शहर लुटलें. यशवंतराव यांस तीन—[१]"

(६ आगष्ट १८०५) "रा. यशवंतराव होळकर अजमेरास जाऊन तेथें पिराची मान्यता करोन कमान रात्रौ दरग्यांत टेविली. प्रातःकाळीं पाहतां कमान चढलेली पाहिली. तेव्हां फिरोन दोन दिवस दोन कमाना उतरोन पिराजवळ टेविल्या. त्याही कमाना चढलेल्या आल्या. पिराचें अभय आलें जे तुम्हास मी सर्व प्रकारें साहित्य आहें."

(६ आगष्ट १८०५[२]) "पेशजीं डीगच्या मुक्कामीं फाल्गुनमासीं लढाई जाली होती. तेव्हां चार पांचशें गोरे लोक होळकरास सांपडले

---

१ पत्र अपुरें सांपडलें. २ स. १९१८ सालीं कै. तीर्थरूपांनीं केळकरकृत 'मराठे व इंग्रज' या पुस्तकाला प्रस्तावना लिहिली आहे तींत हे दोन उतारे पृ. २३ वर घेतलेले आहेत.

होते त्यांचीं नाकें कापून सोडून दिले होते. त्यांपैकीं दीडशे असामी जमादार वगैरे मातबर पुण्यास आलीं. तीं सर्व कलुप यांणीं मुंबईस लाऊन दिलीं. मुंबईहून विलायतेस जाणार होते. त्यास मुंबईकर जनराल [1]डकीणसाहेब यानें विचार केला जे हे नकटे विलायतेस गेले असतां कुंपणीची मर्जी ठीक राहणार नाहीं, म्हणोन तारवांत बसवून दीडशे असामी नकटे होते ते ममईच्या बाऱ्याबाहेर नेऊन बुडविलें."

(नोव्हेंबर १८०५[2]) "छ. १६ रमजानीं इंग्रजाकडील डाक आली. जेवावयासी जात होते. इतक्यांत डांक येऊन दाखल झाली. सबब तीनचार असामी खुरशीवर बसोन डाकेचे तीन फर्द पाहिलेवर डोईची टोपी काढून भूमीवर आपटली. नेत्राश्रुपतन करूं लागले. चवकीदार वगैरे होते त्यास दूर दूर उभे केले. सारेजण जमा होऊन खुरशावर बसोन कौंसल होऊन नंतर एका इंग्रजानें एका अधिकारी यांस उठविलें. इतका मजकूर जाहला. सावकारीं वर्तमान आलें, अश्वदल याची प्रबलता, जळचर पेचांत आहे, असें लिहिलें आलें. शिंदे यांचीं पत्रें आलीं त्यांत अतीप्रबलता अश्वदलाची[3] लिहिली आहे. मुकलसाहेबाचीं पलटणें बुडविलीं. दहाबारा पलटणें घेऊन यमुनापार लखनौकडे जात होता. त्यास सभोवते घेरा पडला. असें वर्तमान लिहिलें आलें. त्यावरोन हत्तीवर घालोन साखरा वाटणार होते ती राहिली. इंग्रजास जवाहीर व वस्त्रें द्यावयाचीं काढलीं होतीं तीं दिलीं नाहींत."

शिंदे भोसले आणि इंग्रज यांमधील युद्ध नुकतेंच संपलें होतें. त्यांत शिंदे भोसल्यांनीं कोणताच पराक्रम गाजविला नाहीं. इतकेंच नव्हे तर इंग्रजांशीं झालेल्या पहिल्याच लढाईंत शत्रूच्या तोफेच्या पाहिल्या बाराबरोबर हे दोघे शूर मराठे सरदार जीव घेऊन पळून गेले! पुढेंही विशेषसा अडथळा न होतां इंग्रजांना सहज विजय मिळत गेले. या युद्धासंबंधीं महाराष्ट्रांत त्या वेळीं सरकारी आणि सावकारी डाकेमार्फत

---

१ डकीणसाहेब = मि. जोनाथन डंकन, मुंबईचा गव्हर्नर. २ पृ. ८०१२ तळटीप २ पाहा. ३ होळकराची.

बातमीपत्रें येत असत त्यांतून मात्र खोट्या बातम्या मुद्दाम पसरविल्या जात असत. प्रत्येक बातमीपत्रांत शिंद्यांच्या पराक्रमाचीं काल्पनिक भरमसाट वर्णनें लिहिलेलीं असत, आणि लढायांतून हजारों इंग्रज ठार झाले आणि नापत्ता झाले असा खोटाच खमंग मजकूर लिहिलेला असे! पुढें आम्हीं होळकर व इंग्रज यांमधील युद्धासंबंधीं पुष्कळ बातमीपत्रें छापलेलीं आहेत. त्या पत्रांतील मजकुराची सत्यासत्यतेची निवड करणें कठिण आहे. या युद्धांत मराठ्यांच्या बाजूनें ज्यांनीं प्रत्यक्ष भाग घेतला होता त्यांनीं लिहिलेल्या हकीगती उपलब्ध झाल्याशिवाय या पत्रांतून आलेल्या माहितीसंबंधीं खऱ्याखोट्याची निवड करतां येणार नाहीं. इतकें मात्र खरें कीं, होळकर आणि इंग्रज यांमध्यें उत्तर हिंदुस्थानांत बरोबरीचा सामना चालू होता, आणि पराक्रमाच्या बाबतींत होळकरच श्रेष्ठ ठरला होता. असो. पुढें छापलेल्या बातमीपत्रांपैकीं कांहीं उतारे आम्हीं वर दिले आहेत.

होळकर व इंग्रज यांमध्यें रणधुमाळी चालू असतां या वेळीं महाराष्ट्रांत अनेक राजकीय महत्त्वाच्या घडामोडी होत होत्या, त्यांचाही योग्य तो परामर्श या ठिकाणीं घेतला पाहिजे. पुढें आम्हीं पत्रव्यवहार छापला आहे त्यांतून अनेक राजकीय घडामोडी आणि अनेक राजकीय प्रकरणें यांची माहिती आलेली आहे. या सर्वांमध्यें प्रतिनिधि प्रकरण हें सर्वांत महत्त्वाचें आहे. या प्रकरणाची माहिती भाग १० ते १४ या पांची भागांतून तुटक तुटक आलेली आहे. ती सर्व एकत्र विचारांत घेऊन आणि पूर्वापरसंबंध दाखवून आम्ही या प्रतिनिधि प्रकरणाची हकीगत पुढें देतों.

**(२) प्रतिनिधींचा दंगा. (३) मान्यांचें बंड. (४) सांगलीकरांचे पराक्रम.**

**२ प्रतिनिधि प्रकरण**—श्रीनिवासराव उर्फ भवानराव प्रतिनिधि ता. ३० आगष्ट १७७७ रोजीं मृत्यु पावले. त्यांना दोन स्त्रिया होत्या. नवऱ्याच्या पश्चात् या दोघी स्त्रिया अत्यंत गुण्यागोविंदानें एकत्र नांदत होत्या. त्या दोघींमध्यें भांडणाचा प्रसंग कधींच उद्भवला नाहीं. भवान-

रावाची धाकटी स्त्री इ. स. १८०० सालीं वारली. थोरली स्त्री काशीबाई अतिशय कर्तृत्ववान् होती. प्रतिनिधींच्या पश्चात् त्यांच्या दौलतीचा बंदोबस्त करण्याकारितां नाना फडणिसांनीं कृष्णराव तात्या जोशी नांवाचा एक कारभारी पाठविला. परंतु काशीबाईनीं जोशांची डाळ शिजूं दिली नाहीं. दौलतीचे गणेशपंत कात्रे, बळवंतराव फडणीस आणि मोरो अनंत पेंढारकर असे तिघे जुने कारभारी होते त्यांना हाताशीं धरून काशीबाईनीं स्वतः राज्यकारभार हाकण्यास सुरुवात केली. भवानराव हे मोठे पराक्रमी आणि स्वाभिमानी सरदार होते आणि त्यांचा मराठमंडळांत फार मोठा लौकिक होता. त्यांच्या पराक्रमाची आणि कर्तृत्वाची पुष्कळ माहिती आम्हीं ऐ. ले. संग्रहाच्या पहिल्या आठ भागांतून जागोजाग दिलेली आहे. काशीबाईनीं नवऱ्याचा लौकिक कायम ठेविला. इ. स. १७९८ सालीं सातारकर महाराजांनीं दंगा केला त्या प्रसंगीं काशीबाईनीं करवीरकरांच्या फौजेचा लोंढा अनेक दिवस अत्यंत शौर्यानें कसा थोपवून धरला होता आणि त्यामुळें मराठी राज्याचा कसा बचाव झाला ही हकीगत आम्हीं दहाव्या भागांत विस्तृत दिलेली आहे. मराठी इतिहासांत ज्या थोड्याशा कर्तृत्ववान् आणि पराक्रमी स्त्रिया निपजल्या त्यांत काशीबाईची प्रामुख्यानें गणना केली पाहिजे.

काशीबाईना एकच मुलगा झाला. मुलाचें नांव परशराम श्रीनिवासराव असें होतें. 'पंत' अशा लहानशा नांवानेंच त्यांचा जुन्या कागदपत्रांतून उल्लेख करीत असत. भवानरावांचा मृत्यु झाला त्याच दिवशीं पंतांचा जन्म झाला होता. पंतांच्या शिक्षणाची वगैरे सर्व व्यवस्था बाईनीं अत्यंत दक्षतेनें ठेविली होती हें सांगणें नकोच. मुलाच्या बाबतींत मात्र काशीबाईची अत्यंत निराशा झाली. मुलगा वयांत येतांच छांदिष्ट, हेंकट, मनस्वी आणि दुर्वृत्त निपजला. बाईनीं मुलाचीं हौसेनें दोन लग्नें केलीं होतीं. परंतु पंत स्त्रियांचें तोंडसुद्धां पहात नसत. नेहमीं भांग प्यावी, वाटेल तें करावें आणि वाटेल तसें वागावें. चार लुचे लोक भोंवतीं गोळा करून मजा मारावी हा पंतांचा नित्यक्रम असे. सुंदर स्त्रिया भोंवतीं गोळा करून ख्यालीखुशाली करावी हाही त्यांना नाद होता.

लुच्चे लोकांनीं पंतांच्या मनांत असें भरविलें होतें कीं, भवानरावाच्या जन्मपत्रिकेंत पुत्रमुखदर्शनाचा योग नव्हता, त्यामुळें तुमच्या जन्म-काळीं त्यांना मृत्यु आला. तुमच्या पत्रिकेंतही तो योग आहेच. तुमच्या स्त्रीला जर मुलगा होईल तर त्याच दिवशीं तुम्हांस मृत्यु प्राप्त होईल. पंत स्त्रियांचें तोंड पहात नसत त्याचें कारण हें असें आहे. अशा मुलाला ताळयावर कसें आणावयाचें हें कोडें बाई व त्यांचे कारभारी यांना शेवटपर्यंत सुटलें नाहीं. पंत अत्यंत रागीट, शूर आणि धाडसी होते. त्यामुळें त्यांचें सर्वांना भय वाटत असे. कोणी त्यांना उपदेशाच्या चार गोष्टी सांगण्यास धजत नसत. पंतांचे खेळ दिवसेंदिवस वाढूं लागले आणि ते मन मानेल तसा राज्यकारभार करूं लागले. त्यामुळें लुच्चे लोकांचें फावलें. शेवटीं काशीबाई व त्यांचे कारभारी यांचा निरुपाय झाला आणि त्यांनीं हें प्रकरण पुण्यास नाना फडनवीसांकडे नेलें. नानांनीं पंतांचा ताबडतोब बंदोबस्त केला. सवाई माधवराव पेशवे यांच्या लग्नाच्या निमित्तानें नानांनीं पंतांस पुण्यास आणलें आणि तेथेंच त्यांना अडकवून पाडलें. तुम्ही सरकारपरवानगीशिवाय पुण्याबाहेर जाऊं नये अशी नानांनीं पंतांस तक्त ताकीद दिली. पंत नानांना अतिशय भीत असत. नानांनीं पंतांच्या खर्चाची व्यवस्थाही उत्तम प्रकारें केली. प्रतिनिधि घराण्याचें खाजगी उत्पन्न फार मोठें होतें. या खाजगीच्या उत्पन्नाचा उपभोग पंतांनीं घ्यावा आणि प्रतिनिधि घराण्याचा सरंजामी मुलूख आणि दौलतीचा सर्व कारभार बाईकडे चालावा असा नानांनीं ठराव केला. खासगीच्या उत्पन्नांत आणि कारभारांत बाईनीं लक्ष घालूं नये आणि दौलतीच्या कारभारांत पंतांचा संबंध असूं नये ही नानांनीं ठरविलेली व्यवस्था फार चांगली होती. पंत पुण्यांत प्रतिबंधांत पडले तरी तो प्रतिबंध केवळ नांवापुरताच होता. त्यांनीं पुण्याबाहेर जावयाचें नाहीं एवढाच त्याचा अर्थ होता. एरवीं त्यांना सर्व प्रकारची मोकळीक होती. ते आपल्या स्वतःच्या वाड्यांत ऐश्वर्यानें रहात होते. पुण्यांत बसून खासगीचा सर्व कारभार करावा, पुण्यांत कोठेंही फिरावें आणि कांहींही करावें या गोष्टीला प्रत्यवाय नव्हता. पेशव्यांच्या दरबारीं प्रतिनिधींचा मान फार मोठा होता. पेशवे आणि प्रतिनिधि हे राजपथकीबरोबरीचे

सरदार होते. त्यामुळें पुण्यांत पंतांचा मानसन्मान उत्तम प्रकारचा ठेवण्यांत येत असे. पेशव्यांच्या स्वारीची मिरवणूक निघाली तर पेशव्यांच्या अंबारीच्या हत्तीच्या पाठोपाठ पंतांचा अंबारीचा हत्ती चालत असे. आपण पुण्यांत अडकून पडलों ही गोष्ट पंतांच्या मनाला अतिशय झोंबली आणि त्यामुळें काशीबाई मातुश्री आणि त्यांचे कारभारी यांशीं पंतांचें जन्माचें वाकडें आलें. पंतांना सुंदर स्त्रियांचा षोक होता हें पूर्वी सांगितलेंच आहे. त्यांची ताई तेलीण नांवाची अत्यंत आवडती मैत्रीण होती. ताई तेलिणीचा उल्लेख या हकिगतींत पुढें वारंवार येणार आहे. ताईशिवाय आणखी तीन चार सुंदर स्त्रिया पंतांनीं पुण्यास येतांना बरोबर घेतल्या होत्या. पंत स्वतःच्या स्त्रियांचें तोंड पहात नसत आणि असल्या बायकांपुढें मात्र लाळ घोटत. यामुळें त्यांचा फार दुर्लौकिक सर्वत्र पसरला होता.

प्रतिनिधींच्या दौलतीची नानांनीं केलेली व्यवस्था बरेच दिवस सुरळित चालली. पुढें सवाई माधवराव पेशवे मृत्यु पावले आणि राज्यबुडवे दुसरे बाजीराव हे गादीवर आले. इ. स. १७९६–१८०० पर्यंत मराठी राज्यांत सारख्या राज्यक्रांत्या आणि उलथापालथी होत होत्या. परंतु पंतांच्या परिस्थितींत कांहीं फरक पडला नाहीं. ता. १३ मार्च १८०० या दिवशीं नाना फडनवीस मृत्यु पावले आणि पुढें एक दोन महिन्यातच पंतांच्या परिस्थितींत एखाद्या चलच्चित्रपटाप्रमाणें अत्यंत झपाट्यानें फरक पडूं लागले.

ताई तेलिणीचा वर उल्लेख करण्यांत आला आहेच. बाजीराव पेशवे आणि दौलतराव शिंदे यांचा या ताईवर डोळा होता. पंतांकडे या बाईबद्दल उघडपणें मागणी करणें लौकिकाच्या दृष्टीनें गैर होतें. सबब पंतांशीं कुरापत काढण्याची संधि पेशवे व शिंदे पहात होते. तशी संधि त्यांना लवकरच प्राप्त झाली. नाना वारल्यावर त्यांच्या पदरचे हजार दोन हजार आरब पुण्यांतच जागजागीं नोकरीला राहिले होते. त्यांपैकीं पंतांनींही तीनचारशें आरब आपल्या नोकरींत ठेवून घेतले होते. हे सर्व आरब पुण्यांतून काढून लावावेत असा पेशव्यांचा निश्चय ठरला. आणि त्या-

प्रमाणें शिंद्यांच्या लष्कराच्या मदतीनें आरबांना पुण्यांतून हाकलून देण्यांत आलें. आरबांना काढून लावण्याबद्दल पंतांनाही पेशव्यांचा तगादा बसला. पंतांनीं आरबांना दूर करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला परंतु ते सुधेपणानें जाईनात. आरब जमातदार यांपासून पंतांनीं कर्ज काढलें होतें. शिवाय आरबांची पगाराची बाकी तुंबली होती. यामुळें त्यांनीं दंगा सुरू केला. त्यापुढील हकीगत—"[1]नाना" वारल्यावर पेशवे आणि पंत यांमध्यें थोडें थोडें वाकडें येत चाललें. पेशव्यांचे कारभारी बाळोजी कुंजर आणि आबा काळे यांशींहि पंतांचें अतिशय वाकडें आलें. पंतांनीं तीन चारशें आरब चाकरीस ठेविले. पुढें शिंदेशाही माजली. आरब घालवण्याबद्दल तगादा बसला. ते सुधेपणानें जाईनात. त्यांची चाळीस हजार रुपये तलब (पगाराची बाकी) चढली होती. शिवाय पंतांनीं आरबांच्या जमातदारांपासून पंधरा हजार रुपये कर्ज काढलें होतें. आरबांचें धरणें बसलें. पंत व वाड्यांतील पन्नाससाठ असामी यांस उपाशी बसविलें. शेवटीं

स. १८०० जून पंतांनीं तीस हजार दिले. तेव्हां चवये दिवशीं जेवणास परवानगी दिली. बाकीच्या रकमेची तोड करतां आली नाहीं, त्यामुळें आरब तसेच राहिले."

यानंतरचा प्रसंग—

"[2]श्रीमंत रा. पंत प्रतिनिधि यांनीं आरब दूर करावेत याप्रमाणें सरकारांतून ताकीद जाली. आरब दूर करावयाचें ठरलें तेव्हां तलब चाळीस हजार रुपये व कर्जाऊ ऐवज पंतांनीं घेतला आहे तो द्यावा

३ जुलै स. १८०० म्हणोन अरब याणीं अडवून बसविलें. ते समयीं पदरचे लोकानीं शक्त्यनुसार ऐवज दिला. पंचवीस तीस हजारांचा भरणा जाहला. बाकीचा भरणा न होय तेव्हां पंतानीं कित्येकांच्या अब्रू घेतल्या. आठ चार दिवस दंगा जाला. नंतर सरकारांतून वारंवार ताकीद होऊं लागली कीं, लवकर आरब दूर करणें. लोकांच्या अब्रूनिमित्ताखेरीस घेतात हें चांगलें नाहीं. जवळ कारभारी

---

१ पहा भाग १२ पृ. ६४५६. २ पहा भाग १२ पृ. ६५४० आणि पत्र नं. ५६४५.

आहेत त्याचे ऐकत नाहींत, हें कामास येणार नाहीं. महात खिजमतगार पखाली यानीं सांगावें तेंच करावें. सारा दिवस आरब जमातदार यापाशीं बोलणें खलबत. मनस्वी वर्तणूक करावी. नाटकशाळा ठेविली ते जात तेली. बहुत निंद्य हें कामाचें नाहीं. अशी ताकीद सरकारची जाली. त्यावरोन रागें भरोन अटाळा अगोदर लावून देऊन आपण स्वार गाडद तयार करून निघणार. हें वर्तमान सरकारांत विदित जाल्यानंतर तुम्ही जाऊं नये, जाऊं म्हटल्यास अटकाव होईल असे सांगोन पाठविलें. तत्राप आग्रहें करोन निघणार हा विचार कळतांच सरकारांतून स्वार, गाडदी, तोफा २ शिंद्याचें पलटण व स्वार पाहाऱ्यावर आले. यावर मुख्य घाटगे व तांबोळी. सायंकाळीं घाटगे वाड्यांत गेले. पंतास चार गोष्टी सांगितल्या. जेवत नव्हते जेवावयास घातलें. आपले लोक घाटग्यानें वाड्यांत घातले. नाटकशाळेचा आग्रह बहुत धरला. हिची गत तीच माझी पंत म्हणतात. गोष्ट थियरास जाईलसें दिसतें. खासा बायकोचें दर्शन नाहीं. वरकड सर्व असेंच. यांत निवड नाहीं. घाटग्याला सर्व लोक निघेनात. कांहीं निघाले. कांहींनीं स्थलांतर द्रव्यासुद्धां केलें. पांचसहाशें वाड्यांत आहेत. पंत जिवावर उदार. उदईक गोळा सुरू होतो."

या प्रसंगीं घाटग्यानें ताई तेलिणीला ताब्यांत घेण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. परंतु तो साधला नाहीं. पंत शूर आणि माथेफिरू आहेत, अतिप्रसंग करून जबरदस्तीनें तिला ताब्यांत घ्यावी तर रक्तपातापर्यंत मजल येईल असें भय वाटून घाटग्यानें तूर्त तो विचार सोडून दिला. पंतांनीं यानंतर एक गोष्ट केली ती आश्चर्यकारक आहे. बाजीराव, बाळोजा कुंजर, आबा काळे, दौलतराव शिंदे आणि सर्जेराव घाटगे या सर्वांची नजर चुकवून आणि पहारे चुकवून पंतांनीं ताईला सातारा प्रांतीं गुप्तपणें पळविली. त्यामुळें बरीच भानगड मिटली. असो. यानंतर पेशव्यांचा पंतांवर जास्त जुलूम होत चालला, आणि शेवटीं सर्वस्व जाऊन आपण कैदेंत पडणार असें पंतांना भय वाटूं लागलें. तेव्हां आपणाला वांचविण्याबद्दल त्यांनीं शिंदे व घाटगे यांचीं अतिशय आर्जवें केलीं. पंत

घाटग्यास लिहितात– "आमची[1] अब्रू बेअब्रू सारी तुम्हांकडे व रा. दौलतराव शिंदे अलिजाहबहादर यांवर आहे. तुम्ही उभयतांनी समक्ष बोलून जें करणें तें एकीकडे नेऊन

६ जुलै १८००

हित करावें. नाहीं तर काशीयात्रेस जाणेस निरोप द्यावा. आपलें इमान गुंतलें. दुसरा विचार आपलेशिवाय असेल तर महाराजांच्या बीजाचा असेल ही खातरजमा असावी. परस्परें फार बातम्या ऐकण्यांत येतात. आपली स्वदस्तूरची चिटी व दौलतराव शिंदे यांची स्वदस्तूरची चिटी अगत्याची आली म्हणजे भरंवसा लागेल. नाहीं तर आम्ही अब्रूसाठीं मरतों. कुंजर व काळे आम्हांस वाचूं देत नाहींत. दौलतही राहूं देत नाहींत. सारे बुडवितात. आपले हातची उभारणी आहे. याचा अभिमान आपल्यास आहेच. इतक्यावर आमचें दैव फुटलें असल्यास उपाय काय ! आपण येऊन एकदां भेटून दोन गोष्टी ऐकून जावें. इतक्यावर आपली मर्जी. आमची अखेर आली."

काय ही पंतांची भाषा आणि काय ही त्यांची दशा ! घाटग्यासारख्या क्षुद्र माणसाची त्यांनीं पायधरणी केली. परंतु शेवटीं काय व्हायचें तें झालेंच. तो मजकूर—

"रा. पंत[2] प्रतिनिधी यांची वर्तणूक चांगली नाहीं म्हणोन दोन वेळां सरकारांतून शिंदे यांस सांगोन तोफा पलटणांच्या चौक्या बसविल्या होत्या. फिरोन बोलणें होऊन चौक्याही उठल्या. गैरवाजवी वर्तणूक करूं नये, नाटकशाळा लावून द्यावी, कारभारी यांचे हातून सुरळीत कामकाज घ्यावें ऐसा ठराव जाला होता. परंतु तेंही जालें नाहीं. पूर्ववत्प्रमाणें बेजहा वर्तणूक व्हावयास लागली. आज प्रातःकाळीं दोन पलटणें व पांच तोफा, स्वार पांचशें घेऊन एकाएकीं वाड्यांत चढाई करून गेले. पंताकडील कांहीं

३० आक्टोबर १८००

लोक पळोन गेले. दहा वीस लोक स्थळ सोडीन लढों लागले. झटपट जाली. पांच सात लोक पंताकडील ठार जाले. शिंदेकडील पांच सात ठार व दहावीस जखमी जाले. खासा पंत बंगल्यामध्यें जिन्याचें करा–

---

1 पहा भाग १२ पत्र ५६५१. २ पहा भाग १२ पत्र नं. ५७७७.

लावून बसले आहेत. हातीं निमच्या सळ सोडोन बसले आहेत. वाड्यां-तील झाडून चीजवस्त लुटली. शेदोनशें घरें सभोवतीं लुटलीं. त्यांजवर समय विलक्षण गुदरला आहे."

"पंताचे वाड्यांत[1] दंगा जाला. पांच सात असामी ठार वीस जखमी जाले. शिंदेकडील तीन ठार वीस जखमी आहेत. बाकी लोक झाडून बाहेर काढले. खासा पंताजवळ बंगल्यामध्यें दहा पंधरा असामी केवळ निदानचे सोबती मात्र एक दिवस होते. सरकारांतून बाळोजी कुंजर जाऊन पंतास चार गोष्टी सांगोन सरकारांत वाड्यांत आणलें. निराळें स्थळ हौदाजवळ पूर्वेचे अंगचें थोरलें देवघर व आंतील सोपा व

**६ आक्टोबर इ. स. १८००**

वरील दिवाणखाना पंताकडे दिला. चार लुच्चे जवळ होते त्यांस प्रतिबंध केला आहे. नाटकशाळा कोणी म्हणतात पंतांनीं लांबविली. कोणी म्हणतात शिंद्यांनीं सैन्यांत नेली. परंतु पंताजवळ नाहीं. पंताचे वाड्यांत गर्दी जाली ते समयीं वाडा झाडून लुटला. सुतळीचा तोडादेखील राहिला नाहीं. सभोंवते चाळीस पन्नास वाडे व घरें लुटलीं. लाखो रुप-यांची नुकसानी जाली. पंतांचा आब गेला, ही गोष्ट लौकिकांत चांगली जाली नाहीं. लोक बहुत श्रमी होतात. बहुत दिवसांचे दौलतवान. त्यांजवर हा प्रसंग गुदरला ! भगवत् सत्ता प्रमाण !"

"पंत शनवार वाड्यांत[2] आले तेव्हां त्यांजबरोबर त्यांचें शेंपन्नास हत्यारबंद माणूस होतें. ते लोक पेशव्यांनीं हळूहळू हांकून दिले. फक्त दहा पांच शिपाई चार दोन कारकून मात्र राहूं दिले. सन १८०० च्या आक्टो. महिन्याच्या अखेरीस त्यांस शनिवार वाड्यांतून काढून गोविंद-राव काळे यांचे वाड्यांत ठेविलें. याच संधींत पंताची सापत्न आई वारली.

**नोव्हें.-डिसेंबर सन १८००**

पंतांची सर्वच जहागीर शिंद्यास द्यावी असा विचार पेशव्यांच्या मनांत घोळत होता. पुढें पेशवे सासवडास गेले तेव्हां पंतांस बरोबर घेतलें. त्यांचा

१ पहा भाग बारा पत्र नं. ५७७९. २ पहा भाग बारा पृ. ६७८१.

स्वतंत्र खर्च फारसा ठेविलेला नव्हताच. त्यांच्या पंगतीस सारे पंधरा वीस पात्र जेवीत होतें. पुढें सासवडास आल्यावर पेशव्यांनीं तेही लोक हांकून लाविले आणि त्यांजवळ एक वैदिक, एक पूजेचा ब्राह्मण, एक चाकरीचा माणूस अशीं तीन माणसें ठेविलीं. पंतांनीं यावर अन्न सोडलें. फक्त दूध रताळीं खात. पुढें निरुपायानें अन्नही घेऊं लागले."

"पंतानीं[1] उपवास केले परंतु त्यांची दाद लागली नाहीं. तेव्हां पंत शेवटीं मऊ पडले. पांच लक्ष रुपये उत्पन्नाच्या मुलखाच्या सोडचिठ्या त्यांनीं पेशव्यांस दिल्या. प्रतिनिधि आणि पेशवे हे बरोबरीचे राजपथकी सरदार होते. पेशवे हे स्वारीवर निघाले तरच प्रतिनिधींनींही स्वारीवर बाहेर पडावें अशी वहिवाट होती. पंत अडचणींत सांपडले होते. त्यांनीं हे मानापानाचे हट्ट सोडले. आमचा सरदार पांडोजी कुंजर (बाळोजी कुंजराचा मुलगा) कर्नाटकांत स्वारीवर जात आहे त्याच्या हाताखालीं तुम्ही काम करावें असा पेशव्यांचा पंतांना हुकूम झाला. पंतांनीं हा हुकूमही निमूटपणें मान्य केला. तेव्हां आगष्ट महिन्यांत त्यांजवरील कैदेची सक्ती थोडीशी कमी करण्यांत आली."

स. १८०१

मातुश्रीशीं भांडल्यामुळें पंतांचा दिवसेंदिवस अधःपात होत चालला होता. शेवटीं त्यांच्या अधःपाताची गाडी एका खोल खड्ड्यांत कशी पडली याची माहिती आतांपर्यंत देण्यांत आली आहे. सन १८०१ च्या जून महिन्यापासून मराठी राजकारणाचें तोंड एकाएकीं फिरलें. अमृतराव, मोरोबा फडणीस, बाबा फडके वगैरे मंडळींनीं कारस्थान करून होळकराला पुण्यास आणलें. होळकरानें हडपसरच्या लढाईंत शिंद्यांच्या सर्व फौजेचा पुरता विध्वंस केला, नंतर पेशवे पळून इंग्रजांकडे गेले, हा सर्व मजकूर आम्हीं चौदाव्या भागांत सविस्तर वर्णिला आहे. पुण्यांत आतांपर्यंत शिंदेशाही होती तिच्या जागीं नवीन होळकरशाही झाली. होळकरशाहीच्या अंमलाखालींही प्रतिनिधि घराण्यावर नवीन नवीन संकटें येत गेलीं. त्यांची माहिती—

फत्तेसिंग माने नांवाचा होळकराचा एक शूर सरदार होता. माने हा

१ पहा भाग तेरा पृ. ६८९८.

मूळचा रहिमतपूरचा पाटील होता. होळकरानें फत्तेसिंगास कर्नाटक प्रांतावर पंधरा लक्ष रुपयांच्या वराता दिल्या. नंतर माने पंधरा हजार फौज घेऊन द्रव्यवसुलीसाठीं रहिमतपुरास आला. तेथून त्यानें काशीबाई-कडे दहा लक्ष रुपये खंडणीची मागणी केली. कारभारी मोरोपंत पेंढारकर होता. त्यानें मान्याचीं आर्जवें करून आणि त्याला पांच हजारांचा गांव इनाम देऊं करून रकम चार लक्ष रुपयांवर ठरवून घेतली. ही रकमही घड वसूल होईना, तेव्हां फत्तेसिंगाचा सरदार पाटलोजी माने सात हजार फौज घेऊन कऱ्हाडास आला आणि त्यानें वसंतगडास वेढा दिला. किल्ल्यावर काशीबाई होती, तिनें महिना पंधरा दिवस शत्रूशीं नेटानें टक्कर दिली. परंतु शेवटीं तिचे सर्व उपाय थकले. अशा स्थितींत कार-भारी मोरोपंत पेंढारकर यानें एका अंधाऱ्या रात्रीं पाटलोजीवर छापा घातला आणि त्याची फौज उधळून लावून त्याचे दोनशें घोडे आणि तीन तोफा हिसकून घेतल्या. छाप्याच्या गर्दींत काशीबाई वसंतगडाहून पळून वासोट्याच्या किल्ल्यावर जाऊन बसली. रहिमतपुरास ही बातमी समजतांच स्वतः फत्तेसिंग ता. १५ जानेवारी स. १८०३ रोजीं कऱ्हाडास आला आणि वसंतगड घेऊन त्यानें गांवांतील घरांस खणत्या लावल्या. शिवाय धराधर आणि मारामार करून कऱ्हाड गांवांतील लोकांपासून त्यानें हजारों रुपये उकळले. यानंतर नारायणराव घोरपडे, सुभानजी माने, पाटलोजी माने, नारायणराव माने, कोठारी, आबा बक्षी, मार्तंड विठ्ठल परभु हे मान्याचे सरदार फौजेच्या लहान लहान टोळ्या घेऊन लुटालूट करण्याकरितां सर्व प्रांतभर पसरले.

याप्रमाणें कऱ्हाडास मान्याची धामधूम चालू असतां त्याच वेळीं पुण्यास पंत होते त्यांजवरही असाच प्रसंग गुदरला. पुण्याच्या रहिवाशां-पासून द्रव्य उकळण्याकरितां होळकरानें हरीपंत भावे या सरदाराची नेमणूक केली होती. भावे हा घाटग्याप्रमाणें उलट्या काळजाचा क्रूरकर्मा होता. त्यानें पंतांकडे सव्वा-लाख रुपये खंडणी आणि पंचवीस हजार उंबरेपट्टी एकूण दीड लक्षाची मागणी केली. पंतांनीं खंडणी माफ होण्याबद्दल भावे, मोरोबा फडणीस आणि बाबा फडके यांचीं पुष्कळ आर्जवें करून पाहिलीं. परंतु त्यांची

**सन १८०३ जाने.**

कोठेंही दाद लागली नाहीं. उलट भाव्यांनीं प्रतिनिधींच्या वाड्यावर तोफा डागल्या. शेवटीं रकमेच्या भरण्यासाठीं पंतांनीं निरुपायानें चिटको-पंत एकांडे, नाना वोकील आणि कारभारी मोरोपंत पेंढारकर याचा मुलगा असे तिघे असामी भाव्याकडे ओलीस पाठविले. रकमेबद्दल जामीन पटले अशा समजुतीनें पंतांवरील पहारे थोडेसे ढिले करण्यांत आले. त्याचा फायदा पंतांनीं तावडतोब घेतला. ता. २३ जानेवारी रोजीं रात्रीं पंत तीनशें स्वारांनिशीं पुण्याहून निसटून सातारा प्रांतीं पळाले. मागें भाव्यांनीं त्यांच्या वाड्याची जप्ती केली आणि तिघां जामिनांना तापल्या तव्यावर उभे करून त्यांचे हाल हाल केले.

पंत सातारा प्रांतीं आल्यावर कर्नाटकांतील राजकारणाला निराळें वळण लागलें. रामचंद्रराव घोरपडे हा मान्याचा सरदार करकंब तालुक्यांत होता, त्यावर पंतांनीं छापा घातला आणि त्याच्या फौजेची दाणादाण केली. पंतांचा हा पराक्रम पाहून मान्याच्या फौजेच्या लहान लहान टोळया प्रांतभर पसरल्या होत्या, त्यांमध्यें पळापळ सुरू झाली. पटवर्धन, रास्ते, धारवाडचा बापू शिंदे, करवीरकर, नाना पुरंदरे या सर्वांनीं एकजूट करून मान्याविरुद्ध हत्यार उपसलें. त्यामुळें कर्नाटकांत मान्याचा फैलाव होऊं शकला नाहीं. होळकरानें नागो जिवाजी याजबरोबर नवीन फौज मान्याकडे पाठविली. सन १८०३ च्या फेब्रुवारी महिन्यांत फत्तेसिंग आणि नागो जिवाजी रहिमतपुरास एकत्र झाले. पुढें होळकराच्या नाशाकरितां इंग्रजांच्या फौजा पुण्याकडे येऊं लागल्या तेव्हां होळकर माळवा प्रांताकडे परत निघाला. तुम्ही होळकरास सोडून आम्हांकडे याल तर तुम्हांस दहा लक्षांची जहागिर देऊं असें पेशव्यांनीं फत्तेसिंगास आमिष दाखविलें आणि माने त्या आमिषाला बळी पडून त्यानें होळ-करास सोडिलें. जहागीर देण्याची ही पेशव्यांची नुसती भूलथाप आहे ही गोष्ट चार सहा महिन्यांत मान्याच्या लक्षांत आली. तेव्हां तो पांच सहा हजार फौज गोळा करून स्वतंत्रपणें बंडावा करूं लागला.

पंत सातारा प्रांतीं आल्यावर त्याचें आईशीं पुन्हां भांडण सुरू झालें. याचें कारण ‘ विनाशकाले विपरीतबुद्धिः ’ हेंच होय. पंत कैदेतून

मोकळे होतांच म्हसवडचा सुभानजी माने, मल्हारजी बोडके सरनोबत, आरब व पठाण जमातदार हे सर्व पंतांभोंवतीं गोळा झाले. पंतांनीं लवकरच तीन चार हजार फौज गोळा केली आणि फत्तेसिंगाप्रमाणें पंतही भोंवतालच्या प्रांतांत लुटालूट करूं लागले. त्यांना सुंदर स्त्रियांचा षोक होता हें पूर्वी सांगितलेंच आहे. होळकराच्या दंग्यामुळें पुण्याची जिवी कानी नायकीण वाईस येऊन राहिली आहे आणि तिच्याजवळ एक सुंदर मुलगी आहे अशी पंतांना बातमी लागली. तेव्हां त्यांनीं सन १८०३ सालच्या आगष्ट महिन्यांत एकाएकीं वाई क्षेत्रावर स्वारी केली आणि क्षेत्रस्थ ब्राह्मणांना मार देऊन हजारों रुपये उकळले. नंतर जिवी कानीला दहा हजार रुपये देऊन पंतांनीं तिच्याकडून ती पोरगी विकत घेतली. पंतांचा सर्वच कारभार असा उलटा होता! आतांपर्यंत भाग ११ ते १४ या चार ग्रंथांतून पंतांसंबंधीं जागोजाग तुटक तुटक माहिती आलेली आहे ती येथें एकत्र करून सांगण्यांत आली आहे. या भागांत पुढें पत्रें छापलीं आहेत त्यांतून पंतांच्या चरित्रासंबंधीं पुढील मजकूर आहे तो आम्ही आतां क्रमशः नमूद करतों.

पंतांकडे खासगीचें उत्पन्न चालत होतें तें त्यांच्या खासगी खर्चा-पुरतेंच होतें. पंतांनीं तीन चार हजार फौज नवीन गोळा केली ; तिच्या खर्चाकरितां भोंवतालच्या प्रांतांत लुटालूट करून त्यांना द्रव्य उभें करावें लागत असे. इतकेंही करून शिपायांचा पगार वेळेवर भागत नसे आणि आरब लोक वारंवार दंगे करीत. अशाच एका प्रसंगाची हकीगत—

" श्रीमंत रा. पंत प्रतिनिधि यांचें व आरबाचें वांकडें पडोन गरगशा आज आठ रोज तंटा पडोन श्रीमंतांची गैरमर्जी आरबावर होऊन चार जमादार मसुरेच्या ठाण्यांत कैदेंत ठेविले आहेत. त्यामुळें आरब चार-पांचशे चहूंकडून जमा होऊन मसुरेंत मुक्काम करोन वाड्यांत श्रीमंताकडे जमादार सोडून द्यावे म्हणोन सांगोन पाठविलें. तेव्हां जमादार सोडा-वयाचे नाहींत म्हणून उत्तर आलें. वाड्यावर चालोन जाऊन जमादार सोडवावे असा विचार आरबानीं आरंभिला. तेव्हां मसलत जड पडली. राजश्री बळवंतराव फडणीस व मोरोपंतभाऊ कोरेगांवचे मुक्कामीं होते,

त्यांस आरबांचें पारिपत्य करावें अशीं श्रीमंतांचीं पत्रें गेलीं. त्यावरोन कारभारी फौजसुद्धां छ. २१ र०वलीं मसुरेंत दाखल जाले.
५ जुलै १८०४ कारभारी यांणीं मध्यस्थी केली. परंतु तहांत आलें नाहीं. गांवांत आरब शिरले. कारभारी गांवालगत आहेत. श्रीमंत वाड्यांत आहेत. छ. २४ पासोन आरबांची लढाई होत आहे. वाड्यावर आरबानीं चालोन घेतलें. दरवाज्यापुढें लढाई जाली. त्यांत दोन तीन असामी मानकरी व पांच सात शिलेदार ठार झालें. आरबाकडील पंचवीस तीस असामी ठार जखमी आहेत. आरब माघारे फिरले. दोन रोज दोहींकडून गोळागोळी चालली आहे."

कारभाऱ्यांचें तोंडसुद्धां पहावयाचें नाहीं अशी पंतांना ईर्षा वाटत होती. परंतु या प्रसंगीं कारभारी फडणीस व पेंढारकर यांचीं पंतांनीं आर्जवें केलीं. त्यामुळेंच त्यांची या प्रसंगांतून सुटका झाली. पंतांच्या फौजेंत असे दंगे वारंवार होत असत. शेवटीं कारभारी यांनीं मध्यस्थी करून आणि कांहीं द्रव्य देऊन आरबांची कशीबशी समजूत काढली.

यानंतर पंतांचे कारभारी फडणीस यांनीं मान्याच्या बंडाचा बंदोबस्त करण्याचें काम हातीं घेतलें. या कामीं त्यांनीं सांगलीकरांची फौज मदतीला घेतली. फडणिसांनीं सांगलीकरांच्या फौजेचा पोटखर्च द्यावा. सांगलीकरांच्या फौजेंत घोडीं माणसें ठार व जखमी होतील त्यांचा खर्च फडणिसानीं द्यावा. किरकोळ लूट, घोडीं व जनावरें वगैरे ज्याला सांपडेल त्यानें घ्यावें. हत्ती, नगारा, तोफा, नौबत, जामदारखाना, मातबर गृहस्थ हे सांगलीकरांच्या हातीं येतील तर ते त्यांनीं फडणिसाकडे द्यावे. असा फडणीस आणि सांगलीकर यांमध्यें करार ठरला. या कराराप्रमाणें सांगलीकरांची दोन तीन हजार फौज फडणिसांच्या मदतीला आली. सांगलीकरांच्या फौजेंत अंताजी हरि कानिटकर आणि जिऊबा अण्णा जोशी हे दोघे सरदार होते. खुद्द पंतांनीं मात्र कारभाऱ्यांना या उद्योगांत कांहीं सुद्धां मदत केली नाहीं. आमची फौज खासगीची आहे ती आम्ही तुमच्या दौलतीच्या कामासाठीं देत नाहीं असें पंतांनीं कारभाऱ्यांना उत्तर दिलें. तेव्हां फडणीस आणि कानिटकर हे स्वतंत्रपणें फत्तेसिंग

मान्यावर चालून गेले. मान्याचा या वेळीं मुक्काम पंढरपूर प्रांतीं होता. कासेगांव मुक्कामीं ता. १७ जुलै १८०४ रोजीं मोठी लढाई झाली. तिची हकीगत कानिटकरांनीं लिहिली आहे ती अशी—

" काल दोन प्रहरानंतर फत्तेसिंग माने यांची व आमचे फौजेची लढाई कासेगांवच्या उत्तरेस जाली. फत्तेसिंगाची फौज चार हजार होती. त्याचा मोड जाला. नारायणराव माने ठार जाले. ××× गोटांत कांहीं फौज राहिली होती ती व मोडापैकीं पांच सातशे पळोन काळपिराचे सुमारें गेले. गोट दरोबस्त लुटला. तोफा पांच पाडाव आल्या. त्या पंताकडेच दिल्या. लढाई आमच्या फौजेशींच जाहली. पंतांकडील रा. भगवतराव बापू लिगाडे आमचे उजवे बाजूस होते त्यानीं मात्र कुमक केली. पंताकडील कारभारी उजवे बाजूस होते. मान्याचा मोड जाल्यावर त्यांचे फौजेनें उठावणी केली. फत्तेसिंग एक गोळी लागोन व एक भाल्याची जखम लागोन ठार झाला. आम्हाकडे पाडाव हत्ती एक, उंटावरील नौबती दोन, घोड्यावरील नगारा एक, निशाणें दोन, ढाल एक सवाईची याप्रमाणें आलें आहे. "

" झांगले मंडळीपैकीं दोन व घाटगे सरंजामीकडील बारगीर येणेंप्रमाणें आम्हाकडील तीन ठार जाले. दोघांचा ठिकाण नाहीं. बाळाजीपंत टकले यांच्या छातीस गोळी लागोन पाठींतून पार जाली. जखम भारी आहे. रा. महादाजी चिंतामण जोशी यांचे उजवे हातास तरवारेची जखम आहे. घोडीं पांच सातशे, उंट, दहा बैल व गुरें वगैरे लूट बहुत आली."

या कासेगांवच्या लढाईनंतर पाटलोजी माने, सुभानजी माने वगैरे माने मंडळींची जागजागीं कत्तल झाली. या लढाईनें मान्याच्या बंडाचा कायमचा बींमोड झाला.

पंतांनीं फौज गोळा करून सातारा प्रांतीं दंगा चालविला होता. त्याला जवळ जवळ बडाचें स्वरूप प्राप्त जालें होतें. त्यांच्याभोंवतीं म्हसवडचा सुभानराव माने, मल्हारराव बोडके सरनोबत, हाजी महमद आरब, आल्लदातखान पठाण, हरी फरास, हुसेनखान, बाळोजी बोडके, बालेखान, मालेखान, जानोजी हुजरे वगैरे सरदार जमले होते. ते सर्व

बेधडक वृत्तीचे आणि उडाणटप्पू लुटारू पोटभरू शिलेदार होते. पंतांचे हे सरदार बेअब्रूचे आणि कोणत्याही कर्मास तयार होणारे होते. त्यामुळें पंतांच्या फौजेची कोणत्या गांवावर केव्हां धाड येईल याचा कोणासही भरंवसा वाटत नव्हता. या बाबतींत एका प्रसंगाची माहिती पुढें देतों.—

"प्रतिनिधीनी प्रांतांत बहुत उपद्रव करोन दंगा मांडला आहे. वैजनाथभट ( मामा भागवत ) सातारियाहून पन्नास साठ पायाचे लोक व

२ डिसेंबर १८०४

दहा पांच स्वार व दोन तीन कारकून याप्रमाणें परळीच्या किल्ल्यास जात होते. त्यास प्रतिनिधीकडील स्वार निजाम पाडळींत होते त्यांणीं दौड करोन वैजनाथभटावर येऊन पंधरा वीस मनुष्यें ठार व तीस चाळीस जखमी करून एक कारकून ठार करून दोन कारकून धरून नेले. वैजनाथभट पोषाख टाकून सडे एकटे घोड्यावरोन पळोन सातारियास आले."

पेशवे व त्यांचे दरबारी यांवर पंतांचा अत्यंत पराकाष्ठेचा राग होता. भागवत मामा हा पेशव्यांचा अत्यंत आवडता माणूस होता. तो सातान्यास पळाला म्हणूनच बचावला. नाहीं तर या वेळीं पंतांच्या तडाख्यांत सांपडून त्याची चांदी आटली असती. असो. पेशव्यांना या प्रसंगाची बातमी समजतांच त्यांनीं तावडतोब बापू गोखल्याची पंतांवर रवानगी केली.

फत्तेसिंग मान्याच्या बंडाचा बीमोड करण्यांत पंतांनीं बिलकूल भाग घेतला नाहीं. माने ठार झाल्यावर माने मंडळीचा सूड घेण्यांत मात्र पंतांनीं पुढाकार घेतला. नारायणराव माने, पाटलोजी माने, यशवंतराव माने, संभाजी माने वगैरे मान्यांचीं घरें पंतांनीं लुटून जाळून टाकलीं. माने मंडळींचीं बायकामुलें पंतांनीं कैदेंत टाकलीं. फत्तेसिंगाचें रहिमतपुरास वाड्याचें काम चाललें होतें, तें पंतांनीं बंद पाडलें. रहिमतपुरांतील वाणी उदमी रयत पंतांनीं लष्करांत धरून नेलें आणि त्यांना मार देऊन मिळेल तितकें द्रव्य उकळलें ! पंतांच्या भयानें रहिमतपूर आणि भोंवतालचा प्रांत ओस पडला. रहिमतपूर हा पटवर्धनांचा गांव होता. पटवर्धनांचा तेथील कमाविसदार बाळाजी महादेव दामले

हा गांवाची आशा सोडून बळवंतराव फडणिसाच्या लष्करांत येऊन राहिला.

मान्याच्या बंडाचा बीमोड केल्यावर सांगलीकर आणि फडणीस यांनीं खुद्द पंतांचा बंदोबस्त करण्याचें काम हातीं घेतलें. पंतांच्या फौजेच्या लहान लहान टोळ्या प्रांतभर पसरल्या होत्या त्यांचा प्रथम नाश करण्यांत आला. या उद्योगांत सांगलीकरांचा सेनापति अंताजी हरि कानिटकर यानें दोन मोठे पराक्रम केले. त्यांची माहिती—

" रा. अंताजी हरी कानिटकर फौजसुद्धां देवर अष्ट्याचे मुक्कामीं होते. तेथून कूच करोन छ. ८ रजेबीं सुभानराव माने याचे रोखें गेले. त्यास

२४ आक्टोबर १८०४

त्यांची यांची आश्विन वद्य ६ बुधवारीं म्हसवडच्या पलीकडे दोन तीन कोसावर धुळदेव म्हणोन देव आहे तेथें गांठ पडोन लढाई होऊन मान्या लुटला गेला. तीन चारशें घोडीं लहानमोठीं लूट फौजेंत आली. खुद्द मान्या पन्नास स्वारानिशीं पळोन गेला. त्याजकडील नगारा निशाण व गाड्याकडील निशाणें दोन येणेंप्रमाणें पाडाव आलें. मान्याकडील आरब शंभर दीडशे होते ते देवालयांत शिरून गोळ्या मारूं लागले. त्यामुळें घोडीं माणसें जायां जखमी फार जालीं. "

सुभानराव माने या लढाईतून बचावून सातारा प्रांतीं गेला. तेथें कडलास येथें त्याचा मुक्काम असतां त्याजवर यशवंतराव शिंदे नाझरेकर यांनीं पुन्हां छापा घातला आणि त्याला ठार मारलें.

यानंतर सांगलीकरांच्या फौजेनें कऱ्हाड तालुक्यांत रेटरें येथें मल्हारजी

५ डिसेंबर १८०४

बोडक्यावर छापा घातला. बोडक्या जखमी होऊन लढाईत ठार पडला. त्याची सर्व फौज उधळली. शेकडों लोकांची कत्तल झाली. बोडक्याचा सर्व गोट दरोबस्त कानिटकरांच्या हातीं आला. कानिटकरांच्या फौजेपैकींही शेपन्नास घोडीं माणसें जायां जखमी झालीं. या लढाईतून मल्हारजीचा भाऊ बाळोजी बोडके हा कसाबसा जीव घेऊन पळून गेला.

यानंतर सांगलीकर आणि फडणीस यांच्या फौजा खुद्द पंतांवर चालून गेल्या. पंतांजवळ हजार पायदळ आणि दीड हजार फौज होती. पंतांपेक्षां फडणीस आणि कानिटकर यांची फौज पुष्कळच मोठी होती. सांगलीकरांच्या फौजेंत एकोणीसशे राऊत आणि चारशे पायदळ असा सरंजाम होता. फडणिसाजवळही दीड दोन हजार पायदळ होतें. शिवाय दोघां मिळून पांच तोफा होत्या. पंतांचा मुक्काम किन्हईस होता. फडणिसांचा मुक्काम ता. १५ डिसेंबर रोजीं आपशिंगें एकसळ येथें आला. तेथून दुसरे दिवशीं सकाळीं फौजा तयार होऊन किन्हईस पंतांवर चालून गेल्या. तिकडून पंतही फौजेची तयारी करून आणि गांवाशेजारीं ओढा होता तो ओलांडून शत्रूच्या तोंडावर उभे राहिले. फडणीस आणि

१६ डिसेंबर १८०४

कानिटकर यांनीं प्रारंभीं हल्ला करून लढाईस तोंड लावलें आणि पंतांच्या फौजेला खरडून मागें सारलें. पंतांची फौज मागें सरकत सरकत ओढ्यापलीकडे गांवाच्या आसऱ्यास गेली. पंतांनीं या प्रसंगीं शत्रूला खड्ड्यांत पाडण्याकरितां एक युक्ति योजिली. पंतांची फौज पीच्छेहाट करीत असतां त्या फौजेपैकीं हजार पांचशें आरब गुप्तपणें ओढ्यांत दबा धरून बसले. पंतांनीं पिच्छेहाट केलेली पाहून फडणीस आणि कानिटकर यांना मोठा हुरूप चढला. याच प्रसंगीं आपणही ओढ्यापलीकडे जाऊन गांवावर हल्ला करावा आणि पंतांच्या फौजेचा नाश करावा असें त्या दोघांनीं ठरविलें आणि तो बेत अंमलांत आणला. ओढ्यांत आरब दबा धरून बसले आहेत ही बातमी त्यांना समजली नाहीं, त्यामुळें परिणामीं मोठा घात झाला. त्यांच्या फौजा ओढयांत शिरतात तोंच आरबांनीं गोळयांचा भडिमार केला. त्यामुळें आघाडीचें पायदळ ठार झालें आणि त्यामुळें गोंधळ उडाला. याच वेळीं पंतांच्या फौजेनेंही उलटून शत्रूवर हल्ला केला, तेव्हां कानिटकर व फडणीस यांच्या फौजांची दाणादाण झाली. सर्व फौज उधळली. पुष्कळांची कत्तल झाली. त्यांच्या सर्व तोफा, निशाणाचा हत्ती, डेरे राहुटयां आणि सर्व सामानसुमान पंतांच्या हातीं लागलें. मोरो अनंत पेंढारकर हे सात जखमा लागोन पंतांकडे पाडाव सांपडले. सात जखमांपैकीं दोन भाल्याच्या भारी होत्या. जखमांनीं मोरोपंत अत्यवस्थ

होते. पंतांनीं त्यांच्या जखमा बांधूं दिल्या नाहींत. दुसरा एक नामांकित शिलेदार नाथाजी शेडगे हाही जखमी होऊन असाच पाडाव गेला. त्याचीही वास्तपुस्त पंतांनीं कांहींच केली नाहीं. त्या दोघांना तशा स्थितींत वर्धनगडास पाठविण्यांत आलें. निंबाजी भोसले रांजणीकर हा ठार झाला. आप्पासाहेब सांगलीकर लिहितात—"निंबाजी भोसले चांगले मनुष्य. भोसल्यासारख्या माणसाची किंमत काय लिहावी! ईश्वर इच्छेस उपाय नाहीं. महादजी चिंतामण जोशी हेही गोळी लागोन ठार झाले." फडणीस, कानिटकर आणि जिऊबाअण्णा हे कसेबसे फौज आणि सामान बचावीत पुसेसावळींत परत आले. या विजयानें पंताचा लौकिक आणि दरारा फारच वाढला. काशीबाई मातुश्री यांनाही कऱ्हाडास राहण्याचा धीर होईना. त्या फडणिसांच्या लष्करात येऊन राहिल्या. पुढें थोडीशी स्वस्थता झाल्यावर बाई कऱ्हाडास परत गेल्या.

पंतांचा हा विजय फार वेळ टिकला नाहीं. पेशव्यांच्या हुकुमावरून त्यांच्या पारिपत्याकरितां बापू गोखले हे पुण्याहून यापूर्वीच निघाले होते. किन्हईच्या पराजयानंतर फडणिसांनीं गणेशपंत कात्रे यांची तांतडीनें गोखल्यांकडे रवानगी केली. कात्र्यानें गोखल्यांना फौजेच्या खर्चाकरितां बरेंच द्रव्य देऊं केलें. तेव्हां गोखले सर्व उद्योग बाजूला ठेवून कऱ्हाडाकडे निघाले. ता. १८ डिसें. १८०४ रोजीं गोखल्यांचा मुक्काम नीरेवर आला. ता. २५ डिसेंबर रोजीं गोखले कोरेगांवावर आले. किन्हईस पंतांचा मानाजी रोमण नांवाचा सरदार होता. गोखल्यांनीं पहिल्याच सपाट्यांत रोमणाची फौज उधळून लावली आणि त्याचे दोनशे घोडे हिसकून घेतले. पंत किन्हईहून निघून वर्धनगडच्या घाटानें औंधाजवळ उत्तरेस दोन कोसांवर करोली येथें आले. पंतांजवळ हजार स्वार आणि दोन हजार पायदळ असा सरंजाम होता. पायदळांत सहा सातशे आरब होते, बाकीचा भरणा रोहिले पठाण आणि शीख यांचा होता. गोखलेही न्हावीच्या घाटानें औंधाजवळ कळंबी येथें आले. तेथें गोखले, फडणीस आणि कानिटकर अशा तिनी फौजा एकत्र झाल्या. त्यापुढील हकीगत—

"श्री. रा. पंत प्रतिनिधि यांचा मुक्काम मौजे कुरोली येथें होता.

तेथोन मंदवारीं दोन प्रहर रात्रीस कूच करून रहिमतपूरच्या पूर्वेस मौजे आसेरीच्या घाटानें बुणगेंसुद्धां स्वारी घाटाखालीं उतरली. हें वर्तमान रा. बळवंतराव फडणीस यास मौजे येळीवचे मुक्कामीं समजतांच गोखले व इकडील फौजसुद्धां सड्या फौजा निघोन मौजे न्हावीच्या घाटानें खालीं उतरोन मौजे सापानजीक श्रीमंतासी फौजसुद्धां गांठ घातली. तेव्हां श्रीमंतानीं पायदळसुद्धां गोल बांधोन रहिमतपुरास सांभाळोन आले. तों इकडील फौजेनें नेट केला. तेव्हां श्रीमंताकडील पायदळ आरब वगैरे दोन हजार जमाव एकीकडे जाला. दोन हजार स्वारसुद्धां श्रीमंत रहिमतपूरच्या आंबराईजवळोन गोळया मारीत निघाले. तेव्हां त्यांची यांची झटपट होत होत रहिमतपूरच्या पश्चिमेस श्री(कृष्णा)तिरीं मौजे बोरगांव येथें स्वारी पोंचली. तों इकडील फौजेनें नेट भारी केला. नदी उतरावयास फुरसद न होय. तेव्हां बोरगांवांत शिरून गांव रोखोन गोळया मारों लागले. फौजेनें गांव वेढिला. चार सहा घटका आंतून बाहेरून गोळागोळी चालली. रविवार प्रहररात्रपावेतों इकडील वेढा होता. गांव ओस होता. याजमुळें श्रीमंतानीं सल्ल्याचें बोलणें लावून दीड प्रहर रात्रीचे सुमारास फडणीस यांजकडे तीनशें लोकानिशीं श्रीमंत आले. आरब पलीकडे गेले त्यांचा पाठलाग कोणी केला नाहीं. श्रीमंताची सर्व दौलत लुटली. गोखल्याकडे लूट फार गेली. श्रीमंतांचा रोज खर्च फडणीस चालवितात. पंताच्या दोघी स्त्रिया किन्हईस आहेत. पंताजवळ तेलीणसुद्धां चौघीजणी आहेत. "

९ जाने. १८०५

बळवंतराव फडणीस, मोरोपंत पेंढारकर आणि गणेशपंत काले या तिघां कारभाऱ्यांशीं पंतांचें अगदीं हाडवैर होतें. नुकत्याच झालेल्या लढाईत पेंढारकर सात जखमांनीं जर्जर होऊन पंतांच्या हातीं सांपडला असतांना त्यावर त्यांनीं कसा सूड घेतला हें पूर्वी सांगितलेंच आहे. अशा स्थितींत पंत त्या कारभाऱ्यांच्या पाठीशीं पडून आपला बचाव करून घेतील ही गोष्ट कोणाच्या स्वप्नांतसुद्धां येण्यासारखी नव्हती. पंतांनीं आपल्या अकलेचा हा खरोखर अजब चमत्कार करून दाखविला. मुलावर लढाईत बरावाईट प्रसंग येईल या भयानें काशीबाई मुद्दाम लष्करांत येऊन राहिल्या होत्या. मुलगा आपण होऊन आपल्याकडे आला यामुळें

त्यांना अत्यानंद झाला. लढाईनंतर एक मोठीच भानगड उद्भवली. पंत हे सरकारचे गुन्हेगार आहेत, त्यांना घेऊनं आपण पेशव्यांकडे जाणार, कोणी अडथळा करील तर आपण त्यांना जबरदस्तीनें नेणार, असा गोखल्यांनीं हट्ट धरिला. काशीबाईनीं मुलगा तुमच्या ताब्यांत कधींही देणार नाहीं असें गोखल्यांना उत्तर दिलें. फडणीसही गोखल्यांस म्हणूं लागले कीं, पंत हे आमचे मालक आहेत, आम्ही त्याचे नोकर आहों. आमचें घरगुती भांडण आतांपर्यंत होतें तें आतां मिटलें आहे. चार लुच्चे लोकांच्या नादीं लागून पंतांनीं खेळ केले, त्यामुळें हा प्रसंग ओढवला. तुम्हांस ज्या कामासाठीं आणलें तें काम संपलें आहे. आम्ही तुम्हांस द्रव्य देण्याचें कबूल केलें आहे तें घ्या आणि परत पुण्यास जा. तुम्हीं कांहीं केलें तरी आम्ही मालकांना तुमच्या स्वाधीन करणार नाहीं. सांगली-करांच्या लष्करांत अंताजीपंत कानिटकर होते तेही गोखल्यांना उपदेश करूं लागले कीं, तुम्ही हें प्रकरण फारसें वाढवूं नका. तुम्हीं प्रतिनिधि घराण्याची अब्रू घ्यावी म्हणतां हें चांगलें नव्हे. करारप्रमाणें द्रव्य घेऊन तुम्हीं पुण्यास परत जावें हें चांगलें. याप्रमाणें सर्व बाजूंनीं पाठिंबा मिळाल्यावर पंतही म्हणूं लागले कीं, आम्ही सर्व एक झाल्यावर गोखल्यांना सहज उडवून देतां येईल. सारांश, काशीबाईचें पुत्रवात्सल्य, फडणिसांची स्वामिभक्ति आणि कानिटकरांचा शिष्टपणा यांच्या जाळ्यांत अडकलेल्या पंतांना बाहेर ओढून काढण्याचा मार्ग गोखल्यांना दिसेना. अतिप्रसंग करावा तर विनाकारण रक्तपात होईल या भयानें फडणिसां-कडून करारप्रमाणें द्रव्य घेऊन गोखले पुण्यास परत गेले.

सांगलीकरांची फौज फडणिसांनीं वेळोवेळ मदतीला आणली होती तिचा खर्च त्यांनीं अजून भागविला नव्हता. या देण्याच्या हिशोबाची भानगड बरेच दिवस चालली होती. शेवटीं चिंतामणराव अप्पा हे स्वतः कऱ्हाडास जाऊन काशीबाईना भेटले आणि फडणिसांकडून एक लक्ष पांच हजार रुपये घेऊन सांगलीकरांनीं ही हिशोबाची भानगड मिटवून टाकली. यानंतर फडणीस आणि सांगलीकर यांची संगत तुटली आणि सांगलीकरांची फौज पुढें कर्नाटक प्रांताकडे वळली.

दहा वर्षांनंतर काशीबाई, पंत आणि त्यांच्या स्त्रिया हें कुटुंब पुनः

एकत्र नांदूं लागलें. परंतु हा समेट फार दिवस टिकला नाहीं. पंतांभोंवतीं त्यांचे उडाणटप्पू शूर सोबती पुनः गोळा झाले आणि पंत भोंवतालच्या प्रांतांत पुनः लुटालूट करूं लागले. काशीबाई व कारभारी यांना पंतांचा दंगा आवरेना. फडणिसांनीं एकदां दहा पंधरा रामोशांना तोफेच्या तोंडीं दिलें. पंत व कारभारी यांचे तंटे होऊं लागले. या बाबतींत घडलेल्या एका प्रसंगाची हकीगत अशी—

"श्रीमंत रा. पंत प्रतिनिधि याणीं राजश्री बळवंतराव फडणिस यांस कऱ्हाडहून मसुरेस बोलावून नेलें. फडणीस पंताकडे जाऊन कचेरीस

२१ मे १८०५ बसले होते. पंत बोलतां बोलतां ताईभरानें बळवंतराव यांजवर कमरेचे पेषकबज उपसोन मारतों म्हणून उठले. तेव्हां जवळ भवानजी घाटगे होते त्यानीं पंताचें मनगट धरून मागें काढलें आणि बळवंतराव यांस बाहेर लावून दिलें."

या घरगुती भांडणाचें पर्यवसान पुढें भलतेंच झालें. पंतांनीं कारभारी व त्यांचीं बायकामुलें आणि खुद्द मातोश्री काशीबाई या सर्वांना कैदेंत टाकलें आणि ते मन मानेल तसा कारभार करूं लागले. पंतांच्या घरचीं हीं भांडणें पाहिलीं म्हणजे मनाला अतिशय आश्चर्य वाटतें. पंत हे कांहीं काशीबाईचे सावत्र चिरंजीव नव्हते किंवा काशीबाई या पंतांच्या सापत्न मातोश्री नव्हत्या. अशा स्थितींत भांडणाची ही विचित्र तऱ्हा पाहिली म्हणजे 'विनाशकाले विपरीतबुद्धिः' या कविवचनाची येथें पुनरुक्ति केल्याशिवाय आमच्यानें राहावत नाहीं.

पंतांच्या दौलतीचा विनाशकाल खरोखरच जवळ येऊन ठेपला होता. पंतांचा हा दंगा पेशव्यांनीं फार दिवस चालूं दिला नाहीं. त्यांनीं पुनः पंतांवर बापू गोखल्यांची रवानगी करून दिली. गोखले हे मोठे फौजबंद सरदार होते. इ. स. १८०६ च्या जानेवारी महिन्यांत गोखले हे पुण्याहून निघोन कऱ्हाड प्रांताकडे वळले. पायदळ, घोडदळ आणि तोफा अशी सुमारें चार पांच हजार फौज गोखल्यांनीं बरोबर घेतली होती. फेब्रुवारी महिन्यांत गोखले पाडळीवर आले. कऱ्हाड प्रांतीं आल्यावर त्यांनीं युद्धाची घाई केली नाहीं. पंतांच्या दौलतीचा शक्य तेवढा बचाव

करावा, पंतांच्या घराण्याच्या अब्रूचा बचाव व्हावा, अशी गोखल्यांची मनापासून इच्छा होती. या पंत प्रकरणांत गोखल्यांचें वर्तन हें हाडाच्या खऱ्याखुऱ्या शिपायाप्रमाणें होतें. बापू गोखले हे मराठी परंपरेंतील शेवटचे सरदार होत आणि यशवंतराव होळकर हा मराठी परंपरेंतील शेवटचा सेनापति होय. चुलता धोंडोपंत गोखले आणि वडील बंधु आप्पाजी गणेश यांचा लौकिक बापूंना सतत डोळ्यांपुढें दिसत होता. पटवर्धनी दप्तरांपैकीं आम्ही पुढें बापूजी गणेश आणि चुलता विसाजी राम गोखले यांचीं पत्रें छापलीं आहेत त्यांवरून या गोखले घराण्याचा मनाचा थोरपणा जागजागीं व्यक्त होतो. असो. गोखल्यांनीं पंतांपुढें पेशव्यांतर्फे दोन तहाच्या अटी मांडल्या. त्या अशा–(१) मातुश्री काशीबाई आणि कारभारी ही सर्व मंडळी पंतांनीं कैदेंतून सोडावीं. (२) यापुढें पंतांना सरकारांतून कारभारी नेमून देण्यांत येईल. पंतांनीं या कारभाऱ्याच्या सल्ल्याप्रमाणें कारभार करावा. या तहाची वाटाघाट सुमारें दीड महिना चालली होती. परंतु पंतांनीं या अटी कबूल केल्या नाहींत. पंत हे स्वभावानें अत्यंत मानी आणि हेकट होते. काळवेळ त्यांना समजत नव्हती. बलाबलाचा विचार त्यांना सुचत नव्हता. पंतांनीं सुमारें दोन हजार पायदळ आणि दोन हजार घोडेस्वार असा फौजेचा सरंजाम गोळा केला होता. या फौजेच्या बळावर आपण युद्धांत यश मिळवूं अशीही त्यांना घमेंड वाटत होती. तहाच्या वाटाघाटींत गोखल्यांचा महिना दीड महिना फुकट गेला. पंत हे समेटाची कोणतीच भाषा ऐकत नाहींत असें पाहून त्यांना शत्रु समजून त्यांचें पारिपत्य करण्याशिवाय गत्यंतर नाहीं ही गोष्ट गोखल्यांना शेवटीं समजून चुकली आणि उभयपक्षीं युद्धाच्या हालचाली सुरू झाल्या. ता. ९ मार्च रोजीं उभयपक्षीं थोडीशी

सन १९०६

झटपट होऊन तींत पंतांचा मोड झाला. तेव्हां पंत थोडेसे मऊ पडले आणि त्यांनीं मातुश्री आणि कारभारी या सर्वांना कैदेंतून सोडलें. नंतर पंतांनीं तहाची पुनः भाषा सुरू केली. शेवटीं समेटाचे सर्व प्रयत्न फुकट गेले आणि ता. २५ मार्च या दिवशीं या पंत प्रकरणांतील शेवटची लढाई झाली. या लढाईची हकीगत बापू

गोखल्यांचे चुलत चुलते विसाजी राम गोखले यांनीं मिरजेस बाळासाहेबांस लिहून कळविली ती अशी—

" मुक्काम लष्कर नजीक कोणेगांव श्रीकृष्णा दक्षिणतीर छ. ४ मोहरमीं मौजें कवठें येथोन कूच करोन मुक्काम मजकुरीं आलों. बुणगें उतरलें.

ता. २५ मार्च १८०६

बापूंची स्वारी मागून आली. तों श्रीमंत रा. पंत कऱ्हाडचे मुक्कामीं दोन टोळ्या करोन खासा हजार स्वार व पांचशे पायदळ वसंतगड एक कोसाचे पिछाडीस राखोन उभे राहिले. दुसरी टोळी मसूर पिच्छाडीस घेऊन चारशे स्वार व चारशे पायदळ घेऊन आली. त्या दोन टोळ्यांस व आमचे गोटास दीड कोसाचा छटा होता. त्याणीं पाऊलानीं पाऊल चालून घेतलें तेव्हां मसूरच्या अंगे स्वार पायदळ नेमून खासे टोळीवर श्रीकृष्णा उतरोन पायदळ तोफा पुढें घालोन मागें फौजसुद्धां चालोन घेतलें. घटका दीड घटका गोळा-गोळी चालली. नंतर हे चालोन गेले. पंतांचा मोड जाला. पांचपंचवीस माणूस ठार पंताकडील जालें. रा. गोपाळराव कारभारी नि॥ पंत ठार जाला. वसंतगडाच्या माचीपर्यंत इकडील फौजेनें घोडीं घातलीं. खासा पंत पाडाव आले. बारा जखमा बितपशील खैरं आहेत. जखमा चार भारी आहेत. कराचलीच्याच जखमा आहेत. दोनशे घोडीं व एक हत्ती व डंके दोन पाडाव आले. लढाई न व्हावी, सरकार आज्ञेप्रमाणें समेट व्हावा यदर्थी दीड मास वाट याणीं पाहिली. परंतु अखेरीस अशी गोष्ट जाली. होणार भवितव्यास उपाय नाहीं."

"श्रीमंत रा. पंत यांस बारा जखमा लागल्या. बितपशील—

१ उजवा हात पंजापासोन लेखणी.

१ कपाळावरील भिवई डावी तुटोन बचाव.

२ दोन खांद्यावर दोन हलक्या.

१ टाळकीवर आडवी हलकी.

१ डाव्या मांडीवर हलकी.

२ नाकावरील व गालावरील डोळ्याचा व नाकाचा बचाव राहून लागल्या.

१ डाव्या दंडास जखम भारी.

१ छातीस उभी जखम पट्याची भारी.

२ उजव्या मांडीवर हलक्या.

बारा जखमा झाडून तरवारेच्या व पट्याच्या आहेत. लढाईचे दिवशीं अंगांत कांहीं ( चिलखत वगैरे ) सामान घातलें नव्हतें. पांढरा अंगरखाही नव्हता. जातीच्या कजाखीपणास ऐसा दुसरा पुरुष पाहण्यांत नाहीं. इतक्या जखमा लागल्या, परंतु बोलणें सावधपणाचें, वावगा शब्द कोठें जाऊं द्यावयाचा नाहीं. जखमा झाडून साऱ्या शेजेस आल्या. खैर आहेत. बरदास्तविषयीं चिरंजीवांचा बंदोबस्त चांगला आहे. "

लढाईच्या ऐन गर्दीत हातघाईची मारामार झाली तींत पंतांनीं प्रमुख भाग घेतला, त्यामुळें त्यांना सर्व जखमा तरवारेच्या लागल्या. या लढाईत पंतांचा उजवा हात मनगटापासून तुटला, त्यामुळें त्यांना यापुढें थोटे पंत असें नामाभिधान प्राप्त झालें. पंत कैद झाल्यावर पुढील मजकूर काय विचारावा ! गोखल्यांनीं कऱ्हाड मसूर, येथें तावडतोब ठाणीं घातलीं. वर्धनगड, महिमनगड, भूषणगड, वासोटा, मच्छिंद्रगड, कमलगड वगैरे पंतांचे पहाडी किल्ले महिनाभरांत गोखल्यांच्या हातीं आले. पंतांच्या सर्वच दौलतीची लूट गोखल्यांना आयतीच मिळाली. थोरल्या महाराजांच्या वेळेपासून धनकनकसंपन्न आणि शौर्य, धाडस, पराक्रम या गुणांनीं कीर्ति पावलेलें प्रतिनिधींचें कुटुंब एकदम अधःपाताच्या खोल गर्तेत सांपडलें ! काशीबाई, पंत, बळवंतराव फडणीस, मोरोपंत पेंढारकर वगैरे पंधरा वीस मंडळी कैद करून गोखल्यांनीं पेशव्यांकडे पुण्यास पाठविलीं.

एप्रिल १८०६　त्यांपैकीं पंत आणि काशीबाई यांना पुण्यांतच प्रतिनिधींच्या वाड्यांत कैदेंत ठेवण्यांत आलें. पेशव्यांना विनंती करून गोखल्यांनीं मोरोपंत पेंढारकर वगैरे पांच असामी आपल्या कैदेंत मागून घेतले. फडणीस, त्यांचे बंधु सदाशिवपंत, बापू रुद्र वगैरे इतर सर्व कैद्यांना अलंग, कुलंग, वसई या किल्ल्यांवर फुटाफूट करून पाठविण्यांत आलें.

ऐ. ले. १५...१

गोखले हे कांहीं मागच्या खेपेप्रमाणें फडणिसांच्या बोलावण्यावरून त्यांच्या कामासाठीं आले नव्हते. ते पेशव्यांच्या हुकुमावरून पंतांच्या बंदोबस्ताकरितां स्वतंत्रपणें आले होते. सरकारी हुकुमाप्रमाणें गोखल्यांनीं पंतांचें बंड पूर्णपणें मोडलें आणि त्यांचा मुलूख खालसा केला. असा बंदोबस्त करतांना पंतांच्या अब्रूचा आणि दौलतीचा शक्य तेवढा बचाव करावा अशी गोखल्यांनीं पुष्कळ खटपट केली. परंतु पेशव्यांच्या हट्टामुळें त्यांना या कामीं यश आलें नाहीं. पंतांची रवानगी पुण्यास केल्यावर पंतांची थोरली स्त्री लक्ष्मीबाई यांनीं बंडाचें निशाण उभारलें.

जून १८०६ त्यांनीं नवीन पांच चारशें फौज चाकरीस ठेविली आणि वसंतगड किल्ला ताब्यांत घेतला. नंतर वठार, आरवी, नागझरी यांभोंवतालच्या प्रांतांत बाई स्वाऱ्या करूं लागल्या. गोखल्यांनीं लक्ष्मीबाईच्या बंडाकडे विशेषसें लक्ष दिलें नाहीं. कर्नाटकांत त्यांच्या जहागिरींत दंगे चालू होते. सबब गोखल्यांनीं कऱ्हाड प्रांतांतून आपला तळ हालविला आणि ते कर्नाटक प्रांतीं सावनुरास गेले. त्या प्रांतीं गोखल्यांचा सुमारें वर्षभर मुक्काम होता.

५ ताई तेलिणीचें बंड—गोखले दूर गेलेले पाहून पंतांच्या तर्फे सातारा प्रांतीं दुसरें एक मोठें बंड उभें राहिलें. या बंडाचे उत्पादक ताई तेलीण नांवाची औरत होती. हिचा उल्लेख या प्रकरणांत जागोजाग आलेला आहे. या बाईला पुढारी बनवून वासोटा किल्ल्याच्या गडकऱ्यांनीं बंडाचें निशाण उभारलें. या बंडवाल्यांनीं जयगड, मोरगिरी, कमलगड, मकरंदगड, महिपतगड वगैरे किल्ले काबीज केले आणि मोटा जमाव करून भोंवतालच्या मुलखांत लुटालूट सुरू केली. या दंग्याचें वर्तमान ऐकून गोखले घाईघाईनें परत सातारा प्रांताकडे वळले. जून अखेरीस कुडचीच्या उतारावर कृष्णा उतरून गोखले उगार येथें आले. तेथून कूच करून जुलैच्या पंधराव्या तारखेस त्यांचा मुक्काम सातारा प्रांतीं मसूर येथें आला. वाटेनें त्यांनीं कमलगड काबीज केला. मसूर येथें आल्यावर गोखल्यांनीं मोरगिरी किल्ल्यावर फौज, पायदळ वगैरे सरंजाम पाठविला. या फौजेनें किल्ल्याबाहेर शत्रूचा जमाव होता तो उधळून लावला आणि किल्ल्याभोंवतीं मोर्चे उभे केले. दोन

तीन दिवसांतच किल्लेकरी शरण आले आणि किल्ला गोखल्यांच्या स्वाधीन झाला. गोखले नंतर मसूरहून किन्हई येथें गेले. त्यांची आघाडीची फौज पुढें बामणोली येथें होती. वासोटेकरांची एक टोळी किल्ल्याबाहेर होती. गोखल्यांच्या आघाडीच्या फौजेनें ती टोळी उधळून लाविली.

नोव्हेंबर १८०७ नंतर गोखल्यांचा मुक्काम किन्हईहून मेढें या ठिकाणीं आला. या ठिकाणाहून वासोटा सहा कोस होता. गोखल्यांची आघाडीची फौज वासोट्यापासून दोन कोसांवर मौजे तांबी येथें होती. किल्ल्याखालीं इंदोली गांवीं बंडवाल्यांचा मोठा जमाव होता. गोखल्यांनीं आपलें बुणगें मेढें येथें ठेविलें आणि ते स्वतः सडी फौज घेऊन आघाडीच्या फौजेंत तांबी येथें आले. येथें येतांच त्यांनीं इंदोलीच्या जमावावर हल्ला केला. दोन चार घटका पायदळाची हातघाई होऊन बंडवाल्यांची दाणादाण झाली आणि इंदोली गांव गोखल्यांनीं काबीज केला. गोखल्यांची ही धडाडी पाहून बंडवाल्यांचें अवसान गळालें आणि त्यांनीं तहाचें बोलणें लावलें. पंतांची सुटका व्हावी आणि त्यांचा मुलुख त्यांना परत देण्यांत यावा ही वासोटेकरांची तहाची मुख्य अट होती. गडकऱ्याच्या या मागणीबद्दल गोखल्यांना कांहींच करतां येण्यासारखें नव्हतें. या बाबतींत बरीच वाटाघाट होऊन उभयपक्षीं तूर्त तहाच्या अटी ठरल्या त्या अशा— ( १ ) युद्ध तूर्त उभयपक्षीं बंद ठेवावें. ( २ ) युद्धतहकुबीबद्दल गडकऱ्यांनीं मकरंदगड गोखल्यांच्या स्वाधीन करावा. ( ३ ) गडकऱ्यांनीं पुण्यास कारकून पाठवून पंतांचा सल्ला घ्यावा. पंत सांगतील त्याप्रमाणें गडकऱ्यांनीं वागावें. या कराराप्रमाणें गडकऱ्यांनीं मकरंदगड गोखल्यांच्या स्वाधीन केला आणि पुण्यास कारकून पाठविला. पंतांनीं सर्व परिस्थितीचा विचार करून गडकऱ्यांना सल्ला दिला कीं, तुम्ही माझ्या सुटकेच्या भानगडींत तूर्त पडूं नका. किल्ला व ठाणीं तुमच्या ताब्यांत असतील तीं गोखल्यांच्या स्वाधीन बिनशर्त करा. वासोटेकरांना पंतांचा हा सल्ला मानवला नाहीं. पंतांची

डिसेंबर १८०७ मुक्तता होईपर्यंत आम्ही किल्ला लढविणार असा त्यांनीं हट्ट धरिला. उलटपक्षीं हें प्रकरण तडजोडीनें मिटवावें अशी गोखल्यांचीही इच्छा होती. पंतांना थोडासा मुलूख

देऊन त्यांची मुक्तता करावी अशी गोखल्यांनीं पेशव्यांना विनंती केली. परंतु तिचा कांहीं उपयोग झाला नाहीं. पेशव्यांनीं या वेळीं काशीबाईची मात्र मुक्तता केली. गोखल्यांनीं या बाईना कऱ्हाडासच बंदोबस्तानें ठेविल्या. असो. ही तहाची वाटाघाट सुमारें दोन तीन महिने चालू होती. परंतु पंतांची मुक्तता होईपर्यंत किल्ला लढविण्याचा हट्ट गडकऱ्यांनीं सोडला नाहीं. तेव्हां स. १८०८ च्या जानेवारी अखेर गोखले युद्धाच्या तयारीला लागले.

फेब्रु.–जून स. १८०८

वासोटा हा पहाडी किल्ला एका बिकट आणि उंच डोंगरावर बांधलेला होता. फेब्रुवारी महिन्यांत गोखल्यांनीं त्या किल्ल्याभोंवतीं मोर्चेबंदी केली. महिनाभरांत मोर्चे पुढें सरकत सरकत किल्ल्यापासून शंभर हातांवर जाऊन पोंचले. किल्ल्याशेजारीं जुना वासोटा म्हणून एक पहाड होता. त्यावर गोखल्यांनीं तोफा चढविल्या. तेथून तोफांचे गोळे किल्ल्यांत जात होते. गोखल्यांजवळ तोफा आणि दारूगोळा यांचा भरपूर पुरवठा नव्हता. त्यामुळें वेढ्याचें काम रेंगाळत चाललें होतें. पावसाळा नजीक आला तरी गोखल्यांनीं वेढा उठविला नाहीं. उलट वेढा कायम ठेवून किल्ल्याखालीं छावणी करण्याचा त्यांनीं बेत केला. त्या दृष्टीनें ते लष्करांत छप्परबंदी करूं लागले तेव्हां गडकऱ्यांनीं तहाचें बोलणें करून जून महिन्यांत किल्ला गोखल्यांच्या स्वाधीन केला. गडकरी आपलें सामान घेऊन खालीं उतरले. त्यांना गोखल्यांनीं कोणताही उपद्रव दिला नाहीं. सारांश, विशेषसा युद्धप्रसंग न करतांच गोखल्यांनीं हा वासोट्याचा किल्ला काबीज केला. कोंकणांत पंतांचा महिपतगड म्हणून एक डोंगरी किल्ला होता तोही गोखल्यांनीं स. १८०८ च्या आगष्ट महिन्यांत काबीज केला.

वासोटेकरांची ही दशा पाहून लक्ष्मीबाईचें बंड आपोआपच थंड पडलें. गोखल्यांचें भय वाटून पंतांच्या स्त्रियांनीं पटवर्धनांकडे आश्रय मागितला. पंतांवर गोखले आणि पेशवे यांचा रोष आहे, पंतांच्या स्त्रिया आपण आपल्या आश्रयाखालीं ठेवून घेतल्या तर आपणांवर

एखादें लचांड येईल, असें भय वाटून पटवर्धन सरदारांनीं या स्त्रियांना आश्रय दिला नाहीं. पंतांचें चुलत घराणें करवीर राज्यांत प्रतिनिधि-पदावर होतें. हें चुलत घराणें विशाळगड येथें रहात होतें. पंतांच्या स्त्रिया शेवटीं विशाळगड येथें जाऊन राहिल्या.

प्रतिनिधि घराण्याची हकीगत येथेंच समाप्त करणें सोईचें आहे. काशीबाई स. १८१० सालीं मृत्यु पावल्या. नंतर स. १८११ सालीं पेशव्यांनीं पंतांचीही मुक्तता केली. पंत यापुढें सरळपणानें वागतील याबद्दल गोखल्यांनीं पेशवे सरकारांत जामिनगत भरली तेव्हां पेशव्यांनीं पंतांची मोकळीक करून त्यांच्या खाजगी खर्चासाठीं थोडेंसें उत्पन्नही तोडून दिलें. प्रतिनिधि घराण्याच्या जहागिरीपैकीं जो थोडासा मुलूख त्या वेळीं पेशव्यांनीं पंतांच्या ताब्यांत दिला त्याचेंच हल्लीं औंध संस्थान बनलें आहे. पुढें स. १८१८ सालीं पेशवाई बुडाल्यावर सातारकर छत्रपतींचें राज्य इंग्रज सरकारनें कांहीं दिवस स्वतंत्र ठेविलें. त्या वेळीं प्रतिनिधींची जहागीर सातारा राज्याच्या ताब्याखालीं इंग्रज सरकारनें ठेविली. साताऱ्याचें राज्य बुडाल्यावर औंध संस्थान इंग्रज सरकारनें आपल्या अधि-राज्याखालीं घेतलें. पंत पुष्कळ वर्षें जगले. शेवटपर्यंत त्यांनीं आपले दुष्ट छंद सोडले नाहींत. शेवटपर्यंत त्यांचें आपल्या स्त्रियांशीं पटलें नाहीं तें नाहींच. पंत पाऊणशे वर्षांचे होऊन इ. स. १८४८ सालीं मृत्यु पावले.

### (६) पटवर्धन सरदारांची दैना. (७) कर्नाटकांत पाळे-गारांचे दंगे.

पंत प्रतिनिधींचें प्रकरण विषय सांगतां सांगतां बरेंच लांबलें. घर-कलहामुळें पंतांच्या दौलतीचा नाश कसा झाला हें आतांपर्यंत सांगण्यांत आलें आहे. ही राज्यनाशाची क्रिया मराठी राज्यांत सर्वच ठिकाणीं अनेक रूपांनीं चालू होती. राज्याचे खावंद जे पेशवे ते या परिस्थितीला आळा न घालतां उलट त्या राज्यनाशाच्या क्रियेंत भरच घालीत होते. पूर्वीच्या राजवटींतल्या सर्व गोष्टींचा पेशव्यांना नाश करावयाचा होता. विशेषतः नाना फडणीस आणि त्यांच्या पटडींतील पटवर्धन, रास्ते वगैरे सरदार यांवर तर त्यांना सूडच घ्यावयाचा होता. वसईच्या तहानें पेशवे

हे नामधारी मालक बनले. स्वतःचें वैभव नष्ट झालें तथापि त्यांची द्वेषबुद्धि मात्र कमी झाली नाहीं. सरदार रास्ते पुण्यास पेशव्यांच्या हातांत सांपडले. त्यांची त्यांनीं कशी दुर्दशा उडवून दिली आणि त्याचे परिणाम काय झाले हें आम्हीं भाग १३ पृ. ६९००–६९०४ यांवर सविस्तर वर्णन केलें आहे. पटवर्धन पेशव्यांच्या हातांत सांपडले नाहींत त्यामुळें त्यांना प्रत्यक्ष असा फारसा त्रास पेशव्यांना देतां आला नाहीं. तथापि त्यांचें कर्ज बुडवून पेशव्यांनीं पटवर्धन सरदारांची अगदीं दुर्दशा उडवून दिली. परशुरामभाऊंनीं पेशवे सरकारच्या हुकुमावरून अनेक मोहिमा केल्या आणि त्यापायीं त्यांना कोट्यवधि रुपयांचें कर्ज झालें होतें. पेशव्यांनीं आपले दहा लक्ष उत्पन्नांचे सावनूरचे महाल कर्जफेडीसाठीं भाऊंच्या ताब्यांत दिले होते. पुढें बाजीरावांनीं पटवर्धनांचें कर्ज बुडवून सावनूरचे महाल कसे काढून घेतले आणि त्या बाबतींत काय भानगडी झाल्या याचें सविस्तर वर्णन आम्हीं भाग १३ पृ. ६९०६–६९२४ यांवर केलेलें आहे. पटवर्धन व रास्ते यांचे सरंजाम जप्त करण्याकरितां पेशव्यांनीं कर्नाटकांत अनेक फौजा पाठविल्या. पुढें होळकरानें पुण्यावर स्वारी केली त्यामुळें पेशव्यांना आपले सूड्यनाशाचे उपद्व्याप कांहीं काळ बंद ठेवावे लागले आणि त्यामुळें पटवर्धन व रास्ते यांचा तात्पुरता बचाव झाला.

सावनूरचे महाल काढून घेतांना पटवर्धनांनीं आपल्या कर्जाबद्दल पेशव्यांकडे पुष्कळ तक्रार केली. तेव्हां पेशव्यांनीं त्यांना स्वच्छ उत्तर दिलें कीं, आम्ही पूर्वींच्या अमदानींतील कर्जाविषयीं कांहीं जाणीत नाहीं. आम्हीं कांहीं तुम्हांस कर्ज काढावयास सांगितलें नव्हतें. नाना फडणीस आणि सवाई माधवराव पेशवे यांनीं तुम्हांस कर्ज काढावयास सांगितलें होतें. ते आतां मृत्यु पावले आहेत. त्यांच्याकडे जाऊन तुम्ही आपलीं कर्जें वसूल करून घ्या! याप्रमाणें कर्जफेडीच्या बाबतींत पेशव्यांनीं आपल्या अक्कलेचें दिवाळें काढलें. परंतु पटवर्धन सरदार मात्र या बाबतींत आपल्या अब्रूचें दिवाळें काढावयास तयार झाले नाहींत. दुसऱ्याचें कर्ज बुडविलें तर आपले सत पितर नरकांत जातात अशी पूर्वीं सार्वत्रिक समजूत होती. शिवाय दिवाळखोरी हा एक पूर्वीं अत्यंत

बेअब्रूचा सामाजिक गुन्हा समजत असत. अशा परिस्थितीमुळें पटवर्धन अब्रूच्या भयानें सावकारांचें कर्ज नाकारीत नसत आणि त्यामुळें पडतील ते कष्ट आणि मानहानि सोसावयास तयार होत. पेशव्यांनीं तुमचें कर्ज बुडविलें तर तुम्हीही सावकारांचें कर्ज बुडवा असा रामचंद्रपंत आपांना अनेक हितचिंतकांनीं सल्ला दिला. परंतु राम आपांना हा सल्ला मानवला नाहीं. त्यामुळें त्यांच्यामागें वारंवार सावकाराचे तगादे लागत आणि वेळोवेळ अब्रू जाण्याचे प्रसंग त्यांवर ओढवत असत. असा एक प्रसंग पुढें छापलेल्या पत्रांतून नमूद केलेला आहे. तो असा—

पुण्याच्या वानवळे नांवाच्या सावकाराचें परशुरामभाऊंनीं पन्नास लक्ष रुपये कर्ज देणें होतें. इ. स. १८०४ च्या सप्टेंबर महिन्यांत त्या सावकाराचा भिकाजीपंत नांवाचा कारकून कर्जवसुलीसाठीं जमखंडीस रामचंद्रपंत आपांकडे आला. नंतर त्या पंतानें आठ पंधरा दिवस त्रागा करून आपांची त्रेधा उडवून दिली. तो आपांस म्हणूं लागला कीं, आमच्या कर्जाची फेड आतांच्या आतां करा, नाहीं तर मी उपास करून तुमच्या दारांत प्राण देतों किंवा उपास घालून तुमचा प्राण घेतों ! तुमच्याजवळ द्रव्य नसेल तर तुम्ही माझ्याबरोबर पुण्यास सावकाराकडे चला. कारकुनाची कशानेंही समजूत पटेना तेव्हां आपा निरुपायानें पुण्यास निघाले. तुम्ही पुण्यास जाऊं नका, तेथें गेलां तर सावकार तुमची अब्रू घेईल, असा पुष्कळ जणांनीं आपांस बुद्धिवाद सांगितला. परंतु आपांचें एकच म्हणणें पडलें. सावकाराला मी कधींही नाहीं म्हणणार नाहीं. माझ्याजवळ द्रव्य नाहीं, तेव्हां सावकाराच्या स्वाधीन होऊन तो करील ती शिक्षा मी भोगीन, परंतु सावकाराचें कर्ज नाकारणार नाहीं. आपा पुण्यास निघाले तेव्हां पटवर्धनांच्या पुण्याच्या वकिलानें त्यांस एका पत्रांत उपदेश केला आहे तो या प्रकरणीं फार मार्मिक आहे. त्याचा सारांश असा—

(१६ सप्टेंबर १८०४)—"रा. भिकाजीपंत निा राजश्री वानवळे याणीं येऊन बहुत निकड केली. ऐवज द्यावयास नाहीं. ब्राह्मण प्राण द्यावयास उदीत झाला. याजकरितां आपा पुण्यास वानवळे यांजकडे

दरमजल येणार. वडिलीं त्यांस पुण्यास येऊं देऊं नये. दौलतींत कर्ज कोण देणें नाहीं? सावकारांनीं पैकाही मागणें प्राप्त. तत्राप मर्जीनुरूपच असावें. प्राण द्यावा अथवा घ्यावा असें कोणत्या सावकारानें कोणत्या दौलतींत आजपावेतों केलें आहे? वानवळे याचेंच कर्ज शिंदे व भोसले यांजकडे येणें आहे. तेथें जाऊन भिकाजीपंत असा निग्रह करून प्राण द्यावयास उदित होते कीं काय? आपा सावकाराच्या कारकुनाबरोबर यावयास निघाले तेव्हां वडिलार्जित लौकिकाची गति काय? चहूं मुलखीं कीर्ति काय जाईल? भिकाजीपंत बरेपणें समजले तर उत्तम. नाहीं तर नृसिंहरूपच दर्शविलें पाहिजे! आपा येथें आले तर अब्रू जाऊन कुळास बट्टा लागेल. कोणेविशीं वसवसा न धरावा. जो ठोकील तोच निभावेल असेच दिवस आहेत!"

भाऊबंद मंडळींनीं आपांना पुण्यास जाऊं दिलें नाहीं. त्यामुळें हा प्रसंग निभावला आणि भिकाजीपंत शेवटीं कंटाळून पुण्यास परत गेला.

रामचंद्रपंत आपांचें दिवाळें वाजलें होतें, त्यामुळें त्यांच्या स्वतःच्या जहागिरींतही त्यांचा अंमल फारसा चालत नसे. पांडुरंग भास्कर नांवाच्या कारकुनाशीं आपांचा देण्याघेण्याच्या बाबतींत तंटा झाला. तेव्हां त्या कारकुनानें जमखिंडीचें ठाणें बळकावलें आणि आपांविरुद्ध बंड उभारलें. ठाणें घ्यावयास आपा गेले तेव्हां ठाण्यांतून गोळीबार झाला. त्यांत दहा वीस घोडीं माणसें जायां जखमी जालीं. आपा लिहितात—

**जुलै १८०४**

( ९ जुलै १८०४ ) "अकस्मात् एकदांच गोळी दगड धोंडे यांचा आंतून मारा बहुत केला. मागें सरकोन कसब्याच्या आसऱ्यास आलों. रा. विष्णू बाबाजी फडके यांस कपाळांत गोळी लागोन हा वेळपर्यंत खैर आहेत. परंतु कठीण आहे. रा. अंताजी केशव कानिटकर यास पायास गोळी लागोन पार झाली. वरकड दोन तीन जखमी आहेत. आपला काळ फिरला त्यामुळें हीं विघ्नें येतात." नंतर आपांनीं थोडीशी फौज गोळा करून ठाण्याला वेढा दिला. जमखिंडी ठाण्यांत तोफा दारूगोळा धान्य कापड वगैरे सामानाचा भरपूर साठा होता तो आयताच

पांडुरंग पंतांच्या हातीं सांपडला. त्यामुळें तो रामचंद्रपंत आपाशीं मग-रुरीच्या गोष्टी सांगूं लागला. आपाजवळ द्रव्य नव्हतें. फौज, तोफा, दारूगोळा हे सर्व खेळ द्रव्याचे होते. आपांजवळ थोडीशी फौज होती, तिच्या जोरावर त्यांनीं वेढ्याचें काम सुमारें दोन महिने नेटानें चालविलें. शेवटीं मुधोळचे नारायणराव घोरपडे यांच्या मध्यस्थीनें आपांनीं पांडु-रंग पंतांचें थोडेंबहुत देणें भागविलें, तेव्हां ता. २७ आगष्ट रोजीं जम-खंडीचें ठाणें पुन्हां आपांच्या ताब्यांत आलें.

सन १७६३–६४ सालीं पटवर्धनांना जहागीर मिळाली तेव्हां मिरज, तासगांव आणि कुरुंदवाड अशीं पटवर्धनांचीं तीन घराणीं होतीं. या तिन्ही घराण्यांना पेशव्यांनीं निरनिराळ्या स्वतंत्र जहागिरी दिलेल्या होत्या. सर्व पटवर्धनांच्या जहागिरींचा बेहडा मात्र एकट्या मिरज घराण्याच्या नांवानें होत असे. पटवर्धनांचीं तीन निरनिराळीं घराणीं होतीं. तथापि सर्व पटवर्धन सरदारांत विलक्षण एकोपा नांदत होता. परशुराम-भाऊंच्या हयातीपर्यंत पटवर्धनांची एकजूट टिकली. पुढें मात्र त्यांच्या-मध्यें आपापसांत भांडणें होऊं लागलीं. पहिलें भांडण मिरज घराण्यांत गंगाधरराव गोविंद आणि चिंतामणराव पांडुरंग या चुलत्या पुतण्यांत निर्माण झालें. पुढें रामचंद्रपंत आपा तासगांवकर आणि रघुनाथराव कुरुंदवाडकर यांनीं मध्यस्थी करून चुलत्या-पुतण्याच्या आपापसांत वांटण्या करून दिल्या. तेव्हांपासून मिरज घराण्याचे मिरज आणि सांगली असे दोन भाग स्वतंत्र झाले. इ. स. १८०९ सालीं मिरज-सांगली वांटणीला पेशव्यांनींही मान्यता दिली. मिरजेचें उदाहरण पाहून पुढें तासगांव घराण्यांत गणपतराव परशराम तासगांवकर आणि रामचंद्रपंत परशराम जमखंडीकर अशा वांटण्या झाल्या आणि कुरुंदवाड घराण्यांतही गण-पतराव कोन्हेर आणि त्रिंबकराव रघुनाथ अशा वांटण्या झाल्या. तास-गांव व कुरुंदवाड या घराण्यांत झालेल्या वांटण्यांनाही पेशव्यांनीं मान्यता दिली. सारांश, घरकलहामुळें पटवर्धनांची एकजूट कायमची नष्ट झाली आणि पटवर्धन सरदार कायमचे दुबळे होऊन बसले.

पटवर्धन सरदारांत रामचंद्रपंत आपा आणि चिंतामणराव आपा

सांगलीकर या दोघांचा लौकिक शिपाईगिरीबद्दल फार मोठा होता. राम. आपांचें दिवाळें वाजलें होतें हें वर सांगितलेंच आहे. सांगलीकर मात्र वेळोवेळ फौज बाळगीत आणि मोठमोठ्या कामगिऱ्या पार पाडीत. त्यांनीं पटवर्धन सरदारांचा लौकिक कायम टेविला होता. प्रतिनिधींचा बंदोबस्त झाल्यावर स. १८०४ च्या फेब्रुवारी–मार्च महिन्यांत सांगलीकरांची फौज कर्नाटकाकडे वळली हें पूर्वी सांगितलेंच आहे. त्या प्रांतीं लहान मोठ्या सर्वच देसायांनीं बंडें करून मुलूख उद्ध्वस्त केला होता. जांबोटकर, पाच्छापूरकर, काकतीकर, अनगोळकर या देसायांचे दंगे पेठ तालुक्यांत चालू होते. कित्तूरकर, तळूरकर आणि डंबळचा भीमराव मुंढरगी आणि तोतया वाघ यांचे दंगे नवलगुंद व जालेहाळ तालुक्यांत चालू होते. रास्त्यांच्या फौजेनें भीमराव मुंढरगीच्या फौजेवर छापा घातला. छाप्याच्या गर्दीत मुंढरगीचे पांच चारशें लोक ठार झाले. तो मात्र जीव बचावून पळाला. हुद्दा-

स. १८०५ मे–जून

पूरच्या मामलेदारानें जांबोटकर देसायावर असाच छापा घातला आणि त्याच्या फौजेची दाणादाण उडवून दिली. स्वतः चिंतामणराव सांगलीकर हे एप्रिल महिन्यांत कर्नाटकांत गेले आणि त्यांनीं कित्तूरकर देसायावर स्वारी केली. त्या देसायाचें नेगिनहाळ नांवाचें बळकट ठाणें होतें. सांगलीकरांनीं प्रथम संपगांव घेतलें आणि नंतर नेगिनहाळच्या ठाण्यावर हल्ला केला. ठाण्यांत पांच सातशें कांटक होते त्यांनीं शौर्यानें हल्ला परतविला. हल्ल्याच्या गर्दीत उभय-पक्षांकडील शेपन्नास लोक ठार व जखमी झाले. नंतर सांगलीकरांनीं मोर्चे बांधून ठाण्याला वेढा दिला. तेव्हां ठाण्यांतील लोक शरण आले आणि ता. ९ मे रोजीं ठाणें सांगलीकरांच्या स्वाधीन झालें. कित्तूर-करांचे वीर संगापा आणि व्यंकटराव हे दोघे कारभारी एप्रिल महिन्या-पासूनच तहाकरितां चिंतामणराव आपाशीं बोलणें करीत होते. शेवटीं त्या दोघांच्या मध्यस्थीनें तह घडून आला आणि कित्तूरकरानें एक सालची सव्वा लक्ष रुपये खंडणी सांगलीकरांना दिली. नंतर सांगली-करांनीं नवलगुंद, जाडरहेवळी, बेहट्टी, आणिगेरें, संपगांव, हिरेचंदगड वगैरे गांवांपासून मोठमोठ्या खंडण्या वसूल केल्या. सांगलीकरांच्या दा

कर्नाटकांतील स्वारीनें त्या प्रांतीं मराठी अंमलाचा दरारा पुन्हां प्रस्थापित झाला.

उत्तर हिंदुस्थानांत इंग्रजांचा होळकराशीं भयंकर रणसंग्राम चालू होता. त्या कामीं पटवर्धन, रास्ते वगैरे सरदारांनीं आपणांस मदत करावी अशी इंग्रजांची अतिशय इच्छा होती. पटवर्धनांनीं स्वारीवर निघावें यासाठीं जनरल वेलस्लीनें मि. स्टूंची नांवाचा एक अधिकारी मुद्दाम पटवर्धनांकडे पाठविला. मि. स्टूंची याचा उल्लेख जुन्या कागदांतून इस्त्रंचीसाहेब असा करीत असत. या साहेबानें जमखंडी, मिरज आणि सांगली येथें हेलपाटे घालून सर्व पटवर्धन सरदारांना स्वारीवर निघण्याबद्दल पराकाष्ठेचा तगादा केला. या कामासाठीं स्वतः जन. वेलस्ली हाही जमखंडी, मिरज, सांगली येथें आला आणि त्यानेंही पटवर्धनांना भीड घातली. परंतु पटवर्धनांनीं दोघांचीही भीड मानली नाहीं. इंग्रजांना सामील होण्याबद्दल पेशव्यांचा हुकूम यापूर्वीच पटवर्धनांना आला होता. परंतु पटवर्धन व पेशवे यांमध्यें भयंकर वाकडें आलें होतें. आपण फौज घेऊन दूर गेलों तर पाठीमागें पेशवे विश्वासघात करून आपले सरंजाम जप्त करतील किंवा आपण पुण्यास गेलों तर पेशवे आपली अब्रू घेतील असें पटवर्धनांना भय वाटत होतें. आपण मध्यस्थ आहों, तुमच्या जहागिरीस किंवा अब्रूस पेशवे धक्का लावणार नाहींत, अशी इंग्रज पटवर्धनांची समजूत घालीत होते. परंतु पटवर्धनांचा इंग्रजांच्या म्हणण्यावरही विश्वास बसला नाहीं आणि एकही पटवर्धन सरदार स्वारिवर बाहेर पडला नाहीं.

पटवर्धन आणि इंग्रज यांमधील ही घसघस पाहून पेशव्यांना आनंद झाला. पटवर्धन व रास्ते यांचे सरंजाम जप्त करून बापू गोखल्यांस द्यावेत अशी पेशव्यांची पुष्कळ दिवस खटपट चालू होती. परंतु इंग्रज या गोष्टीस रुकार देत नव्हते. आतां पेशव्यांनीं या बाबतींत पुनः खटपट चालू केली. पटवर्धनांचा वकील लिहितो—( २९ जून १८०४ )

" त्रिवर्ग पटवर्धन सरदार व रास्ते यांच्या सरंजामाच्या यादी कर्णेल (क्लोज) यांजकडे देऊन कार्यभागी (कारभारी सदाशिव माणकेश्वर) व मुख्यसह (पेशव्यासह) कर्णेल याशीं दोन बैठकी जशी सरंजामाची

करावी याप्रमाणें बोलणीं जालीं. त्याच संधींत जनरेलही (जन. वेलस्लीही) निरोपास पुण्यास आल्यानंतर त्यापाशींही याच अन्वयें बोलणीं पडलीं. पटवर्धन व रास्ते हे सरकार कह्या मानीत नाहींत व उपयोगी नाहींत याकरितां सरंजाम जप्त करावेत येविशीं बहुत खटपट जाली. परंतु आजच्या प्रसंगीं यांचा (इंग्रजांचा) रुकार पडला नाहीं. परंतु हें चाललें त्यापक्षीं कोणे वेळेस काय होईल याचा भरंवसा नाहीं. गोखल्याकडे सरंजाम द्यावे याप्रमाणें पेशजी बेत जाले. त्या समयीं यांचा रुकार न पडल्यामुळें राहिलें. हल्लींही यांणींच टाळा दिला. परंतु सरकारांतून कांहीं तथा नाहीं."

नाना -फडनविसांच्या वेळचे मुत्सद्दी व सरदार यांशीं पेशव्यांचें भयंकर वितुष्ट वाढलें होतें. कोणाचें नफा नुकसान न करतां आपल्याकडे शक्य तेवढा भलेपणा घेऊन सर्वांचा समेट करून द्यावा, नानांच्या वेळचे मुत्सद्दी व सरदार यांचा पेशव्यांच्या द्वेषाग्नीपासून शक्य तेवढा बचाव करावा, असें इंग्रजांनीं आपलें धोरण ठरविलेलें होतें. या दृष्टीनेंच पटवर्धन व रास्ते यांचे सरंजाम जप्त करण्याबद्दल पेशव्यांच्या मागणीला इंग्रजांनीं मान्यता दिली नाहीं. पटवर्धन सरदारांच्या बाबतींत इंग्रजांनीं कोणतें धोरण ठरविलेलें होतें त्याची माहिती पटवर्धनांचा वकील रामचंद्र श्रीधर ऊर्फ बाबा काळे यानें ता. २७ आगष्ट १८०४ च्या पत्रांत सविस्तर दिलेली आहे. त्या माहितीचा सारांश असा—(१) पटवर्धन व पेशवे यांच्या मनांत कांहीं विषाद आहे किंवा असेल तो उभयतांनीं सोडून द्यावा. (२) पटवर्धनांनीं पेशवे सरकारची इमानानें चाकरी करावी. पेशव्यांकडून पटवर्धनांच्या अब्रूस धक्का लागणार नाहीं याबद्दल इंग्रज सरकार जामीन राहील. (३) पटवर्धनाकडे सरकारसनदेप्रमाणें मुलूख ताब्यांत असेल तो त्यांजकडे चालेल. याबद्दल इंग्रज सरकार जामीन राहील. पटवर्धन इमानानें चाकरी करतील तोंपर्यंतच ही जामीनगत चालेल. (४) पेशवे सरकारचा हुकूम होईल तेव्हां पटवर्धनांनीं आपली सरंजामी फौज पुण्यास पाठवावी. पटवर्धन फौज न पाठवितील तर इंग्रज सरकारची जामीनगत उडेल. पटवर्धनांपैकीं एक खासा कांहीं फौज घेऊन पुण्यास कायमचा रहावा. त्याच्या अब्रू हुरमती-

विषयीं सरकार इंग्रज कुंपणी बहादुर जामील राहील. ( ५ ) पटवर्धनांकडे सनदेशिवाय मुलूख ताब्यांत असेल तो त्यांनीं सरकारास परत द्यावा. बाबा काळ्यानें इंग्रजांच्या धोरणाचीं पांच कलमें लिहिलीं आहेत त्याच अनुरोधानें पुढें इ. स. १८१३ सालीं पेशवे व पटवर्धन यांमध्यें पंढरपूर मुक्कामीं तह घडून आला. पंढरपूरच्या या तहाची हकीगत पुढील सोळाव्या भागांत 'पेशवाईचे शेवटचे दिवस' या प्रकरणीं सांगण्यांत येईल.

**८ पुणें दरबार आणि पेशव्यांचा स्वैर कारभार**—पटवर्धन व पेशवे यांमध्यें समेट करण्याचा इंग्रजांनीं कसा प्रयत्न केला हें वर सांगितलेंच आहे. इंग्रजांची राजनीति ही अत्यंत धूर्तपणाची होती. इंग्रज हे जातिवंत थंडे मुत्सद्दी होते. पेशवाई राज्यांत तूर्त त्यांना शांतता प्रस्थापित करावयाची होती. नानांच्या वेळच्या मुत्सद्यांचा शक्य तेवढा बचाव करावा, पेशव्यांच्या वक्र राजनीतीपासून सरदार आणि सरंजामदार यांचाही बचाव करावा, आपण भलेपणा घेऊन सर्वांचा समेट करून द्यावा, असें इंग्रजांनीं या वेळीं धोरण ठरविलेलें होतें. पुढें आम्हीं पत्रव्यवहार छापला आहे त्यांत अनेक प्रकरणांची माहिती आलेली आहे. प्रत्येक प्रकरणांत इंग्रजांची ही धूर्तपणाची आणि समेटाची राजनीति दिसून येते. त्यांपैकीं कांहीं प्रकरणांची माहिती आम्ही येथें संक्षेपानें देतों.

**१ बडोद्याचे गायकवाड**—गोविंदराव गायकवाड आणि पेशव्यांचा अहंमदाबादेचा सुभेदार आबा शेलूकर यांमध्यें स. १७९८–१८०० सालीं तंटा झाला. त्यांत गायकवाडांनीं शेलूकराचा पराजय केला. नंतर पेशवे सरकारास दरसाल पांच लक्ष रुपये देण्याच्या करारावर स्वतः गायकवाडांनींच अहंमदाबादेची सुभेदारी पत्करली हा सर्व मजकूर आम्हीं भाग तेरावा पृ. ६९३५–६९४२ यांवर विस्तृतपणें दिलेला आहे. गोविंदराव सन १८०० च्या सप्टेंबर महिन्यांत मृत्यु पावले आणि त्यांच्या पश्चात् आनंदराव गायकवाड गादीवर बसले. त्यांच्या कारकीर्दीच्या सुरवातीसच त्यांचा भाऊ कान्होजी गायकवाड आणि कडी प्रांताचा जहागीरदार मल्हारराव गायकवाड यांनीं बंडाचें निशाण उभारलें. रावजी आपाजी परभू हे गायकवाडांचे कारभारी होते आणि

त्यांचे बंधु बाबाजी आपाजी परभू हे गायकवाडांचे सेनापति होते. रावजीनें सुरतकर इंग्रजांची मदत घेऊन कान्होजी व मल्हारराव यांचीं बडें मोडलीं. या रावजीच्या मार्फत गायकवाडींत इंग्रजांचा कायमचा प्रवेश झाला. रावजी हे स. १८०३ सालीं मृत्यु पावले आणि त्यांच्या मागें त्यांचा दत्तक मुलगा सीताराम रावजी हा गायकवाडांचा कारभारी झाला. सीतारामाच्या कारकीर्दींत इंग्रजांनीं गायकवाडांच्या कारभारांत जास्तच हातपाय पसरले. इंग्रजांनीं कान्होजी आणि मल्हारराव यांच्या बंडाचा पुरता बींमोड केला. कान्होजी हा इंग्रजांच्या कैदेंत मद्रास येथें राहिला आणि कैदेंतच त्याचा शेवट झाला. मल्हारराव हाही मुंबई येथें इंग्रजांच्या कैदेंत राहिला आणि कैदेंतच त्याला मृत्यु आला. या वेळीं गायकवाडांच्या कारभारांत दुसरे एक गृहस्थ पुढारी बनले. हे गृहस्थ म्हणजे गोविंदरावांचे बंधु फत्तेसिंग गायकवाड हे होत. गोविंदराव व फत्तेसिंग यांमध्यें पूर्वी गायकवाडांच्या सरदारीबद्दल तंटा झाला होता. त्याची माहिती आम्हीं भाग पांच आणि सहा यांत विस्तृतपणें दिलेली आहे. गोविंदरावास सरदारी मिळाल्यावर नाना फडणिसांनीं फत्तेसिंगास धरून आणून सन १७७८ सालीं पुण्यास नजरबंदींत ठेविलें. फत्तेसिंग पुण्यास पंचवीत वर्षें कैदेंत होते. पुढें होळकरांच्या दंग्यांत ते पुण्याहून पळून गुजराथेंत गेले आणि नंतर इंग्रजांच्या आश्रयानें फत्तेसिंगबाबा गायकवाडांचे मुख्य कारभारी झाले. फत्तेसिंगाच्या आगमनामुळें परभू मंडळींचें गायकवाडांच्या कारभारांत महत्त्व राहिलें नाहीं.

इंग्रजांनीं गायकवाडांच्या कारभारांत ज्या उलाढाली केल्या त्यांतून त्यांना एका गृहस्थाचें फार मोठें साहाय्य झालें. ते गृहस्थ म्हणजे गंगाधरशास्त्री पटवर्धन हे होत. पटवर्धन हे पूर्वी हरीपंत फडक्यांचे अत्यंत विश्वासु कारकून होते. फडक्यांचें आणि बाजीरावाचें वांकडें होतें. त्यामुळें पेशव्यांना पटवर्धनांबद्दल अत्यंत द्वेष वाटत होता. गंगाधरशास्त्र्यावर इंग्रज आणि फत्तेसिंग यांचा मात्र अत्यंत विश्वास होता. फत्तेसिंग गायकवाडांचे कारभारी झाल्यावर त्यांच्या कारभाराचीं सर्व सूत्रें पटवर्धनांच्या तंत्रानें चालूं लागलीं. या वेळीं गायकवाड आणि पेशवे यांमध्यें देण्याघेण्याच्या बाबतींत मोठा तंटा चालू होता. गायकवाडांची

सरदारी आणि अहमदाबादेची सुभेदारी या बाबतींत गायकवाडांनीं पेशव्यांचे दोन कोट रुपये देणें होतें. उलटपक्षीं पुणें दरबारच्या नेभळट कारभारामुळें गुजराथेंत बंडें झालीं आणि तीं बंडें मोडण्यांत आपले पांच कोट रुपये खर्च झाले आहेत ते पेशव्यांनीं भरून द्यावे असें गायकवाडांचें म्हणणें होतें. सारांश, गायकवाड आणि पेशवे यांचा हा देण्याघेण्याचा तंटा एखाद्या जबरदस्त मध्यस्थाशिवाय तुटण्यासारखा नव्हता. इंग्रजांनीं या बाबतींत मध्यस्थी चालविली होती. पेशव्यांनीं आपल्या देण्याघेण्याची तोड बेचाळीस लक्ष रुपयांवर करून घ्यावी अशी इंग्रजांची खटपट चालली होती. ही हिशेबाची भानगड मिटविण्याकरितां गंगाधरशास्त्री हे सन १८०४ सालीं पुण्यास आले. परंतु त्यांची पेशव्यांनीं भेट सुद्धां घेतली नाहीं. पेशव्यांनीं पटवर्धनशास्त्र्याची भेट घ्यावी, देण्याघेण्याच्या हिशोबाच्या बाबतींत त्यांचें म्हणणें पेशव्यांनीं ऐकून घ्यावें, याबद्दल सदाशिव माणकेश्वर दिवाण आणि इंग्रजांचा वकील क. क्लोज यांनीं अतिशय खटपट केली. परंतु शास्त्री हा नीच मनुष्य आहे, हा आतां इंग्रजांच्या खांद्यावर बसून मोठा बलिष्ठ होऊं पहात आहे, फडक्यांच्या पदरीं असतांना त्यानें आपले अपमान केले आहेत, त्याचें तोंडसुद्धां पहावयाचें नाहीं, असा पेशव्यांनीं सिद्धान्त ठरविला होता. पटवर्धनशास्त्री सुमारें दोन अडीच वर्षे पुण्यास राहिले परंतु पेशव्यांच्या दरबारांत त्यांची कांहींच दाद लागली नाहीं. पेशव्यांच्या मित्रांपैकीं त्रिंबकजी डेंगळे यानें मात्र पटवर्धनशास्त्री यांशीं अतिशय सख्य जोडलें. स. १८०६ सालीं डेंगळे पटवर्धनांना घेऊन आळंदीस गेला. तेथून निंबगांव येथें डेंगळ्यांनीं पटवर्धनांना मेजवानी केली. नंतर डेंगळे आणि पटवर्धन हे दोघेही नाशिकास गेले. नाशकाहून गंगाधरशास्त्री कोणतेंही काम न होतां हात हालवीत गुजराथेंत परत गेले. गंगाधरशास्त्र्यांची पुढील हकीगत पुढील सोळाव्या भागांत 'पेशवाईचे शेवटचे दिवस' या प्रकरणीं सांगण्यांत येईल.

**२ वाडीकर सावंत**—करवीरकर आणि सावंतवाडीचे सावंत यांमध्यें वारंवार तंटे उद्भवत असत. स. १७८५ सालापासून या तंट्याला उग्र रूप प्राप्त झालें. वाडीकर खेम सावंत यांची थोरली स्त्री लक्ष्मीबाई या

जयापा शिंद्यांच्या कन्या होत्या. त्यांनीं आपला चुलता महादजी शिंदे यांच्या वशिल्यानें दिल्लीच्या पातशहाकडून आपल्या नवऱ्यासाठीं मोर्चेल वापरण्याचा मान मिळविला. मोर्चेल वापरणें हा मान वस्तुतः छत्रपतींचा होता. आपला मान वाडीकर सावंतांनीं मिळविलेला पाहतांच करवीरकर छत्रपतींचें पित्त भडकलें आणि त्यांनीं वाडीच्या मुलखावर स्वाऱ्या सुरू केल्या. उलटपक्षीं वाडीकरही करवीरकरांच्या मुलखावर स्वाऱ्या करूं लागले. असा हा तंटा अनेक वर्षे चालू होता. हा तंटा चालू असतांना खेम सावंत हे सन १८०३ चे सुमारास मृत्यु पावले. त्यांना तिसरी स्त्री देवीबाई हिजपासून झालेला एकच अल्पवयी पुत्र होता. तोच पुढें गादीवर बसला. थोरली स्त्री लक्ष्मीबाई या अज्ञान मुलाच्या वतीनें राज्यकारभार करूं लागल्या. खेम सावंत मृत्यु पावलेले पाहून करवीरकरांनीं वाडी प्रांतावर स्वारी केली. लक्ष्मीबाईनीं विश्वासराव घाटगे कागलकर आणि आपा देसाई निपाणीकर यांची मदत मिळवून करवीरकरांशीं अत्यंत शौर्यानें युद्ध चालविलें. आपा देसायानें करवीर राज्यावर स्वारी करतांच करवीरची फौज मुकाट्यानें वाडी प्रांतांतून परत फिरली. आपा देसाई हा क्रूरकर्मा होता. त्यानें आणि खेम सावंताचा चुलत भाऊ फोंड सावंत यांनीं संगनमत करून खेम सावंताच्या अल्पवयी मुलाचा खून करविला. हें अघोर कर्म करून दोघांचाही कांहींच फायदा झाला नाहीं. देसाई करवीरकरांच्या युद्धांत गुंतल्यामुळें फोंड सावंत शिरजोर झाला आणि त्यानें आपा देसायाला वाडी प्रांतांतून हाकून लाविलें. फोंड सावंताचीही वाडीच्या कारभारांत डाळ शिजली नाहीं. त्याबद्दलची माहिती एका पत्रांत दिली आहे ती अशी—

(२७ मे १८०५) "रत्नाकरपंत निा करवीरकर वाडी प्रांतीं गेले. त्यांचे हस्तगत रेडी व भरतगडचा किल्ला जाहला. त्या संस्थानांत घरफुटीमुळ यांचा पाय शिरोन दोन्ही किल्ले याजकडे आले. याजउपरी तें संस्थान राहणें कठीण आहे."

वाडीकर सावंत घराण्यापैकीं राजकुंवरबाई या पटवर्धनांच्या आश्रयास येऊन राहिल्या. त्या मिरजकर बाळासाहेबांस लिहितात—(२३ फेब्रुवारी १८०५) "वाडीहून हरोलीस येऊन आठ दिवस जाहले. आम्ही

आपल्या जिल्हेंत आलों. आमचा सांभाळ करावा. आमचे राज्याचा बखेडा जाहला. यास्तव येथें येणें प्राप्त जालें."

८ जाने. १८०६—"वाडी प्रांताकडील वर्तमान तर—मातुश्री लक्ष्मीबाई भोसले यांणीं रा. श्रीराम सावंत यांचा पुत्र दत्तक घेऊन शिक्याचा अधिकारी केला. तो व मातुश्री वाड्यांत असतात. श्रीराम सावंत बहिरवाडींतच राहून प्रांताचा कारभार करतात. रा. फोंड सावंत वाडींतून पळून गेले. कुडाळास जाऊन राहिले. त्याजवळ हजार पांचशे जमाव आहे. प्रांतांत जाळपोळ करून खराबी करतात. रा. चिटकोपंत सालढीकडून पांच चारशें जमावानिशीं फोंड सावंत यांस सामील जाले. धुळपाचेंही संधान आहे. तेही येणार. त्यांतच राजमंडळकरही मिळणार. याप्रमाणें वर्तमान आहे."

याप्रमाणें वाडीच्या कारभारांत गोंधळ चालू असतां स. १८०८ चे सुमारास लक्ष्मीबाई मृत्यु पावल्या. त्यानंतर लवकरच फोंड सावंत मृत्यु पावले. दोघांच्या पश्चात् खेम सावंताची दुसरी स्त्री दुर्गाबाई यांनीं करवीरकराशीं युद्ध चालविलें आणि रेडी आणि भरतगड हे दोन्ही किल्ले पुन्हां काबीज केले.

सन १८०८ चे सुमारास इंग्रजांनीं वाडीच्या कारभारांत लक्ष घातलें. करवीरकर आणि वाडीकर हे दोघेही समुद्रावर चांचेगिरी करीत असत. इंग्रजांनीं करवीरकरांचीं मालवण व सिंधुदुर्ग हीं दोन्ही स्थळें ताब्यांत घेतलीं. शिवाय वाडीकरांचें वेंगुर्ल्याचें बंदर आणि शेजारची गुणारामाची बातेरी हीं दोन्ही स्थळेंही इंग्रजांनीं ताब्यांत घेतलीं. याप्रमाणें दोघांच्या चांचेगिरीचा बंदोबस्त केल्यावर इंग्रजांनीं करवीरकर व वाडीकर यांचा समेट करून देण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. परंतु दुर्गाबाई इंग्रजांचे कोणतेही युक्तिवाद ऐकेनात. इंग्रजांनीं वाडी प्रांतांत फौज पाठविली तेव्हां दुर्गाबाईनीं इंग्रजी फौजेशींही दोन तीन वर्षें शौर्यानें युद्ध चालविलें. पुढें स. १८१९ सालीं इंग्रजांनीं वाडीची सर्व जहागीर ताब्यांत घेतली. पुढें राणी सरकारचें राज्य झाल्यावर इंग्रजांनीं वाडीची जहागीर पुनः

सावंतांना परत दिली. इंग्रजांनीं परत दिलेली जहागीर हेंच हल्लींचें सावंतवाडी संस्थान होय.

३ कित्तूरकर देसाई—ऐ. ले. सं. भाग ५–१४ यांपैकीं प्रत्येक भागांत कित्तूरकरांच्या दंग्याचा उल्लेख जागोजाग आलेला आहे. कित्तूरकर हे एक कर्नाटक प्रांतांतील मोठें बंड होतें. सतत चाळीस वर्षें स्वाऱ्या करूनही पेशव्यांना या बंडाचा नींमोड करतां आला नाहीं. सांगलीकरांनीं कित्तरकरांवर नुकतीच स्वारी केली तिचें वर्णन पूर्वीं आलेंच आहे. स. १८०१–१८०२ सालीं जनरल वेलस्ली हा इंग्रजी फौज घेऊन धारवाड–हुबळी–मिरज या मार्गानें पुण्यास गेला तेव्हां सावनूरचा नबाब आणि कित्तूरकर देसाई यांनीं इंग्रज फौजेला अतिशय मदत केली आणि दोघांनींही इंग्रजांची दोस्ती संपादन केली. दोघांपैकीं सावनूरच्या नबाबाला मात्र इंग्रजांच्या दोस्तीपासून चांगला फायदा झाला. इंग्रजांनीं पेशव्यांना भीड घालून त्या नबाबाला पन्नास हजार रुपयांचें उत्पन्न तोडून देवविलें. कित्तरकरांना मात्र इंग्रजांच्या मैत्रीपासून कांहींच फायदा झाला नाहीं. कामापुरते इंग्रज कित्तूरकरांशीं गोड बोलले. काम संपतांच तेच इंग्रज देसायावर उलटले. तुम्ही पसतीस हजार रुपये उत्पन्नाचे अकरा गांव घेऊन स्वस्थ बसा, तुमचा बाकीचा सर्व मुलूख तुम्ही पेशवे सरकारच्या स्वाधीन करा, असा इंग्रजांनीं देसायास तगादा लाविला. त्याबद्दलची माहिती—

( २ आक्टोबर १८०५ )– "कित्तूरकर यांस सरकारांतून व इंग्रजांकडून निकड आहे जे, अकरा गांव पसतीस हजार रुपयेचे तुम्ही घेऊन बाकी तालुका सरकारचे हवालीं करावा आणि आठ सालांचा ऐवज सदरहू नेमणूक वजा होऊन बाकी निघेल तो द्यावा म्हणोन त्याचे वकिलास निक्षोन ताकीद जाली. वकिलास निकड आहे. सुप्रवृत्तीनें जाबसाल उलगडल्यास उत्तम. नाहीं तर इंग्रज बंदोबस्त करणार. आजतागायत इंग्रजांचा आधार कित्तूरकरांस होता. त्याणीं स्पष्ट सांगितले जे, तालुका सरकारचे हवालीं करावा."

असो. इंग्रजांनीं पुष्कळ खटपट केली तथापि या वेळीं कित्तूरकरांचा

दंगा थांबला नाहीं. पुढें पेशवाई बुडाल्यावर इंग्रजांनीं स्वतःच कित्तूरकरांचा मुलूख काबीज करून त्यांचें बंड मोडलें.

४ सोलापूरचा किल्ला—सोलापूरचा किल्ला रामचंद्र शिवाजी या गृहस्थांकडे होता. हे गृहस्थ नाना फडनवीसांच्या विश्वासांतले मोठे सावकार होते. पुण्यांत शिंदेशाही माजली तेव्हां नानांच्या वेळचे पुष्कळ मुत्सद्दी व सावकार यांनीं आपापल्या इष्टेटी सोलापूरच्या किल्ल्यावर रामचंद्रपंतांकडे ठेविल्या होत्या. पेशव्यांनीं सोलापूरच्या किल्ल्यावर फितूर करून ठेविला आणि रामचंद्रपंत वेळींच सावध झाले नाहींत त्याचे भयंकर परिणाम त्यांना भोगावे लागले. स. १८०४ सालच्या नोव्हेंबर महिन्यांत किल्ल्यावर एकाएकीं बंड झालें आणि किल्ला सहजासहजीं पेशव्यांच्या हातीं आला. किल्ला काबीज करण्यांत उभयपक्षीं रक्ताचा एकही थेंब खर्च पडला नाहीं. रामचंद्र शिवाजी बायकांमुलांसह कैदेंत पडले आणि त्यांची लाखों रुपयांची दौलत पेशव्यांनीं जप्त केली. पुढें रामचंद्रपंत आणि त्यांचे दोघे मुलगे यांना पेशव्यांनीं सोलापुराहून हालवून प्रतापगडावर कैदेंत ठेविलें. वाटेनें त्यांचे अन्नपाण्याचे अतिशय हाल करण्यांत आले. स. १८०५ सालच्या एप्रिल महिन्यांत पेशव्यांनीं रामचंद्रपंतांची मुक्तता केली. नंतर ते पुण्यास आपल्या वाड्यांत येऊन राहिले. त्यांचीं बायकामुलें सोलापुरास कैदेंत होतीं. त्यांचीही याच वेळीं मुक्तता करण्यांत आली. सोलापूरच्या किल्लेदारीचें काम सदाशिव माणकेश्वर दिवाण यांचे बंधु नानाजी माणकेश्वर यांजकडे पेशव्यांनीं सांगितलें. रामचंद्र शिवाजी यांची किती दौलत जप्त झाली याची पेशव्यांनीं चवकशी केली तेव्हां रामचंद्रपंतांनीं आपली बावीस लक्ष रुपयांची मालमत्ता जप्त झाली अशी पेशवे सरकारांत याद दिली. सदाशिव माणकेश्वर यांनीं फक्त तीन लक्षांची मालमत्ता सरकारच्या जप्तींत आली असें पेशव्यास समजाविलें. तेव्हां सुमारें एकुणीस लक्षांची मालमत्ता मधल्या मध्येंच कशी नाहींशी झाली याबद्दल पेशव्यांनीं चवकशी सुरू केली. शेवटीं या सरकारी चवकशींत कांहींच निष्पन्न झालें नाहीं. पेशव्यांनीं या वेळीं नाशिकचे राजेबहाद्दर आणि वाळव्याचे थोरात यांचेही सरंजाम जप्त केले. थोरातांचा सरंजाम जप्त करण्याचें काम पेशव्यांनीं मिरजकर पटवर्धनांना सांगितलें.

५ अमृतराव पेशवे—होळकराला दक्षिणेंत आणण्यांत अमृतराव पेशवे, मोरोबादादा फडनवीस आणि बाबा फडके हे तिघे पुढारी होते. पुढें होळकर दक्षिणेंतून माळव्यांत परत गेल्यावर मोरोबादादा आणि अमृतराव हे इंग्रजांच्या आश्रयास जाऊन राहिले. त्यामुळें त्यांचा मोठा बचाव झाला. मोरोबादादा हे पुढें लवकरच मृत्यु पावले. अमृतरावांच्या खर्चाची सर्व व्यवस्था इंग्रजांनीं उत्तम प्रकारें लावून दिली. त्याबद्दल माहिती—

( ९ आगष्ट १८०४ )–" श्रीमंत रा. रावसाहेब यांस व त्यांजकडील मडळीस दरमहाची नेमणूक वसली यांणीं येणेंप्रमाणें करून दिली आहे. ५०००० रु. खाशास कुल. १००० रु. बचाजीपंत मेहेंदळे बहिरोपंतांचे बंधु. १००० रु. प्रभाकरपंत. २०० रु. मुजुमदार. २५०० रु. मोरोबादादा यांचे स्त्रीस. १००० रु. अन्याबा फडके. ५०० गोविंदराव भुस्कुटे. ३०० रु. चिटणीस. येणेंप्रमाणें करून दिलें आहे. शिवाय मानकरी, शिलेदार व कारकून यांस असामी व खर्च पाहून तेंही एकंदर ठरावून दिलें आहे. "

(१२ आगष्ट १८०४)–"श्रीमंत रा. रावसाहेब भिंगारास आहेत तेथें त्यांजपाशीं मंडळी आहे. ती झाडून कर्नेल कलुप यांणीं भेटीस्तव आणविली होती. त्यास उभयतां खासे व रा. अन्याबा फडके व घाकोपंत याशिवाय सर्व भेटीस आले. भेटी झाल्या. जन. वसलीसाहेब यांणीं सर्वांस अभय देऊन दारमदार करून दिला आहे. त्याप्रमाणें कर्नेल यांणीं ठरावून दिलें. कोणी कोठें गेल्यास चिंता नाहीं. याप्रमाणें होऊन कर्नेल याचा निरोप घेऊन सर्व मंडळी निघोन रावसाहेब याजपाशीं गेली. रावसाहेब यांचा मानस समुदायसह श्रीकाशीयात्रेस जावें असें आहे. लवकरच निघोन खर्चाचे सुमारें जाणार. तेथें दोन महिने राहून यात्रासुद्धां चालते होणार असें ठरलें आहे. कै. मोरोबादादा यांचेंही कुटुंब त्यांजबरोबर यात्रेस जाणार."

यानंतर इंग्रजांकडून मार्गाचीं दस्तकें मिळवून अमृतराव पुढें नागपूर प्रांतीं गेले. तेथून श्रीकाशीस जातांना वाटेनें गोंडवनांतून मार्ग चालत असतां

स. १८०५ सालच्या मार्च महिन्यांत अमृतरावांची सर्व काशीयात्रा पेंढाऱ्यांनीं लुटली. स्वतः अमृतराव कसाबसा जीव बचावून नागपुरास परत आले. तेथें नागपूरकर भोसल्यांनीं त्यांचा उत्तम प्रकारें परामर्श घेतला. ( १६ मार्च ०५ ) " श्रीमंत रावसाहेब यांस गोंडवनांत लुटलें. चार स्वारानिशीं नागपुरास परत आले. भोसल्यानीं विठ्ठलराव बक्षी यांचा वाडा रहावयास दिला. २५००० रुपये आणि इतर सरंजाम भोसले यानीं पुरविला." ( ३० मार्च ०५ ) " श्रीमंत अमृतराव यांस नागपुरापलीकडे पेंढारी यार्णी सर्व लुटलें. वस्त्रानिशीं नागपुरास परत आले. भोसले परामर्ष घेतात. "

यानंतर भोसल्यांकडून फौजेची मदत मिळवून अमृतराव स. १८०५ सालच्या अखेरीस श्रीकाशीस जाऊन पोचले. अमृतरावांनीं पुढें जन्मभर क्षेत्रवास केला. इ. स. १८२४ सालीं ते श्रीकाशी क्षेत्रांत मृत्यु पावले.

होळकराला दक्षिणेंत आणण्यांत तिसरे पुढारी बाबा फडके हे होते. फडणीस व अमृतराव या दोघांप्रमाणें ते इंग्रजांस सामील झाले नाहींत. उलट ते शेवटपर्यंत इंग्रजांशीं लढत राहिले. त्याचे परिणाम त्यांना भोगावे लागले. इंग्रजांच्या सामर्थ्यापुढें त्यांचा निभाव लागला नाहीं. शेवटीं सर्व उपाय थकल्यावर बाबा फडके हे मिरजेस पटवर्धनांच्या आश्रयाखालीं येऊन राहिले. चिंतामणराव सांगलीकर यांना त्यांची कन्या दिलेली होती. बाबांना ठेवून घेण्यांत चिंतामणराव जांवई यांनीं पुढाकार घेतला हें सांगणें नकोच. फडके हे बंडखोर आणि सरकारचे गुन्हेगार आहेत, त्यांना पेशवे सरकारच्या स्वाधीन करा, असा पेशव्यांनीं पटवर्धनांना तगादा लाविला. परंतु पटवर्धनांनीं पेशव्यांच्या तगाद्याला मुळींच दाद दिली नाहीं. शेवटीं फडक्यांना पेशव्यांच्या स्वाधीन करण्याबद्दल इंग्रजांनीं पटवर्धनांना खडसून तगादा लाविला तेव्हां पटवर्धनांचा उपाय थकला आणि फडक्यांना पेशव्यांच्या स्वाधीन करण्यांत आलें. पेशव्यांनीं त्यांना वसईच्या किल्ल्यावर कैदेंत ठेविलें. बाबा फडके हे अव्वल दर्जाचे थोर गृहस्थ होते. त्यांची अशी दुर्दशा केलेली पाहतांच हुजरातींतील मानकरी व शिलेदार यांमध्यें मोठीच चळवळ उडाली. फडके हे पुढें स. १८१० सालच्या सुमारास कैदेंत मृत्यु पावले. त्यांची

स्त्री सौभाग्यवती बयाबाई या सती गेल्या. त्याबद्दलची माहिती एका पत्रांत दिली आहे ती अशी—" बाबा फडके यांची स्त्री सौ. बयाबाई यांणीं अग्निप्रवेश केला तेव्हां त्यांनीं श्रीमंतास दुपेटा व श्री. रा. चिमाजी अप्पासाहेब यांचे स्त्रीस पातळ चोळी दिली. तीं सनगें पुण्यास वकिला-कडे पाठविलीं. त्याणीं रा. दिवाण व अल्पिष्टनसाहेब यांचे विचारें करून श्रीमंतास पावती करावीं. त्याणीं न घेतल्यास परत पाठवूं नयेत. तेथेंच चांगलें सुस्थळ ब्राह्मण पाहून त्यास पावतीं करावीं असें लिहून पाटविलें आहे."

मराठी राज्यांत शांतता प्रस्थापित करण्याचा इंग्रजांचा उद्योग चालू असतां मराठी राज्याचे खावंद जे पेशवे त्यांचा कारभार पूर्णपणें मन-सोक्त आणि अव्यवस्थित चालू होता. त्यांच्या वागणुकीला कोणतेंही ताळतंत्र नव्हतें. त्यांच्या कारभाराबद्दल आम्हीं पूर्वी तेराव्या भागांत वर्णन केलें आहे तें असें—" 'धाता यथापूर्वमकल्पयत्' अशीच त्यांच्या कारभाराची स्थिति होती. त्यांत त्यांचें व्यक्तिमत्व कोठेंच फारसें दिसून येत नव्हतें. श्रीमंतांचा अवतार केवळ राज्यनाशासाठींच झाला होता. त्यांच्या स्वभावांत अनेक सद्गुण आणि दुर्गुण यांचा असा अपूर्व मिलाफ बनला होता कीं त्याचा परिणाम फक्त एकाच गोष्टींत होत असे. ती गोष्ट म्हणजे नाशकार्य! मृच्छकटिकांतील शकाराच्या पात्राचें स्वभाववर्णन करावयाचें तर तो मूर्ख असून धूर्त—भ्याड असून धाडसी—आचरट असून कावेबाज— होता असें कांहीं तरी परस्परविरोधी वर्णन करावें लागतें. पेशव्यांच्या स्वभाववर्णनाचा प्रकारही असाच आहे" (पृ. ६९३२). " पोरकट देणग्या, हेकट वागणूक, आचरट धर्मभोळेपणा आणि नायकिणी व त्यांचे साजिंदे यांचा दौलतजादा या श्रीमंतांच्या खासगी वर्तनाच्या चतुःसीमाच होत! (पृ. ६८९६)."

आतांपर्यंत आम्हीं भाग १०—१४ यांतून पत्रव्यवहार छापला आहे त्यांतून आमच्या विधानाला पोषक अशा पुष्कळ गोष्टी छापल्या गेल्या आहेत. पेशव्यांच्या भरमसाट कारभाराचे आणखी कांहीं विचित्र नमुने पुढें देतों—

१ देणग्या-धर्मदाय—

(२० आगष्ट १८०४) "रा. रामचंद्र गोसावी यांस हुजुरून पन्नास हजार रुपये देऊन शुक्रवारचे वाड्यासमोरची जागा ती त्यास रुपये सुद्धां बक्षीस देऊन 'सरकारवाड्याच्या मुकाबल्याची[1]' हवेली याजकारणें बांधवून परस्पर झरोक्यांत बसोन खुषीचीं भाषणें होत जावीं याप्रमाणें बेत होऊन गोसावी बावा याणीं हवेलीचें काम सुरू केलें आहे."

(सप्टेंबर १८०४) "वाड्यांतील आश्रीत याणीं विनंती केली कीं, स्वामी नेहमीं जाऊन नव्या वाड्यांत राहिले. आम्हास दर्शन होत नाहीं. तेव्हां कसें करावें? त्यावरोन सर्वत्र ब्राह्मण मंडळीस आज्ञा जाली कीं, तुम्हास नवा वाडा नेऊन दाखवावयाचा आहे. इतकें बोलणें जालें. त्याजवर आठ चार दिवस जाले. भाद्रपद शु॥ प्रतिपदा मंगळवारीं श्रीमंतांनीं वाड्यांतील ब्राह्मण शंभर असामी नव्या वाड्यांत नेऊन वाडा दाखवून दर असामीस शंभर रुपये प्रमाणें देऊन निरोप दिला."

(१९ आगष्ट १८०५) "वाड्यांत राखी पौर्णिमेचा उत्साह केला. पांचशेंपर्यंत राख्या ब्राह्मणांस भोजन घालोन हातास बांधोन एक एक रुपया दक्षणा दिली. नाच भोजनोत्तर करून घरीं गेले. शिवरात्रीस जागरण वर्षापेक्षां ब्राह्मण अधिक होते. दर ब्राह्मणास पुतळी दिली. श्रावणमासचे संख्येची याद आलाहिदा पाठविली आहे."

(२९ सप्टेंबर १८०५) "परीट चाबुकस्वार सरकारांत आहेत. त्यास पालखी द्यावयाची ठरवून सरंजामास चास लावून दिली. पालखी दसऱ्यास होईल. रा. खंडेराव रास्ते यास बहुत समाधान नव्हतें. विषमज्वर होता. हल्लीं मधुरा जाला. परंतु आरोग्य दिवसेंदिवस आहे."

(२ आक्टोबर १८०५) "रा. खंडेराव तात्या रास्ते यांस पंधरा दिवस संततज्वर बसला होता. नवज्वराची भावना होती. परंतु ईश्वरें पार केलें. त्यांतच मधुऱ्याची भावना झाली आहे. आरोग्य होईल असा भरंवसा लागला. दानधर्मही बहुत जाले. गृहस्थ बहुत थोर. श्रीनें कृपा करावी."

---

१ नमुन्याची.

(२ आक्टोबर १८०६) "यंदा श्रीमंत श्रीवेंकटेशाचा उत्साह शुक्रवारचे वाड्यांत चवथ्या मजल्यास करणार. मखरास काम लाविलें. काम सुमंताकडे सांगितलें. एकंदर हरदास कलावंत वगैरे विडे पान रोशनाई वगैरे झाडून लहान मोठा खर्च मिळोन रुपये वीस हजार सुमंतास द्यावयाचे ठरले. तूर्त दहा दिले. नवरात्र नऊ दिवस उत्साह होणार."

(१४ आक्टोबर १८०६) "श्रीमंत श्रीवेंकटेशाचा उत्साह शुक्रवारचे वाड्यांत चवथे मजल्यावर करणार. मखर केलें आहे. ब्राह्मणभोजन नित्य सरकारचे थोरल्या वाड्यांत पांच सातशेंपर्यंत नित्य होतें. दर असामीस रुपया एक प्रमाणें दक्षणा देतात. मिष्टान्न भोजन असतें. शुक्रवारचे वाड्यांत कांहीं सवाष्णी घालतात. नेमणुकीचे गृहस्थ आणि गवई मात्र उत्साहास जातात."

(सन १८०७) "फाल्गुनमासीं राजापुरास गंगा आली होती. मिरजेहून बाळासाहेब मिरजकर आणि जमखंडीहून रामचंद्रपंत अप्पा गंगास्नानास गेले होते. बाळासाहेब मिरजकर ता. ५ आक्टोबरच्या पत्रांत लिहितात, "श्रीगंगास्थान बहुत रमणीय आहे. असें स्थळ आजपर्यंत पाहाण्यांत आलें नव्हतें. इकडील मार्ग चांगली वाट अर्धकोश देखील नाहीं. उंच नीच जमीन झाडी अडचणी भारी. सर्व श्रम गंगादर्शनें करून परिहार झाले. अपूर्व स्थळ आहे. राजापूर बंदरही जागा चांगली. गांव पेठ चांगली. सावकार मातबर आहेत. माल जहाजावरोन बहुत येतो."

(१५ मार्च १८०९) "नाशकास पंचवटीस रामनवमीचा उत्साह सरकारचे दहा हजार रुपये खर्च करून करणार. श्रीमंत पुत्रोत्पत्तीस्तव नाशकाजवळ संगम आहे तेथें कांहीं ब्राह्मण करवणें अनुष्ठान करविणार. याकरितां नाशिकास पंधरा दिवस मुक्काम आहे."

२ स्वाऱ्या-शिकाऱ्या—

(१५ आक्टोबर १८०४) "दसऱ्याचे दिवशीं श्रीमंतास नजरा सर्वांनीं केल्या. त्याचा आकार मोहरा सुमार ४५ पुतळ्या तारें ६५ होन ६

व रुपये ७० येणेंप्रमाणें कुल नजरेचा आकार. श्रीमंताकडून पोषाख सातारेस महाराजाकडेस गेला."

(२८ फेब्रु. १८०५) "मुक्काम पळशीनजीक पाराशरपंत यांचा इनामगांव साकूर—इकडील मजकूर भिल्लाण होऊन सरकार तालुक्यास उपद्रव भारी जाला. याजमुळें श्रीमंतांनीं इंग्रजांचें एक पलटण व गोखले-कडील हजार स्वार व पायदळ पाठविलें. पलटणावर कर्णेल-कलणसाहेब आहे. येथून भिल्ल आठ कोशावर आहेत. एकंदर भिल्लांचा जमाव आरब सिद्दी इरसाल मिळोन पांच हजार जमाव आहे. त्यांत भिल्ल दीड हजार सुमार आहेत. आरब सिद्दी मिळोन तीनशें सुमारें आहेत. बाकी गांवगुंड मिळोन आहेत. डोंगर कटारी मुलखांतून नदीचे दरे मातबर अडचणीचे जागे पाहून उतरले आहेत. चि. रा. बापूसाहेब (गोखले) यांचें लग्न माघ व. ६ स एक जालें. दुसरें फाल्गुन शु. द्वितीयेस होणार."

(१३ आक्टो. १८०५) "श्रीमंत दसऱ्याचे दिवशीं बाहेर निघ-ताना जिलबीच्या पुढें भले[1] माणसाचा घोडा उपायी येऊन स्वार पडला. पायाची नळी मोडली. त्यांजला एकीकडे काढून मग स्वारी चालती झाली. सदाशिव माणकेश्वर नवी अंबारी पितळी एकखांबी आंत बसोन अबारीमागाहून अवघे बाळाराम मामाचे वाड्यानजीक रस्त्यानें जातां नागझरीजवळ अंबारीचा खांब मोडला. मग घोड्यावर बसोन पुढें गेले. अंबारी मागें आली. आबा ठोसर बाळाजी ठोसर यांचे पुत्र उदर होऊन देवाज्ञा जाले. स्त्री बरोबर गेली. आठ रोज जाले."

(२६ नोव्हें. १८०५) "श्रीमंतांची स्वारी सोमवारीं सायंकाळीं श्री-पर्वतीं जाऊन रात्रीस तेथें भोजन करून प्रहर रात्रीस शुक्रवारचे वाड्यांत आले. चिराखदान रा. गणपतराव पानशे यांचे वाड्यापासोन उत्तरेकडे सोलापूरकर यांचे वाड्यापर्यंत दुरस्ता दोहीं अंगें व सरकारवाड्यापुढें रस्ता आहे त्या रस्त्यांत समोर दोही बाजूंनीं पुढें रस्ता शंभर हात दक्षिणोत्तर आहे तोंपर्यंत चिराखदान लाविलें. श्रीमंत साबे अंबारींत होते.

---

१ भला माणूस = शिलेदार.

दुसऱ्या अंबारीमध्यें कृष्णाची भवानी होते. तिसरे अंबारींत रा. खंडेराव रास्ते यांचे पुत्र रावजी होते. एकूण अंबाऱ्या तीन. शंभरदीडशे स्वार बरोबर होते. शु. ५ मंगळवारीं प्रातःकाळीं तोफा पन्नास सोडल्या. ×××× कोंकणांत भार्गवरामाचे देवालयापुढें चौघडा होता. खालील मजला दगडी संगीन दुमजला लाकडी होता. खालीं छप्पर होतें त्यास आग लागून चौघडा सोपासुद्धां जळाला. खालीं गाईचीं वासरें होतीं तींही जळालीं. श्रीदेवाचा डोंगर उतरून खालीं जावें तेथें दोल आहे त्यापाशीं श्रीविठोबा-रखुमाईची मुहूर्त होती ती कोणी रात्रीस विच्छिन्न केली."

(१२ जाने. १८०६) "श्रीमंतांची स्वारी कोपरगांवास गेली. स्वारीबरोबर पुरंदरे, उभयतां रास्ते व अक्कलकोटकर व श्रीमंत रा. गणपतराव बापूसाहेब वगैरे मिळून गणतीचे हजार स्वार व रूपराम चौधरी यांचें पायदळ पांचशें आहे. शिवाय गोखलेकडील हजार स्वार व हजार पायदळ स्वारीबरोबर आहे."

(१६ जाने. १८०६) "श्रीमंत कोपरगांवास गेले. तेथें कांहीं भिल्लांचा उपद्रव जाला. त्याजवरी अक्कलकोटकर राजे व रास्ते यांची रवानगी जाली आहे. आनंदराव खासगीवाले यांच्या उभयता चिरंजीवांत कलह लागला होता. त्यास धाकटे चिरंजीव याणीं सरकारांत फिर्याद होऊन केशवराव म्हणोन वडील बंधु यास कैद करोन सिंहगड किल्यावर घातलें. रा. बापू फडके यांस समाधान नव्हतें. त्यास पौष वद्य १० भौमवारीं दोनप्रहरीं काळ जाला.'

(१४ मार्च १८०६) "कै. रंगराव राजेबहादर यांचा दौलतीची कुल किल्ले व सरंजामी महाल व नाशिकांतील वाडा वगैरे दौलत जप्त करोन राजेबहादूर यांच्या दौलतीचा बंदोबस्त जप्तीसुद्धां त्रिंबकजी डेंगळे याजकडेस पेशव्यांनीं सांगितला."

(२७ मार्च १८०६) "श्रीमंतांची स्वारी नाशकाकडेस गेली. तेथें एक स्वारींतील हत्ती मेला. तेथून त्रिंबकेश्वरास स्वारी गेली. तेथें एक हत्ती

मेला. एकूण दोन हत्ती शिरा चांगले मेले. श्रीमंतांची स्वारी पुण्यास चैत्र शुद्ध २ शनिवारीं आली. ते दिवशीं झाडून सरदार व मुत्सदी व कारभारी वगैरे सर्वांनीं वकील सुद्धां योग्यतेप्रमाणें नजरा केल्या. नंतर दुसरे दिवशीं छ. ३ रविवारीं कारभारी याणीं शहरांतील झाडून सावकार व उदमी लोक यांजकडे शिपाई पाठवून श्रीमंतास नजरा सावकाराकडून मातबरीप्रमाणें करविल्या. स्वारी येथें आल्यावर चैत्र शु. ५ श्रीमंतानीं सदाशिव माणकेश्वर व जीवनराव सुमंत व देवराव हिंगणे व कृष्णाजी भवानी यांस बोलावून आज्ञा केली जे, खासा स्वारी चैत्र शु. १३ निघोन सासवडास जाऊन तेथून वाईस जाऊन वैशाख वद्यांत पुनः कोपरगांवास जाऊन द्वितीय लग्न करावयाचें. त्यास पसतीस हजार रुपये सरकारांतून घेऊन कोपरगांवीं तीन मंडप दुमजला चौरस चाळीस खणांप्रमाणें मजबूद तयार करावे. कदाचित् जेष्ठ मासाचा पाऊस तरी मंडपावरी खपरेल कौली असावें. याप्रमाणें मांडव जलद तयार करावे म्हणोन आज्ञा केली. ××× नवरी मूल एक तिंच आईबापासुद्धां श्रीमंतांनीं तिचे आईबापासुद्धां स्वारी बरोबर ठेविली आहे."

(२५ एप्रिल १८०६) "उभयतां श्रीमंतांमध्यें (बाजीराव व धाकटे बंधु चिमाजीअप्पा यांमध्यें) परस्परें अति चित्तशुद्धता नाहीं. त्रितीयेचीं श्राद्धें परस्परें निराळीं होऊन धाकटे श्रीमंत प्राचीन वाड्यांत आहेत. त्यांच्या मुदबख सुद्धां खर्चाची बहुत तंगचाई होऊन एक पालखी व दोन कोतवाल घोडीं व पांच सात प्याद्यांनिशीं शहरांत हरकोठें स्वारी जाती. लहान मोठे सरदार व मुत्सदी, लहान थोर कारभारी सुद्धां नव्या वाड्यांत येतात. खासे श्रीमंत आंत असतात. तेथें हरकोणी शागीर्द व खिजमतगार विनंती करतात जे, बाहेर लहान मोठे मुत्सद्दी व कारभारी आले आहेत. त्यास नमस्कारास आज्ञा जाल्यास येतील. अशी विनंती केली असतां सर्व सरदार व मुत्सद्दी यांस गालिप्रदानें होऊन हरकोणास नमस्कारास परवानगी होत नाहीं. रात्रंदिवस स्वारी जनान्यांत असती. कुलदौलतीचा कारभार व एखत्यारी त्रिंबकजी डेंगळे व आणखी चार असामी खिजमतगार आहेत यांजवर आहे. ते म्हणतील तें सर्वांस मान्य याप्रमाणें येथील वर्तमान आहे."

(२९ एप्रिल १८०६) "कारभारी व मुत्सद्दी यांचे घरीं श्रीमंतांस मेजवान्या होतात. त्यांस जवाहीर व पोषाख श्रीमंतास द्यावा लागतो. त्याचा खंडच होऊन नगदी ऐवज खासगीस हालीं शिक्का पावता करावा लागतो. याप्रमाणें शिरस्ता पडोन सरकारचें जवाहीर व पोषाख आणोन दिल्हे म्हणजे मेजवानी होते. ××× रा. बळवंतराव नागनाथ अपंक्त दासीच्या दोषेंकडून होते. ते वैशाख शु. ५ स श्रीमंत मशारनिल्हे यांचे घरीं जाऊन पांक्तिपावन केलें."

(२८ जून १८०५) "पुंडलीक नाईक रास्ते वाईकर यांचे नातवाची कन्या आणून तिजला जानवसा नानावाडा दिला. मंगळवारीं साडेसहा घटकांपूर्वी रात्रीं लग्न झालें. बुधवारीं सहा घटका पहाटेची गृहप्रवेश थोरल्या वाड्यांत केला. नंतर दोन घटकांनीं उभयतां शुक्रवारचे वाड्यात गेले. तेथें घटकाभराहून बाईसाहेब नानाचे वाड्यात रात्र कांहीं असतां आली. श्रीमंत प्रातःकाळीं आले. गुरुवारीं सुन्मुख जालें. आज सहा घटका पूर्व रात्रीस वरात समारंभें वाड्यांत जाणार. वाड्यासभोंवतें चिराखदान पणत्या वासे मारून ठेवल्या आहेत. आहेर सर्वत्रांचे घेतले."

(१९ जुलै १८०५) "श्रीमंतांची स्वारी पुणेयाहून जेष्ठ शु. द्वितीयेस वाईस आली. चि. रा. शामरावबाबा स्वारीसमागमें आले आहेत. गोखले वगैरे सरदार दोन हजारांचा जमाव बरोबर आहे. श्रीमहाबळेश्वरास गेले होते. माहुली सातारियास जावयाची बोलावा आहे. ××× औषधाकरितां कुंडलीच्या मुळयांचें प्रयोजन आहे. जरूर मिळवून पाठवाव्या म्हणोन लिहिलें. त्यास कुंडलीच्या मुळया वजन पक्के ८८१८९ एक शेर अदपाव पाठविल्या आहेत."

## ३ साक्षात्कार—चमत्कार—

(१६ आगष्ट १८०४) "शिवनेरी किल्यावरती श्रीशिवाईदेवी होती. तेथील पहिले डोंगरास भुयार होतें त्यांत देवी होती. त्यास तेथें देवीचे नवसाबद्दल व यात्रेबद्दल डबीचा ऐवज जमला होता. सरकारपरवानगी घेऊन किल्लेदार याणीं आणखी भुयार कोरून लांबी रुंदी दोन चार खणांची जागा काढून सिंहासन वगैरे डोंगरास कोरून काढलें. देवी

काढून तेथील तेथेंच पांच सद्दा हातांवर ठेवली होती. स्थापना करीत होते. तेव्हां दृष्टांत जाहला, माझे इच्छेस येईल तेव्हां बसेन. स्थापना करीत होते तैसीच राहिली. नागपंचमीचे दिवशीं मध्यान रात्रीस किल्यावर नौबत वाजली. तेव्हां किल्लेकरी व हवालदार चौकशी करून चोहोंकडे पाहूं लागले. हवालदार यास दृष्टांत जाला जे, माझी मी आपले स्थानास बसले. उजाडल्यावर पाहूं लागले तों कोठें कांहीं नाहीं. देवीचे देवळास कुलपें असतां नवी जागा केली होती त्या सिंव्हासनावर देवी सर्वत्रांनीं पाहिली. येथून कारकून पाहावयास गेले आहेत. शास्त्री पंडीत बसोन येविशीं शास्त्रार्थ होत आहे."

(जुलै १८०४) "कृष्णजी समर्थ यांचा सेवक केदारजीबावा यास देवाजींनीं भविष्य सांगितलें जे, राज्य खलबलेल. राज्यामध्यें बंद नाहीं. प्रजा पिडून बहुत क्लेशांत पावली. सबब देवानीं कृपाळू होऊन अवतारपुरुष निर्माण जाला आहे. नेमणूक इस्तकबिल श. १७२५ वैशाख शु. १ तहत शके १७२६ पौष शु. १ एकूण एकवीस महिने उपोषण जालें आहे. त्यांत बारा महिने जाले. बाकी नऊ महिने पौष शु. १ होणार. नंतर एकवीस रोज तपश्चर्या होणार व राजसूय यज्ञ होणार. एकवीस कवस्या आणोन आंत तेल घालून पाप पृथ्वींतील जाळून भस्म जाहलें. नंतर राज्याचा बंदोबस्त होऊन एकछत्री राज्य चालेल. श्रीकृष्णजींनीं साक्षात्कार भेटून सांगितलें आहे."

(११ मे १८०४) "पहाटेच्या दोन घटका रात्रीस तारा मोटा पडला. सर्वांनीं पाहिला. चंद्रोदय झाला असा प्रकाश पडला. त्याची शांत वाड्यांत करणार आहेत."

(१५ आगष्ट १८०४) "गोविंदराव परांजपे श्रीमंतांचे माऊसभाऊ यांस आषाढ व. ५ स्वारी कोथरूडास गेली तेव्हां समागमें गेले होते. नंतर नित्यनेमाचीं देवदर्शनें घेऊन वाड्यांत आले. नंतर फराळ, नंतर सोंगट्या खेळावयास बसले. मध्यान रात्रीस निजावयास गेले. दोन घटका निद्रा जाहल्यावर अंगाची आग होऊं लागली. खिजमतगार याणें वारा घातला. आग न राही. चौफाळ्यावरोन खालीं उतरोन कासोटा

घातला. जवळ बसले तों मान सावरेनाशी जाहली. स्त्री व मंडळी येतात तों बाबांचा काळ जाला. श्रीमंतांस तीन दिवस अवरोध होता."

(१६ आक्टो. १८०४) "अलगुरच्या फकिराचा अंगारा दोन वेळां पाठविला होता. पावलाच असेल. प्रकृती कशी आहे ती लिहावयास आज्ञा करावी. फकीर विचारीत होता कीं, अलीकडे प्रकृती कशी आहे? यास्तव सेवेशीं लिहिलें आहे. तर अंगारा तेथें पावल्यानंतर प्रकृती लिहावयास आज्ञा जाली पाहिजे. कवठें चार सेवेशीं पाटविलीं आहेत."

## ४ दुर्भिळ वस्तु—

(१५ सप्टेंबर १८०४) "पेशजी संग हसमाचा (?) कबजा एक व मोहोनाळ नेच्यार्चे एक एकूण दोन दागिने सेवेशीं पाठविले आहेत. हल्लीं औरंगाबादेहून संगीन जिन्नसाना[1] आणविल्या आहेत. त्यास ऐना व प्याला व बिचव्याचीं कबजें याप्रमाणें आलें आहे. त्याची किंमत पक्की ठरावून सेवेशीं पाठवून देतों. दिल्लीहून नरगपचे (?) कांदे आणविले आहेत. स्फटिक दगडाविशीं काश्मिरास माल खरेदीस गोसावी गेले आहेत. येथेंही शोधांत आहे."

(२२ सप्टें. १८०४) "दोन घडयाळें मुंबईस दिलीं होतीं. त्यांपैकीं धाकटें मात्र नीट होईल. थोरले घड्याळाची किंमत तेथील इंग्रज वीस रुपये करतो. आणि नीट करावयास वीस रुपये मागतो. असा प्रकार आहे. तें नीट होत नाहीं."

(१९ नोव्हें. १८०४) "औषधास शिलाजित पाहिजे. तर डबा पाटविला आहे. हा भरोन पाटविणें म्हणोन आज्ञा. त्यास शिलाजित इकडील डोंगरांत नाहीं. सह्याद्रीनजीक मोटा पर्वत आहे. तेथें कडा तुटला आहे. त्या कड्यास होत असतो. तेथें शहाणा गडी रुपये देऊन पाठविला. रुपयास तोळा एक याप्रमाणें चार तोळे मिळाला तो पाट-

---

१ जिन्नस याचें अनेकवचन जिन्नसाना.

विला आहे. वाण्याच्या दुकानांत मिळतो त्यांत भेळ असते. हा चांगला आहे. नीट चवकशी करोन पाठविला आहे."

(२८ डिसेंबर १८०४) "कावळी वेलाचीं मुळें व मोरवेल ऐसे औषधाकरितां पाहिजे. इकडे मिळत नाहींत तर तिकडे तलास करोन पाठविणें म्हणोन आज्ञा. आज्ञेप्रमाणें कावळीवेल व मुळें व मोरवेल ऐसीं पाठविलीं आहेत."

### ५ पुण्यांत महागाईचा हाहाःकार--

(११ जुलै १८०४) "येथें साडेतीन शेराप्रमाणें दाणा मिळत होता. सरकारांतून एक पायली विकावी ऐसी आज्ञा जाली. त्यावरोन दोन अडीच शेर दर जाला. नंतर सरकारांतून मारवाडी व वाणी यांचे मार्गे प्यादे लाविले. कोठे कांहीं जबरदस्तीनें फोडले. तो दाणा हुजरे खिजमतगार सरकारचे यांणींच नेला. गरीबास व इतरास दाणा मिळाला नाहीं. वाण्यास हाणमार केली. आज चार रोज दाणा कोंडा देखील मिळत नाहीं. लोक रस्तोरस्तीं पैका घेऊन फिरतात. एक जागा कोठ्यावर मारामार जाली. तेथें दोन माणसें उडविलीं. हाहाःकार जाला आहे. माणसें बहुत मरतात. गल्लींतून पहावत नाहीं. अद्यापवत् धारणेचा बंद नाहीं. उदईक तीन शेराची व्हावी अशी बोलवा आहे. दुकानीं दुकानीं प्यादे बसले. दुकानें रिकामीं आहेत. कहर जाला आहे."

(१५ जुलै १८०४) "शहरांत महर्गता बहुत जाली. यामुळें त्रिंबकजी डेंगळे खिजमतगार याणें श्रीमंतांस विनंती केली कीं, मला आज्ञा जाल्यास पांच शेरांची धारण करवितों. सरकारची त्यास आज्ञा जाली. त्यानें झाडून मारवाडी वगैरे जेथें जेथें गल्याचे कोठे होते तेथें जप्ती करोन आपल्या लग्याचे होते त्यास दाणे घालून घरें भरलीं. वरकड गोरगरीबांस आज पांच दिवस दाणा मिळत नाहीं. हातीं रुपये घेऊन प्रातः-काळपासोन फिरावें सायंकाळीं परत यावें अशी अवस्था ब्राह्मणांची. शूद्र मंडळी तीन दिवस कुटुंबाचीं कुटुंबें उपाशीं. कोणी लगट करोन कोठ्यावर गेल्यास मार खाल्ले. एक दोन ठारही जालीं. सारांश ईश्वरें नेत्र झाकिले."

(१६ जुलै १८०४) "सरकारांतून प्रेत्न होत तितका केला. परंतु

पायलीप्रमाणें धारण जाली नाहीं. आठ रोज हाहा:कार झाला. मग जशी मर्जी असेल तसें विकण्याविशीं सरकारची आज्ञा जाली. त्यावरोन काल दुकानें उघडलीं. उकडे तांदूळ कोंडा नासका सवादोन शेर भाव पडला. जोरी बाजरी मिळतच नाहीं. माणसें बहुतच मरतात."

(७ आगष्ट १८०४) "आज शिध्याचे ब्राह्मण दहा पंधार हजार फिरोन आले. शिधा सहा घटका दिवसास सरला. कवाडें शिध्याच्या दरवाज्याचीं लावलीं. गांवांतून शिधा जाई तों अस्तमान जाला. तेथें तोफा पांच जाल्या. ब्राम्हण सोडले. बाकी ब्राम्हण तसेच फिरोन आले. यंदा महगीता त्यामुळें ब्राम्हण निकड शिधा घेण्यास करतात. दरवाजावर दाटी बहुत होते. मारामार करतां आज तीन दरवाज्यांवर पांच ब्राम्हण मृत्यु पावले. काल एक श्रीदत्ताचे दरवाजास प्रथमच मृत्यु पावला. शिध्याचा कारभार त्रिंबकजी डेंगळया खिजमतगार याकडे सांगितला आहे.

(७ आगष्ट १८०४) "हल्लीं धारण रुपयास ८॥ दर ।-॥ याप्रमाणें सव्वाशेर, अदपाव कमदीड शेर याप्रमाणें आहे. हाहा:कार जाला आहे. माणसें बहुत मरतात. श्रावण मासचे शिध्यास प्रारंभ शु. १ सोमवारीं अठरा घटकांनंतर जाला. दक्षणेचे दिवशीं फुटाणे देतात. चाल आहे. यंदा हरभरे नाहींत. यास्तव अदपाव खोबरें व अदपाव साखर देणार."

(१० आगष्ट १८०४) "यजमानसाहेबांचें चित्त प्रजापालन करोन सर्वांचें संगोपन करावें हें प्रजेचें सुकृत दिसत नाहीं. × × × येथें गोरगरिबाची दाद नाहीं. प्राचीन चाल राहिली नाहीं. नूतन पर्याय आहेत. धान्य सव्वाशेर दीड शेर भाव आहे. परंतु मिळत नाहीं. उकडे तांदूळ मात्र मिळतात. श्रावण मासचे खिचडीकरतां उदग्याजवळचे तांदूळ जबरदस्तीनें घेतले. दक्षणेचे दिवशीं फुटाणे द्यावयाचे त्यास खोबरें व साखर द्यावयासी खरेदी केली आहे. टोपीकरास राज्यलाभ दिसतो. तदनुसार मुख्यास वांच्छा होती हें बहुत वाक्यता आहे."

### ६ पुणें दरबार आणि राजकीय घडामोडी—

(१ जुलै १८०४) "दिवाण व मोघी यांचें वांकडें आहे. दिवाण व

देशमुख वांकडे आहेच. डेंगळे मध्यस्थी करतात. खलबतांत क्लोज, दिवाण, मोधी व पेशवे. पांचवा नव्हता. अलीकडे डेंगळे घेऊं लागले त्यामुळें दिवाण व इंग्रज नाराज आहेत. गंगाधरशास्त्री आले त्यांचा बंदोबस्त करोन द्यावा असें दिवाण व इंग्रज यांचें म्हणणें. सरकारच्या तें मनांत येत नाहीं. आंत आंत राजकारण अगदीं विघडलें."

(नोव्हें.–दिसें. १८०४) " इंग्रजी दोन तरांडी फराशिसानीं नेलीं. पन्नास लाखांचें नुकसान जालें. मुंबईस सातशें घरें पाडणार. लढाऊ सामानाची तरतूद होत आहे."

(२ दिसें. १८०४) " इंग्रजांचीं दोन तरांडीं मुंबईस येत होतीं तीं फरांचिसांनीं नेलीं. चाळीस पन्नास लाखांचा माल गेला. किल्ल्यानजीक घरें होतीं तीं मोडून लढाऊ सामानाची तरतूद होत आहे. याप्रमाणें वर्तमान आहे."

(३० आक्टो. १८०४) "रा. यशवंतराव होळकर यांजकडील वकील रा. आनंदराव होळकर व दाजी भैराळ व महिपतराव असे येथें वकिलीस आहेत. त्यास कलुपांनीं सरकारांत विनंती केली जे, होळकराकडील वकिलांनीं येथें असों नये. त्यावरोन श्रीमंतांनीं होळकराकडील वकिलांस आज्ञा केली जे, तुम्ही निघून जावें. त्यावरोन दिवाळी करोन निघोन जाणार. रा. मोरोबादादा फडके व माधवराव फाळके यांस सरकारांतून आज्ञा जाली जे, तुम्ही येथें राहूं नये. त्यावरोन ते वाईस गेले. रा. आबा काळे यांस आज्ञा जाली जे, तुम्ही वाडयांत व शहरांत राहूं नये. त्यावरोन ते कुटुंबसुद्धां जाणार."

(१६ आक्टो. १८०५) " रा. आनंदराव भाऊ (हुपरीकर) यांजकडे कर्नाटकचा सरसुभा झाडून कित्तूर तालुक्यासुद्धां जाला. सनदा होऊन मशारनिल्हेकडे रवाना जाल्या. त्याचे वकिलांनीं राजश्रियाविराजित हा किताब व अंबारीसहित हत्ती व मुतालिकी शिक्के याविशीं बहुतां प्रकारें यत्न केला. परंतु किताब व शिक्के द्यावयाचे नाहींत म्हणोन स्पष्ट उत्तर जालें. हत्तीही देण्याचें अनमान दिसतें."

(१३ जुलै १८०४) " फरांचिस काडकाळ बंदरास आला. किरीटी आणि श्वेतपति राजे पालेली फ्रेंचाकडे फितूर जाले. नरसिंव्ह खंडेराव यांस शिक्के कटयार देऊन फौज उभी करणेस आवाहन जालें. विसर्जन लवकरच होईल !"

(६ एप्रिल १८०५) " दिवाणजी कृश जाले आहेत. क्षयाची भावना आहे."

(२१ जाने. १८०५) " इंग्रजांकडून नवीन वकील आले. एकाचें नांव सेडिघम. दुसऱ्याचें मेजर ग्राम. श्रीमंतांनीं नव्या जुन्या वाकिलांस वस्त्रें दिलीं. दिवाण त्यांचे भेटीस बरोबर दोनशे राऊत, हत्ती एक जिलबेचा, अंबारीचा एक याप्रमाणें अंबारींत बसोन गेले. दिवाणांनीं इंग्रजांस मेजवानी केली."

(आक्टो. १८०६) " होळकरांचा वकील खंडोपंत पुण्यास आला. पेशव्यांची भेट जाली. विसाजीपंत लेले यांचा वाडा रहावयास दिला. खंडोपंत व पेशवे यांचे भेटीचा मंत्र बाहेर फुटत नाहीं. खंडोपंत याचे जाबसाल समजत नाहींत."

(३१ मार्च १८०९) " शिंदे जयपूरप्रांतीं आहेत. मुख्य सर्जेराव बापू व मामा आंगरे व अंबोजी इंगळे व देवबा काळे व केदारजी हुजरे व बाळोजी कुंजर व बापू निंबाळकर व बाबा पाटणकर हे कारभारी आहेत."

(३१ मार्च १८०९) " किरीटी रामराजे यानें इंग्रजी वकील ठार मारला. कोचीन बंदर घेतलें. इंग्रजांनीं बंदर पुनः घेतलें. राजाला गुन्हा माफ केला."

(१५ मार्च १८०९) " होळकर मुलीचें लग्न इंदुरास माघमासीं करोन हुताशनीकारितां महेश्वरास आले. मीरखान व राजे महिपतराव वऱ्हाडांत जाणार."

(१२ मार्च १८०९) " होळकराचे कन्येचें लग्न माघ व. ३ जालें."

(३१ मार्च १८०९) " होळकर बेआराम आहे. उज्जैनच्या संन्यासी यांजकडून अनुष्ठान करविलें. कांहीं गुण आहे."

(१२ जून १८०१) "अंबोजी इंगळे बेआराम होऊन मृत्यू पावले. धर्मसिंग व रणाजितसिंग यांचें इंग्रजांशीं वाकडें आलें."

## ७ पेशवे आणि इंग्रज--

आतांपर्यंत निरनिराळ्या प्रकारचे उतारे दिले आहेत त्यांवरोन पेशव्यांचा कारभार कसा अव्यवस्थितपणें चालला होता हें दिसून येतें. नाना फडनवीस होते तोंपर्यंत त्यांच्या कारभाराला कांहीं तरी आळा होता. नाना गेल्यावर त्यांचा राज्यकारभार लगाम तुटलेल्या घोड्याप्रमाणें मन मानेल त्या दिशेनें उधळू लागला. स्वतःच्या परिस्थितीची त्यांना कांहींच जाणीव नव्हती. त्यांच्या या वागणुकीनें इंग्रजांची मात्र अतिशय निराशा झाली. होळकराशीं चाललेल्या युद्धांत पेशवे व त्यांचे सरदार यांनीं आपणांस सर्व प्रकारें मदत करावी अशी इंग्रजांची अपेक्षा होती. फितुराचा दुष्ट प्रयोग करून इंग्रजांनीं पूर्वीं शिंद्यांच्या सामर्थ्याचा सहजासहजीं चुराडा उडविला. परंतु होळकरासारख्या हरदमख्याली शत्रूशीं गांठ पडतांच इंग्रजांच्या अकलेची उलटी अंबारी झाली. होळकराची मसलत आपणांस आवरत नाहीं असें पाहून इंग्रज उलट पेशव्यांशींच भांडूं लागले. यासंबंधीं पुढील उतारे पहाः--

(२ दिसें. १८०४) "करनेलानें सरकारांत बोलणें लाविलें जे, आजपर्यंत मसलतसंबंधें आम्हांस खर्च जाहला आहे, त्याचा आकार करोन सरकारांतून वसूल करोन द्यावा. होळकराशीं तह करोन आम्हांस निरोप द्यावा. त्यावरोन श्रीमतांचें बोलणें पडलें जे, तुमची भाईदारी आम्हीं केली जे तुम्हीं बंडाचें ( होळकराचें ) पारिपत्य करोन राज्याचा बंदोबस्त करावा. हा करार असतां तुम्ही मुलूख लिहून मागतां आणि तह करोन जावें म्हणतां हें बोलणें परिच्छिन्न ठीक नाहीं. होळकराशीं तह करावयाचा नाहीं. त्याचें तुम्ही पारिपत्यच करावें. इंग्रजांचें म्हणणें जे--पन्नास हजार फौज तुम्ही आम्हाबरोबर द्यावी हा करार असतां ती कोठें आहे ? हुजुरचें म्हणणें जे-- जीं पथकें आहेत तीं तुमच्या स्वाधीन केलीं आहेत. आम्हापाशीं एवढी फौज असती तर आम्हीच बंडाचें प्रारिपत्य केलें असतें."

(१० जुलै १८०५) "कलुषानें श्रीमंताशीं बोलणें केलें जे, तुमच्या

भरंवशावर आम्ही पैकयानें, सरंजामानें व फौजेनें खराबींत येऊन कुंपणीचे इतराजींत आलों. त्यास साहेबीं फौज ठेवून होळकराचें पारिपत्य करावें. नाहीं तर होळकराशीं तह करावा हें चांगलें. त्यावरोन श्रीमंतांनीं उत्तर केलें जे— तुमच्यानें होळकराचें पारिपत्य होत नाहीं असें तुम्ही सांगितलेवर पुढें जसें आम्हास कळेल तसें आम्ही करूं. येणें करोन कलुष बहुत [1]अर्जुदे आहेत.

होळकराशीं चाललेल्या युद्धाचे बाबतींत पेशवे आणि इंग्रज वारंवार कसे जिकीरीला येत आणि दोघांमध्यें कशी हमरीतुमरी चाले याचे दोन नमुने वर दिले आहेत. पेशव्यांजवळ विशेषशी फौज नव्हती. नरसिंगराव अन्या विंचूरकर यांचे मार्फत त्यांनीं नवीन पांच चार हजार फौज उभी केली होती. त्याशिवाय हुजरातीपैकीं कांहीं किरकोळ पथकें त्यांच्याजवळ तयार होतीं. पेशव्यांनीं ही सर्व फौज इंग्रजांच्या स्वाधीन आगाऊच केली होती. इंग्रजांनीं कितीही जिकीर लावली तरी पेशवे त्यांना आणखी फौजेची मदत देणार कोठून ! होळकराची मसलत चिघळत चालली आहे, होळकराला शक्य त्या सवलती देऊन पेशवे आणि होळकर यांचा समेट करून द्यावा असा इंग्रजांचा विचार होता. परंतु ती गोष्ट पेशव्यांना कधीं पटण्यासारखी नव्हती. आपण विठोजीचा खून करविला आहे आणि शिंद्यांनीं मल्हाररावाचा खून केला आहे, होळकर जिवंत राहिला तर तो आपला सूड घेतल्याशिवाय राहणार नाहीं, असें पेशव्यांना भय वाटत होतें. अशा स्थितींत कांहीं झालें तरी होळकराशीं तह करावयाचा नाहीं, त्याचा तुम्ही नाशच करा, असा पेशव्यांचा इंग्रजांमागें सक्त तगादा होता. राजकीय परिस्थिति अशा स्वरूपाची होती त्यामुळें होळकराच्या युद्धाचा कांहींतरी सोक्षमोक्ष लावल्याशिवाय इंग्रजाना गत्यंतर उरलें नाहीं.

मराठी स्वराज्याच्या स्वातंत्र्याकरितां होळकरानें प्राण पणाला लावून इंग्रजांशीं युद्ध चालविलें होतें. अशा त्या युद्धांत एकाही मराठ्यानें होळकराच्या बाजूनें हत्यार उपसलें नाहीं. उलटपक्षीं सर्व मराठी राज्याचे खावंद

---

१ असंतुष्ट.

जे पेशवे ते सर्वस्वी ताब्यांत असूनही इंग्रजांना मराठी राष्ट्राकडून कांहींच मदत मिळूं शकली नाहीं. होळकर आणि इंग्रज हे एकमेकांशीं एकाकी लढत होते. तथापि दोघांचाही युद्धोत्साह अमर्याद होता. अशा स्थितींत उत्तर हिंदुस्थानांत चाललेल्या या युद्धांत कशा घडामोडी घडत होत्या आणि जयापजयाचे चढउतार कसे घडत होते हें आतां कथन करावयाचें आहे.

युद्धामध्यें आपल्या व शत्रूच्या बलाबलाचा विचार मुख्यत्वें पाहावा लागतो. स्वतः यशवंतराव होळकर आणि इंग्रजांचा सरसेनापति जनरल लेक हे दोघेही खरोखर फार मोठे युद्धविद्याविशारद होते. शत्रूचें बळ कशांत आहे हें एकमेकांना पूर्णपणें समजत होतें. इंग्रजांचें मुख्य बळ कवायती पलटणें आणि तोफखाना यांत आहे हें जाणून होळकर इंग्रजांशीं मैदानांत लढण्याच्या भानगडींत सहसा पडत नसे. तो नेहमीं इंग्रजांशीं गनिमी काव्यानें लढत असे. डीगच्या लढाईत होळकरानें इंग्रजांशीं मैदानांत लढाई दिली तींत त्याची कशी त्रेधा उडाली हें पूर्वी सांगितलेंच आहे. उलटपक्षीं गनिमी काव्यानें लढून होळकरानें इंग्रजांची कशी वेळोवेळ त्रेधा उडवून दिली हेंही पूर्वी आम्हीं सांगितलेंच आहे. होळकराच्या युद्धनीतीचा विचार करून जन. लेक यानें आपले युद्धाचे दोन मार्ग ठरविले— ( १ ) होळकराला शक्य ते उपाय करून मैदानांत लढाई देण्यास भाग पाडणें. हा इंग्रजांचा पहिला मार्ग होता. वर्षभर उद्योग करूनही इंग्रजांना या क़ामीं यश आलें नाहीं. मैदानांत होळकर इंग्रजांपुढें उभा राहिला असता तर इंग्रजांनीं हां हां म्हणतां त्याचा चुराडा उडविला असता. परंतु होळकराच्या धूर्तपणामुळें इंग्रजांचा हा डाव फसला. वर्षभर युद्ध चालवून शेवटीं इंग्रजांनाच शत्रूच्या गनिमी काव्याचा वेळोवेळ मार खावा लागला. त्यामुळें इंग्रजांनीं शेवटीं हा पहिला मार्ग सोडला. ( २ ) होळकराच्या आश्रयस्थानांचा नाश करणें हा इंग्रजांचा दुसरा मार्ग होता. गनिमी काव्याचें युद्ध हें मुख्यत्वें स्थानिक लोकांच्या सहानुभूतीवर अवलंबून असतें. रजपूत, जाठ, बुंदेले, रोहिले, पठाण वगैरे सर्व स्थानिक लोक होळकराला अनुकूल होते. त्यामुळेंच होळकराला गनिमी काव्याच्या युद्धांत वेळोवेळ यश मिळवितां आलें. होळकराला मदत करणाऱ्या ठिकाणांचा नाश करावा म्हणजे तो सहजच उघडा पडेल आणि मैदानांत लढाई

देणें त्याला भाग पडेल असा इंग्रजांनीं आपल्या युद्धनीतीचा नकाशा ठरविला आणि त्या दृष्टीनें ते ताबडतोब उद्योगास लागले. भरतपूरचा राजा रणजितसिंग जाठ हा होळकराचा पुरातन मित्र आहे, त्याचीच मदत होळकराला मुख्यत्वें होत असते, हें जाणून इंग्रजांनीं जाटांचा डीगचा किल्ला यापूर्वींच घेतला होता. यानंतर इंग्रजांनीं भरतपूरच्या बळकट किल्ल्याला वेढा घालण्याचा निश्चय ठरविला.

**भरतपूरचा वेढाः—**भरतपूर हें एक त्या काळचें अत्यंत बळकट आणि सात आठ मैल घेराचें तटबंदीचें शहर होतें. शहराभोंवतीं रुंद आणि उंच मातीचा तट होता. तटामध्यें जागजागीं चौफेर बुरूज बांधलेले असून त्यांवर तोफा डागलेल्या होत्या. तटाभोंवतीं चौफेर रुंद आणि खोल खंदक होता. शहरांत जाठांचें आणि होळकराचें सैन्य युद्धाची कडेकोट तयारी करून सज्ज होऊन राहिलें होतें. होळकरानें आपलें पायदळ फक्त शहरांत ठेविलें होतें. स्वतः होळकर तीस चाळीस हजार घोडेस्वार घेऊन शहरापासून थोड्याशा अंतरावर तळ देऊन राहिला. इंग्रजांचा भरतपूरचा वेढा यशस्वी झाला तर आपणावर आणीबाणीचा प्रसंग गुदरेल हें ओळखून होळकरानें मीरखान बुंदेलखंडांत होता त्याला आपणाकडे बोलाविलें. त्याच्या हुकुमाप्रमाणें मीरखानानें बुंदेलखंडांतून तळ हालविला आणि गंगा आणि यमुना ओलांडून तो एकाएकीं रोहिलखंडांत शिरला आणि इंग्रजांचा मुलूख उद्ध्वस्त करूं लागला. त्याच्या पाटलागावर इंग्रजी फौजही

**१८०५ जाने.–फेब्रु.**

ताबडतोब रोहिलखंडांत गेली. पठाण इंग्रजी फौजेला झुकांड्या देत सुमारें महिनाभर त्या प्रांतीं फिरत होता. आपल्या पाटलागावर मोठी इंग्रजी फौज रोहिलखंडांत येईल आणि त्या मानानें भरतपूरचा वेढा ढिला पडेल असा पठाणाचा अजमास होता. परंतु तो अजमास चुकीचा ठरला. पठाणाचा रोहिलखंडांत दंगा चालू असतांही जनरल लेक यानें भरतपूरचा वेढा जास्तच नेटानें चालविला. तेव्हां मीरखान शत्रूशीं लढत लढत भरतपुरास येऊन होळकरास मिळाला.

उलटपक्षीं इंग्रजांचा सरसेनापति जनरल लेक यालाही युद्धाची मोठी हिंमत वाटत होती. त्याच्या हाताखालीं फार मोठी इंग्रजी फौज एकत्र

झाली होती. शिवाय इंग्रजांजवळ तोफखाना आणि इतर रणसाहित्य यांचा भरपूर पुरवठा होता. होळकराचे घोडेस्वार आणि भरतपूरची मातीची उंच तटबंदी यांची इंग्रजांना कांहींच पर्वा वाटत नव्हती. डीगच्या लढाईप्रमाणें एकाच लढाईत होळकराच्या घोडेस्वारांना उधळून लावतां येईल, नंतर तोफांच्या भडिमारानें भरतपूरचा मातीचा तट सहज उडवून देतां येईल आणि तें स्थळ सहज काबीज करितां येईल अशी जन. लेक याला हिंमत वाटत होती. इंग्रजी फौजेपैकीं बंगालची फौज प्रथम ता. २ जाने. रोजीं भरतपुरास येऊन दाखल झाली. मागोमाग सर्व इंग्रजी फौज येऊन तिनें भरतपुरास चौफेर वेढा घातला. जागजागीं मोर्चेबंदी करण्यांत येऊन इंग्रजांनीं शहरावर तोफांचा भडिमार चालू केला. शत्रूच्या तोफांनीं शहराची तटबंदी कोठें ढासळली तर जाठ तटाचें तें खिंडार रातोरात बांधून काढीत. शहरांत जाठ आणि होळकराचें पायदळ होतें. त्यांनीं शहराच्या बचावाचें काम अत्यंत शौर्यानें आणि चिकाटीनें चालविलें. तटास खिंडार पाडून आंत प्रवेश करण्याचा प्रयत्न केला तर जाठ व मराठे इंग्रजी फौजेवर बेधडक तुटून पडत आणि हातघाईची लढाई होऊन इंग्रजांचे शेकडों लोक ठार होत आणि त्यांना परत फिरावें लागे. शहराबाहेर होळकराचे हजारों घोडेस्वार होते ते इंग्रजी लष्कराभोंवतीं सारख्या घिरट्या घालीत आणि वारंवार छापे घालून इंग्रजांची त्रेधा उडवून देत. इंग्रजी लष्करापैकीं लहान लहान टोळ्या तावडींत सांपडल्या तर होळकर त्यांची कत्तल करीत असे. होळकराच्या असल्या या गनिमी काव्याच्या युद्धशास्त्रापुढें इंग्रजी पायदळाचा कांहीं उपाय चालत नसे. होळकरानें सर्व वाटा बंद केल्या, त्यामुळें धान्यसामुग्री आणि दारूगोळा यांचा पुरवठा इंग्रजी लष्कराला होईनासा झाला आणि त्या लष्कराची उपासमार होऊं लागली. बाहेरून होळकराचे छापे आणि आंतून जाट व मराठे यांचा प्रतिकार या गोष्टी संभाळून इंग्रजांनीं भरतपुरावर चार मोठे हल्ले चढविले. पहिला हल्ला कर्नल मेटलंड याच्या नेतृत्वाखालीं ता. ९ जानेवारी रोजीं बंगाली पलटणींनीं केला. प्रथमपासूनच इंग्रजी फौजेंत गोंधळ होऊन पुष्कळ शिपाई

**स. १८०५ जाने. ते मार्च**

वाट चुकले, कांहीं खंदकांत पडून बुडून मेले, कांहीं तटाच्या खिंडारा-जवळ गेले तेथें त्यांची जाटांनीं कत्तल केली. या पाहिल्या हल्ल्यांत कर्नल मेटलंड हा प्रथमच ठार झाला, शेकडों लोक ठार व जखमी झाले आणि हा पाहिला हल्ला फसला. शहराच्या तटाला पूर्वीपेक्षां मोठें खिंडार पाडून जनरल लेक यानें स्वतःच्या देखरेखीखालीं ता. २० जाने. रोजीं

स. १८०५ जाने.–मार्च

दुसरा मोठा आणि निकराचा हल्ला चढविला. या दुसऱ्या हल्ल्यांत इंग्रजी फौजेचें भयंकर नुकसान झालें. खंदकाच्या पाण्यांत बुडून शेकडों लोक ठार झाले. पुष्कळ इंग्रज ऑफिसर आणि पलटणाचे शिपाई धडाडी करून तटाच्या खिंडारांत शिरले. तेथें जाठ व मराठे यांशीं गांठ पडून भयंकर हातघाई होऊन शेकडों इंग्रजी ऑफिसर आणि शिपाई नाहक मारले गेले. सारांश, इंग्रजी फौजेचा हा दुसरा हल्लाही फुकट गेला. जाठ व मराठे यांच्या शौर्यापुढें इंग्रजी पलटणें दिवसेंदिवस बेहिंमत होत चाललीं. विशेषतः इंग्रजांच्या गोऱ्या पलटणांनीं शत्रूची भयंकर धास्त घेतली. अशा स्थितींत मुंबईच्या पलटणांनीं धडाडी करून भरत-पुरावर ता. २० फेब्रु. रोजीं तिसरा हल्ला केला. या तिसऱ्या हल्लयांत मेजर जनरल जोन्स हा पुढारी होता. तिसऱ्या हल्ल्याला सुरवात होतांच बंगाली पलटणांनीं आयत्या वेळीं हातपाय गाळले. बंगाली फौजेपैकीं दोन गोऱ्या पलटणी आणि दोन काळ्या पलटणी यांनीं लढाई करण्याचें साफ नाकारून हत्यारें खालीं टाकलीं. अशा स्थितींतच मुंबईच्या पलटणांनीं तटावर हल्ला केला. तेथें शेकडों लोक ठार व जखमी होऊन हा तिसरा हल्लाही परत फिरला. दुसरे दिवशीं बंडखोर पलटणें एकत्र करून त्यांपुढें जनरल लेक यानें वरिष्ठांचें भाषण केलें आणि ता. २१ फेब्रु. रोजीं चवथा आणि शेवटचा हल्ला करण्यांत आला. या वेळीं जनरल लेक हा स्वतः रणांगणावर हजर होता. आणि त्याच्याच हुकुमाप्रमाणें सर्व हाल-चाली चालल्या होत्या. या हल्ल्यांत इंग्रजी फौजांचें भयंकर नुकसान झालें. तटावरून जाटांनीं तोफांचा मारा केला. त्यामुळें शेकडों शिपाई ठार झाले. पुष्कळ शिपायांनीं प्रेतें तुडवीत पुढें चाल केली. त्यांपैकीं बरेच जण खंदकांत बुडून मेले. शेवटीं कांहीं जण धडाडी करून तट चढूं लागले

तेव्हां जाठांनीं वरून धोंडे आणि दारूचे बाण यांचा भयंकर मारा केला. तेव्हां प्रेतांनीं खंदक भरून गेला. अशी दुर्दशा होऊन हा शेवटचा हल्लाही परत फिरला.

या हल्ल्याशिवाय लहान किरकोळ हल्ले इंग्रजानीं भरतपुरावर पुष्कळच केले. परंतु प्रत्येक वेळीं त्यांची अशी दुर्दशा होत असे कीं, आपल्या फौजेपैकीं जखमी लोकांना रणांगणावर टाकून इंग्रजी पलटणापैकीं गोरे काळे शिपाई जीव घेऊन आपल्या छावणींत परत येत आणि त्यांच्याच देखदेखत जाठ व मराठे या दुर्दैवी जखमी लोकांची कत्तल करीत असत. सारांश, इंग्रजी पलटणाच्या शौर्याबद्दल आणि अजिंक्यपणाबद्दल हिंदुस्थानांत भ्रम पसरला होता तो होळकरानें साफ उडवून दिला. आपणाला वेढा देऊन भरतपूर काबीज करतां येईल अशी आशा जन. लेक याला वाटेनाशी झाली. अशा स्थितींत भरतपूरच्या राजानें दहा वीस लाख रुपये हप्त्यानें देतों असें जन. लेक याला आश्वासन दिलें आणि त्या कोरड्या आश्वासनावरच शेवटीं इंग्रजांनीं संतोष मानला आणि डीगचा किल्ला जाठांना परत देऊन जन. लेक यानें मार्च महिन्याच्या अखेरीस भरतपूरचा वेढा उठविला. याच वेळीं इंग्रजांना प्रतिकूल अशा पुष्कळ गोष्टी इतरत्र घडत होत्या त्यांची माहिती येथें सांगितली पाहिजे.

होळकर आणि इंग्रज यांमध्यें युद्ध चालू असतां शिंदे हे अजागळाप्रमाणें उगीच मध्यें लुडबूड करीत होते. बापूजी शिंदे आणि सदाशिवराव बक्षी हे दोघे सरदार शिंद्यांनीं इंग्रजांकडे मदतीसाठीं पाठविले. हे दोघे शेवटीं होळकराकडे फितूर झाले हें पूर्वी सांगितलेंच आहे. शिंद्यांचें दरबार हें अगदीं अस्ताव्यस्त होतें. पेशव्यांनीं आपल्या पदरचे जुने मुत्सद्दी व सरदार यांचें वाटोळें केलें होतें. त्याप्रमाणें शिंद्यांनींही घाटग्याच्या नादीं लागून महादजी शिंद्याच्या वेळचे आपल्या दरबारांतील जुने मुत्सद्दी व सरदार यांचें उच्चाटण केलें होतें. पुष्कळांची घाटग्यानें निर्दयपणें कत्तल केली होती. तूर्त शिंद्यांच्या दरबारांत सर्जेराव घाटगे, मामा आंगरे, देवबा काळे, केदारजी हुजरे, बाळोजी कुंजर, बाबा पाटणकर आणि बापू निंबाळकर हे कारभारी होते. या सर्वांमध्यें घाटग्याचें प्राबल्य विशेष होतें.

घाटगे म्हणेल ती पूर्वदिशा अशी त्या दरबाराची स्थिति होती. घाटगे हा आतां होळकरांचा दोस्त बनला होता. शिंद्यांच्या दरबारांत मि. जेंकिन्स हा रेसिडेंट म्हणून रहात होता. घाटग्याच्या प्रेरणेवरून शिंद्यांनीं या इंग्रज वकिलाची बेअब्रू केली, त्याचें सामानसुमान लुटून घेतलें आणि त्याला कैदेंत घातलें. नंतर शिंदे बऱ्हाणपुराहून तळ हालवून माळवा प्रांताकडे निघाले. चंबळ नदीवर त्यांचा मुक्काम जातांच त्यांनीं आपली बरीच फौज भरतपुरास होळकरांकडे पाठविली. शिंद्यांची फौज भरतपुरास दाखल होण्यापूर्वींच इंग्रज व जाठ यांमध्यें समेट घडून आला होता. नंतर शिंद्यांची फौज आणि होळकर हे शिंद्यांच्या छावणींत आले आणि शिंदे-होळकरांच्या मोठ्या समारंभानें भेटी झाल्या.

**सन १८०५ एप्रिल–मे**

घाटग्यानें पूर्वीं मल्हारराव होळकराचा खून केला आहे आणि शिंदे हा तर एक निर्बुद्ध खुशालचेंडू माणूस आहे या गोष्टी होळकरास दिसत होत्या. आणि त्याचा दोघांवरही विश्वास नव्हता. महादजी शिंद्यांच्या वेळचा एकच अनुभवी, शहाणा आणि शूर सरदार शिल्लक राहिला होता. तो सरदार म्हणजे अंबोजी इंगळे हा होय. हा गोहद प्रांतीं जहागीर घेऊन यापूर्वींच इंग्रजांकडे फितूर झाला होता.[1] इंगळ्याच्या हरामखोरीबद्दल त्याला शिक्षा करण्याचें सामर्थ्य शिंद्यांमध्यें नव्हतें. तें काम होळकरानें केलें. होळकरानें अंबोजीला पकडून कैदेंत घातलें आणि त्याजकडून पन्नास लक्ष रुपये दंड वसूल करून त्याला सोडून दिलें. होळकर हा विलक्षण कारस्थानी होता. त्यानें लवकरच शिंद्यांचें दरबार ताब्यांत घेतलें आणि घाटग्यास कामावरून दूर करून होळकरानें अंबोजी इंगळ्यास शिंद्यांचा कारभारी नेमिलें. अंबोजीचें शिंद्यांच्या फौजेवर फार मोठें वजन होतें. त्याचा आपणांस चांगला उपयोग होईल असें होळकरास वाटत होतें. नंतर शिंदे व होळकर यांनीं अजमीराकडे मोर्चा वळविला. इंग्रजांशीं नेटानें युद्ध चालवावें आणि त्यांचा पुरता नाश करावा असा होळकराचा हट्ट होता. शिंद्यांच्या पदरचे जुने मुत्सद्दी व सरदार हे सर्व इंग्रजांना प्रतिकूल होते आणि त्यांचा होळकरास पूर्णपणें पाठिंबा होता.

---

१ भाग चवदावा पृ. ७८२३-७८३८.

परंतु आयत्या वेळीं अंबोजी इंगळयानें हातपाय गाळले. तो इंग्रजांशीं समेटाचीं राजकारणें करूं लागला. इंग्रजांशीं लढाई म्हणजे फायदा कांहींच नाहीं आणि लाथांचा मात्र सुकाळ ! ही गोष्ट इंगळे व शिंदे यांना कसची मानवते ? अशा स्थितींत घाटगे आणि जुने सरदार व मुत्सदी यांचा एक पक्ष आणि अंबोजी इंगळे आणि बाळोजी कुंजर आणि पाटणकर वगैरे दरबारी यांचा दुसरा पक्ष असे शिंद्यांच्या दरबारांत दोन पक्ष झाले. त्यांच्या दरबाराची ही डळमळ लक्षांत घेऊन होळकर शिंद्यांच्या लष्करांतून पंजाबांत गेला आणि तेथें त्यानें धर्मसिंग वगैरे शीख सरदारांची इंग्रजांविरुद्ध उठावणी केली. याप्रमाणें आपली बाजू बळकट करण्याचा होळकराचा आटोकाट प्रयत्न चालू होता.

शिंदे व होळकर यांमध्यें समेटाचें राजकारण चालू असतां शिंदे हे एकीकडे इंग्रजांना मैत्रीच्या गोड थापा मारीत होते आणि नाना प्रकारच्या सबबी सांगून आणि लपंडाव लढवून इंग्रजांकडून द्रव्य उकळण्याचा प्रयत्न करीत होते. त्यांचीं हीं कारस्थानें इंग्रजांना पूर्णपणें समजत होतीं. बापूजी शिंदे आणि बक्षी वगैरे फितुरी मराठे सरदार हातांत सांपडले तर त्यांजवर कोर्ट मार्शल करून त्यांना फाशीं द्या असा गव्हर्नर जनरल यांचा जनरल लेक याला सक्त हुकूम आला होता. खुद्द शिंदे आणि घाटगे हातांत सांपडले असते तर इंग्रजांनीं त्यांचीही तीच दशा केली असती. परंतु परिस्थितीपुढें इंग्रजांचा उपाय चालला नाहीं. शिंदे व होळकर एक झालेले पाहून जनरल लेक हा त्यांवर चालून गेला. शिंदे होळकर इंग्रजांसमोर पीच्छेहाट करीत कोट्याकडे परत आले. पावसाळा नजीक आला. यापुढें मराठ्यांचा पाठलाग केला तर आपला नाश होईल असें भय वाटून इंग्रजांनीं छावणी केली. जनरल जोन्स याच्या हाताखालीं मुंबईची फौज टोंक रामपुऱ्यावर तळ देऊन राहिली. कर्नल मार्टिंडेल हा कांहीं फौज घेऊन बुंदेलखंडांत राहिला. बाकीची सर्व फौज आणि तोफखाना घेऊन जनरल लेक हा आग्रा येथें तळ देऊन राहिला.

## ९ इंग्रजांचें धूर्त राजकारण—

इंग्रजांच्या राजकारणांत या वेळीं फार मोठी क्रांति घडून येत होती.

त्यांनीं आतांपर्यंत चढाईचें धोरण स्वीकारिलें होतें. पगारी मैत्रीच्या निमित्तानें जागजागीं प्रवेश करावयाचा आणि संधि सांपडेल त्याप्रमाणें हातपाय पसरून एकेक प्रांत गिळंकृत करावयाचा असें त्यांचें धोरण होतें. या चढाईच्या धोरणाचा पुरस्कार करणारा गव्हर्नर जनरल मार्क्विस वेलस्ली हा अत्यंत खंबीर माणूस होता. त्याला आतांपर्यंत सर्व ठिकाणीं यश आलें होतें. परंतु होळकराच्या लढाईमुळें इंग्रजांच्या राजकारणाला चांगलीच थप्पड बसली. होळकराची मसलत चिघळत चालली, कंपनीचा व्यापार ठार बसला आणि लष्करी खर्चामुळें कंपनीला भयंकर कर्ज झालें असें पाहून विलायतेंत लॉर्ड वेलस्लीविरुद्ध फार मोठी ओरड झाली आणि त्याला कामावरून दूर करून त्याच्या जागीं लॉर्ड कॉर्नवालीस याची नेमणूक करण्यांत आली. हा अत्यंत थंड आणि धोरणी मुत्सद्दी होता. उत्तर हिंदुस्थानांत निर्माण झालेल्या परिस्थितीचा त्यानें सूक्ष्म अभ्यास केला आणि त्यानें सिद्धान्त ठरविले ते असे—( १ ) शिंदे, होळकर, रजपूत, जाठ, पठाण, शीख हे सर्व एकमेकांचे शत्रु आहेत. होळकराच्या मोहिनीमंत्रानें भारल्यामुळें हे सर्व इंग्रजांशीं लढण्यापुरते एकत्र झाले आहेत. युद्ध संपलें तर त्यांची जूट फुटेल आणि आपापसांत भांडणें होऊन सर्वजण आपोआपच दुर्बळ होतील. ( २ ) संघटनाशक्ति हें होळकराचें मुख्य बळ आहे. होळकराशीं तह केला नाहीं तर होळकर व शीख एक होणार. त्यांतच पुढें जाठ, रजपूत, पठाण वगैरे मिळणार आणि नंतर युद्ध मारुतीच्या शेपटासारखें लांबवावें तितकें लांबणार आणि त्याचा परिणाम व्हावयाचा तो होईल. कंपनीचा व्यापार बसला आहे आणि कर्ज भयंकर वाढलें आहे अशा स्थितींत युद्ध लांबलें तर हिंदुस्थानांतील इंग्रजी सत्तेचें उच्चाटण होण्याचा संभव आहे. ( ३ ) शिंदे, होळकर आणि राजेरजवाडे या सर्वांचा लष्करी खर्च भयंकर वाढला आहे. युद्ध थांबलें तर लष्कराच्या देण्यामुळें सर्वांचें दिवाळें वाजेल आणि नंतर त्यांना जिंकण्याचें काम आपणांस पुढें सोपें जाईल. ( ४ ) युद्ध थांबलें तर लष्करचे लोक बेकार होतील आणि नंतर हे बेकार लष्करी लोक कांहीं उद्योग नसल्यामुळें आपापसांत मारामाऱ्या करतील आणि भोंवतालचा प्रांत लुटून उद्ध्वस्त करतील. देशाची ही अराजक स्थिति आपणांस आयतीच

उपयोगी पडेल आणि आपणांस विरोध करण्यास कोणी शिल्लक राहणार नाहीं.

वर नमूद केलेल्या सर्व गोष्टींचा नीट विचार करून लॉर्ड कॉर्नवालीस यानें आपल्या राजकीय धोरणाचा नकाशा ठरविला तो असा—( १ ) या प्रसंगीं नफातोटा आणि मानापमान यांचा विचार न करतां कसेंही करून युद्ध थांबवावें. (२) पगारी मैत्रीच्या तहामुळें वारंवार तंट्याचें मूळ उद्भवतें. सबब परिस्थिति पाहून कांहीं जणांशीं केलेले पगारी मैत्रीचे तह रद्द ठरवावे. ( ३ ) देवघेवीच्या व्यवहारांत तूर्त उदारपणाचें धोरण स्वीकारून भलेपणा घ्यावा आणि स्वस्थ बसावें. स्वस्थता प्राप्त झाली तर आपलें कर्ज फिटेल आणि आपणाला लष्करी सामर्थ्य वाढवितां येईल. स्वस्थतेमुळें शत्रूंची मात्र उलट दुर्दशा होऊन आपापसांतील भांडणांमुळें त्यांचा नाश होईल. ( ४ ) तूर्त राजकीय दृष्ट्या पीच्छेहाट करून कसेंही करून युद्ध थांबवावें. याप्रमाणें लॉर्ड कॉर्नवालीस यानें धोरण ठरविलें. तें अत्यंत धूर्तपणाचें आणि शहाणपणाचें होतें. या धोरणामुळें त्या वेळीं इंग्रजांचा मोठा बचाव झाला. या धोरणालाच कांहीं इतिहासलेखक उदारपणाचें तटस्थपणाचें धोरण ( Liberal non-intervention policy ) असें नांव देतात. या धोरणाची अंमलबजावणी चालू असतां लॉर्ड कॉर्नवालीस हा ता. ५ आक्टोबर १८०५ रोजीं दुखण्यानें मृत्यु पावला आणि त्याच्या जागीं सर जॉर्ज बार्लो हा गव्हर्नर जनरल झाला. यानेंही पूर्वींचेंच धोरण अगदीं कांटेकोरपणानें अंमलांत आणलें. याप्रमाणें इंग्रजांनीं आपल्या राजकारणाची टोपी एकाएकीं फिरविली. त्यामुळें हिंदुस्थानांतील इंग्रजांच्या इतिहासांत ज्या गोष्टी इंग्रजांनीं कधींही केल्या नाहींत अशा पुष्कळ गोष्टी त्यांना या प्रसंगीं परिस्थितीमुळें कराव्या लागल्या.

होळकराशीं लढाई चालू असतां शिंद्यांनीं आणि त्यांच्या सरदारांनीं इंग्रजांचा वेळोवेळ विश्वासघात केला आणि शिंद्यांनीं शेवटीं इंग्रजांच्या वकिलाची बेअब्रू करून ते उघडपणानें होळकराला मिळाले हें पूर्वी सांगितलेंच आहे. पुढें इंग्रजांनीं आपल्या राजकारणाची टोपी फिरविलेली

पाहतांच शिंद्यांनींही आपल्या अकलेची पुनः कोलांटी मारली. त्यांनीं होळकराचा विश्वासघात करून अंबोजी इंगळ्याच्या मार्फत इंग्रजांशीं पुनः मैत्रीचें बोलणें लाविलें. इंग्रजांनीं राजकारणावर नजर देऊन शिंद्यांच्या सर्व अपराधांकडे डोळेझांक केली आणि इंग्रज व शिंदे यांमध्यें ता. २२ नोव्हेंबर १८०५ रोजीं मैत्रीचा नवीन तह झाला. दोन वर्षांपूर्वी इंग्रजांनीं शिंद्यांशीं युद्ध करून त्यांची सर्व बाजूंनीं दुर्दशा उडवून दिली आणि त्यांचा बहुतेक मुलूख जिंकून घेतला. नंतर इंग्रजांनीं पगारी मैत्रीच्या मिषानें आपलीं पलटणें शिंद्यांच्या गळ्यांत बांधलीं हा सर्व मजकूर आम्हीं चवदाव्या भागांत पृष्ठ ७८३७-३८ यांवर सांगितलाच आहे. इंग्रजांनीं शिंद्यांशीं या वेळीं नवीन तह केला त्यांत त्यांनीं शिंद्यांचा घेतलेला मुलूख परत दिला आणि त्यांनीं शिंद्यांशीं ठरविलेला पगारी मैत्रीचा तह रद्द ठरविला. शिवाय इंग्रजांनीं या तहांत शिंद्यांच्या मुलीला इंग्रजी मुलखांत तीन लक्षांची नवीन जहागीर दिली. या प्रसंगीं इंग्रजांनीं नागपूरकर भोसले आणि बडोद्याचे गायकवाड यांशीं ठरविलेले पगारी मैत्रीचे तहही रद्द केले आणि त्यांचा घेतलेला मुलूख त्यांना परत दिला. राजकारणांत न्याय कसा उलटसुलट असतो पहा ! प्राण पणाला लावून युद्ध केलें होळकरानें आणि त्यामुळें फायदा झाला तो मात्र शिंदे, भोसले आणि गायकवाड यांचा ! राजकीय व्यवहारांत असल्या गोष्टी वारंवार घडून येतात.

इंग्रजांनीं एकाएकीं राजकारणांत उलट खाल्ली त्यामुळें जयपूर, जोधपूर, बुंदी, माचोडी, भरतपूर, गोहद वगैरे रजपूत व जाठ राजांची तारांबळ उडाली. सन १८०३ सालीं इंग्रजांनीं या राजांशीं मैत्रीचे तह केले. त्या वेळीं परचक्र आणि मराठ्यांची खंडणी यांचा उपद्रव तुम्हांस कधींही लागूं देणार नाहीं अशीं इंग्रजांनीं या राजांना आश्वासनें दिलीं होतीं. इंग्रजांनीं दोन वर्षांपूर्वी आपणच दिलेलीं आश्वासनें या प्रसंगीं गुडाळून ठेविलीं आणि या राजांना स्पष्ट सांगितलें कीं, तुमचा मराठ्यांशीं तंटा असेल तर तो तुमचा तुम्ही पाहून घ्या. तुमची व आमची मैत्री संपली. आम्हांपासून याउपर तुम्हांस कांहींही मदत मिळणार नाहीं. गोहदच्या राण्याची तर फारच दुर्दशा झाली. महादजी शिंद्यांनीं या राण्याची

जहागीर पूर्वी सन १७८४ सालीं जिंकली होती. पुढें १८०३ सालीं इंग्रजांनीं शिंद्यांशीं तह केला त्यांत शिंद्यांनीं या राण्याची सर्व जहागीर परत द्यावी असा करार ठरला. आतां इंग्रजांनीं शिंद्यांशीं नवीन मैत्रीचा तह केला त्यांत त्यांनीं गोहदच्या राण्याची जहागीर पुनः शिंद्यांना दिली. राण्याचें झालेलें नुकसान लक्षांत घेऊन इंग्रजांनीं आपल्या मुलखांत त्या राण्याला पोटापुरती नवीन थोडीशी जहागीर तोडून दिली. याप्रमाणें गोहदचा राणा आपल्या जहागिरीला कायमचाच मुकला. सारांश, इंग्रजांच्या राजनीतीवर विश्वास ठेवल्यामुळें या रजपूत व जाठ राजांना या प्रसंगीं चांगलीच थप्पड बसली.

हिंदुस्थानांतून इंग्रजी सत्तेचें कायमचें उच्चाटन करावें याबद्दल होळकराचा आटोकाट प्रयत्न चालू होता. परंतु परिस्थितीमुळें त्याला या कामीं यश आलें नाहीं. शिंदे विश्वासघात करून इंग्रजांना मिळाले आणि भरतपूरचा राजाही तूर्त थंड पडला. या गोष्टीचा होळकराच्या मनावर परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. इंग्रजी सत्तेचा समूळ उच्छेद करण्याचा हट्ट त्याला शेवटीं सोडावा लागला. ता. २४ डिसेंबर १८०५ रोजीं शीख सरदारांच्या मध्यस्थीनें होळकर व इंग्रज यांमध्यें तह घडून आला. होळकराचा जिंकलेला सर्व मुलूख इंग्रजांनीं या तहांत परत दिला. शिवाय होळकराच्या मुलीला इंग्रजांनीं आपल्या मुलखांत तीन लक्षांची नवीन जहागीर दिली. या तहानंतर होळकर पंजाबांतून माळव्यांत परत आला आणि होळकर आणि इंग्रज यांमधील हा इतिहासप्रसिद्ध रणसंग्राम समाप्त झाला.

गव्हर्नर जनरल कॉर्नवालिस आणि बार्लो यांनीं एकाएकीं पीच्छेहाटीचें धोरण अंमलांत आणलें ही गोष्ट जनरल लेक याला बिलकूल पसंत पडली नाहीं. इंग्रजांनीं पीच्छेहाटीचें धोरण स्वीकारलें तर हिंदी राजेरजवाडे यांमध्यें कलह निर्माण होतील आणि आपापसांत मारामाऱ्या होऊन प्रजेचा उच्छेद होईल, त्यामुळें मराठ्यांच्या इंग्रजी मुलखावर स्वाऱ्या होऊं लागतील आणि कंपनीचें नुकसान होईल. रजपूत राजांशीं वचनभंग केला तर त्यामुळें इंग्रजी सत्तेची बेअब्रू होईल, असे अनेक युक्तिवाद जन. लेक यानें

लढविले. परंतु गव्हर्नर जनरल बार्लो याच्या मनावर या युक्तिवादांचा कांहींही परिणाम झाला नाहीं. बार्लो यानें जन. लेक यास सांगितलें कीं, " The security of the British Government depended on the wars and disputes (of Indian States) which were sure to arise if left to themselves. "[१]

" हिंदी राजांना आपण मोकळें सोडलें तर त्यांच्यामध्यें आपापसांत भांडणें आणि मारामाऱ्या हटकून होऊं लागतील. हिंदी लोकांचीं हीं भांडणें आणि मारामाऱ्या यांवरच इंग्रजी सत्तेचा सुरक्षितपणा आणि वैभव अवलंबून आहे." जन. लेक याला बार्लो याचा युक्तिवाद पटला नाहीं आणि तो राजीनामा देऊन विलायतेस परत गेला. गव्हर्नर जनरल लॉर्ड कॉर्नवालिस आणि सर बार्लो या धूर्त इंग्रज मुत्सद्यांनीं त्या वेळीं जें पीच्छेहाटीचें धोरण स्वीकारलें तेंच परिणामीं कसें यशस्वी झालें आणि इंग्रजांना अनुकूल परिस्थिति कशी येत गेली आणि शिंदे, होळकर, रजपूत व जाठ राजे, दिल्लीचा पातशहा, निजाम आणि भोसले यावर या धोरणाचा काय परिणाम झाला याचें विवेचन आम्हीं पुढील सोळाव्या भागांत 'पेशवाईचे शेवटचे दिवस' या प्रकरणीं करणार आहों.

होळकराचें रणकौशल्य केवळ अपूर्व होतें. गनिमी कावा आणि टाणबंदी या दोनी युद्धपद्धतींत तो अगदीं पारंगत होता. शिंद्यांशीं लढतांना तो टाणबंदी पद्धतीचा अवलंब करीत असे. शिंद्याशीं होळकराच्या शेकडों लढाया झाल्या त्यांतून होळकर रणभूमीवर टाण मांडून शत्रूशीं समोरासमोर लढला– रणभूमीची वीतभर जागासुद्धां त्यानें लढून दिली किंवा घेतली आणि शिंद्यांची फौज व पलटणें यांवर बेधडक हल्ले करून होळकरानें त्याची वेळोवेळ दाणादाण उडवून दिली. इंग्रजांशीं लढताना मात्र तो गनिमी काव्याचा आश्रय करीत असे. आपल्या गनिमी काव्यानें त्यानें इंग्रजी फौजेची वेळोवेळ कशी त्रेधा उडवून दिली याचें विवेचन आम्हीं आतांपर्यंत केलेलें आहेच. रणकौशल्याच्या बाबतींत होळकराची महादजी शिंदे आणि हैदरअली यांशीं तुलना करतां येईल.

---

१ ग्रांट डफ आ. तिसरी पृ. ६०२.

होळकराचा पराक्रम केवळ अलौकिक होता. त्याच्या पराक्रमाचें वर्णन करावें तेवढें थोडेंच ठरणार आहे. ता. १४ सप्टेंबर १७९७ रोजीं शिंद्यानीं भरदिवसां पुणें मुक्कामीं होळकराच्या लष्करावर छापा घातला आणि मल्हारराव होळकराचा खून केला. त्या प्रसंगीं यशवंतराव अगदीं कंगाल स्थितींत कसाबसा जीव बचावून पुण्याहून निसटला. पुढें नशिबाचे फेरे आणि चढउतार यांचा अनुभव घेत घेत होळकरानें तीन चार वर्षांतच कोट्यवधि रुपये उभे केले आणि हजारों फौज उभी केली. त्यानें होळकरांची जहागीर ताब्यांत घेतली आणि आपल्या पराक्रमानें त्यानें सर्वांना दिपवून टाकिलें. होळकराच्या नांवाच्या उच्चाराबरोबर सर्वांच्या अंगाला थरकांप सुटूं लागला. पेशवे, शिंदे व इंग्रज हे तिघेही होळकराचा प्राण घेण्याला टपलेले होते. यांपैकीं पेशवे यांची फौज आणि शिंदे यांची फौज व कवायती पलटणें यांची होळकरानें वेळोवेळ दाणादाण उडवून दिली. पुढें त्याचें इंग्रजांशीं युद्ध जुंपलें. त्यांतही त्यानें इंग्रजी फौजेची वेळोवेळ त्रेधा उडवून दिली आणि शेवटीं इंग्रजांना राजकीय दृष्ट्या माघार घ्यावी लागली. होळकराच्या सवाई सोट्यापुढें पेशवे, शिंदे आणि इंग्रज या तिघांचीही अब्रू नष्ट झाली. होळकरानें अवघ्या चार दोन वर्षांतच तुंगभद्रेपासून दिल्लीपर्यंत हजारों मैल क्षेत्रफळाचा मुलूख हां हां म्हणतां पादाक्रांत केला. होळकराची ही करामत लक्षांत घेतली म्हणजे मनांत आश्चर्य आणि स्वाभिमान यांचे अनेक तरंग उदय पावतात. पराक्रमाच्या बाबतींत होळकर आणि पहिले बाजीराव पेशवे यांची तुलना करतां येईल.

होळकराचें व्यक्तिमत्त्व( Personality )ही असेंच अलौकिक होतें. मराठी राज्याच्या स्वातंत्र्यासाठीं ज्यानें मराठे, जाठ, रजपूत, बुंदेले, पठाण, शीख असले लोक आपल्या निशाणाखालीं आणले त्याच्या बुद्धिवैभवाची तारीफ काय करावी ? असली करामत हिंदुस्थानच्या इतिहासांत आजपर्यंत कोणींच करून दाखविलेली नाहीं. होळकर या व्यक्तींत एक प्रकारची जादू होती. सर्वजण त्याच्या मोहिनी मंत्रानें ताबडतोब भारले

जात. राजे महिपतराय, नागो जिवाजी, हरनाथसिंग, जीवलालसिंग, अचेवीसिंग, मीरखान पठाण वगैरे त्याचे सरदारही असेच निधड्या छातीचे आणि जिवाला जीव देणारे होते. स्वराज्यसंस्थापक श्रीशिवाजीमहाराज यांच्या पश्चात् होळकराएवढा अलौकिक व्यक्तिमत्वाचा माणूस हिंदुस्थानच्या इतिहासांत दुसरा कोणी निपजला नाहीं. होळकराच्या चरित्राचा मुख्य विषय येथें संपला आहे. त्याचें पुढील चरित्र पुढील सोळाव्या भागांत 'पेशवाईचे शेवटचे दिवस' या प्रकरणीं सांगण्यांत येईल.

आतांपर्यंत ऐ. ले. संग्रह भाग बारा, तेरा, चवदा आणि पंधरा यांतून होळकराचें चरित्र वर्णिलेलें आहे. त्याचा विचार केला तर इतिहासाचे अनेक सिद्धान्त मनापुढें उभे राहतात. त्यांचें विवेचन करणें या ठिकाणीं अप्रस्तुत आहे. या ग्रंथाचा उपसंहार लिहिण्याची संधि आम्हांस कधींकाळीं प्राप्त झाली तर त्या ठिकाणीं या सिद्धान्तांचें विवेचन करण्यांत येईल.

---

# ऐतिहासिक-लेख-संग्रह भाग पंधरावा.

## पत्रें-यादी वगैरे.

नं. ६८४० (फाल्गुन शु. १२ श. १७९३–१६ मार्च १८०२.)

—उतारा[1]–पत्र जमखिंडीहून राम. आपांचें मिरजेस बाळा. स.–रवाना छ० ११ जिल्काद—"कुवारीचा किल्ला फितुरानें सरकारच्या हस्तगत जाला म्हणोन लिहिलें तें कळलें. ईश्वर इच्छा प्रमाण ! आजपर्यंत आरबांच्या विश्वासाचा लौकिक होता तो हल्लीं असा प्रकार घडला."

---

स. आर्बा मय्यातैनचीं पत्रें---

नं. ६८४१ (आश्विन व. ३–३ आक्टो.)

उतारा-- पत्र माधवराव रास्ते यांचें मिरजेस बाळासा. स. रवाना छ० १६ जमा. खर--"वसईच्या लष्करास गल्ला वगैरे जिन्नस माणसें जात होतीं. पेंढारी गल्ला वगैरे घेऊन गेले. माणसें माघारीं पुण्यास आलीं येविशींचें व इंग्रजाकडोन एक तोफ मातबर पुणियास आली व विंचूरकर यांचा मजकूर गंगातीरास जावें असें ठरलें याप्रमाणें लिहोन आलियाचें व खेम सांवत भोसले यांस देवाज्ञा जाली व करवीरकरांची स्वारी वाडी प्रांतीं जाणार व मोरोबादादा कैलासवासी जाहले म्हणोन लिहिलें तें कळलें."

---

नं. ६८४२ (ज्येष्ठ शु. ८–२८ मे.)

उतारा--पत्र बाळाजी महादेव दामले यांचें रहिमतपुराहून मिरजेस बाळासाहेबांस. रवाना छ. ६ सफर सन आर्बा.

"रा. फत्तेसिंग माने यांचा मुक्काम मौजे नेहरवाडी कसबें रहिमतपूर येथें आहे. रा सुभानराव माने श्री० रा० पंतप्रतिनिधीकडील दोन हजार फौजेनिशीं मसुरेहून कूच करोन काल छ० ५ सफरीं कसबें तारगांवचे

---

१ हें पत्र तेराव्या भागांत छापावयाचें राहिलें तें येथें छापिलें आहे.

मुक्कामास आले. ही बातमी रा. फत्तेसिंग माने यांणीं राखून मुक्कामाहून सडे होऊन चालोन गेले. तिसरे प्रहरीं गांठ घालोन तोफांची लढाई लागली. चार घटका दोहींकडील तोफा चालत होत्या. नंतर फत्तेसिंगानें प्रतिनिधींच्या फौजेवर चालोन घेतलें. तरवारेची लढाई मोटी होऊन प्रतिनिधींची फौज मोडली. सरदार पन्नास स्वारांनिशीं पळून गेला. बुणगें वगैरे झाडून लुटलें. पंताकडील लोक फार मारले गेले. फत्तेसिंग तमाम प्रांतांत खंडण्या घेत आहेत. शिवाय मांग रामोशी यांनींही मोठाच दंगा केला आहे. यामुळें महागाई फार जाली आहे. तीन शेरांची धारण आहे."

---

नं. ६८४३ (पौष व. ६–३ जाने.)

उतारा––पत्र रामचंद्रपंत आपांचें मिरजेस बाळासा. स. रवाना छ० १९ रमजान–"इंग्रजांची व शिंदे, भोसले व होळकरी फौजसुद्धां लढाई होऊन उभयपक्षीं बहुत नाश जाला. इंग्रजाकडील सरदार मराठ्यांकडे पाडाव गेले व इंग्रजाकडील वकिलांनीं श्रीमंतापाशीं टोपी टाकिल्याचा मजकूर लिहिला तो कळला."

---

नं. ६८४४ श्री. (फाल्गुन व. ३०–११ मार्च.)

पै. छ. १३ जिल्हेज. आर्बा मय्यातैन.

[१]सेवेशीं साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ. २८ जिल्काद पावेतों स्वामींचे कृपावलोकनें करून वर्तमान यथास्थित असे. विशेष. पेशजीं सेवेशीं छ. २१ मिनहूचें पत्र पाठविलें आहे त्यावरून सविस्तर निवेदन होईल. स्वामी कृपाळू होऊन छ. १८ रोजचें पत्र पाठविलें तें पावलें. बहुत आनंद जाहला. चिरंजीवाचें पत्र पाठविलें तेंही पावलें. इकडील वर्तमान तरी, फाल्गुन वद्य ९ मी मंगळवारीं वसलीसाहेब यास सदाशिव माणकेश्वर याणीं मेजवानी केली. नंतर तेच दिवशीं गोखले व

---

१ पत्र कारकुनाचें पुण्याहून मिरजेस. यापुढें टीपा दिलेल्या नाहींत अशीं पत्रें पुढें छापलीं आहेत तीं सर्व पुण्याहून कारकुनांनीं मिरजेस गंगाधरराव गोविंद उर्फ बाळासाहेब यांस लिहिलेलीं आहेत असें समजावें.

निपाणीकर यांस वसईनें ज्याफते करून (निरोप देऊन) मंगळवारीं दोन प्रहर रात्रीं वसली याणीं कूच करून सडे स्वारीनिशीं व बरोबर शिंदे भोसले यांचे वकील घेऊन व निपाणीकर व गोखले यांचेही कारकून बरोबर घेऊन व आपणाकडील म्हैसकर यासही बरोबर घेऊन ममईस निघून गेले. तेथें जाऊन ममईकर जनरल डकिनसाहेब व करनेल कलुप वकील या उभयतांस सरदारांकडील समेट करून तह केला. त्याचा मजकूर सर्व कलमबंदोप्रमाणें उभयतांस समजाऊन तेथें कौंसलांत ठरेल त्याप्रमाणें पुन्हां वसलीसाहेब पुण्यास येऊन श्रीमंतांस समजाऊन राज्याचा वगैरे सर्व बंदोबस्त करणार त्यास वसलीसाहेब लौकरच येतील. नारोपंत चक्रदेव व दादा गद्रे व सखोपंत साने वगैरे कैदेंत आहेत त्यांस मोकळे करून त्यांचीं घरें त्यांचे स्वाधीन करून पूर्ववतप्रमाणें त्यांच्या हातून चाकरी घ्यावी म्हणोन वसलीच्या विचारें ठरोन घरांच्या जप्त्या मोकळ्या होत आहेत. श्रीमंत राजश्री रावसाहेब यांजकडील प्रभाकरपंत वसलीबरोबर नेहमीं आहेत. चक्रदेव व गद्रे वगैरे यांचा खुलासा करून प्राचीनांच्या हातून कामेंकाजें घ्यावीं हा नेट त्याचा आहे. याप्रमाणें इकडील वर्तमान आहे. पुढें होईल तें सेवेशीं लिहूं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६८४५ श्री. ( नकल. )

विज्ञापना. कोणी गृहस्थानें राजश्री सदाशिवपंतभाऊ यांस विचारलें कीं बंडाचे पारिपत्यास जावयाविशीं पत्रें कोणास गेलीं? त्याणीं सांगितलें पटवर्धन व रास्ते खेरीज करून सर्वांस गेलीं. त्याणीं पुसलें उभयतांस पत्रें न जावयाचें कारण? तेव्हां भाऊनीं सांगितलें गुदस्तां उभयतांस पत्रें गेलीं परंतु त्याणीं मान्य करून चाकरीस कोठें गेले व सरकारची मर्जी न राखतां पटवर्धन निघोन गेले. तेव्हां त्यांस पत्र पाठवून फळ तें कोणतें? त्याप्रमाणें बोलणीं जालीं. अनेक प्रकारचे आवाज निघतात. विदित व्हावें म्हणोन लिहिलें आहे. हे विज्ञापना.

नं. ६८४६ श्री. ( नकल. )

विज्ञापना. अमदाबाजेचा सुभा इंग्रजांकडे कमाविशीनें सरकारांतून सांगितला असें बाह्यात्कारीं आहे. अंतर्यामीं कसा दिलासा असेल तो

असो. अमदाबाज प्रकरणीं कागदपत्र समजावून देणेंविशीं राजश्री सदाशिवपंतभाऊ व कृष्णाजी भवानी व त्यांचे चिरंजीव व चिंतोपंत देशमुख व भाऊ सरंजामी व बाबा चोळकर गेले होते. त्याणीं कागदपत्र समजावून दिले सबब कर्णेल याची मर्जी खूष होऊन गेले. त्यास वस्त्रें दिलीं. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६८४७ श्री. ( वैशाख शु. ६–१५ मे. )

पै० छ० ७ सफर. सन आर्बा मय्यातैन व अल्लफ.

विज्ञापना. तागायत छ. ५ सफर सुखरूप असे. विशेष. इकडील मजकूर तरी राजश्री यशवंतराव होळकर अजमीरकडे आहेत. बुणगें माळव्यांत लावून आपण सडे पन्नास हजार फौजेनिशीं इंग्रजांचे मोहल्यावर आहेत. त्यांजकडील सरदार जीवलालसिंग चांदवडाकडे होते. त्याणीं राजश्री कासीराव होळकर यास धरून कैद केलें. राजश्री हरीपंत भावे त्याच मंडळांत जाऊन मिळाले. राजश्री दौलतराव शिंदे बराणपुरापासून आठ कोसांवर आहेत. असेरीस अंमल शिंदे यांचा बसला व पायगड किल्ला इंग्रजांनीं घेतला तो माघारा दिल्हा. भडोचही माघारी देणार असें बोलतात. परंतु निश्चयांत नाहीं. श्रीमंत राजश्री रावसाहेब नगरानजीक भिंगारावर आहेत. जनरल वसलीसाहेब अद्याप मुंबईस आहेत. हल्लीं मुंबईहून कपतान नाकससाहेब पुण्यास आले. आठ दिवस जाहले. सरकारच्या भेटीस छ० २ सफर मंगळवारीं सकाळचे प्रहर दिवसास करणेलसुद्धां आले. दिल्लीदरवाज्यावर बैठक होती. दोन घटका बसोन नाकससाहेब यांस वस्त्रें व सिरपेंच दिला. सिंद्याकडील तोफखाना पाडाव इंग्रजाकडे आला. त्याजपैकीं पलटणी तोफा सहा भेटीस आले. तेसमई समागमें घेऊन आले. दरवाज्यापुढें आणिल्या. नजर केल्या. ते समई दर तोफेचे तीन बार प्रमाणें साऱ्यांचे बार केले. निघोन गेल्यावर तोफा ठेऊन बैल वगैरे जास्ती सरंजाम आणिला होता. तो त्याणीं नेला. तोफा कारखान्यांत न्यावयाची आज्ञा सरकारची जाहली. इंग्रज गेल्यावर श्रीमंतांची स्वारी शुक्रवारच्या वाड्यांत गेली. प्रस्तुत राहणें नव्याच वाड्यांत होतें. नवे अग्नीहोत्री कोंकणांतून गुदस्तां आणिले. त्यांजकडून चातुर्मास्यें सासवडास

करणार. त्यांस स्वारी शु॥ द्वादशीस सासवडास जाणार. आठ दिवस तेथें राहून पुरंदरचा किल्ला पाहून यावें असें ठरलें आहे. शहरचा कारभार राजश्री खंडेराव तात्या यांजकडे आला. छ० १ सफर भृगुवार ते दिवशीं पहाटेच्या दोन घटका रात्रीस तारा मोठा पडला. सर्वांनीं पाहिला. चंद्रोदय जाहला असा प्रकाश पडला. त्याची शांत वाड्यांत श्रीमंत करणार आहेत. फडके मंडळी पुण्यास यावयाकरितां निघोन गंगातीरास आले. मार्गीं दंगा पाहिला. म्हणोन चार दिवस मुक्काम जाहला. लौकरच येणार. श्रीमंत सौ० मातुश्री ताईसाहेब यांची प्रकृत बरी आहे. श्रीमंत राजश्री आपासाहेब[1] नेहमीं थोरल्या वाड्यांत असतात. महर्गता बहुत जाहली. माणूस गंगातीरचें वगैरे आलें तें बहुतेक मेलें. या प्रांतीचे जीव मात्र कुडींत राहिले आहेत. परंतु अद्यापवत् पल्ला फार लांब आहे. पर्जन्य नेमाप्रमाणें पडल्यास सर्व चांगलें. नाहीं तर कांहीं राहावयाचें नाहीं. वरचेवर सविस्तर लिहीतच आहें. विदित होय हे विज्ञापना.

---

## सन खमस मय्यातैन व अलफचीं पत्रें--

नं. ६८४८ ( ज्येष्ठ शु. १५–२३ जून.)

उतारा--पत्र बाबाजी आपाजी पटवर्धन यांचें पुण्याहून मिरजेस बाळासा. स. रवाना छ० १४ रबिलावल--" पुण्यांत संगमीं इंग्रजांनीं नावेचा पूल बांधला तो पहावयासी काल श्रीमंतांची स्वारी जाणार होती. परंतु राहिली. नावा किती कशा लाविल्या आहेत तें मी पाहून आल्यावर लिहीन."

---

नं. ६८४९ श्रीगणपतिर्जयति. (ज्येष्ठ शु. ४–११ जून.)

चिरंजीव राजश्री त्रिंबकराव[2] आप्पा यासी प्रति चिंतामणराव पांडुरंग आशीर्वाद उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें विशेष. जांबोटकर देसाई व अनगोळकर एक होऊन पाच्छापूर व काकतीकर देसाई यांची कुमक करून पेठ तालुकेंत बखेडा करून मसलत

---

१ पेशव्यांचे धाकटे बंधु चिमाजीआपा. २ पत्र सांगलीहून कुरुंदवाडास.

वाढविली. देसकाकडे कुमक पाठविल्याचा मुद्दा राजश्री बाळकृष्ण बहिरव यांनीं राजश्री रामचंद्र कृष्ण बरवे याजकडे शाबूत करून आले आहेत. कुमकेस आलेल्या प्याद्यांतील एक असामी जखमी तेथें सांपडला तोही आणविला. येईल. दोन्ही तालुके एक असतां अनगोळकरांनीं जांबोटीकरांस मिळऊन घेऊन पाळेगाराची कुमक करून बखेडा करावा हें चांगलें कीं काय ? इकडील फौज जाऊन मसलतसबंधें खर्च जाहला. त्याचा उलघडा जाहला पाहिजे. यास्तव तुम्हास लिहीलें आहे. उत्तर पाठवावें. रवाना छ० २ (खमस) रबिलावल. जे पक्षीं कुमकच जाहली ते पक्षीं उलघडाही करून देवतीलच, परंतु आपसांत असें होऊं नये. उत्तर समर्पक पाठवावें. बहुत काय लिहीणें लोभ करावा हे आशीर्वाद.

---

नं. ६८५० श्रीगजानन. (ज्येष्ठ शु. ४–११ जून.)

पै० छ० १० रबिलावल सन खमस.

[१]राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधरराव यांस—प्रति रामचंद्र जोशीराव साष्टांग नमस्कार विनंती. उपरी. येथील कुशल तागायत छ० २ माहे रबिलावल यथास्थित जाणोन स्वकीय लिहीत असले पाहिजे. विशेष. निंबाजी यादव हवालदार यांचे बंधु धुरपतराव यादव कवठेस आपली स्त्री निवर्तली म्हणोन मुलाचे समाचारास गेले. तेथून मुलास घेऊन माघारे येतांना वाटेनें तासगांवचे राऊत येऊन त्यांस धरोन नेलें. त्यास शिवेशेजारीं खटला वाढविणें युक्त नव्हे. तरी आपण पत्र तासगांवास पाठवून त्यांस निरोप देऊन लावून द्यावें. मार्गानें आपणाकडील कोणी इकडे येतात त्यास यांणीं मोबदला करावें असें होऊन खटला लांबणीवर पडत जाईल. यास्तव आपलेकडील गांवांत आलेल्यास धरोन नेलें म्हणोन रिकामा शब्दही येतो. प्रांतांत मार्गही यथास्थित चालणेचें होणार नाहीं. याजमुळें राजश्री रावोपंत यांजसमागमें आपला माणूस व पत्र देऊन त्यांची सुटका होई तें करावें. कळावें. बहुत काय लिहिणें. लोभ करावा हे विनंती.

---

१ पत्र करवीराहून मिरजेस.

नं. ६८५१ श्रीगणपतिर्जयति. (ज्येष्ठ शु. ९-१६ जून.)

पौ। छा। ९ रविलावल सन खमास

चिरंजीव [1]राजश्री त्रिंबकराव आप्पा यासी प्रती चिंतामणराव पांडुरंग आशीर्वाद उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. जांबोटकर देसाई व अनगोळकर एक होऊन पाळेगाराची कुमक करून मसलत वाढऊन बखेडा केला. त्यास मसलतसंबंधें खर्च जाहला आहे. त्याचा उलगडा व्हावा म्हणून तुम्हांस लिहीलें होतें. त्याचें उत्तर कुमक पाठऊन बखेडा केला. हें समजण्यांत आलें नव्हतें. राजश्री रामचंद्र कृष्ण यास आणऊन मजकूर समजून घेऊन लिहून पाठवितों असें लिहीलें. त्यास राजश्री बाळकृष्ण बहिरव यांणीं बरवे यास आणऊन पाळेगाराकडे कुमक पाठविल्याचे मुद्दे शाबूत केले. त्याची याद आलाहिदा पाठविली आहे. त्यावरून कळेल. पत्तेवार मुद्दे शाबूत आहेत, ते पक्षीं आणखी चौकशी करावयाची ती काय ? मसलतसंबंधें खर्चाची याद मागाहून पाठवितों. रवाना छा। ७ रविलावल, सन खमास मयातैन. बहुत काय लिहीणें. लोभ करावा हे आशीर्वाद.

नं. ६८५२ श्रीगणपति. (ज्येष्ठ शु. ११-१८ जून.)

पौ। छ० १६ रबिलावल. इंदुवार. आवशीची चार घटका रात्र. जेष्ट वा। २. सन खमस मय्यातैन.

अपत्यें रामचंद्रानें शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ० ९ रबिलावलपर्यंत यथास्थित असे. विशेष. वडीलीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. मजकूर सविस्तर कळला. त्याचीं उत्तरें बितपशील.

चिकोडी बागेवाडी प्रकर्णीं चिरंजीव रा। चिंतामणराव आपा यांचें पत्र पेशजीं आल्याचें व उत्तराचें लिहिलें. त्यास पेशजीं वडीलांचें पत्र या मजकुराचें आलें होतें त्याचें उत्तर पाठविलेंच आहे. नंतर फिरोन परभारें चिरंजीवाचें पत्र येथेंही आलें होतें. त्याचें उत्तर वडीलांस लिहिल्या

---

[1] पत्र सांगलीहून कुरुंदवाडास. [2] पत्र जमखिंडीकडून मिरजेस.

प्रमाणेंच दिल्हें आहे. तरी त्यांस पेशजीं मीं वडीलांस विनंती लिहिली आहे त्याप्रमाणें उत्तर सांगावें. कलम. १

तिकडे रोहिणी मृगांचा पाऊस जाल्याचें व खरपाचें पेरणीचें काम चालीस लागल्याचें लिहिलें तें कळलें. ईश्वरें कृपा केली. इकडे अद्यापि पेरणी व्हावयाजोगा पाऊस नाहीं. पुढें काय कृपा करील ते करो. कलम १.

राजश्री नारायणराव लागू तेथें आल्याचें व त्याणीं आपले चिरंजीवाची रवानगी लग्नास नरगुंदास केली असतां राहाणें जाल्याचें लिहिलें तें कळलें. कलम १.

सुभानराव माने नि॥ प्रतिनिधि शलेगांवचे सुमारें व फत्तेशिंग माने खटावचे सुमारें आल्याचें लिहिलें तें कळलें. सारांश त्या सरदेस बंड नव्हतें तें उभें राहिलें. प्रजेचा भोग आहे. कलम १.

निपाणकर यांची व सखाराम घाटगे यांची भेट कोगनोळीस जाली म्हणून लिहिलें तें कळलें. इकडेही वर्तमान आलें होतें. कलम १.

नागो शामजी यांजकडील पत्र वडीलांस आलें त्यांतील मजकूर जनराल वसली मुंबईहून निघोन भांबवड्यास येऊन श्रीमंतांस मेजवानी केल्याचें व होळकराकडील वगैरे लिहिलें तें कळलें. ईश्वर इच्छेनुरूप ज्या काळीं जें घडेल तें प्रमाण. कलम १.

चंदन वीस शेर खरेदी करून पाठवावयाविशीं आज्ञा. त्यास आज्ञेप्रमाणें खरेदी घेऊन पाठवितों. कलम १.

नरगुंदास रा॥ आनंदराव लागू लग्नाकरितां गेले होते. कार्य संपादून आले. कलम १.

येकूण नऊ कलमें लिहिलीं आहेत. त्याजवरून विदित होईल. यादव तासगांवास नेले. ते वर्तमान वडीलीं लिहिलेवरून कळलें. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६८५३ श्रीगणपति. (ज्येष्ठ शु. १४–२२ जून.)

पै॥ छ० १९ रबिलावल. गुरुवार प्रातःकाल जेष्ठ मास सन खमस मय्यातैन.

अपत्यें[1] रामचंद्रानें शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ० १३ गुरुवार रबिलावलपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. वडीलीं छ०४ रबिलावलचीं पत्रें पाठविलीं तीं छ० १० मिनहू्स पावलीं. रा। बिष्टोपंत नि। इंग्रज यांच्या लष्करचा मोकाम हत्तीपचे (?) मोकामास आल्याचें व उपसर्ग भारी आहे त्यास पत्रें पाठविलीं आहेत. आपलेंही पत्र त्वरित त्यास यावें व रा। आपाजीपंत दामले पुण्यास गेल्याचें व किबे यांचें पत्र पाठविलें आहे म्हणोन लिहिलें तें कळलें. रा। बिस्टोपंतास पत्र पाठविलें नाहीं कारण माझी त्याची ओळख नाहीं व दूरही आहे. वडीलीं लिहिलें म्हणजे जालें. किबे याचीं दोन पत्रें पाहून पाठविलीं आहेत. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६८५४ श्री. (ज्येष्ठ शु. १५–२३ जून.)

पै. छ. १९ रबिलावल. खमस मयातैन. जेष्ठ.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधरराव स्वामी गोसावी यासी. पो। जयवंतराव[2] रघुनाथ मंत्री. नमस्कार विनंती. उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. आपण पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन लेखनार्थ कळों आला. राणोजी भाई गडेजामदार यास खळोजी बिरादर पाटील मौजे साखराळे याणें आपले पाटीलकीचा हिस्सा स्वसंतोषें खरेदी दिल्हा. त्यास येवीसीं आपलें व मोकदमाचें पत्र भोगवटीयास पाहिजे. याकरितां उत्तर आलेवर राणोजीस पाठवून देऊं. पत्रें करून देवावीं. लांबणीवर न पडे तें व्हावें. म्हणोन लिहिलें. ऐसीयास खळो पाटील याचे भावबंद आहेत. त्यांचा वतनासंमंधें वाद पडोन त्यांचें अवघ्यांचें वतन बहुत दिवस अमानत आहे. त्यांचे बोलणे-चा निवाडा होऊन मोकळीक आवघ्यांची जाले उपर याचा हिस्सा सुटलेवर गांवकरांचे व भावबंदाचे संमतें जाबसाल होणें तो होईल. कळावें रा। छ. १४ रबिलावल. बहुत काय लिहिणें. लोभ करावा हे विनंती.

---

१ पत्र जमखंडीहून मिरजेस. २ पत्र इस्लामपुराहून मिरजेस.

नं. ६८५५ श्री. (ज्येष्ठ व. १–२४ जून.)

पै. छ. १५ रबिलावल खमस मयातैन. जेष्ठ मास.

साष्टांग[1] नमस्कार विनंती विशेष. राजेश्री सखाराम घाटगे हिंदुस्थानास शिंद्याकडे जाणार ते अद्याप चिखलीसच होते. आपल्याकडील सरंजामाचे गांव कागल व शिरोळ वगैरे गांवांपैकीं निपाणीकर देसाई यांसीं आणून त्याचे स्वाधीन करावयाचें करून चाळीस हजार रुपये देसाई याजकडून घ्यावयाचें करून तूर्त त्यापैकीं दहा हजार रुपये देविले. घाटगे यांचा पुत्र व सरंजाम सर्व त्यांचे हवालीं करून जाणार. पुढें पागा कांहीं स्वार अंकलीस येऊन पांच सहा रोज मोकाम करून होते. शितोळे याणीं मांजरीकडे ठोकरा टेविल्या. येडूरचे नावे करतांही चीटी केली होती. परंतु दिली नाहीं. शितोळे यासीं निपाणीकरांची चिठी आणून लाविली. मांजरीजवळ राहतील. मागून घाटगे येणार तोंपावेतों पार होऊन राहों द्यावें म्हणोन सितोळेयासी चिठी लाऊन परवांपासून अलीकडे उतरतात. येडूरासही देसाई यांची चिठी च्यार रोज नाव देणें म्हणून आली होती. त्याणीं इकडे काल परवानगीविशीं लिहिलें होतें. परवां आपला निरोप इंग्रजाकडील लोक घोडगिरीनजीक आल्याचें वर्तमान आहे. येविसीं वर्तमान असल्यास कळवावें म्हणून आला होता. ते समई नेरलीकडून काल परवां पत्रें येतात त्यांत कांहीं लिहिलेलें नव्हतें. येडूरास बातमी तिकडून रामराव दोन हजारनिसीं येणार आहेत. वैरणीविसीं उपद्रव देतील. बंदोबस्त करवावे म्हणून संध्याकाळचे पत्रीं होतें. कळावें. घाटगे यांजकडील अडीचशें तीनशें सुमार तूर्त आहेत. तेही आठ पंधरा रोजीं याच मार्गें येणार. निपाणीकरही अंकलीस येणार. सध्यां निपाणीहून मुरगुडावरील छावणीबद्दल गेले. त्याणीं याप्रमाणें घाटगेकडील मजकूर शिंद्याकडे जाणेचा लिहिला होता. संकेश्वराजवळ नदीपार होऊन मुरगोडास गेले. राजेश्री विठ्ठपाचे पुतणे भीमराव कृष्णापार होऊन पुढें गेले. ह्याप्रमाणें येडूरचें पत्र आलें. कृपा करावी हे विनंती.

---

१ पत्र कारकुनाचें चिकोडीहून मिरजेस.

नं. ६८५६.		श्रीगणपति.		(ज्येष्ठ व. २-२५ जून.)

पौ छ० १६ रबिलावल इंदुवार. चार घटका रात्र आवसीची. जेष्ठ वा। २. सन खमस मय्यातैन.

विज्ञापना[1] ऐसीजे. इकडील वर्तमान तरी रा। बापूजीपंत गोखले व रामचंद्र आपाजी नरगुंदास लग्नाकरितां गेले होते. तें कार्य जाल्यावर उभयतांही श्री दीक्षितांचे[2] दर्शनास येथें आले आहेत. आमचे भेटीस बिराडीं आले होते. अद्यापि उभयतांचे सावनूर तालुक्याविशीं समेटांत येऊन कोणतेंही उलगड्यांत आलें नाहीं. पुण्यांत गोखले याणीं तालुक्याच्या सोडचिठ्या फडपोसीस[3] दिल्या. परंतु आंतून तालुका न देण्याविशीं आज्ञाही आहे असें वाटतें. वर्तण्यांतही तसेंच दिसतें. पुढें काय घडतां घडेल तें प्रमाण. आम्ही सरकारांत लिहिलें आहे. तूर्त तुम्ही तालुक्यांत राहूं नये याप्रमाणें बोलून सरसुभ्याचा सरंजाम तेथून घालविला तो परगणे जुने हुबळी येथील सरदेस आहे. गोखले यांची फौज धारवाडनजीक गरगावर आहे. मशारनिल्हे दीक्षितांचा निरोप घेऊन लौकरच आपले सैन्यांत जाणार. निपाणकर यांची फौज पाछापूर परगण्यांत आहे. आम्ही तिकडे येण्यास निरोपाविशीं श्री दीक्षितांस विनंती करीत असतां सुमुहूर्तें निरोप देतों म्हणतात. जेष्ट शु॥ दशमी रविवारीं आमचे मंडळीसह प्रसादास बोलाविलें होतें. याउपरी मर्जीनरूप निरोप घेऊन यावयाचें करितों. श्रीमंतांची स्वारी भाद्रपदमासीं श्री कार्तिक स्वामीस येणार. साहित्याची तरतूद असों देणें म्हणोन सरकारचें पत्र सरसुभ्यास आलें आहे. तुमचें बिदरहळ्ळीस जाण्याचें कारण म्हणून आज्ञा. त्यास तुंगभद्रेस भागीरथी आली आहे. याकरितां तेथें मातुश्रीचे श्राद्धाकरितां गेलों आणि तो विधि उरकोन तेथून श्री गलगनाथास जाऊन दर्शन घेऊन आलों. शरीरप्रकृत दिवसेंदिवस बरी आहे. प्रसादास आम्ही गोखले रास्ते मंडळीसह म्हणतां व आणखी आगांतूक आदीकरून तीन हजार ब्राह्मणाचें पात्र व खेरीज तीहीकडील शागीर्दपेश

---

१ पत्र रामचंद्रपंत आपांचें मुरगोडाहून मिरजेस बाळासा. स. २ चिदंबर दीक्षित. ३ तात्पुरत्या.

दीड दोन हजार येणें प्रमाणें पात्र जालें. ईश्वरी अवतार! विस्तारें काय ल्याहावें? बहुत काय लिहिणें. विदित होय. हे विज्ञापना.

नं. ६८५७ श्री गणपति. (ज्येष्ठ व. ५—२८ जून.)

पौा छ० १९ रबिलावल. गुरुवार जेष्ट मास. सन खमस मय्यातैन.

पुा विज्ञापना. [1]पुण्याहून चिरंजीव रा बाबाजीपंत[2] याचीं व रा बळवंतराव नागनाथ व बाळाजी लक्ष्मण व म्हैसकर याचीं पत्रें पाहून पाठविलीं तीं पावलीं. लिहिला मजकूर कळला. शिंदे व भोसले मोठे सरदार सरंजामसुद्धां जातात. त्यापेक्षां न जाऊन परिणाम नाहीं. समयानुसार वर्तलें पाहिजे. त्यास चिरंजीवास तयारीविशीं लिहून आपणही श्रीचा निरोप घेऊन त्वरित यावें म्हणून वडीलीं लिहिलें तें कळलें. ऐशियास तयारीचा प्रकार काय लिहूं! सर्व वडिलांस माहीत आहे. सालगुदस्तां सरकारांत व इंग्रजाशीं बोलणीं चालणीं जालीं तीं सर्व वडीलांस माहीत आहेच. त्यास सालमजकुरीं जाणें हें कसें पडतें? प्रसंगानुरूप वर्तावें म्हटलें असतां सालमजकुरचा निमे ऐवज येकंदर माहालचा घेऊन फौजेचा गुदस्ताचा फडशा केला. यास्तव अगोदर द्रव्याचा विचार होऊन जाण्याची तरतूद जाली पाहिजे. आम्ही दो चौ रोजीं श्रीचा निरोप घेऊन वडीलाकडे येतों. चिरंजीव रा चिंतामणराव आपा यांसही पत्रें त्याजकडील कारकुनाचीं आलीं असतील. त्याणीं मनसुबा कसा ठरविला ते आज्ञा व्हावी. मी परम संकटीं पडलों. त्याचा विस्तार किती लिहूं! विदित होय हे विज्ञापना. पुण्याचे पत्राचे जाब लिहून पाठविले आहेत. वडीलीं पाहून चिरंजीवाकडे तासगांवास पाठवावे म्हणजे पुढें रवाना करितील. हे विज्ञापना.

नं. ६८५८ श्री. (नक्कल.) (ज्येष्ठ व. ६—२९ जून.)

पै॰ छ० २० रबिलावल. सन खमस मय्यातैन.

विज्ञापना. स्वामीसह त्रिवर्ग सरदार पटवर्धन व रास्ते यांच्या सरंजामाच्या यादी कर्णेल यांजकडे देऊन कार्यभागी व मुख्यसह कर्णेल

१ पत्र मुरगोडाहून मिरजेस. २ पटवर्धन.

दोन बैठकी जप्ती सरंजामाची करावी याप्रमाणें बोलणीं जालीं. त्याच संधींत जनरेलही निरोपास पुण्यास आल्यानंतर त्यापाशींही त्याच अन्वयें बोलणीं पडलीं. पटवर्धन व रास्ते हे सरकार कह्या[1] मानीत नाहींत व उपयोगी नाहींत याकरितां सरंजाम जप्त करावे येविशीं बहुत खटपट जाली. परंतु आजच्या प्रसंगीं यांचा रुकार पडला नाहीं असें वाटतें. परंतु हें चाललें त्यापक्षीं कोणे वेळेस काय होईल याचा भरंवसा नाहीं. गोखल्याकडे सरंजाम द्यावे याप्रमाणें पेशजीं बेत जाले त्या समयीं यांचा रुकार न पडल्याकरितां राहिलें. हल्लींही याणींच टाळा दिल्हा. परंतु सरकारांतून कांहीं तथा नाहीं. हे गेल्यावर सरकारचा विचार केवळ कर्णेल याच्यानें मोडवणार नाहीं. याकरितां त्यास एक मजल सामोरे येऊन मेजवानीचा बेत यथास्थित वस्त्रें वगैरे होऊन त्याचा संतोष करून आम्ही सांगों तें ऐकावें याप्रमाणें होत असल्यास आम्ही ठीक करून देतों असें म्हणणें यांचें पाहिलेपासून आहे. त्यास तुम्ही सांगाल त्याप्रमाणें आइकतों म्हणोन सांगोन कर्णेल यास पत्र हरएक बंदोबस्ताविशीं द्यावें म्हणजे उपयोगी पडेल असें वाटतें. विचार होऊन बेत ठरेल त्याप्रमाणें आज्ञा सत्वर व्हावी. श्री० राजश्री आपासाहेबांस लिहून विचार करूं म्हटल्यास अवकाश राहिला नाहीं. जो विचार करणें तो आपणच करून करणें तें केलें पाहिजे. श्री० राजश्री आपासाहेबांकडे पत्रें पाठवून त्या सुमारें हे गेले असतां भेट द्यावी हें चांगलें दिसतें. आपण सूचना जलद लिहून कळवावी. श्री० राजश्री बाळासाहेबांसही हें वर्तमान कळवावें. मला सुचलें तें विनंती लिहिली आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६८५९ श्री गणपतिर्जयति. (ज्येष्ठ व. ९–१ जुलै.)

पौा छा २२ रविलावल. सन खमस.

अपत्यें चिंतामणीनें शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० २२ रविलावल पावेतों वर्तमान यथास्थित असें विशेष. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. आज्ञेप्रमाणें आरबांस ताकीद केली. वसलीसाहेबास

---

१ आज्ञा. हें पत्र पुण्याहून कारकुनानें सांगलीस चिंता. आपांस लिहिलेलें आहे.

भोजनास बोलावणेचें शोधास पाठविलें होतें. येतों म्हणून सांगितलें आहे. सायंकाळीं येणार. दोन घटकेचे आंत उरकावयाचें. याजप्रमाणें सांगितलें. याजकरितां विनंती लिहिली आहे. तर मोबतीचे सरपोस दोन पाठवावया आज्ञा करावी. वायु सुटला तर टेवावयास येतील. चार घरें मोबतीचीं पाठवावीं. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६८६० श्री. (ज्येष्ठ व. ९–१ जुलै)

पौ छा २७ रविलावल. सन खमस.

सेवेसीं साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छा २२ रविलावल पावेतों स्वामीचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. हल्लीं इकडील वर्तमान तरी, राजश्री शिंदे बाहादूर ब्ऱ्हाणपुरावरून नर्मदेचे काटीं हुसंगाबादेवर छावणीस गेले होते. त्यास होळकर खासा उज्जनीनजीक आले. पुढें होळकराच्या छावणीचा डौल माळवे प्रांतींच होणार अथवा कोणीकडे दौड करतील याचा भरंवसा नाहीं. याकरितां शिंदे बाहादूर याजवळ फौजेचा वगैरे सरंजाम कोता हें जाणून [1]ताम्रमुखाचे रोखाप्रमाणें जाहेरदारीस पुन्हां हुसंगाबादेहून माघारे ब्ऱ्हाणपुरास आले. हिंदुस्थानांत इंग्रज वगैरे कोणी दिल्ली ताहत आग्रे जयपूर वगैरे येथील इंग्रज वगैरे कोणी एक होळकर याच्या मोहऱ्यावर कोणी येत नाहींत. नबाबाकडून सखो रुद्र यांणीं होळकराचे महाल जप्त केले होते व चांदवड प्रांतीं पलटणें गेलीं होतीं. त्यास होळकर यांणीं पत्रें नबाबास पाठविलीं. त्यावरून व होळकर उज्जनीनजीक आले हें जाणून चांदवड प्रांतचीं पलटणें व सखो रुद्र मार्गे हटून गेले. वसली मसलत आटपोन समेट करून गेले. पुढें तिनीही सरदारासी द्वेष पडले. पुढें परिणाम शुद्ध नाहीं येविसींचे आंदेशे कारभाऱ्यासुद्धां बहुत आहेत व वसली गेल्यानें ताम्रमुखाचा भ्रम जाऊन येथील लहान मोठे सरदार विंचूरकर वगैरे बहुत विचारांत आहेत. बाद बरसात तिनी सरदार अथवा एक होळकर इकडे आले असतां काय घडेल न कळे. अथवा शिंदे भोसले हे उभय-

---

१ इंग्रजांचे.

तांच आले असतां काय करीत हें न कळे. याजकारितां तीही सरदारांसी साधनें राखावीं म्हणोन विचारांत आहेत व देशीं मिरजकर व रास्ते व प्रतिनिधि यांणीं एक विचार करून फौजसुद्धां पुण्यास येऊन पूर्वीप्रमाणें बंदोबस्त केल्यास उत्तमच आहे. असेही विचार कित्येक ठिकाणीं होतात. नगरांत वसलीकडून किल्लयाचे बंदोबस्तास इंग्रज होता. त्यानें आपले तर्फेचा एक जमादार नगरांत ठेऊन आपण ममईस निघोन गेला. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६८६१  श्री.  (ज्येष्ठ व. ९–१ जुलै.)

पै. छ. २२ रबिलावल. खमस

विज्ञापना. मोधी सरकार लक्षांत होते. याजमुळें इंग्रज त्यास दूर करणार होते. आपले घरास जाणार असें वर्तमान आठ पंधरा दिवस बोलत होते. दिवाण यांची त्याची चित्तशुद्ध तर दोन वर्षे नव्हती. गुदस्तां कारभारी यांत व देशमूख यांत द्वैत आलें होतें. त्या वेळेस कोपरगांवाहून डेंगळे यास उभयतांचे समजुतीस पाठविलें होतें. त्यापासून डेंगळे यास इंग्रजांचे खलबतांत घेऊं लागले यास्तव कारभारी यांस तें प्रस्थ भारी जालें. याजकरितां इंग्रजांचे कुमकेस जावयाचें फौजेसह ठरत होतें. तें सरकारचे युक्तीस न येई. रा. गंगाधरशास्त्री आले त्यांचा बंदोबस्त इंग्रजांचे व दिवाण यांचे चित्तांत करून घ्यावा असें होतें. तें सरकारचे मनांत नाहीं यास्तव आंतच्या आंत राजकारण अगदीं बिघडलें. इंग्रजाचे सरकारचें नीट नाहीं असें बाजारी बोलवा आहे. प्रत्ययास येईल तेव्हां खरेंखोटें असें आहे. मोधी मयत झाले. फार वाईट जाहलें. विदित होय हे विज्ञापना.

पाहिल्यापासून इंग्रज, मोधी व दिवाण व सरकार. पांचवा खलबतांत नव्हता. तो डेंगळे यास सरकारांतून घेऊं लागले. त्यामुळें कांहीं परस्पर विरुधें आलीं आहेत. हे विज्ञापना.

---

नं. ६८६२  श्रीगणपति.  ( ज्येष्ठ व. १०–२ जुलै.)

पौ छ० २३ रबिलावल. सन खमस मय्यातैन. जेष्ट मास.

ऐ. ले. १५...१७

[1]अपत्यें हरीनें शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. ता छ० २३ रबिलावलपर्यंत यथास्थित असे. विशेष. पुण्याहून ती रा बाबाजीपंत पटवर्धन यांचें पत्र आलें. त्यांत वसलीकडील बाहीर (?) बुणगें दोन पलटणें व दोन हजार फौज तुरुक स्वार व तोफा वगैरे पट्टणास जात आहे. व गडी आला त्यानेंही याप्रमाणेंच सांगितलें. वेळून्या मुकामास सोडिलें. उपद्रव करितात याजकरितां वसलीचे कानावर घालून मिरज प्रांतांत न येतां दुसरे मार्गानें जावें याप्रमाणें कोण कारभारी असेल त्यास निक्षून पत्र घेऊन पाठवावें म्हणोन रा बाळकृष्णपंत म्हैसकर यांस पत्र लिहिलेलें पाठविलें आहे. हें मशारनिल्हेकडे रातोरात पत्र त्यांजकडे पाठवावयासी आज्ञा जाली पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६८६३ श्री. (ज्येष्ठ व. ११–३ जुलै.)

पै० छ० २४ रबिलावल, खमस.

राजश्री गंगाधरराव गोसावी यासी.

[2]अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य—स्नेहांकित शिवाजी थोरात दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लेखन करणें. विशेष. गांवगन्ना जमीचे रोखे घेऊन प्यादे आले होते त्यांस आपली आज्ञा पेशजीपासून होती कीं, पुरंदरास कारकून पाठवून स्वालजाब करणें. त्याजप्रमाणें कारकून पुरंदरास पाठविले आहेत. तेथून स्वालजाब होऊन येईपावेतों प्यादियास सांगितलें जे, राहणें अगर रोख्याप्रमाणें मसाला घेऊन रोखा देऊन जाणें. ऐसे कितेक प्रकारें सांगितलें असतां आम्हांस राहावयास पुरवत नाहीं. आम्हांस उठोन येणें म्हणून आमचे खावंदांची आज्ञा. त्यास आम्ही जातों. तेथील स्वालजाब येई तोंपावेतों एक आठ दिवस राहणें अगर मसाला घेऊन रोखा देवून जाणें हें न ऐकतां उठोन आले आहेत. जमीचा प्रकार हुजुरून स्वालजाब येईपावेतों राहावें, स्वालजाबाप्रमाणें वरातदारांनीं वर्तावें ऐसा मजकूर आहे. परंतु त्यांजला आपली आज्ञा उठोन येणेविशीं आली. आपले चित्तीं आमचें कल्याण न व्हावें,

---

१ पत्र हरि परशराम यांचें तासगांवाहून मिरजेस. २ शिवाजी थोरात हे वाळव्याचे सरंजामदार.

हरएक गोष्टीस विकल्प पडावा हें तुम्हांस योग्य नव्हे. ज्यांनीं स्थापना केली त्यांनीं उच्छेद करावयाचें मानस धरलिया आमचा यत्न नाहीं. उदंड[1] तुम्ही चित्तांत विकल्प धरला तरी आम्ही तुमचा पदर सोडीत नाहीं. सर्व प्रकारें आम्ही तुमचे असों. सर्व आपला आधार आहे. यामध्यें जें आपले खातरेस येईल तें प्रमाण. लोभ करावा हे विनंती.

---

नं. ६८६४ श्री. (ज्येष्ठ व. १३–५ जुलै.)

पौ। छा। २९ रबिलावल सन खमस.

[2] श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेसीं. विनंती सेवक बाळाजी महादेव दामले चरणांवर मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा। २६ रबिलावल पावेतों शेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं पंत प्रतिनिधि यांस व कारभारी यांस आपलीं पत्रें व श्रीमंत राजश्री आप्पासाहेबांचीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. ऐसीयासी श्रीमंत राजश्री पंतप्रतिनिधि यांचें व आरबांचें वाकडें पडोन गरगशा आज आठ रोज तंटा पडोन श्रीमंतांची गैरमर्जी आरबांवर होऊन चार जमादार मसुरेचे ठाण्यांत कैदेंत ठेविले आहेत. त्यामुळें आरब चार पांचशे चहूंकडून जमा होऊन मसुरेंत मुकाम करून वाड्यांत श्रीमंतांकडे जमादार सोडून द्यावे म्हणून सांगोन पाठविलें. तेव्हां जमादार सोडावयाचे नाहींत म्हणोन उत्तर जाहलें. त्याजवरून श्रीमंत मसुरेच्या ठाण्यांत आहेत त्या वाड्यावर चालून घेऊन जमादार सोडवावे असा विचार आरबांनीं आरंभिला. तेव्हां गोष्ट श्रीमंतांस जड पडली. याजमुळें राजश्री बळवंतराव फ़डणीस व मोरोपंतभाऊ कोरेगांवचे मुक्कामीं फौजेसुद्धां होते. त्यांस आरबांचें पारपत्य करणें म्हणोन मसुरेहून श्रीमतांचीं पत्रें गेलीं. त्याजवरून छा। २१ रबिलावलीं कारभारी फौजेसुद्धां कोरेगांवाहून निघोन मसुरेस दाखल जाहले. नंतर दोन रोज आरबांचें व श्रीमंतांचें व कारभारी यांचें बोलणें होत होतें. परंतु तह्हांत आलें नाहीं. श्रीमंत वाड्यांत आहेत. आरब गांवांत शिरोन गांवांतील

---

१ येथून खास दस्तुर. २ पत्र रहिमतपुराहून मिरजेस.

गल्ल्या रोखोन आहेत. कारभारी फौजसुद्धां गांवालगत आहेत. छा २४ रोजापासून आरबांची लढाई होत आहे. वाड्यावर आरबांनीं चालोन घेतलें तेव्हां वाड्यांतील लोक बाहेर निघोन दरवाज्यापुढें लढाई जाहली. त्यांत दोन तीन असामी मानकरी व पांच सात असामी बारगीर शिलेदार ऐसे ठार जाहले. शिवाय जखमी. आरबांकडीलही लोक पंचवीस तीस असामी ठार जखमी जाहले. चालोन आलेले आरब माघारे शिरोन गांवांतील घरांचा आसरा करोन राहिले आहेत. दोन रोज गोळागोळी दोहींकडून चालली आहे. आरबांनीं गांवांतील वाड्यांचा आसरा करून राहिले आहेत. त्या वाड्यांस कारभारी तोफा लावावयाच्या विचारांत आहेत. या गरगशामुळें पत्रें पोहोंचून उत्तरें आलीं नाहींत. गरगशा निवारण जाहल्यावर पत्रें प्रविष्ट करून उत्तरें घेऊन सेवेसीं पाठवितों. रहिमतपुरीं माने प्रकर्णी जप्तीस कारकून लोक आले आहेत. त्यांचा दंगा आहे तसा चालला आहे. श्रीमंतांची अविवेक करण्याची मर्जीमुळें कारभारी यांचें बनत नाहीं. त्याजमुळें बंदोबस्त होत नाहीं. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६८६५ श्री. (ज्येष्ठ व. १३-५ जुलै.)

पै॥ छा २६ रविलावल. जेष्ठ. सन खमस.

[1]सेवेसीं सेवक महादाजी विश्वनाथ कोल्हटकर. साष्टांग नमस्कार. विज्ञापना. वसईचे लष्करांत चोरी झाली. त्याची चौकशी करणें म्हणोन आज्ञा झाली. त्यावरून राजश्री मोरो हरी यास ही चिटी पाठविली. त्यांनीं आम्हास कोणी सांगितलें नाहीं म्हणोन सांगितलें. आम्हीही चावडीस चौकशी केली. कोणी येऊन चोरीचा बोभाटा सांगितला नाहीं. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना. तेव्हांच बोभाटा आला असता तरी चौकसी करावयास सांपडतें. आतां कोठें म्हणून चौकसी करावी? विदित होय हे विज्ञापना.

---

१ पत्र अष्ट्याच्या कमावीसदारार्चे मिरजेस बाळासा.स.

नं. ६८६६ . श्री. (ज्येष्ठ व. १४–६ जुलै.)

पौ छा १ रबिलाखर सन खमस.

[१]श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेसीं. विनंती सेवक बाळाजी महादेव दामले चरणांवर मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा २७ रविलावल पर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. काल श्रीमंत राजश्री पंत प्रतिनिधि यांजकडील स्वार व पायदळ असे दोन तीनशे येऊन राजश्री नारायणराव माने व यशवंतराव माने व दुसरे नारायणजी माने, पाटलोजी माने व संभाजी माने यांचे घरीं चौक्या बसऊन मुलें माणसें गुरें धरून घरें लुटलीं. त्याजबरोबर शेजारचीं घरें सात आठ दरोबस्त लुटून नेलीं. शिवाय गोरगरीब यांचीं पांगरुणें नेलीं. गांवांत दोनशेंपर्यंत माने यांचें घर आहे. परंतु तितकें फत्तेसिंगराव यांचेकडे चाकरीस नाहींत. जे चाकरीस असतील त्यांचे घरांचें काय पाहिजे तें करावें. तें न करितां शिवार लुटतात. पांच असामी माने यांचीं मुलेंमाणसें नेलीं. त्याजबरोबर त्यांचे भाऊबंद कुलंबावा करून आहेत त्यांचींही नेलीं. याजमुळें गांवांत दहशत पडोन पेठ तों दरोबस्त उजाड जाहली. फक्त कुलंबावा करून माने आहेत. त्यांसही दहशत पडोन तेही परागंदा होत चालले. याजमुळें गांवचा घर तुटला आहे. सांगलीहून फौज पंतांकडे कुमकेस येतांच हीं कुळें धरून नेलीं. तेव्हां फत्तेसिंगराव माने माघारे येतील. तेही गांव लुटतील. पंतही लुटतात. तेव्हां निभावणी कसी पडते? या दहशतीनें गांव तजावजा होत चालला. या दंग्यामुळें वसूल देखील चालत नाहीं. यास्तव विनंती लिहिली आहे. गांवाचा बचाव जाहला पाहिजे. यास्तव श्रीमंत राजश्री पंत प्रतिनिधि यांस पत्र द्यावयास आज्ञा जाहली पाहिजे. वसलीसाहेब यांजकडील पलटणचा मुक्काम छा २५ रविलावलीं एकसल सरस्यावर होऊन काल याच मार्गें आले. त्यांची गडबड, त्यांत पंतांचे स्वारीची गडबड एकच जाहली. पलटणचा मुक्काम मौजे आरवीवर झाला. आज कूच होऊन पुसेसावळीचे मुकामास जाणार. तोफा व तुरुक स्वार व पायाचे व बुणगें मिळोन दहा हजार सुमार आहे.

---

१ पत्र रहिमतपुराहून मिरजेस.

मृगाचा पाऊस पडला. याजमुळें पेर मात्र झाले आहेत. त्यावर पाऊस आजपर्यंत नाहीं. पिकें वाळतात. तीन शेरांची धारण जाहली आहे. परंतु दंग्यामुळें दाणा मिळत नाहीं. रोज दहा वीस माणूस मरतें. वैरणीची काडी राहिली नाहीं. इंग्रजांच्या लष्करानें घरांतून शिरोन झाडून वैरण सांपडली ती नेली. दंग्यामुळें एक दिवस सुरक्षित जात नाहीं. सेवेसीं विदित होय. हे विज्ञापना.

---

नं. ६८६७ श्रीगणपति. (९ जुलै.)

पै० छ० २ रबिलाखर. भौमवार. खमस मय्यातैन.

[१]अपत्यें रामचंद्रानें शिरसा. नमस्कार विज्ञापना. तागायत आषाढ शु० २ इंदुवार मुक्काम कडपट्टी आपले आशीर्वादें क्षेम असे. विशेष. काल मुधोळाहून जमाखिंडीस आलों. चिरंजीवास शिदापुरास ठेविलें. आम्ही सडे नवे तासीं आलों. नंतर त्याणीं कांहीं गोळी वाजविली नाहीं. चार तास दरवाज्याजवळ उभे होतों. त्याणीं दरवाजे लाविले होते. इतक्यांत अकस्मात् एकदांच गोळी मारली. दगड धोंडे मार बहुत केला. आम्हांबरोबर सामान थोडें. अगदीं दरवाजाजवळ चार हातांचे तफावतीनें होतों. याजमुळें तेथें राहणें जालें नाहीं. सरकून कसब्याचे आसन्यास आलों. गोळागोळींत जखमी बहुत जाले. रा० विष्णु बाबाजी फडके यांस कपाळांत गोळी लागोन हा वेळपर्यंत खैर आहे. परंतु कठिण आहे. रा० अंताजी केशव कोल्हटकर यांस पायास गोळी लागून पार जाली. वरकड एक दोघे जखमी जाले. एक घोडें ठार पडलें. दोन चार घोडे जखमी जाले. असा प्रकार जाहला. आपला काळ फिरला त्यामुळें नानाप्रकारें विघ्नें येतात. चि० राजश्री बाबास तेथील सामानसुद्धां येणें म्हणोन लिहिलें आहे. पुढें विचार कसा करावा? संकट प्राप्त जाहलें. याजउप्पर खटपट होईल ती करतों. त्यावाचून निर्वाह नाहीं. युद्धाचा निश्चय केला त्याजपेक्षां पन्हाळेकरांचें संधान केलें असें वाटतें. ईश्वर इच्छा प्रमाण. रवाना सूर्योदय. सामान थोडें म्हणोन कडपट्टीस मुक्कामास आलों. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

१ पत्र जमखंडीहून मिरजेस.

नं. ६८६८  ( आषाढ शु. ४–११ जुलै. )

ठतारा—पत्र हरि परशराम यांचें मिरजेस ( रा ३ रबिलाखर सन खमस. )

[1]" जमाखिंडीस येथून लोक दारूगोळी रवाना करीत आहें. माझे मतें हरयुक्त करून चार रुपये त्यांचें देणें वाजवी कबूल करून ठाणें घ्यावें. परंतु मसलत वाढवूं नये. वाढविली असतां पैका फार लागेल. दिवस विलक्षण आहेत ! याकरितां चहूंकडील अंदेशे मनांत आणून जाले विचारें आल्यास वडिलांस ल्याहावें."

---

नं. ६८६९  श्रीगणपतिर्जयति.  (आषाढ शु. ४–११ जुलै.)

पौा छा ३ रबिलाखर. सन खमस.

[2]अपत्यें चिंतामणीनें साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छा ३ रबिलाखर पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. इंग्रजांचा मुक्काम ( मिरजेस ) गोविंद तळयावर झाला. तीर्थस्वरूप राजश्री आप्पासाहेब जमाखिंडीस येऊन दरवाजेजवळ चार घटका उभे राहिले. किल्लेवरून गोळी वाजविली. दहा पांच माणसें जखमी झालीं म्हणून लिहिलें तें कळलें. इंग्रजांचे लष्करांत इकडून राजश्री भिमाजी गोपाळ ठेविले आहेत. राजश्री विष्णु आबाजी फडके व अंताजी केशव कानिटकर जखमी जाहले. ईश्वर इच्छा प्रमाण. मेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६८७०  श्री.  ( नकल )  ( आषाढ शु. ६ )

साहेब मुषफक मेहरबान करमफर्माय दोस्तां रामचंद्रपंत अप्पासाहेब जुसल मुला हुताला.

आजतर्फे जनरेल वेलस्ली बदाद्दर सलाम आं कीं. येथील खुशी जाणोन आं साहेबीं आपली शादमानीं कलमीं करीत असली पाहिजे. दरी आयांम. पेशजीं आंसाहेबांस एक पत्र लिहून पाठविलें होतें. त्यांत सरकारचे कामास्तव जबाबसालाबद्दल आम्हाकडील एक सरदारास पाठ-

---

[1] पत्र तांसगांवाहून मिरजेस.  [2] पत्र सांगलीहून मिरजेस.

वीत असों. म्हणोन तर आतां इस्त्रंजीसाहेब यांस आपणाकडे पाठविलें असे. हे साहेब हें पत्र आपणांस पावीत करतील. त्यास जबाब द्यावा. आयां होय. रवाना छ. १३ माहे जुलई सन १८०४ इ. मुताबिक छ.४ रबिलाखर. जादा काय लिहिणें ? हे कितावत.

---

न. ६८७१ श्री. ( आषाढ शु. ४–११ जुलै. )

पै० छ० ७ रबिलाखर. रविवार. आषाढ. सन खमस.

[१]अपत्यें बाबाजींनें शिर सां. नमस्कार विज्ञापना. तागायत छ० ३ रबिलाखर बुधवार प्रातःकाळपावेतों सुखरूप असें. विशेष. + + + जनराल इकडून एकाएकींच निघोन गेले व त्यांस उपदेशही बहुत प्रकारें जाला होता याजमुळें येथील लोकांस मोठा वसवसा पडला. जनराल यास दोस्ती राखावयाची याजमुळें त्याणीं कोणतीही गोष्ट मनांत न आणितां दोस्तीच राखोन गेले. वडिलांचीं पत्रें कृष्णापार गेल्याचीं आलीं त्याजमुळें सर्वांस आनंद जाला. ज्यांस न व्हावयाचा त्यांस मात्र जाला नाहीं ! इकडील मजकूर तरी– वे० राजश्री बाळशास्त्री टोकेकर यांजकडून चातुर्मास्यें श्रीमतांनीं फडके यांच्या वाड्यांत करविलीं. प्रारंभास चार दिवस जाहले. आणखी दोन दिवस समाप्तीस लागतील. रा० दौलतराव शिंदे बऱ्हाणपुराहून अलीकडे एक मजल आले. तेथें महर्गता बहुत. एक शेराची धारण आहे. लोक बहुत उठोन गेले. जवळ दोन हजारांचा अजमास राहिला. दौलत बहुत खराबींत आली. होळकर माळव्यांत आहेत. त्यांचा लुटावयाचा क्रम चालला आहे. लढाई जाल्याच्या आवाया मनस्वी येतात. परंतु निश्चयांत नाहीं. रा. नरसिंगराव अन्या विंचूरकर यास फौज पांच हजार ठेवावयास सांगितली. खासे डेरेदाखल जाले आहेत. आजपावेतों पांचशें स्वार जमले. पुढें भरती कशी होईल पहावें. इंग्रजाकडील दोन तीन पलटणें व विंचूरकर यांस नाशिकास राजेबहादर यांचे पारिपत्यास जावयाची आज्ञा जाली आहे. जनराल येथून निघोन जावयाचे पर्याय लौकिकांत बोलतात कीं, कर्नाटकांत पूर्णय्याची बदनजर दिसोन आली व कोच्याळ बंदराकडे

---

१ पत्र पुण्याहून मिरजेस.

दंगा जाला व किरीटी रामराजा याणींही जमाव केला यास्तव गेले + + + विदित होय हे विज्ञापना.

नं. ६८७२  श्रीशंकर प्रसन्न.  ( आषाढ शु. ४–११ जुलै. )

पै. छ. ३ रबिलाखर. खमस मयातैन. आषाढ.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधर रावजी स्वामीचे सेवेसी. पो माधवराव[१] अनंत साष्टांग नमस्कार विनंती. उपरी. येथील कुशल ता। छ० रबिलावल यथास्थित जाणून स्वकीय कुशल लिहीत असलें पाहिजे. विशेष. आपणाकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी असें नसावें. निरंतर पत्रीं आधिकोत्तर लिहून कळवीत असावें. प्रस्तुत पुणीयांत चाकरीविसीं टोपीकराबरोबर जावें म्हणून बहुत तगादा आहे. कदाचित हुजूरचें पत्र आलें असतां विचार कसा करावा? परिणाम कसा लागतो? ओढीचा प्रकार सर्व ध्यानांत येतच आहे. त्यांतही जवळील चाकरी नव्हे. हिंदुस्तानची मोहीम यामुळें कांहीं बुद्धि चालत नाहीं. राजश्री रामचंद्रराव अप्पा व राजश्री माधवराव दाजी उभयतां आम्ही एकत्र बसून बहुत विचार केला. परंतु कांहीं तोड सुफथेची ( सोईची ) निघाली नाहीं. यास्तव उभयतांस श्रीचा निरोप होऊन तिकडे आले आहेत. आपलेकडे येऊन विचार होईल तो कळवावा. आम्हासही कसें करावें येविसीं बुद्धिवाद ल्याहावा. बहुत काय लिहिणें. कृपालोभ असों द्यावा हे विनंती.

नं. ६८७३  श्री.  ( ११ जुलै )

पौ छा ७ रबिलाखर. सन खमस. आषाढ.

सेवेसीं धोंडो बापूजी जोशी शिर साष्टांग नमस्कार. विज्ञापना. आषाढ शु. ४ पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडे पेरण्या चांगल्या झाल्या. अलीकडे पंधरावीस रोज पर्जन्य नाहीं. साडेतीन शेर प्रमाणें दाणा मिळत होता. सरकारांतून एक पायली विकावी ऐसी

१ रास्ते यांचें पत्र मुरगोडाहून मिरजेस.

ऐ. ले. १५...१८

आज्ञा जाली. त्यावरून दाणा अडीच शेर दर जाहला. नंतर सरकारांतून मारवाडी व वाणी यांचे मागें प्यादे लाविले. कोठे कांहीं जबरदस्तीनें फोडिले. तो दाणा हुजूर हिमायतदार सरकार यांणींच नेला. गरीबांस व इतरांस दाणा मिळाला नाहीं. वाण्यास हाणमार केली. आज चार रोज दाणाकोंडा देखील मिळत नाहीं. लोक रस्तोरस्तीं पैका घेऊन फिरतात. एक जागा कोठ्यावर मारामार जाली. तेथें दोन माणसें उडविलीं. हाहाःकार जाला आहे! माणसें बहुत मरतात. गल्लींतून पाहावत नाहीं. अद्यापवत धारणेचा बंद बसला नाहीं. उदईक ठराव तीन शेरांनीं व्हावी असें बोलतात. दुकानोंदुकानीं प्यादे बसले. दुकानें रिकामीं आहेत. कहर जाहला आहे! कळावें. बहुत काय लिहिणें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६८७४ श्री. (नकल) (आषाढ शु. ७–१४ जुलै.)

[1]चिरंजीव राजश्री चिंतामणराव आप्पा यासी आशीर्वाद उपरी. पुण्याहून पत्रें आलीं. त्यांतील मजकुराचीं सहा पत्रें पाठविलीं आहेत म्हणून लिहिलें, त्याप्रमाणें पत्रें पाहून माघारीं पाठविलीं आहेत. याचा विचार कसा करावा. उत्तरें जावीं लागतात. ऐसीयास शिंदे श्रीमंतांचे पदरचे मातबर सरदार. ते इंग्रजांबरोबर बंडाचे पारिपत्यास जातात. राजश्री नरसिंगराव विंचूरकर व रास्ते यांणीं मान्य केलें तेपक्षीं कबूल करणें प्राप्त आहे. न केल्यास पत्रांत अर्थ स्पष्टच आहेत. श्रीमंतांनीं कृपा करून यादीच इंग्रजास दिल्यानें जो चाकरीस न जाईल त्याचा सरंजाम जप्त करावा अशी आज्ञाच आहे. यापक्षीं याचा विचार समजतच आहे. त्यापक्षीं मान्य करण्यांत बचाव आहे. छ ७ रबिलावल. मंदवासर. बहुत काय लिहिणें. लोभ करावा हे आशीर्वाद.

---

नं. ६८७५ श्री. (आषाढ शु. ८–१५ जुलै.)

पौ छ ७ रबिलाखर. सन खमस.

विज्ञापना. शहरांत महर्गता बहुत झाली. यामुळें त्रिंबकजी डेंगळे

---

१ पत्र पुण्याहून बाबाजीपंत पटवर्धन यांचें सांगलीस चिंतामणरावआपांस.

खिजमतगार निजबत सरकार याणें श्रीमंतांस विनंती केली कीं, मला आज्ञा जाल्यास पांच शेरांची धारण करवितों. सरकारची त्यास आज्ञा जाली. त्याणें झाडून मारवाडी वगैरे जेथें जेथें गल्लयाचे कोठे होते तेथें जप्ती करून आपल्या लग्याचे होते त्यांस दाणे घालून घरें भरलीं. वरकड गोरगरीबांस आज पांच दिवस दाणा मिळत नाहीं. हातीं रुपये घेऊन प्रातःकालपासून फिरावें. सायंकाळीं लोक यावे. अशी अवस्था ब्राह्मणांची. शूद्र मंडळी तीन दिवस कुटुंबाचीं कुटुंबें उपासी. कोणी लगट करून कोठ्यावर गेल्यास मार खाल्ले. पांच चार जखमी जाले. एक दोन गरीबें ठारही जालीं! असा कहर गुदरला! असे आणखी आठ चार दिवस गेल्यास काय अवस्था घडते पहावें. पाऊस आजपावेतों थेंब नाहीं. कालपासून अभ्र दिसों लागलें आहे. कोंकणांत लागतो. सारांश ईश्वरें नेत्र झाकिले! प्रजेचा संव्हार जाला. जाला मजकूर विदित व्हावा म्हणून लिहिलें आहे. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६८७६ (१६ जुलै.)

उतारा—पत्र पुण्याहून मिरजेस धोंडो बापूजी जोशी यांचें आषाढ शु. ९ सन खमसचें.

"दाणा सरकारचे आज्ञेवरून उदमी यांणीं धांदल करून दुकानें बंद केलीं. त्याजविशीं प्रेत्न होता तितका सरकारांतून केल्याचें पेशर्जी लिहिलेंच आहे. परंतु दाणा पायलीप्रमाणें धारण जाली नाहीं. आठ रोज जाले. हाःहाःकार गांवांत जाला! मग जशी मर्जी असेल तसें विकणेविशीं आज्ञा सरकारची जाली. त्याजवरोन कालपासोन दुकानें उघडलीं. उकडे तांदूळ कोंडा नासका बंगाली दर ८८=। सव्वादोन शेर प्रमाणें भाव पडला. जोरी बाजरी मिळत नाहीं. सव्वादोन शेर भाव जाला. बहुत माणसें मृत्यु पावतात! प्रजन्यही नाहीं. + + हरनाथ व हरीपंत भावे यांची रवानगी गुजराथेमध्यें होळकर यांणीं केली अशी दोन रोज बोलवा आहे."

---

नं. ६८७७ श्री. (नकल) (आषाढ शु. १०–१७ जुलै.)

यादी. जखमी जाहले छ० ९ रबिलाखर फत्तेसिंग मान्ये यांचे लढाईंत सु॥ खमस मय्यातैन व अल्लफ.

१ बालेखान भिरजकर. जदीद[1]. जखमा तीन भारी.
१ शेखोजी पवार गु॰ गंगाजी पवार. जखमा तीन भारी.
१ नूरखान गु॰ शेख महंमद जमादार. जदीद. जखमा दोन भारी.
१ उदाजी घायगुडे नि॰ यशवंतराव चोपडे. जखमा तीन मध्यम.
१ बापूजी शिंदे गु॰ बाळाजीपंत टकले. जदीद. जखमा चार भारी.
१ कडलासकर हुसेनभाई गु॰ मोहिद्दीनखान. जखम एक मध्यम.
१ खादीरसाहेब गु॰ अमीनसाहेब. जखमा तीन भारी.
१ आपाखान गु॰ महमद. जखम एक हलकी.

---

नं. ६८७८ श्री. (आषाढ शु. ४-१३ जुलै.)

पै. छ. ७ रबिलाखर. सन खमस मय्यातैन.

सेवेशीं साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ. ३ रबिलाखर पावेतों स्वामीचे कृपावलोकनें करून वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं छ. २४ रबिलावलचें पत्र पाठविलें तें पावलें. पाहून बहुत आनंद जाहला. हाल्लीं इकडील वर्तमान तरी, राजश्री येशवंतराव होळकर उज्जनीचे उत्तरेस अगरसागर येथें सत्तावीस कोसांवर मुक्काम करून आहेत. शामतखान पठाण यास हरिद्वाराहून बोलाविलें. ते तिकडेस येत होते. त्यास काल्पीनजीक इंग्रजांचीं पलटणें होतीं व जयपूराहून दोन चार पलटणें व दोन तीन हजार तुरुकस्वार येऊन पलटणें एकत्र होऊन शामतखान याचा पिच्छा केला. त्यास पठाण व पलटणें यांची लढाई सुरू भेलशाच्या नजीक होऊन तीन चार पलटणें व हजार बाराशें तुरुकस्वार पठाण यांनीं गारद करून पठाण भेलशाहून वीस कोस अलीकडे आले. हरिनाथसिंग[2] उज्जनीस दाखल होऊन क्षिप्रेवर मुक्काम करून शहरांतील गल्ला, घास, लकडी लुटतात. सिंदेबहादूर यांजकडील राजश्री सदाशिवराव बक्षी यांस शिकस्त करून पलटणें वगैरे मारलीं. बक्षी पळोन बहादूर याजकडेस आले. सिंदे नर्मदेवर गेले होते. त्यास हरिनाथसिंग यांनीं सांगून पाठविलें जे तुम्ही इकडे न येणें. यशवंतराव यास कळलें

---

१ हंगामी. २ हा जातीनें रजपूत किंवा जाठ नसून ब्राह्मण होता.

असतां परिणाम ठीक नाहीं. त्यावरून सिंदे बहादूर बराणपुरास येऊन तेथून कूच करून जामनेरानजीक आले. पुढें आजंठ्याच्या घाटाखालीं येणार. बऱ्हाणपुरीं दीड सेरांची धारण व सिंदे बहादूर यांस सर्व गोष्टींची तंगचाई होऊन फौज वगैरे लोक बहुत उठोन गेले. सरदारी बहुत गरीबदारींत आहे. होळकराचा रोख भागानगराकडे जावयाचा आहे. जनरल वसली येथून पट्टणाकडे बहुत जलदीनें गेले. याचें कारण तर पूर्वेकडून फरांसीस काडकाल बंदरास दाखल जाहला. [1]किरिटी व श्वेतपति राजे पालेली यांणीं पूर्णिया याचे विचारें फरांशिस याजकडेस संधान करून पट्टणांत फितूर करून लांब नेलें म्हणोन येथें वर्तमान जनरेल यास समजलें व कलकत्याहून हुकूम आला जे जलद पट्टणास जाणें. त्यावरून जनरल वसली पट्टणास निघून गेले. म्हणोन दरबारांत व शहरांत व करनल कलुस याजकडेस याप्रमाणेंच बोलतात. परंतु ठिकाणचें कागदींपत्रीं वर्तमान पक्केपणें समजलें म्हणजे सेवेशीं लिहूं. स्वामीस पट्टणाकडील पक्कें वर्तमान समजलें असल्यास ल्याहावयास आज्ञा व्हावी. छ. २२ रोजीं करनेल कलुस सरकारवाड्यांत येऊन श्रीमंत कारभारी बसून प्रहरभर खलबत करून करनल कलुस यांणीं विनंती केली जे होळकर यांचें पारपत्य आमच्यानें होत नाहीं. सरकारांतून सल्हा करावयास आज्ञा व्हावी. म्हणजे आम्ही दरम्यान येऊन करूं. त्यावरून आज्ञा केली जे विचार करून सांगूं. कलुस यांणीं मुमईस जाण्याविसी विनंती केली. त्यास आज्ञाही जाहली. आठ चौ रोजां जातील. राजश्री नरसी खंडेराव यास सिक्के कट्यार देऊन आवाहन जाहलें आहे. विसर्जन लौकरच होईल! सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६८७९ श्री. (आषाढ शु. ९–१६ जुलै.)

पैवस्ती छ. १४ रबिलाखर. खमस मयातैन आलफ.

सेवेशीं सा॥ नमस्कार. विज्ञापना. तागाईत छ. ८ रबिलाखर पावेतों स्वामीचे कृपावलोकनें करून वर्तमान यथास्थित असे. विशेष. पूर्वी स्वामीकडेस छ. १ मिनहूनचें पत्र पाठविलें आहे. त्यावरून सविस्तर ध्यानारूढ

---

1 किरीटी हा त्रावणकोरचा राजा. श्वेतपति हा कोचीनचा राजा.

झालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी छ. ९ रबिलावलचीं पत्रें उत्तरेकडून आलीं आहेत. त्यांतील वर्तमान तरी राजश्री यशवन्तराव होळकर लाखेरीच्या बारीच्या मार्गें भेलशानजीक आले. त्यांच्या पीछावर आग्रे व जयपूर व काल्पी येथील पलटणें मिळून सात व तुरुकस्वार पांच हजार याप्रमाणें पीछावर आलीं. त्यास होळकर यांनीं बारीची जागा अडचणी जाणून पलटणें व तुरुकस्वार बारींत सांपडून मागून पुढें फौजा घालून बुडवून टाकिलीं. नंतर होळकर पुन्हा भेलशांजवळ आले. त्यास हें वर्तमान जयपूर व आग्रे व काल्पी येथील इंग्रजांस समजल्यानंतर काल्पी प्रांतींचा बुशीसाहेब इंग्रज प्रयागास निघून गेले. काल्पी व झांशी वगैरे डंगाई येथील प्रांतीं इंग्रजांचा अंमल होता तो मीरखान पठाण यांनीं आपला अंमल कायम केला. जयपूरकर यांस सामील इंग्रज होता तो जयपूरनें निघून लखनौस गेले. जयपुरानजीक नागो जिवाजी तीस हजार फौजेनिशीं आहेत. आग्र्यास लिकसाहेब फिरंगी होते ते दिल्लीस निघून गेले. तिकडेस शामतखान पठाण गेले आहेत. सारांश हिंदुस्थानांत इंग्रजांनीं फैलाव केला होता तो होळकराच्या जरबीमुळें जिकडील तिकडे गेले. होळकर यांनीं पूर्वी महमूदशाहा पातशाहा तुराणी याजपासून बहालीचा सिक्का आणला आहे. त्याची नक्कल पेशजीं पाठविलीच आहे. हल्लीं राजश्री यशवन्तराव होळकर यांनीं दिल्लीहून आलीगोहर पातशाहा याजपासून मरातबाचा सिक्का करून घेऊन आणला आहे. त्या सिक्क्याची नक्कल हल्लीं सेवेशीं पाठविली आहे. सरकारांत विनंती-पत्रें शिक्क्यासुद्धां होळकर यांनीं पाठविलीं आहेत. शिंदेबहादुर यांनीं होळकर यांचे वकील राजश्री खंडो महादेव याजकडेस राजश्री आत्मारामपन्त [1]बाबा व विठ्ठल महादेव[2] व गोपाळराव रघुनाथ चिटणीस असे पाठवून यासी बोलणें परस्परें जाहलें जे. आम्हाकडील सरदार बापूजी शिंदे व सदाशिवराव बक्षी यांचें पारिपत्य करून आमच्या फौजा बुडवावयास कारण कोणतें व तुमची आमची सफाई होऊन राजश्री खंडेराव होळकर तुमचे स्वाधीन केले ते सयर्यी सर्व मुद्दे कबूल करून

---

१ उपनांव तांबोळी. २ बक्षी.

सफाई परस्परें जाहली असतां आमच्या सरदारांचीं पारपत्यें करावीं हें ठीक केलें नाहीं. याजवर खंडो महादेव यांनीं उत्तरें केलीं जे, तुम्हीं व इंग्रज एक होऊन इंग्रजांस तुम्हांकडील सरदार बापूजी शिंदे फौज सुद्धां सामील होऊन आमचें पारपत्य करावें हा बेत तुमचा होता. त्यास तुमची काबू न सावली. आमचा हात पोंचला. आम्हीं ठोकलें. याचप्रमाणें तुम्हाकडील सदाशिवराव बक्षी पलटणेंसुद्धां हरिनाथावर गेले होते. सबब त्यांचेंहि पारपत्य हरिनाथांनीं केलें. असे कितीएक मजकूर परस्परें बोलणीं होऊन सारांश ठरला जे, इतःपर तुमचा आमचा विचार एक याप्रमाणें परस्परें कागदींपत्रीं पक्केपणें विचार ठरून शिंदे बहादुर यांचीं पत्रें होळकरास गेलीं व होळकर यांजकडून बहादुर यांस येऊन परस्परें एक विचार पक्का ठरून उज्जनीहून हरिनाथसिंग यांनीं कूच करून धारेकडेस गेले व यशवन्तराव होळकर यांनीं कूच करून पुन्हां कोट्याचे सुमारास गेले. श्रीमन्त राजश्री रावसाहेब आषाढ शु १५ च्या ग्रहणाकरतां नाशकास निघून जाणार. तेथून पूर्वेस उमरावतीच्या सुमारास जावें असा बेत आहे. शिंदे बहादुर यांजपाशीं वायफसाहेब फिरंगी चेनापट्टकर, वकिलीस आहे. तेही निघून भागानगरचे मार्गें चेनापट्टणास जाणार. येथें पुण्यांत करनेल कलुस वगैरे आणखी मुखत्यार फिरंगी आहेत. तेही ममईस वरचेवर जात आहेत. करनेलही ममईस निघून जाणार. सारांश हिंदुस्थानांत व स्वदेशीं व येथें होळकर याची जरब बहुत व फौज दोन तीन लाख बरोबर याजकरतां सर्वांस विचार बहुत पडून बहुत गरीबदारींत आहेत. वसलीसाहेब पट्टणास माघारे गेले. याप्रमाणेंच हिंदुस्थानांतील चार पांच इंग्रज सरदार होते ते मघारे आपल्या हद्दींत गेले. वायफसाहेब शिंद्यापाशीं आहेत. तेही लौकरच जाणार. येथें इंग्रज आहेत तेहि जाण्याचे तरतुदींत आहेत. बादबरसाद तिन्ही सरदार शिंदे भोसले होळकर हे स्वदेशी येतात. याप्रमाणें तिकडील वर्तमान आहे. नबाब पोलादजंग याचे कारभारी रघूत्तमराव यांजकडेस कारभारसंबंधें ××× होता याजमुळें मशारनिल्हे कामाकाजांतून दूर होते. असें असतां रघूत्तमराव यांनीं नबाबास अर्जी लिहिली जे करोड रुपये नजर देतों. कारभार आम्हांस सांगावा. त्यावरोन नबाबाचा व बक्षी बेगम याचा हुकूम झाला जे, तोपेखान्यांत नजर

पोंचती करावी. नंतर तुम्हांस कारभाराचीं वस्त्रें देऊं. त्यावरून रघूत्तमराव यांनीं पाऊण करोडपर्यंत भरणा केला. नंतर बेगम वगैरे यांनीं कांहीं एक मनसुब्याचा गुन्हा ठेवून मशारनिल्हेस नजरबंद केलें. आषाढ शु॥ १५ ग्रहण आहे म्हणून श्रीमंतांची स्वारी वाईस जाणार असा बेत आहे. याप्रमाणें येथील मजकूर आहे. पुढें होईल तें सेवेशीं लिहूं. सेवेशीं श्रुत होय विज्ञापना.

---

नं. ६८८०. श्री. (नक्कल) (१८ जुलै.)

विनंती सेवक अंताजी हरि कानिटकर दोन्ही कर जोडून कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ आषाढ शु. ११ बुधवार प्रातःकाल मु॥ लष्कर नजीक कासेगांव येथें स्वामीचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. काल दोन प्रहर नंतर फत्तेसिंग माने याची व आमचे फौजेची लढाई कासेगांवचे उत्तरेस जाहली. फत्तेसिंगाची फौज च्यार हजार होती. त्याचा मोड जाहला. नारायणराव माने ठार झाले. फत्तेसिंग माने याचा मुक्काम पंढरपुरावर जाला होता. तेथपर्यंत इकडील फौजेचा पाटलाग जाहला. गोटांत कांहीं फौज राहिली होती ती व मोडापैकीं पांच सातशें सडे पळोन काळपरीचे कुरोलीचे सुमारें गेले. गोट दरोबस्त लुटला. मान्याकडील तोफा पांच पाडाव आल्या त्या पंताकडेच दिल्या. तोफा करितां आम्ही झटलों नाहीं. फौजेचें कामकाज बहुत चांगलें जाहलें. लढाई मान्याची आमचे फौजेशींच जाहली. पंताकडील रा॥ भगवंतराव बापू लिगाडे दोनशें लोकांनिशीं आमचे डावे बाजूस होते त्यांनीं मात्र कुमक केली. पंताकडील कारभारी फौजेसुद्धां उजवे बाजूस उभे होते. मान्याची लढाई होऊन मान्याचा मोड जाहला. ते पळों लागले. आम्ही पाठीस लागलो नंतर त्यांचे लोकांनीं उठावणी केली. याप्रमाणें लढाईंतील मजकूर जाहला. स्वामीचे कृपेनें यश मोठेंच आलें. फत्तेसिंग मान्यास गोळी लागोन व एक भाल्याची जखम लागोन ठार जाहला म्हणतात. परंतु पक्की बातमी अद्याप आली नाहीं. आल्यानंतर सेवेशीं लिहितों. आम्हाकडे पाडाव हत्ती एक व उंटावरील नौबती दोन, घोड्यावरील नगारा एक येणप्रमाणें व निशाणें दोन व ढाल रुवाईची याप्रमाणें आले आहे. सेवेसीं विदित होय. हे विज्ञापना.

नं. ६८८१ श्री. (नक्कल) (आषाढ शु ११-१८जुलै.)

[1]विज्ञापना. इकडील फौजेंतील जखमी जाहले त्यांची याद अलाहिदा पाठविली आहे. व ठार झांगले मंडळीपैकीं दोन, घाटगे व सरंजामी याकडील बारगीर एक येणेंप्रमाणें तीन ठार जाहले. आणखी दोघांचा ठिकाण नाहीं. त्यांचा पत्ता लाऊन मागाऊन शेवेसीं लिहितों. राजश्री महादजी चिंतामण जोशी व बाळाजीपंत टकले या त्रिवर्गाचीं काजकामें चांगलीं जाहलीं. बाळाजीपंत टकले यांच्या छातीस गोळी लागून पाठींत पार झाली. जखम भारी आहे. ते श्रीक्षेत्रीं राजश्री कृष्णाप्पा नाईक नरगुंदे यांचे घरीं आहेत. राजश्री महादाजी चिंतामण जोशी यांचे उजवे हातास तरवारेची जखम आहे. हलकीच आहे. मान्याकडील घोडीं लुटीचीं आमचे गोटांत पांच सातशें घोडे व उंट, दहा बैल, गुरें वगैरे लूट बहुत आली. हत्ती, नौबती, नगारा, निशाणें असें पंतांकडील कारभारी मागत आहेत; परंतु मी देत नाहीं म्हणून त्यांस निक्षून सांगितलें. त्यांनीं कराराची यादीची नक्कल मला दाखविली. त्या यादींत हत्ती, तोफा, नगारे, नौबत, जामदारखाना व मातबर गृहस्थ पाडाव आला असतां आपण घ्यावा असें कलम लिहिलें आहे. परंतु त्या यादीवरून मला द्यावयास येत नाहीं. स्वामीची आज्ञा येईल त्याप्रमाणें वर्तणूक करीन. छा १० रबिलाखरपर्यंत तेथून निघाले तारखेपासून महिना झाला. खर्चाची बेगमी सरत आली. पुढेंही खर्चास त्याजकडून नक्त पावावयाचें दिसत नाहीं. महाल लाऊन घ्यावा असें कलम यादींत आहे. येविसीं कसी वर्तणूक करावी त्याची आज्ञा जाली पाहिजे. पंताकडील कारभारी यांणीं जखमेचे खर्चाबद्दल तूर्त तीनशें रुपये दिले आहेत. याद ठरल्यावर बाकी ऐवज देऊं असें म्हणताहेत. पत्राचें उत्तर लौकरच पाठवावयास आज्ञा जाहली पाहिजे. शेवसीं श्रुत होय हे विज्ञापना..

---

नं. ६८८२ श्री. (आषाढ शु. ११-१८ जुलै.)

पौ। छा १३ रबिलाखर. खमस मयातैन.

---

१ ही मागच्या पत्राची पुरवणी.

ऐ. ले. १५...१९

श्रीमंत राजेश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेसीं—

विनंती[1] सेवक बाळाजी महादेव दामले चरणांवर मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. १० रबिलाखर पर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंत राजेश्री पंतप्रतिनिधि यांजकडील कारभारी मोरोपंत भाऊ व बळवंतराव फडणीस यांणीं फौजबंदी करून गेले आहेत. मुक्काम मौजे झरें येथें आहे. तीन हजार फौज जमाव आहे. शिवाय सांगलीकडून आलेली. राजेश्री फत्तेसिंगराव माने यांचा मुक्काम ठाणें दिलीव यानजीक आहे. त्याजपाशीं सात आठ हजार जमाव आहे. अद्याप त्याचा यांचा मुकाबला जाला नाहीं. एकमेकांस रोखोन आहेत. करवीरकर यांजकडील दोन हजार फौज पंताचे कुमकेस येणार म्हणोन बोलवा आहे. खाजगीकडील आरब तीन चारशें आहेत ते व राजेश्री सुभानराव माने म्हसवडकर पांचशें स्वारांनिशीं हे मसुरेस श्रीमंतांजवळ आहेत. खासगीकडील जमाव कारभारी याजबरोबर जावयाचा नाहीं म्हणोन मुक्कामीं राहिले. त्यास खर्चास पाहिजे तेव्हां श्रीमंतांनीं नेमणूक करून कुंभारगांव कोळें इकडे आरब रवाना केले आहेत. आरब तिकडे जाऊन कुंभारगांव लुटलें. वरकड गांवांनीं रोखे करून खंडण्या घेत आहेत. सुभानराव माने यांस वांई प्रांत व सातारा प्रांत नेमणूक करून दिला आहे. त्याचा मुक्काम मौजे पालीनजीक आहे. झाडून प्रातांत रोखे करून खंडण्या मनस्वी लाविल्या आहेत. शिवाय मसुरेहून माने याजकडे कोण चाकरीस गेले आहेत याची चौकशीचे रोखे जाहाले आहेत. तो हा एकच गांवोगांव दंगा जाहला आहे. अंदाधुंदी कारभार कशास कांहीं मिळत नाहीं. जिकडे तिकडे लुटतात. रहिमतपुरावर सुभानराव माने याचा रोखा येणार या दहशतीमुळें गांव तजावजा होत आहे. 'रामोशी जिल्हेदार यांचे आश्रयानें माजले आहेत. मार्ग चालों देत नाहीं. रात्रौ दरवडे घालतात. हा उपद्रव भारी जाहला आहे. पाऊस एक महिना नाहीं. पिकें वाळलीं. बाजरीचे पेरे अद्याप नाहींत. श्रीमंतांची स्वारी ग्रहणास वाईस येणार अशी बोलवा आहे. महागाई फार. पांच

१ पत्र रहिमतपुराहून मिरजेस,

मापस्यांची धारण. दाणा मिळत नाहीं. माणसें फार मरतात. त्यांत लष्कराचा दंगा आहे. शेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६८८३ श्रीगणपति. (आषाढ शु. १३–२० जुलै.)

पै. छ. १३ रबिलाखर. खमस मयातैन. आषाढ मास.

अपत्यें हरीनें शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. ताा छ. १२ रबिलाखर पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. फत्तेसिंग माने क्षेत्र पंढरपूर येथें दुर्बुधी धरून गेले होते. दोन चार घरें लुटलीं. इतक्यांत राजेश्री पंतप्रतिनिधि यांजकडील राजेश्री बळवंतराव फडणीस फौजेसुद्धां जाऊन लढाई दिली. तों मान्याचा मोड होऊन झाडून लष्कर लुटलें गेलें. माने शेदोनशें राऊतांनिसीं पळून गेले. तोफा वगैरे पाडाव फडणीसांनीं आणिलें. पंढरपुरानजीकच लढाई झाली. पंतांचे फौजेस मोठें यश आलें. तूर्त बंड मोडलें. हें वर्तमान पंढरपुराहून लिहून आलें. त्याजवरून विनंती लिहिली आहे. लढाई दशमीचे दिवशीं जाहली. शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६८८४ श्री. (आषाढ शु. १४–२१ जुलै.)

पै. छ. १५ रबिलाखर. सन खमस मयातैन. इंदुवार. आषाढ मास.

श्रीमंत राजेश्री बाळासाहेब स्वामीचे शेवेसीं—

[1]विनंती. सेवक बाळाजी महादेव दामले चरणांवर मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. १३ राा खर मंदवार सायंकाळ च्यार घटका दिवस वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजेश्री फत्तेसिंगराव माने यांची व श्रीमंत राजेश्री पंतप्रातिनिधि यांजकडील फौजेची मंगळवारीं सायंकाळचे प्रहर दिवसास श्रीपंढरपुरानजीक कासेगांवचे सुमारें लढाई होऊन लढाईत माने ठार झाले. फौज लुटली गेली. लढाईतील लोक उघडे बोडके दाहा पांच असामी येथें येऊन पोंचले. लष्कराचे लोक यांणीं मुरद्यांस आग दिल्ही. याप्रमाणें वर्तमान आहे. शेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

१ पत्र रहिमतपुराहून मिरजस.

नं. ६८८५ श्री. (आषाढ शु. १४–२१ जुलै.)

पौ छा १५ रबिलाखर. सन खमस.

शेवेसीं[1] विनंती सेवक बाळाजी महादेव दामले चरणांवर मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा १३ रबिलाखर पर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. फत्तेसिंगराव माने टार होऊन फौजेची वाताहात झाली. माने याचा वाडयाचा कारखाना चालत होता तो श्रीमंत राजश्री पंतप्रतिनिधि यांचे दहशतीनें पेशजींच बंद जाहला आहे. लाकडें वगैरे वाडयाचीं तशींच पडलीं आहेत. पंताकडील माने याचे वाडयाचे जसीस व माने याजकडे कोण कोण गेले होते त्याचे चौकशीस कारकून येणार; ते उगाच दोष ठेऊन गांव नागवावयाचे विचारांत आहेत. त्याजकडे घनीपणा, दोष टेविल्यास नव्हे कोणाच्यानें म्हणवत नाहीं. याजकरितां येथील चौकसी होणें ती आपलेच सरकारांतून जाहल्यास गांवचा बचाव होऊन सरकारांत किफायतही होईल. बंडवाले प्रतिनिधि यांचेच अन्याईदार असा अर्थ नाहीं. याजकरितां स्वामीस विनंती लिहिली आहे. ध्यानांत आणून आज्ञा झाली पाहिजे. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६८८६ श्रीगणराज. (आषाढ शु. १५–२२ जुलै.)

पै. छ. १४ रबिलाखर. सन खमस.

[2]चिरंजीव राजश्री त्रिंबकराव अप्पा यांसी आशीर्वाद. उपरी. जनरल वसली बहादूर मजल दर मजल छ. ४ रबिलाखरीं हरिहरास जाऊन तुंगभद्रापार होऊन तेच दिवशीं रात्रौ पुढें घोड्यांच्या डाकेवरून गेले. नाकस साहेब मागें राहिले होते ते छ. ७ तारखेस कारखाना घेऊन पुढें जाणार होते. त्यास गेले असतील. रा. फत्तेसिंग माने श्रीक्षेत्र पंढरीकडे क्षेत्रांतील दोन चार घरें लुटलीं. तों पिच्छावर रा. पंतप्रतिनिधि यांजकडील फौज गेली. फौजेंत रा. बळवंतराव फडणीस होते. त्यांची यांची लढाई क्षेत्रानजीक आषाढ शु १० स होऊन माने

---

१ पत्र रहिमतपुराहून मिरजेस. २ पत्र गंगाधरराव गोविंद यांचें मिरजेहून कुरुंदवाडास.

यांचा मोड जाला. सलतनत तोफांसुद्धां पंतप्रतिनिधींकडे पाडाव आली. पुण्यांत धारण पांच शेरांची करावी असा सरकारचा हुकूम झालेवरून वाण्यांचीं दुकानें बंद होतीं. तत्राप पायलीची धारण झाली नाहीं. आठ रोज शहरांत धान्याविशीं हाहाकार जाला. नंतर धारण होईल ती करावी अशी सरकारची आज्ञा जालेवरून वाण्यांचीं दुकानें उघडलीं. उकडे तांदूळ कोंडा नासका जिन्नस सव्वादोन शेर मिळतो. जोरी बाजरी मिळतच नाहीं. याअन्वयें रा. घोडोपंत जोशी यांचें पत्र आषाढ शु नवमीचें काल मंदवारीं आलें. कळावें रा। १४ रबिलाखर. हे आशीर्वाद.

---

नं. ६८८७ श्री. (आषाढ व. १–२३ जुलै.)

पैवस्ती छ. १९ रबिलावल. सु॥ सन खमस मयातैन.

सेवेशीं साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागाईत छा। १५ रबिलावल पावेतों स्वामीचे कृपावलोकनें करून वर्तमान यथास्थित असों. विशेष. राजश्री यशवन्तराव होळकर दिल्लीनजीक जाऊन भागीरथीपार कलकत्त्याचे प्रांतांत राहिले. तीस हजार व शीख चाळीस हजार व खासगत फौज पंचवीस हजार येणेंप्रमाणें रवाना करून तो प्रान्त बेचिराख करावयासी सांगून लखनौ प्रांतीं मीरखान व शामतखान व नागो जिवाजी यांस साठ हजार फौजेनिशीं रवाना करून लखनौ प्रांत बेचिराख करून शहरचे पुरे जाळले. होळकर खासा लाख स्वार सडे घेऊन दररोज तीस चाळीस कोसांची मजल करून उज्जनीनजीक आठरा कोसांवर आल्याचीं पत्रें आलीं व ××× व हरनाथ पेशजी उज्जनीनजीक तीस हजार फौजेनिशीं आहेत. त्यास कलकत्त्याहून वसली यांस हुकूम आला जे, होळकर यांनीं कलकत्ते व लखनौस उपद्रव करून प्रांत तख्तताराज करितात. त्यास आजपर्यंत कुंपणीचा पैका खर्च होऊन दौलत खराबीस होत आली. त्यांस तुम्ही देखत पत्र निघून [1]पट्टणास जाणें. त्यांस होळकर याची उमेद पट्टणास जाण्याची आहे. याजकरतां तुम्ही पट्टणास जाऊन तेथील बंदोबस्त राखणें. त्यावरून वसली चंद्र १४ रोजीं चांदवडाहून कूच करून फौज पलटणें सुद्धां पुण्यास आले. नंतर शनिवारीं रात्रीं श्रीमंतांकडेस

---

१ श्रीरंगपट्टण.

वसलीस मेजवानी होऊन सांप्रदायाप्रमाणें जवाहीर वगैरे वस्त्रें दिलीं. सरकारचा निरोप झाला. आज रविवारीं सदाशिव माणकेश्वर यांच्या मेजवान्या होऊन बनल्यास आज कूच करतील किंवा सोमवारीं प्रातःकाळीं करतील. बुणगें वगैरे याचें कूच होऊन दिव्याचे घाटें चालू झालें. पुढें मिरजेचे मार्गें वसली पट्टणास जाणार. याप्रमाणें वर्तमान आहे. पुढें होईल तें सेवेसीं लिहूं. सेवेशीं श्रुत होय. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

---

नं. ६८८८ श्री. (आषाढ वद्य १–२३ जुलै.)

पौ छा १७ रबिलाखर. सन खमस. आषाढ.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेसीं विनंती. सेवक [1]रामाजी अनंत कृतानेक साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा १५ रबिलाखर पावेतों स्वामीचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. मी जमखिंडीस आषाढ शुद्ध १२ गुरुवारीं गेलों. श्रीमंत राजश्री आपासाहेब यांची भेट झाली. दोन दिवस ठेऊन घेतलें. काल रविवारीं पौर्णिमेस घरीं आलों. तिकडील वर्तमान. राजश्री पांडुरंगपंत याजकडून गोळागोळी थोडीबहुत चाललीच आहे. दरम्यान बोलण्यास गुरशिदाप्पा देसाई गेले होते. त्यांजकडून आडमुद्याची यादी आली. त्याप्रमाणें कलमांतील हांशील पाहून रुकार द्यावयाचे दिले असतां मशारनिल्हे तोडीस न येत. तेव्हां तोफा व आरब वगैरे लोकांची तरतूद चाललीच आहे. आंतील [2]कार्टकांचीं रांडापोरें सांपडलीं त्यांस हाणमार करून मोर्चे किल्ल्यानजीक गेले तेथें गोळयाचे सुमारें रांडापोरें उभीं करितात. तेव्हां आंतून गोळी बंद होते. असाही प्रयत्न चाललाच आहे. परंतु विवेकेंकरून पांडुरंगपंत लौकर किल्ल्यांतून उतरत नाहींत. बदमामली करणेची बाकी सेवकांकडून राहिली नाहीं. सरकारची दारुगोळी मनस्वी व तोफा किल्यांतच आहेत. जामदारखाना व गल्ला व किराणा जिन्नस व कापड वगैरे सामान एक वर्षाचे बेगमीचें तितकेंही त्याचे हस्तगत होऊन उमेदवारी धरली आहे. दुतर्फा सरकारची खराबी. विना तोफांशिवाय काट चालत नाहीं. सर-

---

१ हे तेरदाळचे फडणीस. २ काटक = कर्नाटकी पायदळी शिपाई.

कारचे बंदीवान व मुनसी वगैरे कैदेंत होते त्यांस त्यांणीं सोडिलें. बरकड बंदीवान पळोन गेले. त्यांणीं बाहेर येऊन सरकारच्या पागेचीं घोडीं चोरून नेलीं. मुनसी मात्र आप्पासाहेब याजपासीं आले. सारांश आप्पासाहेब क्षमाशील. त्याचे आडमुद्दे बहुत चालविले परंतु ते कांहीं तोडीस येत नाहींत. याउपरी काय ठरतें पहावें. मलाही याच प्रयत्नास आणविलें. मजारनिल्हेची बहुत ओढ पाहून काटकांचें पारपत्य करावें हा हिय्या श्रीमंतांचा. तूर्त ते शुद्धीवर नाहींत त्यापेक्षां तुम्हीं गांवास जावें. नजीकच आहां. काम लागेल तसें बोलऊं. अशी आज्ञा जाहल्यावरून निरोप घेऊन आलों. राजश्री बाळाजीपंत जोशीही तेथें आले आहेत. सविस्तर सेवेसीं कळावें करितां विनंती लिहिली असे. बहुत काय लिहिणें. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६८८९ श्री. (आषाढ शु. ६–२८ जुलै.)

पै. छ. २७ रबिलाखर. खमस मय्यातैन.

सेवेशीं साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. २० रबिलाखर पावेतों स्वामींचे कृपावलोकनें करून वर्तमान यथास्थित असे. विशेष. उत्तरेकडील वर्तमान तर राजश्री येशवंतराव होळकर उज्जनीनजीकनें कूच करून मंदूसरास जाऊन तेथील खंडणी पांच लाख रुपये घेऊन शहर लुटून महेश्वरच्या रइतेस सांगून पाठविलें जे, तुम्हास कळेल तिकडे चीजवस्तसुद्धां निघून जाणें. त्यावरून रयत कुल निघून गेल्यानंतर महेश्वरास पलटणें पाठवून शहर जाळलें. म्हणून वर्तमान आलें आहे. याचें कारण तर जयपुराकडून दहा पलटणें व दहा बारा हजार तुरुकस्वार होळकर यांचे पिच्छावर आले आहेत व गुजराथकडून एक कंपू व पांच हजार तुरुकस्वार महीकांठानें पायगडानजीक येऊन तेथून होळकर यांच्या मोहऱ्यावर महेश्वरच्या सुमारास येणार म्हणोन महेश्वरास अग्न दिली. पुढें होळकरांचा व इंग्रजांचा पलटणाचा लढाईचा इरादा भारी आहे. होळकर यांजपासीं दोन लाख फौजेचा जमाव व हरिनाथसिंग यांजपासीं तीस पस्तीस हजार फौज व तीस पलटणा व दोन अडीचशें तोफा इतक्या सरंजामानिसीं होळकर मजबुतीनें हुशार राहून दोन्हीकडील

पलटणा येत आहेत. त्यासी लढाई द्यावी म्हणोन उमेदवार आहेत. मीरखान पठाण झासीकडून होळकरांनीं बोलाविले ते जयपुराकडील पलटणें येत आहेत त्याच्या पिच्छावर आहेत. शामतखान पठाण अंतरवेदींत उतरले आहेत. त्याणीं इंग्रजांच्या मुलखाची बहुत खराबी केली. नागो जिवाजी वगैरे फौज लखनौ प्रांतीं गेले. त्याणींही तो प्रांत बहुत तख्ततराज केला. म्हणून दिल्लीहून व उज्जनी व ब-हाणपुराहून पत्रें आलीं. त्यांत सदरहूप्रमाणें मजकूर लिहिला आहे. तो सेवेशीं लिहिला आहे. श्रीमंत राजश्री रावसाहेब याजवळील मंडळी कारभारी, चिटणीस, मुजुमदार, वाकनीस वगैरे झाडून बारा पंधरा असामी येथें छ. १८ रोजीं आली आहे. ते भांबोड्यास आहेत. यावयाचें कारण काय तें पक्कें समजल्यावर सेवेसीं लिहूं. रावसाहेब यांजकडील मंडळ आलें, त्याचें कारण वसलीनीं मंडळाचा बंदोबस्त करून दिला होता. त्यांत करनल कलुस याणीं दिक्कत घेऊन दरमाहात खलेले केली होती. याजकरितां मंडळी येऊन बंदोबस्त करून घेतला. लौकरच माघारे जाणार. श्रीमंत राजश्री रावसाहेब महायात्रेस निघणार आहेत. इंग्रजांचे तीनशे लोक बरोबर घेऊन सिंदे, भोसले, होळकर यांचा प्रांत चुकावून इंग्रजांचे अंमलांतून श्रीरंगनाथकडून जाणार. याप्रमाणें बेत जाहला आहे. श्रीगणपतीचा उत्साह उमरखेडांत अगर आसपास करावा याप्रमाणें बेत जाहला आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६८९० श्रीत्र्यंकटेश. (आषाढ व. ७–२९ जुलै.)

पौ छा २३ रबिलखर. सन खमस.

राजश्रीया विराजित राजमान्य राजेश्री गंगाधररावजी स्वामीचे सेवेशीं. [1]पोष्य नारायणराव त्र्यंकटेश साष्टांग नमस्कार. विनंति. येथील कुशल तागायत छा २१ रबिलाखर जाणोन स्वकीय कुशललेखन करीत असलें पाहिजे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. निंबाजी यादवाची जप्ती करावयाचें कारण समजण्यांत आलें असल्यास लेखावें व तिकडील वातमी लिहावी म्हणोन लिहीलें. त्यास घाटग्यांचे मध्यस्थींत राजश्री आकाराम यादव होते. त्यास हुजूर समजाविलें एकप्रकार व घाटग्यांकडे

---

1 पत्र इचलकरंजीहून मिरजेस.

बोलणें एक प्रकार समजाऊन ऐवजाकरितां जवाहिर गहाण घेतलें, तें मध्येंच यादवांकडे राहिलें. हल्लीं घाटगे हुजूर समक्ष येऊन मनास आणत यादवाकडे तफावत निघाली. सबब गहाण दागिने घेऊन शिवाय दोन् लाख रुपये बाकी वगैरे व कारकुनाकडे वीसपंचवीस हजार रुपये घेतले. याप्रमाणें लौकिकांत वर्तमान बोलतात. आणखी अंतर्गत आरोप काय ठेविला असेल हें समजत नाहीं. राजकीय वर्तमान तर पांच सातशें स्वार जमा जाहले आहेत. खासा महाराजच बाहेर निघणार अगर पाटणकर व रायाजी जाधव यांची रवानगी करणार. जावयाची धोप शिराळ्याकडे बोलतात. नंतर कोणीकडे जातात पाहावें. याप्रमाणें एका गृहस्थाकडून निरोप आला आहे. आणखी बातमीस गडी पाठविले आहेत. अधिकोत्तर वर्तमान असल्यास लिहून कळवितों. बहुत काय लिहीणें. लोभ करावा हे विनंती.

नं. ६८९१ श्री. ( आषाढ–जुलै. )

विज्ञापना. या प्रसंगीं इंग्रजांस सोडून सरकारची मर्जी रक्षून राहूं म्हटल्यास परिणाम नाहीं. सरकार तों आश्रयस्थान तेव्हां दोहींकडून संकट. याकरितां दोहींकडून संधानें मजबूद राखणें प्राप्त आहेत. सरकारचें आहेच. प्रस्तुत इंग्रजांचें मन रक्षणें त्यास अलाहिदा पत्रीं लिंहिलें आहे त्याप्रमाणें त्यांजवर ओझें ठेवल्यानें सरकारांत वाईट वाटलें तरी येथील मर्जी संभाळून घ्यावयास येईल. परंतु आपलीं कामें तरी होतील. सारांश ममतेनें चार महिने लोटावे. नंतर रंग दिसेल तसें करतां येईल. येथील भरंवसा धरून परिणाम अगदीं नाहीं ! सर्व भाव लिहिले आहेत त्याचें मनन जालें पाहिजे. येथें यावयाचा बेत तूर्त करूं नये. विदित होय हे विज्ञापना.

नं. ६८९२ श्री. ( आषाढ–जुलै. )

श्रीकृष्णजी समर्थ याचा सेवक केदारजीबावा यास देवाजीनीं भविष्य सांगितलें जें– राज्य खलबलेल. राज्यामध्यें बंद नाहीं. प्रजा पिडून बहुत क्लेशांत पावली. सबब देवानीं कृपाळू होऊन अवतार पुरुष निर्माण जाला आहे. नेमणूक (?) इ. शके १७२५ वैशाख शु. १ तहत शके

ऐ. ले. १५–२०

१७२६ पौष शु. १ एकूण एकवीस महिने उपोषण जालें आहे. त्यांत बारा महिने जाले: बाकी नऊ महिने पौष शु. १ होणार. नंतर एकवीस रोज तपश्चर्या होणार व राजसूय यज्ञ होणार. एकवीस कवस्या आणून आंत तेल घालून पाप पृथ्वींतील जाळून भस्म जाहलें. नंतर राज्याचा बंदोबस्त होऊन एकछत्री राज्य चालेल. श्रीकृष्णजीनीं साक्षात्कार भेटून सांगितलें आहे.

---

नं. ६८९३ श्री. ( आषाढ–जुलै. )

यादी

पन्हाळेकर[1] याणीं बोडक्यांची[2] कुमक करून नाहीं म्हणोन लिहितात तेविशीं तालका[3] पत्रें सांपडल्या आहेत, पाहाव्या. भाऊ जोशी याणीं कुमक केली नाहीं असें लिहिले आहे त्यास व जखमी तुमचे लोक जाहलेत ते. कलम १.

शिराळयाचें ठाणें कराराप्रमाणें हवालीं न जाहालें, त्याचा वसुला घेतला तो सरकारचें ठाणें बसेपर्यंत देववावें. हल्लीं सरकार ठाणें घालण्याचें प्रयोजन काय ? तें सोडून द्यावें. कलम.

भाऊ जोशीराव याणीं पत्र पाठविलें त्यांत लिहिलें आहे आपलीं लिहिणीं जरबेचीं येतात तीं येऊं नयेत. कलम.

परस्परें तालुक्यांतील तळीखोर[4] आहेत त्यांस पत्ता लावून दिला असतां तळीखोर यांस द्यावें घ्यावें. कलम

शाहापुराकडे फौज महाराजांची गेली. त्या वेळेस धाण दाणा क्रिया देऊन घेतला याचें स्मरण क्रियेचें असावें. कलम

सन ईहिदे मयातैनातं राजश्री रत्नाकरपंत याणीं निपाणकर व सखाराम घाटगे यास सांगोन दुधगांवची खराबी केली, गांव लुटून जाळला, येविशींचा जाबसाल उलगडा व्हावयाचा. कलम

मौजे श्रीगोदीकर पाटील भाऊबंद, नागपा नंदगौडा व मोळेकर चौगुला व कागवाडकर पाटील, मौजे वाडी कसबे सांगली एथील बिरादर बापू बरमाजी पाटील, हे आकिवाट व इतर गांवीं राहून इकडील

---

१ करवीरकर. २ मल्हारजी बोडके. ३ तालीक = नकल. ४ दंगेखोर.

प्रांतांत दावे करितात त्याचा जाबसाल व्हावयाचा. कलम.

मौजे बेदरी कसबें नांदरें एथील बैल नेले. ते हल्लीं चिकोडींत आहेत त्याचा जाबसाल व्हावयाचा. कलम.

मंगळवेढें परगण्यांतील बैल मालसुद्धां ठेविले ते जरा बाजरा सोडावे. कलम.

इकडील कारभारी याजजवळ बोलण्यांत आलें कीं तुमचा आमचा भाई चारा व सरकार आज्ञा आली असतां तुमचेकडे शब्द नाहीं असें बोलून बेल भांडार दिला होता. वचन कोणाचें ? व शाहापुराकडे फौज गेली त्यांतील बुणगें बारींत फौज पुढें गेल्यामुळें कांहीं तट्टें व उंट नेले. करवीराचे आपले कारखान्यांत नेले हें काय ? कलम १.

शिराळ्याच्या ठाण्यांतून रामगोंडा पाटील नेला, त्यास पाटील माघारा द्यावा. शिराळ्यांतून प्यादे कौलानें उतरले तेव्हांचा करार त्यांस माघारा द्यावा द्यावा. त्यास सदरहू लिहिले अन्वयें पाटील मजकूर यावा. कलम.

इकडील तालुक्यांत दरवडे वगैरे आपल्या तालुक्यांत आकिवाट वगैरे एथें राहून लाखों रुपयांची खराबी केली व करितात त्याचा जाबसाल व्हावा. कलम १.

रत्नाकरपंत कर्नाटकांत गेले होते, ते वेळेस हुबळी वगैरे तालुक्यांतून ऐवज घेऊन हुबळीचे पेठेची खराबी लाखो रुपयांची केली. त्याचा जाबसाल व्हावयाचा. कलम १.

करनाळांतून बैल लमाण नेलें त्याचा जाबसाल व्हावयाचा. कलम १.

पलीकडील गांवास कह्या[1] वगैरे करून गुरें व ढोरें वगैरे नेलें त्याचा जाबसाल होणें. कलम १.

---

नं. ६८९४ श्रीगणपतिर्जयति. (आषाढ व. ३०–५ आगष्ट.)

पैा छ. २ जमादिलावल. सन खमस मय्यातैन. श्रावण.

अपत्यें चिंतामणीनें शिरसाा विज्ञापना. ताा छ. २८ रबिलाखरपर्यंत यथास्थित असे. विशेष. राा नाईकजी घाटगे सरंजामी मौजें कुमटें याकडील बारगीर फत्तेशिंग माने

---

1 कह्या = दाणावैरण आणणारी लष्करी टोळी.

याचे लढाईंत ठार होऊन घोडी पाडाव गेले. याशिवाय बारगीर जखमी जाले. त्यास कैलासवासी त्रिंबकराव मामा यांची लढाई मोती तळ्यावर[1] जाली ते समयीं यशवंतराव घाटगे ठार होऊन घोडी पडली व बारगीर जखमी जाले. त्यास यशवंतराव यांचे दिवसास व बारगीर जखमी जाले त्याचे खर्चास व घोडी पडली त्याबद्दल सरकारांतून काय पावलें याचा दाखला तपशीलवार लिहून पाठवावयास आज्ञा व्हावी. स्वारी पुण्यास अगर कोठें गेल्यास तिकडे माहागाई पडली असतां घाटगे यास रोजमरे किती पावतात हें स्याहावयास आज्ञा व्हावी. सेवेसीं विदीत होय हे विज्ञापना.

---

नं. ६८९५ श्रीगणपति. (श्रावण शु.१–६ आगष्ट.)

पै. छ. १ जमादिलावल. खमस मयातैन. श्रावण. बुधवार.

[2] अपत्यें रामचंद्रानें साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाइत. छ. २९ रविलाखर पर्यंत सुखी असे. विशेष. राजेश्री बाळकृष्णपंत म्हसकर यांजबरोबर इंग्रज येत होते ते काल मुधोळास आले. आज येथें येतील. वडीलांस कळणें म्हणोन विनंती लिहिली आहे. चिरंजीव बाबास पत्र लिहिलें आहे. तें पोचतें करावें. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६८९६ श्री. (७ आगष्ट.)

पैा छा ५ जमादिलावल. सन खमस.

सेवेसीं धोंडो बापूजी जोशी त्रिकाल चरणांवरी मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. श्रावण शु. २ मंगळवार प्रहर रात्र पावेतों वर्तमान यथास्थित. आज शिध्याचे ब्राह्मण दहा पंधरा हजार फिरोन आले. शिधा सहा घटका दिवसास सरला. कवाडें शिध्याच्या दरवाज्याचीं लाविलीं. गांवांतून शिधा जाईतों अस्तमान झालें. तेथें पांच तोफा झाल्या. ब्राह्मण सोडिले. बाकीचे ब्राह्मण तसेच फिरोन आले. यंदा महर्गता. याजमुळें ब्राह्मण निकड शिधा घेण्यास करितात. दरवाज्यावर दाटी बहुत

---

१ ही मोती तलावाची लढाई हैदर व पेशवे यांमध्यें ता. ७ मार्च १७७१ रोजीं झाली. २ पत्र जमखिंडीहून मिरजेस.

होते. मारामार करितां आज तीन दरवाज्यांवर पांच ब्राह्मण मृत्यु पावले. काल एक श्रीदत्ताचे दरवाज्यास प्रथमच मृत्यु पावला. याप्रमाणें बोलतात. सिध्याचा कारभार त्रिंबकजी डेंगळ्या खिजमतगार यांजकडे यंदा सांगितला आहे. याप्रमाणें व्यवस्था झाली. उदईक बंदोबस्त कसा काय होईल न कळे. चिटणिसाचे गांवांविसीं सविस्तर वडिलीं लिहिलें. तो मजकूर राजश्री दिनकरपंत यांस समजाविला. श्रीमंतास फडणिसाचे कामाचें पुसावयाचें आहे. त्यामध्यें हेंही पुसोन घेतों असें पंत बोलले. वारंवार स्मरण करितों. कळावें. तिकडून जासूद व खिजमतगार येतात त्यांस महर्गताही बहुत. पोटास मागण्याविसीं निकड करितात. न द्यावें तरी मार्ग आला पाहिजे. यास्तव देतों. त्यास तेथून खर्चाची बंदोबस्ती करून द्यावयास आज्ञा करावी. बहुत काय लिहिणें. सेवेसीं श्रुत व्हावें ही विज्ञापना.

---

नं. ६८९७  श्री.  (७ आगष्ट.)

पै. छ. ५ जमादिलावल सन खमस. मयातैन.

सेवेसी धोंडो बापूजी जोशी त्रिकाल चरणीं मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत श्रावण शु॥ २ पावेतों बालकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. प्रजन्य माफीकच आहे. अद्याप पिकें जगविलीं आहेत. पाऊस बारीक लागतो. कवलास पाणी येत नाहीं. मावळांत कोंकणांत बहुत लागत आहे. हल्लीं धारण रुपयास ८॥. दर ·।—॥. याजप्रमाणें सव्वाशेर, आदपाव कम दीड शेर याजप्रमाणें आहे. हाहाःकार झाला आहे! मनुष्यें बहुत मरतात. श्रावणमासचे सिध्यास प्रारंभ शु. १ सोमवारीं आठरा घटकांनंतर जाहाला. हजारपांचशे शिध्यास बाकी राहिली. तोफा जाल्या. फिरोन आली. दक्षिणेचे दिवशीं फुटाणे देतात. चाल आहे. त्यास यंदा हरभरे नाहींत. यास्तव आदपाव खोबरें व आदपाव साखर द्यावी असा करार जाला. खोबरें खरेदी केलें. याजप्रमाणें बोलतात. दक्षिणेचे दिवशीं समजलेनंतर वडिलांस मागाऊन लिहून पाठवितों. इंग्रजाचीं पलटणें चार श्री सासवडापाशीं होतीं. तीं पुण्यास आलीं. विंचूरकर व तीं मिळोन पौर्णिमेचे सुमारें निघोन चांदवडाकडे जिवलालसिंग होळकरांकडील याजवर जाणार. याजप्रमाणें बोलतात. महेश्वर व इंदूर

वगैरे शहरें होळकर याणें लुटलीं. मीरखान यमुना उतरोन अम्मल बसवीत काशीचे सुमारें मिरजापुरानजीक गेला. नागो जिवाजी व खानूने (?) आंगे शामतखान दिल्लीचे सुमारें तीस चाळीस हजार एक एक जथा आहे. होळकर पाऊण लाख जमाव आहे. शिवाय हरनाथ टोळी निराळी. दोन लाख फौजेची वदंता बोलतात. कळावें. बहुत काय लिहिणें. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६८९८ श्रीगणपति. (श्रावण शु. ४–९ आगष्ट.)

पै. छ. २ जमादिलावल. खमस मयातैन.

विज्ञापना. इस्तंचीसाहेब व गोविंदराव मुकाम मजकुरीं भोमवारीं आले. पाव कोस चिरंजीव रा. दाजी सामोरे गेले होते. भेटी आशौच्यामुळें झाल्या नाहींत. कां आले आहेत यांतील अर्थ म्हसकरासही समजला नाहीं. म्हणोन सांगतात. भेटीनंतर समजेल तें विनंती लिहीन. समागमें येक कुंपणीचें सामान आहे. वरकड सरंजाम म्हणतां पांचशेचा गोट आहे. विदित होय ही विज्ञापना.

---

नं. ६८९९ श्री. (श्रावण शु. ४–९ आगष्ट.)

पौा छा ५ जमादिलावल. सन खमस.

सेवेसीं साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छा १ जमादिलावल पावेतों स्वामीचे कृपावलोकनें करून वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान तरी, महीकांठाहून चार पलटणें व तीन हजार तुरुकस्वार आले. ते उज्जनीस दाखल जाहले. राजश्री यशवंतराव होळकर मंदोसरावर होते. तेथून कूच करून रतलाम व झाबुआच्या रोखास वायव्येच्या रोखास गेले. उज्जनीवरील पलटणें उज्जनीवरच आहेत व जयपूरचीं पलटणें पूर्वेस आलीं आहेत तेथेंच आहेत. होळकराच्या पिच्छावर दोन्हीकडीलही पलटणें गेलीं नाहींत. होळकराकडील मीरखान पठाण होळकराच्या आज्ञेवरून अंतर्वेदींतां [1]काशीनजीक मिरजापुरास चाळीस हजार फौजेनिसीं दाखल जाहले. तो प्रांत आबाद राहिला होता. तेथील शिष्टकृत्य करून

---

१ श्रीकाशी क्षेत्र.

क्षेत्रासहि जाणार. याप्रमाणें तिकडील लिहिलें आलें तें सेवेसीं लिहिलें आहे. वसली पट्टणास दाखल होऊन तिकडून कलकत्त्यास लौकरच जाणार. राजश्री यशवंतराव घोरपडे नि॥ शिंदे बहादुर यांस वसलीचीं पत्रें आलीं आहेत जे, तुम्हीं बाहादूर याजकडेस लौकरच जाऊन त्यांची भेट घेऊन भोसले व होळकर यांचे वकील बरोबर घेऊन लौकर कलकत्त्यास यावें म्हणून आलीं. त्यास घोरपडे श्रावण शु॥ ७ कूच करून बराणपुरास जाऊन तिकडून कलकत्त्यास जातील. श्रीमंत राजश्री रावसाहेब यास व त्याकडील मंडळीस दरमाहाची खर्चाची नेमणूक वसली याणीं येणें-प्रमाणें करून दिला आहे.

५०००० खाशास कुल[1], १००० बच्चाजीपंत मेहेंदळे बहिरोपंताचे बंधु, १००० प्रभाकरपंत, २०० मुजमदार, २५०० कैलासवासी मोरोबा-दादा यांचे स्त्रीस, १००० आन्याबा फडके, ५०० गोविंदराव मुस-कुटे, २०० चिटणीस. येणेंप्रमाणें करून दिलें आहे. शिवाय मानकरी, शिलेदार व कारकून मंडळी यांस आसामी व खर्च पाहून तेंही एकंदर ठराऊन दिलें आहे. येथें श्रीमंतांची मर्जीत व कारभारी यांचे चित्तांत व बोलण्यांत वारंवार येतें जे, ज्याप्रमाणें मानें गारद केले याचप्रमाणें होळ-कराचें पारपत्य घडेल, म्हणून उमेदवारी धरून बोलतात. विंचूरकर याज-कडील तूर्त दोन तीन हजार फौज व दोन तीन पलटणें जाऊन आचेब्रीसिंग होळकराकडील याचें पारपत्य करून कासीराव होळकर यास सोडऊन चांदवड वगैरे हे महाल होळकराकडील जप्त करावे. याप्रमाणें बेत होऊन खर्चाची बेगमी होत आहे. जाहल्यावर लौकरच निघोन जातील. दक्षिणेचा व खिचडीचा कारभार त्रिंबकजी डेंगळे खिजमतगार यांस हुजूरनें सांगितला आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६९०० ( श्रावण शु. ५–१० आगष्ट.)

उतारा—पत्र पुण्याहून मिरजेस अंताजी रामचंद्र जोशी यांचें छ. ३ जमादिलावल सन खमसर्चे.

"इकडील मजकूर तरी श्रीक्षेत्र काशीपासोन येथपावेतों एकसारखा

---

[1] सर्व.

दंगा ! कोणा एकाची प्राबल्यता होऊन एकत्यारी जाल्याविना स्थिरता होतां दिसत नाहीं. महेश्वर इंदूर वगैरे राहावयाचें स्थळ ज्याचें त्याणें बेचिराख केलें ! इतरांची तमा नाहीं. सैन्यही विशेष आहे. टोपीकर यांचा जमाव त्या प्रांतीं मोडला नाहीं. क्षेत्र काशीनजीक शूद्राकडील यवन गेले ऐसी वदंता आहे. यजमानसाहेबांचें चित्त प्रजापालण करून सर्वांचें सांगोपन करावें हें प्रजेचें सुकृत दिसत नाहीं. नागपंचमी करून विंचूरकर व पलटणें येथून चालतीं होणार. + + + येथें गोरागरीबाची दाद नाहीं. प्राचीन चाल राहिली नाहीं. नूतन पर्याय आहेत. धान्य सव्वा-शेर दीड शेर भाव आहे. परंतु मिळत नाहीं ! उकडे तांदूळ मात्र मिळ-तात. सालमजकुरीं श्रावणमासचे खिचडीकरितां उदम्याजवळचे तांदूळ जबरदस्तीनें घेतले. दक्षणेचे दिवशीं फुटाणे द्यावयाचे त्यास खोबरें व साखर द्यावयासी खरेदी केली आहे ! टोपीकरांस राज्यलाभ दिसतो तद-नुसार मुख्यास वांच्छा होती हें बहुत वाक्यता आहे. शूद्रप्राबल्य जाहलें तरी सर्वांस इष्ट. एरवीं कळतच आहे !"

---

नं. ६९०१ श्री. ( श्रावण शु. ७–१२ आगष्ट )

पै० छ० ५ जमादिलावल. खमस मय्यातैन.

विज्ञापना. श्री. राजश्री रावसाहेब भिंगारास आहेत. तेथें त्यांजपाशीं मंडळी आहे ती झाडून कर्णेल कलुप याणीं भेटीस्तव आणविली होती. त्यास उभयतां खासे व रा. अन्याबा फडके व बाकोपंत यांशिवाय सर्व भेटीस आले. भेटी जाल्या. जनराल वसलीसाहेब याणीं सर्वांस अभय देऊन दारमदार ठरून दिल्हा आहे. त्याप्रमाणें कर्णेल याणीं ठरावून दिल्हें. कोणी कोठें गेल्यास चिंता नाहीं. याप्रमाणें होऊन कर्णेल याचा निरोप घेऊन आलेली मंडळी सर्व निघोन रावसाहेब याजकडे गेली. रावसाहेब यांचा मानस समुदायसह श्रीकाशीयात्रेस जावें असें आहे. लौकरच निघोन खडर्याचे सुमारें जाणार. तेथें दोन महिने राहून यात्रासुद्धां चालते व्हावें असें ठरलें आहे. कै. मोरोबादादा फडणीस यांचेंही कुटुंब त्यांजबरोबर यात्रेस जाणार. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६९०२        श्री.        (श्रावण शु. ७–१२ आगष्ट.)

पै. छ. ५ जमादिलावल. श्रावण. सन खमस.

विज्ञापना. गोविंदराव परांजपे श्रीमंतांचे माऊस बंधु यांस आषाढ व. ५ भृगुवारीं श्रीमंतांची स्वारी कोथरुडास गेली तेव्हां समागमें गेले होते. अस्तमानीं शहरांत येऊन नित्यनेमाचीं देवदर्शनें घेऊन आपले वाड्यांत आले. नंतर फराळ जाला तों दहा घटका रात्र जाहली. नंतर सोंगटीं खेळावयास बसले. मध्यानरात्रपावेतों खेळ जाला. त्याजवर निजावयास गेले. दोन घटका निद्रा जाहल्यावर जागे झाले तों आंगाची आग होऊं लागली. तेव्हां खिजमतगार यास वारा घालावयास सांगितला. चौफाळ्यावर एकटेच निजले होते. आग न राही म्हणोन चौफाळ्यावरून खालीं उतरून कासोटा घातला आणि चौफाळ्याजवळ बसले तों मान सावेरनासी जाली. तेव्हां खिजमतगार याणें सर्वांस बोलाविलें. स्त्री व मंडळी आली तों बाबांचा काळ जाला! कोणापाशीं भाषण जालें नाहीं. असा मृत्यु त्यांस आला. श्रीमंतांस तीन दिवस अवरोध होता. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६९०३        (श्रावण शु. १०–१५ आगष्ट.)

उतारा — राम. आपांचें पत्र मिरजेस छ. ८ जमादिलावल सन खमसचें.

"इस्त्रंची साहेब यांची भेट आम्ही त्यांचे डेऱ्यास जाऊन छ. ६ जमादिलावलीं जाली. काल छ. ७ जमादिलावलीं ते आमचे डेऱ्यास आले होते. जनरेल वेलजली बहादर यांचें पत्र आणिलें होतें तें त्याणीं आम्हांस दिलें. बोलणें जालें नाहीं."

---

नं. ६९०४        (१६ आगष्ट.)

उतारा–पत्र पुण्याहून मिरजेस. घोंडो बापूजी जोशी यांचें श्रावण शु. १० चें (सन खमस)

"आज चार रोज बोलवा कीं, मिरझापुरानजीक इंग्रजांकडील आठ पलटणें व स्वार जमाव आला त्याची व मीरखानाची लढाई जाहली. चार

पलटणें लुटलीं. कांहीं स्वार मारिले. बाकीचीं डोंगराचें आसरेनें राहिलीं. मीरखान याणें यमुनेस पूल नावांचा इंग्रजांनीं बांधिला तो त्याणें पाडून नावा मीरखानानें आपल्याकडे घेतल्या. बाकी पलटणें कोंडलीं आहेत. त्यास दुसरी कुमक पूल पाडिला याजमुळें येत नाहीं. कांहीं जमाव पठाणांचा श्रीकाशीलगत गेला. तिकडे गलबल आहे अशी वार्ता बोलतात."

---

नं. ६९०५ श्री. ( १६ आगष्ट. )

पौ छा १५ जमादिलावल. सन खमस. श्रावण.

सेवेशीं घोंडो बापूजी जोशी त्रिकाल चरणांवरी मस्तक ठेऊन शिर· साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत श्रावण शुद्ध १० पावेतों बालकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील मजकूर आलाहिदा पत्रीं लिहिला आहे. त्याजवरून कळोन येईल. शिवनेरी किल्ल्यावरती श्रीशिवाई देवी होती. तेथील पहिले डोंगरास भुयार होतें. त्यांत देवी होती. त्यास तेथें देवीचे नवसाबद्दल व यात्रेबद्दल डबीचा ऐवज जमला होता. सरकार परवानगी घेऊन किल्लेदार यांणीं आणखी भुयार कोरून लांबी रुंदी दोन चार खणांची जागा काढून सिंव्हासन वगैरे डोंगरास कोरून काढिलें. देवी काढून तेथील तेथेंच पांच सहा हातांवर ठेविली होती. स्थापना करीत होते. तेव्हां दृष्टांत जाहला, माझे इच्छेस येईल तेव्हां बसेन. स्थापना करीत होते तैसीच राहिली. नागपंचमीचे दिवशीं मध्यानरात्रीस किल्ल्यावर नौबत वाजली. तेव्हां किल्लेकरी व हवालदार चौकसी करून चोहोंकडे पाहूं लागले. हवालदार यांस दृष्टांत पडला जे, माझी मी आपले स्थानास बसले. उजाडल्यावर पाहूं लागले तों कोठें कांहीं नाहीं. देवीचे देवळास कुलपें असतां नवी जागा केली होती त्या सिंव्हा· सनावर देवी सर्वत्रांनीं पाहिली. ऐसें वर्तमान जाहलें म्हणोन श्रीमंतांस किल्लेदाराचीं पत्रें आलीं. येथून कारकून पाहावयास गेले आहेत. शास्त्री पंडित बसोन येविशीं शास्त्रार्थ होत आहे. एकाएकीं किल्ल्यावर नौबत वाजली त्याकरितां हवालदार वगैरे गस्ती पहारे हुशारीनें राहिले. सूर्योदय जाहलेवर देवीचे देवालयाचीं कुलपें काढून पूजेस पुजारी गेले. तेव्हां ऐसा मजकूर दृष्टीस पडला म्हणून लिहीलें आलें आहे. सेवेसीं श्रुत होय

हे विज्ञापना. शास्त्रार्थ कसा ठरोन विचार होतो हें मागाहून लिहून पाठवितों. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६९०६    श्री. (नकल.) (श्रावण शु. ११–१७ आगष्ट.)

पै. छ. १४ जमादिलावल. श्रावण. खमस मय्यातैन.

सेवेशीं सा. नमस्कार विज्ञापना. तागायत छ. १० जमादिलावल-पावेतों स्वामीचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. उत्तरेकडील वर्तमान— मीरखान पठाण श्रीनजीक[1] मिरझापुरास दाखल होऊन प्रांत बेचिराख करून इंग्रजांकडील आठ पलटणें आलीं होतीं त्यांपैकीं चार गारद करून बाकीच्यांस [2]महसरा करून लढाई सुरू राखोन यमुनेंतील नावांचा पूल होता तो पठाण याणें [3]कबज केला आहे. पुढें काशीस जावयाची तजवीज आहे. रा. यशवंतराव होळकर मंदोसराजवळोन छत्तीस लाख रु. घेऊन तेथून झाबडी प्रांताकडे जाऊन तेथून माघारे उलटून जयपूरचे पलटणें व तुरुकस्वार कोचेनजीक होते त्यासी गांठ घालून परस्परें लढाई छ० १८ रबिलाखरीं होऊन चार पलटणें व पांच हजार तुरुकस्वार गारद केले. होळकर यांजकडील पांच सात हजार माणूस जायां जालें. बाकी पलटणें व तुरुकस्वार मागें हटून जयपुराकडेस गेलीं. त्यांचे पीछावर होळकर फौजसुद्धां जयपुराकडे गेले. मीरखान याची लढाई मिरझापुराजवळ जाली ती छ० १३ रबिलाखरीं जाली. म्हणोन दोन्ही लढायांचीं पत्रें आलीं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६९०७    श्री.    (श्रावण शु. १४–२० आगष्ट.)

पौ छा १८ जमादिलावल. सन खमस. श्रावण.

सेवेसीं साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छा १३ जमादिलावल-पावेतों स्वामीचे कृपावलोकनें करून वर्तमान यथास्थित असे. विशेष. उत्तरेकडील वर्तमान तरी, राजश्री यशवंतराव होळकर यांची व इंग्रजाकडील पलटणें व तुरुकस्वार यांची लढाई छा ११ रबिलाखरीं कोट्याचे मैदानांत मोटी होऊन होळकर यांणीं कजाकी करून दहा पलटणें व दहा

---

१ श्री = काशीक्षेत्र. २ वेढा. ३ काबीज.

बारा हजार तुरुकस्वार व जयपूरकर याजकडील दहा हजार फौज इतक्यावर चालून घेऊन प्रहर सहा घटकांपर्यंत समशेरीसी लढाई होऊन इंग्रजाकडील पलटणें व तुरुकस्वार व जयपुराकडील फौज कुल गारद करून बुडवून इंग्रजाकडील सात सरदार कपितान धरून दोन अडीचशें तोफा व कुलदौलत व इंग्रजांचा तळ, डेरे वगैरे, हात्ती, घोडे, झाडून काबज करून इंग्रजाकडील खजिना पुतळी वगैरे नगदी चार क्रोड पर्यंत दौलत होळकरास लाभली. आणि त्या प्रांतीं होळकराचा लौकीक मोठाच जाहला. लढाईत होळकराकडील सात आठ हजार पर्यंत पटाण, शिवाय मराठे वगैरे स्वार दहा हजार पर्यंत खेत जाहले. याप्रमाणें तिकडील वर्तमानाचीं पत्रें आलीं त्यांतील सारांश सेवेसीं लिहीलें आहे. मागाहून नक्कल सेवेसीं पाठऊन देतों. होळकराकडील मीरखान पठाण अंतरवेदींत उतरोन श्रीनजीक मिरजापुरास दाखल होऊन चर्नोड वगैरे मिरजापूर आदि करून प्रांताची खराबी करून खंडण्या घेऊन काशीकडेस गेले. तिकडून इंग्रजाकडील आठ पलटणें दिल्ली व ग्वाल्हेर व गोहद, मिळोन पठाण याच्या मोहऱ्यावर यमुना उतरून येत होतीं. त्यास पठाण यानें मिरजापुराहून दौड करून पलटणासी लढाई देऊन तीन चार पलटणें गारद करून बाकीच्या पलटणास [1]माहासरा घालून आहेत. त्यांचेंही पारपत्य पठाण याचेच हातून होईल. पठाण याचा रोख बाकीच्या पलटणाचें पारपत्य करून [2]मकसुदाबाद व पटणें येथील समाचार घेऊन पुढें कलकत्त्यास जाणार. याप्रमाणें तिकडील मजकुराचीं पत्रें आलीं आहेत. त्यांतील सारांष सेवेसीं लिहीलें आहे. मागाहून दोही पत्रांच्या नकला सेवेसीं पाठऊन देतों. भोसले यांणीं नागपुरीं फौजीची निगा दास्त करून दहावीस हजार जास्ती टेऊन पुढें श्रीमंतांच्या भेटीस यावें हा बेत आहे. शिंद्याचे कारभारी राजश्री विठ्ठल [3]महादेव श्रीमंताकडेस येणार आहेत. आल्यानंतर सेवेसीं लिहीतों. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६९०८ श्री. (नकल.) (श्रावण शु. १४-२० आगष्ट.)

पौ जमादिलावल. सन खमस.

---

१ महसरा = वेढा. २ मुर्शिदाबाद व पाटणा. ३ बक्षी.

विज्ञापना. रा. नरसिंगराव अन्या यांचा मुक्काम पर्वतीजवळ होता तेथून कूच करून छ० १२ रोजीं संगमाच्या पलीकडे इंग्रजांचा मुक्काम आहे त्यांजपाशीं मुक्काम केला. विंचूरकर यांजपाशीं सरकारची मुतालिकीची शिक्केकस्यार असें असतां त्यांची हजेरी फेर धरून इग्रज हत्तीवर हौद्यांत बसोन घेतात हें सर्वांस चांगलें वाटलें नाहीं. ईश्वर इच्छा प्रमाण ! हे विज्ञापना.

नं. ६९०९ श्री. (नक्कल.) (श्रावण शु. १४–२० आगष्ट.)

पौ जमादिलावल. सन खमस.

येथील वर्तमानः—रा. रामचंद्र गोसावी यास हुजुरून पन्नास हजार रुपये देऊन शुक्रवारच्या नव्या वाड्यासमोरची जागा ती त्यास रुपयेसुद्धां बक्षीस देऊन सरकारवाड्याच्या [1]मुकाबल्याची हवेली याजकारणें बांधवून परस्पर झरोक्यांत बसून खुषीचीं भाषणें होत जावीं याप्रों बेत होऊन गोसावी बावा याणीं हवेलीस काम सुरू केलें आहे. होळकराकडील जिवलालसिंग चांदवडच्या लगत्यास आहेत त्याचे पारिपत्यास तीन पलटणें व विंचूरकरसुद्धां छ० १२ जमादिलावलीं रवाना जाले ते खडकीच्या मुक्कामास गेले. लौकरच पुढें जातील. कोळी नाशकाकडील व त्रिंबकाकडील दहा पंधरा हजार जमा होऊन कोकणांत उतरून कल्याण प्रांतांत दंगा बहुत मांडला आहे. कर्णेल कलुप व सदाशिव माणकेश्वर यांचें चित्त शुद्ध नाहीं. सरकार इंग्रजांच्या सांगितल्याप्रमाणें होळकराशीं तह करीत नाहीं म्हणोन कलुप ममईस निघून जाणार. त्यावरोन श्रीमंत बोलले जे, पूर्ववत्प्रमाणें इंग्रजांचा नक्ष सरकारांत नाहीं. त्यास वाजद बरसात तिन्ही सरदार देशीं येणार. तेव्हां जें दैवीं घडणें असेल तें घडो ! म्हणोन श्रीमंतांनीं उत्तरें केलीं. हे विज्ञापना.

नं. ६९१० (२२ आगष्ट.)

छ. २१ जमादिलावल सन खमस.

उतारा—पत्र पुण्याहून मिरजेस धोंडो बापूजी जोशी याचें श्रावण व. १ चें.

" बुंदीकोट्यास होळकर होते. इंग्रजांचीं पलटणें तिकडून आगरेकडून

[1] नमुन्याची.

आली. त्याबरोबर शिंदेकडील दोन पलटणें व बापू शिंदे होते. सात आठ पलटणें व चार हजार तुरुकस्वार व पांच हजार शिंदेची फौज ऐशी तिकडून आली. कोठ्याहून होळकर पुढें गेले. लढाई जाली. होळकराकडील पांच सात हजार पठाण पडले. तिकडील पाच सहा पलटणें व चार हजार तुरुकस्वार मारले, हजारपर्यंत लोकांचे नाककान घेतले आणि सोडिले. शिंदेकडील फौज झाडून लुटली. पळून लोक बऱ्हाणपुरास आले. फत्ते होळकरानें केली. तोफा वगैरे सरंजामही आणिला व गोरे काहीं सांपडले असें बोलतात."

---

नं. ६९११ श्रीगणराज. (श्रावण व. ३—२४ आगष्ट.)

पौा छ० १७ जमादिलावल, भृगुवार. श्रावण. सन खमस मय्यातैन.

[1]अपत्यें आपानें साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता. छ० १७ जमादिलावलपावेतों यथास्थित असे. विशेष. वडीलीं पत्र पाठविलें तें पावलें. तेथें आज्ञा जे, रा. धोंडो अनंत यांजकडे अमचा ऐवज येणें त्याची यादी सन तिसा तिसैनांत ठरोन त्यापैकीं कसबे बेहट्टीची मामलत त्यांजकडे होती तो हिशेब होणें म्हणोन सात हजार रुपये तहकूब ठेविले. कारकुनीबद्दल तेरा हजार यावयाचे. खुद्द मशारनिल्हेचे नांवचें सत दहा हजार रुपयेचें. याप्रमाणें त्यांजकडून फडशा व्हावयाचा. चिरंजीव कैलासवासी दादा[2] यांजकडून सन मय्यातैनांत कंठी मोत्यांची गहाण ठेऊन ऐवज कर्जाऊ साडेतेरा हजार रुपये घेतले. त्याऐवजीं दाहा हजार रुपये रा. धोंडो अनंत यांजकडे खताबद्दल येणें त्याची वरात लिहून दिल्ही. तो ऐवज त्यांजकडून तुम्हास यावा. गुदस्त श्री दीक्षित बावाच्या दर्शनास स्वारी गेली तेथें मशारनिल्हेची गांठ पडली. तेव्हां मिरजेस येऊन कसबे बेहट्टीचा हिशेब करून फडशा करावा, वरकड ऐवजाची विल्हे करावी याप्रमाणें बोलिले. परंतु मिरजेस येऊन कांहींच बोलिलेप्रमाणें जालें नाहीं. गुदस्तां कारकून मिरजेस आले. परंतु हिशेब न होतां गेले. मशारनिल्हेचें कुटुंब मिरजेस येणार म्हणोन पत्र येऊन घेतलें आणि मशारनिल्हे येथें न येतां परभारें पुण्यास गेले. वर्तणूक या रीतीची असोन तुम्ही आपणाकडून

---

१ पत्र जमखिंडीहून मिरजेस. २ रघुनाथराव दादा कुरुंदवाडकर

गड तालुक्याची मामलत सालमजकुरीं त्यांजकडे सांगितली. आम्हाकडील हिशेब शहापुरचे त्याचे विद्यमानेंच व कसबे बेहेट्टीचा हिशेब व ऐवज त्यांजकडे कराराचे यादीचा व शाहापुरचा येणें तो जाबसाल मागें पडत चालला. यास्तव रा। धोंडो अनंत यास आणवावें. त्यांनीं सुखरूप येथें यावें. हिशेबीं ऐवज निघेल तो द्यावा. त्याचा निघाल्यास हिसेबीं देऊं. यास्तव दिवसगत न होतां त्यांचें येणें व्हावें असें करावें म्हणोन आज्ञा. त्यास गड तालुका दोन तीन सालें बखेड्यास आला जाणोन सालमजकुरीं त्याजकडे मामलत सांगितली. मशारनिल्हेकडून मामलत वहिवाटून हिशेब घेऊन येथें येतील तेव्हां हिसेबाचा गुंता उरकल्यानंतर वडीलांचे आज्ञेप्रमाणें वर्तणूक करतील. कैलासवासी ती. दादासाहेब यांजकडून सन मय्यातैन सालीं कंठी मोत्यांची ठेऊन साडेतेरा हजार रुपये घेतले. त्या-ऐवजीं दहा हजार रुपयेची वरात दिली तो ऐवज त्यांजकडून तुम्हास यावा म्हणोन आज्ञा. त्यास वरात दिल्हेलीची येथें वरातविशींचा शोध केला परंतु कोणासी दखल नाहीं व ऐकण्यांतही गोष्ट आली नाहीं. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६९१२ (श्रावण व. ३–२४ आगष्ट.)

उतारा–पत्र राम. आपांचें मिरजेस छ० १७ जमा. वल (सन खमस) गुरुवारचें.

" येथें इंग्रज आले आहेत हे शुद्ध ढालाइतादाखल आहेत. आम्ही येण्यास सरकारचें पत्र पाहिजे म्हणतांच पत्र सरकारचें आणावयास डाकेवरून लिहिलें गेलें अशी जलदी आहे. परिणाम कठिण. मला ज्वर येत आहे. जमाखिंडीचें अजून उलगडेना. "

---

नं. ६९१३ श्रीगणपतिर्जयति. (श्रावण व. ३–२४ आगष्ट.)

पौ। छ. १७ जमादिलावल. सन खमस मयातैन. श्रावण.

तीर्थरूप राजश्री काकासाहेब वडिलाचे शेवेसीं.

अपत्यें[1] चिंतामणीनें शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत

---

१ पत्र सांगलीहून मिरजेस.

छ. १७ जमादिलावलपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष श्रीमंत राजश्री पंत प्रतिनिधि यांजकडील सुमानराव माने यानें सातारा वाई इकडील दंगा मांडिल्याविशींचे बोभाट सरकारांत आलें. त्याजवरून मान्याचे पारिपत्याविषयीं श्रीमंतांनीं आज्ञा केली आहे. फौजा जाऊन पारिपत्य जाल्याचीं पत्रें यावीं म्हणोन काल राजश्री दिनकरपंत यांचें पत्र आलें आहे. त्यास येविशींचा विचार कसा करावा, उत्तर काय पाठवावें ते आज्ञा व्हावी व मेस्तर इस्त्रंचीसाहेब यांचें पत्र जमखिंडीहून काल तिसरे प्रहरीं आलें. त्यांत आपणास कर्नेल वसलीसाहेब यांनीं कांहीं बोलणेकरितां पाठविलें आहे. जमखिंडीस आलों. येथील रुकसत[1] घेऊन आपणाकडे येतों. मुक्काम कोणे ठिकाणीं आहे, भेट कोठें होईल हें लिहावें. जनरलसाहेबांनीं थैली दिल्ली पाठविली आहे. याप्रमाणें लिहिलें आहे. थैलीचे पत्रांतील मजकूर इस्त्रंचीसाहेब यांस कांहीं जाबसाल बोलावयाकरितां पाठविले आहेत. बोलतील इतकें लिहिलें आहे. या पत्राचें उत्तर कसें द्यावें, व जमखंडीस आले आहेत त्यास काय लिहावें, येविशींची आज्ञा जाली पाहिजे. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ६९१४ श्री. (आषाढ व. ३—२५ आगष्ट.)

सेवेसीं विज्ञापना. ता. छ. १७ रविलाखर. वर्तमान यथास्थित असे. विशेष. काल पुण्याहून पत्रें आलीं ह्यांतील मजकूर— होळकर दोन लाख सरंजामानिशीं चित्रकूटाकडे गेले. गंगा उतरून लखनौकडे जाणार. पन्नास हजार शीक होळकराशीं सामील जाहले. लखनौ वगैरे इंग्रजी तालुक्यांत दंगा करणार अशी बातमी इंग्रजाकडे पुण्यास आल्यावरून मोठी मसलत पडली आहे. शिंदे बऱ्हाणपुरास होते ते कूच करून नर्मदातीरास गेले. हें इंग्रजांस समजलें तेव्हां शिंदे होळकरालगत चालले. तेव्हां ह्यांच्या चित्तांत काय आहे हाही अंदेशा इंग्रजास पडला. गुदस्तां लढाई झाली ते वेळेस नामी माणूस गोरे वगैरे इंग्रजाकडील पडलें. त्यांची भरती अद्यापि नाहीं. पुढें होळकरावर जाणें तेव्हां पोक्त सरंजाम पाहिजे, अशा विवंचनेंत आहेत. विलायतेहून दोन इंग्रज सरदार कलकत्त्यास आले.

[1] निरोप.

त्यांस हुकूम—तुम्हीं जाऊन होळकराशीं तह करावा—असा आहे. तहाचा प्रकार श्रीमंतांच्या मनास येत नाहीं. पारिपत्यच करावें अशी इंग्रजांस आज्ञा होत्ये. त्यावरून चाळीस हजार फौज सरकारची द्यावी म्हणजे कूच करतों, याप्रमाणें इंग्रजांनीं उत्तर केल्यावरून सरंजामी सरदारांस पत्रें तयार होत आहेत. सर्वांनीं जावें असें ठरलें आहे. येथें काय विचार होतो पहावा. विंचूरकर यांस दहा हजार फौज ठेवावयास सांगितलें. पंचवीस हजार निसबतीस देणार. मुतालिकीचे शिक्के दिले. तूर्त त्यांची बहाली व सर्फराजी आहे. याप्रमाणें वर्तमान लिहिलें होतें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६९१५ (श्रावण व. ७—२७ आगष्ट.)

उतारा—पत्र राम. आपांचें मिरजेस छ० १९ जमादिलावल सन खमसचें.

"जमखंडीचे टरून काल रविवारीं प्याद्याचीं वगैरे ओझीं पाझीं रांडा पोरें निघून मुधोळचे खेड्यास वस्तीस गेलीं. खुद व प्यादे खडे राहिले ते आज निघणार. आज रा. नारायणराव घोरपडे आलेवर बाहेर निघोन जावें असें आहे. घडेल तें लिहीन."

---

नं. ६९१६ श्री. (नक्कलेची नक्कल.) (श्रावण व. ७—२७ आगष्ट)

पै० छ० २० जमा. वल. श्रावणमास. इंदुवार. स. खमस.

चि[1] राजश्री बाबा फडणीस याणीं याद पाठविली तिची ही नक्कल—

१ श्रीमंत पेशवेसाहेब बहादर यांस व आपासाहेब पहिलेपासोन मनांत कांहीं विषाद आहे किंवा असेल तरी श्रीमंतांनीं माफ करावे. आपासा.नीं मनापासोन विषाद सोडावे.

---

१ बाबा काळ्याची ही याद महत्त्वाची आहे. रामचंद्र श्रीधर उर्फ बाबा काळे फडणीस हा पुणें दरबारीं राम. आपा जमखिंडीकर यांचा वकील होता. इंग्रजांनीं पेशवे आणि सरंजामी सरदार यांच्या बाबतींत कोणतें धोरण स्वीकारलें होतें त्याची स्पष्ट रूपरेषा या यादींत दिलेली आहे. वसईच्या तहानें पेशवाई

१ आपासाहेब यांचे बंधु व इलाखेचे सरदार लोकांनीं आपले मनापासून एकनिष्ठाकडून श्रीमंतांची चाकरी करावी. श्रीमंतांचे दुष्मान कोण आहेत त्यांसी स्नेह व कोणते गोष्टीचे स्वाल जाब करूं नये. तंवपावेतों सरकार कुंपणी इंग्रज बहाद्दर यांनीं अब्रू हुरमत रक्षणार्थ जामीन आहे.

१ आपासाहेब यांचे भाऊबंद व इलाखी सरदार यांस श्रीमंत बहाद्दर यांचे सरकारांतून सरंजामी व इनाम व जहागीर वगैरे मुलूख सनदे-

---

[ तळटीप पुढें चालू.

सत्ता इंग्रजांच्या मुठींत सांपडली. परंतु त्या गोष्टीचा प्रत्यक्ष व्यवहारांत कांहींच उपयोग होत नव्हता. पेशव्यांच्या राज्यबुडव्या धोरणामुळें पेशवे व त्यांचे सरदार यांमध्यें भयंकर तेढ माजली होती.

नाना फडणिसांच्या वेळचे जुने मुत्सद्दी व सरदार यांचा नाश करावयाचा, सरदारांच्या जहागिरी जप्त करावयाच्या आणि त्यांची सर्वप्रकारें अब्रू घ्यावयाची हें पेशव्यांचें धोरण ठरलेलें होतें. विशेषतः पटवर्धन व रास्ते या घराण्यांवर पेशव्यांचा मनस्वी राग होता. उलटपक्षीं जुने मुत्सद्दी व सरदार यांना बाजीराव हे पेशवे आणि राज्याचे खावंद आहेत ही गोष्टच कबूल नव्हती. अशा बेबनावामुळें पेशव्यांच्या हुकमास कोणी जुमानीत नसे, त्यांच्या रागलोभाची पर्वा कोणास वाटत नसे आणि सर्वत्र बेबंदशाही माजली होती. राज्याची व्यवस्था लागावी या दृष्टीनें इंग्रजांनीं धोरण ठरविलें कीं, पेशव्यांनीं जहागिरी जप्त करण्याचा हट्ट सोडावा आणि सरदारांचे मानपान आणि हक्कसंबंध यथापूर्व चालवावे आणि सरदारांनींही पेशव्यांची पूर्वीप्रमाणें चाकरी करावी. पेशवे व त्यांचे सरदार हे दोन्ही पक्ष कराराप्रमाणें वागतील याबद्दल इंग्रजांनीं दोन्ही पक्षांकडे जामीनगत पतकरावी. एकदां पेशव्यांची सत्ता प्रस्थापित झाली म्हणजे त्या सत्तेचा आपणांस वाटेल तसा उपयोग करून घेतां येईल असा हें धोरण ठरविण्यांत इंग्रजाचा हेतु होता. प्रारंभीं बरेच दिवस इंग्रजांच्या या धोरणाला यश आलें नाहीं. पुढें दहा वर्षांनीं इ. स. १८१३-१४ सालीं पंढरपूर मुक्कामीं पेशवे आणि त्यांचे सरदार यांमध्यें बाबा काळ्याच्या या यादीच्या तत्त्वास अनुसरून इंग्रजांनीं एक करार घडवून आणला. या कराराला पंढरपूरचा तह असें म्हणतात. या तहाची माहिती पुढील सोळाव्या भागांत यथाप्रसंगीं देण्यांत येईल.

प्रमाणें जे स्वाधीनांत असेल ते बहाल असून चालावे यासी सरकार कुंपनी इंग्रजबहाद्दर जामीन आहे. कोठपावेतों सदरीं लिहिलेप्रमाणें श्रीमंतांची चाकरी एकनिष्ठाप्रवर्तक करून त्यांचे दुष्मनाशीं स्नेह न ठेविजे पावेतों.

१ सरकार इंग्रज जामीन होत कीं, या गोष्टीवरून आपासाहेब भाऊबंद इलाखे सरदार वगैरे श्रीमंतांची नोकरी नेकनियत संतोषेंकडून करावें. सरंजामी फौजेनिशीं श्रीमंत बहाद्दर कोणते वेळेस फौजेसहित यादी फर्मावितील ते वेळेस हजर व्हावें. अगर हजर न जाले तरी सदरीं लिहिलें तें सरकार कुंपणी इंग्रेज बहाद्दरचे जामीन उडेल. सरंजामी फौजेपैकीं कांहीं फौज हमेषा नेहमीं पुणेंत फौज व सरदार सहित एक भाऊ राहावे. त्याचे अब्रु हुरमतेविशीं सरकार कुंपणी इंग्रज बहाद्दर जामीन आहे.

१ श्रीमंतांचे मुलखापैकीं आपासाहेबांकडे सनद वितरिक्त जे आहेत ते श्रीमंतांचे स्वाधीनसे सोडून द्यावे.

---

नं. ६९१७    श्रीगणपति. (श्रावण व. ९–२९ आगष्ट.)

पै. छ. २२ जमादिलावल. खमस मयातैन. श्रावण.

इस्तंरजी साहेबासी गोडी राखावयाचें बोलण्याचा प्रकार विस्तारें लिहिला तो कळला. वडीलीं लिहिला प्रकार त्याच अन्वयें बोललों. सारांश ढालाइती प्रकार ! रोखा कबूल कीं माघारा टाकावा इतकाच आशय दिसतो. येविसींचा मजकूर कसा करावयाचा यास्तव चिरंजीव राजश्री बाबा फडणिसास सांगून वडीलाकडे पा। आहेत. ते विस्तारें कळवितील. तें ध्यानास आणून आज्ञा व्हावी. फडक्यांचे वगैरे खर्चाचा व करवीर प्रकर्णी मसलतीचा प्रकार यासी बोलून काय फळ? कलुषास लिहितीं म्हणणार इतकाच अर्थ आहे. ढालाइती तऱ्हा आहे ! विदित होय ही विज्ञापना.[1]

---

[1] पत्र जमखिंडीहून मिरजेस.

नं. ६९१८ श्रीगणपतिजयति. (श्रावण व. १०—३० आगष्ट.)

पै. छ. २४ जमादिलावल. सन खमस. मयातैन. श्रावण.

तीर्थस्वरूप राजेश्री काकासाहेब वडिलांचे शेवेसीं.

[1]अपत्यें चिंतामणीनें शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. २३ जमादिलावलपर्यंत वर्तमान यथास्थित असों. विशेष. काकतीकर देसाई पळोन गेला. तो कित्तूर तालुक्यात राहून जांबोटीकर देसाई यास मिळोन शाहापूर तालुक्यांत [2]तळ्या करितात. अलीकडे जांबोटकराकडील बहादुरवाडी म्हणोन गांव आहे, तेथें काटक येऊन जमल्याची बातमी कमवीसदार यांणीं राखून कांहीं स्वार व पायदळ घेऊन चालून गेले. हें वर्तमान बहादुरवाडींतील काटकांस कळून ते बाहेर आले. परस्पर लढाईचा प्रसंग बनोन देसाई याजकडील येशवंतराव घाटगे व आणखी सात आठ असामी शिलेदार टार पडले. दोन तीन घोडीं पडल्यावर तिकडील मोड होऊन पळोन गेले. इकडील पायदळापैकीं दोन तीन असामी टार व कांहीं जायां जखमी जाले. तिकडील सात आठ घोडीं पाडाव आलीं. इकडील लोक बहादुरवाडींत शिरोन गांव लुटून, लूट लोकांनीं आणली. नजीक किमो (?) म्हणून गांव होता, तेथेंही हल्ला करून गांव मारला. याप्रमाणें शाहापुराहून वर्तमान लिहून आलें त्याजवरून शेवेसीं विनंती लिहिली आहे. शेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६९१९ श्रीगणपति. (श्रावण व. १०—३० आगष्ट.)

पै. छ. २५ जमादिलावल. सन खमस मयातैन.

अपत्यें रामचंद्रानें शिरसा. नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. २३ जमादिलावल गुरुवारपर्यंत यथास्थित असे. विशेष. इंग्रजासी बोलण्याचे पर्याय लिहिले ते सर्व कळले. चि. बाबा फडणीस आतांच आले. वडिलीं आज्ञा केलेले अर्थ जबानीवरून चिरंजीवांचे समजून घेऊन इलंचीसाहेब यासी रा. बाळकृष्णपंत म्हैसकर यांबरोबर सांगून पाठवितों. सरकारमर्जी एक प्रकारची व इंग्रजांची चाल एक प्रकारची. परिणाम फार अवघड दिसतो ! किबे यांचें पत्र पाहून पाठविलें आहे. वारंवार होळकरास जय आला

---

[1] पत्र सांगलीहून मिरजेस. [2] चोऱ्या व दरवडे.

म्हणोन लिहितात परंतु प्रत्यय दिसत नाहीं ! मग काय आहे न कळे. बहुत काय लिहिणें. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६९२० श्रीगणपति. (श्रावण व. ११–३१ आगष्ट.)

पै. छ. २४ जमादिलावल. सन खमस. भृगुवार.

अपत्यें[1] रामचंद्रानें शिर सा. नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. २२ जमादिलावल तिसरा प्रहर वर्तमान यथास्थित असे. विशेष. रा. पांडुरंग भास्कर ठाण्यांतून अडीच प्रहर दिवसास श्रावण व. ९ सौम्यवारीं निघोन गेले. आम्ही बेवीस घटका दिवसास सुमुहूर्तें किल्ल्यांत दाखल जालों. इस्त्रंचीसाहेब आज निघोन गेले. मिरजेस ऐनापुरावर उतरून येणार आहेत. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६९२१ श्री. (नक्कल.) ( श्रावण–आगष्ट. )

यादी[2]

१ अब्रूविसीं व मानपानाविसीं तुम्ही खातरजमा केलीच आहे. पुण्यास वकीलास आम्ही येणार त्यास सरकारचें पत्र घेऊन पाठवावें म्हणोन लिहिलें आहे. पत्र आलें म्हणजे श्रीमंताचे शेवेसीं जातों. सरकारांतून च्यार काजकामें होणें आहेत. तीं सरकारांत विनंती करतों. जाल्यास उत्तम. न जाल्यास न जालीं तर दौलतीचा अभिमान सर्वस्वीं तुम्हांस आहे. तेव्हां तुम्हीं करून द्यावीं.

१ पत्राविसीं वकीलास लिहिलें आहे. आलें म्हणजे पुण्यास जातों. वकिलाकडून पत्र न आलें तर तुम्ही आणोन द्यावें.

---

नं. ६९२२ श्री. ( श्रावण–आगष्ट. )

[3]यादी–इंग्रज सरदार यांची नांवनिशी.

१ कर्णेल हिलसाहेब [4]कमान आवसर.

---

१. नं. ६९१९-२० दोन्ही पत्रें जमखिंडीहून मिरजेस. २ इस्त्रंजीसाहेब यांजकडे रामचंद्रपंत आपांनीं बोलणें केलें त्याची ही यादी जमखिंडीहून मिरजेस. ३ पुण्याहून कारकुनाची ही याद मिरजेस बाळासाहेबांस. ४ कमान आवसर–कमांडिंग ऑफिसर.

१ कर्णेल कलुषसाहेब तुरुकस्वारांचा सरदार.

१ मेड प्रदालिस.

१ [1]केपन इटली दिम्मत [2]पटालन एक व कामाठी.

१ केपन इंग साहेब दि० एकंदर तोफखाना.

१ केपन ब्रेन तुरुकस्वाराकडील तोफखाना.

१ केपन ब्लागिष्ट नकाशे लिहिणार व लष्करची [3]ब्रिनी.

१ केपन ग्रांड [4]अजीटण म्हणजे वर्दी सांगणार.

१ केपन नेवल मुख्य कमान आबसर याचा कारभारी.

१ [5]जोनाथ डकीन इस्कोयर जनरेलबहादूर. ममईचा सुभा.

१ मेंडुर मला पाठर येडुरास राहिला आहे.

---

न. ६९२३ श्री. ( श्रावण–आगष्ट. )

विज्ञापना. इकडील वर्तमान बितपशील.

१ सालमजकुरीं वाड्यांतील भर दक्षणा बेत आहे. प्रारंभ होऊन आठ दिवस झाले. रमण्यांतही दक्षणा वर्षांपरीस चांगली जास्ती द्यावी असा बेत दिसतो. पाहावें. रमण्यांतील चौकसी पाहण्याचा बंदोबस्त गोखले यांजकडे सांगणार. समारंभ जाहल्यावर तपशीलवार लिहीतों. कलम १

१ श्रीमंत राजश्री बाबासाहेब[6] दक्षिणेकरितां थोरल्या वाड्यांत येतात. दोन प्रहरीं यावें. ते पहांटेस शुक्रवारचे वाड्यांत जाऊन स्नानसंध्या करून भोजनास यावें. याप्रमाणें चार दिवस चाललें आहे. कलम १

१ राजश्री सदाशिवपंतभाऊ[7] यांस दादा गद्रे यांचे वाड्यात चैन पडत नाहीं. म्हणोन कैलासवासी, आप्पा बळवंत यांचे वाड्यांत येऊन राहिले आहेत. पांच दिवस झाले. चार दिवसांनीं कैलासवासी राघोपंत गोडबोले यांचा वाडा रिकामा करविला. त्यांत जाऊन राहाणार आहेत. गेल्यावर लिहितों. कलम १

---

१ केपन–कॅप्टन. २ पटालन–पलटण. ३ ब्रिनी–आघाडी. ४ अजीटन–अॅडज्यूटंट. ५ जोनाथन् डंकन एस्क्वायर–मुंबईचा गव्हर्नर. ६ पेशवे. ७ माणकेश्वर दिवाण.

१ पुणें सुभा गोखले यांजकडे सांगितला व शहर कोतवाली यासुद्धां गोखले यांस सांगणार. सरदारी करून मामलतही करण्याची उमेद गोखल्यांनीं धरली. कलम १

१ पाऊस चांगला पडत आहे. पेरणी तटल्या. आठ दिवस निखालस उबला तर बरें होतें. कलम १

१ नगरच्या किल्ल्यांतील दाणा वगैरे काढऊन मोकळा केला. तेथील जकीरा पुण्यास न येतां परभारां मुंबईस जात आहे. कर्णल यानें आपल्याजवळचा सरंजाम विकावयास काढला. उंट सरकारांत पंचवीस घेतले व आणखी कोणी कोणी घेतात. गोखल्यांनीं एक हत्ती घेतला. निपाणकर याजकडील कारभारी यांणीं एक हत्ती घेतला. कुदळेंही विकणार. विलायतचीं पत्रें येणेंविसीं आलीं आहेत. आठ पंधरा दिवसांत जाणार असें बोलतात. त्याचा ग्रंथ समजावयाचा नाहीं. परंतु लक्षण जाण्याचें खरें. कर्णेल आल्यावर सरकारची भेट एक वेळ जाहली. त्याजवर बैठक होऊन बोलणें झालें नाहीं मर्जी जळचराची दिक्क[1] आहे. कलम १

१ नवाबाकडील पलटणें विंचूरकर या समागमें होतीं. तीं घांटावर आल्याचा मजकूर पेशजीं लिहला होता. हल्लीं घांटावरून निघोन गंगातीरास आलीं म्हणोन वर्तमान आलें आहे. कलम १

१ राजश्री बाळाजी[2]पंत बाबा यास दोन दिवस ज्वरांष जाहला आहे. आरोग्य जाहल्यावर लिहितों. कलम.

ऐकून आठ कलमांवरून विदित होईल. रवाना श्रावण वा॥ १३ बुधवार. हे विज्ञापना.

---

नं. ६९२४ श्री. (नक्कल.) (श्रावण–आगष्ट.)

[3]विज्ञापना. जनरल वसलीसाहेब याजकडून बोलावयास इत्रांचीसाहेब व राजश्री गोविंदराव आले आहेत. त्यांचें बोलणें पडलें आहे कीं, तुम्हीं पुण्यास श्रीमंतांपासीं जावें. सरकारचें व तुमचें आम्ही नीट करून देतों म्हणून वडिलीं लिहीलें होतें. त्यास गुदस्तां जनराल वसलीसाहेब आले. ते समई वडिलांचीं बोलणीं त्याजपासीं पडलीं. तेव्हां त्यांणीं तुमचीं कामें

१ नाखूष. २ जोशी हुपरीकर. ३ पत्र पुण्याहून मिरजेस.

करून देतों म्हणून वडिलीं त्याचा भरंवसा धरून समागमें आले. नंतर साफच सांगितलें कीं, तुमचीं काय कामें असतील तीं सरकारांत बोलोन करोन घ्यावीं. आम्हीं एक वेळ सांगून ठेवलें आहे. वारंवार विचारावयाचें नाहीं. तेव्हांच इंग्रजांचा मजकूर वडिलांचे ध्यानांत आला. नंतर त्याची संगत सोडून सरकारची खातरी करून स्वारी निघोन गेली होती. दोस्तीचीं बोलणीं बोलतात. कामकाजें जीं असतील तीं करून देवितों. सरकारचें पत्राशिवाय येत नाहीं. तरी पत्रही सरकारचें आणून देवितों. त्यास ते येथें लिहून पत्रही सरकारचें नेवितील. त्याजवर वडिलीं निघोन येतील. तरी त्यांचे हातून कांहीं व्हावयाचें नाहीं. नाहक पेचांत महर्गतेच्या आणून घालतील. याजकरितां वडिलांचें सांगणें त्याजपासीं पडावें कीं, आम्हीं जनरल याजबरोबर गुदस्तां गेलों तेव्हां आमचीं कामें करून न देतां निघोन गेले. याजमुळें आमचें जाणें झालें नाहीं. हल्लीं पुण्यास जावें म्हणतां तरी आमचीं कामें काजें आहेत. त्याचें बोलणें कसें करतां ? आम्हीं तुमचा स्नेह केला त्यापेक्षां जीं कामें आहेत तितकीं तुम्हीं सरकारांतून उलघडून घेऊन कागदपत्र आम्हास आणून द्यावे. म्हणजे चाकरीस सिद्ध आहों. याप्रमाणें बोलून जी याद गुदस्तां जनराल याजकडे व बळवंतरावजी याजपासीं दिली त्याची नकल तेथें आहे. त्याप्रमाणें कामकाजाचें ओझें त्याचेच गळीं पडोन घालावें. त्यांणीं तितकीं उलघडून न घेतल्यास त्याचे संगत केल्याचें फळ नाहीं. तरी व्यर्थ आणून कुजवितील. इंग्रजांनीं कामकाजें करून देतों म्हणून कबूल केल्यास त्याचें बोलणें सरकारांत पडलें. पुढें अगदीं विकोपास जाईल, त्यास इंग्रजांनीं दोस्तीनें आमचीं कामें उलघडून दिलीं तरी इकडून चित्तांत वांकडेपणाही आल्यास चिंता नाहीं. भिऊन कोणतेंही व्हावयाचें नाहीं. याजकरितां त्याजपासीं बोलणीं इकडे न येतां पडावें. त्याजमध्यें त्याचे अर्थ काय निघतात तेंही समजेल. तूर्तकाळीं त्यांची समजूत येथें आणून आपले लगामीं लाऊन घ्यावें. इतकाच प्रकार आहे. त्यांसही पुढें मसलत जडच दिसते. याजकरितां वडिलीं त्यांचें माथें ओझें ठेवावें. कोणीकडून चार दिवस काढून घ्यावयाचे याजकरितां विनंती लिहिली आहे. विदित होय हे विज्ञापना.

नं. ६९२५　　　श्रीगणेशप्रसन्न.　　(श्रावण व. १२-१ सप्टें.)

पै॥ छा॥ १८ साबान. कार्तिक मास. सन खमस.

राजश्री गंगाधर रावजी गोसावी यांसी.

७ सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य-स्नेहांकित सखाराम घाटगे सर्जेराव दंडवत. विनंती. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत असलें पाहिजे. विशेष. आम्ही देशींहून कूच करून निघालों ते दरमजल छ० ५ जमादिलावलीं बराणपुरानजीक लष्करचे मुक्कामीं यजमानसाहेब यांजपाशीं पोंहचलों. नंतर तेथून कूच करून नर्मदातीरास जावयाचा बेत ठरण्यांत येऊन कूच करून दरमजल जात आहोंत. कळावें म्हणून लिहिलें आहे. इकडून यजमानांचें लक्ष आपणाविषयीं आहे तसेंच आहे. याकरितां आपण समयोचित इकडील लक्ष धरावें. येविशीं लेहून सुचवावें असा अर्थ नाहीं. समयोचित चांगलें तेंच आपण करतील हे खातरजमा आहे. येविशीं स्वदस्तुर चिठी यजमानांची आपणांस आहे त्याचें उत्तर समर्पक यावें. रवाना छ०२५ जमादिलावल. बहुत काय लिहिणें. लोभ करावा हे विनंती.

---

नं. ६९२६　　　श्रीगणपतिजयति.　　(श्रावण व. १२-१ सप्टें.)

पौ॥ छा॥ २५ जमादिलावल. सन खमस.

अपत्यें[1] चिंतामणीनें साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. २५ जमादिलावलपावेतों यथास्थित असे. विशेष. वडिलीं दोन चिठ्या पाठविल्या त्या व लोणी प्रकर्णी याद पाठविली ती पावली. जमखिंडीहून सकाल सायंकाळीं पत्रें आलीं. छा॥ २२ जमादिलावल बुधवारीं बोलणेचा ठराव होऊन रा. पांडुरंगपंत टाणेहून निघोन गेले. नंतर तिसरे प्रहरीं, सुमुहूर्तें चिरंजीव रा. रामचंद्रपंत आप्पा किल्ल्यांत दाखल झाले. पेशजीं लोणी आनंदराव हणमंत याजकडे होती. ते वेळेची बाकी वगैरे बखेडे याची चौकशी होऊन याद ठरली त्याची नकल करून पाठविली आहे

---

1 पत्र सांगलीहून मिरजेस.

ऐ. ले. १५-२३

करून देतों म्हणून वडिलीं त्याचा भरंवसा धरून समागमें आले. नंतर साफच सांगितलें कीं, तुमचीं काय कामें असतील तीं सरकारांत बोलोन करोन घ्यावीं. आम्हीं एक वेळ सांगून ठेवलें आहे. वारंवार विचारावयाचें नाहीं. तेव्हांच इंग्रजांचा मजकूर वडिलांचे ध्यानांत आला. नंतर त्याची संगत सोडून सरकारची खातरी करून स्वारी निघोन गेली होती. दोस्तीचीं बोलणीं बोलतात. कामकाजें जीं असतील तीं करून देवितों. सरकारचें पत्राशिवाय येत नाहीं. तरी पत्रही सरकारचें आणून देवितों. त्यास ते येथें लिहून पत्रही सरकारचें नेवितील. त्याजवर वडिलीं निघोन येतील. तरी त्यांचे हातून कांहीं व्हावयाचें नाहीं. नाहक पेचांत महर्गतेच्या आणून घालतील. याजकरितां वडिलांचें सांगणें त्याजपासीं पडावें कीं, आम्हीं जनरल याजबरोबर गुदस्तां गेलों तेव्हां आमचीं कामें करून न देतां निघोन गेले. याजमुळें आमचें जाणें झालें नाहीं. हल्लीं पुण्यास जावें म्हणतां तरी आमचीं कामें काजें आहेत. त्याचें बोलणें कसें करतां? आम्हीं तुमचा स्नेह केला त्यापेक्षां जीं कामें आहेत तितकीं तुम्हीं सरकारांतून उलघडून घेऊन कागदपत्र आम्हास आणून द्यावे. म्हणजे चाकरीस सिद्ध आहों. याप्रमाणें बोलून जी याद गुदस्तां जनराल याजकडे व बळवंतरावजी याजपासीं दिली त्याची नकल तेथें आहे. त्याप्रमाणें कामकाजाचें ओझें त्याचेच गळीं पडोन घालावें. त्यांणीं तितकीं उलघडून न घेतल्यास त्याचे संगत केल्याचें फळ नाहीं. तरी व्यर्थ आणून कुजावितील. इंग्रजांनीं कामकाजें करून देतों म्हणून कबूल केल्यास त्याचें बोलणें सरकारांत पडलें. पुढें अगदीं विकोपास जाईल, त्यास इंग्रजांनीं दोस्तीनें आमचीं कामें उलघडून दिलीं तरी इकडून चित्तांत वांकडेपणाही आल्यास चिंता नाहीं. भिऊन कोणतेंही व्हावयाचें नाहीं. याजकरितां त्याजपासीं बोलणीं इकडे न येतां पडावें. त्याजमध्यें त्याचे अर्थ काय निघतात तेंही समजेल. तूर्तकाळीं त्यांची समजूत येथें आणून आपले लगामीं लाऊन द्यावें. इतकाच प्रकार आहे. त्यांसही पुढें मसलत जडच दिसते. याजकरितां वडिलीं त्यांचें माथें ओझें ठेवावें. कोणीकडून चार दिवस काढून घ्यावयाचे याजकरितां विनंती लिहिली आहे. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६९२५ श्रीगणेशप्रसन्न. (श्रावण व. १२-१ सप्टें.)

पौा छा १८ साबान. कार्तिक मास. सन खमस.

राजश्री गंगाधर रावजी गोसावी यांसी.

५ सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य-स्नेहांकित सखाराम घाटगे सर्जेराव दंडवत. विनंती. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत असलें पाहिजे. विशेष. आम्ही देशीहून कूच करून निघालों ते दरमजल छ० ५ जमादिलावलीं बराणपुरानजीक लष्करचे मुक्कामीं यजमानसाहेब यांजपाशीं पोंहचलों. नंतर तेथून कूच करून नर्मदातीरास जावयाचा बेत ठरल्यांत येऊन कूच करून दरमजल जात आहोंत.कळावें म्हणून लिहिलें आहे. इकडून यजमानांचें लक्ष आपणाविषयीं आहे तसेंच आहे. याकरितां आपण समयोचित इकडील लक्ष धरावें. येविशीं लेहून सुचवावें असा अर्थ नाहीं. समयोचित चांगलें तेंच आपण करतील हे खातरजमा आहे. येविशीं स्वदस्तुर चिठी यजमानांची आपणांस आहे त्याचें उत्तर समर्पक यावें. रवाना छ०२५ जमादिलावल. बहुत काय लिहिणें. लोभ करावा हे विनंती.

---

नं. ६९२६ श्रीगणपतिजयति. (श्रावण व. १२-१ सप्टें.)

पौा छा २५ जमादिलावल. सन खमस.

अपत्यें[1] चिंतामणीनें साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. २५ जमादिलावलपावेतों यथास्थित असे. विशेष. वडिलीं दोन चिठ्या पाठविल्या त्या व लोणी प्रकर्णी याद पाठविली ती पावली. जमखिंडीहून काल सायंकाळीं पत्रें आलीं. छा २२ जमादिलावल बुधवारीं बोलणेचा ठराव होऊन रा. पांडुरंगपंत ठाणेहून निघोन गेले. नंतर तिसरे प्रहरीं, सुमुहूर्तें चिरंजीव रा. रामचंद्रपंत आप्पा किल्ल्यांत दाखल झाले. पेशजीं लोणी आनंदराव हणमंत याजकडे होती. ते वेळेची बाकी वगैरे बखेडे त्याची चौकशी होऊन याद ठरली त्याची नकल करून पाठविली आहे

---

१ पत्र सांगलीहून मिरजेस.

ऐ. ले. १५-२३

म्हणून लिहिलें तें कळलें. यादही पावली. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ६९२७ श्री. (नकल.) (श्रावण व. १२–१ सप्टें.)

पौा छा। १ जमादिलाखर. सन खमस. भाद्रपद.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधररावजी स्वामीचे सेवेसीं. पोष्य [1]सिद्धेश्वर महिपतराव साष्टांग नमस्कार. विनंती उपरी. येथील कुशल तागायत छा। २५ जमादलावलपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजश्री नारोपंत शहापुरास राजश्री चिंतामणराव आप्पाकडून आहेत. जांबोटकराचें पारपत्य करावयाचें म्हणून जमाव करून आम्हाजवळ तोफा मागावयास आले. चिंतामणराव आप्पाचा वडिलोपार्जित घरोबा, परस्पर उपराळा करावयाची चाल आहे. त्या अन्वयें तोफा देतों म्हणून सांगितलें. श्रावण वद्य दशमी गुरुवारीं सायंकाळचे तोफा न्यावयास जमाव घेऊन किल्ल्याचे दरवाज्यास आले. इकडून तोफा स्वाधीन करणेबद्दल राजश्री विसाजी रघुनाथ बाहेर गेले होते. तोफ स्वाधीन केली आणि नारोपंत यांणीं भेटीस येतों म्हणून सांगोन पाठविलें. दहा लोकांनिसीं यावें म्हणून परवानगी दिली. ते आरब घेऊन बेजरब शिरले. तिसरे दरवाज्यास येऊन परदेशी वगैरे लोक तोडिले. गोळागोळी चालली. तसेच मारीत वाड्यावर येऊन आमचा दगा करावा, किल्ला हस्तगत करावा, म्हणोन येत असतां इकडील लोकांनीं मारून काढिलें. नारोपंत दरवाज्यानजीक भिंत आहे तिजवरून उडी टाकून पळून गेले. रात्र जाहली होता. याजमुळें निघोन गेले. विसाजी रघुनाथ यास शहापुरास धरून नेलें आहे. आपला आमचा घरोबा वडिलापासून त्याचे सार्थक जाहलें. वर्तमान आपणांस समजावें म्हणून लिहिलें असे. कैलासवासी विसाजीपंत दादा यांचे जागा आपण. आम्हाकडून गोष्ट गेली असतां आपण बुद्धिवाद सांगून नीट करवावी. तें एकीकडे राहून चिंतामणराव आप्पांनीं असें करविलें. श्रीमंतांचे प्रतापें खैर जाहली. बहुत काय लिहिणें. लोभ केला पाहिजे हे विज्ञापना.

---

१ विनीवाले. पत्र बेळगांवाहून मिरजेस.

नं. ६९२८ श्री. (श्रावण व. ३०—४ सप्टें.)

विज्ञापना. वडिलीं सरकारांत व राजश्री बळवंत रावजीस व मला पत्रें छा। १७ जमादिलावलचीं पाठविलीं. तीं छा। २७ मीनहूस सोमवारीं पावलीं. लिहिला मजकूर सर्व कळों आला. मला पत्रें आलीं त्यांत ज्या पुरवण्या दाखवावयाजोग्या होत्या त्या, व सरकारचें पत्र व राजश्रींचें असें नेऊन बळवंतराव यास दाखविलीं. त्यांणीं पत्रें वाचून सरकारचें पत्र व आपलें व मजकडील पुरवण्या अशा झाडून श्रीमंतांकडे नेऊन दाखवयाकरितां आपले रुमालांत ठेऊं लागले. तेव्हां मीं सांगितलें, सरकारचें पत्र व आपण आपलें पत्र नेऊन दाखवावें. मजकडील पत्रें दाखवावयाचें कारण कोणतें ? आम्हीं तुम्हांस मात्र दाखविलीं. त्यांणीं तुला पत्रें आलीं त्यांत वांकडेपणा नाहीं. चार खुलासे लिहीले आहेत. याजकरितां नेऊन दाखवितों. यांत वाईटपणा नाहीं. तीनी पत्रांत निखालसता लिहिल्या आहेत. येणेंकडन संतोष श्रीमंतांस होईल. त्याजवरून सारींच पत्रें नेऊन श्रीमतांस राजश्रींनीं दाखविलीं. जवळ राजश्री दिनकरपंत पटवर्धन होते. आणखी कोणी नव्हते. आगोदर बळवंतरावजी याजपाशीं बहुत प्रकारें बोलणें बोलून ठेवलें होतें. राजश्रीही श्रीमंतांपासीं बोलले. श्रीमंतांनीं सांगितलें. आम्ही सर्व प्रकारें इंग्रजांचे म्हणण्याप्रमाणें चालतों. तेव्हां इंग्रजांचें पत्र रामचंद्रराव यांस बोलावण्याचें मागितल्यास आम्हास नाहीं म्हणतां येत नाहीं. देणें प्राप्त. त्याजवर राजश्री बोलले स्वामीचें आज्ञापत्र आगोदर गेलें असतां मग इंग्रजांकडील पत्राचें मागणें पडल्यास. त्यांस सांगावें कीं, पटवर्धन यास बोलावण्याचीं पत्रें गेलीं आहेत. असें सांगितलें असतां त्यांचे बोल ते काय ? तेव्हां श्रीमंत बोलले, रावजी, इकडूनही पत्र गेलें असतां इंग्रजांनींही पत्र मागितलें. तत्राप देणें प्राप्त आहे. त्याला ना म्हणतां येत नाहीं. तुम्हास सर्व माहीत असोन बोलतां हें काय ? त्याजवर बळवंतराव यांणीं विनंती केली. इंग्रजांनीं पत्र सरकारचें घेतलें. पटवर्धन इंग्रजांच्या खांद्यावर बसोन आले. गुदस्तां याजप्रमाणें म्हणणें पडलें. तेव्हां पटवर्धन यांणीं परभारें माझ्याच विद्यमानें स्वामीची खात्री करून निघोन गेले. तसें या प्रसंगींही तेंच बोलणें पडलें याचा विचार कसा करावा तो स्वामींनींच सांगावा. तेव्हां श्रीमंतांनीं सांगितलें, यांत

मला एकही विचार सांगतां येत नाहीं. कोणता म्हणोन सांगावा? तेव्हां बळवंतराव बोलले, आमचा विचार अंतरयामचा होता, तो स्वामींस विदित केला. याजउपर काय घडणें असेल तें घडो. याप्रमाणें बोलणीं होऊन जाला मजकूर राजश्रींनीं मला सांगितला. तो सर्व विदित व्हावा म्हणोन लिहिलें आहे. मात्र [1]स्थान म्हणोन वंदन करावें, नाहीं तरी सर्व भाव दुळगपणाचे आहेत. मारल्याची व मेल्याची दोनी संतोष! तेथें परिणाम कोणाचाच लागावयाचा नाहीं. सरकारचें पत्र बोलावण्याचेंही दिल्यास जाईल. मी निकड करीत नाहीं. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६९२९ श्रीगणपतिर्जयति. (भाद्र. शु. ६–७ सप्टें.)

पौ छा २ जमादिलावल. सन खमस.

[2]तीर्थस्वरूप राजश्री काकासाहेब वडिलांचे सेवेसीं. अपत्यें चिंतामणीनें शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा १ जमादिलावलपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. श्रीमंत राजश्री पंत प्रतिनिधि यांचें व आरबांचें वाकडें येऊन जमादारास कैद केल्यामुळें सारे आरब एक जागा जमून खटला वाढल्याविसीं रहिमतपुराहून राजश्री बाळाजी महादेव दामले यांजकडून पत्र आल्याचें लिहिलें तें कळलें. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६९३० श्रीगणपति. (भाद्रपद शु. ५–९ सप्टें.)

पै. छ. ६ जमादिलाखर. खमस मयातैन. भाद्रपद. भोमवार.

अपत्यें[3] रामचंद्रानें शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. ता छ. ४ जमादिलाखरपर्यंत यथास्थित असों. विशेष. इस्त्रंचीसाहेब चिरंजीव राजेश्री अप्पाकडे गेले. मिरजेचे मु॥ भेट होऊन परस्परें बोलणीं होऊन निरोप घेऊन गेले. चिरंजीवांनीं मजकूर वडिलांस निवेदन करून सांगलीस गेले म्हणोन लिहिलें तें कळलें. तेथून निघोन इस्त्रंची मुकाम मजकुरीं छ. ३ जमादिलाखरीं मंदवारीं दोनप्रहरीं आले. येण्याचे कारणाचा शोध घेतला. त्यासी उत्तर सांगतात जे, इकडील उत्तर कळलें नव्हतें सबब

---

१ मुख्य स्थान. २ पत्र सांगलीहून मिरजेस. ३ पत्र जमखिंडीहून मिरजेस.

आलों. येथें चिरंजीव राजेश्री बाबा फडणीस येऊन नंतर उत्तर राजेश्री बालकृष्णपंतासमागमें पाठवितों म्हणोन सांगून निरोप दिल्हा होता. मह्वारनिल्हे येथून निघावयास चार दिवस लागले सबब येथें आलों असें बोलणें आहे. आज [1]रुबरू उत्तर विचारावयास आले त्यास उत्तर सांगितलें. त्याची नक्कल करून पाठविली व वडीलीं सह्या कलमें लिहून पाठविलीं तीं सांगितलीं. त्यांणीं याजवर आकांक्षा घेतली. तुमचें उत्तर कारकुनाकडून किती दिवसांत येईल तें कळूं द्या. तेव्हां सांगितलें जे, सरकारचें काम श्रीमंत थोर त्यांची गांठ पडून उत्तर लिहितील. पत्रें सरकारांतून दिल्हीं तर पाठवितील अगर कसा मजकूर असेल तो लिहितील. तेव्हां इंग्रज म्हणूं लागले निश्चयाचें उत्तर समजल्याविना आम्ही कसें दुसरे कामास जावें ? मग त्यांणींच काढलें जे, तुमचे कारकुनास पत्र लिहून आम्हाजवळ द्यावें. आम्ही डाकेवरून रवाना करून जाब आणून देतों. आमचे पोटांत चार दिवस दिपवाळीपर्यंत बोलणेखालीं घालून दिवस घ्यावे. मग जावयाचें करतों. परंतु तसें घडत नाहीं. असें येऊन पडलें आहे. पत्र आम्हाकडील कारकुनास देतों म्हणोन सांगोन निरोप घेऊन ठिकाणास गेले. सारांष जलदी भारी. सर्वांस तेथें आडकाऊन आपले हाताखालीं घालून ठेवावें. मग पुढें काय कर्तव्य असेल तें सुखी आसों. असा प्रकार आहे. पत्राचे जाबासाठीं पुण्यांत कारकुनास घाबरेंच करतील. उपाय नाहीं. याजउपर येथें राहतात कीं जातात तें लिहितों. परंतु येथील पक्कें उत्तर समजावें. रास्त्यास पत्र पाठवावें, जाब आलेवर ते कोठें असतील तेथें जावें असा बेत दिसतो. तेव्हां आठ पंधरा दिवस मुकामच करतीलसें वाटतें. राजश्री भिकाजीपंत वानवळे यांचा मजकूर विस्तारें राजश्री विनायकपंत निवेदन करतील त्याजवरून श्रुत होईल. ईश्वर इच्छेपुढें उपाय काय ? तूर्त कडपट्टीस आहे. चिरंजीव राजश्री दाजी जमाखिंडीत आहेत. शेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६९३१ श्री. (नक्कल.) (भाद्र. शु. १०–१४ सप्टें.)

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं.

---

१ समक्ष.

विनंती सेवक बाळाजी महादेव दामले चरणांवर मस्तक ठेवून शिर-साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. ९ जमादिलाखर वर्तमान यथास्थित असे. विशेष. कसबें रहिमतपूर येथें माने प्रकरणीं श्री. राजश्री पंतप्रतिनिधि यांजकडील कारकून व लोक आले आहेत ते उठवून नेणे-विशीं स्वामींनीं पत्रें पाठविलीं तीं पावतीं करून पत्रान्वयें व्हावें म्हणोन सांगितलें. तें त्यांचे खातरेस येत नाहीं. गावांत खटले फार याजकरितां आम्ही नेहमीं लष्करास जात येत असतों. रा. मोरोपंत भाऊ व बळवंत-राव फडणीस यांणीं पत्राचीं उत्तरें दिल्हीं आहेत तीं पाठविलीं आहेत. श्रीमंतांचे पत्राचें उत्तर देणें तरी कारभारी देणार. हीं उत्तरें दिल्हीं त्यांतच जाबसाल हाच मजकूर म्हणोन सांगितलें. हा काळपर्यंत प्रति-निधींची स्वारी मार्गानें गेली असतां नजरभेट व्हावयाची चाल नाहीं. बैद्यामुळें त्यांचा प्रवेश गावांत झाला आहे. यांची बाब काडीमात्र गावांत नाहीं. कांहीं तरी आपलें गावांत असावें हा मनोदय कारभारी यांचा दिसतो. लष्करचा मुक्काम कोरेगांवनजीक आहे तेथें काल गेलों होतों. तेव्हां रा. बळवंतराव फडणीस यांणीं गोष्ट काढली कीं, फत्तेसिंग माने यांचे वाड्याचें निम्में काम व्हावयाचें आहे. त्यास लाकडें माने यांचीं आहेतच. पांच हजार रु. खर्चून वाडा बांधावयाचा. स्वारी येतां जातां वाडा असल्यानें उपयोगी म्हणोन बोलले. ह्याजबरून आम्हीं उत्तर केलें जे, मिरजेस कानांवर घालून काय करणें तें करावें. इतकें उत्तर केलें. त्यांणीं परतून उत्तर केलें नाहीं. त्यास वाडा बांधावयाचा मनोदय दिसतो. वाडा बांधून त्यांचा रहिवास पडला असतां ठीक नाहीं. गांवास अपाय आहे. रोज उठोन घसघस. ते वाडा बांधों लागले म्हणजे वेठ बेगारीचा उपद्रव. वाडा तयार होऊन स्वारी येऊं जाऊं लागली म्हणजे जिल्हे-दारांचें ठाणें होईल. गावांत नाना प्रकारचे खटले आहेत. वाडा बांधतात हें ठीक नाहीं. याजकरितां लिहिला मजकूर स्वामींनीं मनांत आणून वाडा बांधों देऊं नये. माने त्यांचेच अन्याईदार असा अर्थ नाहीं. आपलाही मुलूख त्यांणीं बुडाविला आहे. लाकडें पडलीं आहेत तीं येथून मिरजेस न्यावीं तेव्हां वाड्याचें काम बंद होईल. स्वामींचीं पत्रें येतात त्यांचीं उत्तरें सुरळीत द्यावयाचीं, परंतु वर्तणूक ठीक नाहीं. आजपर्यंत

पांच हजार रु. माने प्रकरणीं कुळें बुडवून नेले. आणखी कारभार चाललाच आहे ! कारभारी यांजकडे मुजरद कारकून मिरजेहून येऊन वाडा बांधों देऊं नये. लांकडें मिरजेस नेतों याप्रमाणें ठरवावें. या कामाविशीं दिवसगत जाहली असतां ते वाडा बांधावयास काम लावतील. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ६९३२ श्री. (भाद्रपद शु. ११–१५ सप्टें.)

पौा छा १९ जमादिलाखर. खमस. मय्यातैन.

सेवेशीं आबाजी[1] हरि कृतानेक सा. नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. १० जमादिलाखरपावेतों स्वामीचे कृपावलोकनें करून वर्तमान यथास्थित असे. विशेष. पेशजीं स्वामीकडेस संगइसमाचा (?) कबजा एक व मोहोनाळ नेच्याचें एक एकूण दोन दागिने सेवेशीं पाठविले आहेत. हल्लीं शहर औरंगाबादेहून संगीन जिनसा आणविल्या आहेत. त्यास ऐना व प्याला व बिचव्याचीं कबजें याप्रमाणें आलें आहे. त्यांची किंमत पक्की ठरावून सेवेशीं पाठवून देतों. दिल्लीहून नरगष(?)चे कांदे आणविले आहेत. आल्यावर तेही सेवेशीं पाठवून देतों. स्फटिक दगडाविशींची आज्ञा रुबरू[2] जाली आहे. त्याप्रमाणें काश्मीरास माल खरेदीस गोसावी गेले आहेत त्यांजपाशीं आज्ञेप्रमाणें बेताचा फर्मा लेहून दिल्हा आहे. तिकडून येईल व येथेंही शोधांत आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ६९३३ श्री. (भाद्रपद शु. १२–१६ सप्टें.)

पौ छा १९ जमादिलाखर. सन खमस. भाद्रपद मास.

अपत्यें [3]बाबाजीनें शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा ११ जमादिलाखर रविवार प्रातःकालपावेतों सुखरूप असें. विशेष. वडिलांकडून आशीर्वादपत्र येऊन अलीकडे सांभाळ होत नाहीं तरी सदैव पत्रें येऊन परामर्ष जाला पाहिजे. तीर्थस्वरूप राजश्री आप्पासाहेब यांजकडून पत्रें छा १ जमादिलाखरचीं जमखिंडीचे मुकामाहून सांडणीस्वाराबरोबर

१ उपनांव किंवे. पत्र पुण्याहून मिरजेस. २ समक्ष. ३ मिरजकरांचा वकील बाबाजी विश्वनाथ चाफेकर यांचें पत्र पुण्याहून मिरजेस.

आलीं. तीं येथें छा ८ मीनहूस पावलीं. पत्रीं लिहीलें होतें कीं, राजश्री भिकाजीपंत निजबत राजश्री सदाशिव नाईक वानवळे यांणीं घेऊन बहुत निकड केली. ऐवज द्यावयास नाहीं. ब्राह्मण प्राण द्यावयास उदीत जाला. याजकरितां उदईक मुहूर्तें निघोन पुणीयास वानवळे यांजकडे दरमजल येतों. तीं पत्रें राजश्री बळवंत रावजी यांस नेऊन दाखविलीं. त्यांचें बोलणें जाल्याचें पर्याय तपशीलवार छा ९ रोजीं सांडणीस्वार रवाना केला. त्याजबराबर लिहून पाठविलें आहे. तीं पत्रें वडिलांकडे येतील. त्याजवरून सर्वार्थ ध्यानांत येतील. जसें पत्रीं मीं लिहून पाठविलें आहे त्याच अन्वयें वडिलांकडून पत्रें जावीं. जमखिंडीहून आसोन निघोन वडिलापासीं आले असल्यास पुणीयास वडिलीं येऊं देऊं नये. दौलतींत कर्ज कोणी देणें नाहीं ? असें कोण आहे ? त्यास सावकारांनीं पैकाही मागणें. तत्राप मर्जीनुरूपच असावें. प्राण घ्यावा अथवा द्यावा असे कोणत्या सावकारानें कोणत्या दौलतींत आजपावेतों केलें आहे ? वानवळें यांचेंच कर्ज शिंदे भोसले यांजकडे येणें. तेथें जाऊन भिकाजीपंत असा निग्रह करून प्राण द्यावयास उदित होते कीं काय ? याच दौलतींत मऊ सांपडलें म्हणोन सरदारास घेऊन आपले खावंदाकडे येणार. परंतु जे सरदार सावकाराच्या कारकुनाबरोबर पुणें म्हणोन राजधानी तेथेंच यावयास निघाले तेव्हां वडिलार्जित लौकिकाची गति काय ? चहूंमुलखीं कीर्ति काय जाईल ? व येथें खावंद काय म्हणतील ? बोज कसा राहतो ? याजकरितां बहुत प्रकारें लिहून पाठविलें आहे. भिकाजीपंत बरेपणें समजून आल्यास उत्तम. नाहीं तरी इकडे यावयाचें न करितां नरसिंव्हच रूप दर्शविलें पाहिजे ! तरच परिणाम. वडिलीं इकडील संशय मनांत आणतील. कारण वानवळे श्रीमंताजवळ पेश. तेव्हां अधिक आगळें कसें करावें ? यास इकडील दिक्कत तिलमात्र चित्तांत न आणतां चांगलेंचपणें त्याची रवानगी करावी. पुढें खासा वानवळेही गेले. तत्राप त्यांच्यानें कांहीं व्हावयाचें नाहीं. आज एका सावकारानें आबरू घेतल्यानें वरकड सावकारांचे करोडों रुपये देणें त्यांची गति काय ? व आपला श्वरूपनाश. याजकरितां मी येथें बळवंतराव व दिनकरपंत यांजकडून सरकारांत बळकटी करून ठेविली आहे. श्रीमंतांकडून कांहीं एक वाकडेपणा व्हाव-

या व्या नाहीं. वडील पुण्यास आले असतां जनांत केवळ वाईट. आजपावेतों वडिलांपासून जें मिळविलें त्याजवर पाणी पडतें. हें सर्व वडिलांचे ध्यानांत आहे. मीं लिहून कळवावें असें नाहीं. लाईलाज म्हणून निघोन येणार. त्याचें निरशन तेथेंच व्हावें. येविसीं सर्वांचा एकदिल असावा. सर्वांवर पेंच असेच आहेत. एक मूठ होऊन उत्तर जालें असतां कालही थबकोन राहील. मग वानवळे ते किती ? जमखिंडीहून पत्रें आल्यापासून मला चैन पडत नाहीं. येविसीं बळवंतरावजी यांचेंही पत्र घेऊन आप्पासाहेब यांस पाठविलें आहे. वडिलीं पाहून जेथें असतील तेथें परिसफोट न होतां पोचविलें पाहिजे. वडिलींही निक्षून ल्याहावें. सारांष इकडे येणें न होई. तो अर्थ सर्वोपरी व्हावा. 'एक आप्पासाहेब निघोन आले आणि त्यांचा श्वरूपनाश झाला असें होत नाहीं. सर्व कुलास बट्टा लागेल. जाणोन विनंती लिहिली आहे. समय जाणोन अधिक उणें लिहलें आहे याची क्षमा व्हावी. नाहीं तर हें लिहणें लिहावयाची योग्यता माझी नाहीं. सर्व वडिलांचे ध्यानांत आहे. उत्तर समर्पक यावें. बुरकड मजकूर मागाहून लिहीन. या संकटापुढें कांहींच लिहावयास सुचत नाहीं. इकडील कोणेविसीं वसवसा न धरावा. जो ठोकाल तोच निभावेल असेच दिवस आहेत ! विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६९३४    श्री. (नकल) (भाद्रपद शु. १५–१९ सप्टें.)

पै. छ. २४ जमादिलाखर. खमस मयातैन. मु। कंकणवाडी.

वडिलांचे शेवेसीं शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. ता। छ. १४ जमादिलाखर बुधवार प्रातःकाळपावेतों सुखरूप असों. विशेष. वडिलीं छ. ५ जमादिलाखरचें पत्र लिहून जनराल याकडील वकीलाजवळ दिल्हें. तें त्यांनीं डाकेवरून रवाना केलें. कर्णेल यांनीं मजकडे पाठविलें. छ. १२ मिनहूस सोमवारीं दोनप्रहरीं पाठविलें. लिहिला मजकूर सविस्तर कळों आला. सायंकालचें पत्र घेऊन राजेश्री बळवंतरावजीकडे गेलों. रावजींनीं पत्र पाहून तेच समईं तें पत्र घेऊन श्रीमंताकडे गेले. पत्र श्रीमंतांस दाखविलें व पत्र पाठविण्याविसींचे पर्याय बहुत प्रकार बोलले. परंतु

चित्तांत भरलें नाहीं. आज्ञा जाली कीं आम्ही शिंदे भोसले पटवर्धन रास्ते यांस पत्रें इंग्रजांचे इतल्याशिवाय पाठवीत नाहीं अशी इंग्रजांची खातरजमा करून दिली आहे. त्यापेक्षां परभारें पत्र कसें पाठवावें? आपांचें लक्ष्य आमच्या ठायीं आहे. त्या अर्थी इंग्रजांकडूनही पत्र गेलें आणि आले. तत्राप बाध नाहीं. चित्तापासून लक्ष आमच्या जागीं आहे. तसेंच खंबीरतेनें राखोन समय काढून घ्यावा. यांत इकडून दुसरा अर्थ नाहीं. याप्रमाणें लिहून पाठवण्यास सांगावें. याप्रमाणें बोलणें होऊन रावजी घरास आले. काल दोनप्रहरीं मी गेलों. जाला मजकूर मला सांगितला. रावजीस सांगितलें. पुढील कर्मास भिऊन अगोदर सरकारांत विनंती पत्राविशीं केली. याप्रमाणें पत्र गेलें असतें म्हणजे इंग्रजांकडील इतल्ला कांहींच न राहतां व आम्हांस चाकरी करावयास संतोष व सरकारांतही चांगलें. यांत गुण बहुत होते म्हणून खटपट केली. परंतु सरकारच्या मर्जीस न येई. लाइलाज. याजउप्पर इंग्रज सरकारचें पत्र आम्हांस नेऊन देतील. आम्हास येणें प्राप्त. आमचीं चार कामें असतील तीं त्याजकडून करून घ्यावीं लागतील. इंग्रजांची दोस्ती राखणें. त्यास ते आमचे कामाविशीं सरकारांत विनंती करतील. त्या काळीं सरकारची मर्जी रुष्ट होईल. याचा विचार करूनच आम्हास सांगितलें कीं, रावजी बोलले पुढील अंदेशे घेऊन बोललास. असेंच मी श्रीमंतांपाशीं घेऊन बोललों. ते समई आज्ञा झाली कीं समजोनच येतात. त्या अर्थी कोणतेंही वाकडेपणांत यावयाचें नाहीं. याप्रमाणें बोलण्यांत आलेंच आहे. मीं रावजीस विचारलें. बोलण्यांत आल्याप्रमाणें मी लिहून पाठवितों. त्यांणीं सांगितलें इंग्रजांचे डाकेबरोबर पत्र देणें. त्यांत कांहींही लिहूं नये. आंतून पत्रें तपशिलवार लिहिलीं जावीं. त्याजवरून जाला मजकूर विदित व्हावा म्हणून लिहिलें आहे. इंग्रजांकडे उदईक पत्र लिहून लखोटा करून देतों. वडिलीं इंग्रजाकडे पत्र देईन तें आल्यानंतर त्यास जसे जाबसाल सांगावयाचे असतील तसे सांगावे. आम्ही पत्राविशीं सरकारचें लिहिलें आहे. त्यास दिवसगत लागले. याजकरितां तुम्हीही आणले. तत्राप चिंता नाहीं. असेंच सांगावें म्हणजे ते कर्णलास लिहून सरकारचें पत्र नेतील. परंतु कामकाजाचे मुद्दे त्याजपाशीं बोलण्यांत यावे. नाहीं तर

गुदस्तासारखें होईल. याजकरितां आधींच त्याचें वचन घेऊन ठेवावें. इकडील पत्र रावजीचें इतल्यानें यावयाचें नाहीं. या समई रावजींनीं खटपट बहुत केली परंतु खावंदांचे मर्जीस इलाज नाहीं. ईश्वर इच्छा काय समज आहे तो त्यांचे ते जाणत. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६९३५ श्रीगणपति. (भाद्रपद व. ३–२२ सप्टें.)

पौ। छ. १८ जमादिलाखर. सन खमस मय्यातैन.

[1]अपत्यें गणपतीनें दोनी कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. ता। छ. १७ जमादिलाखरपावेतों वडिलांचे कृपावलोकनें करून बालकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. वडिलीं आज्ञापत्र पाठविलें त्यांत आज्ञा कीं, दोन घड्याळें नीट करावयास मुंबईस पाठवावयास दिलीं होतीं तीं माणसें रवाना केलीं. तीं आलीं असल्यास किती दिवसांत तयार होतील तें पुसोन लिहावें म्हणोन आज्ञा. त्यास अद्यापि माणसें आलीं नाहीं. आलीं म्हणजे पुसोन लिहोन पाठवितों. घड्याळें आल्यास घड्याळें पाठवतों. दोन घड्याळांपैकीं धाकटें मात्र नीट होईल. थोरले घड्याळाची किंमत तेथील इंग्रज वीस रुपये करतो आणि नीट करावयास वीस रुपये मागतो असा प्रकार आहे. तें नीट होत नाहीं. कळावें. वडील कंकणवाडीस आलेचें लिहिलें तें कळलें. आज श्राद्धास्तव तीर्थस्वरूप रा [2]बाबासाहेब तासगावींहून भिलवडीस आले. कळावें. सेवेसीं विदित होय. कृपा पूर्ण केली पाहिजे हे विज्ञापना.

---

नं. ६९३६ (भाद्रपद व. ८–२६ सप्टें.)

उतारा—पत्र जमखिंडीहून राम. आपांचें मिरजेस छ. २२ जमा.खर (सन खमस.) बुधवारचें.

" होळकराच्या लढाया जालेल्या प्रामाणीक गृहस्थानें सांगितलेचें लिहिलें तें कळलें. हिंदुधर्म राखावा असें ईश्वराचे इच्छेंत असलें तर घडेल. विश्वतोमुखीं तसेंच आहे. + + वानवळे याचा मजकूर लिहिला त्याची तोड निघणें कसें होईल ? पुणेंचे मुक्कामचे पंचवीस लक्ष रुपयांचें कर्ज

---

१ पत्र गणपत परशराम याचें तासगांवाहून मिरजेस. २ हरि परशराम.

शिवाय स्वाऱ्यांचें कर्ज म्हणतां पन्नास लक्षांस गांठ आली आहे. रदकर्जी महाल गेले. सरंजामी महाल उरले यांत चाकरी व रदकर्ज कसें करावें? ते पक्षीं ज्याचें देणें त्याचे घरीं जावें, सांगतील तें करावें, नंतर ईश्वर इच्छेनें घडेल तें खरें! अडूराहून निघोन रा. गणेशपंत जोशी येथें येऊन पावले. अडूर गेलें. बरकड महालही गेलेदाखलच आहेत!"

नं. ६९३७ श्री. (भाद्रपद व. १२–३० सप्टें.)

पौ छा ३ रजब. सन खमस. आश्विन मास.

वडिलांचे सेवेसीं शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा २५ जमादिलाखर रविवार प्रातःकाळपावेतों सुखरूप असें. विशेष. वडिलांकडून बहुत दिवस पत्र येऊन सांभाळ होत नव्हता. हल्लीं छा १६ जमादिलाखरचीं पत्रें पाठविलीं तीं छा २३ मिनहूस पावलीं. लिहिला मजकूर कळों आला. चिरंजीव राजश्री रामचंद्रपंत आप्पा कंकणवाडीस आले. वानवळेकडील कारकुनांचा तगादा फार जाणोन निघाले. कृष्णेस पाणी फार आलें होतें. हल्लीं उतरलें. घोडीं, उंटें तुटलेलीं कसीं उतरतील म्हणोन राहिले आहेत. चिरंजीवास दुखण्यानें बहुत हैराण केलें. त्याजमुळें शक्तिहीन झाले आहेत. चिरंजीव राजश्री [1]दाजी जमखिंडीस आहेत. म्हणोन पत्रीं आज्ञा. ऐशास वानवळे याजकडील कारकुनांनीं जमखिंडीस उपास करून लौकर निघावें म्हणोन निकड केली. तेव्हां तीर्थस्वरूप राजश्री आप्पासाहेब यांणीं सांडणीस्वाराबरोबर मला पत्र छा १ जमादिलाखरचें पाठविलें. त्यावरून येथें राजश्री बळवंतरावजी व दिनकरपंत यांजपासीं बोलून त्यांचीं उत्तरें झाल्याचा मजकूर वडिलांस तपशीलवार त्याच सांडणीस्वाराबरोबर पाठविला आहे. तीं पत्रें आजपावेतों पोचलीं असतील. त्याजवर वडिलांसही पत्र लिहिलें तेंही पावलें असेल. त्यावरून सर्व ध्यानास आलेंच असेल. दौलतींत कर्ज आजपावेतों नाहीं कोणास! कर्जाशिवाय कोणी राहिला नाहीं व भिकाजीपंत निजबत वानवळे यांणीं निकर्ष काढिला आहे. असा कीं कोणीं केला नाहीं व कोणी सोडणार नाहीं. आप्पासाहेब यांणीं शर्त केली. परंतु पहिल्यानेंच मऊपणा जाला. याजमुळें

१ महादेव परशराम.

भिकाजीपंतांनीं पाय पसरिले. त्यास जें आजपावेतों जालें तें चांगलेंच आहे. याजउपरी वडिलीं सावकाराचे कारकुनाजवळ उत्तर करणें तें समर्पकच करावें. पन्नास लाख रुपये दौलतीचें कर्ज देणें. एका सावकारानें अब्रू घेतल्यानें वरकडांनीं काय करावें ? याजकरितां विनंती लिहिली आहे. वडिलीं ध्यानांत आणून तिकडे लिहिलें जावें. सर्वांनीं एकविचार करून धैर्य दिलें असतां तेही नेटानें सांगतील. इकडील वसवसा कांहीं चित्तांत नसावा. सरकारांतून उपराळा लोभांतील, म्हणोन होईल हे चित्तांत असेल. त्यास तें कांहींएक नाहीं. खाशा वानवळे गेले. तत्राप त्यांच्यानें कांहीं होण्याचें नाहीं. वडिलांस दुखण्यानें बहुत दिवस हैराण केलें व हल्लीं अनेक प्रकारचीं खटलीं उभीं राहिलीं आहेत. दिवसरात्र चैन पडत नाहीं. तेव्हां शरिरांत शक्ति कोठून राहील ? इकडे यावयाकरितां निघाले आहेत. त्यास इकडे येऊन फल तें कोणतें ? चौघांत आबरू घालवावी इतकाच प्रकार. आणखी कांहीं एक नाहीं. मीं लिहिले अर्थ ध्यानीं आणून न यावें म्हणोन स्पष्ट लिहिलें आहे. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६९३८ श्री. (भाद्रपद व. १२–३० सप्टें.)

पौ छा २६ जमादिलाखर. सन खमस.

[1]श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेसीं विनंती सेवक बाळाजी माहादेव दामले चरणांवर मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा २५ जमादिलाखरपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंत राजश्री पंतप्रतिनिधि यांची स्वारी छा १३ जमादिलाखर मसुरेहून निघोन कसबें मजकुरावरून किनईस गेली. परतोन छा २० जमादिलाखर याच मार्गें माघारी स्वारी येऊन मौजे सुरळीवर मुकाम जाहला. तेथून स्वारीखर्चाचा रोखा होऊन पाटील कुलकर्णी नेले. पांच हजार रुपये मार्गें लाविले तेव्हां पंधराशें रुपये ठराव करून घेऊन रोख ऐवज घेतला. शिवाय स्वारास व प्यादे आले होते त्यांस खाणा दाणा निराळा

---

१ पत्र रहिमतपुराहून मिरजेस.

खर्च पडला. राजश्री सुभानराव माने यांचा रोखा मजरें नेहरवाडी कसबें मजकूर येथें जाहला. त्यास खाणा दाणा मसालासुद्धां चारशें रुपये पडले. शिवाय गांवांतील घोडीं तीन नेलीं आहेत. राजश्री बापूजी महादेव बक्षी माने प्रकर्णी जप्तीचे कामावर आहेत. त्यांनीं स्वारी किनईस गेल्यापासून परतोन सुरलीस मुक्काम होऊन मसुरेस गेले. तोंपावेतों मुदबखाकडे जिनस गल्ला वगैरे लागला तो पेठेंतील वाणी यांस मारामार करून जबरदस्तीनें घरांतून जिन्नस काढून नेले. राजश्री बळवंतराव फडणीस याचा मुक्काम मौजे कुमठें येथें होता. श्रीमंतांची स्वारी मसुरेहून निघतांच बळवंतराव फौजसुद्धां कसबे निंबचे मुकामास गेले. दरबारांत दाद फिर्याद लागत नाहीं. नेहमीं रहदारी किनईहून मसुरेस व मसुरेहून किनईस लागली आहे. जातां येतां लोक मुकामास रहातात ते दाणा पोटगी घेतात. न द्यावें तर कजियास येऊन जबरदस्तीनें वाणी उदमी धरून घेतात. दरबारांत फिर्याद नाहीं. तेव्हां कांहीं उपाय चालत नाहीं. वाणी उदमी आब्रूचे होते ते निघोन गेले. माने प्रकर्णांचा कारभार चालत आहे. त्याचा जाब तुटत नाहीं. रोज दंगा चालला आहे. भोवरगांव पंताचे दंग्यानें ओस पडले. रहिमतपुरांत मात्र वसती आहे. रोख्याचा तों बेबंद राहिला नाहीं. राजश्री जगन्नाथ कृष्ण पेंढरकर श्रीमंतांजवळ असतां त्यांणीं चाळीस वर्षांचें येणें मुकादमीवर आहे म्हणोन पन्नास रुपये मसाला करून स्वार प्यादे पाठविले आहेत. त्यांनीं दंगा केला आहे. स्वामींनीं कृपादृष्टि करून बंदोबस्त केल्यास वसति राहील. नाहीं तर वसति रहातां दिसत नाहीं. राजश्री आप्पा निपाणकर यांचा काल मुक्काम मौजे साप येथें जाहला. आज कूच करून पुढें जाणार. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६९३९ श्री. ( भाद्रपद–सप्टें. )

स. खमस.

विज्ञापना. सरकारचे वाड्यांतील आश्रित वगैरे मंडळी यांणीं श्रीमंतांस विनंती केली कीं, स्वामी नेहमीं जाऊन नव्या वाड्यांत जाऊन राहिले. आम्हांस दर्शन होत नाहीं. तेव्हां कसें करावें ? त्यावर सर्वत्र ब्राह्मण मंडळीस आज्ञा जाली कीं, तुम्हांस नवा वाडा नेऊन दाखवावयाचा आहे.

इतकें बोलणें जालें त्याजवर आठ चार दिवस जाहले. भाद्र० शु० प्रतिपदा मंगळवारीं श्रीमंतांनीं वाड्यांतील ब्राह्मण शंभर असामी नव्या वाड्यांत नेऊन वाडा दाखवून दर असामीस शंभर रु० प्रमाणें देऊन निरोप दिल्हा. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६९४० ( भाद्र. व. १२–२० सप्टें. )

उतारा–पत्र धोंडो बापूजी जोशी याचें पुण्याहून मिरजेस बाळासा. स. रवाना छ० २५ जमादिलाखर–" उत्तरा नक्षत्राचा पाऊस नर्मदातीरीं बहुत पडोन नर्मदेस पाणी अती विशेष येऊन भडोच शहर चौथाई निजामपुऱ्यासुद्धां वाहून गेलें. असें पाणी शंभरदीडशे वर्षांत येऊन शहर वाहून गेलें नाहीं. रा. सदाशिव माणकेश्वर यांजकडील इंग्रजांच्या वकिलीचें काम निघोन रा. बाळशास्त्री टोकेकर यांजकडे सांगोन इंग्रजांच्या कुल जाबसालांत बाळशास्त्री बोलतात व बाळशास्त्री यांचे हातून परभारें यशवंतराव होळकर यांजकडे सल्ल्याचा पैगाम सुरू झाला आहे."

---

नं. ६९४१ ( भाद्र. व. १२–३० सप्टें. )

उतारा–पत्र धोंडो बापूजी जोशी याचें पुण्याहून मिरजेस बाळासा. स. रवाना छ० २५ जमा. खर—" शिंदे यांचा मुक्काम बऱ्हाणपुरास आहे. फौज बहुतकरून फुटली. कांहीं सदाशिवराव बक्षी यांजपाशीं आहे. कांहीं चाकरीस गेली. दहा हजार फौज सारी आहे. बाकी उठोन गेली. खाया खर्चाची तंगचाई बहुत आहे. बऱ्हाणपुरीं धारण सव्वा शेराची आहे. खासे शिंदे शहरांत भुस्कुटे यांचे वाड्यांत राहतात. पलटणें शहराबाहेर आहेत. फौजेची अशी अवस्था जाली. निभावणी कशी होते पहावी. साठ लक्ष रुपये कर्ज इंग्रजांपासोन शिंदे यांणीं आजपावेतों घेतलें. मलकनसाहेब शिंदेपाशीं वकिलीस होता. तो निघोन आला. वैकसाहेब सध्यां शिंदेपाशीं राहिले आहेत. मलकनसाहेब होता तोंपर्यंत कर्ज दिलें. हल्लीं तेंही बंद जालें. महालीं पैका यावा तर समजतच आहे. चाळीस चाळीस कोस वस्ती नाहीं अशी अवस्था होळकरांनीं केली आहे. जीव-

लालसिंग नि. होळकर याणें खानदेशीं धूम मांडली आहे. दहा पंधरा हजार फौज आहे. राज्याचा बंदोबस्त प्रथम दिवस आहे."

---

नं. ६९४२ श्रीगणपतिर्जयति. (भाद्रपद व. ३०–३ आक्टो.)

पै. छ. २८ जमादिलाखर. खमस मयातैन. भाद्रपद.

तीर्थस्वरूप राजेश्री काकासाहेब वडिलांचे शेवेसीं अपत्यें चिंतामणीनें सिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. ता छ. २८ जमादिलाखरपर्यंत वडिलांचे आशीर्वादें वर्तमान यथास्थित असे. विशेष. वडीलीं पत्र पाठवलें तें पावलें. राजेश्री बाळाजी महादेव दामले यांचें पत्र वडिलांस आलेलें पहावयास पाठविलें तें पाहिलें. त्यांचे डोळे उघडत असे जाहल्यास फिरोन उपद्रव होणार नाहीं म्हणोन आज्ञा. ऐसीयास येविसीं पेशजीं वडिलीं लिहिलें व दामले यांचीं पत्रें पाहावयास पाठविलेवरून श्रीमंत राजेश्री पंतप्रतिनिधि यांस व कारभाऱ्यास पत्रें लेहून पाठविलींच होतीं व इकडूनही परभारें पांच चार वेळां ल्याहावयाचे प्रकारें लिहिलें. तत्राप कोणतेंही जालें नाहीं. हल्लीं राजेश्री अंताजी हरि कानिटकर यांजकडे लेहून पाठविलें आहे. दामले यांचें पत्र माघारें पाठविलें आहे. शेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६९४३ श्री. (आश्विन शु. ५–८ आक्टो.)

पौ छा ३ रजब. खमस मय्यातैन.

विज्ञापना. इकडील वर्तमान तरी, श्रीमंतांची स्वारी छा १९ रविलाखरीं दोनप्रहरीं निघोन सासवडास गेली. उदईक यावयाचा बेत आहे. मग पहावें. राजश्री शिंदे निघोन नर्मदेवर जाणार. तयारी होत आहे म्हणोन पत्रें आलीं व भोसलेही नर्मदेवर फौज आहे तिकडे जाणार. राजश्री यशवंतराव होळकर जयपुराकडे गेले. [१]जमीयतपूर आहेत. श्रीहरि त्यांस यश देत आहे. पेशजी लढाई जाहल्याचा मजकूर किबे यांणीं राजश्री बाळाजीपंत यांस लिहिला होता. त्याजवरून विदित जालेंच असेल. अलीकडे वर्तमानें आलीं नाहींत. पाऊस हस्ताचे दोन पडले.

---

१ फौजबंद.

धारण पहिला पाऊस पडला त्याजवर पायली सवा पायली जाली होती. पाऊस चांगला पडोन अडीच शेरांवर आली. चौकसी असल्यास असें न होतें. सारांश रयतेचा भोग. सर्वांनीं मरावें हीच इच्छा श्रीहरीची. मग बंदोबस्त कसा होईल? राजश्री सलो[1] रुद्र थांस नबाबाकडून फौज आली होती. त्यांणीं कैद केलें म्हणोन वर्तमान आहे. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६९४४ श्री. ( १५ आक्टो. )

पै. छ. १८ रज्जब. सन खमस. मय्यातैन.

सेवेशीं साष्टांग नमस्कार. विज्ञापना ऐसीजे. तागायत छ. १० रजेबपावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंत आश्विन शु. ९ शनिवारीं जवाहिरखान्यांत पूजा करावयास बसले होते ते समई होळकराचे लष्करांतून पत्रें श्रीमंतांस बातमीदारांचीं आलीं. त्यांतील मजकूर जे, सिंदे, भोसले, होळकर व नबाब वगैरे कुल सरदार व हिंदुस्थानचे राजेरजवाडे या सर्वांचा एक दिल होऊन कलकत्तेस व विलायतेस तिहीं सरदारांचीं पत्रें गेलीं जे, पेशव्यांचे दौलतीचा बंदोबस्त नाहीं. तो आम्ही सर्वांचे विचारें करितों. त्यास तुमचा रुकार असल्यास पुढें तुमचा आमचा सल्हा वगैरे हरयेक जाबसाल ठरेल. नाहीं तरी परस्परें लढाई तरी सुरूच आहे. त्यास दौलतीच्या उपयोगी हे खावंद नाहींत. याजकरितां गादीस दुसरा खावंद केला पाहिजे. म्हणून तिहीं सरदारांचीं पत्रें गेलीं आहेत. म्हणोन याप्रमाणें वर्तमानाचीं पत्रें बातमीचीं श्रीमंतांनीं वाचलीं. त्यावरून मर्जी बहुत सर्द आहे. दसऱ्याचे दिवशीं श्रीमंतांस सर्वांनीं लहानथोरांनीं नजरा केल्या. त्याचा आकार मोहरा सुमार ४५, पुतळी तार्टे ६५, होन ६, व रुपये ७० येणेंप्रमाणें कुल नजरेचा आकार. श्रीमंतांकडून पोषाख सातारियांस महाराजांकडेस गेला. बाजत दुसरे कोणास कांहीं एक आजपारियंत दिलें नाहीं. इंग्रजांचें म्हणणें सरकारांत जे, सरकारचे लहान मोठे सरदार आहेत ते फौजसुद्धां आम्हाबरोबर होळकराचे पारपत्यास यावे.

---

१ हा निजामाचा सेनापति.

त्यांची खर्चाची वगैरे बंदोबस्ती आम्ही करूं. न आले असतां पारपत्य करूं, याप्रमाणें आहे. पुढें जो मजकूर होईल तो शेवेसीं लिहूं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं ६९४५ श्रीगणपतिर्जयति. (आश्विन व. ५–२३ आक्टो.)

पै. छ. १८ रजब. आश्विन मास. सन खमस. मयातैन.

तीर्थस्वरूप राजेश्री काकासाहेब वडिलांचे शेवेसीं—अपत्यें चिंतामणीनें शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. १८ रजबपर्यंत वर्तमान यथास्थित असें. विशेष. राजश्री सखाराम घोंडदेव काळे याजकडील कारकून नारो विष्णु आपटे यांणीं शहापुरास खटला केला. यास्तव तिकडील बंदोबस्ताकरितां राजश्री दाजीबा लिमये यांजबरोबर सरंजाम देऊन पाठविले आहेत. त्यांणीं दोन कोशांचे तफावतीनें मुक्काम करून पत्र व कारकून पुढें पाठविले असतां आपटे यांनीं आपण जांबोटीकराकडील खटल्याबद्दल शिबंदीखर्च केला आहे त्याचा फडशा करून द्यावा अशीं बोलणीं घालून घटाई करून पत्र माघारें देऊन कारकुनास उठवून लावून दिलें. दाजिबाकडे गेले. इतक्यांत आपटे जमावसुद्धां निघोन जाऊन तुरुकवाडी म्हणोन विठ्ठल विश्राम यांचा इनाम आहे तेथें ठाणें घातलें. दाजीबांनीं दसऱ्याचे दिवशीं शहापुरास जाऊन बंदोबस्त केला. याप्रमाणें वर्तमान लिहून आलें तें वडिलांस लिहिलें आहे. हिरे चंदगड येथेंही आपट्यांनीं वेध लाविल्याचें वर्तमान आहे. आपट्याबरोबर स्वार आरब गाडदी मिळोन दीड हजार जमाव आहे असें तिकडील लिहिण्यांत आहे. शेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६९४६ श्रीगणपतिर्जयति. (आश्विन व. ९–२७ आक्टो.)

पौ छा २२ रजब. सन खमस.

[1]तीर्थस्वरूप राजश्री काकासाहेब वडिलांचे सेवेशीं. अपत्यें चिंतामणीनें शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छा २२ रजब वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजश्री अंताजी हरि कानिटकर फौजसुद्धां देवर

---

१ पत्र सांगलीहून मिरजेस.

आष्ट्याचे मुकामीं होते. तेथून कूच छा। ८ रजबीं करून सुभानराव माने यांचे रोखें गेले. त्यास त्यांची यांची आश्विन वद्य ६ बुधवारीं म्हसवडचे पलीकडे दोन तीन कोसांवर धुळदेव म्हणून देव आहे तेथें गांठ पडून लढाई होऊन मान्या लुटला गेला. तीन चारशें घोडीं लहान मोठीं गुरें वगैरे लूट फौजेंत आली. खुद्द मान्या सडा चाळीसपन्नासानिशीं पळोन गेला. त्याजकडील नगारा व निशाण व गारद्याकडील निशाणें दोन येणेंप्रमाणें पाडाव आलें. तिकडील आरब शंभर दीडशें होते. ते देवालयांत शिरून गोळी वाजविली. ते वेळीं पागेकडील बारगीर एक [1]भले लोकांपैकीं डिगरजकरांकडील भला माणूस एक, दोन असामी ठार झाले. मान्याचा कारकून माणको गोपाळ म्हणून पाडाव आला आहे. जायां जखमी शिलेदार व घोडीं झाल्याची याद मागाहून पाठवितों असेंही कानिटकर यांनीं लिहिलें आहे. वडिलांस विदित व्हावें म्हणून सेवेसीं विनंती लिहिली आहे. सेवेसीं विदित होय. पागेपैकींचा बारगीर फार चांगला माणूस होता. बाहेर बुणगें दोन अडीच हजार सुमार होतें. आंत होतें त्यांनीं गोळ्या मारल्या याजमुळें घोडीं पडलीं व जायां फार झालीं. माणूस जखमीही बरेंच झालें. श्रीनें कृपा केली. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६९४७ श्री. ( २७ आक्टोबर )

पै. छ. २७ रजब. खमस मयातैन.

शेवेसीं धोंडो बापूजी जोशी शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. आश्वीन वा। ९ पावेतों यथास्थित. नरगुंदकर दीक्षिताबरोबर तीनशें रुपयांची हुंडी करावीविसीं तीनशें रुपये शिका हुंडी करून पाठवावी व आणखी पंचावेसाची हुंडी करावी असें पेशजीं पत्रीं आज्ञा. त्यास सावकाराकडून रुपये आणून घरीं ठेवले. हुंडी केली नाहीं. श्रीकाशीकडे दंगा असे यास्तव केली नाहीं. पेशजीं लिहिलें आहे. त्यास हल्लीं होळकर याणें आगरे किल्ल्यानजीक सात पलटणें लुटून हल्ल्यानें किल्ला आगरे घेऊन चार रोज मुक्काम करून पुढें दिल्लीस खासा गेला. अंतरवेदी, मथुरा वगैरे

---

१ भले लोक = शिलेदार.

अंमल बसला. मीरखान याजला लखनौस पाठविलें. दिल्ली सर करून काशी प्रयाग ठाणीं घ्यावीं याप्रमाणें बोलतात. श्रीकाशी येथें इंग्रजानें सावकार मातबर यांस वीस लक्षांची पट्टी लावली आहे. कांहीं पांच चार लाख ऐवज पटला. याजप्रमाणें सावकारी लिहून आली असें सांगतात. होळकराकडील फौज तिकडे जाणार अशी वंदता दाट आहे. यास्तव हुंडी केली नाहीं. हल्लीं एथें भाव बरोबर आहे. पुढें हुंडणावळ पडते कीं काय न कळे. कळावें. हुंडी करावी न करावी याची आज्ञा आल्यास सत्वरच करीन. रावसाहेब[1] श्रीकाशीस जाणार होते ते तूर्त राहिले. सरकारची आज्ञा जाणेस होत नाहीं. विलायतेहून करनल लाट म्हणून पुण्यास आला. त्यास परस्परें मेजवानी सरकारांत व माणकेश्वर यांजकडे होऊन मुंबईस माघारा गेले. चार रोज जाले. साष्टीस नानाची स्त्री आहे त्यांची भेट घेऊन जाणार असें बोलतात. कळावें. शिंदे उज्जयनीस गेले. जमाव पंधरा वीस हजार बरोबर आहे. भोसले दसऱ्यास डेरेदाखल होणार होते. कळावें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ६९४८ श्री. (आश्विन व. ११–२९ आक्टो.)

पै. छ. २७ रजब. सन खमस मयातैन. आश्विन मास.

श्रीमंत राजेश्री बाळासाहेब स्वामीचे शेवेसीं विनंती. सेवक बाळाजी माहादेव दामले चरणांवर मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. २४ रजबपर्यंत वर्तमान यथास्थित असों. विशेष. माने प्रकरणीं श्रीमंत राजश्री पंतप्रतिनिधि यांजकडील कारकून व पन्नास शिपाई जप्तीचे कामावर कसबे रहिमतपूर येथें आहेत. त्यास त्याचा खटला अद्याप तुटत नाहीं. रोज गांवांत दंगा चालला आहे. भाद्रपदमासीं श्रीमंतांची स्वारी किन्हईस गेली ते समयीं सव्वापंधराशें रुपये स्वारीखर्च घेतला. शिवाय पेठेंतील वाणी यांचा जिन्नस पांच सातशें रुपयांचा लुटून नेला. येविसीं स्वामीस विनंती लिहिली होती. तेथून येविसीं पत्रें अथवा कारकून प्रतिनिधि यांजकडे येऊन कांहीं व्हावें तें झालें नाहीं. तेव्हां त्यांस तें जिरलें असें जाहलें. हल्लीं फत्तेसिंग माने व

[1] अमृतराव पेशवे.

नारायणराव माने दोन व यशवंतराव माने व पाटलोजी माने वगैरे चाकर माने, याचे गांवचे शेतावर जप्ती आली आहे. माने यांस शेतें इनाम नाहींत. गांवचीं रयताव्याचीं शेतें त्यांजवर जप्तीनें जे माने फत्तेसिंग माने यांजकडे चाकरीस होते त्यांजकडील रयतावा होता तो त्यांजकडील दूर करून परकी कुळास लावणी केली आहे. त्या कुळास मारामार मांडिली आहे. पट्टीचे दिवस, यास शेतास जप्ती, याजमुळें गांवांत बैदा पडला आहे. सेतें सरकार रयताव्याचीं असतां जप्ती करावयाचें कारण नाहीं. असें असतां रिकामा खटला मांडिला आहे. वसूल त्यांणीं नेल्यावर हातास येणार नाहीं. गांवांत रयत थोडी. शेतें माने याजकडे. याजकरितां स्वामींस विनंती लिहिली आहे. ऐशीं कामें आहेत हीं श्रीमंत करावयास सांगत नाहीं. मध्येंच कारभारी करितात. यास्तव राजेश्री चिटको सदाशिव व बक्षी सांगलीस गेले आहेत. त्याजकडून पत्रें, कारभारी यांस आली असतां काम होईल. यास्तव मशारनिल्हेस येविशीं याचा बंदोबस्त करून जप्ती उठविणेविशीं ताकीद जाली पाहिजे. बंदोबस्त लवकर जाहाल्यास उत्तम नाहीं तर महसूल नेतात. शेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६९४९ श्री. (आश्विन व. १२–३० आक्टो.)

पै. छ. ३ साबान. खमस मय्यातैन. कार्तिक.

सेवेशीं सा। नमस्कार विज्ञापना. तागायत छ. २५ रजेत पावेतों स्वामीचे कृपावलोकनें करून वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं छ. ४ मिनहूचें पत्र पाठविलें तें पावोन बहुत आनंद जाहला. पत्रीं आज्ञा जे, पत्रीं वर्तमान लिहितां तें प्रत्ययास येत नाहीं. याजकरितां वास्तव्य असेल तें पक्कें लिहीत जावें. त्यास सेवेशीं वर्तमान लिहितों तीं दिल्ली व होळकर व शिंदे बहादुर यांच्या लष्करांतून पत्रें येतात त्यांतील सारांश व भोसले व नबाब व इंग्रज यांजकडील वकील येथें आहेत त्यांसी [1]साजिषी राखून परस्परें अखबारीचीं वर्तमानें येतात तीं कलमींच पत्रीं लिहितों. येथील दरबारांतील वर्तमान पक्कें असेल तेंच सेवेशीं लिहितों.

---

१ मैत्री.

राजश्री यशवंतराव होळकर यांजकडील वकील आनंदराव होळकर व दाजी भैराळ व महिपतराव असे येथें वकिलीस आहेत. त्यास कलुप याणें सरकारांत विनंती केली जे, होळकराकडील 'वकिलांनीं येथें असूं नये. त्यावरून श्रीमंतांनीं होळकराकडील वकिलांस आज्ञा केली जे तुम्हीं येथें राहूं नये. निघोन जावें. त्यावरोन दिवाळी करोन निघोन जाणार. राजश्री मोरोबादादा फडके व माधवराव फाळके यांस सरकारांतून आज्ञा जाली जे तुम्ही येथें राहूं नये. त्यावरून उभयतां वाईस निघोन गेले. राजश्री आबा काळे यांस आज्ञा जाली जे, तुम्ही वाड्यांत व शहरांत राहूं नये. निघोन जावें. त्यावरून कुटुंबसुद्धां निघून जाणार. शिंदे बहादुर उज्जनी-नजीक गेले. चित्रा नक्षत्राचा पाऊस उज्जनी प्रांतीं आतिशय पडून क्षिप्रेस पाणी येऊन उज्जनीचीं पांच सात हजार घरें पाण्यानें वाहून गेलीं. इंग्रजांचीं दोन तीन पलटणें क्षिप्राकांटीं होतीं तीं रात्रौ वाहून गेलीं म्हणोन बहुतांचीं पत्रें आलीं. शिंदे व भोसले एक होऊन होळ-कराकडे जाणार. श्रीकाशी क्षेत्रापासोन इंग्रजानें पंचवीस लाख रुपये घेतले. होळकर मथुरेवर आहेत. इंग्रजांकडील तहाचें बोलणें पक्कें असल्यास उत्तम. नाहीं तरी कलकत्ते प्रांतीं फौज रवाना करून आपण दक्षिणप्रांतों येणार. हिंदुस्थानांत होळकराच्या करण्याचा प्रत्यय इंग्रज व राजेरजवाडे वगैरे यांस येऊन त्यांची खातरजमा जाहली. दक्षिणेंत नबाब व पट्टण आहे यांचीही खातरजमा होईल असा बेत तेथील आहे. मीरखान पठाण चाळीस हजार फौजेनिशीं सागर, झांशी व काल्पी व डंगाई या प्रांतीं होळकरांनीं पाठवून इंग्रजांस सामील जाहले होते त्यांचीं पारिपत्यें करून प्रांतांत खंडण्या घेऊन अंमल सुरू केला आहे. कलकत्त्याहून लाडसाहेब नऊ आसामीसुद्धां येथें येऊन सरकारच्या भेटी होऊन परस्परें मेजवान्या होऊन करनेलानीं व डकीण मुमईकर यांनीं ही मसलत उभी केली आहे तिचाही परिणाम साध्य असाध्य व श्रीमंतांची मर्जी कायम सर्व विषय ध्यानांत आणून सरकारचा निरोप आश्विन व. २ घेऊन मुमईस गेले. तेथून कलकत्त्यास जाऊन सविस्तर मजकूर सांगणार. त्या अन्वयें तेथें कलकत्त्यास करतील. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ६९५० [1]शिक्का (ज्येष्ठ शु. ११ श. १६६७–३० मे १७४५)

रा [2]आण्णाजी आपाजी देशमुख व नागोजी राम देशपांडे व रामराव शामजी देशपांडे सरकार [3]मुर्तुजाबाद सुा सीत आर्बैन मया व अलफ. हालीं लिहोन दिला कागद ऐसाजे. ता गौराण्णा मगदुम मौजे निलेजी यांनीं अर्ज केला कीं आमचे कागदपत्र होते ते दिलेलखानाचे वेळीं सोमवंशी सरलष्कर नाईक व उदाजी चव्हाण हे सर्व मिळोन शहर लुटिलें घरें जाळलीं त्यामध्यें आमचे कागदपत्र गेले. भोगवटा पुरातन प्राचीनचा लिहिला आहे. त्यास तुमचें वतंन पुरातन धुरंग दीड पाव चावर दिलें असे. तुम्हांस पंधरा बिघे दिले आहे. मानपान समयास जो कोणी असेल त्यांनीं घ्यावे व उभयतां मिळोन आधीं दर्याबाईनें घ्यावे. खर्च वांटून दोघांनीं घ्यावा. असा करार केला आहे. सुखरूप अनुभवून राहणें. जाणीजे. छ. ९ माहे जमा. वल.

---

नं. ६९५१ ( कार्तिक शु. ६–८ नोव्हें. )

उतारा—पत्र पुण्याहून मिरजेस बाबजीपंत पटवर्धन यांचें छ. ४ साबान गुरुवार सन खमसर्चे.

"सोलापूरचें वर्तमान वडिलांचे ऐकण्यांत आलेंच असेल. हल्लीं तेथील मुख्यास दुर्गवासीं ठेवावें अशी योजना होऊन आणावयास स्वार गेले. ईश्वर इच्छा ! वडिलीं दुर्गात बहुत हुशारी राखली पाहिजे. उद्योगांत

---

१ पत्रावर शिक्के आहेत त्यांतील अक्षरें लागत नाहींत. २ या ग्रंथांत प्रकरणें आलीं आहेत त्यांशीं या पत्राचा कांहीं संबंध नाहीं. आमच्या संग्रहांतील हा जुना कागद कोठें तरी छापावयाचा तो येथें छापला आहे. हें ताकीद. पत्र श्रीनिवासराव परशरामपंत प्रतिनिधि यांचें असावें. इ. स. १७०० सालानंतर ताराबाईंच्या कारकीर्दीत महाराष्ट्रांत सर्वत्र मराठे व मोंगल यांमध्यें युद्ध चालू होतें. पत्रांत मिरजप्रांतीं उदाजी चव्हाण आणि दावलजी सोमवंशी सरलष्कर यांचा दंगा झाल्याचा उल्लेख आहे. तो दंगा इ. स. १७०७ च्या सुमारास घडलेला आहे. मिरजेंत त्या वेळीं महंमद देलेलखान हा मोंगलांचा सुभेदार रहात असे. ३ मुर्तुजाबाद = मिरज.

कमी पडावयाचें नाहीं जाणोन विनंती लिहिली आहे. विश्वास या प्रसंगीं कोणाचा धरूं नये. दिवस विलक्षण आहेत!"

नं. ६९५२ (कार्तिक शु. ७–९ नोव्हें.)

उतारा—पत्र पुण्याहून मिरजेस बाबजीपंत पटवर्धन यांचें छ. ५ साबान भृगुवार सन खमसचें.

"वाडिलीं दुर्गांत चांगली चौकशी करून हुशारी राखली पाहिजे. या प्रसंगीं चि. राजश्री नारायणरावसाहेब यांचा देखील विश्वास धरूं नये. यांत सर्व आहे! येथें अनेक प्रकारचे आवाज ऐकतों. जाणोन वारंवार लिहीत आहें. रा. रामचंद्र शिवाजी कसे फसून स्थळ गेलें हें ध्यानांत आहेच. दिवस केवळ अवघड आले आहेत! याजकरितां स्वस्थता होई तोंपर्यंत लिहिल्याप्रमाणें बंदोबस्त राखला पाहिजे. चौकी पहाऱ्याचीही चाळणा वरचेवर असावी. मी लिहितों त्याचें मनन व्हावें."

नं. ६९५३ श्री. (कार्तिक शु. ९–११ नोव्हें.)

छ. ७ साबानीं पुण्याहून चि. राजश्री बाबाजीपंत पटवर्धन यांचीं पत्रें चि. राजश्री [1]आपासाहेबांस आलीं त्यांतील मजकूर—

१ निपाणकर यास जरीपटका करणें म्हणोन आज्ञा जाली. कर्णेलाकडे गेले होते कीं, आपला बंदोबस्त करावा. त्यांणीं घातुपोपण सांगून वसलीसाहेब आलेवर काम होईल म्हणोन सांगितलें. कलम.

१ पुण्याहून विंचूरकर व कर्णेल वालिससाहेब गेले ते चांदवड घोडप घेऊन गालमार (?) किल्ल्यास तोफा लागू केल्या. बोलणें लागलें. कलम.

१ कर्नाटकचा सरसुभा बयाजी नाईक जामूद यास होणार. बोलणें ठरत आहे. कलम.

१ बापू फडके व रामचंद्र गोसावी व बाबूराव कात्रे व बयाजी नाईक श्रीपंढरीस येऊन [2]सोलापूरकर यास हुजूर न्यावें हा बेत आहे. कलम.

१ निजामन्मुलूख यांजकडील फौज पलटणें विंचूरकरांबरोबर गेलीं तीं सरकार तालुक्यांत खानदेश बागलाण इकडे दंगा मनस्वी करीत आहेत.

---

१ राम. आपा जमखिंडीकर. २ रामचंद्र शिवाजी सोलापूरचा किल्लेदार.

गुदस्तां बंडवाले यांणीं ज्याप्रमाणें केलें त्याप्रमाणें करतात. कलम.

१ दिल्लीस होळकरांची व इंग्रजांची लढाई होऊन दिल्लींत होळकर यांणीं अंमल बसविला. खासा होळकर गेले नव्हते. कलम.

१ शिंदे उज्जनीस गेले. घाटगे कारभार करितात. संगम ( मैत्री ) व्हावयास होळकराकडे जाणार. इंग्रजांजवळ चार लाख रुपये खर्चीस घेतले. कलम.

१ समशेरबहाद्दर याचे सावत्र भावाचा आज्जा इंग्रजांकडे मिळून बहाद्दर यास मारावें म्हणोन भेटीस कपतान यांणीं बोलाविलें. तेथें बेरंग पाहून हुशार जाले. कपतान याणें वार टाकिला तो संभाळून बहाद्दर यांणीं हात चालविला. तो पुरा जाला. आपण निघोन फौजेसुद्धां होळकर यांजकडे गेले. त्यांनीं ठेवून घेतले. नीळकंठराव रामचंद्र यासही जखम लागली. कलम.

१ अशेरीचा किल्ला ज्या कमावीसदाराकडे गुदस्तां होता त्यांणीं फितुरानें इंग्रजांस दिल्हा व जवाहीर दाबलें. हें शिंदे यांस कळोन त्याचें घरदार जप्त केलें. जवाहीर कांहीं सांपडलें व आणखी जिकडे ठिकाण लागेल तिकडे शोध करीत आहेत. शिंदे यांणीं कमावीसदार यापासून सहा लक्ष रुपये घेतले. शिंदे उज्जनीकडे जावें तें सोडून तालभूपालाकडे गेले. कलम.

---

नं. ६९५४　　श्रीगजानन.　　(कार्तिक शु. ११–१३ नोव्हें.)

पो छ्या ४ रमजान, सन खमस.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री गंगाधर रावजी स्वामीचे सेवेशीं. पोष्य [1]बापूजी गणेश साष्टांग नमस्कार. विनंती. येथील कुशल तागायत छ्या ९ साबान जाणोन स्वकीय कुशल लिहीत असलें पाहिजे. विशेष. राजश्री सखाराम थोरात यांजकडे तालुके वाळवें वगैरे फुटगांव सरंजामास आहेत. त्यांनीं नेहमीं चाकरी पुणेयास करावी तें घडत नाहीं. याजकरितां सरकारांतून तालुके मजकूर फुटगांव सुद्धां सखाराम थोरात

---

१ गोखले.

यांचे विचारें दरोबस्त मामलत आम्हाकडे सांगोन थोरात यांनीं चाकरी आम्हाबरोबर करावी असें ठरून पत्रें पुण्याहून आलीं. त्याजवरून तालुके मजकूर येथील ठाणेयांचा बंदोबस्त केला आणि मामलतीच्या कामावर हालीं राजश्री वैजनाथ रघुनाथ जोशी यांसी पाठविले आहेत. तरी मिरज प्रांतांत चवथाईचा अंमल गांवगन्ना नेमणूक आहे त्याप्रमाणें चिठ्या गांवगन्ना देऊन यांचे स्वाधीन जाहला पाहिजे व कांहीं कारण पडल्यास मशारनिल्हे लिहितील त्याप्रमाणें हरयेक विसीं [1]पुस्त पन्हा आपणाकडून होत असावा. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

---

नं: ६९५५ श्री. (कार्तिक शु. १३–१५ नोव्हें.)

पौ छा। १४ साबान. सन खमस.

[2]श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं विनंती. सेवक बाळाजी महादेव दामले चरणांवर मस्तक टेऊन शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा। ११ साबान पर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं आज्ञापत्र पाठविलें. तेथें आज्ञा कीं, औषधास शिलाजित पाहिजे, तर डबा पाठविला आहे. हा भरून पाठऊन देणें म्हणून आज्ञा. त्यांस शिलाजित इकडील डोंगरास नाहीं. सह्याद्रीनजीक मोठा पर्वत आहे. तेथें कडा तुटला आहे. त्या कड्यास होत असतो. तेथें कुमठें म्हणून गांव आहे. तेथील पाटील याजकडे शहाणा गडी रुपये देऊन पाठविला. रुपयास तोळा एक याप्रमाणें मिळाला. तो चार रुपयांचा चार तोळे घेऊन डब्यांत घालून पाठविला आहे. उंच चांगला आहे. वाण्याचे दुकानीं मिळतो. त्यांत भेळ असते. तो चांगला नाहीं. हा अस्सल चांगला आहे. जास्ती मिळत नाहीं. चौकसीनें घेऊन पाठविला आहे. पेशजींही स्वामींनीं एक वेळ आणविला होता. तोही रुपयास तोळाच घेऊन पाठविला होता. आणखी किती रुपयांचा घेऊन पाठवावा ती आज्ञा जाहली पाहिजे. एकदांच मिळत नाहीं. वरच्यावर थोडा थोडा काढावा लागतो. याजकरितां विनंती लिहीली आहे. परीक्षेचा अस्सल चांगला आहे. सरकारचा डबा

---

१ मदत, उपराळा. २ पत्र रहिमतपुराहून मिरजेस.

जासुदाबरोबर पाठविला आहे. राजश्री बापू गोखले यांचा काल मुक्काम मौजे सुरळी येथें जाइला. आज पाडळीचे मुक्कामास जाणार. राजश्री गोविंद शामराव व विनायक पंत चाफेकर समागमें या मुकामापर्यंत आहेत. उदईक मा। निरुहेही माघारे येतील. सेवेसीं विदित होय. हे विज्ञप्ति.

---

नं. ६९५६ श्री. (कार्तिक शु. १४–१६ नोव्हें.)

पौ छा। १५ साबान. सन खमस.

सेवेसीं विनंती सेवक बाळाजी महादेव दामले शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा। १२ साबान वर्तमान यथास्थित असें. विशेष. राजश्री बापू गोखले यांचा मुक्काम काल मौजे सुरळीवर होता. तेथून कूच होऊन पाडलीचे मुक्कामास कसबें रहिमतपुरावरून गेले. बरोबर राजश्री विनायकपंत व गोविंदराव होते. याजमुळें शिवारास उपद्रव लागला नाहीं. खर्चही फार पडला नाहीं. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६९५७ श्री. (कार्तिक व. २–१९ नोव्हें.)

सेवेशीं साष्टांग नमस्कार. विज्ञापना. ता। छ. १५ साबान पावेतों स्वामींचे कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. उत्तरेकडील वर्तमान तर राजश्री शिंदे बहादूर यांजकडे होळकर यांणीं वडीलपणा देऊन फौजेची बंदोबस्ती करून मथुरेनजीक शिंदे यांस ठेऊन राजश्री यशवंतराव होळकर फौजसुद्धां अजमीरच्या मुक्कामाहून कूच करून दिल्लीपार लाहोरप्रांतीं शहर पटल्यास[1] जाऊन शिकाकडील फौज आली होती तिची भेट घेतली. दोनी फौजा एक होऊन पटल्याच्या पूर्वेस भागीरथीच्या तीरास गेल्या आहेत. पूर्वेकडील नेपाळ देशचा राजा गोरख वीस हजार फौज, दहा बारा पलटणें हिंदवी खासगत घेऊन कमायून बद्रिकाश्रम इकडील पहाडांतील मवास[2] व संस्थानिक राजे यांचें पारिपत्य करून ज्वालामुखीच्या राजास तंबी पोंचविली आहे. त्यास होळकर यांचें व गोरख राजे यांचेंही संधान भेटीचें लागलें आहे. उभयतां एक होऊन नेपाळच्या राज्यांतून कलकत्यास जावें हा रोख आहे. म्हणून

---

१ पतियाळा. २ लुटारू.

छ. १२ रजबचीं पत्रें दिल्लीचीं आलीं, त्यावरून सेवेशीं लिहिलें आहे. विलायतेहून लार्ड कार्नवालीस म्हणून मातबर सरदार फिरंगी उमर वर्षें ऐशीचा रवाना जाहला, तो कलकत्त्यास येऊन तेथून बंगाल्याच्या मार्गें लखनौस येत होता, तो आपमोतीनें[1] छ. १५ रजबीं हक्क जाहला. तो मेला म्हणून येथे[2] तोफा जाहल्या. त्यानें दिल्लीस येऊन मराठी यांशीं तह करून माघारें जावें म्हणून रवाना केला होता. रा. पांडुरंग बाबूराव बारामतीकर यांणीं श्रीमंतांपासून अठरा महिन्यांचा श्रीमहायात्रेस जावयाचा निरोप घेऊन बारामतीस गेले. तेथून माघमासीं निघोन महायात्रेस जाणार. याप्रमाणें इकडील वर्तमान आहे. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

---

नं. ६९५८ श्री. (कार्तिक व. २–१९ नोव्हें.)

[3]सेवेसीं विनंती. सेवक बाळाजी महादेव दामले चरणांवर मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा १५ साबानपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. कसबें रहिमतपुरांतील ठाण्यांतील वाडा सन इहिदे मय्यातैनांत सखाराम घाटगे यांणीं जाळला. वाड्यात जागानिवारा अगदीं नाहीं. कुसवाचे कडेस पांच खण खपरेल होतें. तें यंदापासून पडून कुसूं सुद्धां पडलें. त्यानें जागा कांहीं राहिली नाहीं. कुसूं पडलेलें नवें बांधिलें पाहिजे व घरही नवें बांधिलें पाहिजे. त्यास तीनशें रुपयेपर्यंत खर्च लागेल. याजकरितां विनंती लिहिली आहे. कुसूं व नवें घर बांधण्याविसीं आज्ञा जाहली पाहिजे. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६९५९ श्री. (२२ नोव्हेंबर.)

पौ छा २५ साबान. सन खमस. कार्तिक मास.

सेवेसीं साष्टांग नमस्कार विज्ञापना. कार्तिक वा ६ शिंदे यांणीं हुसंगाबाद घेऊन भोसले यांचीं पहिलीं त्यांचे हवालीं करून पुढें चालते झाले. भोसलेही चालते झाले. होळकर मथुरेपलीकडे आहेत. दिल्ली, आग्रा, टाणें घेऊन आंबोजी इंगळे यांचे हवालीं केली. लिखासाहेब

---

१ स्वाभाविक मृत्यूनें. २ पुण्यास. ३ पत्र रहिमतपुराहून मिरजेस.

याची लढाई होऊन यश यशवंतरावांनीं घेतल्याचें पेशर्जी लिहिलेंच होतें. हल्लीं लाट नऊ पलटणें घेऊन ग्वालेरी व गोहाद, दोन किल्ले त्यांचा अंमल आहे तेथें आले. दिल्लीहून चाळीस हजार जमाव इंगळे यांणीं ग्वाल्हेरीस रवाना केला बोलतात. मुंबईमध्यें सातशें घरें आणखी इंग्रज पाडणार बोलवा आहे. दोन जहाजें इंग्रजांचीं [1]फरासिस याणें नेलीं. माल होता अथवा गोरे येत होते अशी बोलवा बोलतात. कळावें हे विज्ञापना.

---

नं. ६९६० श्री. (कार्तिक व. ९–२५ नोव्हें.)

पै. छ. २५ साबान सन खमस मयातैन. कार्तिक मास.

राजश्रिया विराजित राजमान्य राजेश्री गंगाधर रावजी स्वामीचे सेवेसीं. पोष्य सिद्धेश्वर[2] महिपतराव साष्टांग नमस्कार. विनंती. एथील कुशल तागायत छ. २१ साबानपर्यंत यथास्थित जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असलें पाहिजे. विशेष. राजेश्री नारोपंत यांचा मोड जाला व शाहापुरास ठाणें घातलें. त्याचा मजकूर इथ्यंभूत समजला नाहीं व राजश्री दाजीबा लिमये शाहापुरास गेल्यावर आपलें त्यांचें बोलणें होऊन कोणतीही गोष्ट उरकण्यांत यावयाची असें असतां पुन्हा खटला होऊन ठाणें घालावयाचें कारण काय जालें? घरोब्याचे जागां असें होऊं नये. चिरंजीव राजश्री चिंतामणराव अप्पा यांणीं आपणांकडे कारकून रवाना केले आहेत. सविस्तर मजकूर आपणाशीं बोलतील. तो अन्वयेंस समजून घेऊन पुढें त्यांचें ठाणें त्यांचे स्वाधीन होऊन समजुतींत गोष्ट आणावी. उभयपक्षीं कलह वाढवूं नये. चिरंजीवांनीं फौज तोफा वगैरे सरंजाम तिकडे रवाना करण्याची तरतूद केली आहे. त्यांस तूर्त कारकून तुमचा जाऊन येईतोंपर्यंत जलदी करूं नये असें चिरंजीवास सांगितलें आहे. आपणासही लिहिलेलें आहे. तरी खटला न घडे असें करावें. म्हणून लिहिलें तें कळलें. त्यास नारोपंत यांणीं येऊन पेशर्जी किल्ल्यांत दगाबाजी केली, त्याचा तपशील पेशर्जी आपणास व राजश्री चिंतामणराव अप्पा यांस एकदोन वेळां लिहिलाच होता. त्यावर नारोपंत शहापुरास राहून पुन्हा दगा करावा.

---

१ फ्रेंच. २ बिनीवाले. पत्र बेळगांवाहून मिरेजस.

फितुराचें साधन व गांवांत शिरण्याचें प्रसिद्धपणीं झालें तरी करावें, म्हणून त्यांणीं जे यत्न केले ते आपास लिहिले त्याच काळीं शहापुरास ठाणें घालावें अगर नारोपंत याचें पारिपत्य करावें. परंतु सर्वांचें सांगणें कीं आपा नारोपंतास नेऊन पारिपत्य करितील. यांत आनमान होणार नाहीं व श्री. दीक्षित स्वामींची आज्ञा कीं, आपास मी लिहितों व राजश्री आनंदराव लागू यांस पाठविलें आहेत. तिकडून वर्तमान समजल्याखेरीज कांहींएक उतावळी तुम्हीं न करणें. शिबंदीचा पेंच व त्याची आगळीक तुम्हीं सोसावी. त्याजवरून खर्चाचे पेचांत येऊन वाट पाहिली. नंतर आपणाकडून बंदोबस्तास राजेश्री दाजीबा लिमये आले ते आगोदर आम्हाकडे आले. त्यांणीं एथील सर्व समजोन घेतलें व नारोपंताकडून लबाडी जाली ती आम्हीं पदरांत घातली. त्यास पुढें विरुद्ध नसावें म्हणोन बोलले. त्यास सांगितलें कीं इकडून वांकडें नाहीं. जें असेल तें तुम्हास माहीत असेल. वडिलोपार्जित ऋणानुबंध याजमुळें आजपर्यंत स्वस्थ राहिलों. पुढें तुम्ही निभावणीजोगा बंदोबस्त करावा. ठाण्याविसीं तुमचे घरचा कारभार पाहिजे तसा तुम्हीं करावा आणि नारोपंत यास लाऊन द्यावें अगर पारिपत्य करावें. त्याजवरून उत्तम असें बोलून दाजीबा शहापुरास गेले आणि नारोपंतास तुरुकवाडीस पाठविलें. नारोपंत जमावासुद्धां तेथें राहिले आणि इकडे उपद्रव करावा असें दिसण्यांत आलें. त्याजवर फिरोन दाजीबा आम्हाकडे आले. त्यास सांगितलें कीं हीं करणीं ठीक नाहींत. मनापासून स्नेह करावा असें असल्यास त्याजला एथून लावून द्यावा. आणि त्याच्या खेळांत जे आहेत त्यास आम्हाकडे पाठवून द्यावें अगर तुम्हीं बंदोबस्त करावा. शहापुराहून सरंजाम त्यास पोहोचतो हा पोहोचूं नये. त्यास दाजीबांनीं सांगितलें कीं तो आमचे स्वाधीन नाहीं. त्याचे निसबतीचे आहेत. त्यास धरून देणें कसें घडतें ? गांवांत राहाणारास धरून द्यावें अशी चाल आहे कीं काय ? आम्हीं त्याचें पारिपत्य करावें तर त्याचे आंगीं मुद्दा लावून द्यावा. मग करावयास येईल. अशीं भाषणें पडूं लागलीं. तथापि सांगितलें. तुमचे मर्जीस येईल तें करावें. परंतु नारोपंतास लावून द्यावें. त्याशिवाय निखालसता होत नाहीं. हें त्यांचे मर्जीस न आलें. आम्हासच उपदेश करूं लागले कीं नारोपंतास समजुतीबद्दल चार

रुपये पडले तरी द्यावे. तेव्हां बोलण्याची पराकाष्ठा जाली आणि दाजीबा शाहपुरांत असतां नारोपंतांनीं बेळगांवचीं गुरें नेलीं व एक गांव मारिले. उचगांव आंबेवाडीस राहून याप्रमाणें चाललें. पुन्हा बेळगांवचे गुरांवर चालोन आले. तेव्हां गांवांतील जमाव जाऊन गोळागोळी होऊन नारोपंत पुन्हा आंबेवाडीस राहिले. तेथून भरमापाचे चिरंजीव शहापुरास येऊन ऐवज व दारूगोळी घेऊन गेले. सरंजाम शहापुराचा पाहिजे तो पोहोचवूं लागला व त्याजकडील लोक श्री पंत शंकर वगैरे येऊन शहापुरास राहिले. त्याचे मनसबे ते जाणत. दुसरे दिवशीं जुनें बेळगांव शहापुरास लगत आहे तेथें नारोपंत राहून आमचा गांव हसूर एथील खराबी करून रयत वगैरे धरून नेले. त्यापासून तसदी करून रुपये घेतले. तेव्हां येथील जमाव जाऊन नारोपंताचा मोड होऊन पळून गेले. दुसरे दिवशीं शहापूरचें ठाणें घेतलें. दाजीबास सांगितलें कीं तुम्ही राहावें. तेथेंच बोलोन तोड पडत असल्यास करावें. तें त्याचे मनास न येतां नारोपंताचे मलईतील मंडळी समागमें घेऊन गेले. प्रस्तुत नारोपंत व दाजीबा सरसुभेदाराचे लष्करांत आहेत. इकडील उद्योग करितात म्हणून ऐकतों. असो. आपण लिहिलें कीं घरोब्यांत असें नसावें. त्यांत मजकडून वांकडेपणा तिळभर झाला नाहीं. या खटल्यामुळें शिबंदीच्या पेचीं आलों. बेळगांवची नासाडी झाली व पाच्छापूरचीही तशीच होऊन लाख सव्वा लाखाचे पेचांत येऊन लटका लौकिक जाहाला आहे. शाहापुरास ठाणें परक्याचें नाहीं. आपलें म्हणूनच आहे. आपण उभयतांसही वडील आपले विचाराशिवाय आम्ही नाहीं. फौज रवाना करणार म्हणून लिहिलें. त्यास फौजेचें कारण काय व कोणावर रवाना करितात? किल्ला सरकारचा. एथें अपाय होऊं लागला तेव्हां बंदोबस्त करणें प्राप्त झालें. गैर समजून आम्ही होऊन कांहीं उद्योग केला नाहीं. पुढें विरुद्ध वाढावें अशी माझी इच्छा नाहीं. सविस्तर मजकूर आपणास समजण्यांत यावा म्हणून लिहिलें आहे. मागाहून खटला तुटावा. न घडल्यास प्रसंगानुरूप वर्तणें प्राप्तच आहे. बहुत काय लिहिणें. लोभ असों दिला पाहिजे हे विनंती.

नं. ६९६१ श्री. (२८ नोव्हें.)

पै. छ. २८ साबान. कार्तिक. खमस मय्यातैन.

विज्ञापना. कार्तिक व. १२ दुर्गाविशीं चे प्रयत्न चालले आहेत. हें पेशजीं कळलें असेल. हल्लीं बोलण्यांत भाव कीं, महिनापंधरा दिवसांत काम होऊन येईल असें आहे. त्यास तिकडून कोणी मंत्री पुरोहित यांचे संधान लिहिलेलें आलेविना हे आवाज निघावयाचे नाहींत असें वाटतें. त्यास लेकाचा देखील विश्वास नसावा. बंदोबस्त पक्केपणें राखावा. दिवसाचे दिवसास बातमी असावी. गलबलीच्या वेळां ध्यानांत असाव्या. मजकूर पक्केपणें आइकण्यांत आला. सुस्ती असों नये. सुचला मजकूर लिहिला आहे. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

---

नं. ६९६२ श्री. (कार्तिक व. १३–२९ नोव्हें.)

पौ छा २७ साबान. सन खमस.

[1]श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेसीं. विनंती. सेवक बाळाजी महादेव दामले चरणांवर मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा २५ साबान वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं आज्ञापत्र पाठविलें. तेथें आज्ञा कीं, शिलाजित तोळेवार पुरवत नाहीं. याजकरितां ज्या स्थळास निघतो तेथें आपलीं माणसें पाठऊन काढून आणून पाठविणें. माणसें जातील त्यांस इनाम देऊं करून पाठवावीं म्हणजे काढून आणतील, म्हणून आज्ञा. त्यांस शिलाजित एकाच पर्वतांत निघत आहे. आणखीही पर्वत आहेत परंतु तेथें निघत नाहीं. मातब्बर कडा तुटला आहे तेथें एकसारखा पाषाण आहे. तेथें निघतो. स्वामींचें आज्ञापत्र आलें त्याजवरून चार असामी माणसें शहाणीं इनाम देऊं करून पाठविलीं होतीं. त्यांस शिलाजित निघतो तो खडक वरच्यावर वानर चाटीत असतात. ज्या स्थळीं वानर पोहचत नाहींत तेवढा मात्र ठिकाणीं राहतो. त्यास रखवाली करावी लागते. तेथें सरकारचा हशील आहे. उगाच कोणी काढून नेईन म्हटल्यास प्राप्त होत नाहीं. किराणा

---

१ पत्र रहिमतपुराहून मिरजेस.

जिन्नस मालबंदी. याजमुळें सरकार हाशील बसला आहे. यास्तव गांवकरी यांचे माथां हशील बसऊन ठेवलेला आहे. उत्पन्न फार. शिलाजित होतो असा अर्थ नाहीं. मार्गशीर्ष व माघ या महिन्यांपासून ऊन फार पडतें. त्यांत पाषाण तापोन त्यांतून द्रव निघतो. तो वरच्यावर खरडून काढून जमा करीत असतात. याप्रमाणें तेथील मजकूर आहे. उगाच जाऊन आणीन म्हटल्यास मिळत नाहीं. याजकरितां विनंती लिहिली आहे. पेशजीं चार तोळे पाठविला तो वाण्याच्या दुकानचा नव्हे. कुलवाडी काढून आणीत असतात. त्यांजकडे माणूस पाठऊन तो कुलवाडी व आमचा गडी कड्यास जाऊन वरच्यावर शिंपीनें खरडून काढून आणोन जमा करोन आणिला तो पाठविला. त्यांत दुसरे प्रकारची भेळ नाहीं. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६९६३ श्रीगणपतिर्जयति. (कार्तिक व. १४–३० नोव्हें.)

पै. छ. २७ साबान. खमस मयातैन.

अपत्यें[1] चिंतामणीनें विज्ञापना ताा छ. २६ शाबान वर्तमान यथास्थित असे. विशेष. पलीकडे माणसें पाठविलीं होतीं तीं आस्तमानीं आलीं. त्यांचे सांगणेंत चव्हाण वगैरे च्यार पांचशें स्वार व दोन तीनशें पायदळ इतक्यांनीसीं ऐतवड्यास आहेत. सीरोळचें ठाणें परवां घालून माघारे आले. पंताकडील बोडके वगैरे बोरगांवाजवळ आहेत. त्याच्या व चव्हाणाच्या भेटी जाहल्या. माहाराज संभापुराहून निघोन काल ऐतवड्यास गेले. याप्रमाणें सांगीतलें तें शेवेसीं लिहिलें आहे. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६९६४ श्री. (नक्कल.) (कार्तिक–नोव्हें.)

राजश्री रामाजी मल्हार यांस पत्र—

विशेष. रा. बाबूराव शिवाजी म्हैसकर हे आमचे पदरचे बहुत दिवसांचे तुम्हास माहीतच आहे. त्यास मशारनिल्हे व त्यांचे धाकटे बंधु याप्रमाणें चि. राजश्री चिंतामणराव आपा यांनीं नेऊन कैद केले होते. त्या संधींत रा.

---

[1] पत्र सांगलीहून मिरजेस.

जनार्दन शिवाजी पुण्याहून सोलापुरास जावयाकरितां श्रीक्षेत्र पंढरपूर येथें आले. तेथें या उभयतांची बायकामुलें होतीं त्यांस कांहीं भय समजावून त्यांजपाशील कांहीं कापड व वस्तवानी येणेंप्रमाणें घेऊन सोलापुरास गेले आणि किल्ल्यांत नेलेला पदार्थ ठेवून आपण पुढें पोटधंद्यास गेले. त्यास अलीकडे सरकारांतून सोलापूरची घालमेल होऊन रा. सदाशिव माणकेश्वर यांचे बंधु रा. नानाजी माणकेश्वर यांजकडे सरकारांतून किल्ला दिल्हा. त्यास किल्ल्यांतील चीजवस्त मागील किल्लेदाराची जप्त जाली त्याजबरोबर आणखी लोकांच्या चीजवस्तीची जप्ती जाली. जनार्दन शिवाजीची चीजवस्त म्हणोन जप्त केली आहे. याकरितां हें पत्र तुम्हांस लिहिलें आहे. तुमचा व नानाजी माणकेश्वर यांचा परिचय चांगला आहे. त्यांस वस्तवानी जनार्दन शिवाजी याची नव्हे. बायकांस दबावून घेऊन गेले असा प्रकार आहे. त्यास येविशीं तुम्ही खटपट करून चीजवस्त सुटून बाबूराव शिवाजी यांचे हस्तगत होय असें करणें. म्हसकर याचें अगत्य जाणून लिहिलें आहे.

---

नं. ६९६५ श्री. (कार्तिक व. ३०–२ दिसें.)

पै. छ. ४ रमजान. सन खमस मय्यातैन. मार्गशीर्ष.

सेवेसीं सा। नमस्कार विज्ञापना. तागायत छ. २८ साबान पावेतों स्वामीचे कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान तरी प्रतिनिधींनीं प्रांतांत बहुत उपद्रव करून दंगा मांडला आहे. वैजनाथभट सातारियाहून पन्नास साठ पायाचे लोक व दहा पाच स्वार व दोन तीन कारकून याप्रमाणें परळीच्या किल्ल्यास जात होते. त्यास प्रतिनिधीकडील स्वार निजामपाडळींत होते त्यांणीं दौड करून वैजनाथभटावर येऊन पंधरा वीस मनुष्यें ठार व तीस चाळीस जखमी करून एक कारकून ठार करून दोन कारकून धरून नेले. वैजनाथभट पोशाख टाकून सडे एकटे घोड्यावरून पळोन सातारियास आले. याप्रों साताऱ्याहून हुजूर वर्तमान लिहिलें आलें. त्यावरोन गोखले व निपाणीकर यांची रवानगी प्रतिनिधींच्या पारिपत्यास करणार होते. त्यास बापू गोखले आपलें लग्न मार्गशीर्ष शुद्ध पक्षीं करणार व इंग्रजांचा आग्रह

पडला जे गोखले यांस आठ लक्षांचा सरंजाम लावून देऊन दोन्ही सरदारांची रवानगी विंचूरकरांकडे करावी. म्हणोन बोलणें पडीन करनलानें सरकारांत बोलणें लाविलें जे आजपर्यंत मसलतसंबंधें आम्हास खर्च जाला आहे त्याचा आकार करोन सरकारांतून वसूल करून द्यावा आणि होळकराशीं तह करोन आम्हांस निरोप द्यावा. त्यावरोन श्रीमंतांचें बोलणें पडलें जे तुमची भाईदारी आम्हीं केली जे तुम्ही बंडाचें[1] पारिपत्य करून राज्याचा बंदोबस्त करावा हा करार तुमचा असतां तुम्ही मुलूख लिहोन मागतां आणि तह करून जावें म्हणतां हें बोलणें परिछिन्न ठीक नाहीं. होळकराशीं तह करावयाचा नाहीं. त्याचें तुम्हीं पारिपत्यच करावें. यांत पुढें काय घाट ठरेल तो पहावा. इंग्रजांचें म्हणणें जे पन्नास हजार फौज तुम्ही आम्हाबरोबर द्यावी हा करार असतां ती कोठें आहे? हुजूरचें म्हणणें जे, जीं पथकें आहेत तीं तुमच्या स्वाधीन केलीं आहेत. आम्हापाशीं फौज असती तर आम्हींच बंडाचें पारिपत्य केलें असतें. याप्रों खलबतें नित्य चाललीं आहेत. विंचूरकर व राजे रामराव नबाबाकडील पलटण व फौजसुद्धां व इंग्रजांचीं पलटणें गाळण्याचें ठाणें घेऊन थालनेरास गेले. पुढें बऱ्हाणपुरानजीक जाणार. होळकराकडील मीरखान पठाण काल्पी प्रांतीं होते ते फौजसुद्धां इंदुरास महेश्वरास आल्याचें वर्तमान सरकारांत आलें. तेथून भारामल व मीरखान पन्नास हजार फौजेनिशीं नर्मदाकांठीं आले म्हणोन वर्तमान आहे. शिंदे फौजसुद्धां मीरखानास सामील होणार व नर्मदा दक्षिणतीरीं येणार असें वर्तमान [2]शहरांत बहुत आहे. काशी प्रयाग वगैरे इंग्रजांपासोन घेऊन काशीचें संस्थान ठेविलें. याप्रमाणें होळकरांनीं केलें म्हणोन वर्तमान आहे. दिल्लीकडील पत्रें आठ चौ दिवसांनीं आल्यानंतर होळकर प्रकरणीं कुल नक्षा निवडक लिहिला येईल तो सेवेशीं लिहूं. श्रीमंत राजश्री रावसाहेब महायात्रेचे उद्देशें नगराहून निघोन राक्षसभुवनास गेले होते. तेथून पुढें जालनापुरास गेले. पुढें नागपुरास जाणार असा बेत आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ स्वराज्यरक्षणार्थ होळकरानें चालविलेल्या युद्धाला पेशवे बंड म्हणत असत. २ शहर = औरंगाबाद किंवा बऱ्हाणपूर.

नं. ६९६६ श्रीगणपतिर्जयति. (कार्तिक व. ३०–२ दिसें.)

छ. २८ साबान. सन खमास मयातैन. कार्तिक.

विज्ञापना. इंग्रजांनीं आली आकबर पातशहा यास घेऊन भरतपुरास गेले. दिल्लीस ठाणें होळकरांनीं बसवून इंगले नि॥ शिंदे यांचे स्वाधीन केलें. पठाण वगैरे फौजा भागीरथीपार जाहल्या. लिखासाहेब ठार पडला. लढाई मातबर जाहली. नावांचा पूल इंग्रजांनीं बांधिला होता तो फौज जाऊन मोडला. पलटणें गारद जालीं. शिंदे यांनीं हुसंगाबादेस ठाणें बसविलें. स्वल्प दिवसांतच उभयतांच्या भेटी होतील. वईफसाहेब म्हणोन शिंदे याजवळ होता. त्यास त्यांनीं निरोप देऊन लाऊन दिल्हें. दरमजल निघोन गेल्यामुळें ते राहिले. हें वर्तमान मुख्यास समजल्यापासून मर्जी बहुत दिक्क आहे. विंचूरकर भांबोरावर आहेत. जिवलालसिंग होळकराकडील याजकडून छापा येऊन दोनशें घोडीं गेलीं. मनोहरगीर माघारे फिरले. कान्होजी गाईकवाड व जोतपूरवाले व उदेपूरकर व भावे अमदाबाद प्रांतीं येऊन दोन तीन गांव लुटले. याप्रमाणें अन्याबाचें पत्र आलें. त्यांत लिहिलें आहे. वडिलांस कळावें. किरीटी रामराजा[1] याची व इंग्रजांची लढाई होऊन वसलीस गोळा लागून ठार झाले असेंही वर्तमान आहे. इंग्रजांचीं तरांडीं दोन मुंबईस येत होतीं तीं फराशिसांनीं नेलीं. चाळीस पन्नास लक्षांचा विषय गेला. किल्ल्यानजीक घरें होतीं तीं मोडून लढाऊ सामानाची तरतूद होत आहे. याजप्रमाणें वर्तमान आहे. सत्य मिथ्या न कळे. पुण्याच्या चिठ्ठया निकडीनें आल्या. येतांच शेवेसीं कर्वे याजबरोबर शेवेसीं पाठविल्या आहेत. येविसीची विनंतीही करतील. समर्पक आज्ञा व्हावी. शेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६९६७ श्री. (नक्कल.) (मार्ग. शु. ४–६ दिसें.)

यादी. जखमी छ. २ रमजानीं मल्हारजी बोडक्या याची लढाई मौजे रेटरें येथें जाली ते समयीं. सुा खमस मय्यातैन. पाहणी ३ रमजान.

१ राजबा पवार गु. निंबाजी भोसले यास डावे हातावर तरवारेची जखम. तरवारेची हलकी मनगटावर.

---

१ हा गावणकोरचा राजा.

१ मल्हारजी शिंदे गु. नरसापा खंजिरे यास मानेस उजवे बाजूस भाल्याची जखम मध्यम.

२ गु. बिरोजी पवार.

१ गिरजोजी पवार यास जखमा.

१ डावे बाजूस कपाळीं तरवारेची जखम चार बोटें. जखम भारी. पागोटें धोतर रुमाल तुटला.

१ डावे बाजूस पायास पोटरीस गोळी पार. जखम भारी.

१ पाठीस भाल्याची थोप. फुगडी म्हणतात.

३

१ मुकुंदराव साळोंखे यांचे बंदुखेस गोळी. दस्ता मोडून गेला. कपाळीं उजवे बाजूस डोळयाजवळ धक्का. जखम हलकी.

२

१ लक्ष्मणराव वागमोडे यांस बेंबीचे वर गोळी लागोन धक्का लागला. जखम मध्यम.

१ राणोजी जगथाप यांस डावे हाताचे मधले बोटास बंदुकेची गोळी लागोन बोट फुटून पार जाली. जखम भारी.

१ चेनापा सावंत गु. आजूरकर मंडळी यास डावे बाजूस घोटीस गोळी लागोन आंत राहिली. जखम भारी.

१ सुभानराव भगत यास उजवे पायास घोड्यास गोळी लागोन पार जाली. त्याच गोळीनें घोडा कुमेत टार जाला. जखम भारी.

१ लाड महंमद मनोळकर नि. गोविंद आपाजी यास उजवे पायास गोळी लागोन खरचटोन गेली. जखम मध्यम.

१ व्यंकटराव गायकवाड गु. रत्नापा केदार यास डावे कुशीस गोळी लागोन पोटांत उतरली. जखम भारी.

१ नाथाजी बाबर गु. रत्नापा केदार याचे उजवे पायास बोटास तरवारेची पुतळी लागोन तुटलें. जखम हलकी.

१ बंडुखान गु. लाड महंमद यास जखम उजवे बाहुट्यावर तरवारेची जखम भारी. पांच बोटें तुटलें.

१ येलोजी पवार कवठेकर यांस जखमा.
  १ उजवे बाजूस मांडीस जखम भारी.
  १ उजवे हातास कोपराजवळ भाला. जखम हलकी.
  १ बावळ्यावर तरवारेचा धबका.
  ३
१ गोपाळसिंग नि. सर्जेराव घाटगे यास डावे कुशीस गोळी लागोन चाटून गेली. जखम मध्यम.
१ संताजी कोळेकर यांस उजवे हातास मणगटावर जखम मध्यम.
१ नारो गोविंद नागर सोंदेकर शिलेदार यास जखमा तरवारेच्या.
  १ उजवे दंडास मध्यम.
  १ डावे दंडास भारी.
  २
१ बुधाजी जमदाडे गु. बुधाजी कदम यास मानेस गोळी लागोन पार जाली. जखम भारी.
१ बाजीराव काटकर गु. झांबरे यास डावे पायास पायाचे मणगटावर तरवारेची पुतळी. जखम हलकी.
१८
१ नाथाजी लोणारी गु. हरि रघुनाथ यास उजवे दंडावर तरवारेची जखम व डावे खवट्यावर जखम तरवारेची भारी.
१९

---

नं. ६९६८ श्री. (नकल.) (मार्ग. शु. ४–६ डिसें.)

यादी. छ. २ रमजानीं बोडक्याच्या लढाईत घोडीं जखमी मु. खमस मय्यातैन. पह्याणी छ. ३ रमजान.

१ गुंडापा लवटे याची घोडी करडी चितोडी पंचकल्याण इच्या मानेस पट्याची जखम भारी.
१ गिरजोजी पवार यांचे घोडीस गोळीच्या जखमा भारी. घोडी मरेल.

१ मानेस तरवारेची जखम.
१ बरगड्यावर गोळी लागून उजवे बाजूस पार.
१ डावे कुशीस गोळी आंत राहिली.
―――
३

१ राणोजी जगताप याची घोडी सारंगी इला मानेस गोळी लागोन पार जाली. जखम भारी.

१ जानराव मान्ये यांची घोडी बोर इचे छातीस गोळी लागोन आंत राहिली. जखम भारी. घोडी मरेल.

१ बळवंतराव झांबरे खाशाची घोडी निळी पातळ गोमाई इचे उजवे मागील फऱ्यावर तरवारेची जखम भारी.

१ भीमराव जाधव गु. तात्या जाधव याचा घोडा निळा नाकावर सफेत यास डावे मांडीस गोळी लागोन आंतील बाजू पार जाली. जखम भारी. घोडा जेर.

१ यमाजी झांबरे गु. झांबरे मंडळी याची घोडी बोर उजवे डोळयास पापणीजवळ तरवारेची पुतळी. जखम हलकी.

१ शिदोजी शिंदे जदीद[1]. याची घोडी कुमेत इचे कपाळावर तरवारेची जखम डावे बाजूस भारी.

१ राणोजी जाधव कुंभारकर नि. गोविंद आपाजी याचा घोडा बोर पंचकल्याण यास डावे बाजूस गोळी लागून पार जाली. जखम भारी.

१ राजबा कदम गु. बुधाजी कदम याची घोडी कर्डी इचे नाकपुडीवर तरवारेची जखम भारी. चार बोटें तुटलें.

१ सावजी कदम गु. सुभानराव कदम याची घोडी निळी इचे मानेस उजवेकडे गोळी लागून आंत राहिली. जखम भारी.

१ जयराम जाधव नि. अंताजी हरि कानिटकर याची घोडी निळी हिला मानेस गोळी लागून आंत राहिली. जखम भारी. घोडी मातबर जेर.

१ सखोजी भोसले नि. सर्जेराव घाटगे याचा घोडा कर्डा यासी डावे पुढील फऱ्यावर तरवारेची जखम भारी.

---

१ जदीद = हंगामी नेमणुकीचा.

१ जमालभाई नि. सर्जेराव घाटगे याचा घोडा बोर यास डावे मागील फऱ्यावर गोळी लागोन आंत राहिली. जखम भारी.

१ कृष्णराव डुब्बळ सरंजामी यांची खाशी घोडी निळी कर्डी ईस डोळयामध्यें कपाळीं तरवारेची जखम भारी.

१ कुसाजी पवार रेटरेकर यांचा घोडा कुमेत कपाळीं चांदणी-मागील डावा पाय ख्यालदार यास छातीस गोळी लागून आंत राहिली. घोडा जेर.

१ महिपतराव मगर याची घोडी कुमेत. इचे उजवे पायास गुडघ्या-वर बंदुखेची गोळी लागोन चाटोन गेली. जखम भारी. पाय लंगडतो.

१ नाथाजी माळोंखे यांजकडील स्वाराचे घोडीस गोळीची जखम पायास.

१८

---

नं. ६९६९ श्री. (नक्कल.) (मार्ग. शु. ४—६ दिसें )

यादी मल्हारजी बोडके याशी लढाई छ. २ रमजान रेटरें येथें जाली तेथें भले[1] लोक ठार जाले सु॥ खमस मय्यातैन.

१ विठ्ठलराव भगत छातींत गोळी लागून ठार.

१ सर्जेराव घाटगे यांचे पागेचा बारगीर ठार.

१ मल्हारजी कर्डे दिमत पागा बारगीर तरवारेची जखम व गोळी लागून ठार.

२ गु. निंबाजी भोसले यांजकडील भले लोक घोडे खासा ठिकाण नाहीं.

१ नबीभाई कडलासकर यास कपाळीं गोळी लागून ठार.

१ केदारजी दाइंगडे गु. मकाजी दाइंगडे ठार.

१ नामाजी म्हारणकर गु. यशवंतराव चोपडे. गोळी लागून ठार.

६ राघोजी कदम गु. जयराम जाधव यास गोळी लागून ठार.

९

---

१ भले लोक = शिलेदार.

नं. ६९७०         श्री. (नक्कल.) (मार्ग. शु. ४–६ दिसें.)

यादी मल्हारजी बोडके याचे लढाईत घोडीं ठार पडलीं व भले लोक जखमी जाले त्यांचीं घोडीं गेलीं. सु. खमस मय्यातैन छ. २ रमजान.

१ सुभानराव भगत यांचा घोडा कुमेत गोळी लागोन ठार.

२ गु. नाथाजी साळोंखे.

१ बाळोजी साळोंखे यांचा घोडा बोर चितोडा याचे मागील डावे पायास गोळी लागोन पडला. घोडा तळावर राहिला.

१ नारायण साळोंखे घोडी कुमेत गोळी लागून ठार.

२

१ महिपतराव निंबाळकर यांचा घोडा कर्डा यासी गोळी व तरवारेची जखम लागोन ठार.

१ विठ्ठलराव मोरे रेटरेकर जदीद यांचा घोडा कर्डा गोळी लागोन ठार.

१ सर्जेराव घाटगे यांचे पागेचा बारगीर ठार. घोडें गेलें.

१ नबीभाई गु. वलीमहंमद कडलासकर ठार पडले. घोडें गेलें.

१ सुलतानभाई गु. आनंदराव चव्हाण याचे घोड्यास गोळी लागून ठार.

२ नामाजी म्हारणवर गु. यशवंतराव चोपडे यासी गोळी लागून ठार. घोडें गेलें.

१ बंडुभाई नि. कडलासकर यासी जखम लागोन घोड्याखालीं आला. घोडें गेलें.

२ गु. निंबाजी भोसले.

१ राजबा पवार याची घोडी गोळी लागून ठार.

१ माधवराव पाटणकर घोडें व खाशाचा ठिकाण नाहीं.

२

१ बाबूराव जाधव गु. मन्याजी भोसले खाशासुद्धां घोडीचें ठिकाण नाहीं.

१ राघोजी कदम गु. जयराम जाधव यासी गोळी लागून ठार जाले. घोडी गेली.

ऐ. ले. १५–२८

१ नाथाजी लोणार गु. हरि रघुनाथ यासी जखमा लागून घोडी बोर उपाव गेली.

१ धोंडजी कदम स्वार गु. नाईकजी झांबरे बोर घोडें माणूससुद्धां गेलें. ठिकाण नाहीं.

१६

---

नं. ६९७१ (मार्ग. शु. ४–६ दिसें.)

उतारा—रामचंद्रपंत आपांचें पत्र मिरजेस छ. ३ रमजान सन खमसेचें.

"व्यंकटराव बर्ग्याचा मजकूर लिहिला तो कळला. शिपाई आहेत. तुटू फाटून आपले जागां म्हणोन असले आहेत. ठेवून घ्यावे. पुढें जशी चाल दृष्टीस पडेल तसें सांगावयास अगाध नाहीं. मातबर वाड्यावर दरवडा पडल्याचें लिहिलें तें कळलें."

---

नं. ६९७२ श्री. (नकल.) (मार्ग. शु. ४–६ दिसें.)

सेवेशीं अंताजी हरि कानिटकर कृतानेक साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा ३ रमजान सायंकालपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. मसुरेहून बातमीचा गडी आज दोन प्रहरां आला. बोडक्याचे मोडांतील स्वार सायंकालीं मसुरेस गेले. त्यानीं पंतांस वर्तमान सांगितलें. चिंतामणराव आप्पा यांजकडील फौज येऊन बोडक्यास लुटलें. खुद्द टार पडला. याप्रमाणें सांगितल्यावरून पंतानीं बालेखान मालेखान यांस बोलाऊन आणून आज तयारी करून चिंतामणराव आप्पा यांजकडील फौज दुधोंडीवर आहे तेथें छापा घालावा अशी ताकीद करून तयारी करविली. इतकें पाहून गडी आला. आणखी येईल वर्तमान तें सेवेशीं लिहून पाठवितों. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६९७३ श्रीगणपति. (मार्ग. शु. ४–६ दिसें.)

पै. छ. ३ रमजान. खमस मयातैन. मार्गसीर्ष.

[1]अपत्यें रामचंद्रानें सीरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. ता. छ. ३

---

१ पत्र जमखिंडीहून मिरजेस.

रमजानपावेतों यथास्थित असे. विशेष. आज कुंडलेहून पत्र आलें त्यांतील वर्तमान चिरंजीव राजेश्री चिंतामणराव अप्पा यांजकडील फौजेचा मुक्काम वाझर येथें होता. तेथून सडे होऊन प्रतिनिधीकडील फौज रेठरें येथें होती. त्याजवर चालोन गेले. कांहींसी त्यांची यांची गोळागोळी होऊन प्रतिनिधीकडील सरदार फौजेंत होता. तो फौज व तोफासुद्धां सांभाळून गेला. बुणगे यांनीं लुटलें. काल बुधवारीं अस्तमानपर्यंत हें कृत्य करोन फिरोन रा। अंताजी हरि कानिटकर आपले सरंजामसुद्धां घोंगांवचे रानांत येऊन उतरले आहेत. याप्रमाणें राजाराम जमातदार कुंडलेस असतो. त्यांणीं लिहिलें आहे. करवीरकर खुद्द इसलामपुरास स्वारीस जाऊन तेथून बोली एक दोन घेऊन मागती पारगांवचे मुकामास आले. तेथून एक दोन रोजीं माघारी जाणार असी बातमी लिहिली आहे. बहुत काय लिहिणें. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६९७४ श्रीगणपतिर्जयति. (मार्ग. शु. ४–६ दिसें.)

पै. छ. ३ रमजान. खमस मयातैन.

[1]अपत्यें चिंतामणीनें साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ. ३ रमजानपर्यंत यथास्थित असे. विशेष. राजेश्री बाळोजी बोडके यास मौजे रेठरें येथें राजश्री अंताजी हरि कानिटकर यांनीं लुटलें. बोडके पायदळांत शिरोन तोफा सुद्धां बचाऊस गेले. इकडील चार पांच असामी ठार व जखमी चाळीस पन्नास जालीं. जरीलगी त्याकडील व घोडीं शंभरपर्यंत व उंट दोन तीन येणेंप्रमाणें गोटांत आलें. वडिलांस कळावयाकरितां विनंती लिहिली आहे. त्याचा व करवीरवासी पन्हाळेकर यांचा विचार एक होऊन इकडे उपद्रव करावा असें ठरल्याची बातमी आली. याजकरतां अंताजीपंत चालोन गेले. वडिलांचे आशीर्वादेंकरून सदरहूअन्वयें जालें. वडिलांस कळावें. शेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६९७५ श्री. ( मार्ग. शु. ५–७ दिसेंबर. )

छ. ४ रमजानचीं पत्रें.

१ श्री. सौ. ताईसाहेब[2] रा. खंडेराव यांजकडे छ. २ रोजीं मेजवानीस

---

१ पत्र सांगलीहून मिरजेस. २ बाजीराव पेशव्यांची थोरली स्त्री.

येऊन छ. ३ रोजीं जेजुरीस गेली.

१ गोखले यांस प्रतिनिधींवर जाणेची आज्ञा हुजूरची. कलुष याचें बोलणें आणखी आठ लक्षांचा सरंजाम उत्तरेस रवाना करावें. काय ठरतें पहावें.

१ श्रीमंत खंडेराव रास्ते यांचे घरीं मेजवानीस छ. १ रमजानीं रात्रौ गेले. आतषबाजी केली होती. रात्रौ स्वारी गेली. आपले घरीं चिराखदान केलें होतें. रागरंग नाच जाला. वस्त्रें जवाहीर दिल्हें. कलम.

१ कर्णेल छ. २ रोजीं सरकारवाड्यांत येऊन दीड प्रहर खलबत चार घटका रात्रपावेतों जालें. कर्णेल एकटेच होते व खासा श्रीमंत व दिवाण व कृष्णाजी भवानी होते. अस्तमानीं मोदी आले. छ. ३ रोजीं कर्णेल दिवाणांचे घरीं येऊन चार घटका खलबत जालें. कलम.

१ सुवर्णदुर्ग बदलून होता. प्रस्तुत संधान आलें. त्यावरून किल्लेदाराचा बचाव करावा असें गणपतराव करमरकर यांचे विद्यमानें ठरोन विठोजी नाईक, हरजी शिंदे गेले आहेत. छ. २९ साबानीं. कलम.

१ निपाणकर यांस [1]बंडवालेवर जाणेची आज्ञा जाली. त्यांणीं विनंती केली बंदोबस्त करून द्यावा. जातों. नाहीं तर कांहीं दिवस वाट पाहून उठून जातों. कलम.

१ श्रीमंतांची स्वारी तळेगांवास दाभाडेकडे मेजवानीस जाणेची बोलवा आहे. कलम.

१ नरसिंगराव विंचूरकर व पलटणें खानदेश प्रांतीं आहेत. होळकर यांजकडील मीरखान पठाण चाळीस हजार फौजेनिशीं महेश्वरास आले. शिंदे, भोसले हे खान यास येऊन मिळणार. त्रिवर्गांनीं एक मनसब्यानें असावें. विंचूरकरावर येऊन हैदराबादकडे जाणार. कलम.

१ नगरचा किल्ला खालीं करतात. चीजबस्त काढतात. शिंदे यांस देणार. कलम.

---

नं. ६९७६ श्रीगणपतिजयति. ( मार्ग. शु. ५–७ दिसें. )

पै. छ. ४ रमजान. सन खमास मयातैन.

---

१ बंडवाला = होळकर.

[1]विज्ञापना. राजेश्री जिवाजीपंत आण्णा यासमागमें तोफा गेल्या त्याबरोबर कांहीं दर्यावर्दी गोलंदाज गेले. कांहीं एथील तोफांचे राहिले आहेत. थोरली तोफ आहे. त्याची भरती पाहिजे. यास्तव वडिलांस विनंती लिहिली आहे. तर तेथील गोलंदाजांपैकीं दोन असामी जुने नवे, दोन तीन असामी चांगले व [2]दर्यावर्द्यांपैकीं जुने दोन तीन असामी व नवे चार असामी. येणेंप्रमाणें तरतूद होऊन पाठवावयाची आज्ञा व्हावी. आण्णाबरोबर गेलेले आलेवर गोलंदाज दर्यावर्दी जुने माघारे पाठवीन. चिठी आली त्यांत [3]औषधाची तयारी करून ठेवावी असे भाव आहेत. न जाणो कोण वेळ कशी. दागिना मोठा, तरतूद असावी याजकरितां सेवेसीं लिहिलें आहे. विनंती लिहिल्याअन्वयें गोलंदाज व दर्यावर्दी उदईक यावे. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६९७७ श्री. ( मार्ग. शु. ६–८ दिसें. )

पौ छा ७ रमजान. सन खमस.

[4]श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेसीं विनंती सेवक बाळाजी महादेव दामले. चरणांवर मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा ५ रमजानपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंत राजश्री पंतप्रतिनिधि यांची खासा स्वारी मसुरेहून किनईस जावयास काल डेरादाखल जाहले. बरोबर खाजगीकडील फौजा, सरदार त्यांचीं नांवें हाजी महंमद आरब व आल्लदातखान पठाण व हुसेनखान व बालेखान व मालेखान व हरी फरास व जानोजी हुजरे व मल्हारी सरनोबत इतके सरदार मिळोन स्वार व पायदळ मिळोन जमाव अदमासें पांच हजार. त्यास खर्चाची बेगमी तर प्रांतांत रोखे करून खंडण्या चालल्या आहेत. सातारा शहरपर्यंत स्वाऱ्या होऊन खंडण्या घेऊन गांव लुटतात. मसुरेपासून फाळक्याचे पाडळीपर्यंत गांव दरोबस्त ओस जाहले. गांवचीं घोडीं सोडून नेऊन पागा होत आहेत. वाटसरू सांपडला असतां घोडें घेऊन लुटावयाचें. दाद फिर्याद नाहीं. इतक्या प्यांद्यांचे रोखे प्रथम प्रथम

---

१ पत्र सांगलीहून मिरजेस. २ दर्यावर्दी = तोफांच्या मरामतीचे पायदळी लोक. ३ दारूगोळयाची. ४ पत्र रहिमतपुराहून मिरजेस.

व्हावयाचे. कसबें मजकूर चार रोखे आले आहेत. पसतीस तीस वरातदार बसला आहे. सालमजकूरची पट्टी चालती करून वसूल चालीस लागतो. तों रोखे आले. वसूल होतो तो दररोज खर्चास चालला. रयतेंत त्राण राहिला नाहीं. याशिवाय खासा स्वारीचे रोखे असा अनर्थ जाहला आहे. बारा कोस वस्ति राहिली नाहीं. मध्यें रहिमतपुराची वस्ती. जातां येतां वसतीस राहातात. त्यास खर्च पडतो. जबरदस्तीनें घेतात. खासा स्वारी याच मार्गें किनईस जाण्याची बोलवा आहे. तेव्हां येथील निभावणी व्हावयाचें कठिण आहे. सेवेसीं विदित होय. हे विज्ञापना. एका रोख्याची नक्कल पाठविली आहे. हे विज्ञापना.

---

नं. ६९७८ श्रीगणपति. (मार्ग. शु. ७–९ दिसें.)

पौ छा ७ रमजान. खमास. मार्गशीर्ष.

अपत्यें[1] रामचंद्रानें शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा ६ रमजानपर्यंत यथास्थित असे. विशेष. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. चिरंजीव राजश्री चिंतामणराव आप्पा यांजकडील व पंतप्रतिनिधीकडील फौजेची लढाई होऊन चिरंजीवाकडील घोडे व माणूस जायां जखमी जाहल्याचा तपशील लिहिला तो कळला. जायां जखमी फार जाहले. बेळगांवहून कारकून आले आहेत. भेटून मजकूर समजला म्हणजे लिहितों म्हणून आज्ञा. त्यास उत्तम आहे. रा. सुभानराव माने पंताकडे जावयासाठीं म्हसवडचे मुकामास आले म्हणून वर्तमान आहे. बहुत काय लिहिणें. विदित होय. हे विज्ञापना.

---

नं. ६९७९ श्री. (मार्ग. शु. ७–९ दिसें.)

पौ छा ६ रमजान. खमास. मार्गशीर्ष.

सेवेसीं साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा। साबान पावेतो स्वामीचे कृपावलोकनें करून वर्तमान यथास्थित असे. विशेष. फत्तेसिंग माने रहिमतपूरकर यांणीं आपलें भाऊबंद व कुलकर्णी कसबें मजकूरचे मिळून सरकार अंमलांत बदफैली करून प्रांत लुटला. याजमुळें माने मजकूर याची पाटिलकी व ज्योतीष कुलकर्ण व माने याजकडे साताऱ्या-

---

१ पत्र जमखंडीहून मिरजेस.

कडून ब्रह्मपुरी व जमिनी आहेत त्याची कुल जप्ती सरकारांतून करून जप्तीचें कामकाज रा. बाबाजी रघुनाथ याजकडे व विनायक विष्णु याजकडे सांगून कसबे मजकुरीं पाठविले आहेत व स्वामीसही सरकारचें पत्र व प्रतिनिधीस आहे त्यांस मशारनिल्हे रहिमतपुरास जाऊन सविस्तर विनंती करतील. त्यावरून मजकूर श्रुत होईल. शिंदे बाहादूर याजपासीं इंग्रजाकडील वकील वायफूसाहेब होते. त्यास शिंदे बहादर यांचा बद रोख पाहून उज्जनीपासून चार कोस राहिले होते. त्यास कार्तिक शु॥ १३ वायफूसाहेब वकील [1]अपमोतें हक्क जाहले म्हणून पत्रें आलीं. मालोजी [2]घोरपडे पुण्यास पाऊणशे स्वारांनिशीं येऊन यशवंतराव घोरपडे यांचे बंधु खंडेराव घोरपडे निजबत शिंदे यांच्या विद्यमानें सरकारच्या भेटी वद्य १० जाहल्या. मालोजी घोरपडे बहुत वृद्ध जाहाले म्हणून त्यांचे बुद्धीस चळ होऊन नेत्रांसही दिसत नाहीं. परंतु अद्यापर्यंत लौकिक व मानपानाचे मार्ग सोडले नाहींत. शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ६९८० श्रीगणपतिर्जयति. (मार्ग. शु. ७–९ दिसें.)

पौ छा॥ ६ रमजान. सन खमस.

[3]अपत्यें चिंतामणीनें शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा॥ ६ रमजान वर्तमान यथास्थित असे. विशेष. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. राजश्री वैजनाथ भट मामा सातान्याहून परळीस जात असतां पंताकडील जमावाची त्यांची गांठ पडून लढाई जाहल्याविसीचें व हें वर्तमान पुण्यास समजल्यावर तेथून बंदोबस्ताविसीं गोखले व निपाणकर यांस आज्ञा जाहल्याचें लिहलें आलें आहे म्हणून लिहीलें तें कळलें. बागणीचें पत्र पाहावयास काल पाठविलें म्हणून लिहिलें होतें परंतु येथेंच राहिलें तें हल्लीं पाठविलें आहे. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

---

१ स्वाभाविक मृत्यूनें. २ कुमठेकर. हे उत्तर पेशवाईतील नामांकित शिलेदार होते. ता. १८ मे १७७५ रोजीं झालेल्या नावलिनपाड्याच्या लढाईत यांना सत्तावीस जखमा लागल्या होत्या. (पहा नाना. फ. चरित्र पृ. ३९). ३ पत्र सांगलीहून मिरजेस.

नं. ६९८१ श्री. (९ दिसेंबर.)

पै. छ. ११ रमजान. खमस. मय्यातैन.

सेवेशी[1] शिरसा. नमस्कार. विज्ञापना. मार्गशीर्ष शु. ७ किल्ल्यामध्यें कोणा गृहस्थाची चीजवस्त आहे. तिकडून स्वार येत असल्यास कळवावें. आपलें काम आहे असें बोलला. नंतर विचारलें काम काय? तो ममतेंतील यास्तव सोलापूरसारखा भाव येथें बोलण्यांत आइकतों. आपण गरीब यास्तव वस्तभाव आणवितों असें तो बोलला. नंतर तूर्त कोणी यावयाचें नाहीं असें मी बोललों. त्याजवरून लिहिलें आहे. दुर्गाची बंदोबस्ती यथास्थित असावी. विश्वास कोणाचा न धरणें. लोकांचा पैका देऊन राजी राखणें. सुचला मजकूर लिहिला आहे. हे विज्ञापना.

---

नं. ६९८२ श्री. (मार्ग. शु. ८–१० दिसें.)

पै. छ. ९ रमजान. सन खमस मयातैन. मार्गशीर्ष मास.

[2]श्रीमंत राजेश्री बाळासाहेब स्वामीचे शेवेसीं–विनंती. सेवक बाळाजी माहादेव दामले चरणांवर मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. ७ रमजान पावेतों वर्तमान यथास्थित असो. विशेष. श्रीमंत राजश्री पंतप्रतिनिधि यांची स्वारी मसुरेहून निघोन किन्हईस जातांना छ. ५ रमजानीं कसबें रहिमतपूर एथें मुक्काम करून गांवही झोबडला आणि गांवास चौकी देऊन लुटावयाची परवानगी जाहली होती. परंतु चौघांकडून रदबदली पडोन लुटावयाचा मना जाहाला. खंडणीचें बोलणें लाविलें. तेव्हां सक्त रदबदलीनें पांच हजार रुपये खंडणीचा टराव जाहाला. हजार रुपये दरबारखर्च पडला. शिवाय मुक्काम जाहाला. त्याजकडे खर्च रखवाली वगैरे मिळोन पांचसहाशें रुपये खर्च जाहाला. खंडणी दरबारखर्च मिळोन हजार रुपये आठ रोजांत द्यावे. याप्रमाणें करार आहे. ऐवजाचे [3]निशेस पाटील कुलकर्णी ओलीस नेले आहेत. शिवारांतच

---

१ सोलापूरचा किल्ला पेशव्यांनीं विश्वासघातानें घेऊन किल्लेदार रामचंद्र शिवाजी यांस नुकतेंच कैद केलें होतें. मिरजेचा किल्लाही असाच पेशवे घेणार अशा अफवा त्या वेळीं पसरल्या होत्या त्यास अनुसरून पत्रांत सावधपणाचा इशारा दिला आहे. २ पत्र रहिमतपूराहून मिरजेस. ३ निशा = जामीनगत.

मुक्काम शाळीचे पिकांत जाहाला. त्याणें व लष्करचे दळवटानें पीक बहुत गेलें. गांवची खराबी फारच झाली. गांव लुटावयाचा आग्रह फारच होता. याचें कारण तर राजश्री मल्हारजी बोडके सरनोबत यांचे फौजेवर छापा श्रीमंत राजश्री आप्पासाहेबांनीं घातला याजमुळें रहिमतपूर मिरजकरांकडील यास्तव लुटून जाळून टाकावें या आकसामुळें मुक्काम करून खराबी करावयाचें कारण अशा आदावती येऊन पडों लागल्या. रहदारीवरील गांव नित्य त्यांजकडील लोक मसुरेहून किन्हईस जाणार. किन्हईहून मसुरेस जाणार. ते आदावती घालतात. शिवाय श्रीमंतांची स्वारी अशा आदावती पडों लागल्या, तेव्हां राहाणारानें कसें राहावें ? रयतेची नांदणूक कशी होते ? खंडण्या किती द्याव्या ? दररोजचा येणाराजाणारास खर्च किती द्यावा ? कांहीं बंद राहिला नाहीं. सरनोबत यांजवर छापा पडला म्हणोन गांव बुडवावयाचा याप्रमाणें बोलोन चालोन होते. तेव्हां उपाय चालत नाहीं. पुढें कसें करावें ? येविसीं आज्ञा जाली पाहिजे. पंतांचा दरबार म्हणजे केवळ यवनी जाहाला आहे. माणूस गैरमाणूस याची आबरू नाहीं. दरबारांत दाद फिर्याद नाहीं. अशा आकसानें वसती राहात नाहीं. स्वारीचा मुक्काम रहिमतपुरास येणार ते समयीं आम्ही निधोन कुरल्यास आलों. मार्गे लष्करांत वळखी होते त्यांस सांगोन ठेविलें होतें. त्यांनीं मात्र रदबदली करून खंडणी ठरावून गांव लुटूं दिला नाहीं. तूर्त सहा हजार रुपये द्यावे लागतात. जाहाला मजकूर स्वामींस कळावयाकरितां विनंती लिहिली आहे. शेवेसीं विदित होय. हे विज्ञापना.

---

नं. ६९८३  श्री. ( नक्कल. ) ( मार्ग. शु. ९–११ दिसें. )

पै. छ. ८ रमजान. सन खमस मयातैन.

विज्ञापना. छ. ३ साबानचीं पत्रें नागपुराहून काल अस्तमानीं आलीं त्यांत वर्तमान लिहिलें आहे जे, आश्वीन मासीं शुद्धांत राजश्री येशवंतराव होळकर यांची व इंग्रजांची लढाई झाली. होळकराजवळ पाऊण लाख फौज होती व इंग्रजांकडील जमाव पलटणें बारा व आठ हजार तुरुक, स्वार. त्याची यांची गांठ बुंदीच्या मैदानांत पडली. लढाई सुरु जाहाली. ते

ऐ. ले. १५–२९

समई इंग्रजांकडील मार जबरदस्त बसला. यामुळें फौजेचा ठिकाव न निघे. फौजा मागें फिरल्या. नंतर तीन चार कोस होळकर मागें फौजेसुद्धां आले. तेथें घोड्याखालीं उडी टाकून सर्वांस बोलाविलें. आम्ही आज इंग्रजांपुढून मागें फिरलों त्यापेक्षां हिंदुपद बुडालें. याजउपर तोंड दाखवावयाचें नाहीं. मरणें प्राप्त आहे. तेव्हां सर्वांनीं एक विचार करून खाशाबरोबर मरण्यास सिद्ध होऊन घोडीं मागें ठेऊन चाळीस हजार पाय उतार होऊन फिरले आणि एकसहा चालोन घेतलें. मरणाचें भय बाळगिलें नाहीं. तेव्हां त्यांची व यांची हातघाई झाली. पहिल्या तोंडीं होळकराकडील पांच सहा हजार लोक ठार झाले. नंतर तरवार चालली. त्यांत खासा आहे. दोन प्रहर लढाई हातघाईची जाली. तेथें इंग्रजांकडील सात पलटणें व तुरुक स्वार झाडून ठार. बाकी राहिली यांणीं पळ काढिला. मार देत बुंदीपासून गोकुळवृंदावनापावेतों ते पुढें हे मागें याप्रमाणें तेरा दिवस लढाई होत होती. तेरावे दिवशीं इंग्रजांकडील दोन पलटणें बदलून इकडे आलीं. बाकी एक राहिलें तें जर्जर होऊन आगऱ्यानजीक गेलें. होळकर वृंदावनींच मुक्काम करून राहिले. दोन पलटणें होळकराकडे आलीं. त्यांत फितूर दृष्टीस पडला. याजकरितां दोन हजार माणसांचें एक हात व नाक याप्रमाणें घेऊन सोडून दिलीं. तीं निघोन आगऱ्यास गेलीं. तेथें इंग्रज होते. त्यांनीं त्या लोकांस समजोन सांगितलें. तुम्ही एथेंच राहावें. घरीं बसून तुम्हांस पोटास देऊं. कोणीकडे जाऊं नये. याप्रमाणें भुलथाप देऊन सारें माणूस ठेवून घेतलें. चार दिवस पोटास देऊन त्यांस सांगितलें तुम्हांस कलकत्त्यास लाऊन देतों. म्हणोन विछिन्न झालेले लोक गलबतांत बसवून तितके झाडून यमुनेंत बुडविले. असे जखमी विछिन्न गेले असतां अपलौकिक व वाईट म्हणोन बुडवून टाकिले. याप्रमाणें त्या लढाईचें वर्तमान लिहिलें आहे. मागाहून एक दोन दिवशीं पत्रें तपशीलवार यावयाचीं आहेत तीं आल्यावर मागाऊन लिहितों. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६९८४ श्रीगणपतिर्जयति. (मार्ग. शु. १०-१२ दिसें.)

पौ छा १० रमजान. सन खमस.

[1]तीर्थस्वरूप राजश्री काकासाहेब वडिलांचे सेवेशीं—अपत्यें चिंतामणीनें शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा। ९ रमजान वर्तमान यथास्थित असे. विशेष. पनाळेकर[2] ऐतवड्याहून येळूरचे मुकामीं आले. गोटखिंडी आष्टे इकडे येणार म्हणून आतांच बातमी आली. त्याजवरून वडिलांस विनंती लिहिली आहे. सुभानराव मान्या शंभर सवाशें स्वारांनिशीं जवळयाजवळ आला आहे. तीर्थस्वरूप राजश्री गणपतराव दादा मंगळवेढ्याहून येत असतां त्याजकडील स्वार यांजवर धांवले होते. दादासमागमेंही दहा वीस स्वार होते. संभाळून आज भोंवऱ्यास आले. चिठी अस्तमानीं येथें आली. चहूंकडील शिलशिल्याचे दिवस. चिरंजीव राजश्री त्रिंबकराव आप्पा यांजकडे पथकाचे रवानगीविसीं दोन तीन वेळ लिहिलें असतां उत्तरें समर्पक आलीं नाहींत. वडिलास कळावें म्हणून विनंती लिहिली आहे. सरकार आज्ञेवरून फौज कराडाकडे गेली आहे. मान्या त्याजकडील, तो इकडे उपद्रव करील याजकरितां वडिलीं तीर्थस्वरूप राजश्री आप्पासाहेबांस लिहावें म्हणजे वडिलांकडील स्वार जातील. थोडका शत्रु सवाशेंपर्यंतआहे. यांजकरितां विनंती लिहिली आहे. सेवेशी विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६९८५ श्रीगजानन. (मार्ग. शु. ११–१३ दिसें.)

पौ छा। १० रमजान. सन खमस. मय्यातैन. मार्गशीर्ष.

पु॥ विज्ञापना ऐसा जे. श्रीमंतांच्या व चिरंजीवांच्या भेटी कार्तिक वा। १० मीस जाहल्या. महाकार्तिकीचे दिवशीं सोळावे घटिकेस श्रीमंत येथून चालते झाले. ते आळंदीस देवदर्शनास गेले. तेथून श्रीमंत राजेश्री अप्पासाहेब[3] यांची स्वारी माघारी पुण्यास आली. आपण पुढें तुळापूरचे संगमास स्नान करोन सवेंच माघारे पुण्यास दाखल दोन घटका रात्रीस आजमासें आले. समागमें चिरंजीव होते. अप्पा देसाई दोन अडीचशें स्वारांनिशीं येथें आहेत. पट्टणांतून काल पत्रें आलीं. त्यांतील मजकूर ऐकिवांत आला. वसली चेनापट्टणास[4] आला. लवकर चार आठ

---

१ पत्र सांगलीहून मिरजेस. २ करवीरकर. ३ पेशव्यांचे धाकटे बंधु चिमाजीआपा. ४ मद्रास.

दिवसांत सरंजामाबरोबर येतों म्हणोन पत्रें त्याच्या वकीलाचीं आलीं आहेत व टोपीकरांचींही श्रीमंतांस आलीं आहेत. चिरंजीवास भोजनास भेटी जाल्या. त्या दिवशीं सोमवारीं प्रदोषास बोलाविलें होतें. मर्जीही चांगल्यांतच आहे. मी पेशजीं राजश्री विनायकपंत चाफेकर यांजपासीं स्वामीस विनंती करावयाकरितां सांगितली आहे. श्रुत करतील त्याचें उत्तर सेवकास आलें पाहिजे. शेवेसीं श्रुत होय ही विज्ञापना.

---

नं. ६९८६ श्रीगणपतिजयति. (मार्ग. शु. ११–१३ दिसें.)

पै. छ. ११ रमजान. खमस मयातैन.

[१]अपत्यें चिंतामणीनें सिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. ता। छा। १० रमजान वर्तमान यथास्थित असे. विशेष. पलीकडे सैन्यांत एकास पाठविलें होतें. तो जाऊन आज आला. तेथील मजकूर पंताचा व यांचा[२] एक विचार दोन स्थळें त्यांनीं द्यावयाचा करार केल्यावरून होऊन बोडक्याकडे कुमक जाऊन आपण ऐतवड्यावर राहिले. इकडील फौज तिकडे गेल्याचें पाहून इकडे दुरक शह लाऊन सिलसिला लावावा या बेतानें ऐतवड्यावरोन निघोन काल इटकऱ्यास आले. आज लाटवडें भेंडवाड यावर येऊन मुक्काम केला आहे. दोनी स्थळांपैकीं एक याचे हस्तगत जाहलें. येक व्हावयाचें. तितकेपुरतें त्यांचें कार्य करावें. म्हणोन आसपास फिरतात. असा मजकूर आहे. जमाव विशेष नाहीं. थोडयांतच आहे. परंतु फौज तिकडे गेली आहे. याजमुळें विचार. स्थळांचीं नांवें समजलीं नाहीं. एक दोन दिवसीं स्वस्थळास जाणार असेंही त्याचे सांगणेंत आहे. त्याणीं स्थलें देऊं केलीं. ते पक्षीं आम्ही त्यास वेध लावला असें सांगून हाताखालीं घालावें. इतकाच अर्थ. परंतु त्याचे रीतीची माहिती वडिलांस आहेच. शेवेसीं विदित होय. हे विज्ञापना.

---

नं. ६९८७ (१४ दिसेंबर)

उतारा—पत्र बाबूराव शिवाजी म्हैसकर याचें पंढरपुराहून मिरजेस. मार्ग. शु. १२ चें. (रमजान. सन खमस.)

---

१ पत्र सांगलीहून मिरजेस. २ पंतप्रतिनिधि व करवीरकर यांचा.

" रा. रामचंद्र शिवाजी व त्यांचे दोघे पुत्र येणेंप्रमाणें येथूनच नेले. नित्य निरशनाचा फराळ करतात. अन्न घेत नाहींत. वरकड बायकामुलें सोलापुरीं किल्ल्यांत आहेत. रामचंद्र शिवाजी बहुतच अशक्त जाले आहेत. फार दिवस लोटावयाचे नाहींत असें येथील गृहस्थांचें म्हणणें आहे. सोलापूरचे बंदोबस्तीस रा. सदाशिव माणकेश्वर यांचे बंधु जाणार. सुभानराव मान्या करकंबेकडून भंडारकवठ्याकडून हुजरतीस येऊन श्री पंताकडे जाणार. + + + पुण्याहून काल जासूद आला. हा तोंड जबानी सांगतो. होळकराची फौज चांदवडावर आली. मागाहून खासाही येत आहे. याजमुळें इंचूरकर पुण्यास आले असें बाजारी वर्तमान आहे."

---

न. ६९८८ श्रीगणपतिर्जयति. (मार्ग. शु. १३–१५ दिसें.)

पै. छ. १२ रमजान. खमस मय्यातैन. मार्ग. शु. १४ शनवार.

अपत्यें चिंतामणीनें शिरसा नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. १२ रमजान वर्तमान क्षेम असे. विशेष. सुभानराव मान्या शंभर सवाशे स्वारांनिशीं जवळ कडलास इकडून फिरत होता. त्यास रा. भगवंतराव शिंदे नाझरेकर यांणीं बातमी राखोन लुटलें. खुद्द मान्या ठार पडला याप्रमाणें आतांच बातमी आली. रा. रत्नापा केदार शिलेदार आतांच कडलासवरून आले त्यांणींही सदरहूप्रमाणें सांगितलें. काल करवीरास महाराज गेले. चव्हाण व रत्नाकरपंत यांचे चिरंजीव लष्करांत आहेत. काल मी तीन चारशे स्वार घेऊन पन्हाळेपर्यंत उतार कोठें आहेत हें पहावयास गेलों होतों. त्यांचे लष्करांत रात्रीं हुल्लड जाहली. डेरे राहुट्या वगैरे लादून वडगांवास गेले. वडिलांस कळावें. जमाव थोडा आहे. समय आहे. परंतु ईश्वर इच्छा म्हणावी. फौज तिकडे गेली आहे. तिकडील वर्तमान. पंतांकडून बोलणार आले व इकडेही पत्र आलें त्यांतील मजकूर पूर्वींचे स्नेहभाव जाणवून लिहिलें आहे. असें असतां हें काय ? त्याचें उत्तर–आपणाकडून बहुत उपद्रव व सरकार तालुक्यास उपद्रव याजकरितां सरकारचीही आज्ञा याजकरितां फौज पाठविली. आमच्याही चित्तांत घरोब्याचे भाव हें जाणवून उत्तर लिहिलें आहे. कळावें. सेवेशीं विदित होय. हे विज्ञापना.

---

नं. ६९८९ श्री. ( मार्ग. शु. १५–१६ दिसें. )

पै. छ. १४ रमजान. खमस मयातैन. मार्गशीर्ष.

[१]शेवेसीं श्रीधर गोविंद साष्टांग नमस्कार. विज्ञापना. ताा छ. १३ रमजान. रविवार आवसीची पांच तास रात्र पावेतों शेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंत राजेश्री चिंतामणराव अप्पासाहेब यांजकडील फौज श्रीमंत राजेश्री पंतप्रतिनिधि यांच्या मोहोऱ्यावर होती. यांचा मुकाम आपसिंगें येकसलनजीक होता. तेथून आज प्रातःकाळीं चार घटका दिवसास किनईपर्यंत गेले. फौज तयार होऊन तोंडावर येऊन लढाई झाली. इकडील फौजेनें उठावणी करून येक दोन वेळां खरडून घातलें. त्यांचे फौजेनें पाठ केली. गांवचे आश्रयास गेले. मागून इकडील फौजेनें उठावणी करून बोढापार व्हावें तों आरब ओढ्यांत होते. त्यांणीं मारगिरी करून इकडील फौज हटविली. मग तिकडील फौजेनें उठावणी करून तोफा सोडविल्या. तसाच पाठलाग करीत मुकामापर्यंत आले. कांहीं बुणगें झाबडाझाबड केली असें वर्तमान चाळीस पन्नास राऊत येथें मुकामास आले. त्यांणीं सांगितलें. त्याजवरून शेवेसीं लिहिलें आहे. सेवेसीं श्रुत होय. हे विज्ञापना.

---

नं. ६९९० श्रीगणपतिजयति. (मार्ग. व. १–१७ दिसें.)

पै. छ. १४ रमजान. इंदुवार. खमस मय्यातैन.

तीर्थस्वरूप राजश्री काकासाहेब वडिलांचे शेवेसीं—

[२]अपत्यें चिंतामणीनें शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. १४ रमजान वर्तमान यथास्थित असों. विशेष. इकडील व पंतांकडील फौजेची झटपट काल रविवारीं तिसरे तासीं होऊन तिकडील पायदळ ओढ्याचे आश्रयास होतें. त्याजमुळें इकडील कांहीं खराबी झाली. लोक मागें निघोन बुणगें संभाळून राजश्री जिवाजीपंत आण्णा पुसेसावलीचे सुमारें आले. याप्रमाणें [३]कुसूद एक तिकडून आला. त्यानें सांगितलें व तासगांवास एक दोन स्वार पळांतील आले. त्याचे सांगण्यांत सदरहू अन्वयें आहे. येविसीं

---

१ अष्टयाच्या कमावीसदाराचें पत्र मिरजेस. २ पत्र सांगलीहून मिरजेस.
३ कुसूद = बातमीदार, जासूद.

तीर्थरूप राजश्री आपासाहेबांकडून आतांच पत्र आलें. वडिलांकडेही वडिलांनीं लिहिलेंच असेल. लष्करांतून अद्याप कोणाची चिठ्ठी आली नाहीं. आल्यावर वडिलांस विनंती लिहून पाठवितों. तोफा त्यांनीं सांडविल्या असें माणूस सांगतो. कुरुंदवाड तासगांवचीं पथकें सरकारचाकरीस फौज गेली असतां यावयाचीं येविसीं कुरुंदवाडास परभारें लिहिलें व तासगांवास लिहावयाविसीं वडिलांस लिहिलें. परंतु त्यांतून कोणी आले नाहींत. करवीरकर पुन्हां सैन्यांत आले. दोन तोफा बरोबर आणिल्या आहेत. वडिलांस कळावें. लिहिलें असतां हा समय दिरंगाईचा नव्हे. पाटणकर जमखिंडीकडे जातात. उपेक्षेचा समय नव्हे. अशी वडिलांची चिठी येतांच निघालों येविसीचें वडिलांस विदित असेलच व करवीरास तीर्थरूप राजश्री आपासाहेब जाण्याविषयीं निघावयाचें ठरलें ते वेळेस मी मंगळवेढ्यास होतों. पुण्याहून मातोश्री आली ती किल्ल्यांत आली व मी डेऱ्यांत आलों. आठ वर्षांनीं भेट झाली असतां सदरहू अन्वयें निघालों. निघणेविसीं वडिलांची चिठी येतांच निघालों हें वडिलांचें ऐकण्यांत असेलच. असो. ईश्वर इच्छा म्हणावी! शेवेसीं विदित होय. हे विज्ञापना.

---

नं. ६९९१ श्रीगणपति. (मार्ग. व. १–१७ दिसें.)

छ. १४ रमजान. सन खमस मयातैन.

[1]विज्ञापना. तागायत छ. १४ रमजानपर्यंत यथास्थित असों. विशेष. राजश्री जिवाजीपंत, आण्णा व कानिटकर व पंतांकडील राजश्री बळवंतराव फौजसुद्धां कोरेगांवचें सुमारें होतें. खासा पंत येऊन लढाई होऊन इकडील फौजेचा मोड काल रविवारीं प्रहर दिवस प्रातःकाळचे जाला. हत्ती गेला, तोफा गेल्या, असे स्वार पळाचे आले, त्यांचें जबानीचें वर्तमान आहे. पलुसाहून पत्रें आलीं, तेंच पाठविलें आहे. स्वाराचे सांगण्यांत फौज मागें सरकून पुसेसावळीस मुक्काम आला असें आहे. आणखी येईल तें वर्तमान लिहितों. ईश्वर इच्छेपुढें इलाज नाहीं. विदित होय. हे विज्ञापना.

---

१ पत्र तासगांवाहून गणपत परशराम यांचें मिरजेस.

नं. ६९९२ (मार्ग व. १–१७ दिसें.)

उतारा—पत्र बाळाजी महादेव दामले याचें रहिमतपुराहून मिरजेस छ. १४ रमजान इंदुवार सन खमसचें.

" श्री. मातुश्री काशीबाई कऱ्हाडहून काल रात्रौ पुसे सावळीचे मुक्कामांत फौजेंत आली. आज दोन प्रहरानंतर कूच होऊन खानापुरास जाणार. रा. बळवंतराव फडणीस व जिवाजीपंत अण्णा सडे शेपन्नास लोकांनिशीं सांगलीस जाणार. श्री. राजश्री पंतप्रातिनिधि यांचा मुक्काम किन्हईसच आहे. कसबें रहिमतपुरास प्रतिनिधीकडील उपद्रव लागणार याजमुळें गांव दरोबस्त पळत आहे. इतक्यांत रोखा घेऊन स्वार आले. त्यांणीं गावांत दंगा करून पळणकरू यांस धरून दंगा केला आहे. गांवची दशा कांहींच राहिली नाहीं."

---

नं. ६९९३. श्री. (मार्ग. व. १–१७ डिसें.)

पै. छ. १५ रमजान. सन खमस. मयातैन. मार्गशीर्ष मास.

[१]श्रीमंत राजेश्री बाळासाहेब स्वामीचे शेवेसीं विनंती बाळाजी माहादेव दामले चरणांवर मस्तक ठेऊनं शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. १४ रमजान इंदुवासर पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंत राजेश्री आप्पासाहेब यांजकडील फौज व राजेश्री बळवंतराव फडणीस फौजसुद्धां एकत्र होऊन काल रविवारीं श्रीमंत राजेश्री पंतप्रातिनिधि यांसी कोरेगांवानजीक प्रातःकालीं लढाई होऊन प्रहर दिवसास बळवंतराव फडणीससुद्धां इकडील फौजेचा मोड जाहाला. तोफा व बळवंतराव फडणीस यांजकडील हत्ती पाडाव गेला. राजश्री मोरोपंत भाऊ [२]पेंढारकर यांस जखमा लागोन पाडाव गेले. जखमा भारी लागल्या आहेत. ठार जाले किंवा जिवंत आहेत हें वर्तमान नाहीं. इकडील निंबाजी भोसले यास जखमा लागोन लढाईत पडले. ठार जाले किंवा जिवंत आहेत किंवा तिकडे नेलें हें वर्तमान नाहीं. वरकड इकडील घोड्यावरील स्वार फार जखमी ठार नाहींत. थोडेंबहुत पायदळ ठार

---

१ पत्र रहिमतपुराहून मिरजेस. २ फडणिस व पेंढारकर हे प्रति. च्या दौलतीचे कारभारी.

जालें. बहुतकरून बुणगें निभाऊन आलें. गडबडींत तळावर राहिलें तें त्यांणीं नेलें. ब्राणाच्या कैचा व राहुटया [1]चांदण्या सारवान टाकून उंटें घेऊन पळोन आले. आप्पासाहेबाकडील तोफा बळवंतराव फडणीस याजकडील तोफा साऱ्याच गेल्या. बुणगेंसुद्धां फौजेचा मुक्काम काल सायंकाळीं पुसेसावळीस आला. फौजेंत राजेश्री बळवंतराव फडणीस व जिवाजीपंत अण्णा व अंताजीपंत कानिटकर शाबूत आहेत. फौजेचा मोड होऊन माघारे रहिमतपुरास आले. गांवासही पळ सुटला. आम्हीही निघोन फौजेंत आलों आहों. गांवची वस्ति पंत ठेवितील हा भरवंसा नाहीं. शेवेसीं विदित होय. हे विज्ञापना.

नं. ६९९४ श्रीगणपति. (मार्ग. व. २–१८ दिसें.)

पै. छ. १५ रमजान. सन खमास मयातैन. मार्गशीर्ष.

[2]विज्ञापना. तागायत छ. १५ रमजान भौमवार तिसरा प्रहर वर्तमान यथास्थित असे. विशेष. प्रतिनिधीकडील फौजेंतून राजश्री अंताजीपंत किराणे म्हणोन कारभाऱ्यांतच आहेत. ते आज दोनप्रहरीं एथें आले. जखमी आहेत. तीन जखमा आहेत. त्यांचे सांगण्यांत दोन तोफा आप्पाकडील व एक तोफ कारभाऱ्याकडील अशा तीन लढाईत होत्या त्या गेल्या व दोन बुणग्यांत होत्या त्या गेल्या. एकूण पांच तोफा व एक हत्ती कारभाऱ्यांकडील व राजश्री मोरोपंत पेंढारकर जखमी पाडाव गेले. आपण बळवंतराव आदिकरून राजश्री जिवाजीपंत व अंताजीपंतसुद्धां पुसेसावळी येथें आलों सांगतात. बुणग्यांचा मुक्काम रामापुरावर आहे. असें आहे. कऱ्हाडहून श्रीमंत मातुश्री काशीबाई इटयास आली व आणखी कोणी कोणी काल रात्रीस येऊन दाखल जाले. बळवंतरावही इटयास आले म्हणोन तेथून जोगाकडील ग्रहस्त आले ते सांगतात. खानापुरास जाणार असें आहे. एथून सुतरस्वार जिवाजीपंताकडे पाठविला आहे तो अजून आला नाहीं. प्याद्यांचा नाश बहुतकरून जाला असें ऐकतों. विदित होय हे विज्ञापना.

---

१ चांदणी = लहान राहुटी. २ पत्र तासगांवाहून मिरजेस गणपतराव परशराम यांचें.

ऐ. ले. १५–३०

नं. ६९९५ श्रीगणपति. (मार्ग. व. ३-१९ दिसें.)

पै. छ. १६ रमजान. सन खमास मयातैन. सौम्यवार.

[1]अपत्यें रामचंद्रानें शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. ता। छ. १६ रमजान पर्यंत यथास्थित असे. विशेष. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. चिरंजीव राजश्री चिंतामणराव आप्पा यांचें पत्र वडिलांस आलें त्यांतील मजकूर लिहिला तो कळला. काल मलाही चिरंजीवांचें पत्र आलें, त्यांत लिहिलें आहे कीं पंताकडील फौज पायदळास ओढ्याचा आसरा होता. इकडील तोफा मारागिरीमुळें काढावयास अवकाश पडला नाहीं. महादाजी चिंतामण गोळी लागोन ठार झाले. निंबाजी भोसले याचें ठिकाण नाहीं. याप्रमाणें लिहिलें होतें. दोन्ही मनुष्यें चांगलीं गेलीं. ईश्वर इच्छा प्रमाण ! कराडाहून मातुश्री बाई व पंताकडील कारभारी इत्यास आल्याचें वडिलांस लिहिलेंच आहे. रहिमतपूरचें पत्र पाहावयास पाठविलें तें पाहून शेवेसीं पाठविलें आहे. कळावें. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६९९६ श्रीगणपतिर्जयति. (मार्ग. व. ३-१९ दिसें.)

पै. छ. १६ रमजान. सन खमास मयातैन. मार्गशीर्ष. बुधवार.

[2]तीर्थस्वरूप राजेश्री काकासाहेब वडिलांचे शेवेसीं. अपत्यें चिंतामणीनें शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. १६ रमजान पावेतों वर्तमान यथास्थित असो. विशेष. काल मंगळवारीं रात्रौ डेऱ्यास जावयाचा मुहूर्त पाहिल्याचें विनंतीपत्र लिहिलेंच होतें. परंतु कांहीं तरतुदीमुळें राहणें झालें. लष्करांतून आतांच पत्रें आलीं. त्यांत बाबाजी जोशी, गणपतराव बोरगांवकर यांचे मेहुणे सरकारकामास आले व निंबाजी भोसले रांजणीकर हेही ठार झाले. भोसले चांगले मनुष्य. श्रीइच्छेस उपाय नाहीं. पाडाव मंडळी, मोरोपंत भाऊ व नाथाजी शेडगे व त्रिंबकपंत गेले. यांच्या जखमा बांधिल्या नाहींत. लष्करांत दुसरे लोक रवाना करितों. आलासकर मंडळीपैकी कांहीं जखमी आहेत व दोन

---

१ पत्र जमखिंडीहून मिरजेस. २ पत्र सांगलीहून मिरजेस.

असामी ठार झाले. भोसल्यासारख्या मनुष्याची किंमत काय लिहा-वयाची! श्रीइच्छेस इलाज नाहीं. शेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६९९७     श्रीगणपतिर्जयति.     (मार्ग. व. ३–१९ दिसें.)

पै. छ. १६ रमजान. सन खमस मयातैन. मार्गशीर्ष. बुधवार.

[1]अपत्यें चिंतामणीनें साष्टांग नमस्कार. विज्ञापना. वडिलीं चिठी पाठविली ती पावली. राजेश्री बाळाजी महादेव दामले यांचें पत्र आलेलें पाठविलें तें पाहून पाठविलें आहे. रा. आण्णाचें पत्र याप्रमाणेंच आजच आलें. मातोश्री काशीबाई येणार म्हणून लिहिलें आहे. अविचार आहे. विश्वास काय! याजकरितां निघणार. मी पहाटेस मुहूर्त करून निघणार. पाहिला मुहूर्त सुमाराचा होता. याजकरितां दुसरा पाहिला. वडिलांस कळावें. तिकडील जमाव हजार पायदळ व दीड हजार फौज. परंतु वेळेस उपाय नाहीं. तोफा लगत जाऊन सुरू झाल्या. ओढ्यांतील पायदळाची माहिती नाहीं. याजकरितां दगा झाला. पायदळानें वोढा सोडून वर निघतांच तोफा वर आले. इकडील पायदळ कमती होतें. याजकरितां तोफा गेल्या. फौज उठली तों त्यांनीं सडी जातांच एक टोळी मागें सरली. नंतर सारी फौज उधळली. इकडील फौज एकोणीसशे राऊत गणतीचा. शिवाय चारशें पायदळ व पंताकडील दीड हजार पायदळ सुद्धां कांहीं जास्त. परंतु वेळेस उपाय नाहीं! कांहीं एथील लोक उदईक रवाना करितों. शेवेसीं विदित होय. हे विज्ञापना.

---

नं. ६९९८     श्री.     (मार्ग. व. ४–२० दिसें.)

पै. छ. १८ रमजान. खमस मयातैन. मार्गशीर्ष.

[2]श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे शेवेसीं. विनंती सेवक बाळाजी महादेव दामले चरणांवर मस्तक ठेऊन सीरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागाइत चंद्र १७ रमजान पावेतों सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंत राजेश्री पंत प्रतिनिधि यांची स्वारी मसुरेहून किन्हईस जातां छ. ६ रमजानीं कसबें रहिमतपूर येथें मुक्काम जाहला. ते समईं

---

१ पत्र सांगलीहून मिरजेस.   २ पत्र रहिमतपुराहून मिरजेस.

स्वारी खर्च दाणा वगैरे हजार रुपये पर्यंत खर्च जाहला. शिवाय गांव लुटीत होते. त्याजबद्दल खंडणी पांच हजार रुपये ठरोन वोलीस पाटील कुलकर्णी धरोन नेले. त्यांपैकीं पांच सातशे रुपये पावती जाहली. इतकीयांत इकडील फौजेचा मुक्काम छ. ९ रमजानीं कसबें मजकुरीं जाहला. यामुळें ऐवज वसूल होऊन प्रतिनिधीकडे पावला नाहीं. शिवाय मल्हारजी सरनोबत यांचे रोखे बारा हजार रुपयांचे आले होते. त्यास रोज मसाला[1] मिळोन सातशे रुपये खर्च जाहला होता. ते रोखेवाले इकडील फौज येतांच पळोन गेले. हल्लीं इकडील फौजेचा मोड होऊन फौज माघारी गेली याजमुळें पांच हजार खंडणीचे ऐवजाबद्दल व मल्हारजी सरनोबत याजकडील रोखेवाले पळाले होते ते ऐसीं स्वार व प्यादे मिळोन गांवांत येऊन बसले आहेत. गांव उजाड जाहला आहे. गोरगरीब खावयास अन्न नाहीं. ते गांवांत आपआपले घरांत आहेत. त्यास रोखेवाले धरून मारहाण करतात व पेठेंत उदमी यांचे घरांत कांहीं कापड वगैरे जिन्नस व कुलवाडी यांचे घरांतून दाणादुणा आहे तो काढून नेतात. गांव परागंदा जाहला. तो भोंवर गांवांनीं पळोन जाऊन राहिले आहेत. त्यांसही उपद्रव होत आहे. खंडणीचे रोखे मनस्वी जाहले. त्याची कांहीं दादफिर्याद त्या दरबारीं नाहीं. तशांत श्रीमंत राजेश्री अप्पासाहेब याजकडील फौज आली व सुभानराव माने याची व मल्हारजी सरनोबत याची फौज बुडविली. या आकसामुळें श्रीमंतांची बेमर्जी. यामुळें रदबदल चालत नाहीं. गांवांत गेल्यानें रोखेवाले आले आहेत त्याची निभावणी होणें कठीण. यास्तव बाहेरच आहें. ठाण्यांत चाळीस पन्नास असामी लोक ठेऊन वरचेवर बातमी राखून आहें. गांवची निभावणी पडेल असा भरंवसा येत नाहीं. श्रीमंतांचा मुक्काम किन्हईस आहे. श्रीमंत राजेश्री अप्पासाहेब यांजकडील एक कारकून किन्हईस धरून नेला आहे. त्यास मारहाण करतात. कारकून कोणता याचें नांव समजलें नाहीं. सेवेसीं विदित होय. हे विज्ञापना.

---

[1] मसाला = प्याद्यांचा पोटगी वगैरे खर्च.

नं. ६९९९ श्री. (मार्ग. व. ४–२० डिसें.)

पै. छ. १८ रमजान. मार्गशीर्ष. सन खमस मयातैन.

[1]सेवेसीं श्रीधर गोविंद साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. १७ रमजान गुरुवारपावेतों सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंत राजेश्री पंतप्रातिनिधि यांजबरोबर हिकडील फौजेची लढाई बिघडल्याचें पेशजीं विनंती लिहिलीच आहे. त्यावर माणसें बातमीस पाठविलीं होतीं. त्यास मंगळवारपर्यंत पंतांचा मुक्काम किन्हईसच होता. हिकडील फौज इस्यानजीक आहे. लढाईत राजेश्री बळवंतराव याजकडील राजेश्री मोरो अनंत पेंढारकर व पेडकर सेडगे पाडाव गेले वगैरे दहापांच आसामी चांगलेच जायांजखमी जाहाले. हत्ती निशाणाचा एक व तोफा तीन गेल्या. बुणगें थोडेंबहुत झाबडलें. इकडील फौजेंतील निंबाजी भोसले रांजणीकर वगैरे त्याचे भाऊबंद दोनतीन पडले व ब्राह्मणही दोनतीन जायांजखमी जाहाले. त्यांची नांवनिशी समजली नाहीं. तोफा दोन गेल्या. बुणगें सांभाळून निघाले असें वर्तमान आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७००० श्रीगणपतिर्जयति. (मार्ग व. ५–२१ डिसें.)

पै. छ. १८ रमजान. सन खमस मयातैन. मार्गशीर्ष.

[2]अपत्यें चिंतामणीनें शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. १८ रमजान वर्तमान यथास्थित असे. विशेष. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. तुम्हाकडील व पंतांकडील कारभारी यांची फौज कोणे ठिकाणीं आहे. तुम्हाकडील वर्तमान काय तें ल्याहावें म्हणोन लिहिलें तें कळलें. ऐसीयास राजश्री जिवाजीपंत आण्णा व बळवंतराव फडणीस फौज बुणगें सुद्धां पुसेसावलीस आल्यावर श्रीमंत मातोश्री काशीबाई तेथें कराडाहून आली. तेव्हां त्यांस घेऊन आण्णा व बळवंतराव फौजेसह खानापुरालगत आले आहेत. मातोश्री खानापुरीं राहतील. खुद पंत किन्हईसच आहेत. जमाव स्वार पांचसहाशें व पायदळ आरब वगैरे बाराशें इतका आहे. लढाईत स्वार पठाण वगैरे पावणाशे ऐशी आसामी जखमी व कांहीं ठार

---

१ अष्टयाच्या कमावीसदाराचें पत्र मिरजेस. २ पत्र सांगलीहून मिरजेस.

झाले. याप्रमाणें तेथील बातमी आहे. मोरोपंत पेंढरकर यांच्या जखमा बांधूं दिल्या नाहींत असेंही वर्तमान आहे. इकडून आण्णाकडे[1] स्वाराची रवानगी वरचेवर होत आहे. पायदळाविसीं चहूंकडे सांगितलें आहे. परंतु पाईचे[2] लोक जमत नाहींत. वरचेवर येतील त्यांची हजेरी घेत आहे. शेंवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ७००१ श्री. (मार्ग. व. १०–२६ दिसें.)

छा। २४ रमजान.

[3]सेवेशी विनंती. सेवक सखो तुकदेव. कृतानेक साष्टांग नमस्कार. विनंती विज्ञापना. तागायत छा। २३ रमजान पावेतों यथास्थित असे. विशेष. स्वामींची आज्ञा किनईस गर्डी पाठऊन बातमी आणविणेविसीं. त्यास गर्डी पाठऊन तिकडील वर्तमान राजश्री मोरोपंतभाऊ व नाथाजी शेडगे उभयतांस वर्धनगडास पाठविलें. मोरोपंतभाऊंस जखमा सात. भालेच्या दोन. जखमानें जेर बहुत आहेत. राजश्री बापू गोखले यांचा मुकाम देऊर भोसलेचें येथें आला आहे. खासा प्रतिनिधि वर्धनगडानजीक चिमणगांव कोसावर मुकाम आहे. फौज चार हजार आहे. राजश्री जीवबा आण्णा वाख्याहून उदईक निघोन कुरलेचे मुकामास बळवंतराव सुद्धां जाणार. करवीरकराकडील वर्तमान. काल बोरगांव व खेडचे रानांत स्वारी देऊन शेंदोनशें ढोरें घेऊन गेले. याप्रमाणें वर्तमान आहे. बहुत काय लिहिणें. शक्त न होय. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ७००२ (मार्ग. व. १२–२८ डिसें.)

उतारा—पत्र बाळाजी महादेव दामले यांचें रहिमतपुराहून मिरजेस. छ. २५ रमजान सन खमसचें.

"स्वामींनीं आज्ञापत्र पाठविलें तेथें आज्ञा कीं कावळी वेलाचीं मुळें व मोरवेल ऐसें औषधाकरितां पाहिजे. इकडे मिळत नाहीं. तर तिकडे तलास करून पाठविणें म्हणोन आज्ञा. आज्ञेप्रों कावळी वेल व मुळें व मोरवेल ऐसीं पाठविलें आहे."

१ जिवाजीपंत अण्णा पोतनीस. यांचें उपनांव जोशी उत्तरकर. २ पायचे लोक = पायदळ. ३ अष्टयाच्या कमाविसदाराचें पत्र मिरजेस.

नं. ७००३  श्री.  ( मार्ग. व. १२–२८ डिसें. )

पै. छ. २६ रमजान. खमस मयातैन.

[1]सेवेसीं विनंती. सेवक बाळाजी महादेव दामले चरणांवर मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. २५ रमजानपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजश्री बापू गोखले यांचा मुक्काम काल नीरेनजीक जाला. ही बातमी किन्हईस येतांच श्रीमंत किन्हईहून फौज-सुद्धां निघोन वर्धनगडच्या घांटानें चढोन मौजे कुरोलीवर मुक्काम करून राहिले आहेत. बापू गोखले यांचा मुक्काम छ. २३ रमजानीं कोरेगांवावर आला. तेथून किन्हईवर स्वारी गेली. किन्हईत मानाजी रोमण म्हणून प्रतिनिधीकडील शेदोनशें स्वारानिशीं होते. त्यांची व यांची लढाई होऊन मानाजी रोमण यास जखमा लागोन मोड जाला. वीस पंचवीस घोडे व गुरें वगैरे गोखले यांनीं पाडाव नेलें. गोखले यांचा मुक्काम मौजे न्हावी घांटानजीक गेला. आज घांट चढोन औंधाचे सुमारें जाणार. औंधाहून दोन कोस उत्तरेस कुरोली आहे तेथें श्रीमंत पंतप्रतिनिधींचा मुक्काम आहे. गोखले पुण्याहून प्रतिनिधींचे पारिपत्यास आले आहेत. राजश्री बळवंतराव फडणीस यांचा मुक्काम इस्लावर आहे. श्रीमंत राजेश्री आप्पासाहेबांचे फौजेचा मुक्काम मौजे वेडें एथें आहे. आज उद्यां त्या फौजेचेंही कूच होणार म्हणून बोलवा आहे. सेवेसीं विदित होय. हे विज्ञापना.

---

नं. ७००४  श्री.  ( पौष व. १३ १७२५–२९ दिसें. १८०३)

पौ छ. १४ रमजान. अर्बा मयातैन. पौष.

[2]तीर्थरूप राजश्री बाळासाहेब वडिलांचे सेवेशीं. अपत्यें नारायणराव राम साष्टांग नमस्कार. विज्ञापना. येथील कुशल ता. छ. ११ माहे रमजान पावेतों यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान तरी इंग्रजांची फौज तोरगल व मनोळी यांचेमध्यें मुक्कामीं आहे. जालेहाळाकडून फौज येते समई आमच्या बारीनें यावयाचा मनसबा होता. परंतु राजश्री नरहरपंत नि॥ आप्पा निपाणीकर यांणीं आम्हाविशीं बहुत खटपट करून

---

[1] पत्र रहिमतपुराहून मिरजेस.  [2] पत्र रामदुर्गाहून मिरजेस.

मार्ग होसकेरीचे वारीनें काढून दिला. म्हणोन तालुक्याचा बचाव जाहला. पेशजीं तळूरकर देसाई यांनीं मनोळी तालुक्यांत काटकाई केली. प्रांताची नासाडी फार केली. याजकरितां त्यांच्या बंदोबस्ताकरितां मनोळीकर यांणीं इंग्रजांचीं पलटणें या प्रांतीं आणिलीं आहेत. याप्रमाणें दिसण्यांत येतें. परंतु इंग्रजांचें अंतर्गत कोणास कळत नाहीं. या प्रांतीं छावणीस राहणार असें म्हणतात. पुढें काय घडतें पहावें. सरंजाम दोन हजार तुरुकस्वार व हजार गोरा व चार हजार बारवाले व तोफा वीस व कोठीचे बैल तीस हजार वगैरे बुणगें मनस्वी आहे. आणखी दरचेवरी कोठीचे बैल भरून येतच आहे. दुसरा धोंडजी वाघ म्हणोन उत्पन्न जाहला आहे. त्याजवळ चार हजार फौज आहे. तोही श्रीकृष्णा पैलतीरीं विजापूर तालुक्याचे आसपास आहे. याप्रमाणें चोहोकडे अरिष्टें उठलीं आहेत. कसें घडतें तें पहावें. इचीवरील महाताची मुहूर्त तांब्याची तयार होऊन आली. ती हल्लीं ईश्वरा इंदलकर व महादू मावळा याजबरोबर माफजतीनें करडींत घालून त्यांतच मेणाची मुहूर्त आपण पाठविली होती तीही घालून दोनही मुहूर्ती पाठविल्या आहेत. हाती मानेचा (?) वेत लाकडी करून पाठविला होता. तोही पाठविला आहे. सेवेशीं येऊन पावलियाचें उत्तर पाठवावया आज्ञा करावी. मेणाची मुहूर्त आपण पाठविली ती कारेगार यांणीं पाहिली. नतर त्यानें आपले शहाणपणें करून चांगलां इकडील चौघांच्या चित्तास येईजोगी करून पाठविली आहे. राजश्री मोरोपंत गोडबोले यांस पुढें नरगुंदास पोचाविणेबद्दल आज्ञापत्र पाठविलें. त्याप्रमाणें प्यादे देऊन नरगुंदास पाहोचते केलें. त्यांनींही पत्र आपणास लिहिलें तें पाठविलें आहे. येऊन पावेलच. अलीकडे उत्तरेकडील वर्तमान आलें असेल तें सर्व लिहिण्यास आज्ञा करावी. तीर्थरूप मातोश्रीचे पायाची प्रकृत आहे त्याप्रमाणें आहे. माझे शरिरीं ज्वराचा उपद्रव होऊन महिना जाहला. हल्लीं औषधी उपाय करून उपशम आहे. कळावें. धोंडजी वाघ म्हणोन निर्माण होऊन पांच हजार फौज जमा करून जालिहाळच्या पलीकडे चार कोसांवर स्वारी करून गुरें घेऊन गेले. याप्रमाणें दंगा पहूंकडून जाहला आहे. यात वडिलांच्या आशीर्वादेंकरून काय परिणाम लागेल

मेले व उठोन गेले. सिवार लष्करचे दंग्यानें गेलें. श्रीमंत मसुरेहून निघोन किन्हईस गेले. त्यास सव्वा महिना जाहाला. त्या दिवसापासून गांवाभोंवतीं दंगा आहे. गांव परागंदा जाहाला. कुळें आलीं नाहींत. घरेंही लुटलीं गेलीं व सिवार लष्करच्या दंग्यानें गेलें. याजमुळें सरकार वसुलास ठिकाण नाहींसा झाला. गांवची दशा राहिली नाहीं. शेवेसीं वि. होय हे विज्ञापना.

---

नं. ७०१३ श्री. (पौष शु. ९-९ जाने.)

पै. छ. ८ सवाल सन खमस मय्यातैन. पौष मास.

[१] श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं.

विनंती. सेवक बाळाजी महादेव दामले चरणांवर मस्तक ठेवून शिरसां नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. ७ सवाल पर्यंत स्वामीचे कृपेंकरून सेवकाचें व कसबें रहिमतपूरचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्री. राजश्री पंतप्रतिनिधि यांचा मुक्काम मौजे कुरोली येथें होता. तेथून मंदवारीं दोनप्रहर रात्रीस कूच करून कसबें मजकूरचे पूर्वेस मौजे आभेरीचे घाटानें बुणगे सुद्धां स्वारी घाटाखालीं उतरली. हें वर्तमान रा. बळवंतराव फडणीस यांस मौजे येळीवचे मुक्कामीं समजतांच गोखले व इकडील फौजसुद्धां सव्या फौजा निघोन मौजे नाहावींचे घाटानें खालीं उतरोन मौजे सापानजीक श्रीमंतांसी फौजेसुद्धां गांठ घातली. तेव्हां श्रीमंतांनीं पायदळसुद्धां फौजेचा गोल बांधोन रहिमतपुरास संभाळीत आले. तों इकडील फौजेनें नेट केला. तेव्हां श्रीमंतांकडील पायदळ आरब वगैरे दोन हजार जमाव एकीकडे जाहला. दोन हजार स्वार सुद्धां श्रीमंत कसबें मजकूरच्या आंबराई जवळून गोळ्या मारीत निघाले. तेव्हां त्यांची यांची झटपट होत होत कसबें मजकूरचे पश्चिमेस [२] श्रीतीरीं मौजे बोरगांव येथें स्वारी पोंचली. तों इकडील फौजेनें नेट भारी केला. नदी उतरावयास फुरसत न होय. तेव्हां बोरगांवांत शिरून गांव रोखून गोळ्या मारूं लागले. फौजेनें गांव चोहोंकडून वेढिला. तेव्हां आंतून बाहेरून चार सहा घटका गोळागोळी जाली. तेव्हां इकडील फौजेचा

---

१ पत्र रहिमतपुराहून मिरजेस. २ श्रीकृष्णातीरीं.

वेढा होता तसाच रविवार प्रहर रात्रपर्यंत फौजा उभ्या होत्या. गांव ओस होता. आंत अन्नपाणी नाहीं. याजमुळें श्रीमंतांनीं सल्ल्याचें बोलणें लावून दीड प्रहर रात्रीचे सुमारास बळवंतराव फडणीस यांजकडे स्वार व पायदळ मिळोन तीनशे लोकांनिशीं श्रीमंत आले. मुक्काम इकडील फौजासुद्धां बोरगांवानजीक जाहला आहे. श्रीमंतांकडील आरब हजार बाराशे रहिमतपूरचा ओढा धरून श्रीकृष्णेपर्यंत गेले. तेथें फौजेनें अडविलें. परंतु आरबांनीं मानिलें नाहीं. आरब निघोन पश्चिमेस मौजे पालीकडे कृष्णा उतरून गेले. त्यांचा पाठलाग कोणीं केला नाहीं. फौजा श्रीमंतांभोंवतालत्या उतरल्या आहेत. श्रीमंतांकडील बाजारबुणगें वगैरे फौज लुटली गेली. ज्यांचीं घोडीं चांगलीं होतीं ते गलबल्यांत पळोन गेले. श्रीमंतांची दौलत लुटली गेली. लूट गोखले यांजकडे फार गेली. श्रीमंतांचा मुक्काम जाहल्यावर मुदबखाकडे सामान भांडीं राहुटयासुद्धां व धोतरें सोवळीं सुद्धां सरंजाम बळवंतराव याणीं दिल्हा. रोजखर्च बळवंतरावजी देत असतात. श्रीमंतांच्या दोघी स्त्रिया खिद्रा किन्हईस आहेत. श्रीमंतांजवळ तेलिणसुद्धां चौघीजणी आहेत. श्रीमंतांस कोणीकडे न्यावयाचें हें अद्याप ठरावांत आलें नाहीं. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ७०१४ श्री. (पौष शु. ११–११ जाने.)

पौ छा ११ सवाल सन खमस.

[१]श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामींचे सेवेशीं. विनंती. सेवक बाळाजी महादेव दामले चरणांवर मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा ९ सवाल पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंत राजश्री पंत प्रतिनिधि व बळवंतराव फडणीस व इकडील फौज व गोखले यांचा मुक्काम मौजे बोरगांव येथें होता. त्यांचें काल तिसरे प्रहरीं कूच होऊन मौजे दुधोंचे मुक्कामास गेले. आज संक्रांत. उदईक कर. दोन मुक्काम होणार. किन्हईस जावयाचा बेत आहे. श्रीमंतांची स्वारी चालती जाहली तेव्हां [२]फऱ्यानें फौजा चालल्या. याजमुळें कसबे रहिमतपूरचा शिवार फार दळवटला. गोखले यांचें म्हणणें श्रीमंतांस पुण्यास

---

१ पत्र रहिमतपुराहून निरजेस. २ फरा = बाजू.

घेऊन जाऊं नाहीं तर आम्हांस मनाचिठी आणोन द्यावी. याप्रमाणें गोखले यांचें बोलणें पडलें आहे. याजमुळें घोटाळा पडला आहे. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ७०१५ श्री. (पौष शु. १३-१३ जाने.)

पौ छा १२ सवाल. सन खमस.

[1]सेवेसीं श्रीधर गोविंद. कृतानेक साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा ११ सवाल पावेतों सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंत राजश्री पंतप्रतिनिधि टकले बोरगांवांत आहेत. भोंवतालीं इकडील फौजेचा वेढा पडला आहे. म्हणून पेशजीं विनंती लिहिलीच आहे. अलीकडे गोखल्यांचें बोलणें जे-पंतांस पुण्यास घेऊन जाण्याविसीं श्रीमंतांची आज्ञा आहे. त्यास आम्हीं घेऊन जाऊं. राजश्री बळवंतराव म्हणतात जे, श्रीमंत प्रतिनिधि आमचे धनी. जवळ चार लहान माणसें मिळोन बखेडा करीत होतीं. तुम्हांस आम्हीं आणलें तें कार्य झालें. आतां ते धनी आम्ही सेवक. त्यास पुण्यास नेऊं देणार नाहीं. तुम्हास स्वारी खर्च चार रुपये कबूल केले आहेत. ते घेऊन माघारे जावें. अशीं बोलणीं पडलीं आहेत. श्रीमंत प्रतिनिधि यांजवळ दोन अडीचशें स्वार आहेत. हल्लीं बोरगांवाहून निघोन किनईकडे गेले. अद्याप हस्तगत कोणाच्याही नाहीं. खर्चास बळवंतराव पुरवितात असें वर्तमान आहे. गोखले व इकडील फौज ही समागमें आहे. इतक्यावर समजेल तें सेवेसीं लिहितों. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७०१६ (पौष शु. १४-१४ जाने.)

उतारा—माधवराव रास्ते यांचें पत्र मुरगोडाहून मिरजेस छ. १२ सवालचें. (सन खमस.)

"होळकरांची व इंग्रजांची डीग भरतपुरावर लढाई जाहली. त्यांत इंग्रजांनीं छापा घालून होळकराचा मोड केला. डीगचे किल्ल्यांत बुणगें सुद्धां हरनाथ होता तेथें किल्ल्यास मोर्चे लाविले आहेत. लौकरच हस्त-

---

१ अष्ट्याच्या कमावीसदाराचें पत्र मिरजेस.

गत होईल म्हणोन सरकारांत इंग्रजांनीं वर्तमान कळवून खुषीच्या तोफा करविल्या व त्यांनींही एकवीस तोफा केल्या. होळकर सडे निघून गेले. त्यांचे मागें इंग्रेजी पलटणें व तुरुकस्वार आहेत."

---

नं. ७०१७ श्रीगणपतिर्जयति. (पौष शु. १४-१४ जाने.)

पौ छा १२ सवाल, सन खमास, पौष मास.

विज्ञापना. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. पंत किनईस गेले. गोखले त्यांस पुण्यास घेऊन जाऊं म्हणतात म्हणून रहिमतपुराहून बाळाजीपंत दामले यांनीं लिहिलें आहे म्हणून लिहिलें तें कळलें. ऐसीयास राजश्री जिवाजीपंत आण्णा यांचें पत्र लष्करांतून आतांच आलें. त्यांत पंत आपण व बळवंतराव फौजेसह टकले बोरगांवाहून दुधीस आलों आहों. गोखलेही लगतच आहेत. पंतास घेऊन जावें हा आग्रह गोखल्यांचा बहुत दिसतो. पंतांचें बोलणें आपली फौज व हीं फौज एक जागां आहों. ते पक्षीं गोखले यांनीं नेण्याची जुरत काय आहे ! आपण सावध असल्यानें त्यांनीं करावयाचें तें काय ! याप्रमाणें लिहिलें आहे. गोखले कलहास प्रवर्तले आहेत. येविषीं वडिलांचे विचारें कसें करावें ते आज्ञा व्हावी. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ७०१८ श्रीगणपतिर्जयति. (पौष शु. १५-१५ जाने.)

पौ छा १३ सन खमास. (सवाल)

अपत्यें [1]चिंतामणीनें शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत. छा १३ सवाल वर्तमान यथास्थित असे. विशेष. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. पंतांचा सरंजाम गोखल्यांस सरकारांतून दिला. राजश्री बळवंतराव यांनीं स्वारीखर्च कबूल करून त्यांस आणिलें. हे दोन मजकूर वडिलीं ऐकिल्याचें लिहिलें तें कळलें. ऐसीयास वडिलीं लिहिलें ही वार्ता येथेंही ऐकली होती. त्याजवरून राजश्री बळवंतराव याजकडील शोध करविला. त्यांचे सांगणेंत आपण या व्यवहारांत शपथ पुरस्कार नाहीं असें आहे. कात्रे यांनीं पांच रुपये खर्चवेंच करून हा कारभार केला. असें

---

१ पत्र सांगलीहून मिरजेस.

तो खरा. सदैव पत्रीं सांभाळ केला पाहिजे. बहुत काय लिहिणें. कृपा करावी हे विज्ञापना.

---

नं. ७००५  ( मार्ग. व. १३–२९ दिसें. )

उतारा–पत्र चिंतामणराव आप्पांचें मिरजेस छा। २६ रमजान सन खमसचें.

" पंतांजवळ पायदळ दोन हजार पर्यंत पैकीं आरब पांच सहाशें व बाकीचे शील रोहिले वगैरे व स्वार हजार पर्यंत इतका जमाव आहे म्हणून बातमींत व कोणी येतात त्यांचे सांगण्यांत आहे. पत्र माघारें पाठवावें. "

---

नं. ७००६  श्रीगणपतिर्जयति. (मार्ग. व. ३०–३१ डिसें.)

पौ छा। २९ रमजान. सन खमास. पौष मास.

अपत्यें चिंतामणीनें[१]  विज्ञापना. तागायत छा। २८ रमजानपर्यंत वर्तमान क्षेम असे. विशेष. लष्करांतून राजश्री जिवाजीपंत आण्णाचें पत्र आलें त्यांत राजश्री बळवंतराव व मातोश्रीस कराडास पोहचऊन लष्करांत आले. पंतांचा मुकाम कुरलीवर आहे. तेथें नगारा वाजविल्याची बातमी आलेवरून कूच करून औंधानजीक कळंबीस आले. इतक्यांत गोखले[२] सापाचे मुकामाहून कूच करून घांट चढून आले. भेटी जाहल्या. त्यांजवळ गणतीचे हजार स्वार होतील. शिवाय पायदळ व तोफा आहेत. पंत कुरलीसच आहेत. पुढें होईल तें लिहून पाठवितों. याप्रमाणें लिहिलें आहे. वडिलांची आज चिठी आली. त्यांतील भाव तिकडे लिहून हुशारीविशीं लिहिलें आहे. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ७००७  श्रीगजाननप्रसन्न.  ( ३१ दिसेंबर. )

पै. छ. ३० रमजान. खमस मयातैन. पौष मास.

शेवेसीं[२] विसाजीराम दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार. विज्ञापना.

---

[१] पत्र सांगलीहून मिरजेस. सुतक होतें म्हणून पत्रांत नमस्कार लिहिलेला नाहीं. ती जागा कोरी सोडली आहे. [२] गोखले. हे बापू गोखल्यांचे चुलत चुलते. पत्र मिरजेस.

ऐ. ले. १५–३१

ताा मार्गशीर्ष वाा ३० पावेतों स्वामींचे आशीर्वादें सेवकाचें वर्तमान मुा लष्करानजीक पुर्सेसावली येथें यथास्थित असे. विशेष. रा. कृष्णाजीपंत बर्वे यांजकडे बाकी सरकारची येणें. त्याचा हिशेब राजेश्री बाबाजी बल्लाळ शिधोरे यांचे विद्यमानें करून चिरंजीवांनीं ठरवून स्वामीकडे पाठविला आहे. येऊन पावेल. श्रीमंत पंतप्रतिनिधि[1] फौजसुद्धां औंधेनजीक कुरोलीस आहेत. आमच्या लष्कराच्या लुगाऱ्यांनीं आजपर्यंत दहा उंट व पन्नास घोडे त्यांच्या लष्करचे आणिले. मोठ्या आडचणींत मुक्काम करून आहे. वसलीचीं पत्रें आज दोन प्रहरीं चेनापट्टणाहून आलीं. त्यांत मजकूर जे, होळकर दरोबस्त बुडाविला. कांहीं बाकी राहिली नाहीं. याजप्रमाणें वर्तमान पत्रीं होतें. वरकड मजकूर काय होईल तो सेवेसीं मागाहून लिहितों. चि. रा. बापूसाहेब यांच्या शरीरीं समाधान आज दोन तीन रोज नव्हतें. अलीकडे औषधी उपाय जाहल्यावरून आरोग्य आहे. एक दोन दिवसांत तलाव्यास निघावें असें आहे. त्यांचा दम लढाई येक घेऊन मग काय तो विचार पहावयाचा याजप्रमाणें आहे. शेवेसीं श्रुत होय. हे विज्ञापना.

---

नं. ७००८ श्रीगणपति. ( पौष. शु. ६–७ जाने. )

पै. छ. ६ सवाल. सन खमास. पौष मास.

अपत्यें [2]रामचंद्रानें चरणांवर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार. विज्ञापना. एथील कुशल तागायत छ. ५ सवाल वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजश्री जिवाजीपंत आण्णा यांजकडे राजश्री सखोपंत काळे गेले होते ते लष्करांतून आतांच आले. त्यांचे सांगण्यांत श्रीमंत पंत आपली फौज पायदळासुद्धां कूच कुरलीहून करून किन्हईस गेले. गोखले जिवाजीपंत व फडणीस आहेत त्या जाग्यावरच मुक्काम करून आहेत. कोण्या मनसब्यावर पंत गेले हा मजकूर काळे यांस समजला नाहीं. हे काल रविवारीं लष्करांतून निघून आले. मशारनिल्हेचे सांगण्यांत पंतांनीं

---

१ चुकीची दुरुस्ती— या ग्रंथाच्या पृ. ७९८४ यावर श्रीनिवासराव भवानराव प्रतिनिधि असें नांव दिलें आहे तें चुकलें आहे. त्या जागीं परशराम श्रीनिवासराव प्रतिनिधि असें नांव पाहिजे. २ पत्र जमखिंडीहून मिरजेस.

जातों म्हणोन सांगोन आपले जमावानिशीं गेले. इकडून कांहीं त्यास उपद्रव लागला नाहीं. तीनशे पठाण नवे बिडाकडून आले असें सांगतात. शेवेसीं कळावें. बहुत काय लिहिणें ? विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ७००९ (४ जाने.)

उतारा—पत्र बाबूराव शिवाजी म्हैसकर यांचें पंढरपुराहून मिरजेस पौष शु. ३ चें. (सवाल स. खमस.)

" चि. सौ. गोपिकाबाईची रवानगी करून माणकेश्वरचे सटवाईस दर्शनास पाठविलें आहे. बरोबर रा. गणेशराम पेठे व बाळाजी आपाजी यास दिल्हें आहे म्हणोन आज्ञा. त्यास चि. सौ. येथें येऊन श्रीक्षेत्रास सुखरूप पावली. रविवारीं निघोन माणकेश्वरास जातों. + + + रा. सखो रुद्र माणकेश्वरापासोन पांच चार कोसांवर मुक्काम करून आहेत. रा. रघोत्तमराव यांस नबाबांनीं तीन करोड रुपये घेऊन सोडिलें. ऐवजाचा भरणा जाल्यानंतर कांहीं कारभारही त्यांजकडे सांगावा असें ठरलें म्हणोन येथें वर्तमान आहे."

---

नं. ७०१० (पौष शु. ३–४ जाने.)

उतारा—पत्र राम. आपांचें मिरजेस छ. २ सव्वाल (सन खमस) शुक्रवारचें.

" पांढरा जमाखिंडीचे ठाण्यांतून चौकीपहाऱ्याचा बंदोबस्त असतां ईश्वरें त्यास मार्ग दिल्यावरून पळोन गेला ! "

---

नं. ७०११ श्री. (पौष. शु. ९–९ जाने.)

पै. छ. ७ सवाल. खमस मयातैन. पौष.

शेवेसीं [1]नारो हरि करंदीकर दोनी कर जोडून सिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. रहिमतपुराहून आज आमचा गडी अस्तमानीं आला. श्रीमंत पंतप्रातिनिधि सोमवारीं मौजे बोरगांव येथें गोखले व श्रीमंत आपासाहेबांकडील फौजेनें वेढा देऊन बोरगांवांत कोंडिलें. इंदुवारीं पंतांस उपोषण

---

[1] पत्र रहिमतपुराहून मिरजेस. करंदीकर हा अनेक वर्षे करवीरदरबारीं पटवर्धनांचा वकील होता.

जालें. गोखले यांणीं ब्राह्मण व भोजनाचा सरंजाम पाठविला. परंतु भोजन केलें नाहीं. नंतर लष्करांत पंतांस आणिलें. गोखले यांजवळ आहेत. मातुश्री काशीबाई लष्करांत आहे. तेलीण सुद्धा सांपडली. आत्र पालीकडे पळोन गेले. वरकड लष्कर लुटलें गेलें. याप्रमाणें वर्तमान गडी पाहून आला. आतां मातोश्री सुद्धां सारें लष्कर कऱ्हाडाकडे येणार. भोमवारीं कूच होणार होतें. कळावें. मी येणार होतों. परंतु गोष्ट उतरली यास्तव विनंती लिहीत आहें. हे विज्ञापना.

---

नं. ७०१२ श्री. (पौष शु. ९–९ जाने.)

पै. छ. ८ सवाल. सन खमस मयातैन. पौष मास.

शेवेसीं विनंती. सेवक [१]बाळाजी महादेव दामले. चरणांवर मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. ७ सवाल पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. कसबें रहिमतपूरचा मजकूर तर तिकडील व इकडील फौजा कसबें मजकूरचे शिवारांतून जुजत गेल्या. त्याणें झाडून शिवारांतील पीक दळवटून गेलें. रविवार एक दिवस शिवाराची दशा कांहीं राहिली नाहीं. लष्करचा मुक्काम शिवारानजीक जाहाला आहे. त्याचे कहीं कब्राडानें वैरण व गहूं हरभरा अगदीं राहिला नाहीं. उपडून नेला. गोखले यांचें लष्कर अनिवार. कैद अगदीं नाहीं. रोज लष्करचे कहीचा रखवालीस स्वार आणून बंदोबस्त करितो. परंतु बेकैदी लष्कर. याजमुळें उपाय नाहीं. गोखले यांजकडील पेंढारी यांचा उपद्रव रात्रंदिवस भारी. शिवाय चोर रानांत माणूस राहूं देत नाहींत. गांवचे वाण्यांचे बैल व कुलवाडी यांचे बैल व गुरें शेंदीडशें पर्यंत गेलीं. पाहिला पंतांनीं गांव लुटिला. त्याजवर सर्वेच इकडील लढाई विघडली. ते समयींही पंतांचा कसाला पडला. त्याजवर हल्लींही दंगा. याजमुळें गांव बुडाला. गांवांत वस्ती जुजबी आहे. काळानें कुलवाडी

---

१ हे अनेक वर्षे रहिमतपुरास पटवर्धनांचे कमावीसदार होते. दामले यांचें घराणें साताराप्रांतीं जमीनदार व सावकार या नात्यानें प्रसिद्ध आहे. बाळाजी महादेव यांचे पणतू गंगाधर बल्लाळ उर्फ नानासाहेब दामले हे रहि. स वास्तव्य करून राहतात.

वर्तमान आहे. पुण्यास धोंडो [1]बापूजीकडे माणसें जावयाचीं आहेत. वडिलीं पत्र पाठवावयाचें असेल तर पाठविण्यास आज्ञा करावी. सविस्तर राजश्री भाऊ दीक्षितास सविस्तर सांगितलें आहे. सविस्तर विदित करतील. बहुत काय लिहिणें ? हे विज्ञापना.

---

नं. ७०१९ श्रीगणपति. (पौष व. १–१६ जाने.)

पौ छा १४ माहे सवाल. सन खमास. पौष.

अपत्यें [2]रामचंद्रानें चरणांवर मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. येथील तागायत छा १४ सवाल प्रातःकाल चार घटका दिवस वर्तमान यथास्थित असे. विशेष. पांढरा अथणींत सांपडला होता. तो त्याणीं राजश्री बाळाजी [3]विष्णु यांचे स्वाधीन जाला. मशारनिल्हेचें पत्र आलें तें पाहण्यास पाठविलें आहे. पाहून माघारें पाठवावें. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ७०२० श्री. (पौष व. ६–२१ जाने.)

पै. छ. १३ जिल्काद. खमस मय्यातैन.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं. सेवक बालकृष्ण हरि कृतानेक साष्टांग नमस्कार. विनंती विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ.१९ साबान पावेतों स्वामीच्या कृपेंकरून मुक्काम श्रीरंगपट्टण येथें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामीकडून पत्र येऊन सेवकाचा परामर्ष होत नाहीं. तर असें नसावें. सर्वदा पत्र पाठवून सेवकाचा समाचार होत जावा. यानंतर जनरल वसलीसाहेब बहादुर येथें आल्यावर पुण्यास येण्याची निकड बहुत होऊन तयारी जाहली होती. इतकियांत हिंदुस्थानांत इंग्रजांकडील लेकसाहेब होळकराच्या पिछावर होते. त्यांची त्यांची लढाई होऊन होळकराचा मोड होऊन तोफा वगैरे सरंजाम पाडाव आल्या. होळकराची फौज अगदीं फुटोन खासा हजार दोन

---

१ हा पुण्याचा पटवर्धनांचा वकील. २ पत्र जमखिंडीहून मिरजेस. ३ उपनांव सहस्रबुद्धे.

ऐ. ले. सं. १५–३२

हजार स्वारांनिशीं पळोन गेला. याप्रमाणें पत्रें आलीं. त्यावरून यांच्या निघण्याची स्थिरता जाली. प्रस्तुत कांहीं निघावयाचा बेत दिसत नाहीं. इकडून पत्रें श्रीमंत राजश्री आप्पासाहेब यांजकडे वरचेवर जात आहेत. त्यांतील वर्तमान स्वामींस कळतच असेल. शेवेसीं श्रुत होय ही विज्ञापना.

---

नं. ७०२१ श्री. (नक्कल.) (पौष व. ९–२४ जाने.)

छ. ३० सवाल. भृगुवासर. खमस मय्यातैन. मु. तासगांव.

सेवेसीं बालकृष्ण हरि कृतानेक साष्टांग नमस्कार. विज्ञापना. ता छ. २२ सवाल पावेतों मुा श्रीरंगपट्टण येथें स्वामीच्या कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं छ. २८ साबानचीं व छ. ५ सवालचीं पत्रें पाठविलीं तीं छ. २० सवालीं पावलीं. करवीरकर यांचा शिलशिला चुकत नाहीं. इकडील आइतवड्यास त्यांनीं ठाणें घातलें. मिस्टर इस्त्रंचीसाहेब यांच्या बोलण्यांत करवीरकर यांचा उपद्रव लागणार नाहीं असें असतां उपद्रव चुकत नाहीं येविशींचा बंदोबस्त करणें व इस्त्रंचीसाहेब यांस पत्र लिहिलें आहे. तुमचे शरीरीं आरोग्य होऊन जाणें जाल्यास उत्तम. नाहीं तर पत्र पाठऊन देणें. रा रामचंद्र आपाजी याजकडे आडूर वगैरे माहालाचा ऐवज येणें. त्याविशीं मशारनिल्हेस इस्त्रंचीसाहेब यांचीं पत्रें घेऊन तो ऐवज उगवे असें करणें. मागें पडूं नये म्हणोन आज्ञा. त्यास चित्रदुर्गच्या मुक्कामाहून पत्रें पट्टणास जनरेलसाहेब यांस पाठविलीं आहेत म्हणोन पेशजीं विनंती लिहिली होती. त्या पत्राचें उत्तर येथें यावें म्हणोन येतांच येथें निघोन आलों. भेट होऊन मिस्टर इस्त्रंचीसाहेब यांस पत्र आलें होतें. तेंच जनरेल यांस दाखऊन विनंती केली जे, मिस्तर येऊन कितीयेक बोलणीं जालीं आहेत तीं आपलींच बोलणीं. त्याप्रमाणें आपण निभावलें पाहिजे. हें पत्र आलें हें ध्यानास आणोन जाबसाल व्हावे. तेव्हां त्याणीं सांगितलें, करवीरकर यांस परभारें लिहितों. अडूरच्या ऐवजाविशीं रा रामचंद्रपंत यांस पत्र देतों हें तुमचे जासुदाबरोबर पाठऊन द्यावें. मशारनिल्हे काय म्हणतात हें समजेल. त्यासारखें करावयास येईल. पुण्यास जावयाचें त्यास पत्रें आल्यावर जावयाचें करावें. तोंपावेतों स्वस्त असावें.

याप्रमाणें सांगितलें. रा रामचंद्रपंत यांस पत्र दिलें तें जासूदजोडीबरोबर आडूर येथें रा बळवंतराव जोग यांजकडे पाठऊन याबरोबर येक कारकून देऊन पत्र पावतें करवून उत्तरें प्रत्युत्तरें काय देतात तीं लिहून पाठऊन कारकुनानें तेथें राहावें असें लिहोन पत्रें पाठाविलीं आहेत. त्याचें उत्तर काय येतें तें समजोन यांचे श्रवणीं घालतों. श्रीमंत रा बाबासाहेबांचें पत्र सूतरस्वाराबरोबर कुंदगोळच्या मुक्कामाहून आलें होतें. हांपीविरूपाक्षदर्शन घेऊन श्रीरामेश्वराची यात्रा करून श्रीगोकर्णेश्वरची यात्रा करून यावें असें आहे. त्यास मार्गाचीं दस्तकें करून पाठवावीं असें लिहिलें होतें व श्रीकाशीच्याही मार्गाचेंही दस्तक पाठवावें म्हणोन लिहिलें. त्याजवरून रामेश्वर व गोकर्णेश्वरच्या मार्गाचीं दस्तकें दोन, एक इंग्रजी व एक म्हैसूरच्या राज्याचें येणेंप्रमाणें दोन दस्तकें व श्रीकाशीच्या यात्रेचें दस्तक पाहिलें घेतलें होतें तें अशीं तीन्ही दस्तकें व पत्राचें उत्तर देऊन पाठविलीं व स्वामीकडे पत्रें व जनरेलसाहेब यांचें पत्र थैलीसह येणेंप्रमाणें सूतरस्वाराबरोबर पाठविलीं आहेत. श्रीमंत रा बाबासाहेबांकडून स्वामीकडे येतील. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७०२२ श्री. (पौष व. ११–२६ जाने.)

पै. छ. २ जिल्काद. सन खमस मयातैन.

विज्ञापना. तागायत छ. २४ सवाल मंदवार प्रातःकालपावेतों सुखरूप असे. विशेष. कर्णेलसाहेब यांची बदली होऊन त्याचे मोबदल्यास येथील वकिलीवर कलकत्त्याहून दोन गोरे आले. त्यांत मुख्य आहेत त्यांचें नांव कप्तान सेडिघम व दुसरे आहेत त्यांचें नांव मेजर ग्राम. येऊन आठ दिवस झाले. छ. २० रोजीं सरकारचे वाड्यांत आले. श्रीमंतांची भेट जाली. सरकारांतून नवे आले त्यांस वस्त्रें जवाहीर व हत्ती एक दिल्हा. पहिले होते त्यास [1]रुकसतीचीं वस्त्रें सहा असामींस जालीं. कंठ्यांतील घोस दिला व शिरपेंच पांच आसामींस व एकास वस्त्रेंमात्र याप्रमाणें देऊन अस्तमानीं निरोप झाला. छ. २१ रमजानीं राजेश्री सदाशिवपंत भाऊ इंग्रजांकडे गेले. स्वारीबराबर शंभर राऊत

---

१ रुकसत = निरोप.

दोन हत्ती जिलबेस व एक अंबारीचा. अंबारींत बसून गेले. तेथें दिवाण यांस वस्त्रें जवाहीर इंग्रजांनीं दिल्हें. छ. २२ रोजीं इंग्रज भाऊकडे मेजवानीस आले होते त्याणीं वस्त्रें जवाहीर दिल्हें. काल छ. २३ रोजीं दोनप्रहरीं पलटणांत दहा पंधरा तोफांचे बार झाले. बंदुकीच्या सिलका सुटल्या. खुशाली जाल्यास एकवीस तोफा सुटतात. तसें जालें नाहीं. डीगचा किल्ला जाटांचा इंग्रजांनीं घेतला म्हणोन बातमी आली. इंग्रजांचे घरची याप्रमाणें वर्तमान आहे. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ७०२३ श्री. (पौष–जाने.)

उत्तरेकडील वर्तमान. राजश्री यशवंतराव होळकर व इंग्रज यांची लढाई छा १३ सवालीं जाहली. इंग्रजांचा नाश बहुत जाहला. इंग्रजांनीं तहाचें बोलणें शामतखान व हरनाथ यांचे विद्यमानें लाविलें. उभयतांही फितुरांत होते. शामतखान डीग व कुंभेरी यांच्या दरम्यान गढी होती तेथें होता. राजश्री यशवंतराव होळकर यांस खान मजकूर यांनीं मेजवानीस बोलाविलें. त्याजवरून हजार खासा घेऊन होळकर गेले. पांचशें लोक बाहेर ठेऊन पांचशेंनिशीं गढींत गेले. इंग्रज बावीस कोसांवर होते. त्यांस इशारा केला. गढींत गेल्यानंतर होळकर व खान यांचें बोलणें होतच आहे तों इंग्रजांचीं पलटणें दोन दरवाज्यांजवळ येऊन पोहोचलीं. होळकर याणीं पलटणें यावयाचें प्रयोजन काय म्हणोन, विचारलें. तेव्हां उडऊन गोष्ट सांगूं लागले. इतक्यांत खासा होळकर यांनीं तरवारीचा वार चालऊन शामतखान यास ठार मारिला आणि गढींतून बाहेर निघाले. तों इंग्रज यांनीं दोन तोफांचे बार छऱ्यानें केले. तेव्हां होळकराकडील पन्नास असामी कामास आले. होळकर खासा फौजेंत जाऊन इंग्रजी पलटणें चार कापून काढलीं. हरनाथ याचे पायांत बेडी घातली. इंग्रजांचीं सहा पलटणें कुंभेरीनजीक आहेत. त्यांस आसपास चौकी दिली आहे. राजश्री दौलतराव शिंदे गेले. तेथून कुटुंबासह होळकराकडे गेले. आजपर्यंत भेटी जाहल्याच असतील. होळकराची चाळीस पन्नास हजार फौज कलकत्तेकडे गेली आहे म्हणून तिकडीलही वर्तमान आहे. तें एका गृहस्थानें सांगितलें.

---

नं. ७०२४ श्री. ( पौष–जाने. )

विज्ञापना. नागपुराहून वैद्यांचीं पत्रें आलीं. त्यांत वर्तमान लिहिलें आहे कीं फाल्गुन शु॥ पंचमीस भरतपुरावर लढाई जाहली. यांतील कारण होळकर याजकडे पलटणें आहेत. त्यांणीं इंग्रजांकडे संधान लाविलें कीं, आम्ही तुम्हाकडे निघून येतों. तुम्ही आम्हावर चालोन यावें. आम्ही वायबार काढतों. आम्हाकडील तोफा येऊन घेऊन जावें. याप्रमाणें अगोदर बात करून पंचमीचे दिवशीं इंग्रजांकडील चार पलटणें होतीं तीं झाडून या पलटणावर चालोन आलीं. होळकराकडील पलटणांनीं वायबार टाकिले. तेव्हां त्यास प्रमाण वाटलें. नंतर नीट चालोन घेतलें. जवळ गोळीच्या माऱ्यांत इंग्रजांकडील तीन पलटणें आलीं. तेव्हां इकडील लोकांनीं तोफांतून छऱ्यांचे गोळे व रेजगण खुर्दा असें भरून ठेविलें होतें. जवळ येतांच येकायेकीं भरबार सोडिले. त्याजमुळें इंग्रजांकडील नासाडी बहुत जाहली. तेही मजबुतीनें आले होते. दोनप्रहर लढाई जाहली. इंग्रजांकडील तीन पलटणें गारद जाहलीं. बाकी एक पलटण राहिलें तें पळोन आसरेस गेलें. त्या दिवशीं फौजेशीं गांठ पडली नाहीं. इंग्रजांकडील पलटणें पडलीं, हें वर्तमान लखनौस जमाव होता तेथून दहा पलटणें चालोन लढाईच्या इराद्यानें आलीं. हें वर्तमान होळकर व जाट यांस समजलें. हेही उभयतां जमीयतीनिशीं चालून गेले. लढाईची सुरवात जाहली. परंतु त्या दिवशीं इंग्रजांपुढें फौज ठरली नाहीं. मागें आली. दुसरे दिवशीं चालून गेले. त्या दिवशीं काट चालला नाहीं. मागें ठेऊन जाटांनीं आपले जागीं निश्चय करून आज चालोन जावें, त्यांस मारावें किंवा आपण मरावें असा निर्धार करून निवड वीस हजार फौज घेतली. आणि होळकर यास सांगून पाठविलें आम्ही अशा निश्चयानें जातों. तुमची मर्जी असेल तसें करावें. तेव्हां याणींही निश्चय जाटांप्रमाणें करून समागमें निवड करून फौज नेली. दोन्ही फौजा दोनी बाजूनें उभ्या राहिल्या. जाटांनीं अगोदर चालून घेतलें व होळकरांनीं घेतलें. ते समई इंग्रजांनीं बारांची शर्त करून दिली. परंतु फौजांनीं मानिलें नाहीं. पलटणांत जाऊन नंतर सरमिसळ जाहली. नंतर पाईचे माणसांचा विचार घोड्यापुढें कळतच आहे. दहा पलटणें आलीं त्यांपैकीं दोन पळोन मागें गेलीं.

बाकीच्यांचा संहार जाहला. जाटांकडील चार हजार घोडा पडला व होळकराकडील सहा हजार. शिवाय माणूसही बहुत पडलें. परंतु उभयतांनीं यश संपादिलें. भरतपुरानजीक इंग्रजांची जामियत राहिली नाहीं. सिंदे नरवरावर गेले. लौकरच भेटी होतील. याप्रमाणें मज़कूर लिहिला आला. वाडिलांस कळावें म्हणून लिहिला आहे, विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ७०२५ श्रीम्हाळसाकांत. (माघ शु. ७–६ फेब्रु.)

श्रीमंत राजश्री पंतप्रतिनिधि साहेबांचे सेवेशीं.

सेवकाचा कृतानेक दंडवत. विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ. ५ जिल्काद पावेतों वर्तमान यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लेखन केलें पाहिजे विशेष. अलीकडे बहुतां दिवसां पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं त्यास वरचेवर पत्र पाठवून संतोषवीत जावें. यानंतर तिकडील वर्तमान राजश्री गोविंद शिवराम याजकडून समजलें त्याजवरून सेवेशीं विनंती लिहिली आहे. त्यास आजपर्यंत हिंदुराज्य सर्वत्रांनीं एकदिल राहून चालविलें. अलीकडे ज्याचे त्याचे दौलतींत घरकलह होऊन राज्यास विपर्यास पडोन हिंदुधर्म नाहींसा होण्यास मूळ जालें. त्याचें छेदन करण्यास सर्वत्र एकदिल जालें पाहिजे. तरच मुळाचें छेदन होऊन स्वधर्माचार पूर्ववत्प्रमाणें चालोन हिंदूंची कायमी राहील. इकडील क्रम जो आरंभिला आहे हाच यावद्देह चालवावा ( असें मनांत आहे ). यांत परमेश्वर अनुकूल होऊन जें घडवील तें खरें ! परंतु एकानेंच असा प्रकार करून सर्वत्रानीं तमाशे पाहून आपापली दौलत संभाळून असावें यांतील परिणाम कसा हें मनीं विचारून ज्यांत हिंदुधर्मांची कायमी व परिणामास नीट तें करावें. याचा विचार तुम्हांसारख्यांनीं न केला तरी दुसरे कोण करतील ! वरकड मजकूर येथून कारकून हुजरे पाठविले आहेत: यांचे सांगितल्यावरोन लक्षांत येईल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.[१]

---

१ हें पत्र इंग्रजांशीं लढाई सुरू असतांना होळकरानें परशराम श्रीनिवासराव प्रतिनिधि यांस लिहिलेलें आहे. याच अर्थाचीं होळकराचीं आणखी तीन पत्रें ' मळा दप्तरांत ' आहेत. पैकीं (१) गंगाधरराव गोविंद यांस, (२) दुसरें

नं. ७०२६  श्री.  (माघ शु. २–१ फेब्रु.) (नकल.)

पौ छ. ३० सवाल. भृगुवार.

विज्ञापना. शिंद्याकडे वेफसाहेब होते ते मृत्यु पावले. त्याजवर कर्णेल कलुप साहेब शिंद्याकडे गेले आहेत. तेथील बंदोबस्त करून लौकरच पुण्यास येणार. हालीं वैरणसाहेब म्हणोन आहेत त्यांस पत्र पाठवावें म्हणोन लिहिलें. त्यास पत्राविशीं विनंती केली आहे. उत्तर आलें नाहीं. आणखी येक वेळ विचारून पत्र जाहाल्यास डाकेवरून पाठवितों. जनरेल या मार्गें पुण्यास जाण्यास आल्यास तुम्ही बरोबर येतच आहां. योग बनल्यास समक्ष भेटूं अथवा सरदेस आल्यास चालते थबल्याचीं पत्रें तुमचीं येतील. तेव्हां विस्तारयुक्त बोलण्याविशीं लिहून पाठऊं. त्याप्रमाणें बोलणें आमलांत आणणें. रा। गोविंदराव यांस पत्र लिहिलें आहे. पावतें करणें. सारांश, जनरेल व कर्णेल व इस्तरंचीसाहेब तिघे इकडील जाबसालास माहीत. त्यास तिघे तिहींकडे जाहले. याजकरितां ईश्वर इच्छेनरूप घडेल तें प्रमाण. जनरेल व मलकनसाहेब यांस पत्रें पाठवावीं म्हणोन लिहिलें. त्यास तुम्ही पट्टणास गेल्याचें अथवा तेच इकडे येण्यास

---

टीप पृ. ८२२६ वरून चालू.

आप्पाजीराव पाटणकर यांस, ( ३ ) तिसरें राजश्री समस्त मानकरी हुजरात गोसावी यांस. इ. स. १९१८ सालीं कै. तीर्थरूपांनीं कै. तात्या केळकर यांच्या 'मराठे व इंग्रज' या ग्रंथास उपोद्घात लिहिला आहे. त्यांत या पत्राचा उतारा पृ. ९ वर घेतलेला आहे. या ग्रंथाच्या पृ. ७९८८ यावरही आम्हीं या पत्राचा उतारा छापला आहे. या उताऱ्यावर टीप देतांना "हें पत्र होळकरानें परशरामपंत प्रतिनिधींस लिहिलेलें आहे, असें उतारा देतांना कै. तीर्थरूपांनीं लिहिलें आहे तें मात्र चुकलें आहे. हें पत्र श्रीनिवासराव भवानराव प्रतिनिधि यांस होळकरानें लिहिलें आहे." असें आम्हीं विधान केलें आहे. आमचें हें विधान सपशेल चुकलें आहे. या बाबतींत कै. तीर्थरूपांची कांहींच चूक झालेली नाहीं. हें पत्र श्रीनिवासराव उर्फ भवानराव प्रतिनिधि यांस लिहिलेलें नसून तें त्यांचे चिरंजीव परशराम श्रीनिवासराव यांस लिहिलें आहे ही गोष्टच खरी आहे.

चालते जाहल्याचें तुमचें लिहिणें येतांच पत्रें पाठवितों. कर्णेलास करवीरकर यांणीं गैरवाखा लिहिल्यावरोन त्यांचें पत्र आल्याचें व आपण उत्तर लिहिल्याचें व मागतीं त्याचें पत्र दोहीं पत्राच्या नकला इकडे पाठविल्या आहेत. ते त्या मार्गे येणार. त्यासी बोलावें म्हणोन आल्याचें वगैरे सविस्तर लिहिलें तें कळलें. जनरेल याची तूर्त पुण्यास येण्याची स्थिरता दिसते. येणें जाहल्यास मी समागमें आहेंच. सरदेस आल्याचें व येथून चालते जाहल्याचें लिहिलें. त्याप्रमाणें स्वामीचें येणें होऊन समक्ष बोलणें जाहल्यास उत्तमच जाहालें. नाहीं तर मला आज्ञा येईल त्याप्रमाणें मी बोलोन लिहीन. रा गोविंद रावजी यांस पत्र पाठविलें तें चित्रदुर्गास मशारनिल्हेकडे पाठाविलें. मशारनिल्हे चित्तदुर्गी चिरंजीवाच्या लग्नाकरितां राहिले आहेत. लग्न करोन माघ वद्यांत अथवा फाल्गुन शुद्धांत येतील. तिघे तिहींकडे जाले हें खरेंच. त्यांपैकीं इस्त्रंचीसाहेब लांब गेले, ते कांहीं इकडे यावयाचे नाहींत. कर्णेल लौकरच येणार असें यांचेही सांगणेंत आहे. हे आहेतच. परंतु लांब आहेत. तूर्तच तिकडे येण्याचा रंग दिसत नाहीं. याजकरितां इकडून थैली सूतरस्वाराबरोबर श्रीमंत रा बाबासाहेबांकडे पाठविली आहे. तिकडून स्वामीकडे येईल. त्या पत्राचें उत्तर व इस्त्रंचीसाहेब याचें बोलणें जाहाल्याचें व कामकाजें होणेचें वगैरे विस्तारपूर्वक पाठवावें व मलकणसाहेबही पहिल्यापासून माहीत आहेत. त्यांस पत्रें थैलीसुद्धां पाठवावें. पत्रें येतील तीं माना नीट लिहून सलाम लिहीत जावा आणि गौल्यता नीट पत्रांत असावी. थैल्या चांगल्या व अपसानी कागद याप्रमाणें पत्रें येत जावीं. येथें कोणाकोणाचीं पत्रें आलीं त्यांच्या चौकशा पडल्याकरितां लिहिलें. तरी लिहिण्यांत यथास्थित असावें. पत्रें डाकेवर तासगांवीं दिलीं असतां येथें पैका देणें पडतो. हालीं पत्रें आलीं. याचे नऊ फुलम सांगत आहेत. याजकारितां तेथें पत्रें देऊं नयेत. जासुदाबरोबर येडूरच्या बातेरींत साहेब आहे त्याजकडे पत्रें पाठवीत जावीं म्हणजे ते इकडे पाठवतील व इकडून पत्रें येतील तीं स्वामींकडे पाठवतील. सदर्हूअन्वयें त्यांसही लिहिलें आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७०२७ श्रीगणपतिजयति. (माघ शु. २-१ फेब्रु.)

पौ छा १ जिलकाद. सन खमस.

तीर्थस्वरूप राजश्री काकासाहेब वडिलांचे सेवेशीं.

[1]अपत्यें चिंतामणीनें शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा ३० सवाल वर्तमान यथास्थित असे. विशेष. दुधीहून कूच जाहलेवर गोखले तेथून निघून पुण्यास जावयास गेले. पंतांचे स्वारीसमागमें राजश्री जिवाजीपंत आण्णा सडे तीन चारशें लोकांनिशीं व बळवंतराव फडणीस असे मसुरेस आले. दोन तीन दिवस जाहले. राजश्री अंताजी हरि कानिटकर फौज बुणगें सुद्धां मागें होते. ते काल देवरआष्टयास आलेचें पत्र आज भृगुवारीं अस्तमानीं आलें. आण्णांनीं कांहीं आरब व स्वार शिराळें तालुकेंतील कासेगांव वाटेगांव येथील पन्हाळकरांचे लोक उठऊन बंदोबस्त करावयाकरितां पाठविले आहेत. त्या बातमीवर पनाळकराकडील पेदेखान तीन चारशें पायदळ व शेंदोनशें स्वार इतकेनिशीं पेठ नेरल्यावर आल्याची बातमी कानिटकर यांजकडून आजच आली. त्याजवरून इकडील जमावांत सूचना करण्याविशीं व कांहीं पेंढारी तिकडे पाठविण्याविसीं अंताजीपंतास लिहिलें आहे. सुरसुभ्याकडील जमाव पाच्छापुरास शह देऊन रामचंद्र आप्पाजी बसले होते त्यांजवर [2]पनाळकराकडील कांहीं जमाव व जांबोटकर व बेळगांवकर एक होऊन छापा घालून लुटल्याचें वर्तमान आहे व कांहीं जमाव नणदी करोलीवर आला. चिंचणीचे गुळें होऊन अलीकडे येऊं लागले म्हणून मोलवाडकरांनीं लिहिलें आहे. सविस्तर वाडिलांस विदित व्हावें म्हणून विनंती लिहिली आहे. शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७०२८ श्रीगणपतिर्जयति. (माघ शु. १५-१३ फेब्रु.)

पै. छ. १३ जिलकाद. सन खमास मयातैन. माघ मास.

तीर्थस्वरूप राजश्री काकासाहेब वडिलांचे शेवेसीं.

---

१ पत्र सांगलीहून मिरजेस. २ करवीरकर.

ऐ. ले. सं. १५-३३

[1]अपत्यें चिंतामणीनें. शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. १२ जिलकादपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. रविवारीं सांगलीहून कूच करून बुरलीस आलों. तेथून इंदुवारीं प्रातःकाळीं कूच होऊन बुणगें चालतें जालें. इतकेंत पर्जन्य पडूं लागला. तो मध्यरात्रीं-पर्यंत एकसारखा बहुत लागला. बुणगें मागें जागजागां राहिलें. अस्तमान जाला. मग वडगांवास मुक्काम करून काल भोमवारीं कऱ्हाडास आलों. [2]मातुश्रीची भेट जाली. मंडळीसह भोजनास वाड्यांतच यावें म्हणोन सांगितल्यावरून भोजन तेथेंच जालें. आज राजश्री बळवंतराव फडणीस याणीं आपले घरीं बोलाविलें आहे. मार्गीं पर्जन्य बहुतच लागला. थंडीनें चार पांच माणसें मेलीं. कोण कोणाकडील याचे शोधास पाठविलें आहे. बुणगें मागें राहिलेलें काल अस्तमानीं एथें येऊन पोंचलें. [3]पनाळे·कर प्रकरणीं कलमबंदीचे यादीविसीं राजश्री बापूजी केशव जोशी यांजबरोबर आज्ञा आली होती. त्याजवरून यादीची नक्कल पाठविली आहे. शेवेसीं विदित होय. हे विज्ञापना.

---

नं. ७०२९ श्री. (माघ व. ३–१६ फेब्रु.)

पौ छ. १५ जिल्काद. सन खमस.

[4]सेवेशीं धोंडो अनंत सा. न. वि. तागायत. ११ जिल्काद पावेतों स्वामींचे कृपेंकरून यथास्थित असे. विशेष..... सध्यां तांदुळांची धारण सव्वा पायली दीड पायलीची आहे. जोंधळे दोन पायली मिळावयाचे कठीण पडतें. हरबरे सव्वा पायली. याप्रमाणें दर आहे. दिवसेंदिवस धारण महाग होत्ये. गूळ तीन रुपयांनीं मण आहे. कळावें. बहुत काय लिहिणें. हे विज्ञापना.

---

नं. ७०३० श्री. (माघ व. ८–२२ फेब्रु.)

पौ छा २१ जिलकाद. सन खमस. माघ मास.

---

१ पत्र सांगलीहून मिरजेस. २ पंतांची मातुश्री काशीबाई. ३ करवीरकर. ४ पत्र पुण्याहून कारकुनाचें मिरजेस.

[1]विज्ञापना. दुधीचे मुक्कामीं गोखल्याणीं पंतांस नेऊं म्हणून आड घातला होता. तेव्हां राजश्री बलवंतराव यांणीं पुण्याचीं पत्रें आणऊन गोखले यांस कांहीं ऐवज देऊन लाऊन दिलें. त्याप्रमाणें यांची रवानगी करावी या बेतांत आहेत. पुण्यास कारकून गेला आहे. तो येण्याचा मार्ग पाहातात. पंताचे बंदोबस्ताचा प्रकार कोणे प्रकारें करणें तो इकडील इतल्यानें व्हावा असें म्हणणें आहे. बलवंतराव यांचें म्हणणें आम्ही पाहिजे त्या गोष्टीनें करूं. याणीं त्यांत चित्त घालूं नये असें आहे. यास्तव पुण्याचीं पत्रें वकिलांचीं आणविलीं त्यांचा मार्ग पहातात. विदित होय. हे विज्ञापना.

---

नं. ७०३१  श्री.  (माघ व. ८–२२ फेब्रु.)

पौ छा २३ जिलकाद. सन खमस.

सेवेसीं विनायक[2] विश्वनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा २१ जिलकाद भृगुवार प्रातःकालपावेतों मुक्काम कराड वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं छा १८ मिनहूचें पत्र पाठविलें तें काल पावलें. येथील जाबसाल. राजश्री बळवंतराव याजकडील श्रीमंत राजश्री आप्पासाहेबांनीं आपलेकडील ऐवजाचे उलगड्यांत आणिलें. बळवंतराव यांस ओढ फार. यास्तव एक लक्ष पांच हजार रुपयेवर उलघडून घेतलें. रहिमतपूरचा जाबसाल आहेत ते तूर्त उरकत नाहीं. ह्याच भरणा होणें कठिण. रहिमतपूरचा उलघडा तूर्त होत नाहीं असें बळवंतराव याणीं निखालस सांगितलें. सबब आप्पासाहेबांनीं सांगितलें जे, आम्हास कळेल त्याप्रमाणें रहिमतपूरचा स्वाल जाब करून घेऊं असें बळवंतराव यांस सांगितलें आहे व येविसी पंतांकडील गांवच्या बोली धरून न्यावयाच्या म्हणोन मला सांगितलें आहे. आज येथून कूच जाहलें. खासा सडेनिशीं जकात वाडीस जाणार. स्वशुर येथें बोलावण्याकरितां आले होते. यास्तव सडेनिशीं मेजवानीस जाणार. श्रीमंत राजश्री [3]बापूसाहेब फौज बुणगें सुद्धां कृष्णा दक्षिण तीरानें सांगलीस येणार. खासे दोन तीन

---

१ अष्टयाच्या कमावीसदारांचें पत्र मिरजेस. २ उपनांव चाफेकर. पत्र कऱ्हाडाहून मिरजेस. ३ चिंता. आपांचे धाकटे बंधु विठ्ठलराव बापू.

रोजीं येऊन लष्करांत मिळतील असा बेत आहे. सेवेसीं विदित होय. हे विज्ञापना.

---

नं. ७०३२ श्री. (माघ व. ९–२३ फेब्रु.)

पै. छ. २२ जिल्काद. सन खमस मय्यातैन.

राजश्री गंगाधरराव गोसावी यांसी

५ प्रती मातुश्री राजकुवरबाई सावंत भोसले सरदेसाई प्रांत कुडाळ महालानिहाय दंडवत विनंती. उपरी. येथील कुशल तागायत छ. २१ जिल्काद पावेतों वर्तमान यथास्थित जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. आम्ही वाडीहून हरोलीस येऊन आठ दिवस जाले. कांहीं दिवस राहणार यास्तव आपणास कळवावयाकरितां लिहिलें आहे. आपणाकारणें पंखे वगैरे जिन्नस पाठविला आहे बितपशील—

| | |
|---|---|
| २ पंखे [1]सुमार. | २ विंझण सुमार. (एक प्रकारचे पंखे.) |
| २ खडाव सुमार. | १ दशावतारी गंजिफा. |
| ४ | ३ |

येणेंप्रमाणें पाठविले आहेत. घेऊन उत्तर पाठवून द्यावें. आम्ही आपल्या जिल्हेंत आलों. सर्व सांभाळ करावा. आमचे राज्याचा बखेडा जाला. हें परस्पर ऐकिलेंच असेल. यास्तव येथें येणे प्राप्त जालें. वरचेवर पत्र पाठवून सांभाळ करीत असलें पाहिजे. बहुत काय लिहिणें. लोभ करीत असलें पाहिजे हे विनंती.

---

नं. ७०३३ श्रीगजानन. (माघ व. १४–२८ फेब्रु.)

पै. छ. ८ जिल्हेज. खमस मयातैन. फाल्गुन.

सेवेसीं [2]विसाजी राम गोखले. कर द्वयें जोडून साष्टांग नमस्कार. विज्ञापना. ता। छ. २७ जिलकादपर्यंत स्वामीचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान मुकाम मौजे पळसीनजीक तीन कोस रा. पाराशरपंत यांचा इनाम गांव मौजे साकूर क्षेम असे. विशेष. इकडील मजकूर भिल्लाण होऊन सरकार

---

१ सुमार = नग. २ हे बापू गोखल्यांचे चुलते. पत्र मिरजेस बाळासाहेबांस.

तालुक्यास उपद्रव भारी जाला. त्याजमुळें श्रीमंतांनीं इंग्रजांचें पलटण एक व गोखले यांजकडील हजार स्वार कांहीं पायदळ यांची नेमणूक जाली. त्याजवरून कर्णेल कलनसाहेब एक पलटण सुद्धां व गोखले याजकडील स्वाराबरोबर माझी नेमणूक होऊन मुक्काम मजकुरीं आलों. येथून भिल्ल आठ कोसांवर आहेत. एकंदर भिल्लांचा जमाव आरब शीदी वगैरे इरसाल मिळोन पांच हजार जमाव आहे. त्यांत भिल्ल दीड हजार सुमार आहे व आरब सिद्दी मिळोन. तीनशें सुमार आहे. बाकी गांवगुंड मिळोन आहेत. डोंगर कटारी मुलखांतून नदीचे दरे मातबर आडचणीची जागा पाहून उतरले आहेत. उत्तरेकडील मजकूर केवळ आटोप्यांत आला असें नाहीं. चिरंजीव राजमान्य राजश्री बापूसाहेब यांचें लग्न माघ वा। ६ येक जाहलें. दुसरें फाल्गुन शु॥ द्वितीयेस होणार म्हणोन पुण्याहून पत्रें आलीं त्यांत लिहिलें होतें. सर्व प्रकारें स्वामीचे गर्भवासी आहों. सांभाळ करणें स्वामीकडेस आहे. शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७०३४ श्रीगणपति. (फाल्गुन शु. १४–१४ मार्च.)

छ. १२ जिल्हेज. खमस मय्यातैन. फाल्गुन.

[१]विज्ञापना. ऐसीजे. येथें एकानीं असें सांगितलें कीं, विजेदुर्ग येथें व रत्नागिरीस सोलापुराप्रमाणें कारस्तान चाललें आहे. याप्रमाणें सांगितलें. सत्य मिथ्या ईश्वर जाणे. उद्योग करवीराहून आहे. सांगणारानें खरेंच आहे म्हणोन सांगितलें. हे विज्ञापना.

---

नं. ७०३५ श्री. (फाल्गुन व. १–१६ मार्च.)

पै. छ. २६ जिल्हेज. खमस मय्यातैन व अल्लफ. फाल्गुन मास. सौम्यवार.

सेवेशीं साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. १४ जिल्हेज पावेतों स्वामीचे कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील

---

१ पत्र तासगांवाहून गणपतराव परशराम यांचें बाळासाहेबांस मिरजेस.

वर्तमान तरी श्रीमंत राजश्री [1]रावसाहेब गोंडवणपरियंत गेले. तेथें सिंदे बहादूर यांजकडील पेंढार येऊन रावसाहेबांची चीजवस्त वगैरे नगदी व जवाहीर झाडून सलतनतसुद्धां लुटलें. खासा रावसाहेब चार स्वारांनिशीं नागपुरास आले. भोसले सामोरे जाऊन शहरांत आणून राजश्री विठ्ठलपंत बक्षी यांचे वाड्यांत राहावयास जागा देऊन वीस हजार रुपये खर्चास वगैरे सरंजाम दिल्हा. याप्रमाणें रावसाहेब यांची अवस्था जाहली. ही करनेल कलुस याणें ऐकून करनेल नागपुरापासून आठ कोश देवळगांवास होते. तेथून नागपुरास येऊन राहिले. चौदा रोजांचा सूतरस्वार येथें आला. त्याजबरोबर भोसल्यांचे कागदपत्र आले. त्यावरून लिहिलें आहे. राजश्री कासीराव होळकर जीवलालासिंग याजपासीं कैदेंत होते. त्यास जिवलालसिंग यानें कासीराव होळकरसुद्धां महेश्वरास जाऊन तेथें चार सहा हजार फौज ठेऊन बारा पंधरा हजारांचा जमाव करून इंग्रजांकडील दोन पलटणें व गाईकवाड यांजकडील बाराशें स्वार याप्रमाणें नवलाईवर मुक्काम करून होते. त्यांवर जीवलालसिंग कासीराव सुद्धां फौज घेऊन चालून गेले. तेथें लढाई मोठी जाहली. कासीराव याणीं हावद्यांतून उडी टाकून घोड्यावर बसोन चालून घेऊन दोनही पलटणें व स्वार झाडून कत्तल करून लुटून टाकिले आणि नवलाईवरच मुक्काम करून आहेत. त्यांस हें वर्तमान राजश्री येशवंतराव होळकर यांस कळल्यावर यानीं राजश्री महिपतराव होळकर यांजबरोबर तीस हजार फौज व कासीराव होळकर यांस पोशाख व जवाहीर व घोडे व नजर याप्रमाणें देऊन रवाना केलें. ते माळव्यांत आले. कासीराव यांच्या व महिपतराव यांच्या भेटी लौकरच होऊन तेथून कासीराव सुद्धां महिपतराव व जिवलालसिंग फौज घेऊन महेश्वरास जावें. तेथून ब-हाणपुरास येणार. याप्रमाणें नवलाईचे मुक्कामचीं पत्रें आलीं. त्यावरून सेवेशीं लिहिलें आहे. सिंद्यांचा व इंग्रजांचा बिघाड पुरता जाहला. तथा राहिली नाहीं. इंग्रजांचा वकील सिंद्यांजवळ होता. त्यास सिंद्यांनीं कैद करून पहा-यांत ठेविला आहे. त्यावरून नगरचे किल्लेदार इंग्रज याणीं स्वारी जांबगांवावर करून तेथील शामराव कारकून शिंद्याकडील

---

[1] रावसाहेब = अमृतराव पेशवे.

होता. तो नगरास धरून नेला. पुढें शिंद्याकडील मुलखांत अंमल बसविणार. सिंद्यांनीं सागर किल्ल्यासुद्धां खणून टाकिलें. तेथून निघोन गोहदेकडे गेले. राजश्री येशवंतराव होळकर यांनीं मथुरा लुटून इंग्रजांचे पलटणच्या पिच्छावर तीस हजार फौज ठेऊन आपण कुल प्रांत यमुनातीर व अंतर्वेद सुद्धां लुटून टाकीत चालले आहेत. भरतपुरावर इंग्रजांचीं पलटणें सात आठ राहिलीं आहेत. त्यास उभयतां सरदार मिळोन लवकरच नाबूद करतील. अलीबहादूर यांची मातुश्री सागरांत होती. तिला सिंद्यानीं लुटून कुल असबाब घेतली. कासीराव होळकर जिवलालसिंग सुद्धां उज्जनीस दाखल जाहले. सिंद्यांचें पेंढार वीस हजारपरियंत नागपुरांत दाखल जाहलें. त्या प्रांतीं दंगा फार आहे. तेथून कित्येक गृहस्थांचीं लिहिलीं आलीं कीं, करनल व रावसाहेब यांच्या पिच्छावर पेंढार आलें आहे. हरिनाथसिंग यांस होळकरांनीं कैदेंत ठेऊन बंदोबस्त करून पाहाऱ्यांत ठेविला आहे. त्याजकडून फितूर जाहला होता. म्हणून हा विचार केला. म्हणून माघ शु छ. २ पत्रें आलीं. त्यावरून सदरहू मजकूर सेवेशीं लिहिला आहे. श्रीमंत राजश्री [1]विनायकराव व रावसाहेब यांचें कुटुंब वगैरे अन्याबा फडके सुद्धां व चिमाबाई वगैरे मंडळी कोठें आहेत तो मजकूर समजल्यावर विनंती लिहीन. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

---

नं. ७०३६ श्रीगणपतिर्जयति. (फाल्गुन व. ८–२३ मार्च.)

पै. छ. २१ जिल्हेज. सन खमास मयातैन.

[2]विज्ञापना ऐसीजे. गणेशप्रसाद तोफ सामानसुद्धां किल्ल्याचे मैदानांत सोडली आहे. चाक्या वगैरे सामान आहे. मैदानांतील पाहारे जवळच आहेत. चौकी पाहारा करणेविसींची आज्ञा व्हावी. संपगांव, बागेवाडी, कुरुंदवाडकराकडील कित्तूरकरांचीं ठाणीं आहेत. येतद्विषयींचें बोलणें राजश्री बळवंतराव लेले बोलत होते. त्यांस उत्तर केलें कीं तुमचे सरंजामाचे फौजेशिवाय दोन हजार पायदळ यावें म्हणजे बंदोबस्त करावयास येईल. त्याजकडील पायदळें आल्यानंतर तोफ न्यावयास येईल. कळावें. पाय-

---

१ हे अमृतराव पेशव्यांचे चिरंजीव. २ पत्र सांगलीहून मिरजेस.

दळही ठेवीतच आहे. ह्या तोफेचें सामान येथें होतें. गाडा नीट करावयास नेली होती, ती हल्लीं आणून ठेविली आहे. गाडाही तयार केला आहे. शेवेसीं विदित होय, हे विज्ञापना.

---

नं. ७०३७ (फाल्गुन व. १२–२७ मार्च.)

उतारा—पत्र कारकुनाचें पुण्याहून मिरजेस बाळा. स. रवाना फाल्गुन व. ९. पौा छ. २५ जिल्हेज खमस मय्यातैन.

" भरतपुरास इंग्रजांचा शह होता. इंग्रजांनीं हल्ला केली. ती आंतून फिरविली. खालून होळकर व रतनसिंग राठोड यांणीं चालोन घेतलें. उभयतांमधून मारगिरीमध्यें इंग्रजांचा पराजय होऊन दहा पलटणें मारून बुनगें वगैरे झाडून सलतनत लुटली. याप्रों माघ शु. ५ चे सुमारें लढाई झाली. याप्रमाणें दोन रोज बोलतात. शिंदे सागरची खंडणी सात लाख घेऊन पुढें भेलशास गेले, पुढें दरमजल होळकराकडे जातात याप्रमाणें बोलतात. "

---

नं. ७०३८ श्री. (फाल्गुन व. ३०–३० मार्च.)

पौ छाा २९ जिल्हेज. सन खमस.

[1]सेवेसीं विज्ञापना. तागायत छाा २८ जिल्हेज. स्वामीचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामीची आज्ञा घेऊन निघालों तो काल शुक्रवारीं शिरगुरचे मुकामीं लष्करांत आलों. येथें लष्करचा मुकाम आणखी दोन दिवस आहे. पुढें जिकडे जाण्याचें ठरेल तिकडे लष्कर जाईल. करवीरकरांचें कांहीं सामान बेडकेह्याळवर आलें अशी बातमी आली आहे. कुरुंदवाडचें पथक काल याच मुकामीं येऊन मिळालें. पुण्याचीं पत्रें राजश्री आन्याबाचीं काल आलीं. त्यांत लिहिलें आहे भरतपुरावर होळकर आहेत. सात पलटणें इंग्रजां तोंडावर शेष आहेत. त्यांची लढाई सुरवात आहे. राजश्री अमृतरावसाहेब नागपुरापलीकडे पेंढारी यांणीं लुटलें. खासा सडे नागपुरास आले. भोसल्यानीं खर्चास व

---

१ पत्र कारकुनाचें लष्करांतून मिरजेस.

सरंजाम देऊन ठेऊन घेतलें.. कलुपही नागपुरासच आहे. याप्रमाणें पत्रेंच आलीं असें पुण्याच्या पत्रांत लिहिलें आहे. स्वामीची प्रकृत कशी आहे तें लिहिण्यास आज्ञा जाहली पाहिजे. सेवेसीं श्रुत होय. हे विज्ञापना.

---

नं. ७०३९ श्री. (चैत्र शु. ७—६ एप्रिल.)

पै. छ. ९ मोहरम. सन खमस मय्यातैन. चैत्र मास.

सेवेशीं सा। नमस्कार विज्ञापना. तागायत छ. ५ मोहरमपावेतों स्वामीचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. उत्तरेकडील वर्तमान तरी भरतपुरानजीक होळकरांची व इंग्रजांकडील पलटणांची लढाई छ. २ जिल्हेजीं होऊन पलटणें शिकस्त करून होळकर फौजसुद्धां यमुनापार फरुकाबादेस गेले. पुढें भागीरथीपार जाणार. याप्रमाणें त्याचा इरादा ठरून होळकर याणीं शिंदे बहादुर यांस लिहिलें जे, तुम्हीं उज्जनीस जाऊन तेथून ब्ऱ्हाणपुरावर छावणी करून भोसले व तुम्हीं मिळून भागानगर प्रांतीं फौज पाठविणें. त्यावरून शिंदे फौजसुद्धां खीचीवाड्यांत येऊन भेलशाच्या मार्गानें उज्जनीनजीक आले आहेत. वर्षप्रतिपदेस उज्जनीस येणार होते. नागपूर प्रांतीं शिंद्याकडील पेंढार होतें त्यास शिंद्यांनीं अशीरी प्रांतीं बोलावून नेलें. कर्नेल कलुप याणीं भोसले यांसी बहुत नम्र होऊन बोलतात जे, तुम्हीं व शिंदे मिळोन होळकराचा व आमचा तह करून द्यावा. होळकर जें म्हणतील तें तुमचे व शिंदे यांचे विचारें आम्हांस कबूल आहे. याप्रमाणें भोसल्यासी बोलून भोसले व शिंदे यांचा प्रांत इंग्रजांनीं दाबला आहे तो व किल्ले कोट माघारे द्यावे आणि त्यांनीं दरम्यान होऊन समेट करून द्यावा याप्रमाणें पत्रें शिंदे यांस लिहिलीं आहेत. त्यास शिंदे व भोसले व होळकर एकरूप आहेत. भोसले व शिंदे मिळोन आपली काबू साधावी या रोखांत आहेत. होळकराकडील नागो जिवाजी व शिंदे मिळोन ब्ऱ्हाणपुरास येणार ही आवई ऐकून श्रीमंताच्या [1]स्वारीची तयारी भाड्याच्या घोड्यासुद्धां जाली आहे ! त्रयोदशीस निघोन आश्रित वगैरे मंडळीसुद्धां मुत्सद्दी आदि करोन जाणार.

---

१ स्वारी = अर्थात् पळून जाण्याची स्वारी.

ऐ. ले. १५—३४

बऱ्हाणपुरानजीक इंग्रजांचीं पलटणें होतीं तीं विंचूरकर सुद्धां औरंगाबादेस येऊन छावणी करणार. पुण्यांत इंग्रजांचीं एक दोन पलटणें होतीं त्यांपैकीं हजार पांचशें लोक व तीस असामी गोरे दुखणाईतसुद्धां नगरास गेले. राजश्री रामचंद्रपंत सोलापूरकर यांचा वित्तविषय सरकारांत किती आला. याची चौकशी व्हावी म्हणोन रामचंद्र शिवाजी यांस आज्ञा जाली. त्यांणीं बावीस लक्षांचा अजमास लिहून दिला. त्यावरोन सदाशिव माणकेश्वर यांस विचारलें. त्यावरोन त्यांणीं विनंती केली जे, कुल दोन तीन लक्षांचा ऐवज आला आहे. त्यावरोन रामचंद्र शिवाजी कुल मंडळीसुद्धां प्रतापगडाहून पुण्यास आले. वर्षप्रतिपदेस भेटी होऊन कुटुंबसुद्धां आपल्या वाड्यांत सरकारकृपेनें आहेत. पुढें सोईनें त्यांचा किल्ला त्यांजकडे सांगावा याप्रमाणें मर्जी सरकारची आहे. राजश्री सदाशिव माणकेश्वर यांचें शरीर बहुत कृश जाहलें. येथील हवा मानत नाहीं याकरितां सरकार आज्ञा घेऊन हवापाणी उत्तम पाहून दिवस ढकलावे याकरितां कोथरुडास गेले. तेथून वडगांवच्या बागेंत गेले. तेथून कातरजेस गेले. तेथून शिवापुरास जाऊन आज ठाणेश्वरास गेले. तेथें शु. १० पावेतों राहून माघारें यावें असा बेत आहे. श्रीमंत राजश्री रावसाहेब कुटुंबसुद्धां व नीलकंठराव मेडतकर व मंडळीसुद्धां नागपुरांत आहेत. राजश्री कान्होजी गायकवाड याणीं चार पांच हजार आरब जमाव बडोद्यास येऊन फिरंग्याचीं दोन पलटणें मारून आपला अंमल कायम केला. याप्रों बडोद्याहून बहुतांचीं पत्रें आलीं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७०४० श्री. (चैत्र शु. ८–७ एप्रिल.)

सेवेशीं सा नमस्कार. विज्ञापना. ता छ. ९ मोहरम पावेतों स्वामींचे कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. उत्तरेकडील वर्तमान तरी– शिंदे बहादूर शहाडोरा वगैरे पंचमहाल येथें आले. पुढें उज्जनीस यावयाचा इरादा केला होता, त्यास होळकराकडून पत्रें आलीं त्यावरून पुन्हा माघारे फौजसुद्धां नरवरास जाऊन तेथून सडे होऊन

ग्वालेरीस गेले. तिकडून होळकर खासा येऊन उभतांच्या भेटी यमुनातीरीं होऊन तेथें उभयतांचा विचार ठरून नंतर शिंदे उज्जनीस येणार. इंग्रजांकडून वकील होळकराकडेस येऊन तहाचें बोलणें बहुत नेटाचें चाललें आहे. परंतु होळकराकडून तह करावा हें अद्याप करारांत नाहीं. याप्रमाणें वर्तमानाचीं पत्रें फाल्गुन शुा द्वादशी नरवरच्या मुक्कामचीं आलीं त्यावरून सेवेशीं लिहिलें आहे. येथील इंग्रजांकडील वकील याची जाण्याची तजवीज जे, नगरास जाऊन तेथून शहर औरंगाबादेस जाऊन पुढें कर्नल कलुप यांजकडे नागपुरास जावें असा डौल आहे. करनेल नागपुरीं भोंसले यांसीं बहुत नम्रतेनें राहून हरतरेनें भोसल्यांचे हातून होळकरांचा तह करून घ्यावा या विचारांत आहेत. श्रीमंत राजश्री रावसाहेब व रा. अन्याबा फडके सुद्धां नागपुरानजीक आहेत. कोळयांचा दंगा जुन्नर प्रांतीं बहुत होऊन सरकारी फौज व गारदी गोखले यांजकडील कोळयावर गेले आहेत. त्यांशीं लढाई होऊन गोखले यांजकडील जमाव शिकस्त होऊन मागें हटला. त्यावरून गोखले यांस खर्चाची बेगमी होऊन कोळयांवर रवानगी होणार. शिंद्याकडील पेंढार अजिंठ्याचे घांटावर येऊन बहुत दंगा त्या प्रांतीं मांडला आहे. राजश्री रामचंद्र शिवाजी याचा ऐवज वगैरे जवाहीर सरकारांत काय आलें आहे व मध्येंच किती गेलें आहे याची रुजवात होत आहे. या बोलण्यांत रा. पांडुरंगराव बारामतीकर आहेत. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

---

नं. ७०४१ श्रीगणपतिर्जयति. (चैत्र शु. ८—७ एप्रिल.)

पौ छा। ९ मोहरम सन खमस.

[1]तीर्थस्वरूप राजश्री काकासाहेब वडिलांचे सेवेसीं. अपत्यें चिंतामणीनें शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा। ६ मोहरम पावेतों मुकाम नागनूरनजीक बागेवाडी वर्तमान यथास्थित असे. विशेष. आज नागनुराहून कूच करून मुकाम मजकुरीं आलों. अडगळ तालुकेंत जोडहट्टी म्हणोन गांव आहे. तेथें रोखा आला होता, तो त्यांनीं माघारा

---

१ पत्र मिरजेस लष्करांतून.

टाकिला. तेव्हां फौज व तोफांची तयारी करून जाऊन तोफा लाविल्या. पंचवीस तीस ठार झाले. भिंताडें थोडें पडलें. नंतर लोकांनीं हल्ला करून आंत गेले. कांहीं कांटक होते त्यांतून मारले गेले. कांहीं पळाले. बायका गुरें वगैरे आंत होतें तें लुटलें गेलें. अस्तमानीं माघारे आलों. याप्रमाणें जाहलें. वडिलांस कळावें. सेवेसीं विदित होय. हे विज्ञापना. बाहेरील पांच सात जखमी मात्र झाले. हे विज्ञापना.

---

नं. ७०४२ श्री. ( चैत्र शु. ९–८ एप्रिल. )

पौ छा १२ मोहरम. सन खमस.

[१]सेवेसीं विज्ञापना. तागायत छा ७ मोहरम मुक्काम नागनूर नजीक बागेवाडी परगणें हुकेरी येथें वर्तमान यथास्थित असे. विशेष. छा २ मीनहूचें आज्ञापत्र पाठविलें तें पावलें. इकडील वर्तमान काल येथें मुक्काम आला. वंटमोरीच्या रोखें जाऊन खंडणी घेऊन कित्तूर तालुक्यांत जाणार. पेंढार दोडवाडास राहून शिलाशिला कित्तूर तालुक्यांत लावण्याकारितां रवाना जाहलें. काल जोडहट्टी म्हणोन अडगल तालुक्यांत ठाणें आहे त्यानीं चिठी माघारें टाकिली. याजकरितां फौज तोफा सुद्धां जाऊन तोफा लाऊन ठाणें लुटलें. दहा पंधरा प्यादे आंत होते त्यांस सोडून दिलें. सरसुभ्याकडचें ठाणें होतें. पुढें वंटमुरीकडे जाणार. याप्रमाणें वर्तमान आहे. मी आठ चार दिवसांत निरोप घेऊन येतों. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७०४३ श्रीगणपतिर्जयति. (चैत्र शु. १२–१० एप्रिल.)

पौ छा ११ मोहरम. सन खमास. चैत्र मास.

[२] विज्ञापना. तागायत छा ९ मोहरम पावेतों वर्तमान क्षेम असे. विशेष. बागेवाडीनजीक कब्रूरच्या ओढ्यावर मुक्कामास येऊन तेथून राजश्री हणमंतराव बहिरव यांचेबरोबर स्वार व पायदळ देऊन वंटमुरीकराकडील

---

१ पत्र कारकुनाचें लष्करांतून मिरजेस. २ पत्र सांगलीकरांचें लष्करांतून मिरजेस.

व निपाणकराकडील गांवें लगत आहेत. तिकडे पाठविलें. त्यांनीं मर्दीहळ्ळी म्हणोन गांव आहे (देशपांडेचा) तेथें जाऊन चंदीचा रोखा केला. तो गांवकरांनीं माघारा टाकून गोळी वाजविली. स्वार पायदळ गांवास चौकी देऊन उभे होते. नंतर स्वार पाय उतारा होऊन पायदळ सुद्धां हल्ला करून गांव घेतला. तेव्हां चेबुरजी ठाण्यांत सदाशिवराव नाडगौडा म्हणोन आंत होते ते बाहेर आले. गोळी बंद जाहली. हल्ला जाहल्यामुळें गांव लुटला गेला. चार पांच असामी गार्दी व एक भला माणूस जखमी. इतकें जालें. आरब कांहीं जायां जखमी जाहले. नाडगौड्यास इकडील लोकांनीं धरून ठेविलें आहे. वडिलांस कळावें. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ७०४४    श्री.    (चैत्र शु. १३–११ एप्रिल.)

पौ छा ११ मोहरम. सन खमस.

सेवेसीं [१]बळवंत लक्ष्मण. कृतानेक साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा १० मोहरम गुरुवार मुक्काम नजीक घोडगिरी. स्वामीचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान. परवां स्वारी या मुकामीं आली. मौजे मोदेहळ्ळी चिकोडी तालुक्याचा गांव नाडगौडा यांचा. तेथें स्वारी पाठऊन गांव लुटला. नाडगौडा हस्तगत जाहला. कित्तूर तालुक्यांत जाण्याची योजना आहे. वंटमुरीकर देसाई यांजकडील घांसदाण्याचें बोलणें उरकल्यानंतर कूच होईल. कित्तूरकराकडील अद्यापि बोलणें कांहीं आलें नाहीं. करवीरकरांचा कारकून घाटग्याबरोबर बोलण्याकरितां आला. पेशजी हरीपुरांत [२]मातोश्रींचे विद्यमानें बोलणें जाहलें त्याप्रमाणें उभयतांनीं असावें असें ठरत आहे. वरकड अधिकोत्तर नाहीं. अलीकडे राजश्री लक्ष्मणराव वैद्य यांचें औषध घ्यावयास स्वामींनीं प्रारंभ केल्यापासून प्रकृति कसी आहे? औषध प्रकृतीस मानवतें न मानतें हें लिहिण्यास आज्ञा जाहली पाहिजे. मी

---

१ उपनांव लेले. हा कुरुंदवाडकरांचा सेनापति. याचें हें पत्र लष्करांतून मिरजेस. २ मातुश्री = गोपाळरावांची स्त्री सरस्वतीबाई.

लौकरच यावें म्हणून त्वरा करीत आहें. परंतु जाबसाल लवकर तुटत नाहीं. मैंदर्गी प्रकर्णाविसीं सरकारांत येथील पत्रें उपद्रव सरंजामी तालुक्यास होऊं नये अशीं गेलीं व गोडबोल्याकडील कारकून येथें आले होते. त्यांसही निक्षून ताकीद जाहली आहे. पुढें संपगांव बागेवाडी वगैरे जाबसाल कसे होतात, तें पाहून मी येतों. आमच्या पथकांत नवें पायदळ ठेवण्यास प्रारंभ केला आहे. बोलण्यांत आल्याप्रमाणें भरती करणार. कळावें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७०४५ श्री. (चैत्र व. २–१५ एप्रिल.)

पै. छ. १९ मोहरम. सन खमस. चैत्र मास.

सेवेशीं सा। नमस्कार. विज्ञापना. ता। छ. १४ मोहरम पावेतों स्वामींचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. उत्तरेकडील वर्तमान तरी कलकत्त्याहून होळकरांकडे वकिलातीस इंग्रज भरतपूरच्या मुक्कामीं आला. त्याचे रुबरू होळकरांनीं व जाटांनीं मिळोन दीगचा किल्ला घेऊन सात पलटणें गारद करून तीन पलटणें व दोन हजार तुरुपस्वार पानिपतच्या रोखें पळून गेले त्यांच्या रोखावर होळकरांची फौज गेली आहे. याप्रमाणें लढाई फाल्गुन शु॥ २ होऊन होळकर फौजसुद्धां अंतर्वेदींत फरकाबादेस गेले. तेथून भागीरतीपार होऊन कलकत्त्यास फौजा पेशजीं गेल्या आहेत त्यांस सामील होणार त्यावरून इंग्रजांच्या वकिलाचें बोलणें पडलें जे "कंपनीच्या विचारें तुमचा आमचा समेट व्हावा. त्यास परस्परें समेटाचें बोलणें झालें पाहिजे." त्यावरून होळकराचें म्हणणें "तुमचा कारभार प्रमाण नाहीं. सल्ल्याचीं बोलणीं एक वर्षपर्यंत बोलतच आहां. त्यास जें होणें तें लढाईनेंच होईल." त्यास वकिलाचा आग्रह बहुत पडला. त्यावरून होळकरांनीं साफ सांगितलें जे, भागानगर व पुणें व नागपूर वगैरे मुलकींत तुम्ही जमावानिशीं आहां. त्यास हे जागे सोडून आपल्या ठिकाणास माघारें गेलां म्हणजे नंतर तुमचें आमचें तहाचें बोलणें होईल याप्रमाणें सांगितलें. त्यावरून इंग्रजांच्या वकिलाचें लिहिलें नागपुरास कर्नेलास व पुण्यांतील वकिलास व हरिहरेश्वरासही गेलें आहे.

शिंदे सारंगपुराहून फौजसुद्धां नरवरास गेले. तेथून ग्वालेरीस जाणार म्हणोन सदरहू वर्तमानाचीं पत्रें छ. ४ जिल्हेजचीं आलीं. त्यावरून सेवेशीं लिहिलें आहे. उज्जनीस येणार होते परंतु मागतीं माघारे गेले. इंग्रजांचीं पलटणें व विंचूरकर वगैरे औरंगाबादेचे नजीक आले होते, त्यांस शिंद्याकडील पेंढार वीस पंचवीस हजार पर्यंत नागपूर प्रांतांतून बऱ्हाणपूरच्या सुमारास अजिंठ्याच्या घांटाखालीं येऊन तेथून पन्नास साठ कोस दौड करून इंग्रजांचीं पलटणें व तुरुपस्वार यांजवर येऊन फाल्गुन वद्य अष्टमीस छापा घालून एक पलटण तोफांसुद्धां लुटून कांहीं तुरुपस्वार लुटले. पलटणांत सरकार निसबतचे सरदार महिपतराव जिवाजी व मराठा सरदार एक असे उभयतां सातशें स्वारांनिशीं होते त्यांची पेंढाऱ्यांची लढाई होऊन महिपतराव जिवाजी व मराठा सरदार असे दोघे ठार झाले. नंतर इंग्रजांचीं पलटणें व तुरुपस्वार बाकी राहिले ते नगरास आले. विंचूरकर मालेगांवास गेले. नबाबाची फौज व पलटणें बिडावरून बेदराकडेस फौजसुद्धां महिपतराव राम वगैरे नबाबाकडील गेले. श्रीमंतांचे स्वारीची तयारी होऊन वाईकडेस जाणार होते. त्यास तूर्त स्वारी महकूब जाली. महिपतराव जिवाजी भवानी शिवराम अहमदाबादेचे सुभेदार यांचे पुत्र. ते लढाईंत ठार जाहले. येणेंप्रमाणें इकडील वर्तमान आहे. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना. रा. सदाशिव माणकेश्वर कुटुंबासुद्धां बनेश्वरपर्यंत गेले होते. पुनः शु ९ स कुटुंबसुद्धां पुण्यास आले. रा. रामचंद्र शिवाजी सोलापूरकर आपल्या वाड्यांत कुटुंबांत स्वस्थतेंत आहेत. त्यांजकडील हरएक मजकूर बोलण्यांत अद्याप आला नाहीं. श्रीमंतांच्या मर्जीनुरूप ठरेल तें खरें. पुढें होईल मजकूर तो सेवेशीं लिहूं. हे विज्ञापना.

---

नं. ७०४६ श्री. ( चैत्र व. ३–१६ एप्रिल. )

[१]विनंती सेवक बाळाजी महादेव दामले. चरणांवर मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा १५ मोहरमपर्यंत वर्त-

---

१ पत्र रहिमतपुराहून मिरजेस.

मान यथास्थित असे. विशेष. श्रीमंत राजश्री पंतप्रतिनिधि यांची स्वारी मार्गशीर्षमासीं मसुरेहून किनईस जातां कसबें रहिमतपुरीं मुक्काम करून गांव लुटून पाटील कुलकर्णी घरून किनईस नेले, तेथें ऐन खंडणी चार हजार व दरबारखर्च दोन हजार एकूण सहा हजार रुपये ठराऊन बापूजी नाईक बेलापूरकर यांची निशा[1] घेतली. त्यापैकीं दोन हजार रुपये बेलापूरकर यास पावले. बाकी चार हजार रुपये देणें राहिले. त्याबद्दल हल्लीं वाणी कसब्या मजकूरचे धरून कराडास अटकेंत ठेविले आहेत. चार हजार रुपये घेतल्यावांचून सोडीत नाहींत. पिसाळ देशमुख प्रांत वांई यांचे हक्काचा कसबे मजकूरचा ऐवज रास्ते यांणीं नेला असतां राजश्री धोंडोपंत गोडबोले वाई प्रांताचा सुभा करून आले आहेत. ते ऐवज मागतात. रास्ते याणीं नेला म्हटलें असतां ऐकत नाहींत. देशमुखांची इनाम जमीन सालमजकुरीं पडली आहे. त्यासुद्धां जबरदस्तीनें ऐवज मागतात. पंचवीस सिदी, आरब गांवांत बसविले आहेत. रयतेंत कांहीं त्राण राहिला नाहीं. कसबे मजकूरचे वाणी कराडास अटकाविले आहेत त्यांस सोडून देणेंविसीं राजश्री बळवंतराव फडणीस यांस पत्र पाठविलें पाहिजे. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ७०४७ श्रीगणपतिर्जयति. (चैत्र व. ३–१७ एप्रिल)

पौ छा २१ मोहरम, सन खमस.

[2]तीर्थस्वरूप राजश्री काकासाहेब. वडिलांचे सेवेशीं अपत्यें चिंतामणीनें साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा १६ मोहरम पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. वंटमुरीचे मुक्कामाहून मंदवारीं पाच्छापूरच्या बारींतून अंकलीच्या मुक्कामास आलों. तेथून रविवारीं मारेहळ बारीनें मुदगे परगणे शहापूर येथें मुक्कामास येऊन कित्तूर तालुक्यांतील गांवास लोक पाठऊन शिलशिल्यास प्रारंभ करविला. तेथून दोन अडीच कोस कित्तूरकराकडील देसनूर गांव आहे. तिकडे फौज व पारदळ व तोफा इंदुवारीं रवानगी केली. तेथें गेल्यानंतर त्यांची यांची गोळागोळी जाहली.

---

१ जामिनगत. २ पत्र सांगलीकरांचें लष्करांतून मिरजेस..

ठाणें भजबूत. झाडीचा आसरा. आंत काटक लोक चारशेंपर्यंत होते. त्यांस इकडील लोकांनीं गांवांत शिरोन कांहीं घरांस अग्नी लाऊन अस्तमानीं माघारे आले. भौमवारीं मुद्गयासच मुक्काम जाहला. आजी बुधवारीं कूच करून देसनूरच्या रोखें होऊन नेसरीच्या मुक्कामास आलों. देसनूरच्या ठाण्यांतील काटक होते ते फौजेचे दहशतीनें ठाणें सोडून पळून गेले. पेंढारी गावांत शिरून गाव जाळला. येथून कित्तूर सात कोस आहे. स्वार व पायदळ देसाई यांचें काय असेल तें कित्तुरास आहे. त्याशिवाय दुसरे ठिकाणीं दिसत नाहीं. त्यांजकडील वीराप्पा थामण्या बोलण्याकरितां म्हणून आला आहे. होईल तें मागाऊन शेवसीं लिहून पाठवितों. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ७०४८ श्री. (२१ एप्रिल)

छ. २५ मोहरम. सन खमस मय्यातैन. चैत्र.

सेवशीं शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. चैत्र वद्य ७ वर्तमान यथास्थित असे. विशेष. माघ वद्य १४ पासून फाल्गुन शु। ५ परियंत लढाई होऊन चवदा पलटणें पराभव पावोन लुटून होळकर याणें यश मिळविलें असें बोलतात. शिंदे भेलशाजवळ होते. त्यांजला पत्र होळकर यांचें येऊन सिंदे सडे पांच सात हजार फौजेनिसीं निघोन होळकर याजकडे गेले असें बोलतात. पुण्यांतील इंग्रजांचीं चार पलटणें नगरास गेलीं. विंचुरकरांबरोबर पलटणें होतीं तीं नगरास आलीं. एकूण जमाव किल्ल्यानजीक जाला. पुढें कोणीकडे जाणार समजत नाहीं. सरकारस्वारी वैशाखस्नानास श्रीवाईस जाणार होती ती राहिली. इंग्रजांनीं राहविली असें बोलतात. गांवांत पट्टी होणार होती व सिंदे यांजकडून पेंढार अजिंठ्याचे घांटानजीक आलें व मावे व दातार बंडवाले यांच्या फौजा कुरकुंब व बारामती सुमोरें रोखें आले. त्याजवरून गृहस्थांनीं कुटुंबें घडाका खालीं कोकणांत रवाना करितात. मातबर गृहस्थ चीजवस्त थाग्यास पाठवितात. याजप्रमाणें आहे. पट्टीचे चार रोज मंद पडलें आहे. याजप्रमाणें बोलतात. कळावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

ऐ. ले. सं. १५-३५

नं. ७०४९ श्री. (नकल.) (२१ एप्रिल.)

पुण्याहून एका गृहस्थाचें पत्र आलें चैत्र वा। ७. त्यांतील वर्तमान, लखनौस अंमल सुजातदौले याचे लेकाचा होता. त्याची स्थापना होळकर यांणीं करून दौलत दहा पांच कोटींची हातीं लागली. इंग्रज यांचीं पलटणें चाळीस हजारपर्यंत साफ केलीं. पुढें फौज रवाना होत आहे. शिंदे बऱ्हाणपुराहून माघारे महेश्वरास गेले. तेथें खंडेराव होळकर याचें लग्न होणार. पुढें होळकर यांच्या फौजा हांड्याचे घाटावर आल्या. शेवगांवास कांहीं फौज आली आहे. पुण्यास इंग्रज दहा पांच हजार जमा जाला होता तो कोकणांत मुंबईस गेला. दोन हजारपर्यंत भांबवड्यास आहे. कोकणांत भिल्ल कोळी जमा करून माहुली कल्याण कोहाज येथें शह बसविला. पुण्याचा कारभार विठोजी नाईक यांजकडे होता तो रास्ते यांजकडे सांगितला. पुण्यांत राजश्री बापू परचुरे व गणपतराव करमरकर वगैरे किरकोळ मंडळी आली. दप्तर चालतें करावें म्हणोन देशमुखास आज्ञा सरकारची जाहली त्याजवरोन श्री. कै. नानांचे वाड्यांत रुमाल आणून कांहीं कारकून जमा जाले आहेत. नित्य हजेरी होत्ये. शाई कागदास ठिकाण नाहीं. पट तयार होत आहेत. राजश्री गोपाळराव मुनशी यास आणावयास पाठविलें होतें. आले नाहींत. शेलूकर यास आणावयास गेले आहेत. खासा येथून निघून जावें असा बेत होता याजमुळें इंग्रज यांणीं कांहीं बंदोबस्त केला. त्याजवरोन थोडक्यांतच आटपलें असा भाव दिसतो. कळावें.

---

नं. ७०५० श्री. (चैत्र व. ७–२१ एप्रिल.)

पौ छा। २४ मोहरम. सन खमस. चैत्र.

सेवेसीं बलवंत लक्ष्मण. कृतानेक साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा। २० मोहरम मुक्काम संपगांव स्वामीचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. अंदु जासुदाबरोबर आज्ञापत्र पाठविलें तें पावलें. इकडील वर्तमान. काल लष्कर मुकाम मजकुरीं आलें. कित्तूरकराकडील विराप्पा म्हणोन लिंगायत बोलण्यास शेगुणशीकर पाटलाचे विद्यमानें

आला. परंतु भाग तुटण्याचें बोलणें त्याचे हातून होईना. याजकरितां पराप्पा म्हणोन देसाई याचा कारभारी मुख्य आहे त्यास आणावयास गेला आहे. आल्यानंतर काय बोलणें होईल तें मागाहून सेवेसीं लिहितों. लष्करांत लुटीमुळें धारण बारा दहा आठ पायल्या याप्रमाणें जाहली आहे. भला यावयाची आज्ञा; परंतु येथून निरोप होत नाहीं. प्रयत्न करून पाहिला. परंतु आज्ञा न होय. याजकरितां राहिलों. संपगांव बागेवाडीस आम्हाकडून ठाणें बसलें. पुढें बोलण्यांत कसें ठरेल तें ठरऊन घेऊन मी येतों. वरकड अधिकोत्तर नाहीं. स्वामींचें प्रकृतीचें वर्तमान लिहिलें तें कळलें. पुण्याकडील वगैरे नवीन कांहीं वर्तमान इकडे आलें नाहीं. इंग्रजांकडील कांहीं जखमी आले ते सांगतात, होळकर यांची दीन लाख फौज आहे. आमचीं दहा पलटणें शेष आहेत. लढाई होत आहे असा आपला आब राखून वर्तमान सांगतात. परंतु त्यांच्या सांगण्यांत कलकत्यापासून अंतरवेदींत बाकी दहा पलटणें राहिलीं असें येतें. तिकडे वर्तमान अधिकोत्तर आलें असेल तें लिहावयास आज्ञा जाहली पाहिजे. कित्तूरकरांचा जमाव आठशें स्वार व चार हजार पायदळ आहे. कित्तुरांत सारा जमाव आहे. किरकोळ स्वार बाहेर येऊन कद्दीकबाडास उपद्रव करितात. समोर लढाई मारावयाचें सामर्थ्य दिसत नाहीं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७०५१ श्री. (चैत्र व. १०–२४ एप्रिल.)

पै. छ. २३ मोहरम. खमस.

विज्ञापना. राजेश्री शिंदे भरतपुरास जाऊन दाखल जाहले. सावकारी बातमी आली. भेटी जाहल्याचें पत्र आलें नाहीं. होळकर तह इंग्रजबरोबर करीत होते. परंतु जाट तह करूं देत नाहींत. तुम्ही तह केला असतां आमचा प्राण घेतील. त्यास तुम्हास व शिंद्यास चार रुपये खर्चास देतों. त्रिवर्गांनी मिळोन त्यांचें पारिपत्य करूं तरच सर्वांचा परिणाम. याप्रमाणें बोलणीं होऊन त्रिवर्ग येक जागीं होणार. याअन्वयें बातमी आली आहे. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ७०५२ श्री. (एप्रिल–मे.)

विज्ञापना. राजश्री यशवंतराव होळकर रामपुरा भामपुऱ्याकडे आहेत. पेशजीं लढाई जाहल्याचा मजकूर लिहोन पाठविला आहे. त्याजवर लोकांचीं पत्रें आलीं. लढाई मातबर जाहली. दहा हजार माणूस पलटणचें व तुरुकस्वारसुद्धां रणास आलें. होळकर याजकडीलही सात आठ हजार कंपूंतील कवाइती लोक व स्वार मिळोन पडले. इंग्रजांचा नाश बहुत जाहला. बुणगें व तोफासुद्धां व नक्त झाडून होळकराकडे आलें. त्या लढाईंत मुख्य लीकसाहेब होते. ते निघोन सडे कलकत्त्यास गेले, इकडोन पलटणें व फौजेची रवानगी जाहली. हें समजोन चांदवडच्या सुमारें यावयाकरितां राजश्री गणपतराव रोंझेकर दिवाण यांजबरोबर पंचवीस हजार फौज देऊन रवानगी जाली. याप्रमाणें बातमी आली. नगरास पलटणें गेलीं होतीं तीं तेथेंच आहेत. कलकत्त्याहून लाट दिल्लीस आले. याबरोबर एक कंपू आहे. त्याणीं होळकराकडे तहाचें बोलणें लावलें म्हणोन वदंता आहे. निश्चयांत नाहीं. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ७०५३ श्रीगणपतिर्जयति. (वैशाख शु. २–१ मे.)

पै. छ. ८ सफर. खमस मयातैन. वैशाख.

[१]तीर्थस्वरूप राजेश्री काकासाहेब. वडिलांचे शेवेसी.

अपत्यें चिंतामणीनें शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. १ सफर पावेतों वर्तमान यथास्थित असों. विशेष. रातबिरात सावध असावें म्हणोन आज्ञा. त्यास छबिन्याची वगैरे हुशारी राखोन आज्ञेप्रमाणें आहों. राजेश्री रामचंद्र आप्पाजी सरसुभ्याकडील संपगांवच्या मुक्कामीं भेटले. संपगांवाहून विनंतीपत्र पाठविलें होतें, तें प्रविष्ट जाहलेंच असेल. तेथोन कित्तूरकरांकडील नेगीनहाळ म्हणोन गांव चौबुरुजी आहे तेथें त्याजकडील चार पांचशें पर्यंत [२]काटक आहेत. याजकरितां फौज तोफा सुद्धां तलाव्यास म्हणोन आलों. आंतील लोकांनीं गोळी वाजविली. दोन अडीचशेंपर्यंत लोक आंतून गांवच्या आसऱ्यानें चालोन आले. तेव्हां

---

१ पत्र सांगलीकरांचें लष्करांतून मिरजेस. २ काटक = कर्नाटकी प्यादा.

इकडील पायदळही चालोन जाऊन लढाई झाली. आंतील लोकांस मागें खंदकापर्यंत हाटवून घातलें. इकडील वीसपंचवीस पर्यंत ठार व पन्नास पाऊणशेंपर्यंत जखमी झाले. पायदळांतील दोन जमादार चांगले पडले. आंतील लोकही ठार व जखमी बहुत झाले. इकडील मोर्चे ठाण्यालगत गेले आहेत. तोफांचीही सुरवात आहे. गावांतील लोक घरच्या आसऱ्यानें दम धरून अद्याप आहेत. काल संपगांवाहून कूच करून नेगीनहाळा-जवळ मुक्काम आणविला आहे. याउपरी होईल तें लिहून सेवेसीं पाठ-वितों. गोळ्याविसीं लिहिलें होतें. त्यांची रवानगी झालीच असेल. बंदुखे-च्या गोळ्या रवाना व्हाव्या. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ७०५४ श्री. (वैशाख शु. ५-३ मे.)

पै. छ. ८ सफर. सन खमस.

सेवेशीं सा। नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. ३ सफर पावेतों स्वामीचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. दिल्लीहून व शिंद्यांच्या लष्करांतून पत्रें आलीं त्यांतील सारांश जे- शिंदे व होळकर यांच्या भेटी भरतपुरानजीक वर्षप्रतिपदेस होऊन मोठा समारंभ जाला. फाल्गुन शुद्धांत दोन लढाया डीग व भरतपुरावर होऊन अठरा पलटणें गारद करून पेशजीं कलकत्तेप्रांतीं फौजा गेल्या आहेत त्यांच्या मदतीस आणखी चाळीस हजार रवाना करून त्या प्रांतीं बहुत दंगा केला. त्या-वरून तहाचें बोलणें ठरत आहे. आजपर्यंत इंग्रजांकडील नगदी ऐवज साडेतेवीस क्रोड खर्च होऊन लढाईत शिपाई मनुष्य एक लाखपर्यंत कामास आलें. याप्रमाणें छ. १६ जिल्हेजचीं पत्रें दिल्लीचीं आलीं. दिल्ली आग्रा कानपूर लखनौ व श्रीकाशी येथें इंग्रजांचा अंमल आहे तो तहाचा विषय पक्का ठरल्यावर दिल्ली वगैरे अंमल उठतील. शिंद्यांच्या लष्कराची व भागानगरची दोहोंकडील डाका बसून पत्रांचा शिलशिला सुरू जाहला आहे. भागानगरीं फौजेचा जमाव होत आहे. शिंदे बहादूर देशीं लौकरच येतील. याप्रों तिकडून लिहिलें आलें आहे. रा. सदाशिव माणकेश्वर यांस कफक्षय होऊन बहुत क्षीण जाहले आहेत. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७०५५ श्री. (वैशाख शु. ५–३ मे.)

पै. छ. ८ सफर. खमस मयातैन. वैशाख मास.

शेवेसी साष्टांग नमस्कार. विज्ञापना. ताा छ. ३ सफर पावेतों स्वामीचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. पंढरपुराकडे हरीपंत भावे वगैरे मिळोन बंड पांच सात हजार फौज घरोन दंगा करीत होते. त्याजवर नगराहून व येथून मिळोन सातशें तुरुकस्वार इंग्रजांकडील जाऊन भावे यांजवर छापा घालून लुटून टाकिलें. भावे सडे पळून गेले म्हणून पत्रें आलीं. त्यावरोन शेवेसीं लिहिलें आहे. शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७०५६ श्री. (वैशाख शु. ५–३ मे.)

पै. छ. ११ सफर. सन खमस. वैशाख.

[1]सेवेशीं बळवंतराव आपाजी कृतानेक साां नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. ३ माहे सफर मुक्काम नेगीनहाळ येथें सुखरूप असों. विशेष. स्वामींनीं छ. २१ मोहरमचें पत्र पाठविलें तें पावलें. कित्तूरकरांचा मुख्य दिवाण आला होता म्हणोन पेशर्जी लिहिलें होतें. त्यांचे बोलण्यांतील आशय– सरकारांतून नऊ सालांचा ऐवज द्यावा म्हणून आज्ञा केली. वकिलांनीं सांगितलें कीं, आम्ही कित्तुरास जाऊन काय तें सांगतों. कित्तुरास जाऊन सांगून पाठविलें कीं, आम्हांस साल दरसाल लाख दोन लाख खंडणी पडत आहे. तुम्ही खंडणी घेतल्यावर दुसऱ्याचा उपद्रव लागूं नये असें आहे. त्यास नऊ वर्षांचा हिशेब करणें आणि आम्हांस खंडण्या पडल्या आहेत त्या वजा होऊन बाकीचा ऐवज घेणें. नाहीं तर मोघम आम्ही पंचवीस हजार रु. देतों ते घेऊन जाणें. याप्रमाणें रा. सखोपंत काळे यांस बोलावून कित्तुरास नेऊन सांगितलेवर तह मोडला. त्याजवर दुसरे दिवशीं नेगीनहाळ म्हणोन हा गांव आहे त्या गांवास मोर्चे लावून बसले आहेत. आज तीन दिवस जाले. आंतील पांच सात माणून ठार दहा पांच जखमी व इकडील दहा ठार व जखमी पंचवीस तीस पर्यंत जालें. आंत प्यादे दोनशें आहेत व देसायाचे चिरंजीवांतील असाम्या चार

---

1 पत्र कारकुनाचें लष्करांतून मिरजेस.

आहेत. चौगीर्दा आमचे मोर्चे व रातबिरात छबिना सभोंवता आहे. बावनपागेही येथें येऊन उतरले आहेत. मोर्चास व छबिन्यास त्यांज-कडीलही लोक असतात. कालपासून गावांत मुख्य चौघेजण आहेत त्यांणीं फिरोन खंडणीचें बोलणें लाविलें आहे. रा. सखोपंत काळे आंत गेले होते. आंत पाणी नाहीं. बुरुजाखालीं पाणी आहे तें याणीं धरलें आहे. काल बोलण्याच्या नादांत पन्नास घागरी पाणी व चार बस्ते दारूचे व मुडदे परवांचे दिवशीं पडले होते ते जलदीनें आंत नेले ! अद्यापि बोलणें ठरलें नाहीं. + + + सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ७०५७ श्री. (वैशाख शु. ८–६ मे.)

पौ छा ६ सफर, सन खमस.

चिरंजीव राजश्री बाळासाहेब प्रति [1]लक्ष्मीबाई आशीर्वाद उपरी. आपणास काळीं द्राक्षें सुमारें पन्नास जासुदाबरोबर पाठविलीं आहेत. पावल्याचें उत्तर पाठवावें. लष्करचें वर्तमान राजश्री नागोपंत यांचा कारकून यानें नेरलीहून लिहिलें कीं लष्कर संपगांवाहून कूच होऊन मंगळ-वारीं पुढें एक कोस नेगीनहाळचे ओल्यावर गेलें. कारण त्या गांवावर गोळी उडाली. सबब मौजे मजकुरास बुधवारीं प्रातःकालीं मोर्चे बसऊन तोफा लाविल्या. गांव घेतला. गढी लढत आहे. आंत पाणी नाहीं. गढी घेतील. तहाचें बोलणें ठरावांत आलें होतें; परंतु हल्लीं गोळागोळी झाली याजमुळें बिघाड झाला. असें आहे. सरसुभे निजबत फौजही येऊन लग-त्यास उतरली. भेटी झाल्या; म्हणोन आज प्रातःकाली पत्र आलें. कळावें. बहुत काय लिहिणें. रवाना छा ६ सफर. हे आशीर्वाद.

---

नं. ७०५८ श्री. (वैशाख शु. १०–८ मे.)

पैवस्ती छ. ८ सफर. सु सन खमस मयातैन व आलफ.

सेवेशीं सा. नमस्कार. विज्ञापना. तागाईत छ. सफर पावेतों स्वामीचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. उत्तरेकडील वर्तमान तरी

---

१ लक्ष्मीबाई या पांडुरंगराव गोविंद यांच्या पत्नी. चिंता. सांगलीकर यांच्या मातोश्री. त्यांचें हें पत्र धाकटा दीर गंगाधरराव बाळासाहेब यांस.

राजश्री शिंदे बहादुर ग्वालेरीच्या नजीक फौज सुा गेले. यानंतर इंग्रजांकडील वकील पलटणानिशीं शिंदे बहादुर याजपाशीं आहेत. त्याणीं शिंदे यास सांगितलें जे, तुमचा रोख होलकराकडेस जावयाचा आहे, त्यास आम्हांकडील पलटणें व तुम्ही व आणखी सरंजाम मिळून होळकराकडील लढाई करावी. त्यास तुम्ही येथून कूच करून जाऊं नये. त्यावरून बहादुर यांनीं वकीलास सांगितलें जे, आमच्या फौजेंत खर्चाची तंगचाई होऊन लोक आमच्या हुकुमांत नाहींत. फौज उठून जात आहे. त्यास पंचवीस लाख रुपये आमच्याऐवजीं द्यावे म्हणजे फौजांची बंदोबस्ति होईल. म्हणून सांगितलें. त्यावरून वकीलानें हा मजकूर कलकत्त्यास लिहिला. तेथून उत्तर आलें जे खाजगी खर्चास पांच सात लाख रुपये देऊन बहादुर यांनीं होळकरासी लढाई देऊन होळकर नाबूद करावा. नंतर होळकराचा प्रांत [1]कुल शिंदे बहादुर यांस देऊं. याप्रमाणें उत्तर आलें तें वकील यांनीं शिंदे बहादुर यांस सांगितलें. त्यास शिंदे यांच्या फौजेंत खर्चाचा बहुतच गवगवा होऊन सरदारांनीं शिंदे बहादुर यांस घेऊन होळकराचा रोख धरून जाऊं लागले. त्यावरून वकीलांनीं तीन पलटणें तयार करून शिंदे फौज सुा गेले त्याला आडवितील. पलटणें पाठवून जावें म्हणून सांगून पाठविलें. त्यावरून पलटणांचा व शिंदे यांच्या फौजेचा बेबनाव होऊन लढाई सुरू होतां तिन्ही पलटणें गारद करून शिंदे बहादुर फौज सुद्धां महूस ग्वालेरीपार तेरा कोसांवर दाखल जाहले. वकील तळावरच राहिले. हें वर्तमान होळकरांस समजल्यावर पंचवीस हजार फौज व पंधरा लाख रुपये खर्चास शिंदे बहादूर यास पाठवून दिले. उभयतांच्या भेटी चैत्र शुा १ होणार. इंग्रजांचा अंमल दिल्ली व आग्रे व लखनौ व श्रीकाशींत मात्र राहिला आहे. बाजत पलटणें कुल नाबूद होळकरांनीं केलीं. इंग्रजांचा वकील होळकरापाशीं आहे. त्याचीं बोलणीं समेट करावी म्हणून आहेत. त्यास होळकर व शिंदे बहादुर यांच्या विचारें तहाचा विषय ठरेल त्याप्रमाणें पुढें तहाचा मजकूर होईल. याप्रमाणें पत्रें फाल्गुन वद्य १२ आलीं त्यावरून सदर मज-

---

१ कुल = सर्व.

कूर सेवेशीं लिहिला आहे. श्रीमंत राजश्री रावसाहेब नागपुराहून निघून तीसगडच्या मार्गें महायात्रेस गेले. एक महिना होत आला. क्षेत्रानजीक गेले असतील. नगराहून एकशेंऐशीं लहान मोठ्या [1]जरबा वगैरे सरंजाम व आजारी व जखमी असा खटला पुण्यास येऊन पुण्याहून तोफासुद्धां वरचेवर ममईस जात आहेत. पुण्यांत जंगी[2] सरंजाम गेला आहे. तो नगरास जात आहे. शिंदे होळकर यांच्या भेटी शु १ जाहल्या म्हणून नागपुराहून पत्रें आलीं. करनेल कलूस यांस समाधान नाहीं. नागपुरांतच आहेत. भोसल्यांच्या हातून हरतऱ्हा करून सलाहा करावा या बेतांत आहेत. रावसाहेव काशीयात्रेचे उद्देशें निघून गेले. त्यास यात्रा करून होळकरास जाऊन भेटावें अथवा अगोदर भेटून मग यात्रेस जावें असा विचार आहे. येथें हुजूरनें पांच सात किल्यांची सरंजामी बहुत आहे. राजश्री रामचंद्र शिवाजी सोलापूरकर याची वास्तवानी वगैरे ऐवज आणला आहे. त्याची चौकशी हुजूरनें होत आहे. रामचंद्र शिवाजी यांचेवर श्रीमंतांचा लोभ बहुत आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. स्वामींनीं छ. २० मोहरमचें पत्र पाठविलें तें पावलें. बहुत आनंद जाहला. हे विज्ञापना.

नं. ७०५९ (वैशाख शु. ११-९ मे.)

उतारा— पत्र यशवंतराव पटवर्धन यांचें नेगीनहाळहून मिरजेस. (छा ९ सफर खमस सनचें.)

"किचूर यांजकडील बोलणें ठरविण्यास वीर संगाप्पा व राजश्री व्यंकटराव हे उभयतां आले आहेत. बोलणें ठरत आहे. नेगीनहाळाहून प्यादे पळून गेले. गांवांत प्यादे इकडील आहेत. वरकड मजकूर वडिलांनीं लिहिलें आहे. त्याजवरून विदित होईल."

नं. ७०६० श्रीगणपतिर्जयति. (वैशाख शु. ११-९ मे.)

पै. छ. १३ सफर. सन खमस मयातैन. वैशाख.

[3]तीर्थस्वरूप राजेश्री काकासाहेब वडिलांचे शेवेसीं.

---

१ जरबा = तोफा. २ जंगी = लढाऊ. ३ पत्र सांगलीकरांचें लष्करांतून मिरजेस.

ऐ. ले. सं. १५-३६

अपत्यें चिंतामणीनें, शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. ९ सफर पावेतों वर्तमान क्षेम असे. विशेष, वडिलीं छ. ४ सफरचीं पत्रें पाठविलीं तीं छ. ८ मिनहूस पोचलीं. छ. १६ मोहरमचें पत्र आलें, त्या आलीकडे पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. सविस्तर लिहावें, मुक्काम कोठें आहे, तें कळवावें म्हणोन लिहिलें तें कळलें. ऐसियासी नेगीनहाळचे मुक्कामास आल्यावर एथील लढाईचा वगैरे मजकूर लिहून विनंतीपत्र पाठविलें होतें, तें प्रविष्ट होऊन सविस्तर निवेदन झालेंच असेल. तूर्त मुक्काम नेगीनहळासच आहे. कित्तूरकरांकडील बोलणार जेसरी संपगांव एथील मुक्कामीं दोन वेळां आले. बनाव न बसल्यामुळें माघारे गेले. त्याजवर मुक्काम मजकुरीं लढाई होऊन सोचें गांवानजीक गेले आहेत. तीन चारशें पर्यंत लोक होते. ते हवालदील जाहले. तेव्हां फिरून बोलणार येऊन राजश्री सखोपंत काळे यास घेऊन गेले. मशारनिल्हे तेथें जाऊन देसाई यांजकडील राजश्री व्यंकाजी रामचंद्र व वीरसंगपा यास घेऊन परवां ऐथें आले. अखेरेचे दिवस ते पक्षीं. सुमार पाहून बोलणें ठरावांत आणून शेवेसीं लिहितों. भावे दातार वगैरे, बंडवाले कर्नाळ्याकडे दोन तीन हजारांनीं जमोन तालुक्यांत उपद्रव करीत होते. त्याजवर इंग्रजांकडील जमाव येऊन छापा घातल्याविशींचें लिहिलें तें कळलें. परवां मंगळवेढ्याहून पत्रें आलीं, त्यांत नबाबाकडील फौज पुरंध्याकडे होती, त्यांणीं बंडवाल्यास लुटल्याचें लिहिलें होतें. शेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ७०६१ श्रीगणराज. (१२ मे.)

पौ छा २१ सफर. वैशाख. सन खमस.

[1]तीर्थस्वरूप राजश्री बाळासाहेब वडिलांचे सेवेसीं अपत्यें गणेशानें दोन्ही कर जोडून साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत वैशाख शु॥ १४ पावेतों मुकाम नजीक येकुंडी येथें वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असों. विशेष. वडिलीं आशीर्वादपत्र पाठविलें तें पावलें. परम संतोष जाहला. यानंतर कित्तूरची खंडणी एक साल वर ठराव झाला. त्यांत पंधरा हजार कमी होऊन कित्तूरची सरद सोडून काल येथें आलों. नवलगुंद

---

1 पत्र गणपतराव कोन्हेर यांचें लष्करांतून मिरजेस.

वगैरेचें बोलणें ठरत आहे. तें होतांच मग कोठें जातात पहावें. संपगांवे बागेवाडी व टीकरी खानापूर सोडावें असें तहांत ठरविलें. राजश्री बळवंतराव तेजे यास चार दिवस ज्वर येत आहे. वडिलांस कळावें म्हणून विनंती लिहिली आहे. बहुत काय लिहिणें. लोभ करावा हे विज्ञापना.

नं. ७०६२. श्री. (१५ मे.)

पै. छ. १९ सफर. वैशाख. सन खमस सबयातैन.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. ता॥ वैशाख वद्य २ पावेतों वर्तमान क्षेम. श्रीमंतांची स्वारी आपासाहेब[1] यांस पुण्यांत ठेऊन व मुत्सद्दी सर्व ठेऊन श्रीसोपानदेव, कसबें सासवड येथें समाध आहे, त्यास घांट व उपकरणीं रुप्याचीं यात्रयाकरितां वैशाख शु॥ १४ बारा घटका रात्रीस स्वारी गेली. दोन चार रोजीं स्वारी माघारी पुण्यासी येणार आहे. चैत्र शु॥ ५ ता॥ एकादशीपावेतों सिंदे होळकर यांच्या लढाया पलटणासी जाहल्या. सिंदे यांनीं मोठी कस्त केली. आठ दहा पलटणांचा तसनस करून खासा धरून आणिला. त्याचें नांव लाट म्हणतात. पलटणें व बुणगें व स्वारसुद्धां फडशा केला. याप्रमाणें बोलवा आहे. नगर किल्याजवळील सवासे पर्यंत तोफा खालीं पनवेलीस नेल्या. त्याजप्रमाणें बारा तोफा लहान थोर अशा मागती पुण्यास आल्या. दोन रोज जाहले. नगरास जाणार. किल्ल्यावरील व शिंदे यांच्या ठेवणीच्या हिंदुस्थानास जातांना ठेवविल्या त्या परत मागती आणविल्या असें बोलतात. कळावें बहुत काय लिहिणें, शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ७०६३. श्रीगुरु. (१६ मे.)

पै. छ. २३ सफर. सन खमस. वैशाख.

[2]विज्ञापना. तागायत वैशाख वद्य ३ बुधवार पावेतों स्वामीचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. येथील वर्तमान तरी श्री. राजश्री [3]बाबासाहेबांची स्वारी सासवडास गेली. समागमें गोखले

१ पेशव्यांचे धाकटे बंधु चिमाजीआपा. २ पत्र पुण्याहून मिरजेस. पत्रलेखक अगदीं अशिक्षित मराठा असावा. सर्व चुका दुरुस्त करून पत्र छापलें आहे. ३ बाजीराव पेशव्यांची.

मात्र गेले. वरकड कारभारी श्री. आपासाहेब, बाईसाहेबसुद्धां येथें आहेत. श्रीदेवास घांट बांधावयाचा म्हणोन गेले. आपण म्हणाल कीं अस्त आहे, घांट कसे बांधतील, कार्यानिमित्त गेले म्हणोन अंदेशा घ्याल, तरी कार्य नाहीं. लवकर सात दिवसांत यावें असा करार करून गेले आहेत. लवकर येतील. गुंता नाहीं. तेथें सहस्रभोजनें करावयाचा बेत दिसतो. इंग्रजांच्या घरीं होळकराची बातमी विचाराल तरी मोदी यांणीं सांगतात कीं, होळकर दहा पांच हजारांनिशीं आहे. परंतु पळत फिरतो. उभा राहत नाहीं. भरतपूरवाले जाठाचा व इंग्रजांचा सल्ला जाहला. पन्नास लाख रु. जाठापासून घेऊन मोर्चे भरतपूरचे उठले. असें बोलतात. परंतु नगरास दोन चार हजार लोक जमले आहेत. येथें दोन पलटणें व पन्नास साठ तोफा येथें आले होते व कांहीं इंग्रज नगरांत जखमी वगैरे होते. जखमी आजारी असे शंभर म्याने (मेणे) ममईस गेले. दोन हजार लोक येथें आले होते ते पुनः नगरास गेले. आज चार दिवस जाले. तांब्याच्या नावा पन्नास पाऊणशें सुमार नगरास गेल्या. याप्रमाणें बातमी आहे. रा. कुंजर यांजकडील कारकून बाळाजी धोंडदेव हे पुणेहून शिंदेचे लष्करास बाळाजी बावाकडे गेले होते. श्रीमंतांनीं पाठविले होते ते परवांचे दिवशीं येथें आले. शिंदे यांच्या दोन चार तोफा थोर उज्जनीस आल्या त्याजबरोबर आले. त्यांणीं सांगितली बातमी— शिंदे होळकरास भेटावयास गेले. एक जाहले. यासी गुंता नाहीं. शिंदेपाशीं वीस हजार फौज; पांच हजार पलटणचे लोक दहा हजार पेंढार आहे. खर्चास नाहीं. होळकराची फौज झाडून चाळीस हजार आहे. भरतपुराजवळ आहे. उभयतांस खर्चास भरतपुरवाला जाठ देत आहे. इंग्रजांची लढाई होळकरानें चांगली केली. दहा पंधरा हजार इंग्रज पलटणसुद्धां आहेत. पैकीं पांच सात हजार लोक ठार जाले. खासा लीखसाहेब व त्याचा पुत्र असे खुद्द सरदार ठार जाहले. आणखी बहुत लोक ठार व जखमी जाले. दहापंधरा असामी कैदेंत होळकर यांणीं ठेविले. तहाचें बोलणें लागलें आहे म्हणोन सांगितलें. आणखी कलकत्याहून दहा वीस हजार लोक घेऊन दुसरा सरदार निघाला असें वर्तमान होतें. मार्गी आजंट्याच्या घांटावरील मोंगलाकडील लोक चार पलटणें गेलीं. नगराहूनही दोन हजार लोक गेले. ते हे मार्गी

भेटले. याप्रमाणें बाळाजी घोंडदेव व सखोपंत म्हणोन वैजनाथभट मामाचा मेहुणा तोही आला. त्याणींही याप्रमाणेंच सांगितलें. काल निघोन सासवडास श्रीमंतांकडे गेले. तहाचें बोलणें लागलें खरें. येथील कारभारी लहानथोर आपलीं कुटुंबें मात्र काढतात. वरकड कोणी काढीत नाहींत. दुसरी बातमी— रा. भाऊ दातार यांजकडील विठ्ठलपंत भिडे म्हणोन रा. बापूजी निंबाळकर वाठारकर म्हणोन मातब्बर सरदार सिंदेचे चाकरीत आहेत त्यांजकडे हे कारकून आहेत. त्यांचें पत्र चैत्र व. १ मितीचें आलें. तें पत्र मी आपले दृष्टीनें पाहिलें. त्यांतील मजकूर कीं, मुक्काम सब्बळगड प्रगणें ग्वालेर, होळकराचा मुक्काम भरतपुरास आहे. तेथें शिंदेचे कारभारी गेले आहेत. दोन दिवसांत पत्रें येतील. नंतर खासे शिंदे भेटीस जाणार. आठ चार दिवसांत भेट होईल. तहाचें बोलणें इंग्रजांकडून लागलें आहे. काय होतें पहावें म्हणोन पत्र आहे. त्यावरी रा. सदाशिव नाईक वानवळे यांचा कारकून कचेपंत म्हणोन बापूजी निंबाळकरांकडे कांहीं कामाकरितां गेला आहे. त्याचें पत्र परवांचे दिवशीं चैत्र व. ५ मुक्काम सब्बळगडचें आलें. त्यांत लिहिलें आहे कीं, अंबोजी बावा इंगळे यांची भेट बापूजी निंबाळकर यांचे विद्यमानें जाली. येणेस अनमान करीत होता. सर्जेराव याचा कारभार याकरितां भरंवसा येत नाहीं म्हणोन आड घरली होती. त्यास बापूजी निंबाळकर दरम्यान होऊन भेट जाली व होळकराची भेट जाली. फौज भरतपुरावरी ठेवून पांच हजार फौजेनिशीं खासा सडा आला. भेट जाली. इतक्यांत इंग्रजांकडील पांच सहा हजार लोक शिंदेवरी तयार होऊन आले म्हणोन बातमी आली. त्याप्रमाणें होळकराचे फोजेवरीही तिकडे गेली अशी बातमी आली. तेव्हां दौलतराव शिंदे खासे सडे तयार जाले. बायकामुलें वगैरे बुणगे अंबोजीबावांचे स्वाधीन करून पुढें गेले. कचेपंतास निंबाळकर बुणग्यांत राहणें म्हणोन सांगत होते परंतु आपण राहिलों नाहीं. सडे स्वारीसमागमें आलों. पुढें काय होईल तें मागाहून लिहितों. याप्रमाणें बातमीचीं पत्रें आलीं. तें शेवेशीं विनंती लिहिली आहे. मी दोन तीन दिवसांत निघोन सेवेशीं येतों. बाजारी बातमी चैत्र व. ९ ची लढाई जाली. इंग्रजांचा नाश बहुत जाला असें बोलतात. कळावें हे विज्ञापना.

नं. ७०६४ श्री. (वैशाख व. ४–१७ मे.)

पौ छा २७ सफर. सन खमस.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेसी.

[१]बाळकृष्ण हरी कृतानेक साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा १७ सफर मुकाम लष्कर नजीक चिंचवड येथें स्वामीच्या कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामीची आज्ञा घेऊन निघालों ते पुण्यास आलों. तों जनरेल वसलीसाहेब बाहादूर मुंबईस आहेत असें कळलें त्यापक्षीं तेथेंच जावें, या बेतानें दुसरे दिवशीं निघोन पुढें चालता झालों. छा ८ सफरीं पनवेलीस गेलों. तेच दिवशीं इकडे येण्याकरितां जनरल-साहेब पनवेलीस अस्तमानीं आले. दुसरे दिवशीं कूच करून चौकाच्या मुकामास आले. मींही समागमें येऊन चौकावर भेट घेतली. पत्रें पावतीं करून फडकें प्रकणीं सरकारांत पत्रें पाठविलीं असतां उत्तर न आलें व राजश्री बळवंतराव व दिनकरपंत याजवळ श्रीमंतांची आज्ञा होऊन त्यांनीं राजश्री बाबोजीपंत व अंताजीपंत यांजवळ सांगितलेला मजकूर उभय-तांनीं तेथें लिहिला होता. तो भाव बोलून कितीएक दोस्तीचे भाव बोलून वचन पार पाडणें हें आपणाकडे आहे असें बोललों. त्यांनीं सम-जोन घेऊन व पत्रांतील भाव ध्यानांत आणून आम्ही पुण्यास येतों, तेथें समजोन सांगणें तें सांगूं म्हणोन उत्तर केलें. मर्जी बरीच होती. पुण्यास आल्यावर काय तें समजोन उत्तरें पाठवावीं म्हणोन चार दिवस वाट पाहिली. छा १२ रोजीं मुकाम मजकुरास आले. पुण्यास जाण्याचें लांबणीवर पडलें. याकरितां मागती उत्तर विचारलें. त्यास कर्णेलसाहेबास लिहिलें आहे. उत्तर आल्यावर सांगतों म्हणाले. त्यासही एक दोन दिवस जाहल्यावर आणिक विचारावें म्हणोन गेलों. तेव्हां राजश्री गोविंदराव यांनीं सांगितलें आपण कशास विचारावें ! ते होऊन सांगतील. तें सम-जोन उत्तर करणें तें करावयास येईल. त्यावरून न विचारतां झालें वर्तमान सेवेसी कळावें याकरितां लिहिलें आहे. यांचा आग्रह कांहीं दिसत नाहीं. परंतु पुण्यांतील आग्रह पडल्यास काय म्हणतील पहावें. आंतूनही

१ पत्र मिरजेस बाळासाहेबांस.

घरबंदीचा विचार प्रहात आहे. त्या डौलास येऊन कार्य होतें असें झाल्यास विनंती लिहितों, त्याप्रमाणें तरतूद व्हावी. येविसीं त्यासही सुचऊन ठेवावें. येथें बोलण्यांत येईल त्यांत हिसका बसूं नये. याकरितां आगाच विनंती लिहिली आहे. स्वामींनीं मुंबईहून जिन्नस वगैरे आणावयाची यादी दिली आहे व देव्हाऱ्याच्या पत्त्याविसीं पत्रें दिलीं. परंतु तेथें जाणें न झालें, याकरितां सारेंच राहिलें. वरकड श्रीमंत राजश्री बाबासाहेबास लिहिलें, त्याजवरून कळेल. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञापना.

---

नं. ७०६५ (चैत्र व. ६—१९ मे.)

उतारा—पत्र शिरहट्टीहून रामचंद्र परशराम यांचें मिरजेस. छ. १९ सफर सन खमसचें.

"रा. रामचंद्रपंत कोटबागी यांचा मुकाम सावनुरानजीक आहे. अद्यापि सावनूर त्यांचे स्वाधीन जालें नाहीं. गोखले इतके दिवस हुबळी-नजीक होते. हल्लीं मिश्रीकोट्याकडे गेले. त्यांचें व रामचंद्रपंत यांचें सरकारचे सनदपत्राप्रमाणें सुप्रयुक्त समेटांत येईल, परभारें डोवटास जाईल, असें दिसत नाहीं. आंतून आपले टाण्याची बंदोबस्ती करणें ती गोखले यांणीं केलीच आहे, यांची त्यांची कटकट वाढेलसें दिसतें. इंग्रज अद्यापि आपले जाग्यावरच आहेत. कुमकेस येण्याविशीं रामचंद्रपंतांकडून कारकून कागदपत्र जावयाचा शिलशिला चालला आहे. काय घडतें पहावें. निपाणकर मनोळी तालुक्यांत मुरगोडास आहेत."

---

नं. ७०६६ श्री. (वैशाख व. ७—२१ मे.)

पै॥ छ॥ २१ सफर. सन खमस. वैशाख.

[1]विज्ञापना. श्रीमंत पंतप्रतिनिधि याणीं राजश्री बळवंतराव फडणीस यांस कराडाहून मसुरेस बोलाऊन नेलें. फडणीस पंताकडे जाऊन कचेरीस बसलें होते. पंत बोलतां बोलतां ताईं भरानें बळवंतरावें यांजवर कमरेचें पेष कबज उपसोन मारतों म्हणून उठले. तेव्हां जवळ भवानजी घाटगे होते. त्यानें पंताचें मणगट धरून मार्गे काढिलें. आणि बलवंतराव यांसीं

---

१ बाळाजीपंत दामले यांचें पत्र रहिमतपुराहून मिरजेस.

बाहेर लाऊन दिलें. याप्रमाणें मजकूर चार दिवस जाहले जाहला. बळवंतराव बंदोबस्ताकरितां प्रस्तुत मसुरेसच राहिले आहेत. म्हणून वर्तमान येथें ऐकीव आलें तें लिहिलें आहे. कोणी म्हणतात चौकीचे लोक फितले होते. पक्कें वर्तमान कळलें नाहीं. कळावें हे विज्ञापना.

---

नं. ७०६७ श्रीगणपतिर्जयति. (वैशाख व. १२–२५ मे.)

तीं. मातुश्री बाई वडिलांचे सेवेसीं.

[१]अपत्यें चिंतामणीनें शिरसां नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. २५ सफर पर्यंत वडिलांचे आशीर्वादें वर्तमान यथास्थित असे. विशेष. बुरुडकवठेचे मुक्कामाहून परवां विनंतीपत्र पाठविलें होतें तें प्रविष्ट होऊन सविस्तर मजकूर निवेदन जाहलाच असेल. कित्तूरकरांकडील जाबसालाची ओढ दिसत होती परंतु त्या रोखें कूच करून गेल्यामुळें त्यांस जरब पडून रा. सखोपंत काळे तेथें होते त्यांस तोडजोडीचीं बोलणीं बोलोन पाठविलें. मशारनिल्हेनीं ऐवजाचा उगवणीचा प्रकार कांहीं सावकारी निशा बाकी रोख याप्रमाणें खातरजमा केली त्यावरोन हिरे चंदगड येथील अंमल सरकारचा असतां अलीकडे आडदूरकर देसाई याणीं बळकाविलें आहे. त्यांजकडून कांहीं संध.न आलें होतें व किल्ले कलानिधि येथीलही जाबसाल आहे यास्तव चि. राजश्री विठ्ठलराव[२] बापू याबरोबर रा. अंताजी हरि कानिटकर यांस लोकसुद्धां व नेरलीकरांकडील स्वार व दोन तोफा पायदळ येणेंप्रमाणें सरंजाम देऊन चिरंजीवाची रवानगी तिकडे करून अण्णीगिऱ्याकडे येऊन तेथील पांच रु. उत्पन्न होऊन यावयाचें आहे. तें घेऊन माघारें फिरावें हा विचार चित्तांत आणून कूच करून एकादशी भृगुवारीं होराबेडी होंगल ता. नवलगुंद येथील मुक्कामास आलों. येथून अण्णीगिरें पांच सात कोश आहे. हिरे चंदगड येथील जाबसाल उलगड्यांत आणून लौकर गोकाकेकडे यावें येविशीं चिरंजीवांस सांगितलें आहे. ती. राजश्री गणपतराव[३] दादा वडिलांची आज्ञा घेऊन लोकसुद्धां

---

१ पत्र सांगलीकरांचें लष्करांतून मातुश्री लक्ष्मीबाई यांस. २ विठ्ठलराव पांडुरंग. धाकडे बंधु. ३ गणपतराव कोन्हेर कुरुंदवाडकर.

निघाले ते ऐवजसह येऊन सुखरूप पावले. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ७०६८ श्री. (वैशाख वं. १३–२६ मे.)

पौ छा। २६ सफर. सन खमस.

[१]सेवेसीं विनंती सेवक महादाजी विश्वनाथ कोल्हटकर. विज्ञापना असीजे. नेमाण्णा जैन यांचें मूल चार वर्षांचें आहे. त्यास पुण्याकडील रजपूत यानें धरून मुजुमदार यांचे वाड्यानजीक खेडकर आहे तेथें नेऊन दागिने काढून घेतले आणि पुढें मारून टाकणार तों पोर आरडलें. तेव्हां वाटेचे लोकांनीं पाहिलें. मग उडी टाकून हुपरीकर यांचे आवारांत पळोन गेला. त्याचे लोकांनीं धरून आणिला. तो सेवेसीं पाठविला आहे. नेमाणाचा मुलगा दागिने सुद्धां नेमाण्णाचे हवालीं केला. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ७०६९ श्रीगणपति. (वैशाख व. १४–२७ मे.)

पै. छ. २७ सफर. वैशाख मास. सन खमस.

[२]पुरवणी. विज्ञापना. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. रत्नाकरपंत नि. करवीरकर वाडी प्रांतीं गेले. त्यांचे हस्तगत रेडीचा व भरतगडचा किल्ला जाहल्याचें लिहिलें तें कळलें. त्या संस्थानांत घरफुटीमुळें यांचा पाय शिरोन दोन्ही किल्ले यांजकडे आले. या उप्परीं तें संस्थान राहणें कठिण आहे. रा. बाबा फडके यांची प्रकृत बरी आहे म्हणोन लिहिलें तें कळलें. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ७०७० श्रीगणराज. (वैशाख व. १४–२७ मे.)

पै. छ. ५ रबिलावल. खमस मयातैन. जेष्ठ.

तीर्थस्वरूप राजेश्री काकासाहेब वडिलांचे शेवेसीं बालकें [३]विठोबानें

---

१ पत्र तासगांवाहून मिरजेस. २ पत्र राम. आपांचें जमखिंडीहून मिरजेस. ३ विठ्ठलराव पांडुरंग यांचें पत्र मिरजेस चुलते बाळासा. यांस.

चरणांवर मस्तक ठेऊन सिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. ता। छ. २७ सफर पावेतों वडिलांचे आशीरवादें करून क्षेम असे. विशेष. वडिलांकडून अलीकडे पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. त्यास सदैव पत्र पा। बालकाचा सांभाळ करीत जावा. यानंतर इकडील मजकूर तर, तीर्थस्वरूप राजेश्री आपासाहेब यांची स्वारी बुरूडकवळ्याचे मुकामाहून कूच करून गजेंद्रगडाकडे गेले. मला आज्ञा जाहली कीं, हीरे चंदगड याकडे जाणेविसीं जाहली. त्याजवरून छ. २५ सफरीं चालता जाहलों. मजबरोबर आम्हाकडील तीनशें लोकांचें पथक व राजेश्री अंताजी हरी कानीटकर याजकडील व आपलेकडील पथक व नेरलीकर यांजकडील पथक दोन तोफा व हजार दीड हजार पायदळ पर्येत आहे. वडिलांस कळावयाकरितां विनंती लिहिली आहे. त्याजवरून श्रुत होईल. शेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ७०७१ श्री. (ज्येष्ठ शु. ५ शके १७२६
१२ जून १८०४)

पै. छ. ३ रबिलावल. सन खमस मयातैन. जेष्ठ मास.

[1]शेवेसीं विनंती सेवक बाळाजी महादेव दामले. चरणांवर मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. २७ सफर वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजेश्री फत्तेसिंगराव माने यांचा मुक्काम कसबें रहिमतपूर एथें होता. त्यास छ. २४ सफरीं कूच होऊन किलेवर घनगडानजीक मौजे नेर एथें मुक्काम जाहला आहे. प्रांतांतील गुळें किल्याचे आसऱ्यानें राहिलें होतें. त्याजमुळें किल्याच्या माच्या लुटून जाळल्या. गुळें लुटलें. बुध पाचेगांवाकडे दंगा भारी केला आहे व किल्यास घासदाणा लाविला आहे. रोज तोफांची लढाई चालली आहे. किल्लेदाराकडून माने याजकडे बोलणें लागलें आहे. पंतप्रातिनिधि यांचा मुक्काम फौजेसुद्धां मसुरेस आहे. शेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

१ पत्र रहिमतपुराहून मिरजेस.

नं. ७०७२ श्रीगणपतिजयति. ( वैशाख व. १४–२७ मे.)

पौ छा। ४ रबिलावल. सन खमस.

[1]तीर्थस्वरूप राजश्री काकासाहेब वडिलांचे सेवेसीं. अपत्यें चिंतामणीनें शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा। २७ सफर पर्यंत वडिलांचे आशीर्वादें वर्तमान यथास्थित असे. विशेष. वडिलांकडून अलीकडे आशीर्वादपत्र आलें नाहीं. तीर्थस्वरूप राजश्री गणपतराव दादा आले त्यांनीं सांगितल्यावरून कळलें. इकडून कित्तूरच्या रोखें बुरलकट्याचे मुक्कामास गेल्यावर वडिलांस विनंतीपत्र पाठविलें होतें. तें प्रविष्ट होऊन सविस्तर निवेदन झालेंच असेल. लगत गेल्यामुळें तिकडून तोडजोडीचीं बोलणीं येऊन जाब बोलण्यांत आल्याअन्वयें उलघड्यांत आला. नंतर तेथून कूच करून छा। २३ सफरीं होंगलास मुक्काम करून, छा। २४ रोजीं जाडर हेबळीजवळ मुक्कामास येऊन रविवारीं कूच करून सडे बेहेट्टीस जाऊन हुबळीनजीक मुक्कामास आलों. आज इंदुवारीं आण्णीगऱ्याचे सुमारें सिरगोंदेनजीक मुक्कामास आलों आहें. येथून आण्णीगरें दोन कोस आहे. निपाणकरांनीं इकडील तालुक्यांतून ऐवज घेतला आहे. त्यापैकीं पांच रुपये उत्पन्न होतील. तें पाहावयाचें. होईल तें मागाहून सेवेसीं लिहितों. सेवेसीं विदित होय. हे विज्ञापना.

---

नं. ७०७३ श्री. ( ज्येष्ठ शु. ३–३१ मे. )

पौ छा। २ रबिलावल. सन खमस.

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसी प्रति [2]लक्ष्मीबाई. उपरी. चिरंजीव राजश्री आप्पाकडून अलीकडे कागद आले असल्यास मुक्काम कोठें आहे लिहावें व देसाई निपाणकर यांची फौज कांहीं करकंबें मंगळवेढ्याकडे आली आहे. जमाव किती आहे तें लिहावें म्हणोन लिहलें. त्यास चिरंजीव राजश्री आप्पाकडून छा। २५ सफरचें पत्र आलें तेंच पाठविलें आहे. त्याजवरून कळेल. अलीकडे चार दिवसांत पत्र आलें नाहीं. चिरंजीव राजश्री विठ्ठलराव बापू यांसमागमें दोन हजार फौज व दोन हजार पाय-

---

१ पत्र सांगलेकरांचें लष्करांतून मिरजेस. २ या पांडुरंगराव गोविंद यांच्या पत्नी.

दळ व दोन तोफा व राजश्री अंताजी हरी कानिटकर याजप्रमाणें सरंजाम देऊन हिरेचदगडे सरकारचीं ठाणीं घालावयास पाठविले आहेत. म्हणोन लिहिलें आहे. चिरंजीव अण्णागिरेचे सुमारें गेले आहेत. याजप्रमाणें लिहिलें होतें. राजश्री आप्पा देसाई दोन हजार जमावानिशीं करकंब तालुकेंत येऊन एक दोन गांव मारून पांच हजार रुपये घांस दाणा घेऊन मंगळवेढ तालुकेंत आले आहेत. आंब्याजवळून बाराशें रुपये घेतले. मंगळवेढें प्रांतांतील खेड्यास उपद्रव कहीचा करितात. घासदाण्याचा जाबसाल ठरऊन घेणें म्हणून निकड करितात. मंगळवेढेहून राजश्री मोरोपंत कर्व्यांचें पत्र निपाणीकरांस व निळकंठराव देसाई यांस पत्रें पाठविलीं. त्यांचें उत्तर आलें जे, पूर्वींपासून पटवर्धनांचा स्नेह आहे. आपले गांवास स्वारी कितुरास जाते समई घासदाणे घेतले सबब आम्ही घासदाणा घेणार अशीं बोलणीं बोलतात. मंगळवेढें थांत तीनशे शिलेदार व सातशें पायदळ जमाव केला आहे. कसब्यास उपद्रव व्हावयाचा नाहीं. बरोबर तोफा नाहींत. खेडेचा बचाव होणें कठिण आहे. चिरंजीवासही पत्रें पाठविलीं आहेत. वरकड मजकूर लिहावासारखा नाहीं. पुण्याहून सांडणीस्वार आज आला. आपले नांवचे लखोटे आहेत. प्रातःकालीं घेऊन येईल. बहुत काय लिहिणें. लोभ करावा.[1]

---

सुा सीत मय्यातैन व अल्लफचीं पत्रें:—

नं. ७०७४ श्री. ( तालीक. ) (ज्येष्ठ–जून.)

हिंदुस्थानाकडील पत्रें छ. १६ रबिलावलचीं भवराहोचे मुक्कामचें आलें. त्यांतील मजकूर होळकरांचे लष्करांत फितूर इंग्रजांनीं केला. त्यांत शिंदे यांजकडील लोक व पठाण चाकरी सोडून म्हणोन गेले ते फितुराकरितां गेले. त्याणीं एक दोन लढाया मारिल्या. इंग्रजांस हटविलें असा विश्वास दाखवून मग काल्पीनजीक यमुनातीरीं अगरसर येथें होळकरास सांगितलें, फिरंगी तह करतात. आपलें त्यांचें बोलणें व्हावें. + + + ( इंग्रजांनीं ) हुंड्या पन्नास लक्षांच्या पाठविल्या. भेट जाल्यावर यावे

---

१ पटवर्धनांना सुतक होतें त्यामुळें पत्रांत नमस्कार किंवा आशीर्वाद लिहिलेला नाहीं.

अशी निशा दिली. पठाणांनीं पन्नास लक्ष घेऊन होळकरास स्वाधीन करावें याप्रों बेत होऊन तह जाला. भेटीचे दिवशीं धरून द्यावें. चार हजार पठाणांचे लोक इंग्रजी चार पलटणें व चार हजार तुरुकस्वार आंत अडीचशें गोरे लखनौपावेतों मुख्य असामी नऊ भेटीस आले. होळकर यास बातमी समजली होती. त्यांनीं आपली पागा व शामतखानाचे लोक व भीरखान वगैरे तीस हजारपावेतों तयार केले होते. ते तीन कोसांवर रुसून म्हणोन तीन दिवस ठेविले. भेटीसमयीं सूचना केली. इंग्रजही डेऱ्यास आले. यशवंतराव शौचाहून येऊन भेट घ्यावी तों पलटणें तुरुकस्वार व पठाण आंत घेतले. आपण घोड्यावर बसले. शौचाहून आले नाहींत. पठाण व पागा येऊन सभोंवतीं घेरून फितुरी लोकांस बोलावून पारिपत्यें केलीं. पलटणवाले लढले. नाश पांच चार हजार लोकांचा जाहला. गोरे धरून बेड्या घातल्या. ज्या सावकारांवर हुंड्या ते काल्पींत होते व इंग्रजांची कोठी होती तेथें पलटणें सहा होतीं. त्यांची लढाई दुसरे दिवशीं होऊन मारलीं. सावकार धरोन घरें नागविलीं. काल्पी शहर लुटलें. यशवंतराव यांस तीन[1]--

नं. ७०७५ श्रीगणपति. (ज्येष्ठ शु. १२-८ जून.)

छ. ११ रबिलावल. सन सीत मय्यातैन. ज्येष्ट शुा १३.

[2]अपत्यें रामचंद्रानें शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. ताा छ. १० रबिलावलपावेतों यथास्थित असे. विशेष. कोंकणांतून रत्नागिरीकडून येक ब्राह्मण आला. त्याणें सांगितले कीं राा बापूजी रघुनाथ पटवर्धन चोराचे चौकशीकरितां कोंकणांत गेले होते. त्याणीं कांहीं चोर धरून नव्या बेड्या तयार करून चोरास घातल्या. त्यास नव्या बेड्या तुम्हीच करून चोराचे पायांत घातल्या याचें कारण काय? चोर सांपडले ते सुद्धां रत्नागिरीस पोहोंचते करावे. बेड्या घालणें पारपत्यें होणें तें येथें व्हावयाचें. याप्रमाणें मामलेदाराचें बोलणें पटवर्धन यांसी पडोन त्यांची त्यांची कटकट वाढोन गोळागोळी इकडील तिकडील जमावाची होऊन पटवर्धन यांस जखमा

१ पत्र पुण्याहून मिरजेस. पत्र अपुरें सांपडलें. २ पत्र जमखिंडीहून मिरजेस.

लागोन ते सांपडले. त्याजवरून मामलेदार याणीं रत्नागिरीस नेले. याप्रमाणें वर्तमान सांगितलें. विदित होय हे विज्ञापना.

नं. ७०७६ श्री. (ज्येष्ठ व १–१३ जून.)

पौ छा २२ रबिलावल. सन सीत.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेसी पोष्य [१]त्र्यंकटराव भास्कर कृतानेक साष्टांग नमस्कार. विनंती. येथील कुशल तागायत छा १५ रबिलावल पावतों आपलें कृपेंकरून यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष. हल्लीं आपल्याकारणें या प्रांताचे आंबे पाठविले आहेत. प्रविष्ट होतील. इकडील वर्तमान, राजश्री चिंतामणराव अप्पासाहेब यांची स्वारी कित्तूर तालुक्यांत येतांच संस्थानची खराबी समजावी आणि पुरातन संस्थानचें साभिमानाचें दुसरें घर नाहींच. आपले कृपेनें दिवस घ्यावयाचे. याखेरीज आम्हास निर्वाह नाहींच. सविस्तर विनंती करावयास कारकून पाठविला. त्याची विनंती ऐकून घेऊन अभयवचनही दिलें. येथें दरसाल पायमल्लय पडून संस्थानचे बहुतकरून गांव दिवेखेरीज आहेत! किंचित् पुण्याई यानें पांच चार गांवांस दिवे लागतात. अशी अवस्था जाहली आहे. परंतु हल्लीं आप्पासाहेब यांचे अंतःकरणीं श्रीप्रेरणा होऊन आम्हाविसीं ममता कारितात. असें जघन्य जाहलें. त्याजमुळें ऊर्जित दशा दिसते. असा भास जाहला. परंतु नष्टचर्या बलवत्तर विशेष. त्यापक्षीं आप्पासाहेब यांचें वचन आम्हाविसीं परतलें. हें जाहीर होऊन तालुक्यांत मुकाम घालून पांच चार गांव बाकीस राहिलेले, त्यांचा बंदोबस्त होऊन सारे गांव सारखे जाहले! आणि सावकारांचे पेंचीं गुंतून घासदाणा भरणा करून दिला. ही अवस्था जाहली. मध्यान्य कामास अभाव होऊन विचार राहिला नाहीं. होष्यमाणास इलाज काय ? वडीलपणा आपणाकडे. आपल्यास जाला मजकूर श्रुत करावा म्हणोन विनंती लिहिली आहे. सदैव पत्र पाठऊन सांभाळ केला पाहिजे. बहुत काय लिहिणें. कृपा निरंतर करावी हे विनंती.

---

१ भावे नरगुंदकर. पत्र मिरजेस बाळासा. स.

नं. ७०७७ श्रीगणपति. (ज्येष्ठ व. २-१४ जून.)

पौ छ. १६ रबिलावल. सन शीत मय्यातैन.

[१]विज्ञापना. ताा छ. १६ रबिलावलपर्यंत यथास्थित असों. विशेष. तीर्थस्वरूपाा राा [२]गणपतराव काका यांसी आलीकडे खर्चास पावलें नाहीं. घरीं खर्चाची हालाखी फार. यास्तव वडिलांकडे आले आहेत. चिरंजीव राा चिंतामणरावआपाही घरीं आले आहेत. त्यास आज्ञा होऊन काकास खर्च पोहोचून सेवा घेतली पाहिजे. [३]यांची रीत मोठी थोरपणाची आहे. वाडिलांस विदीतच आहे. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ७०७८ श्रीगणपति. (१५ जून.)

छ. १७ रबिलावल. सन सीत मय्यातैन. जेष्ठ.

[४]अपत्यें माहादेवानें शिरसाष्टाग नमस्कार. विज्ञापना. जेष्ठ वाा ३ भृगुवारपर्यंत यथास्थित असे. विशेष. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. पारिजातकाचे फुलाचे देठ नित्य काढून पाठऊन देत जावा म्हणोन आज्ञा. त्यास अद्याप फुलें फार येत नाहीं. थोडीं येतात. आणखी आठा दिवसांनीं चांगला भर येईल. आतां भोयास सांगितलें आहे. काय मिळतील ते देठ पाठवून देतों. प्रज्यन्य पडेल ते दिवशीं फुलें कुजतील. परंतु जीं सांपडतील तीं पाठऊन देणें. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ७०७९ श्री. (१७ जून.)

शेवेसीं धोंडो बापूजी जोशी. शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत ज्येष्ठ वद्य ५ पावेतों शेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. चिरंजीव सौभाग्यवती मथाबाई कन्या. इच्या घरीं बुधवारचे रस्त्यानें

---

१ पत्र राम. आपांचें जमखिंडीहून मिरजेस. २ गणपतराव कोन्हेर. चुलतपुतण्या त्रिंबकराव रघुनाथ कुरुंदवाडकर खर्चास देत नाहीं ही तकरार. पुढें इ. स. १८१५ सालीं गणपतरावांनीं सरंजामाची वांटणी घेतली. ३ हें उपरोधिक लिहिणें लिंब. कुरुंदवाडकर यासंबंधीं. ४ पत्र महादेव परशराम यांचें तासगांवाहून मिरजेस.

जात होतों. बारामतीकरांचे वाड्याचे दक्षिणेस रघोत्तमराव नबाबाकडील ह्यांनीं वाडा आठवले यांचा घेतला आहे. त्या वाड्यांत राजेश्री आनंदराव केशव नबाबाकडील वकील आहेत. त्याच वाड्यांत राजेश्री गोविंदपंत पोंक्षे रत्नागिरीचे सुभेदार यांजकडील कारकून दिनकरपंत त्याच वाड्यांत होते. रस्त्यांतून जातां आनंदराव बाहेरून आले. दरवाजा उघडोन वाड्यांत गेले. मीही गेलों. त्या वाड्यांत दिनकरपंत याजपाशीं कोकणचें वर्तमान पुशिलें. तों इतक्यामध्यें सरकारची चौकी दिवाणजीकडील व रास्ते यांजकडील मिळोन आली. चहूंकडे बंदोबस्त केला. आम्ही उभयतां विचारामध्यें पडलों. दिनकरपंत हे आपल्या आतेभावास ज्वर येत असे त्याचे समाचारास आले. मी त्याजकडे वर्तमान पुसावयासी गेलों होतों. चौकी आली. विचारामध्यें पडलों इतक्यांत रास्ते यांजकडील कारभारी राजेश्री नरसिंगराव भाऊ आले. त्याणीं वाड्यांतील बैदा पाहून आम्हांस पुसिलें. वर्तमान मागील सर्व सांगितलें. त्याणीं बाहेर काढून प्यादा बरोबर देऊन रास्ते याजकडे पाठविलें. तेथें राजश्री खंडेराव यानीं रुबरूं पुसिलें. त्यांची ओळख होती. सर्व प्रकार समजाविला. जबानी लिहून देणें असें सांगितलें. त्यावरून जबानी लिहून दिली.

तपशीलः—शेवेसीं धोंडो बापूजी जोशी मौजे कासें ता। सावडें तालुके रत्नागिरी कृतानेक साष्टांग नमस्कार. विज्ञापना. विशेष. राजेश्री आनंदराव केशव यांजकडे जावयाचें कारण काय असें पुसिलें. त्यास आपण त्या मार्गें कन्येच्या घरास जात होतों. आनंदरावही येऊन वाड्यांत गेले. दिनकरपंत निजवत पोंक्षे हे त्याच वाड्यांत पाहिले. त्यांजकडे कोंकणचें वर्तमान पुसावयासी गेलों. पोंक्षे यांची सून, आमची सून दोघी बहिणी. राजश्री बापूजीपंत पटवर्धन हे पोंक्षे यांचे गृहस्थ जप्ती निमित्यें करितात. आमचे व्याही याचें वर्तमान काय हें पुसावयासी गेलों होतों. इतर कांहीं नाहीं असें लिहून मिती घालून दिलें. तें रास्ते याणीं पाहिलें. दिनकर यांचा जामीन घेतला. घरास जावें असें सांगितलें. राजेश्री बाबजीपंत पटवर्धन माझें वर्तमान ऐकून रास्तेचे वाड्यांत गेले होते. त्यांची माझी तेथें गांठ पडली नाहीं. तुम्ही जावें. सत्वरच कारकून येतील असें त्यांस रास्ते याणीं सांगितलें. मी जबानी लिहून देऊन घरीं

आलों. इतके कारभारास चार घटी लागल्या. सर्व गांवामध्यें पटवर्धन यांजकडील वकील कारकून सांपडले आशी आपवा उठोन बहुत जण बाबजीपंत यांजकडे मजकडे पुसावयास आले. कसा प्रकार घडला असें समजलें पाहिजे यास्तव जादा मजकूर शेवेसीं लिहिला आहे. मी कांहीं त्या गृहस्थाकडे कुव्या भावानें गेलों नाहीं. राजश्री आनंदराव यांची ओळख आहे. त्यांजवर काय दोष सरकारचा आला न कळे. हा प्रकार ज्येष्ठ शु १५ बुधवारीं सायंकाळीं झाला. कळावें शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७०८० श्री. (ज्येष्ठ व. १०–२२ जून.)

पै. छ. २९ रबिलावल. सन सीत मय्यातैन. ज्येष्ठ.

राजश्रिया विराजित राजमान्य राजेश्री गंगाधराजी स्वामीचे शेवेसीं पोष्य सिद्धेश्वर[1] महिपतराव साष्टांग नमस्कार. विनंती. एथील कुशल तागायत छ. २४ रबिलावलपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. अलीकडे पत्र येत नाहीं. त्यास सदैव पत्र पाठवून समाचार घ्यावा. इकडील वर्तमान किचूरकर याणें जमाव पाठवून बागेवड व संपगांवास ठाणीं घातलीं. अनगोळचीं एक दोन खेडीं मारून परगण्याची खंडणी केली. शाहापुरास खंडणी मागत होते. कमावीसदार खंडणीचें बोलणें नीट न बोलत. तेव्हां शाहापूर तालुक्याचे एक दोन गांव मारिले. खंडणी न द्यावयाची त्या अर्थी गांव [2]जरारा करावा तेंही न केलें. बेळगांवास गुळें जाऊं नये या अभिमानानें सावधगिरी न केली व आम्हाकडेही कोणास पाठवावें, ज्या पक्षीं शत्रू आला आहे, एक विचार असावा जमाव न्यावा, ती गोष्ट करावयाची नाहीं. तेव्हां इकडोन तरी सांगोन पाठवावयाचें काय ? असें असतां छा १८ रबिलावलीं शाहापुरानजीक येऊन फौज राहिली. तेव्हां गांवांतील गुळें अनिवार निघोन बेळगांवास येऊं लागलें. गांवाबाहेर गुळें पडतांच लुटावयास धांवले. ते वेळेस इकडील जमाव

---

१ बिनीवाले. बेळगांवचे किल्लेदार. त्यांचें हें पत्र मिरजेस. २ जरारा= मोकळा.

ऐ. ले. सं. १५–३८

जाऊन गुळयाचा बचाव होऊन एकंदर गांवांत घेतलें आणि कित्तूरकरां-कडील जमावांत मुख्य होते त्यांजकडे सांगोन पाठविलें जर करितां गुळयास उपसर्ग जाहाल्यास तोफा सुरू होतील आणि तुमची आमची कटकट पडेल. तेव्हां त्याचा निरोप आला आम्ही नांव घेत नाहीं. त्यामुळें बचाव फार जाहाला. नंतर एकाएकीं गांवांत जमाव शिरावयास लागला. तेव्हां इकडून पांचपन्नास माणूस व दारूगोळी शाहापुरांत आम्हीं होऊनच रवाना केली. आम्हाकडील परशराम जमादार याणेंच मेहनत केली. आठ असामी आमचेकडील जखमी जाहाली. कमावीसदार जीव घेऊन गडांत गेले. गांवची लूट होऊन आग घातली. नासाडी भारी जाहाली. शेपन्नास घर गवताचें वगैरे जाळलें. नंतर दोन घटका रात्रीं जमाव लूट मुबलक मिळतांच पेठेंतून निघोन रात्रीसच माघारे जाऊन तारेहाळास उतरले. त्यावर चार तास रात्रीं शहापूरकर कमावीसदार राजश्री लिंबक-पंत याणीं सांगोन पाठविलें. लोकसुद्धां आम्ही येतों, परवानगी सांगवावी. त्यावरून कारकुनाबरोबर सांगोन पाठविलें. ते ठाणें घालीत नसतां तुम्ही आधीरपणा करून निघोन येतां हें चांगलें नाहीं. ठाण्याचा बंदोबस्त करून रात्रीं राहावें. जो सरंजाम पाहिजे असेल तो देतों. आणि जागा न सोडणें. उजाडल्यानंतर कोणासही लष्करांत पाठवावें. तहाचें बोलणें बोलोन उलगड्यांत आणणें. तुम्हाकडून बोलण्याचें सोयी पडल्यास एथें कोणासही लष्करांतून आणवून करावयास येईल. दोन रुपये मागत असतां ठाणें शत्रूस देणें चांगलें नाहीं. याजवर निघोन येणार तर सुखरूप येणें. जागा तुमची आहे. येणें त्याजवर आणखी लोक व दारू रवाना केली. त्यानंतर रात्रीं दम धरून राहिले. दुसरे दिवशीं पांच रुपये कबूल जाहाले. खंडणी ठरली. जमाव माघारा कित्तुरास गेला. सविस्तर आप-णास कळलें पाहिजे म्हणून लिहिलें आहे. बेळगांवचीं गुरें रानांत चराव-यास गेलीं होतीं तेथें पांचपन्नास काटक येऊन गुराख्यास तोडोन दोन चारशें गुरें नेलीं. तीं गुरें ब्रेलकुरगीस गेलीं. लालजी जाधव याचे घरीं गुरें ऐन जिन्नस पत्ता लाऊन आले. याप्रमाणें आहे. अद्यापही सुरळीत-पणा नाहीं. बहुत काय लिहिणें. कृपालोभ असों दिला पाहिजे. हे विनंती.

---

नं. ७०८१ श्री. (२४ जून.)

पै. छ. १ रबिलाखर. सीत मयातैन. आषाढ मास.

शेवेसीं धोंडो बापूजी जोशी. त्रिकाल चरणांवरी मस्तक ठेऊन सीर-साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागाईत जेष्ट बा। १२ पावेतों बालकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. पुंडलीक नाईक रास्ते वांईकर यांचे नातवाची कन्या आणून तिजला जानवसा नानावाडा दिल्हा. मंगळवारीं साडेसहा घटकांपूर्वी रात्रीं लग्न जालें. बुधवारीं सहा घटका पहाटेची गृहप्रवेश थोरल्या वाड्यांत केला. नंतर दोन घाटकांनीं उभयतां शुक्रवारचे वाड्यांत गेले. तेथें घटिकाभराहून बाईसाहेब नानाचे वाड्यांत रात्र कांहीं असतां आली. श्रीमंत प्रातःकाळीं आले. गुरुवारीं सुन्मुख जालें. आज सहा घटिका पूर्वरात्रीस वरात समारंभें वाड्यांत जाणार. वाड्यासभोंवते चिराखदान पणत्या वासे मारून ठेविल्या आहेत. आहेर सर्वत्रांचे घेतले. श्रीमंत राजेश्री गणपतराव बापू यांनीं त्रिवर्ग यजमानांचे आहेर केल्याचा मजकूर रा। बाबाजीपंत व बापूसाहेब याणीं वडिलांस लिहून पाठविलें आहे. याप्रमाणें समारंभ जाहला. यजमानांस पत्र लिहून लाखोटा करून पाठविला आहे. हा सांगलीस पाठवावया आज्ञा करावी. इकडे पर्जन्य चांगला झाला. मावळांतून पेरे जाले. कांहीं होणें ते पेरूं देत नाहीं. होळकर याजकडील राजेश्री खंडोपंत वकील आले. आज सायंकाळपावेतों भांबवडें येथें मु। येणार याजप्रमाणें बोलतात. बरोबर जमाव झाडून पांचशेंपर्यंत लहान मोठा आहे असेंही बोलतात. होळकर अजेमरीवर आहेत. हरनाथ उजयनीस आल्याचें बोलतात. वडिलांस कळावें. बहुत काय लिहिणें? शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७०८२ श्री. (२७ जून.)

पै. छ. ९ रबिलाखर. आषाढमास. सन सीत.

शेवेसीं धोंडो बापूजी जोशी त्रिकाल चरणांवर मस्तक ठेऊन सीर-साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागाइत आषाढ शु. १ पावेतों बालकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंतांची स्वारी पंढरपुरास शु. १ मंगळवारीं दोन प्रहर सुमारें निघोन गेली. वाड्यापासून बाराशें पावलें

अन्वाणी जोड्याशिवाय चालत मालोजी राजे यांचे हवेली सुमारें गेले. तेथें घोड्यावर स्वार होऊन सासवडास मुकामास गेले. आज तेथें मुकाम आहे. उदईक पुढें जाणार. राजश्री सदाशिव रामचंद्र जोशी कुरुंदवाडाहून सरकारांत बोलण्यास आले. इंग्रजांनीं भेट घेतली. [1]भाऊसी बोलणें जाहलें. परंतु गोष्ट ठरावांत आली नाहीं. लांबणीवर काम दिसोन आलें. सबब ते श्रीपंढरीस स्वारीबरोबर गेले. परंतु रा॥ सदाशिवपंत भाऊ नाहींत तेथें काम होईल. असा अर्थ नाहीं. यात्रा होईल असा भाव दिसतो. ती॥ रा॥ आन्यापा जोशीही समागमें गेले. राजेश्री विसाजी गोविंद लेले पुण्यास राजेश्री गणपतराव कानिटकर यांजकडे आले. त्याजकडील आडीच हजार रुपये पर्यंत तिकडे संधान करून पत्र वडिलांकडे त्याणीं घरीं पाठविलीं. नंतर श्रीमंतांकडे सूत्र रावजीचे विचारें त्रिंबकजी डेंगळे यांसी बोलोन केलें. त्याणें श्रीमंतांसी विनंती करून सरकारांत भेट घेतली. नित्य येण्यास परवानगी जाली. पांच सात वेळां भोजनासही पंगतीस नेलें. याप्रमाणें दोन मास जाले. हल्लीं स्वारीबरोबर कोतवाल घोडी बसावयासी देऊन बरोबर नेलें. भोजनाची सोय वगैरे नेमणूक मार्गी होणार आहे. याजप्रमाणें सोय लेले यांची जाहली. नित्य दर्शन आहे. वडिलांस कळावें. श्रीमंतांस सर्वांनीं आहेर केले. त्याजवर राजेश्री दाजीबा लिमये व राजेश्री सदाशिवपंत जोशी तात्या याणीं उभयतांनीं यजमानांचे आहेर केले. पागोटें, दुपटा, किनखाब, महमुदी, एक चोळखण, लुगडें साहा सणगें दर आहेरास दिलीं. कुरुंदवाडचा आहेर किंमत रुपये १८३॥ व सांगलीचा रुपये २९९॥ किंमत पडली. श्रीमंत राजेश्री [2]गणपतराव बापूंनीं सणंगें येणेंप्रमाणें दिलीं. शिवाय कंठी मोत्यांची दिली. शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७०८३ श्री. (आषाढ शु. १३–९ जुलै.)

पौ छ. १५ रबिलाखर. सन सीत मय्यातैन. आषाढ मास.

सेवेसीं शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. ता॥ छ. ११ रबिलाखर

---

१ सदाशिव माणकेश्वर दिवाणजी. २ गणपत परशराम तासगांवकर.

-मंगळवार प्रातःकाल प्रहर दिवस पावेतों सुखरूप असों. विशेष. वडिलीं छ. १५ व छ. २६ रबिलावलचीं पत्रें पाठविलीं तीं पावोन लिहिला मजकूर सविस्तर कळों आला. इंग्रजी वाचणार येथें कोणी नाहीं. याजकरितां पुण्यांत इंग्रजी वाचणारांचा शोध परभू अथवा शेणवी अशांतील असावा. [1]त्यांचे जातीचा असों नये. म्हणोन पत्रीं आज्ञा. ऐशास आज्ञे प्रमाणें शोध करीत आहें. परंतु कोणी मिळत नाहीं व आणखी शोध करीत आहें. सांपडल्यास लिहितों. कर्णेल कलोष यांजकडे काल गेलों होतों. त्यांचें बोलणें चिरंजीव रा चिंतामणराव आपा याजविशीं जालें. त्याचा सविस्तर बयाज उदैक तीर्थस्वरूप रा आपासाहेब यांस लिहितों व रायासही लिहितों. त्याजवरून सर्व ध्यानांत येईल. विदित होय. हे विज्ञापना.

---

नं. ७०८४ श्रीशंकरप्रसन्न. (आषाढ व. ८–१९ जुलै.)

पै. छ. २५ जमादिलावल. सन सीत मयातैन. जेष्ठमास.

[2]राजेश्री गंगाधररावजी स्वामीचे सेवेसीं विनंती. उपरी. आपण पुरवणी पत्रें पाठविलीं तीं पावलीं. राजेश्री बळवंतराव फडणीस यांणीं जमाव वर्धनगड बेबदल जाला म्हणोन पाठविला. त्यांची यांची झटपट होऊन [1]किल्लेकरी यांणीं हैबत नाईक व आणखी बेरड मिळोन दहा असामी भरोन किल्ल्यावर नेऊन तोफेचे तोंडीं दिल्हे. आसपास कोसीं दोन कोसीं स्वाऱ्या करितात व चिरंजीव राजेश्री चिंतामणराव आप्पा कित्तूरची खंडणी घेऊन एकादशीस एथें एऊन सांगलीस गेले व श्रीमंतांची स्वारी वांईस आलीयाचें व उत्तरेकडील वृत्त समजतच असेल म्हणोन लिहिलें तें कळों आलें. फडणीस याजकडील जमावाचा व वर्धनगडचा मजकूर आपण लिहिल्यावरून कळला. राजेश्री चिंतामणराव आप्पा आले, उत्तम गोष्ट जाली. श्रीमंतांची स्वारी पुणेयाहून ज्येष्ठ शुद्ध द्वितीयेस आली. चिरंजीव राजेश्री शामरावबाबा स्वारीसमागमें आले आहेत. गोखले वगैरे सरदार दोन हजारांचा जमाव बरोबर आहे. श्रीमाहाबळेश्वरास गेले होते व माहुली सातारीयास जावयाची बोलवा आहे. घडेल तें खरें. उत्तरे-

---

१ इंग्रजांचे जातीचा. ख्रिश्चन. २ माधवराव रास्त्यांचें पत्र वांईहून मिरजेस.

कडील तथ्य वर्तमान समजत नाहीं. बाजारी वर्तमान ऐकतों. आपणास कळावें. औषधाकरितां कुंडलीच्या मुळयाचें प्रयोजन आहे. त्यास जरूर मेळवून पाठवाव्या म्हणोन लिहिलें. त्याजवरून कुंडलीच्या मुळया शिलकेस आणून ठेविल्या त्याचें वजन पक्कें ८८१८९ एक शेर आदपाव पाठविल्या आहेत. प्रविष्ट होतील. आणखी व्हाव्या अशा असलियास लेहून पाठवावें. त्याप्रमाणें आणून पाठवावयास येतील. रवाना छ. २१ रबिलाखर. कृपालोभ करावा हे विनंती.

---

नं. ७०८५ (आषाढ व. ३०–२६ जुलै.)

पै. छ. २८ रबिलाखर. सन सीत. आषाढ.

उतारा—पत्र बागलकोटाहून मिरजेस माधवराव रास्ते यांचें.

"रा. भीमराव मुढरगी नि. संस्थान डंबळ जालेहाळ तालुकियांत खटला करून गांवगन्ना उपद्रव लावूं लागला. सबब चि. राजश्री बळवंतराव यासमागमें लोक पायदळ व दोन तोफा देऊन बंदोबस्ताकरितां पाठविले आहेत. अद्यापि मोहोल्ला जाला नाहीं. छपी लपी करून राहतो. समोर येऊन मोहोरा दिसूं देत नाहीं."

---

नं. ७०८६ श्री. (श्रावण शु. ५–३० जुलै.)

छ. ९ जमादिलावल. सन सीत मय्यातैन. श्रावण शु १० इंदुवासर. सेवेशीं साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. ३ जमादिलावलपावेतों स्वामींचे कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान तरी, होळकर व सिंदे यांजकडील पेंढार व फौज नर्मदा दक्षिणतीरास येऊन गोंडवण व खरगुणवती असेरीनजीक येऊन प्रांतांत खंडण्या घेऊन उपद्रव करितात. कर्णेल कलुप यांजकडील पलटणें व फौज बेदवाडीवर होती. माघारीं येऊन अजंठ्याचे घांटाखालीं तोडापुरावर आलीं. त्याजपासीं विंचूरकर फौजसुद्धां गेले आहेत. भोसलेही फौजसुद्धां सरदारांचे भेटीस जात होते. त्यास उभयतां सरदार माघारे गेले म्हणून भोसलेही नर्मदेचे दक्षिणेस बारा कोसांवर मुक्काम करून आहेत. कर्णेल कलुप येथें आले. त्याचें कारण तरी त्याला विलायतेहून हुकूम

आला जे श्रावण शुद्ध ५ पंचमी परयंत हिंदुस्थानचे मसलतीचा समेट करून तहानें अथवा जसें कळेल तसा करून समेटून घेणें. पंचमीपुढें मसलतसंबंधीं एक दाम मजुरा न देतां पारिपत्य करूं. याजवरून कलुष याणें हातीं, घोडा वगैरे आसबाब झाडून सिलक करून विकून सडा होऊन कारकून वगैरे यांचे दरमहा जास्त केले होतें. ते कमी करून व जास्ती शागिर्दपेशा ठेवला होता तो दूर करून सडे होऊन श्रीमंतांसी बोलणें केलें जें, तुमच्या भरंवशावर आम्ही पैक्यानें, सरंजामानें व फौजेनें खराबींत येऊन कुंपणीचे इतराजींत आलों. त्यास साहेबीं फौज ठेऊन होळकराचें पारिपत्य करावें. नाहीं तर होळकरासी तह करावा हें चांगलें. यावरून श्रीमंतांनीं उत्तर केलें जें तुमच्यानें होळकराचें पारिपत्य होत नाहीं. असें तुम्हीं सांगितलेवर पुढें जसें आम्हास कळेल तसें आम्ही करूं. याप्रमाणें उत्तर जालें. त्यास कलुष आपले ठिकाणीं बहुत अर्जुदे होऊन मजीद होऊन राहिले आहेत. श्रीमंतांची स्वारी पंढरपुरास जाऊन पुढें सोलापूर प्रांतीं जाणार. याप्रमाणें मजकूर ठरण्यांत येऊन श्रावण शु ८ अगर दशमीस निघणार असा बेत आहे. राजश्री बापूजी गणेश गोखले यांजकडेस पुणें शहरचा बंदोबस्त सांगितला आहे. त्यांस सरकार आज्ञेवरून चार पांच हजार प्यादे ठेऊन बंदोबस्त करण्याचा प्रारंभ चालला आहे. राजेश्री खंडेराव नरसी विंचूरकर याजकडेस खानदेश व बागलाण व गंगातीर हे प्रांत सरकारांतून सांगितले. कर्नाटक प्रांतींचे महाल दहाबारा लक्षांचे नेमून दिले आहेत. तूर्त सरकारची मर्जी गोखले व विंचूरकर यांजवर प्रसन्न आहे. श्रीमंत राजश्री चिंतामणराव अप्पासाहेब याणीं गोखले व निपाणीकर यांच्या सरंजामाच्या महालाकडील खंडणी घेतली म्हणोन श्रीमंतांची व कलुषाची मर्जी ठीक नाहीं. नगरास दोन पलटणें वगैरे सरंजाम होता. छ.४ मजकुरीं पुण्यास येऊन दाखल जाहला. याप्रमाणें येथील प्रकार आहे. उत्तरेकडील लष्करांतून छ. २५ रबिलावलचें पत्र आलें. त्याची नकल सेवेशीं अलाहिदा पाठविली आहे. त्याजवरून तिकडील मजकूर ध्यानांत येईल. गुजराथ प्रांतीं गायकवाड यांचें कडीचें ठाणें इंग्रजांनीं घेतलें होतें तें पुन्हां गायकवाड याणीं लढून ठाणें घेतलें. शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. करवीरकरांनीं पुन्हां फौज ठेऊन दंगा

सुरू केला आहे. म्हणून येथें वर्तमान आहे. त्यास कांहींएक इशाऱ्यानेंच दंगा सुरू आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७०८७ श्री. (श्रावण व. ११–६ आगष्ट.)

पौ छ. १८ जमा. वल. सन सीत.

सेवेशीं सा. नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. १० जमा. वल पावेतों स्वामींचे कृपावलोकनें वर्तमान यथास्थित असे. विशेष. दिल्लीकडील व झांशीकडील पत्रें आलीं त्यांतील वर्तमान तरी यशवंतराव होळकर अजमेरास जाऊन तेथें पिराची मान्यता करून कमान रात्रौ दरग्यांत ठेविली. प्रातःकाळीं पाहतां कमान चढलेली पाहिली. तेव्हां फिरोन दोन दिवस दोन कमाना उतरून पिराजवळ ठेविल्या. त्याही कमाना चढल्या आल्या व पिराचें अभय आलें जे तुम्हांस मी सर्व प्रकारें साहित्य आहे. याप्रमाणें अभय पिराचें घेऊन होळकरांनीं कूच करून चिरानेरच्या रोखें आले. शिंदेबहादुर झांशीनजीकच आहेत. इंग्रजांकडील वकील मालकणसाहेब कलकत्त्याहून आले आहेत. ते होळकरांशीं तहाचें बोलणें बहुत नरमपणें बोलतात. अद्यापपावेतों तहाची कलमबंदीची याद ठरून पक्का तह ठरल्याची बातमी लिहिली आली नाहीं. पेशजी डींगच्या मुक्कामीं फाल्गुनमासीं लढाई जाली होती. तेव्हां चारपांचशे असामी गोरे होळकरांस सांपडले होते. त्यांचीं नाकें कापून सोडून दिले होते. त्यांपैकीं दीडशे असामी जमादार वगैरे मातबर पुण्यास आलीं. तीं सर्व कलुप याणीं ममईस लावून दिलीं. ममईहून विलायतेस जाणार होते. त्यास ममईकर जनराल डकीणसाहेब याणें विचार केला जे, हे नकटे विलायतेस गेले असतां कुंपणीची मर्जी ठीक राहणार नाहीं. म्हणोन तारवांत बसवोन दीडशे असामी नकटे होते ते ममईच्या बाऱ्याबाहेर नेऊन बुडविले. ममईहून सावकारी व सरकारी सात झाजें मालसुद्धां चाळीस लाख रुपयांचा ऐवज घेऊन चिनईस जात होते. तीं झाजें दाक्षिणेस रामेश्वरच्या बंदरानजीक मद्रासच्या सुमारास गेलीं. त्यास पूर्वेकडून फराचिसांचीं झाजें येऊन तीं साती झाजें ममईचीं घेऊन गेले. त्यावरून ममईत बंदोबस्ती वगैरे होऊन बहुत खबरदारीनें इंग्रज आहेत. किल्ल्याबाहेरच्या बागा व

हवेल्या जमीनदोस्त करीत आहेत. नगराहून पलटणें वगैरे सरंजाम पुण्यास येऊन पट्टणाकडील पलटणें व तुरुकस्वार मिळोन दोन हजार-पर्यंत होते ते व पुण्यांतही तिकडील लोक होते ते झाडून पट्टणास पट्टण-च्या लोकांसुद्धां व तुरुकस्वारासुद्धां निघोन गेले. नगरच्या किल्ल्यांत रखवालीचे लोक आहेत. बाजत तेथला सरंजाम पट्टणाकडे रवाना केला. पुण्यांत पलटणचे लोक व तुरुकस्वार मिळोन सारीं चार पांचशे रख-वालीपुरते आहेत. भागानगरांत ताम्रमुख होते ते झाडून निघोन गेले. जातेसमयीं बाग वगैरे दोन तीन नवे इंग्रजांनीं केले होते ते व हवेल्या वगैरे वस्ती पेठ व बाजार हुसेन दरग्यांत व तलावावर वस्ती केली होती ती बाग तोडून व घरें मोडून गेले. नबाबाकडील कारभारी याणीं दोन चार लाख रुपये देतों, बाग व घरें आहेत तीं असूं द्या, म्हणोन सांगोन पाठविलें. परंतु त्याणीं मान्य केलें नाहीं. याप्रमाणें तेथील लिहिलें आलें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.[१]

---

नं. ७०८८ श्रीगणपति. (श्रावण व. १३–९ आग.)

छ. १२ जमादिलावल. श्रावण मास. सन सीत मय्यातैन.

[२]विज्ञापना. वडिलीं जमखिंडीच्या ठाण्यांत फितवा जाला आहे म्हणोन लिहिल्यावरून चौक्यांची बदली करोन सावधगिरी केली. परंतु फितव्याचा पत्ता लागला नाहीं. करवीरकरांकडून पांढऱ्याचे बोलण्याकरितां भगवंतराव शेडगाव, हैबतराव देवकांत्या दोघे आले आहेत असें समजल्या-वर त्यांजवळ चौकी बसविली. तेथें दुसरे दिवशीं करवीराहून त्यांज-कडे गडी आला. तो चौकीस सांपडला. त्यास आणोन चौकशी करितां पांढऱ्याजवळ चौकीस आहे. चार प्यादे होते. त्यांजकडे दहा वीस रुपये पांढऱ्याचे पोटास घालावयाकरितां आले. त्याजपैकीं येक प्यादा नित्य तांदूळ व मास आणोन करून घालीत होता व रुपये पावल्याची पावती

---

१ स. १९१८ सालीं कै. तीर्थरूपांनीं कै. तात्या केळकर यांच्या 'मराठे व इंग्रज' या ग्रंथास प्रस्तावना लिहिली तींत या पत्राचा उतारा घेतलेला आहे.
२ पत्र रामचंद्रपंत आपांचें जमखिंडीहून मिरजेस.

ऐ. ले. सं. १५–३९

त्या प्याद्यांपैकीं येक प्यादाची हातची चिठी.गेली होती ती सांपडली. त्याशिवाय जाजती कांहीं पत्ता न लागे. सबब दोघे नाईक होते त्यांस बेड्या घालविल्या व दोघांस कैदेंत ठेविलें. बाकी सात आठ प्यादे शासन थोडेंबहुत करून हत्यारें घेऊन निरोप दिला. पुढें पांढऱ्याजवळ खिजमतगारांची चौकी ठेविली आहे. विदित होय. विशेष कांहीं नाहीं म्हणोन थोर शासन केलें नाहीं. हे विज्ञापना.

नं. ७०८९ श्रीशंकरप्रसन्न. (श्रावण शु. १५–१० आगष्ट.)

पौ छा २५ जमादिलावल. सन सीत मयातैन. श्रावण मास.

[१]राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधररावजी स्वामीचे शेवेसीं पोष्य माधवराव अनंत साष्टांग नमस्कार. विज्ञापना. उपरी. एथील कुशल तागायत छ. १४ जमादिलावल पावेतों यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लिहीत असलें पाहिजे. विशेष. अलीकडे पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तर साकल्य लिहीत जावें. राजेश्री भिवराव मुंडरगी निसबत संस्थान डंबल.याणें जालिहाळ तालुक्यांत दंगा केला. सबब बंदोबस्तास चिरंजीव राजेश्री बळवंतराव यांस पाठविलें. त्याची लढाई होऊन मुंडरगीचा मोड जाला. शें दोनशें लोक ठार झाले. दोनतीनशें जखमी होऊन पन्नास राऊतांनिशीं निघोन गेला. कळावें. इकडीलही पंचवीस तीस असामी जखमी जाले. तोफेचे गोळयांचें प्रयोजन आहे. यास्तव राजश्री नारो.[२]विनायक यांस फर्मे आपल्याकडे पाठवावयाविषयीं पत्र पाठविलें आहे. त्यास शिलकेस गोळे असतील त्यापैकीं जे फर्म्यास उतरतील ते गोळे देवावे. त्यांची यादी करून त्याजेकडे देवावी. त्याप्रमाणें ऐवज पावता होईल. गोळयांचें प्रयोजन जरूर आहे. जितके मिळतील तितके देवावे. बहुत काय लिहिणें ! आपल्याकडे अधिकोत्तर वर्तमान असेल तें लिहून पाठवावें. एथें अलीकडे पुण्याचीं पत्रें आलीं नाहींत. कृपालोभ असावा हे विनंती.

नं. ७०९० श्रीशंकरप्रसन्न. (श्रावण व. ३–११ आगष्ट.)

पौ छा २५ जमादिलावल. सन सीत मयातैन. श्रावण.

---

१ माधवराव रास्त्यांचें पत्र बागलकोटाहून मिरजेस. २ उपनांव दामले.

राजेश्रिया [1]विराजित राजमान्य राजश्री गंगाधररावजी स्वामीचे शेवेसीं. पोष्य माधवराव अनंत साष्टांग नमस्कार. विनंती. उपरी. एथील कुशल तागायत छ. १७ जमादिलावल जाणून स्वकीय कुशल लिहीत असलें पाहिजे. विशेष. राजेश्री भिमराव मुंडरगी यांणीं जालिहाल प्रांतीं उपद्रव फार केला, यास्तव चिरंजीव राजश्री बळवंतराव यांची फौजसुद्धां रवानगी केली. तोफा बरोबर आहेत. परंतु पक्के पंधरा वीस शेरी गोळयाची तोफ पाहिजे. येविसीं राजेश्री नारो विनायक यास लिहिलें आहे. आपणाकडे कारकून येऊन कळवितील. तोफ सरंजामसुद्धां सिद्ध जाली म्हणजे आणावयाचा विचार करावयास येईल. अगत्य नदीपार होऊन आली पाहिजे. बहुत काय लिहिणें ? कृपालोभ करावा हे विनंती.

---

नं. ७०९१ (१९ आगष्ट.)

उतारा--पत्र पुण्याहून मिरजेस धोंडो बापूजी जोशी यांचें श्रावण व. ९ चें (सन खमस.)

"वाड्यांत राखी पौर्णिमेचा उत्साह केला. पांचशेंपर्यंत राख्या ब्राह्मणांस भोजन घालून हातास बांधोन एक एक रुपया दक्षणा दिली. नाच भोजनोत्तर करून घरीं गेले. शिवरात्रीस जागरण. वर्षापेक्षां ब्राह्मण अधिक होते. दर ब्राह्मणास पुतळी दिली. श्रावणमासचे संख्येची याद अलाहिदा पाठविली आहे."

---

नं. ७०९२ श्री. (नक्कल) (श्रावण व. १२–२१ आग.)

पौ छ. १ जमादिलाखर. सन खमस मय्यातैन.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री चिंतामणराव आपा स्वामीचे सेवेसीं--

पो सिद्धेश्वर[2] महिपतराव. साष्टांग नमस्कार विनंती. उपरी. येथील कुशल ता। छ. २५ जमादिलावलपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. रा। नारोपंत आपटे आपणाकडून शहापुरास आहेत. त्यांणीं जमाव करून

---

१ माधवराव रास्त्यांचें पत्र बागलकोटाहून मिरजेस. २ बिनीवाले बेळगांवचे किल्लेदार. त्यांचें हें पत्र सांगलीस.

जांबोटकर या वगैरे काटवाई मोडावयाची येविशीं चिंतामणराव आपांनीं आपणांस योजिलें असा डौल घातलाच होता. आम्हांकडे येऊन तोफ मागितली. आमचा आपला घरोबा. परस्परें तोफ द्यावी, जमाव द्यावा, असें पहिल्यापासून आहेच. त्याअन्वयें तोफ देवितों म्हणोन सांगितलें. श्रावण वा। दशमी गुरुवारीं तोफ घेऊन जावयास मशारनिल्हे जमाव घेऊन किल्याचे दरवाज्यास आले. तोफ स्वाधीन करावयास रा। विसाजी रघुनाथ यांस दरवाज्याबाहीर पाठविलें होतें. तोफ स्वाधीन केली. नारोपंत याणीं सांगून पाठविलें आंत येतों. त्याजवरून नित्यांत येण्याप्रमाणें सांगोन पाठाविलें. ते काहीं आरब घेऊन तिसरे दरवाज्यापर्यंत येऊन दरवाज्यांतील परदेशी वगैरे लोक तोडिले आणि तशीच चाल करून वाड्यावर येऊन आमचा दगा करून किल्ला हस्तगत करावा तों येथील लोकांनीं मारून काढिलें. तेव्हां नारोपंत रात्रीचा विषय भिंतीवरून उडी टाकून पळून गेले. आम्हांकडील लोक चांगले जायां जाहाले. सारांश दंगा करण्यांत कमी केलें नाहीं. वडिलोपार्जित रिणानुबंध त्याची पराकाष्टा जाहली ! रा। विसाजी रघुनाथ यांस धरून गळा कापीत होते, त्यांत कोणी आरबांनीं सांगितलें गळा कापूं नये. त्याजवरून शाहापुरास घेऊन गेले. ज्यंबिये मारले आहेत. वर्तमान आपणांस कळूनच जाहलें असेल ! बहुत काय लिहिणें ? लोभ असों द्यावा हे विनंती.

---

नं. ७०९३ श्री. (भाद्र. शु. २–२६ आग.)

पै. छ. ९ जमादिलाखर. सन सीत मय्यातैन.

सेवेशीं साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. १ जमादिलाखरपावेतों स्वामीचे कृपावलोकनें करून वर्तमान यथास्थित असे. विशेष. उत्तरेकडील वर्तमान तरी उभयतां सरदार यांचें व मलकण फिरंगी वकील यांचें तहाच्या कलमबंदीची याद ठरली ती याद मलकण फिरंगी यांजकडील ××× फिरंगी उभयतां सरदारांकडील येशवंतराव घोरपडे गुत्तीकर असे उभयतां याद तहाची घेऊन लीक फिरंगी याजकडेस मथुरेच्या मुक्कामीं गेले आहेत. तेथून याद कलकत्यास जाऊन तेथून रुकार होऊन सिक्के होऊन पुन्हां लीकसाहेबकडेस आली म्हणजे ती याद

घोरपडे घेऊन उभयतां सरदाराकडेस येतील. यांप्रमाणें तिकडील लिहिलें आलें आहे. होळकर यांणीं श्रीमंतांस पत्रें पाठविलीं आहेत जे शत्रूनें आपली हद्द सोडून सरकार अमलांत येऊन दंगा केला. त्यास श्रीमंतांचे प्रतापें करून शत्रूचें पारपत्य केलें. त्यावरून तह करण्याविसीं शत्रूकडून वकील येऊन बोलत आहे. त्यास सरकारांतून कांहीं एक मजकूर शत्रूसीं बंदोबस्ताचा बोलावयाची आज्ञा आल्यास पत्रीं तपशिलवार आज्ञा यावी. आज्ञेप्रमाणें बोलूं. येविसीं जरूर आज्ञा यावी. नाहीं तरी पुढें जसा प्रसंग दृष्टी पडेल त्याप्रमाणें सरकारआज्ञेप्रमाणें करूं. याप्रमाणें पत्रें सरकारांत आलीं व राजश्री सदाशिव माणकेश्वर व बळवंतराव नागनाथ व खंडेराव रास्ते वगैरे मंडळीस योग्यतेप्रमाणें येऊन सर्वांचे पत्रीं मजकूर लिहिला जे सरकारांत विनंती लिहिली आहे त्यावरून कळेल. त्यांस याप्रमाणें पत्रें तिकडून आलीं त्यावरून श्रीमंतांस व मंडळीस अंदेशा पडला जे पत्रें आल्याचा मजकूर करनेलास समजल्यास ठीक नाहीं. तरी पत्रेंच करनेलास नेऊन दाखवावीं. त्यावरून सरकारचें पत्र घेऊन सदाशिव माणकेश्वर करनेल याजकडेस जाऊन सरकारच्या पत्रांसुद्धां आपलेंही पत्र श्रावण वद्य १४ दाखवून आले. दुसरें वर्तमान तरी सदाशिव माणकेश्वर यांणीं करनेलास सांगितलें जे, मिरजकर यांणीं सरकार आज्ञा मोडून वर्तणूक केली आहे. त्याची याद पाठऊन देतों म्हणून बोलून येऊन मिरजकर यांणीं सरकार आज्ञा मोडून वर्तणूक केली त्यांस त्याचे जाबसालाचीं कलमें आठ बंद लिहिलीं. त्याजपैकीं सिराळ्याचा मजकूर व चाकरीस न येण्याचा मजकूर व मिरजेचे प्रांताची देशमुखीचा मजकूर व कित्तूर व गोखले व निपाणीकर यांच्या मुलखांतून खंडणी व कोकणांतील विजयादुर्गी तालुक्यांतील गांवचा मजकूर वगैरे लहान मोठीं कलमें आठ बंद लिहून करनेलाकडेस लाखोटा करून भाद्रपद शु॥ १ पाठऊन दिल्हा. करनेलानें याद वाचून उत्तर सांगून पाठविलें जे यादीप्रमाणें कलमें बोलतों असें सांगोन पाठविलें. त्यास पुढें राजश्री अंताजीपंत कानिटकर यांस यादींतील कलमबंदीचे जाबसाल करनेल पुसणार आहेत. त्यास येविसीं करनेलाचें व अंताजीपंताचें बोलणें जाहल्यावर. सविस्तर मजकूर अंताजीपंत सेवेशीं लिहितील त्यावरून

विस्तारें निवेदन होईल. सदरहू मजकूर पहाण्यांत आला. त्यावरून संकलित लिहिला आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. राजश्री बापूजी गणेश गोखले व त्रिंबकजी डेंगळे खिजमतगार निसबत सरकार या उभयतांच्या लोकालोकांसीं खटला होऊन परस्परें दहा वीस माणसें जखमी होऊन चाळीस माणूस ठार जाहलें. विशेष मजकुरावरून कज्या जाहला असा मजकूर ल्याहावा असा नाहीं. हे विज्ञापना.

---

नं. ७०९४ श्रीगजानन. (भाद्र. शु. ३–२७ आगष्ट.)

पौ छा १२ जमादिलाखर. सन सीत. भाद्रपद.

शेवेसीं विसाजीराम[१] गोखले शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा २ जमादिलाखरपर्यंत सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंतांची स्वारी श्रीपंढरपुरीं जावयाचा बेत होता म्हणोन फौज पुण्यास बोलाविली. तो बेत राहिला. उत्तरेकडील उभयतांची प्रबलता आहे. नगरचे इंग्रज आजिंठ्याचे घाटाखालीं सडा पांच पलटणें व दोन हजार तुरुकस्वार शिवाय मोगलांची फौज मिळोन आहेत. कर्णेल कलुप नागपुराहून आला. त्यानें पुन्हा एक वेळ पोक्त सरंजामानिशीं तिकडे जावें असा बेत जाला आहे. गोखले ह्यांसही निघण्याविषयीं वरचेवर सरकारचें सांगणें येतें. याणीं आपली बोलण्याची याद दिल्ही आहे. बोलण्याचा बंदोबस्त आठ चार दिवसांत झाल्यावर इंग्रजांबरोबर गोखले जाणार. विंचूरकरांसही पत्रें गेलीं आहेत. तेही इंग्रजांस येऊन सामील होणार. उत्तरेकडील उभयतांचें सामान भारी. याणीं किती सरंजाम घेऊन गेल्यास ते ऐकत नाहींत. वरकड मजकूर नवलविशेष आढळेल तो शेवेसीं विनंतीपत्र पाठवीन. शेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ७०९५ श्री. (भाद्र. शु. ७–३१ आगष्ट.)

पौ छ. ६ जमादिलाखर. सन सीत.

सेवेशीं सा. नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. २७ रबि. वलपावेतों स्वामीचे कृपावलोकनें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं आज्ञा-

---

१ विसाजीपंत हे बापू गोखल्यांचे चुलत चुलते. त्यांचें हें पत्र मिरजेस.

पत्र पाठविलें तें पावलें. बहुत आनंद जाला. उत्तरेकडील वर्तमान तरी विलायतेहून कलकत्त्यास कुंपणीचे कारभारी प्राचीन होते ते दूर होऊन हल्लीं कुंपणीचा कारभार कलकत्त्याचा वसलीकडे देऊन वसलीनें कलकत्त्यास येऊन श्रीरंगपट्टण व ममई व भागानगर व पुणें वगैरे ठिकाणची कर्णेलसुद्धां दूर करून बदली केली आहे व मलमण फिरंगी यांस सलूयाचें बोलणें होळकराकडेस पाठविलें आहे. तेथें दिल्ली व लखनौ व नागपूरकर भोसले व नबाब व टिपूच्या संस्थानासुद्धां बंदोबस्ताचीं बोलणीं पडलीं आहेत. त्यास तेथें पक्का तह ठरून लिहिलें येईल तें सेवेशीं लिहीन. सध्यां उभयतां सरदार अजमेरच्या अलीकडेस आहे. टोंकच्या किल्ल्यानजीक आहेत. इंग्रजांकडील लीकसाहेब पांच सात पलटणांनिशीं यमुनाकांठीं मथुरेनजीक आहेत. याप्रमाणें तिकडील वर्तमान लिहिलें आलें. रा. अंताजीपंत कानिटकर येथें दाखल होऊन श्रावण व. १२ करनेलाची भेट घेऊन कचेरीस प्रथम परस्परें खैरखुषीचीं भाषणें होऊन कर्णेलास थैली दिली. नंतर कर्णेल व बाबजीपंत व अंताजीपंत जोशी व कर्णेल व मोदीसुद्धां दुसऱ्या बंगल्यांत जाऊन कर्णेलाणीं दोष ठेऊन जरबेचीं भाषणें नरम गरम केलीं. अंताजीपंत याणीं उत्तरें त्याच अन्वयें केलीं. नंतर कर्णेलांनीं उत्तर केलें जे तुम्ही दोस्ती असावी म्हणोन आलां त्यास आम्हाकडून दोस्तीच आहे. याप्रों भाषणें प्रथम बैठकीस जालीं. पुन्हां आणखी एक दोन बैठकी होतील. नंतर बातमीत मजकूर समजेल तितका लिहूं. कर्णेलाचीं बोलणीं जालीं तो मजकूर बकाजी नाईक जासूद याणीं राजश्री सदाशिव माणकेश्वर यांस सांगितलीं. कर्णेलांनीं जरबेचीं भाषणें करून दोष ठेविले म्हणोन सांगितलें. त्यावरोन सदाशिवपंत याणीं चिंतोपंत देशमूख यांस सांगितलें जे पटवर्धन याणीं सरकार आज्ञेशिवाय प्रांतांत खंडण्या वगैरे कितीएक जाबसालें सरकार नुकसानीचीं केलीं आहेत त्यांची याद तपशीलवार निवडून देणें. त्याप्रमाणें श्रीमंतांस दाखवून कर्णेलसाहेब यांजकडेस पाठवूं. त्यांचे जाबसाल जाले पाहिजेत म्हणोन राजश्री चिंतोपंत देशमुख यांस सांगितलें. याप्रमाणें येथें वर्तमान आहे. विंचूरकर यांजवर श्रीमंतांची कृपा होऊन जरीपटका हुजूरचा देऊन खानदेश बागलाण वगैरे कर्नाटक प्रांत लाऊन दिले होते त्यास अलीकडे

विंचूरकर यांस फौजसुद्धां बोलावलें आहे व त्यांजकडील जरीपटका व मुलूख माघारा द्यावा हें ठरून सडे हुजूर असावे असें जाहलें आहे. या कारभारांत विंचूरकर यांजकडील बाळाजीपंत बाबा होते यामुळें नवीन च्यार लक्षांचे पेचांत येऊन बहुत गिरीबदारींत आहेत. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७०९६ श्री. (भाद्र. व. १–१० सप्टें.)

पै. छ. २५ जमादिलाखर. सन सीत मयातैन.

सेवेशीं साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. १६ जमादिलाखर पावतों स्वामीचे कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. उत्तरेकडील वर्तमान तरी, उभयतां सरदार फौजसुद्धां उज्जनीपासून उत्तरेस ऐशीं कोसांवर होनारगडानजीक आहेत. इंग्रजांकडील तहाच्या बोलण्यांतील कलमें व कित्येक बंदोबस्ताचे मजकुराचीं बोलणीं श्रीमंतांस समजाऊन हुजुरून आज्ञा होईल तो मजकूर परस्परें समजून तहाची याद ठरावी म्हणोन उभयतां सरदारांकडून राजश्री खंडोपंत व बाळोजी कुंजर व एक ताम्रमुख व येशवंतराव घोरपडे याप्रमाणें निघून महेश्वरास येऊन बऱ्हाणपुरास आले. म्हणोन पत्रें आलीं त्यावरून सेवेशीं लिहिलें आहे. श्रीमंतांची स्वारी उदयीक सासवडास जाऊन शु॥ १ माघारी येणार. सरदारांकडून सदरहू ग्रहस्थ येताहेत व भोसले यांजकडून एकजण बोलणार येत आहे. त्यांच्या व सरदारांकडील बोलणार येत आहेत त्यांच्या भेटी श्रीगंगेवर होऊन श्रीमंतांच्या भेटीस आश्विन शु॥ १० येऊन दाखल होणार. जमखंडींत फितूर जाहला होता त्यास श्रीमंत राजश्री आप्पासाहेब यांणीं बंदोबस्त करून पारपत्य करून जमखंडीहून स्वारी मिरजेस आली. नंतर येथें वर्तमान आलें आहे जे, मिरजेच्या किल्ल्यांत नवीन फितूर जाहला होता तो श्रीगणपतीच्या प्रतापेंकरून स्वामीस कळला. त्यावरून किल्ल्यासुद्धां स्वामींनीं बंदोबस्त केला म्हणोन ऐकिलें. त्यावरून बहुत संतोष होऊन सेवेशीं विनंती लिहिली आहे. त्यास किल्ल्याच्या बंदोबस्तीविशीं पेशजीं सेवेशीं सूचना बहुत प्रकारच्या लिहिल्या आहेत. त्या स्वामींच्या ध्यानांतच आहेत. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

---

नं. ७०९७ श्री. (भाद्रपद व. ७–१५ सप्टें.)

पौ छा २८ जमादिलाखर. सन सीत. भाद्रपद.

वडिलांचे सेवेसीं शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा २१ जमादिलाखर पावेतों सुखरूप असे. विशेष. करवीरकर याणीं राजश्री रघुनाथराव माने यांस कर्नाटकच्या सुभ्याचीं वस्त्रें दिलीं. भावे कारभारी याची फौज जमा होत आहे येविसीं पुरवणी पत्र वडिलांचें मला आलें. तेंच पत्र काल दोनप्रहरीं नेऊन कर्नल क्लोज यास दाखऊन पुढें विचार काय म्हणोन पुसिलें. त्यांनीं उत्तर केलें आम्हीं मुदाम हरकारे याजबरोबर पत्रें करवीरकरांस पाठविलीं आहेत. चार दिवस पत्रें जाऊन जाले. त्याचा जाब आल्यावर तुम्हास काय सांगणें तें सांगूं याप्रमाणें जालें. पत्रें नेटाचींच गेलीं आहेत. मिरज, सांगलीस फितूर जाला म्हणोन च्यार दिवस शहरांत मनस्वी बोलतात. याजकरितां विनंती लिहिली आहे. दोहीं जागेचा बंदोबस्त यथास्थित राहिला पाहिजे. दिवस विलक्षण. समयास कोण काय करील याचा भरंवसा नाहीं. जमखिंडीस फितूर जाला होता. परंतु तो समजून बंदोबस्त जाला म्हणोन इंग्रजांचे घरीं बातमी आली. परंतु वडिलांचे पत्रीं कांहींच लिहिलें आलें नाहीं. याजवरून चिंता लागली आहे. त्यास जसा जाला असेल तो मजकूर तपशीलवार लिहिण्याची आज्ञा जाहली पाहिजे. वडिलांचे प्रकृतीस आरोग्य जाल्याचें पत्र यावें. श्रीमंतांची स्वारी सासवडास जाऊन चार दिवस जाले. [1]उभयतांही गेले. स्वारी आल्यावर लिहितों. कुंजर बऱ्हाणपुरचे सुमारें आला आहे. अजंठ्याचे सुमारें येऊन पोचतील. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ७०९८ श्री. (भाद्रपद व. १३–२१ सप्टेंबर.)

पै. छा १६ रजब. सन सीत मयातैन. आश्विन मास.

शेवेसी [2]आबाजी हरी कृतानेक साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा २७ जमादिलाखर पावेतों स्वामीचे कृपावलोकनेंकरून वर्तमान

---

१ उभयतां = पेशवे व बंधु चिमाजीआपा. २ उपनांव किबे. पत्र पुण्याहून मिरजेस.

ऐ. ले. सं. १५-४०

यथास्थित असे. विशेष. चिरंजीवांनीं व राजश्री शेषगीर नाईक, तबीब व चिपलकट्टी या तिघांनीं मिळोन मिरजेहून ऐवज पुण्यास चार माणसांबरोबर नगदी व सोनें मिळोन साडा हजारपर्यंत पाठविला. तो पुसेसावळीनजीक न्हावीच्या घाटांत बेरडांनीं माणसें ऐवजसुद्धां लुटलीं. पुसेसावलीकर कामदार व गांवकर व बेरड यांस माणसांनीं सदरहू मजकूर सांगितला. त्यांणीं सांगितलें कीं, सोन्याचीं कडीं दोन देणें म्हणजे ठिकाण लावून देतों. परंतु पंतांची आज्ञा पाहिजे. त्यावरून चिरंजीव वगैरे पंतांकडे जाऊन मजकूर सांगितला. पंतांनीं पुसेसावळी आदिकरून गांवगन्ना रोखे करून गांवकरी व बेरडसुद्धां आणून चौकशी करीत आहेत. त्यास प्रतिनिधींची रीत व करणें सर्व स्वामीस माहीतच आहेत. त्यास स्वामी कृपाळू होऊन प्रतिनिधीकडील हरएक गांवचे पाटील कुलकर्णी धरून आणून ऐवजाची निशा करून घेऊन मग सोडावे. येविसीं आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. पूर्वीं राजेश्री माणीकचंद याचा ऐवज नेला होता तो दोन वेळ प्रतिनिधींनींच दिल्हा व स्वामीनींच मनावर घेऊन ऐवज घेतला. त्याप्रमाणें हाही ऐवज घ्यावयास आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. येविसीं शेवेसीं येऊन चिरंजीव विनंती सविस्तर करतील. शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७०९९ श्रीगजानन. (आश्विन शु. ५–२७ सप्टें.)

पै. छ. ८ रजेब. सन सीत. आश्विन.

सेवेशीं विसाजी [1]राम सा॰ नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. ३ रजेबपर्यंत स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील मजकूर रा. आनंदराव भाऊ यांजकडून सावनूर तालुक्याचे सरसुभ्याचे बोलावयास रा. हरीपंत फाळके आले होते. इंग्रजाचे मार्फतीनें सरसुभ्याचें बोलणें तीन लक्ष रु. टरलें. शिवाय दरबारखर्च. तूर्त लाख रु. रसद द्यावी असें ठरोन जसी चिठीची परवानगी घेतली. रा. आपाजी गोविंद यांणीं कित्तूर तालुका पेशजीं केला. त्या कारकीर्दीची बाकी पाऊण लक्ष रु. मशारनिल्हेकडे हुपरीकर यांचे आहेत.

---

१ हें गोखल्याचें पत्र पुण्याहून मिरजेस.

त्याजवर वरात द्यावी म्हणोन बोलणें पडलें आहे. सरसुभ्यासंबंधें अंबारी-सुद्धां हत्ती द्यावा असें ठरलें. 'राजश्रियाविराजित'[1] म्हणोन पत्रें त्याहावीं असें बोलणें आहे. ठरलें नाहीं. चिरंजीव राजश्री बापूची रवानगी दसऱ्यास हिंदुस्थानांत होणार असें ठरलें आहे. विंचूरकर यांस माघारें येण्याविशीं आज्ञापत्र जाणार. यांतील कारण विंचूरकर इंग्रजांचे कह्यांत वागत नाहींत सबब त्यास माघारे आणून गोखले यांची रवानगी होणार. उत्तरेकडील उभयतांची प्रबलताच आहे. गोखले यांजबरोबर हुजूर सनदी अक्कलकोटकर यांची फौज वगैरे तीन चार हजार फौज देणार. रा. खंडेराव रास्ते काशीस जावयास आज्ञा मागत आहेत. रा. धोंडोपंत गोडबोले यांची फौज तिकडे आहे त्याणीं मुलूख फार लुटला. बोभाट फार आले. त्यांचे यजमान येथें आहेत त्यांस इंग्रजांकडून व सरकारांतून ताकीद आली. त्याणींही फौजेंत पत्रें पाठविलीं परंतु बंदोबस्त होत नाहीं. सबब त्या फोजेचा बंदोबस्त फौज पाठवून करणार. सर्व प्रकारें सेवक पदरचा आहे. सेवेशीं श्रुत होय, हे विज्ञापना.

---

नं. ७१००  श्री.  (आश्विन शु. ५—२७ सप्टें.)

पै. छ. ८ रजेब. सन सीत. आश्विन.

वडिलांचे सेवेशीं शिरसां. नमस्कार विज्ञापना. तागायत छ. ३ रजेब भृगुवासर प्रातःकाळपावेतों सुखरूप असे. विशेष. वडिलीं छ. २३ जमादिलाखरचीं पत्रें पाठविलीं तीं छ. ३० मिनहूस पावलीं. त्याचीं उत्तरें बितपशील——

१ रा. रत्नाकरपंत करवीराहून बाहेर निघाले आहेत. याउप्पर सावंतांचे वाडी प्रांतीं जाणार अशी बोलवा आहे. म्हणोन पत्रीं आज्ञा. त्यास इकडे आवाडाव केली. आतां तिकडे सहजच जातील. आठ महिने तिकडे घालवितील. ईश्वर इच्छा ! कलम.

१ रा. बापू फडके यास चार सहा महिने समाधान नाहीं. क्षयाची

---

१ 'राजश्रियाविराजित' हा पत्रांत मायना लिहिण्याचा मान. पेशवाईंत कोणास कोणत्या मायन्याचीं पत्रें लिहावयाचीं हें ठरलेलें असे.

भावना. जेष्ठ मासापासून प्रकृत फारच बिघडली होती. अलीकडे प्रकृत बरी आहे. सरकारवाड्यांत जात असतात. कलम.

१ श्री. राजश्री पंतप्रतिनिधि यांजकडील मजकूर लिहिला तो कळों आला. रा. बळवंतराव फडणीस निघोन गेले. तेव्हां कळस तूर्त वारला. कलम.

१. इस्लामपुरीं गोडबोले यांजकडील लोकांची व मंत्रीकडील लोकांची कटकट जाल्याचें लिहिलें तें कळलें. मंत्री यांजविशीं ती. राजश्री आपासाहेब याणीं पत्र पाठविलें तें नेऊन दिल्हें. त्याचें उत्तर सांगितलें कीं, करवीरचे पत्राचा जाब आल्यावर या पत्राचा जाब देऊं. कलम.

१ रा. रघुनाथराव माने यास भीमबहादुरीचा किताब करवीरकरांनीं देऊन कर्नाटकचे सुभ्याचीं वस्त्रें व शिक्केकट्यार दिली. हरीपंत भावे कारभारी. जमाव चार पांचशें आहे म्हणोन आज्ञा. ऐशास येविशीचें इंग्रजानीं जरबेचीं पत्रें करवीरकरांस पाठविलीं आहेत. पत्रावर आटोपिलें तर बरें. नाहीं तर इंग्रज पारिपत्य करतात. असा बोलण्यांत भाव निघाला. काय घडेल तें खरें ! कलम.

एकूण कलमांवरून ध्यानांत येईल. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ७१०१ श्री. (२९ सप्टें.)

पै. छ. ८ रजब. सन सीत मयातैन. आश्वीन.

शेवेसीं धोंडो बापूजी जोशी साष्टांग नमस्कार. तागायत आश्वीन शुा षष्ठी वर्तमान यथास्थित. शिंदे होळकर एकविचारें होते. परंतु उभयतांमध्यें किलाफ येऊन होळकर कूच करून जयपूरचे रोखें गेले. समागमें सर्जेराव आहेत. जातेसमयीं शिंद्यास सांगून पाठविलें कीं पगडीची शरम राखावी. विचार करणें तो पक्केपणें करावा. राजश्री काशीराव होळकर आजपर्येत महेश्वरास होते. ते हल्लीं यशवंतराव याजपाशीं गेले. त्याणीं खाशास राहुटी देऊन सभोंवता पाहारा टेऊन जवळची मंडळी होती त्यांजला कैद केलें. होळकर बिघडून जावयाचें कारण इंगळे इंग्रजांकडील तहाचें बोलणें आग्रहें बोलतात. तह करूं नये हा निश्चय होळकर याचा सबब गेले. ते गेल्यामुळें शिंद्याजवळचें पेंढार

चहूंकडे गेलें. याप्रमाणें वर्तमान ऐकितों. परीट चाबुकस्वार सरकारांत आहे. त्यास पालखी द्यावयाची ठरवून सरंजामास चास लावून दिली. पालखी दसऱ्यास होईल. याजप्रमाणें आहे. राजेश्री खंडेराव रास्ते यांजला बहुत समाधान नव्हतें. विषमज्वर होता. हल्लीं मधुरा जाला. परंतु आरोग्य दिवसेंदिवस आहे. सेवेसीं श्रुत होय. हे विज्ञापना.

---

नं. ७१०२ श्री. (नकल.) ( आश्विन–सप्टें. )

विज्ञापना. इकडील मजकूर बीतपशील:—

१ राजेश्री कृष्णाजी भैरव थत्ते यास समाधान नाहीं याजमुळें प्रपंचाचा त्याग करून संन्यासग्रहण केलें. परमहंसदीक्षा घेतली. देहाचें सार्थक गृहस्थानें केलें. कलम.

१ किल्ले विजयदुर्ग बडवाई यांजकडे खंडेराव तात्या होते. त्यास सरकारांतून त्याजकडून विजयदुर्ग घारराव म्हणोन श्रीमंतांजवळ राहातात त्याजकडे सांगितला. बडवाई राजेश्री नारोपंत आवटी याजकडे जाहाली. कर्नाटकचे सरसुभ्याची घालमेल दिसते. कलम.

१ श्रीमंत राजेश्री बाबासाहेब यास चार पांच दिवस ज्वरांश जाहला आहे व किंचित् आमांशही आहे. विशेष नाहीं. परवा म्हैस दान दिली. कलम

१ राजेश्री सदाशिवपंतभाऊ यांसही ज्वरांश जाहाला आहे. दरबारांत जात नाहीं. आरोग्य होईल. कलम.

एकूण कलमांवरून विदित होईल हे विज्ञापना.

---

नं. ७१०३ श्रीगजानन. (आश्विन शु. १–२ आक्टो.)

पै. छ. ८ रजब. सन शीत. आश्वीन.

पुरवणी. सेवेसीं [1]विसाजीराम. विज्ञापना. कित्तूरकर यांस, सरकारांतून व इंग्रजांकडून निकड आहे जे, आकरा गांव पस्तीस हजार रुपयेचे तुम्ही घेऊन बाकी तालुका सरकारचे हवालीं करावा आणि आठ सालांचा ऐवज सदरहू नेमणूक वजा होऊन बाकी निघेल तो द्यावा.

---

१ गोखले. पत्र पुण्याहून मिरजेस.

म्हणोन त्याचे वकिलास निक्षोन ताकीद जाली. त्याणीं पंधरा दिवसांत आपले यजमानास लिहून पाठवून उत्तर सांगतों म्हणून करार करून पत्रें पाठविलीं त्यास पाऊण मास झाला. पुन्हां वकिलास निकड आहे. सुप्रवृत्तीनें जाबसाल उलगडल्यास उत्तम. नाहीं तरी इंग्रजांकडे बंदोबस्ताविषयीं आज्ञा होणार. आजतागायत इंग्रजांचा आधार कित्तूरकरांस होता. त्याणीं स्पष्ट सांगितलें जे, तालुका सरकारचे हवालीं करावा म्हणोन. पुढें काय ठरतें तें लिहून पाठवितों. हे विज्ञापना.

---

नं. ७१०४ श्री. (आश्विन शु. ९–२ आक्टो.

पै. छ. ८ रजेब. सन सीत. आश्विन.

विज्ञापना. इकडील मजकूर—

१ रा. खंडेराव तात्या रास्ते यांस पंधरा दिवस संतत ज्वर बसला होता. नवज्वराची भावना होती. परंतु ईश्वरें पार केलें. त्यांतच मधुऱ्याची भावना जाली आहे. आरोग्य होईल असा भरंवसा लागला. दानधर्महीं बहुत जाहले. गृहस्थ बहुत थोर. श्रीनें कृपा करावी. कलम.

१ श्रीमंत राजश्री [1]बाबासाहेब यांची स्वारी भाद्रपद व. पंचमीस निघोन सासवडास गेली. समागमें श्री. राजश्री आपासाहेबही गेले होते. चतुर्दशीस आवशीचे प्रहररात्रीस स्वारी पुण्यास आली. सामोरे दिवाण गेले होते. स्वारीबरोबर रा. खंडेराव यांचे चिरंजीव रावजी व रा. शामराव बाबा रास्ते व रामचंद्र गोसावी व सुमंत इतके गेले. आणखी कोणी गेले नाहींत. सासवडाहून स्वारी मोरेश्वरास गेली होती. कलम.

१ रा. बापू गोखले यांस बाहेर निघावयाची निकड सरकारांतून आहे. त्यांचीही बोलणीं पडलीं आहेत. ठरून कधीं निघतील पहावें. कलम.

१ रा. नरसिंगराव अन्या विंचूरकर फौजसुद्धां खानदेशप्रांतीं होते त्यांस हुजरातची फौज दूर करणेविशीं आज्ञा पेशजीं जाली होती. त्याजवरून त्याणीं छडाछड केली. हल्लीं पूर्ववत् फौज धरावी म्हणोन आज्ञा जाली आहे. काय घडेल तें खरें. कलम.

---

१ बाबासाहेब = बाजीराव पेशवे. आपासाहेब = धाकटे बंधु चिमाजीआपा.

१ कुंजीर ब्ऱ्हाणपुराहून चालते होऊन अजिंठ्याचे घाटावर आले म्हणोन बातमी आली. पत्र कोणाचें नाहीं. ते कधीं येतील पहावें. कलम.

१ उत्तरेकडील उभयतांचें वर्तमान एक महिना कांहींच येत नाहीं. अजमीराकडे आहेत. कलम.

१ जमखिंडीस फितूर जाल्याचें कळलें. त्यास दिवस अवघड आले आहेत! आपासाहेब यांणीं जमखिंडीस राहूं नये. तासगांवीं यावें येविशीं वडिलांचीं पत्रें जावीं. कलम.

एकूण कलमांवरून सर्व ध्यानांत येईल. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ७१०५ श्री. (आश्विन शु. ११-४ आक्टो.)

पै. छ. १० रजेब. सन सीत.

सेवेशीं विज्ञापना. पुण्याहून छ. ३ रजबचीं पत्रें आलीं. त्यांतील मजकूर कलमें---

१ उत्तरेकडील वर्तमान दोनी सरदार एक जागां होते. इंगळे इंग्रजांचे तहाचें बोलणें बोलत होते. होळकरांचे मनांत तह करावयाचा नाहीं. शिंद्यांच्या मनांत करावा; याजकरितां होळकर निघोन पंचवीस कोस फुटोन गेले. तेव्हां शिंद्यास जड पडोन होळकरांचे समजुतीस जाणार आहेत. कलम.

१ कुंजर वगैरे वकील येतात ते अजिंठ्याच्या घाटानजीक आले अशी बातमी आहे. कलम.

१ कर्नाटकचा सरसुभा राजश्री आनंदराव भाऊ यांचे नांवें जाहला. दसऱ्यास सनदा देणार. अंबारीचा हत्ती व "राजश्रियाविराजित" असा मान द्यावा असें ठरलें म्हणोन लिहिलें आहे. कलम.

१ कित्तुरकर देसाई यांजकडील वकिलास इंग्रजांनीं ताकीद केली. "पंचवीस हजारांचा तालुका पेशजीं नेमून दिला आहे. तितका घेऊन बाकी तालुका श्रीमंतांच्या सरकारांत देणें. नाहीं तर पारिपत्य करूं" म्हणोन. त्यावरून विसा रोजांत उत्तर सांगतों असा वकिलांनीं करार केला आहे. कलम.

१ खंडेराव रास्ते यांस संनिपात ज्वर होऊन जेर जाहले होते. परंतु कांहीं उतार दिसतो. कलम.

१ गोडबोले यांचा सरंजाम तिकोट्याकडे आहे. त्यांस या प्रांतीं आवाडाव करण्याचा इशारा आहे. हुशारी असावी असें लिहिलें आहे. कलम.

१ गोखल्यास फौजसुद्धां हिंदुस्थानांत रवाना करीत आहेत. तयारी चालली आहे. कलम.

१ श्रीमंत उभयतां सासवडकडे गेले होते. त्यांची स्वारी माघारी पुण्यास आली. कलम.

येणेंप्रमाणें मजकूर लिहिले आहेत. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७१०६ श्री. (आश्विन शु.११–४ आक्टो.)

पै. छ. १८ रजेब. सन खमस मय्यातैन.

सेवेशीं साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. १० रजेब पावेतों स्वामींचे कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. उत्तरेकडील वर्तमान तरी हरिनाथसिंग नि॥ होळकर यांणीं इंग्रजांकडील पलटणें चार व गाईकवाड यांजकडील फौज पांच साहा हजार गुजराथेहून इंदूर महेश्वर या लगत्यास आली होती. तिजवर कोट्याचे मुक्कामाहून भाद्रपद शु॥ ५ प्रातःकाळीं दौड करून शु॥ ६ तिसरा प्रहरां तीस हजार फौजेनिशीं येऊन गांठ घालून पलटणें व फौज गारद करून रात्रौ दाणाचारा करून शु॥ ७ प्रातःकाळीं पुन्हां कोट्यास गेले. पंचावन कोश येऊन मागती माघारें पचावन कोश गेले. हा मजकूर पेशजीं सेवेशीं लिहिलाच आहे. हल्लीं तिकडील वर्तमान तरी, होळकर जयपुरानजीक गेले. नंतर जयपुरकरानें तेथून पळोन भरतपूरच्या किल्ल्यास गेले. तेथून राजे यांणीं होळकर याजकडेस वकील पाठवून परस्परें सफाईचे जाबसाल ठरोन खंडणी वगैरे देण्याचा जाबसाल ठरून परस्परें आणा शफता होऊन राजश्री येशवंतराव होळकर फौजसुद्धां भरतपुरानजीक गेले. तेथें जयपूरवाले राजे यांची व येशवंतराव यांची भेट होऊन राजास फौजसुद्धां होळकर यांणीं बरोबर घेतलें आहेत. हरनायसिंग कोट्यास होते, ते

होळकरास जाऊन सामील झाले. लीकसाहेब व गव्हरनरसाहेब व करनलसाहेब वगैरे मिळून आठ पलटणांनिसीं आगऱ्यावर होते. तेथें होळकरांची व त्यांची लढाई श्रावण वद्य १२ होऊन होळकरांनीं पलटणें गारद करून आगऱ्याचा किल्ला घेऊन गोहोद व ग्वालेर व मथुरा वगैरे तमाम त्या प्रांतीं ठाणीं बसविलीं. येशवंतराव दिल्लीकडे जाणार आहेत. गव्हरनर वालिकसाहेब वगैरे पळोन लखनौस जाऊन तेथून सल्ल्याचा पैगाम होळकराकडेस लावला आहे. कलकत्त्याहून व विलायतेहून पत्रें सल्हा करावयाचीं तामृमुखांनीं आणविलीं आहेत. तीं आलीं म्हणजे ठरेल. राजश्री दौलतराव शिंदे नर्मदातीरीं हुसंगाबादेस दाखल जाहले. पुढें होळकरांस जाऊन सामील होणार. भोसले यांणीं फौज गडेमंडळच्या रोखें रवाना केली. आपण दसऱ्याचे मुहूर्तें स्वार होऊन होळकराकडेस जाणार. सिंदे भोसले यांचा बदरोख जाहला. हें वर्तमान पक्केपणें तामृ-मुखास समजलें. त्यावरून मुमईहून डकिणसाहेब व लाडसाहेब पुण्यास आश्वीन शु ८ दाखल जाहले. पुढें श्रीमंतांची भेट होऊन काय नक्षा ठरेल तो सेवेशीं लिहूं. वसली पुण्यास येणार हेंही वर्तमान दाट आहे. इंग्रजांनीं फौज व पक्केपणें सरंजाम करून होळकराचें पारपत्य करावें म्हणोन श्रीमंतांची मर्जी. त्यावरून इंग्रजांनीं फौजेचा वगैरे सरंजामास जो ऐवज लागेल तो द्यावा. त्याऐवजीं इंग्रजांनीं सरकारांतून नरमदा उत्तर तीरापासून तहत् द्वारका काठेवाड परियंत कुल मुलूख रद कर्जास लाऊन घेऊन त्याच्या सनदा आश्विन शु ७ इंग्रजांस दिल्या. सरासरी दोन अडीच तीन क्रोडींचा मुलुख अदमासें आहे. याची याद महाल-सुद्धां आकार ठरला आहे. त्याची नक्कल मागाहून पाठवून देतों. त्या-वरून सविस्तर ध्यानांत येईल. दिल्लीकडून पत्रें आलीं. यांतील सारांश सेवेशीं लिहिला आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७१०७  श्री. (आश्विन व. ३–११ आक्टो.)

पौ छा १७ रजब. सन सीत. आश्विन.

विज्ञापना. गडबोले कारजोळास मोर्चे देऊन बसले होते. तेथील

ऐ. ले. सं. १५–४१

खंडणी उरकोन सुरापुराकडे गेले. गडवोले यांणीं पठाण एक सरदार उभा केला. चारशें पायदळ व स्वार येणेंप्रमाणें जमाव आहे. त्यांणीं बावलेश्वर गांव लुटून परत केला. पठाणांची श्रमक शुरपाल क्षेत्रावर यावी अशी अवाई आहे. श्रीकृष्णाबाईस पाणी फार. याजमुळें उपाय नाहीं असें लोक बोलतात. कळावें सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ७१०८ श्री. (१३ आक्टोबर.)

पै. छ. २५ रजब, सन शीत, आश्विन मास.

सेवेसीं शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. आश्वीन व. ५ वर्तमान यथास्थित असे. विशेष.

१ श्रीमंत दसऱ्याचे दिवशीं बाहेर निघतांना दरवाजाबाहीर चौकांत [1]जिलबीच्या पुढें [2]भले माणसाचा घोडा उपाधी येऊन स्वार पडला. पायाची नळी मोडली आणि पडला. त्याजला एकीकडे काढून मग स्वारी चालती झाली.

१ सदाशिव माणकेश्वर नवी अंबारी पिवळी एकसांवी आंत बसून आंबारी मागाहून अवघें बाळाराम मामाचे वाड्यानजीक रस्त्यानें जातां नागझरीजवळ आंबारीचा खांब मोडला. मग घोड्यावर बसून पुढें गेले. अंबारी मागें आली.

१ आबा ठोसर बाळाजीपंत ठोसर यांचे पुत्र उदर होऊन देवाज्ञा झाले. स्त्री बरोबर गेली. आठ रोज झाले.

१ कुंजर नर्मदातीरानजीक आहेत. पुढें हळूहळू येत आहेत.

१ सर्जेराव घाडगे इकडे होळकराचा निरोप घेऊन निघाले. मंदूरास आल्याचें बोलतात. समागमें दहा हजार जमाव आहे. कांहीं पेंढार नर्मदा उतरलें अशी बोलवा आहे.

१ होळकर अजमिरीनजीक आहे. उडे होऊन पुढें जाणार अशी बोलवा बोलतात.

येणेंप्रमाणें वर्तमान ऐकण्यांत आलें. कळावें हे विज्ञापना.

---

१ जिलब = आघाडीची टोळी. २ भला माणूस = शिलेदार.

नं. ७१०९. श्रीगजानन. (आश्विन व. ९–१६ आक्टो.)

पै. छ. २५ रजब. सीत मयातैन. आश्विन.

शेवेसीं बाळाजी गणेश जोशी. विज्ञापना. येथील क्षेम ताा छ. २२ रजब बुधवार पावेतों मुा जमखिंडी क्षेम असों. विशेष. अलीकडे आज्ञापत्र येऊन सांभाळ होत नाहीं. तर सदैव पत्रीं सांभाळ करावया आज्ञा केली पाहिजे. माने भीम बहादर हे निघोन करवीरास यावयास गेले म्हणोन गोकाकेहून बातमी आली. गडबोल्यांची फौजचे मुक्काम निडोणीवर काल आला. गोटेवर येणार आहेत. मुधोळकर राा नारायणराव घोरपडे सदाशिवपंत पराडकर निा गडबोले यांचे भेटीस गेले होते. श्रीकृष्णेची शपथ परस्परें झाली. वस्त्रेंही परस्परें दिलीं. घोरपडे माघारे आले. गडबोले कूच करून गोटेचे सुमारें गेले. पुढें काय मसलत करतात पहावें. लष्करांतील फौज कांहीं उठोन गेली. येक रोज घरणें बसलें होतें. फौज हल्लींही उठोन जाते. पोटास नाहीं म्हणोन प्रायदळ मात्र उठोन जात नाहीं. त्यास थोडेंबहुत पोटास मिळतें. येणेंप्रमाणें आहे. हिशेबाचें काम लवकर आटपून येणेविशीं आज्ञा. त्यास जमखिंडीस येऊन आठ दिवस झाले. येथील कारकुनास दुखणें ज्वर येऊन फार हैराण आहे. त्याजमुळें हिशेब कांहीं समजत नाहीं. हिशेबाची समजूत करून घेतांच यजमानास विनंती करून शेवेसीं येतों. शेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ७११० श्री. (आश्विन व. ९–१६ अक्टो.)

छ. २२ सन सीत. मयातैन. आश्विन.

[1]विनंती विशेष. नारोपंत याणें करवीरकरांकडे जाऊन तेथील जमाव घेऊन दड्डी एथें राहून बेळगांववर जमावानिशीं आला. इकडीलही जमाव बाहेर गेला. त्यावर त्याणें तोंड न देतां माघार जाऊन तुरुकवाडी येथें उतरला आहे. अनगोळकरांनीं चार रुपये देऊन त्यासी तह करून त्यास आंबेवाडी एथें राहावयास जागा द्यावी असें ठरविलें आहे. तेथें एक दोन रोजांत येऊन उतरणार म्हणून ऐकतों. ऐशास आपणांस कळावें

---

१ बिनीवाल्यांचें पत्र बेळगांवाहून मिरजेस.

म्हणोन लिहिलें आहे. तरी राजेश्री त्रिंबकराव आपासही मजकूर सांगावा. बहुत काय लिहिणें. लोभ करावा हे विनंती.

---

नं. ७१११ श्रीगजानन. (आश्विन व. ९–१६ आक्टो.)

पै. छ. २ साबान. सन सीत. कार्तिक.

[1]सेवेशीं विसाजी राम गोखले. कृतानेक सां नमस्कार. विज्ञापना. ता. छ. २२ रजेब पावेतों स्वामीचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान रा. आनंदराव भाऊ याजकडे कर्नाटकचा सरसुभा झाडून कित्तूर तालुकेसुद्धां जाला. सनदाही होऊन मशारनिल्हे-कडे रवाना जाल्या. त्यांचे वकिलांनीं 'राजश्रियगविराजित' हा किताब व अंबारीसहित हत्ती व मुतालिकी शिक्के याविशीं बहुतांप्रकारें यत्न केला. परंतु किताब व शिक्के द्यावयाचे नाहींत म्हणोन स्पष्ट उत्तर जाहलें. हत्तीही देण्याचें अनमान दिसतें. मग पहावें. उत्तरेकडील उभयतांची प्रबलता आहे. चि. राजश्री बापूसाहेब यांची रवानगी हिंदुस्थानांत होणार. त्यास श्रीमंत श्रीचे दर्शनास कार्तिकीस पंढरीस जाणार त्याजबरोबर गेलें पाहिजे. तिकडून स्वारी आलियावर रवानगी होती किंवा अगोदर जाणें होतें पहावें. सविस्तर सेवेशीं मागाहून लिहितों. सर्वप्रकारें सेवक घरचा आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७११२ श्रीगजानन. (आश्विन व. १२–१९ आक्टो.)

पै. छ. २५ रजब. सीत मयातैन. आश्विन.

विज्ञापना.[2] आलिकडे प्रकृती कैसी आहे ? हें ल्याहावयास आज्ञा जाहली पाहिजे. फकीराचा आंगारा पा। होता. तो पावलाच असेल. त्याचा चमत्कार येथें बहुतांस आला आहे. आज अंगारा आणावयास अलगुरास माणूस यजमानांनीं पाठविला आहे. आलेवर शेवेशीं उदेक पाठवितों असें सांगितलें आहे. मीही त्यांजकडे गेलों होतों. कळावें-करितां विनंती लिहिली आहे. वरकड कांहीं सांगत नाहीं. सर्व रोगांवर फकीरसाहेब अंगारा देतात. तो लोक घेतात. गुणही येतो. असें आहे.

---

१ पत्र पुण्याहून मिरजेस. २ पत्र जमाखिंडीहून मिरजेस.

शेवेसीं विदित होय. कागदाचीं रोजिमें आणावयास काल महालिंगपुरास पाठविला आहे. येतांच सेवेसीं पाठवितों हे विज्ञापना. महाराजांस किंचित् गुण आहे. दृष्टीस पडला तर श्रीमंत सौ. मातोश्री बाईसाहेबांचे हाताविसीं अंगारा घ्यावयास येईल हे विज्ञापना.

---

नं. ७११३  श्रीशंकर प्रसन्न.  (आश्विन व. १४–२१ आक्टो.)

छ. ३० रजब. सन सीत. मयातैन. कार्तिक.

राजश्रियाविराजित राजमान्य राजेश्री गंगाधर रावजी स्वामीचे शेवेसीं. पौष्य [1]माधवराव अनंत साष्टांग नमस्कार. विनंती. उपरी. एथील कुशल तागायत छ. २७ रजब जाणून स्वकीय कुशल लिहित असलें पाहिजे. विशेष. गोडबोले निसबत ग्रहस्तांनीं इकडील महालांतही बखेडा मांडिला आहे. तिकडेही हात चालेल तसा विचार करणार, हा पूर्ण भाव त्याचा आहे. यास्तव येविसींचा इकडून उद्योग करून राजश्री भास्कर नारायण कारकून आपणाकडे पाठविले आहेत. हे सविस्तर कळवितील. तें ध्यानांत आणोन घडण्यांत सत्वर यावें. यास दिवसगत नसावी. इकडून सिलसिला लागला. सामोपचार आजपर्यंत होईल तेथवर केला. परंतु क्षणिक कारभारामुळें कोठें धरे राहत नाहीं. प्रस्तुत असा अर्थ पडला आहे. त्यांत कसें घडेल तें घडो. आपणही पुढें कसें करावें, हा बुद्धिवाद लिहावा. इकडून पराकाष्ठा केली तरी त्याचें समाधान नाहीं. समयोचित असेल तें आपण करितील. बहुत काय लिहिणें ? कृपालोभ करावा हे विनंती.

---

नं. ७११४  श्री. (कार्तिक शु. २–२४ आक्टो.)

पौ छा ३० रजब. सन सीत. कार्तिक.

विज्ञापना.[2] अलगुरच्या फकीराचा अंगारा दोन वेळां पाठविला होता. पावलाच असेल. प्रकृती कसी आहे ती लिहावयास आज्ञा करावी. फकीर विचारत होता कीं अलीकडे प्रकृति कसी आहे ? यास्तव सेवेसीं लिहिलें आहे. तर अंगारा तेथ पावल्यानंतर प्रकृति लिहावयास आज्ञा

---

१ माधवराव रास्ते यांचें पत्र बागलकोटाहून मिरजेस. २ पत्र जमखिंडीहून कारकुनाचें मिरजेस.

जाहली पाहिजे. कवठें चार पाठविलीं आहेत. पावतील. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ७११५ श्रीगजानन. (कार्तिक शु. २–२४ आक्टो.)

पौ छा। ३० रजब. सन सीत. कार्तिक.

सेवेसीं[1] विज्ञापना. [2]श्रीनीं आज्ञा केली जे, राजश्री कासी तुकदेव यांस विचारलें, तुम्हांस स्वप्न कांहीं पडतें कीं नाहीं ? त्याणें सांगितलें, मला निशा फार. मला स्वप्न कधींच पडत नाहीं. नंतर आज्ञा जाहली जे, कांहीं दृष्टांत तुम्हांस होईल. मग दोनचार रोजीं दृष्टांत जाला जे, श्रीनीं व श्रीमंत राजश्री बाबासाहेबांनीं[3] ब्राह्मणभोजनाकरितां केरसुणी घेऊन जागा झाडिली असें पाहिलें. नंतर आणखी एक दिवशीं एक किल्ला आहे तो किल्ला हल्ला करून घेतात. शिड्या किल्ल्यास लावून शिड्यांवरून हल्ला चढली. किल्ल्यांत हत्ती वगैरे दौलत मोठी आहे असें पाहिलें. दोन्ही स्वप्न सांगितलेवर म्हणाले जागा झाडावयास मी नाहीं. दरिद्री ब्राम्हण. माझें नांव घेऊं नका. किल्ल्याचे म्हटल्यास प्रभु थोरले. त्यांचें पुण्य विचित्र आहे. सर्वेश्वर कृपा करील. आपास मीं सांगितलें परंतु विश्वास ठेऊन ऐकत नाहींत. काय करावें ? असें बोलले म्हणून सांगत होते. थोरले प्रभूचे चिरंजीव आले होते. परंतु दुखणीं फार याजमुळें निरोप दिला. मी त्यांचा जन्मांतरचा आश्रित आहें असें बोलले. बाबासाहेबांनीं आपले प्रकृतीविसीं विनंती केली. सर्वेश्वर कृपा करील. चिंता न करावी. आम्ही मिरजेस जाणार आहों ऐसी आज्ञा केली. येणेंप्रमाणें सांगितलें तें सेवेसीं लिहिलें आहे. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

सं. ७११६ श्री. (कार्तिक शु. ३–२५ आक्टो.)

पै. छ. ६ सवाल. सन सीत. मयातैन. कार्तिक.

शेवेसीं साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. १ सावान पावेतों स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष.

---

१ पत्र राम. आपांचें मुरगोडाहून मिरजेस. २ श्री = चिदंबर दीक्षित. ३ हरि परशराम यांनीं.

दिल्लीहून छ. २४ जमादिलाखरचें पत्र आलें. त्यांतील मजकूर तरी, राजेश्री येशवंतराव होळकर नाथद्वारास मुक्काम करून दीड लाख फौजेसुद्धां मजबुतीनें, हुशारीनें आहेत व शिंदेबहादूर अजमेरनें निघोन मथुरानजीक फौजेसुद्धां आहेत. उभयतां सरदार यांचा इरादा जे, कृष्णगडच्या सुमारें परस्पर एक होऊन राहावें. लाट व डंकीणसाहेब कलकत्त्याहून दिल्लीस दाखल होऊन लीख फिरंगी कलकत्त्याहून कोलजळेश्वरास येऊन तेथून तोही दिल्लीस येऊन दाखल जाला. तेथून त्रिवर्गांनीं उभयतां सरदारांकडे सलुखाचें बोलणें लावलें आहे व जाहेरदारींत पलटणांची तयारी करून लढाईचा रोख दाखवितात याप्रमाणें पत्र आलें आहे. त्यावरून सेवेसीं लिहिलें आहे. सरजीराव घाटगे पंधरा हजार फौजेसुद्धां शिंदे बहादूर यांजपासून निघोन मंदुसरास येऊन तेथोन उज्जनीस आले. पुढें आसेरीनजीक येणार. राजेश्री बाळोजी कुंजर व येशवंतराव घोरपडे व खंडोपंत व अन्याबा जाधव याप्रमाणें तिकडून वकिलीस आले. ते बऱ्हाणपुरास दाखल झाले. येण्याविषयीं सरकारांतून पत्रें गेलीं आहेत. मार्गेश्वरमासीं गंगातीरास यावें याप्रमाणें सरकारची आज्ञा आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७११७ श्री. (कार्तिक शु. ३–२५ आक्टो.)

पै. छा ६ साबान. सन शीत. मयातैन. कार्तिक मास.

शेवेसीं साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा १ साबानपावेतों स्वामींचे कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंतांची स्वारी कार्तिक शु॥ ३ शुक्रवारीं निघोन पंढरपुरास जाणार. श्रीमंत राजेश्री आप्पासाहेब व सौ उभयतां बाईसाहेबसुद्धां जाणार. तेथून कार्तिक वद्य ७ परभारें आळंदीस येणार. तेथोन निघोन आप्पासाहेब व बाईसाहेबसुद्धां कोपरगांवास जाणार. तेथें श्रीमंत आपलें दुसरें लग्न करणार आहेत. त्यास हुजूरनें गवंडी सुतार वगैरे कोपरगांवास रवाना होऊन वाड्याची तयारी करविली आहे. कोपरगांवास स्वारी गेल्यानंतर बाळोजी कुंजर वगैरे मंडळी तेथें येणार. याप्रमाणें बेत जाहाला आहे. राजेश्री

सदाशिव माणकेश्वर यास समाधान नाहीं म्हणोन राजश्री कृष्णाजी भवानी सुद्धां एथें राहिले आहेत. कर्नेल कलूस बहादूर यांचे चित्तांत जे सदरहू मजकूर होत आहे तेविशीं दिकत आली आहे. याप्रमाणें एथील मजकूर आहे. शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. राजेश्री बापू गोखले यास ज्वरांश जाला आहे. त्यास स्वारींबरोबर जावयाची तया आहे. शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७११८ श्रीशंकर प्रसन्न. (३० आक्टोबर.)

पौ छा २५ साबान. सन सीत. मयातैन. कार्तिक.

राजेश्री गंगाधर रावजी स्वामीचे शेवेसीं.

[1]विनंती. उपरी. श्रीमंतांची स्वारी कार्तिक शुद्ध अष्टमी गुरुवारीं क्षेत्र पंढरीस दाखल झाली. गोखले वगैरे स्वारी समागमें आहेत. फौज चार हजार बरोबर आहे म्हणोन लिहिलें तें कळलें. चिरंजीव राजेश्री शामरावही स्वारीसमागमें आहेत. त्यांचीं पत्रें आलीं. स्वारी षष्ठीस निघोन जलद जाणार म्हणोन लिहिलें आहे. स्वारी आलियाचीं पत्रें आलीं. यावर आम्हीं जावें असा बेत केला. परंतु दुसरें पत्र निकडीनें निघोन मजल दर मजल जाणार म्हणोन राहाणें जाहालें. एकादशीस आळंदीस जावें असा बेत आहे. म्हणून चिरंजिवांनीं लिहिलें आहे. आपलेकडून आधिकोत्तर कळावें. राजश्री विठलराव[2] बापू स्वारीसमागमें गेले किंवा निरोप घेऊन आले हें कळवावें. कृपा करावी हे विनंती.

---

नं. ७११९ श्री. (नोव्हेंबर.)

छ. १६ [3]रमजानीं इंग्रजांकडील डांक आली. जेवावयासी जात होते. इतकियांत डाक येऊन दाखल जाहली. सबब तीन चार असामी खुरशी-

---

१ पत्र माधवराव रास्त्यांचें पुण्याहून मिरजेस. २ विठ्ठलराव पांडुरंग. ३ इ. स. १९१८ सालीं कै. तीर्थरूपांनीं कै. तात्या केळकरांच्या 'मराठे व इंग्रज' या ग्रंथास प्रस्तावना लिहिली आहे. तींत या पत्राचा उतारा घेतलेला आहे.

वर बसोन डाकेचे तीन फर्द पाहिलेवर डोईची टोपी काढून भूमीवर आपटली. नेत्राश्रु पतन करूं लागले. चवकीदार वगैरे होते त्यांस दूर दूर उभें केलें. सारेजण जमा होऊन खुरशावर बसोन कौशेल होऊन नंतर एका इंग्रजानें एका अधिकारीयांस हातीं धरून उठविलें. इतका मजकूर जाहला. डाकेबरोबर सावकारी वर्तमान आलें. आश्वदल[1] यांची प्रबलता जलचर पेचांत आहे असें लिहिलें आहे. सिंदे यांचीं पत्रें आलीं. छ. ९ साबान पावेतों आहे वर्तमान लिहिलें आलें. त्यांत अती बलवरुता[2] अश्वदळाची लिहिली आहे. मुकलसाहेबाचीं पलटणें बुडाविलीं. दहाबारा पलटणें घेऊन यमुनापार लखनौकडे जात होता. त्यांस सभोंवता घेरा पडला असें वर्तमान लिहिलें आलें. त्याजवरून हत्तीवर घालून साखरा वाटणार होते ती राहिली. इंग्रजांस जवाहीर व वस्त्रें द्यावयाचीं काढिलीं होतीं. ( तीं दिलीं नाहींत. )

---

नं ७१२० ( कार्तिक व. २–८ नोव्हें. )

उतारा—पत्र जमखिंडीहून मिरजेस बाळाजी गणेश जोशी यांचें छ. १५ साबान सन खमसचें.

" रा. आपा देसाई निपाणीकर याणीं रामदुर्गकरांशीं शिलशिला करून घासदाणा पंचवीस हजार मागों लागले. आमचा तालुका किती, आपण मागतां किती म्हणोन बहुत प्रकारें कारकुनानें सांगितलें. परंतु देसाईच्या मर्जीस गोष्ट आली नाहीं. तेव्हां याणींही बदलून गोष्ट सांगितली. मुळूर वगैरे चारपांच खेड्यांची खराबी देसाई याणीं बहुत केली. प्रस्तुत मुक्काम मुळुरावर आहे."

---

नं. ७१२१ श्री. ( २४ नोव्हें. )

छ. ७ रमजान. सन सीत. मार्ग. शु ८ भृगुवार.

सेवेशीं धोंडो बापुजी जोशी शिरसा. नमस्कार. विज्ञापना. मार्ग. शु ३ वर्तमान यथास्थित असे. विशेष. होळकर दिल्लीपलीकडे लाहोरचे

---

१ अश्वदळ = होळकर. २ बलवरुता = जबरदस्ती बळकटी.

ऐ. ले. सं. १५–४२

पलीकडे पावले. साठ कोश पाऊणशे कोश गेला. एकूण दिल्लीपुढें तीन साडेतीनशे कोश गेला. समागमें फौज साठ हजार जमाव आहे. मागाहून आणखी पन्नास हजार आहे. खडे फौजेंत राहुटी डेरादेखील सरकारचा नाहीं. तिकडील संस्थानिक सामील होऊन बरोबर फौज कुमक आहे. पुढें दरमजल जात आहे अशी बोलवा आहे. शिंदे अजमेर व मथुरेमध्यें आहेत. पन्नास हजार जमाव आहे. इंग्रजांपासोन पन्नास लाख रुपये घेतले. जमावानिशीं आहेत. कुंजर वकील बऱ्हाणपुरास आहेत. पुढें आले नाहींत. पेंढारी तापीतीरानें आहेत. भोसले याजकडील वकील पुण्यांत आले. काय निमित्य हें समजण्यांत आलें नाहीं. याप्रमाणें बोलवा आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७१२२ श्री. ( २६ नोव्हेंबर. )

पै. छ. १० रमजान. सन शीत.

सेवेसीं धोंडो बापूजी जोशी शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत मार्गशीर्ष शु ५ मंगळवार पावेतों सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंतांची स्वारी सोमवारीं सायंकाळीं श्रीपर्वतीं जाऊन रात्रीस तेथें भोजन करून प्रहर रात्रीस शुक्रवारचे वाड्यांत आले. चिराखदान राजेश्री गणपतराव पानसे यांचे वाड्यापासून उत्तरेकडे सोलापूरकर यांचे वाड्यापर्यंत दुरस्ता दोहीं अंगें व सरकारवाड्याचे दरवाज्यापुढें रस्ता आहे. त्या रस्त्यांत समोर दोन्हीं बाजूंनीं पुढें रस्ता दक्षिणोत्तर शंभर हात आहे तोंपर्यंत चिराखदान लाविलें. श्रीमंत साधे अंबारीमध्यें होते. मागें सदाशिवपंत भाऊ दिवाणजी होते. दुसरे अंबारीमधें कृष्णाजी भवानी होते. तिसरे अंबारीमधें राजेश्री खंडेराव रास्ते यांचे पुत्र रावजी होते. एकूण अंबाऱ्या अवध्या तीन. शंभर दीडशेंपर्यंत स्वार बरोबर होते. शु ५ मंगळवारीं प्रातःकाळीं तोफा पन्नास सोडिल्या. श्रीमंत राजेश्री आप्पासाहेब[1] यांचे शरीरीं समाधान नाहीं. ते स्वारीबरोबर नव्हते. कोंकणांत श्रीभार्गवरामाचे देवालयापुढें चौघडा होता. खालील मजला दगडी संगीन. त्याजवर दुमजला लाकडी होता. खालीं छप्पर होतें. त्यास

---

१ चिमाजी आपा. पेशव्यांचे बंधु.

आग लागून चौघडा सोपासुद्धां जळाला. खालीं गाईचीं वासरें दोन होतीं तींही जळालीं. श्रीभार्गवाचे देवाचा डोंगर उतरून खालीं जावें तेथें दोल आहे. त्यापाशीं श्रीविठोबारखुमाईची मुहूर्त होती. ती कोणी रात्रीस विच्छिन्न केली असेंही बोलतात. श्रीमंत राजेश्री बापूसाहेब[1] यांची स्वारी श्रीसिद्धटेकाहून सरकारचा निरोप घेऊन गेले. बहुत काय लिहिणें? शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७१२३ श्री. (मार्ग. शु. ९-३० नोव्हें.)

पा। छ. ८ रमजान.

विज्ञापना. होळकर झाडून फौजसुद्धां अंतर्वेदींत जाऊन मुक्काम केला. पलटणें व तुरुकस्वार तीस कोसांवर होते. तेथून छापा घालावयाकरितां एक दिवसीं चालोन आले. तेव्हां लाट याजपाशीं पलटणें अकरा सरंजाम चांगला. त्याणीं राठोडावर यावें, तरुकस्वार याणीं बापू शिंदे यांजवर यावें, लीकसाहेब याणीं बुणग्यांवर यावें, असा बेत करून कार्तिक शु. द्वादशीस चालोन आले. रात्रीस आले. राठोडाची बातमी होती. त्यास समजलें कीं आपणावर छापा येतो. तेव्हां राठोड अस्तमानीं ज्या जाग्यावर होते तेथून कूच करून होळकर यांस येऊन मिळाले. त्यास होळकर यास दहा कोसांची तफावत होती. लाट चालोन आले. त्यास बातमी समजली कीं राठोड बातमी समजोन पळून गेले. तेव्हां सरंजामसुद्धां बुणग्यांवर आले. तुरुकस्वार याणीं बापू शिंदे यांजवर येऊन पडले. तेव्हां रात्रीचा विषय. चार घटका यांची त्यांची खटपट होऊन बापू शिंदे उधळोन बुणगें टाकून माघारे आले. बुणग्यांत फौज होती तीही गलबलोन ज्यास जितकें निघालें तितकें घेऊन पळाले. लीकसाहेबही बुणग्यावर येऊन पडले. लाट व तुरुकस्वार व लीकसा। त्रिवर्ग येऊन बुणगें घेतलें. रात्रीं त्याच जाग्यावर मुक्काम केला. दुसरेही दिवशीं मुक्काम पलटणांचा बुणग्याचे जाग्यावर जाला. ते समयीं इंग्रजांनीं फत्तेचीं पत्रें लिहोन पाठविलीं. तीं येऊन पुण्यास तोफा जाल्या तो मजकूर पेशजीं

---

१ विठ्ठलराव पांडुरंग.

लिहिलाच आहे. होळकर राठोड व बापू शिंदे वगैरे झाडून सरदार मिळोन रात्रीस चालोन गेले ते सूर्योदयापूर्वी जाऊन बुणग्याचे जागीं तीन टोळ्या एकत्र होऊन राहिले होते त्यांजवर जाऊन पडले. त्यांची यांची प्रथम तोफांची लढाई जाली. मराठे याजपाशीं तोफ नव्हती. याणीं एकदिल करोन चालोन घेतलें. त्यास पांच सहा हजार माणूस होळकराकडील जायां जखमी जालें. परंतु सोळा पलटणें आठ हजार तुरुकस्वार यांत बाकी ठेवली नाहीं. याप्रमाणें सावकारी कोणाचीं गुप्तरूपें लिहिलीं आलीं व कोण कोठें उभे होते त्याचाही नकाशा आला. तो पाहून नकाशा लिहोन घेऊन पाठविला आहे. त्यावरोन सर्व ध्यानांत येईल. लढाई जाहल्याची ( बातमी ) वास्तविक आहे. वडिलांस प्रमाण वाटणार नाहीं. परंतु पाहिलें ऐकलें तें लिहिलें आहे. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ७१२४ श्रीगणराज. (मार्ग शु. २–४ दिसें.)

[१]चिरंजीव रा। त्रिंबकराव आपा यांसी प्रती गंगाधरराव गोविंद. आशीर्वाद. उपरी. मजेरें गणेशवाडी ही जमीन तीर्थस्वरूप कैलासवासी हरभटबाबांनीं इनाम संपादिली. त्याची वांटणी साहा घरांस ब्राह्मणांस इनाम जमीन दिल्ही. ते वजा होऊन साहा भावांचीं घरें दर घरास येकशें पंचेचाळीस रुपयेंची जमीन प्रस्तुत चालते. त्यास येकंदर जमीन किती, येकूण आकार रुपये किती व त्यापैकीं ब्राह्मणांस जमीन किती कोणास दिली व बाकी वाटणीस किती जमीन येते, हा झाडा समजला पाहिजे. तर मौजे मजकूरचा आकाराची नक्कल तपशीलवार लिहिल्याप्रमाणें करून पाठवणें. रवाना छ. १ रमजान. इनाम जमिनीचीं राजपत्रें वगैरे पत्रें आसतील त्यांच्या नकला करून पाठवणें. रवाना छ. मजकूर बहुत काय लिहिणें. लोभ करावा हे आशीर्वाद.

---

नं. ७१२५ ( ४ दिसेंबर )

उतारा—पत्र पुण्याहून मिरजेस. धोंडो बापूजी जोशी यांचें मार्ग. शु. १३ ( सन सीत ) चें.

---

१ पत्र मिरजेहून कुरुंदवाडास.

" होळकर पंजाबाकडे गेला. दिल्लीपलीकडे पांचशें कोस असें बोलतात. कुंजर बऱ्हाणपुरास आहेत. पुढें चालते जाल्याचें वर्तमान नाहीं. अमरावती नागपुरानजीक आहे त्यानजीक पेंढार आलें. अमरावतीच्या दोन तीन पेठा लुटून नेल्या असें बोलतात."

---

नं. ७१२६ (मार्ग. व. ४–१० दिसें.)

उतारा—पत्र बागलकोटाहून मिरजेस माधवराव रास्ते यांचें छ. १८ रमजान सन सीतचें.

" गोडबोले याणीं इकडील महालांत उपसर्ग लाविला आहे. तिकडे जमाव पाठविला त्यांची यांची एक लढाई जाली. ते हटून माघारे गेले. प्रस्तुत विजापूर प्रांतांतून तालिकोटाकडे गेले आहेत. त्यांचे पाठीवर जमाव इकडील गेला आहे."

---

नं. ७१२७ (मार्ग. व. ११–१६ दिसें.)

उतारा–पत्र सखाराम त्रिंबक गर्दे यांचें छ. २४ रमजानचें (स. सीत).

" रा. आपा देसाई श्रीदर्शन घेऊन गरगच्या सुमारें धारवाडाअलीकडे आले. कित्तूरकरांचें त्यांचें संधान ऐक्यतेचें होऊन कित्तूरकर त्यांचे भेटीस जाणार म्हणोन तालुकियांतील [1]पावलोक पांच सहा हजार जमाव जाला आहे. तीन चार तोफा बाहेर काढिल्या आहेत. भेट घेऊन पुढें आपलेकडील तालुक्यास उपसर्ग लावावा याप्रों वर्तमान आहे. सारांश तूर्त त्यांची यांची एखलाशी जाली असें आहे. काल त्यां उभयतांच्या भेटी जाहल्या. दोडवाडाअलीकडे दो कोशांवर दोघांचे मुक्काम आहेत."

---

नं. ७१२८ श्री. (पौष शु. १०–३१ दिसें.)

पै. छ. ९ सवाल. सीत मयातैन. पौष मास.

[2]शेवेसीं रंगो रामाजी मुकाम कसबें आयनापूर. कृतानेक साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागाईत छ. ९ सवाल पावेतों यथास्थित असे. विशेष. श्रीमंत राजेश्री माहाराज करवीरकर यांचा मुकाम परवां कुडचीवर आल्याचें वर्तमान शेवेसीं विनंती लिहिलीच होती. परवां येतांच गांवास

---

१ पायदळ. २ पत्र मिरजेस.

चौकी ठेऊन गांवांतील प्रमुख दहावीस असामी धरून आणून बसवून ठेऊन गांव लुटावयास प्रारंभ केला. तो काल प्रहर दिवसपर्यंत गांव लुटला. नंतर बंदी जाली. आज मुकाम आहे म्हणून बोलवा आहे. अलीकडे किरकोळी माणसें काणसें वगैरे धेऊन वरदळ करतात. यास्तव लष्करांतून एक जासूद रखवालीस आणविला आहे. त्याजबरोबर प्यादे व रयत सीवेस ठेविले आहेत. शेवेसीं कळावेंकरितां विनंती लिहिली आहे. बहुत काय लिहिणें. शेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ७१२९ श्री. (पौष व. ४–८ जाने.)

पौ छा १७ सवाल. सन सीत. पौष मास.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेसीं. विनंती. सेवक [१]महादाजी विठ्ठल साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा १७ सवाल पावेतों स्वामींचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. श्रीमंत राजश्री नारायणराव[२] बाबांची व श्रीमंतांची भेट जाहली म्हणोन ऐकतों व श्रीमंतांची स्वारी कोपरगांवास ग्रहणाकरितां गेली व करवीरकरांचा मुक्काम कोठें आहे तें लिहावें म्हणोन आज्ञापिलें. त्यास श्रीमंतांची व श्रीमंत यजमानांची भेट शुद्ध पंचमी बुधवारीं जाहली. श्रीमंत कोपरगांवास ग्रहणाकरितां निकडीनें निघोन गेले. आमचे यजमान स्वारी समागमें जाणार होते, त्यांस कांहीं कारणामुळें राहून वद्य द्वितीयेस निघोन जातों म्हणोन पत्र आलें होतें. निघोन गेले असतील. श्रीमंत [३]मातोश्री बाई पुण्यांतच राहिली आहेत. करवीरकराकडील वर्तमान तर, खासा स्वारी फौजेसह त्रयोदशीचे दिवशीं करवीरास दाखल होऊन बाहेर डेरे देऊन राहून रात्रौ पाव घटका रात्रीस वाड्यांत गेले. फौज आहे तसीच आहे. वाडी प्रांतीं राजाज्ञा जाणार म्हणोन वर्तमान आहे. वाडीकरांत गृहकलह होऊन परस्पर विरुद्ध पडलें आहे. त्यांत एकाकडे हे सामील होणार म्हणोन वर्तमान आहे. आपणांस कळावेंकरितां लिहिलें आहे. वाडी प्रांताकडील वर्तमान तर

---

१ उपनांव दातार फडणीस. पत्रें इचलकरंजीहून मिरजेस. २ नारायणराव व्यंकटेश इचलकरंजीकर. ३ अनूबाई–नारायणरावांची आजी.

मातोश्री लक्ष्मीबाई भोसले यांणीं राजश्री श्रीराम सावंत याचा पुत्र दत्तक घेऊन सिक्यास अधिकारी केला. तो व मातुश्री वाड्यांत असतात. श्रीरामा सावंत बहीरवाडींतच राहून प्रांताचा कारभार करितात. राजश्री फोंडसावंत वाडींतून पळून गेले. कुडाळास जाऊन राहिले. त्यांजवळ हजार पांचशे जमाव आहे. प्रांतांत जाळपोळ् करून खराबी करितात. राजश्री चिटकोपंत सालढीकडून पांच चारशें जमावानिशीं फोंड सावंत यांस सामील जाहले. [1]धुळपांचेंही संधान आहे. तेही येणार. त्यांतच राजमंडळकरी मिळणार. त्याप्रमाणें वर्तमान ऐकण्यांत आहे. शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७१३० श्रीगजानन. (पौष व. ८–१२ जाने.)

पौ छा २४ सवाल. सन सीत. पौष मास.

सेवेसीं विसाजीराम[2] करद्वय जोडून शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा २१ सवालपर्यंत स्वामीचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींचा निरोप घेऊन निघालों, तें छा १८ सवालीं मुकाम पुणें येथें सुखरूप पोहोंचलों. इकडील मजकूर श्रीमंत महाराजांची स्वारी कोपरगांवास गेल्याचा मजकूर स्वामींस कळलाच असेल. स्वारीबरोबर पुरंदरे व उभयतां रास्ते व अक्कलकोटकर व श्रीमंत राजश्री गणपतराव[3] बापूसाहेब वगैरे मिळोन गणतीचे स्वार अदमासें दीड हजार व रुपराम चौधारी याचें पायदळ पांचशें येणेंप्रमाणें. शिवाय गोखले यांजकडील स्वार हजार व हजार पायदळ याखेरीज हुजराती [4]जदीत लोक गोखले यास आज्ञा होऊन हजार स्वार एकांडे[5] व हजार पायदळ नवें ठेऊन चिरंजीव राजश्री जनार्दनपंत याची रवानगी स्वारीबरोबर केली. श्रीमंत राजश्री चिमाजीआप्पा पुण्याचे मुकामीं आहेत. गोखले यांणींही पुण्यांत रहावें म्हणोन आज्ञा जाली. विंचूरकर यास सरंजामी नेमणुकी फौज ठेऊन नवी फौजेस निरोप

---

१ धुळप हे मराठी आरमाराचे सुभेदार. २ गोखले पत्र पुण्याहून मिरजेस. ३ गणपत परशराम तासगांवकर. ४ हंगामी. ५ एकांडा = शिलेदारांचा जथेदार.

द्यावा म्हणोन आज्ञा जाली. नवे फौजेच्या फडश्याबद्दल चार लाख रुपये सरकारांतून विंचूरकर यांस दिले, उत्तरेकडील गृहस्थाची प्रबलता आहे. राजश्री आप्पाजी गोविंद याचे मजकुराविशीं आज्ञा. त्यास श्रीमंत तिकडे गेल्यामुळें चार दिवस कारभार दिवसगतीवर पडला. परंतु गोखले मुकामीं आहेत त्या अर्थी वरात रवाना व्हावयाची नाहीं. राजश्री बापू फडके व राजश्री गणपतराव पानसे यांस दुखण्याची आरोग्यता आहे. राजश्री धोंडोपंत गोडबोले निंबास श्रीकृष्णातीरीं आहेत. त्यांस किंचित् आरोग्य आहे. कोपरगांवाहून स्वारी पुण्यास यावयास दोन मास लागतील. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७१३१ श्रीगजानन. (पौष व. १२–१६ जाने.)

पै. छ. २६ सवाल. सन शीत. मयातैन. पौष मास.

शेवेसीं विसाजीराम गोखले. कृतानेक साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा २५ सवाल पावेतों मुक्काम पुणें एथें स्वामींचे कृपावलोकनें करून शेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील सविस्तर वर्तमानाचें पत्रें पेशर्जी एथें आलीं. याजवरी शेवेसीं लिहून पाठविलें आहे. त्यावरून श्रुत होईल. अलीकडील वर्तमान. श्रीमंत कोपरगांवास गेले. तेथें कांहीं भिल्लांचा उपद्रव जाला. त्याजवरी आक्कलकोटकर राजे व रास्ते यांची रवानगी जाली आहे. आनंदराव खासगीवाले यांच्या उभयतां चिरंजीवांत कलह लागला होता. त्यास धाकले चिरंजीव याणीं सरकारांत फिरयाद होऊन केशवराव म्हणोन वडील बंधु यांस कैद करून सिंहगड किल्ल्यावर घातलें. राजेश्री बापू फडके यांस समाधान नव्हतें. त्यास पौष वद्य १० भोमवारीं दोनप्रहरीं काल झाला. वरकड मजकूर अधिकोत्तर कळेल तो मागाहून लिहून पाठवितों. शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७१३२ श्री. (माघ शु. ९–२८ जाने.)

पै. छ. १२ जिल्काद. सन सीत.

विज्ञापना. तागायत छ. ७ जिल्काद मंगळवार दोन प्रहर पावेतों सुखरूप असे. विशेष. रा. बापू गोखले फौजसुद्धां परवां रविवारीं डेरे-

दाखल जाहले. प्रतिनिधींवर मसलत आहे. परंतु आंतील घांट निराळाच दिसतो. गोखले, निपाणकर व करवीरकर एकविचारें होऊन बनल्यास पलटणेंही यावीं आणि कारभारी यांचें मनोगत सिद्धीस न्यावें असें वर्तमान खचित दिसतें. त्यास किल्ल्याची बंदोबस्ती चांगली व चोहींकडे चार जाले आहेत त्यांस इशारा वडिलीं करून हुशार असावें. बळकटी पाहिली असतां केवळ अंगावर पडणार नाहींत. सांगलीसही येविशीं लिहिलीं गेलीं. बहुत चांगला बंदोबस्त असावा. अनमान होऊं नये. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ७१३३ श्रीगजानन. (पौष–जाने.)

पुरवणी. शेवेसीं [1]विसाजीराम साष्टांग नमस्कार. विज्ञापना. श्रीमंतांची स्वारी कोपरगांवास पौष अखेर राहणार. तेथून माघ शु॥ श्रीत्रिंबकेश्वरीं जाऊन श्रीची आर्च्या करून पैठणास रामचंद्र गोसावी यांचे घरीं जाऊन स्वारी माघारी येणार. स्वारीबरोबर इंग्रजांचें एक पलटण आहे. अजिंठ्याचे घांटाखालीं इंग्रजांचीं पलटणें व तुरुकस्वार व मोंगलाची फौज होती ती तेथून कूच करून नागपूरच्या लगत्यास जावयास गेली म्हणोन बाजारआवई आहे. शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७१३४ श्री. (माघ व. ११–१४ फेब्रु.)

पौ छा॥ २५ जिल्काद. सन सीत.

सेवेसीं बाबाजी[2] विश्वनाथ. कृतानेक साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा॥ २४ जिल्काद भृगुवार दोनप्रहर वर्तमान यथास्थित असे. विशेष. गोखले यांचा मुक्काम मौजे पळशी पिंपवडें येथें आला. आज पाडळीचे मुक्कामास येणार. चार हजार फौज आहे म्हणून बाजारी वर्तमान आतांच आलें. तें सेवेसीं लिहिलें आहे. माणसें बातमीस वांगीहून गेलीं आहेत. पक्कें वर्तमान आल्यावर विनंती लिहितों. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ गोखले. पत्र पुण्याहून मिरजेस. २ चाफेकर. पत्र तासगांवाहून मिरजेस. ऐ. ले. सं. १५–४३

नं. ७१३५ श्री. (फाल्गुन शु. ४–२२ फेब्रु.)

पौ छा ६ जिल्हेज, सन सीत. फाल्गुन.

सेवेसीं विसाजी राम गोखले. साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा २ जिल्हेज पावेतों स्वामीचे कृपेंकरून मुक्काम लष्कर नजिक देऊर येथें सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं कसबा राहिमतपूर कमावीसदार याजसमागमें पत्र पाठविलें त्यांत आज्ञा जे, फौजेचा मुकाम तालुक्यानजीक आला. राहिमतपुरास हरएकाविसीं उपद्रव करून देऊं नये. बचाव होय तें करावें म्हणोन आज्ञा. त्यास तालुक्याविसीं बारंवार विनंती करीतच आहें व बरोबर फौजेंत रहावें म्हणोन आज्ञा जाली आहे. याजकरितां माझें राहणें जालें. स्वामींनीं लिहून मीं येथें बोलावें असा हा सेवक नाहीं. चिरंजीव राजमान्य राजश्री [1]बापूसाहेब यास स्वामीचें पत्र होतें. तें प्रविष्ट केलें. बहुत काय लिहिणें? हे विज्ञापना.[2]

---

नं. ७१३६ श्री. (फाल्गुन व. १०–१४ मार्च.)

पै. छ. १ मोहरम. सीत मय्यातैन व अल्लफ.

सेवेशीं साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागाईत छ. २२ जिल्हेज पावेतों स्वामींचे कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंतांची स्वारी नासिकास जाऊन कैलासवासी रंगराव राजे बहादूर याच्या दौलतीची [3]कुल किल्ले व सरंजामी महाल व नासिकांतील वाडा वगैरे दौलत जप्त करून राजे बहादर यांच्या दौलतीचा बंदोबस्त जप्ती सुद्धां त्रिंबकजी डेंगळे यांजकडेस सांगितला. नंतर स्वारी कोपरगांवास जाऊन तेथें राजश्री विंचूरकर यांच्या भेटी होऊन फाल्गुन वद्य ६ पैठणास स्वारी दाखल जाहली. पुण्यास वर्षप्रतिपदेस अथवा शु. २ दाखल होणार. आजंट्याचे घांटानजीक इंग्रजांकडील पलटणें होतीं तीं शहर औरंगाबादेस येऊन दाखल जाहलीं. बऱ्हाणपूर प्रांतीं सिंद्याकडील पेंढार वगैरे यांचा दंगा फार आहे. नागपूर प्रांतीं धारण दोन अडीच शेरांची होऊन भोसले सडे नागपुरांत स्वस्थ आहेत. उत्तरेकडील वर्तमान तरी

---

१ सरदार बापूजी गणेश गोखले. २ पत्र मिरजेस. ३ कुल = सर्व.

दिल्लीचीं पत्रें शु ६ व शु ८ चीं आलीं. त्या पत्रांत मजकूर होळकर फौज सुद्धां [1]आमसराकडे सिखांच्या भेटीस गेले. पिच्छावर लीकसाहेब वगैरे मिळोन चौवीस पलटणेंनिसीं आहेत. उभयतांच्या बोलण्यांत सीखकडील धर्मसिंग आहेत. त्यास होळकर व इंग्रज उभयतां हुशार आहेत व होळकरास मदत सीख आहेत. म्हणोन याप्रमाणें लिहिलें आलें आहे. त्यास पुण्यांत आवई आली आहे जे होळकरांची व इंग्रजांची बेहद लढाई होऊन इंग्रज सिकस्त होऊन परस्परें सल्ला जाहला म्हणोन बहुत शहरांत बोलतात. परंतु करनेल कलुस व मोदी यांजकडेस या वर्तमानाचा शोध केला. परंतु पक्कें वर्तमान कळत नाहीं. त्यास दिल्लीहून आठ चौ रोजां पत्रें येतील. त्यावरून तिकडील सविस्तर मजकूर कळेल. तो सेवेशीं लिहून पाठवूं. राजश्री सिंदे बहादूर आजामिरावर फौजसुद्धां स्वस्थ आहेत. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७१३७ श्रीगजानन. (फाल्गुन व. १३–१८ मार्च.)

पौ छा २८ जिल्हेज. सन सीत. फाल्गुन.

[2]सेवेसीं चिंतामणी राम गोखले. कृतानेक साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा २६ जिल्हेज पावेतों मुकाम लष्कर नजीक कुरलें येथें स्वामीचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंत पंतप्रतिनिधि यांचीं व चिरंजीव राजमान्य राजश्री बापूसाहेब यांचीं बोलणीं होऊन राजश्री बलवंतराव फडणीस यांचीं मुलें माणसें व कारभारी लष्करचे मुकामीं पोहोचऊन दिलीं व पंतांची मातुश्री कराडास आपले स्वसत्तेंत पोहोंचविली. त्यांचा फौजांचा व या फौजांचा मोहल्ला मसुरा-नजीक छा १७ रोजीं होऊन झटपट सुमारांत जाली. त्याणीं मसूर सोडून वसंतगडच्या आश्रानें सायंकाळपावेतों जागा धरून खुद्दच फौजेंत होते. याजकडील तोफेनें त्यांच्या फऱ्यांतील दोन घोडीं ठार जालीं. इतक्यांत त्याजकडून दोन चिठ्या सल्लयासंबंधें आल्यानें व संध्याकाळ जाला तों पंत आपल्या ठिकाणास गेले. हे माघारे कवठ्यानजीक मुकामास आले.

---

१ अमृतसराकडे. २ पत्र मिरजेस.

नंतर हे विचार बोलण्यांत येऊन मुलेमाणसें व कारभारी सोडून दिले. पुढें विचार होऊन ठरेल तें लिहून पाठवितों. इंग्रजांचा व होळकर यांचा सल्ला जाला म्हणोन वकिलांचीं पत्रें आलीं. सल्याचा तपशील मागाऊन लिहून पाठवितों म्हणून लिहिलें आहे. तपशील समजल्यावर सेवेसीं लिहितों. श्रीमंत चैत्र शु १ पुण्यास येणार म्हणोन वर्तमान आहे. पंतांचा मुकाम फौजेसुद्धां कराडनजीक आहे. दोन हजार गणतीचे स्वार व पायदळ हजार येणेंप्रमाणें पंतांजवळ जमाव आहे म्हणोन बाजार-अवाई आहे. त्यांच्या व गोखले यांच्या [१]तलाव्या–तलाव्यांत सदरहू-प्रमाणें जमाव दिसतो. बहुतकरून सरकारआज्ञेप्रमाणेंच पंतांकडील रुकार पडावा असें आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७१३८ श्रीगजानन. (चैत्र शु. ६–२६ मार्च.)

पौ छा ७ मोहरम. सन सीत. चैत्र मास.

सेवेशीं [२]विसाजीराम. कृतानेक साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा ५ मोहोरम पर्यंत सेवकाचें वर्तमान मुक्काम लष्कर नजीक कोणेगांव श्रीकृष्णा दक्षिण तीर क्षेम असे. विशेष. छा ४ मोहरमीं मौजे कवठें येथून कूच करून मुक्काम मजकुरीं आले, बुणगें उतरलें. स्वारी मागून आली. तों श्रीमंत राजश्री पंत कराडाचे मुक्काम दोन टोळ्या करून खासा हजार स्वार व पांचशें पायदळ वसंतगड एक कोसचे पिछाडीस राखून उभे राहिले व दुसरी टोळी मसूर पिछाडीस घेऊन चारशें स्वार व चारशें पायदळ घेऊन आली. त्या दोन टोळ्यांस व आमचे गोटास दीड कोसाचा छटा होता. त्याणीं पावलांनीं पाऊल चालून घेतलें. तेव्हां मसूरच्या अंगें स्वार, पायदळ नेमून खासे टोळीवर श्रीकृष्णा उतरून पायदळ, तोफा पुढें घालून मागें फौज सुद्धां चालोन गेले. घटका दीड घटका गोळागोळी चालली. नंतर हे चालोन गेले. पंतांचा मोड जाला. पांच पंचवीस माणूस ठार पंतांकडील जालें. राजश्री गोपाळराव निजबत पंत यांचा कारभारी ठार झाला. वसंतगडच्या माचीपर्यंत इकडील फौजेनें

---

१ तलावा = टेहळणी. २ गोखले, पत्र मिरजेस.

घोडीं घातलीं. खासा पंत पाडाव आले. बारा जखमा बीतपशील खैर आहेत. जखमा चार भारी आहेत. कराचलीच्याच जखमा आहेत. दोनशें घोडीं व एक हत्ती व डंके दोन पाडाव आले. लढाई न व्हावी आणि सरकारआज्ञेप्रमाणें समेट व्हावा यदर्थी दीड मास वाट यांनीं पाहिली. परंतु अखेरीस अशी गोष्ट जाली. होणार भावितव्यास उपाय नाहीं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७१३९          श्री.          ( चैत्र शु. ७–२७ मार्च. )

पै. छ. १२ मोहरम. सन सीत. चैत्र मास.

सेवेशीं विज्ञापना. तागायत छ. ६ मोहरम पावेतों स्वामीचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंतांची स्वारी नाशिकाकडेस गेली. तेथें स्वारींतील एक हत्ती नाशिकांतच मेला. तेथून त्रिंबकेश्वरास स्वारी गेली. तेथें एक हत्ती मेला. एकूण दोन हत्ती शिरा चांगले मेले. श्रीमंतांची स्वारी पुण्यांत चैत्र शु. २ शनवारीं आली. ते दिवशीं झाडून सरदार व कारभारी व मुत्सद्दी वगैरे सर्वांनीं वकीलसुद्धां योग्यतेप्रमाणें नजरा केल्या. नंतर दुसरे दिवशीं छ. ३ रविवारीं कारभारी यांणीं शहरांतील झाडून सावकार व उदमी लोक यांजकडे शिपाई पाठवून श्रीमंतांस नजरा सावकारांकडून मातबरीप्रमाणें करविल्या. स्वारी येथें आल्यावर चैत्र शु. ५ श्रीमंतांनीं रा. सदाशिव माणकेश्वर व जीवनराव सुमंत व देवराव हिंगणे व कृष्णाजी भवानी यांस बोलावून आज्ञा केली जे खासा स्वारी चैत्र शु. १३ निघोन सासवडास जाऊन तेथून वाईस जाऊन वैशाख वद्यांत पुन्हां कोपरगांवास जाऊन द्वितीय लग्न करावयाचें. त्यास पस्तीस हजार रुपये सरकारांतून घेऊन कोपरगांवीं तीन मांडव दुमजला चौरस चाळीस खणांप्रमाणें मजबूद तयार करावे. कदाचित् जेष्ठ मासचा पाऊस लागला तरी मांडवावरी खपरेल कौलीं असावें. याप्रमाणें मांडव जलद करावे म्हणोन आज्ञा केली. त्यास रा. सदाशिव माणकेश्वर यांणीं जीवनराव सुमंत व देवराव हिंगणे या उभयतांस सांगितलें जे, तुम्हीं उभयतांनीं दिल्लीच्या दौलती व इमारती वगैरे मोगलाईंतील बहुत पाहिलें आहे. त्यास श्रीमंतांचे आज्ञेप्रमाणें ऐवज घेऊन कोपरगांवास जाऊन मांडव

तयार करवावे म्हणोन सांगितलें. त्यावरून उभयतां बहुत अंदेशांत आहेत. नवरी मूल एक तिचे आईबापासुद्धां श्रीमंतांनीं स्वारीबरोबर ठेविली आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७१४० श्रीगजानन. (चैत्र शु. १४–२ एप्रिल.)

पै. छा १४ मोहरम. सन सीत मयातैन. चैत्र मास.

शेवेसीं विसाजीराम[1] गोखले. कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा १२ मोहरम पावेतों मुक्काम नजीक मसूर येथें शेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं छा ७ मोहरमचीं पत्रें पाठविलीं. त्यांत आज्ञा जे, गोखले यांची व पंतांची लढाई होऊन खासा पाडाव व जखमा मोघम लिहिल्या याचें साद्यंत लिहून पाठवणें म्हणोन. त्यांस श्रीमंत राजेश्री पंत यांस जखमा बारा लागल्या. तपशील:––

| | |
|---|---|
| १ उजवा हात पंजापासून लेखणी. | २ नाकावरी व गालावरी डोळयाचा बचाव व नाकाचा बचाव राहून लागल्या. |
| १ कपाळावरील भिंवई डावी तुटोन बच्याव. | १ डाव्या दंडास जखम भारी. |
| २ दोन खांद्यावरी दोन हलक्या. | १ छातीस उभी जखम पट्याची भारी. |
| १ टाळकीवर आडवी हलकी. | २ उजव्या मांडीवर हलक्या. |
| १ डाव्या मांडीवर हलकी. | |

बारा जखमा झाडून तरवारेच्या व पटयाच्या आहेत. लढाईचे दिवशीं आंगांत कांहीं सामान घातलें नव्हतें. पांढरा आंगरखाही नव्हता. जातीच्या कजाखीपणास ऐसा दुसरा पुरुष पाहाण्यांत नाहीं. इतक्या जखमा लागल्या परंतु बोलणें सावधपणाचें. शब्द कोठें जाऊं द्यावयाचा नाहीं. जखमा झाडून सेजेस आल्या. खैर आहेत. बरदास्तविषईं चिरंजीवांचा बंदोबस्त चांगला आहे. कन्हाडीं [2]बाई ठाण्यांत होती. त्यास ठाणेंत आरब होते. त्यांचे तलबेचा फडशा बळवंतराव फडणीस यांजकडून करून घेऊन ठाण्यांत आपली शिबंदी घातली. बळवंतराव यांणीं बहुत विचारें

---

[1] पत्र मिरजेस बाळासा. स. या लढाईंत प्रतिनिधींचा उजवा हात तुटला त्यामुळें यापुढें पंतांना 'थोटेपंत' असें नामाभिधान प्राप्त झालें. [2] काशीबाई मातुश्री.

बोलिले. परंतु चिरंजीवांनीं[1] न आइकतां आपलें ठाणें घातलें. बाई आंतच आहे. मसूर एथेंही आपलेंच ठाणें घातलें. याजमुळें फडणीस यास एक तऱ्हेचें समजोन पुण्यास पत्रें रवाना केलीं आहेत. तिकडून येईल त्याजप्रमाणें एथें काय होतें तें शेवेसीं लिहून पाठवीन. चिरंजीव राजमान्य राजेश्री बापूसाहेब यांच्या मसलतींत संस्थानाचा बचाव आपले हातून जितका होईल तितका करावा. त्यास आनमान नाहीं व ज्या रोजीं खासे पाडाव आले त्या दिवशीं खाशांनीं वचन घेऊन जखमा बांधविल्या. परभारें श्रीमंत राजेश्री बाजीरावसाहेब यांजकडे चिरंजीवांनीं पत्रें कारकून देऊन पाठविलीं आहेत. बळवंतराव फडणीस याणें तेथें मनस्वी दरबार खर्च करून तेथील दिवाण वगैरे आपल्या स्वाधीन करून घेतले आहेत. पंतांस स्वाधीन करणेविसीं त्यांचे उद्योग चालले आहेत. यांचेही परभारें त्यांस न कळत पुरावे महाराजांशीं चालले आहेत. त्यांच्या चित्तांत ही दौलत आपल्या हाताखालीं घालावी असें नाहीं. कारभारी यांच्या चित्तांत अपहार करावी याजप्रमाणें आहे. पंतांच्या दैवदशा कमी झाल्या असल्यास कारभारी आहेत त्याचप्रमाणें घडोन येईल. चिरंजीवांचा निश्चय तो संस्थान राखावें असें आहे. यांत पुढें काय मजकूर बाजारआवाईत येईल तो लिहून पाठवितों. बहुत काय लिहिणें ? श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७१४१ श्रीगजानन. ( चैत्र व. २–५ एप्रिल. )

पौ छा २० मोहरम. सन सीत. चैत्र मास.

सेवेसीं विसाजी[2] राम गोखले. कृतानेक साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा १५ मोहरम पावेतों मुक्काम लष्कर नजीक मसूर येथें स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील मजकूर छा १३ मोहरमीं श्रीमंत राजश्री पंतांची व मातोश्रीची भेट जाहली. नंतर छा १४ मोहरमीं मातोश्री कराडास गेली. श्रीमंतांच्या जखमा बऱ्याच आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

सेवेसीं [2]दिनकर रामाचा साष्टांग नमस्कार. विज्ञापना. ऐसाजे. छा १४

---

१ चुलत पुतण्या बापू गोखले यांणीं. २ विसाजी राम व दिनकर राम हे भाऊ भाऊ. दोघांचें हें पत्र मिरजेस.

मोहरमीं श्रीमंतांकडून बापू कवठेकर व हरिपंत जोशी आले आहेत. त्यांचे बोलण्यांतील रंग पाहिला असतां संस्थानचा बचाव आहे असें दिसतें. श्रीमंत राजश्री पंतप्रतिनिधि पुरा दैववान् म्हणोन अशा काळांत इतक्या रंगास आला. त्यापेक्षां पुढील अर्थ सुदिन आहे. श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं ७१४२ श्रीगजानन. (चैत्र व. ९-१२ एप्रिल.)

पौ छा २५ मोहरम. सन सीत. चैत्र.

[1]सेवेसीं विसाजी राम गोखले. शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा २२ मोहरमपर्यंत स्वामीचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. यानंतर छा १९ मोहरमचें आज्ञापत्र पाठविलें. तेथें आज्ञा जे राजश्री गोविंदरावजी श्रीमंत राजश्री पंतप्रतिनिधि यांचे समाचारास पाठविले आहेत. यास घेऊन जावें. समक्ष पाहून येतील म्हणोन. त्यास आज्ञेप्रमाणें रावजीची व श्रीमंतांची भेट करून जखमा पाहून आले आहेत. इकडील सविस्तर मजकुराची विनंती करतील. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७१४३ श्री. (चैत्र व. ११-१४ एप्रिल.)

पौ छा २३ मोहरम. सन सीत. चैत्र.

[2]सेवेसीं रंगो रामाजी मुकाम कसबें ऐनापूर. कृतानेक साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा २३ मोहरम भानुवार प्रथम प्रहरपावेतों यथास्थित असे. विशेष. राजश्री सदाशिवपंत पराडकर निसबत गोडबोले हे परवां तेलसंगाहून निघोन येथें मुकामास आले. समागमें दहा गारदी व आठ घोडीं, आठ बैल ओझ्याचे व ब्राह्मण, कारकून वगैरे मंडळी बाजारास मुकामास राहिली. तेथें त्यांस ज्वर फार आला. यास्तव गांवांत निवाऱ्याचे जाग्यास एक दिवस राहून पुढें जावें यास्तव गांवांत काल सायंकाळीं येऊन उतरले. तों आज प्रातःकाळीं राजश्री आनंदराव

---

१ पत्र गोखल्यांच्या लष्करांतून मिरजेस. २ पत्र मिरजेस.

भाऊकडून राजश्री बाबा नाईक इंगळकर चाळीस पन्नास स्वार व कांहीं गारदी घेऊन तेरदाळास जातों म्हणून तळ्यावर उभे राहून जमोन दंगा करून तळ्याचे वेसीनें आंत शिरोन मशारानिल्हे यांस वेढून तट्टावर बसऊन त्याची चिजवस्त सुद्धां बाहेर काढून घेऊन जाऊं लागले. सदाशिवपंतांस घेऊन गेले. मागाऊन भाऊकडील कारकून व प्यादे कंठाळा लादून घेऊन जात होते. त्यांस येथें ठेविले आहेत. सारांश गांवांत दंगा करून याप्रमाणें कारभार जाला आहे. सेवेसीं कळावेकरितां लि॥ विनंती आहे. बहुत काय लिहिणें ? सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ७१४४ श्रीगजानन. (वैशाख शु. १–१९ एप्रिल.)

पौ छा २७ सफर. सन सीत. मयातैन. वैशाख मास.

[१]शेवेसीं विसाजीराव गोखले. कृतानेक साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा २९ मोहरम पावेतों मुक्काम लष्करनजीक मसूर येथें स्वामींचे कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं पत्र पाठविलें तेथें आज्ञा जे, पंचवीस अंजीर व पांच डाळिंबें श्रीमंत पंत-प्रतिनिधि यांस प्रविष्ट करावीं. दाहा अंजीर बापू गोखले यांस द्यावे म्हणोन आज्ञा. त्यास आज्ञेप्रमाणें प्रविष्ट करून चिरंजीव राजेश्री बापूचें पत्र पाठविलें आहे. [२]श्रीमंतांस साष्टांग नमस्कार स्वामींचा सांगितला. श्रीमंतांच्या जखमा शेजेस आल्या. चार जखमा भारी आहेत. त्या आवरांत आल्या नाहींत. वरकड आल्या. तीर्थस्वरूप राजेश्री बाळाजी-पंत दादा पुण्यास श्रीमंतांकडे आले आहेत. बोलण्यांत येऊन काय ठरतें तें मागाहून शेवेसीं लिहून पाठवितों. बहुत काय लिहिणें ? शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७१४५ श्री. (वैशाख शु. ७–२५ एप्रिल.)

पै. छ. १२ सफर. सन शीत. मयातैन. वैशाख.

शेवेसीं साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छा ५ सफरपावेतों

---

१ पत्र मिरजेस. २ पंतप्रतिनिधि यांस.

ऐ. ले. सं. १५–४४

स्वामींचे कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. उभयतां श्रीमंतांमध्यें परस्परें अति चित्तशुद्धता नाहीं. त्रितीयेचीं श्राद्धें परस्परें निराळीं होऊन धाकटे श्रीमंत[1] प्राचीन वाड्यांत आहेत. त्यांच्या मुद-बकसुद्धां खर्चाची बहुत तंगचाई होऊन एक पालखी व दोन कोतवाल घोडे व पांचसात प्याद्यांनिशीं शहरांत हर कोठें स्वारी जाती. लहान-मोठे सरदार व मुत्सद्दी लहान थोर कारभारीसुद्धां नव्या वाड्यांत येतात. खासे श्रीमंत आंत असतात. तेथें हर कोणी शागीर्द व खिजमतगार विनंती करितात जे, बाहेर लहानमोठे मुत्सद्दी व कारभारी आले आहेत. त्यांस नमस्कारास आज्ञा झाल्यास येतील अशी विनंती केली असतां सर्व सरदारांस व मुत्सद्दी व कारभारी यांस गालिप्रदानें होऊन हर-कोणास सर्वांस नमस्कारास परवानगी होत नाहीं असा मार्ग सध्यां चालला आहे. रात्रंदिवस स्वारी जनान्यांत असती. कुलदौलतीचा कारभार व एकत्यारी त्रिंबकजी डेंगळे ते व आणखी चार असामी खिजमतगार आहेत. त्यांजवर आहे. ते म्हणतील तें सर्वांस मान्य. याप्रमाणें एथील वर्तमान आहे. शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७१४६ श्री. (वैशाख शु. १२–२९ एप्रिल.)

पै. छ. २० सफर. सन सीत. वैशाख.

सेवेशीं सां नमस्कार विज्ञापना. तागायत छ. ९ सफर पावेतों स्वामींचे कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. पेशजीं सेवेशीं पत्रें पाठविलीं आहेत तीं पावोन सविस्तर निवेदन जाहलेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी कारभारी व मुत्सद्दी यांचे घरीं श्रीमंतांस मेजवान्या होतात. त्यास पोशाख व जवाहीर श्रीमंतांस द्यावें लागतें. त्याचा खंडच होऊन नगदी ऐवज खासगीस हाली शिक्का पावता करावा लागतो. याप्रमाणें शिरस्ता पडून सरकारचें जवाहीर व पोशाख आणोन दिल्हे म्हणजे मेजवानी होती. हरकोठें मेजवानीस एकटे बाबा-साहेब मात्र जातात. नबाबाच्या मुलखांतील सरदेशमुखी व नाडगौडी व बाबती वगैरे मुलूख अंमल येणें त्याऐवजीं बेदरसुभा व बालेघाट वगैरे

---

१ चिमाजीआप्पा. पेशव्यांचे धाकटे बंधु.

मिळोन पसतीस लक्षांचा मुलूख कदीम सरकारांत घेतला होता तो मशीरन मुलूख याणें सरकारांतून सोडून घेऊन गेले. त्यास इल्लीं सदरहू मुलूख माघारा द्यावा म्हणोन नबाबाशीं इंग्रजांनीं परभारें बोलणें करून ठराविलें जे, सरकारचा मुलूख प्राचीन आहे तो सरकारांत द्यावा. त्यावरून कर्णेल कलुप वगैरे इंग्रज यार्णी सरकारांत विनंती केली जे नबाबाकडेस मुलूख पस्तीस लक्षांचा सरकारचा येणें त्याची याद प्राचीन महामुलप्रमाणें उतरून द्यावी. त्यावरून मुलुखाचा झाडा दप्तरांतून निवडून कर्णेल कलूप याच्या स्वाधीन याद एक दो रोजीं होणार. भोसले नागपूरकर यार्णी नागपूरच्या [1]शहरपन्हयास कोटाचें काम सुरू केलें आहे. सरासरी चाळीस लाख रुपयेपर्यंत लावून शहरपन्हा मजबूत तयार करणार. सर्जेराव घाटगे सुरंजेस होते ते शिंदे बहादर यांनीं बोलावून नेले. नंतर चैत्र वद्य पंचमीस अंबोजी इंगळे व यादवराव भास्कर व घाटगे यांस कैद करावें म्हणोन ठरोन अंबोजी इंगळे व यादवराव भास्कर कैद जाहले. घाटगे पळून गेले म्हणून उत्तरेहून लिहिलें आलें आहे. हरिनाथसिंग होळकराकडील फौजसुद्धां कोटें व बुंदी येथें येऊन खंडण्या सुरू केल्या होत्या. त्यास मशारनिल्हे [2]आपमोतीनें कैलासवासी जाले अशी बातमी आली आहे. श्री. राजश्री बापूसाहेब यार्णी श्रीमंतांची मर्जी संपादून हास्यविनोद थट्टामस्करी श्रीमंतांच्या रुबरू श्रीमंतांनजीक मंडळी आहेत त्यांशीं श्रीमंतसुद्धां परस्परें होत असती. रा. बळवंतराव नागनाथ अपंक्त दासीच्या दोषेंकरून होते. ते वैशाख शु. पंचमीस श्रीमंत मशारनिल्हे यांच्या घरीं जाऊन पंक्तिपावन केलें. होळकराकडील खंडोपंत व कुंजर यांस सरकारचीं बोलावणीं कर्णेल यार्णी पाठविलीं आहेत. बऱ्हाणपुराहून लौकरच येतील. शिंद्याकडील अन्याबा जाधव येथें आहेतच. दौलतींतील प्राचीन सरदार व मुत्सद्दी व बाबा फडके, गोविंदराव काळे, दादा गद्रे वगैरे पर्वतवासी[3] आहेत त्यांसुद्धां झाडून बोलवोन पुण्यास आणावें याप्रमाणें कर्णेल यार्णी ठरावून घेतलें. घडेल तेव्हां खरें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ शहरपन्हा = शहराचा तट. २ अपमृत्यूनें. ३ किल्ल्यावर तुरुंगांत.

नं. ७१४७ श्रीगजानन. (वैशाख शु. १३–३० एप्रिल.)

पै. छ. १२ सफर. सन शीत. वैशाख मास.

सेवेसीं[1] विसाजीराम गोखले. शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. १० सफर पावेतों मुक्काम लष्करनजीक टकले बोरगांव एथें सेवकाचें वर्तमान क्षेम असे. विशेष. स्वामींनीं पत्र पाठविलें तेथें आज्ञा जे, श्रीमंतांस डाळिंबें पांच पाठविलीं आहेत. बापूंस पत्र आहे. प्रविष्ट करावें. पुण्याकडील वर्तमान कळलें असेल तें लिहिणें. जखमा शेसेस आल्याचें सविस्तर लिहिणें म्हणोन आज्ञोत्तर आलें. त्यास स्वामींचें पत्र चि रा. रा. बापूसाहेब यांस प्रविष्ट करून उत्तर पाठविलें आहे. त्यांत पुण्याकडील व श्रीमंत राजेश्री पंत यांच्या जखमा शेजेस आल्याचें वगैरे लिहिलें आहे. त्याजवरून कळेल. रा. बळवंतराव फडणीस व पेंढरकर व बाई वगैरे कैद करून मुक्काम मजकुरीं आले. पुण्यास पाठवावयाच्या बेतांत आहेत. कऱ्हाड, मसूर, सदाशिवगड येथें ठाणीं आपलीं बसलीं. मच्छेंद्र व भूषणगड एथें ठाणीं एक दोन रोजांत बसतील. बोलणीं होत आहेत. श्रीमंत राजेश्री पंतप्रतिनिधि तूर्त तरी एथें राहावें याजप्रमाणें याजकडून उद्योग चालले आहेत. श्रीमंतांची आज्ञा काय येती पाहावी. कळावें बहुत काय लिहिणें ! सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७१४८ श्रीगजानन. (वैशाख शु. १३–३० एप्रिल.)

पै. छ. १२ सफर. सन सीत. वैशाख.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधररावजी स्वामीचे सेवेशीं. पोष्य बापूजी गणेश[2] सां नमस्कार. विनंती. येथील कुशल ता. छ. १० सफर जाणोन स्वकीय कुशल लिहीत असावें. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. श्री राजश्री पंतप्रतिनिधि यांस डाळिंबें सुमार ५ पाठविलीं तीं पावलीं. पंतांस प्रविष्ट केलीं. जखमांचा मजकूर लिहावा म्हणोन लिहिलें. त्यांस हलक्या जखमा शेजेस आल्या. भारी होत्या त्याही बऱ्या होत आहेत. गुणोन्मुख आहेत. इंग्रजांकडील येडूरजवळ व घोडगेरीस लोक होते ते गेल्याचें लिहिलें तें कळलें. पुण्यांत

---

१ पत्र मिरजेस. २ गोखले, पत्र लष्करांतून मिरजेस.

पलटणें नऊ दहा जमलीं येविशींचें लिहावें म्हणोन लिहिलें. त्यास पुण्याहून अखबार रोज येत असते. दहा पलटणें जमल्याची बातमी इकडे नाहीं. त्या प्रांतीं लोक बातमी मनस्वी उठवितात ! आपलींही पत्रें पुण्याचीं येतच असतील. बहुतकरून पंतांच्या जखमा शेजेस आल्या. बहुत काय लिहिणें. लोभ करावा हे विनंती.

---

नं. ७१४९ (ज्येष्ठ–मे)

पुा[1] राजश्री बळवंतराव फडणीस वगैरे मंडळी मातुश्रीसुद्धां सतरा पुण्यास रवाना केल्या. त्यांजपैकीं मातुश्री पुण्यांत टेवून घेतली. पांच असामी पेंढरकर वगैरे [2]चिरंजीवांनीं आपल्या जिम्मेस करून घेतल्या. बाकीचे बळवंतराव फडणीस व त्यांचे भाऊ सदाशिवपंत व बापू रुद्र वगैरे मंडळी झाडून अलंग कुरंग व वसई येथें फुटाफूट करून किल्ल्यावर घातली. ××× [3]

---

नं. ७१५० श्रीगजानन. (वैशाख व. ३–५ मे.)

पै. छ. १६ सफर. सन सीत. भौमवार.

सेवेशीं विसाजी[4] राम गोखले. कृतानेक सां. नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. १५ सफर पावेतों मुक्काम लष्करनजीक चिमणगांव येथें वर्तमान क्षेम असे. विशेष. स्वामींनीं पत्र पाठविलें त्यांत आज्ञा जे, जनवार्ता अनेक प्रकारची बोलतात. लष्करचा मुक्काम कोठें आहे तें लिहून कळवावें म्हणोन पुण्याहून दररोज अखबार येत असती. त्यांत अधिकोत्तर ल्याहावयाजोगें नाहीं. तिकडील प्रांतीं काय वर्तमान असेल तें असो. रा. बळवंतराव फडणीस यांस मंडळीसह व मातुश्रीबाईस कैद करून पुण्यास पाठवावयाच्या मसलतींत आहे. श्री. राजश्री पंतप्रतिनिधि तूर्त लष्करास राहावें याजप्रमाणें आहे. मुक्काम मजकुरीं मुक्काम छ. १३ रोजीं आला. त्याच रोजीं वर्धनगडास मोर्चे बसविले. पहिले रोजींच खालील माची घेऊन मोर्चे कायम जाले. आज बोलणें लागलें आहे.

---

१ विसाजी राम गोखले यांचें पत्र लष्करांतून मिरजेस. २ चुलत पुतण्या बापू गोखले यांनीं. ३ पत्र अपुरें सांपडलें. ४ पत्र मिरजेस.

काय ठरेल तें मागाहून सेवेशीं लिहितों. बहुत काय लिहिणें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७१५१ श्री. ( वैशाख व. ६-८ मे. )

पै. छ. १९ सफर. सन सीत. मय्यातैन. वैशाख मास.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी. त्रिकाल चरणांवरी मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत वैशाख वद्य २ पावेतों बालकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. निरखाची याद पेशजीं सांगलीच्या सांडणीस्वाराबरोबर* पाठविली होती व ती मातोश्री साळीआक्कास लुगडीं सांगलीच्या सांडणीस्वाराबरोबर पाठविलीं होतीं. त्यांस पत्रें व लुगडीं पावलीं असतील. पावल्याचें उत्तर पाठवावया आज्ञा करावी. श्रीमंतांनीं कोपरगांवास फरासखाना वगैरे सरंजाम ठेविला होता. लग्न करावयासी स्वारी तेथें जाणार होती. त्यांस यंदा लग्न करीत नाहीं. श्रीमंतांनीं गुदस्तांपासून आठवले यांची मूल पाहून ठेविली. तिजला वस्तवानी घालून वाड्यांत नेहमीं असे. ती मूल राजश्री गणपतराव कृष्ण साठे यांचे मुलास दिल्ही. काल वद्य १ रात्रीस लग्न जाहलें. दोन्ही मांडवांचा खर्च श्रीमंतांनीं दिल्हा. सरकारचे कारकून दोही मंडपांत याजप्रमाणें लग्न तिचें करविलें. लग्नाची मसलत राहिली. मग कोपरगांवचा सरंजाम आणावयासी उंटें व स्वार गेले. कळावें. सरकारांत रात्रीस शंभर ब्राह्मणांची वसंतपूजा केली. पुतळी व मोहोर दिली. पंखा सात आठ रुपयेमध्यें एक एक दिला. मध्यान रात्र जाली. भोजनाची मेजवाणी केली. वडिलांस कळावें. राजश्री महादाजीपंत साठे यांजला सरकारांतून मुली पाहण्यासी पाठविलें होतें. त्याणीं दोन मुली आणिल्या. चार रोज जाले. दोही मुलींस वाडा देऊन तेथें खर्चास दिलें आहे. यंदा लग्न करतील असा सुमार दिसत नाहीं असें बोलतात. राजश्री अन्या विंचूरकर यांनीं आपलें लग्न केलें. काल रात्रीस ती मूल श्रीमंतांनीं पाहून त्यांचे मर्जीस आलेनंतर आज्ञा केलीवरून लग्न केलें. कळावें. राजश्री बाळकृष्णपंत बाळ भाऊ याणीं कल्याणाहून वडिलांचे नांवें पत्र व सौ सगुणाबाई यांचे नांवें पत्र असे दोन्ही पत्राचे लखोटे त्यांजकडून

आले ते हाली पाठविले आहेत. पावल्याचें उत्तर पाठविण्याची आज्ञा करावी. बहुत काय लिहिणें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७१५२  श्रीगजानन.  ( वैशाख व. ६–८ मे. )

पै. छ. १९ सफर. सीत. मय्यातैन. वैशाख मास.

सेवेशीं [1]विसाजी राम गोखले. कृतानेक सा. नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. १८ सफर पावेतों मुक्काम लष्कर नजीक पुसेसावळी एक कोस येथें वर्तमान क्षेम असे. विशेष. स्वामींनीं छ. १४ सफरचें पत्र पाठविलें तें छ. १६ मिनहून वर्धनगडानजीक पावलें. तेथें आज्ञा जे— उगारकरांविशीं रा. बापू यास तुम्हांस लिहिलेप्रमाणें सांगोन रहिमतपूरचा बचाव करावा व सविस्तर लिहिणें म्हणोन आज्ञा. त्यास चि. राजश्री बापूसाहेबांस स्वामींचे पत्र प्रविष्ट केलें व विनंतीही केली. माझे हातून पराकाष्ठा कसबे मजकुराविशीं सांगण्याची ती सांगितली. परंतु त्यांचें बोलणें पडतें जे— आपल्या ऐवजाची उगवणी जाहल्याशिवाय धातुपोषणाचीं बोलणीं ऐकत नाहीं. याप्रमाणें उत्तरें होतात. सेवकाचे हातून सेवाचाकरीस अंतर पडावयाचें नाहीं. चिरंजीवांनीं रा. बळवंतराव फडणीस मंडळीसह व मातुश्री बाईसुद्धां ती. राजश्री बाळाजीपंत दादा यांसमागमें देऊन पुण्यास पाठविलें. मुक्कामीं तूर्त श्रीमंत आहेत. वर्धनगडचें ठाणें छ. १५ सफरीं बसलें. दोन रोजांत ठाणें काईल करून घेतलें. महिमनगड व भूषणगडचीं बोलणीं मुक्काम मजकुरीं स्वारी आल्यावर आली आहेत. वाई देश दरोबस्त जप्ती केली. श्रीमंतांचे तालुकेचा झाडून बंदोबस्त करणार. तूर्त पुण्यास इकडील बंदोबस्त होऊन जावयास दोन मास लागतील. विजापूर बागेवाडीकडेही जावयाचा बेत आहे. वरकड मजकूर मागाहून लिहितों. बहुत काय लिहिणें. श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७१५३  श्रीगजानन. (वैशाख व. १२–१५ मे.)

पै. छ. २५ सफर. सन सीत. मयातैन. वैशाख.

---

[1] पत्र मिरजेस.

विज्ञापना[1] ऐसी जे. राजेश्री आनंदराव भाऊ हुपरीकर याणीं मोरबेस मोर्चे दिले होते. चार दिवस गोळागोळी चालली होती. मोरब गांव आनंदराव भाऊनीं जाळून लुटून फस्त केला. पोटबागीकरांची कुमक मोरबकरांस येतांच आनंदरावभाऊंचे मोर्चे उधळले. दाहा वीस माणूस जायां जखमी जाहाले. दोन चार जमादार वगैरे मातबर माणसांचे गळे कापून नेले. आनंदरावभाऊ फौजसुद्धां कूच करून आाणेगिऱ्यावर येऊन उतरले आहेत. लष्करची आवई फार खात आहेत. श्रीदीक्षित स्वामी[2] नवलगुंदास आले. पाण्याचे सोईंकरितां आले आहेत. घडल्यास मुंजीही कराव्यात असा बेत आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

## सुरु सबां मय्यातैन व अलफचीं पत्रें:—

नं. ७१५४ श्री. (ज्येष्ठ व. १२–१३ जून.)

पौ छ. २९ रबिलावल. स. सबा मय्यातैन. आषाढ.

सेवेशीं विनंती सेवक. अण्णाजी रामचंद्र व रामाजी गुंडो निा लागू. शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. ता. २५ रबिलावल मुक्काम कसबें राहिमतपूर स्वामींचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. किल्ले वसंतगड येथें श्रीमंत सौ लक्ष्मीबाई प्रतिनिधि यांनीं जमाव केला आहे. तेथून स्वाऱ्या करून गांव खेडीं मोंवाडून नेतात. गोखले यांजकडील ठाणें ज्या गांवीं तेथें रोखे करून लोक बसविले आहेत. इतर गांवच्या बोली धरून किल्यास घेऊन जातात. परवां बुधवारीं वाठार येथें येऊन तथील पाटिलाची घोडी व गांवचा बोली व कांहीं चीजवस्त घेऊन गेले. आरवी व नागझरी येथीलही बोली नेल्या. आणखी स्वारी येणार असी बोलवा आहे. कोणीकडे जातात कळेना. सेवेशीं निवेदन व्हावयाकरितां विनंती लिहिली आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७१५५ श्री. (१६ जुलै.)

पै. छ. ४ जमादिलावल. सन सब्बा मय्यातैन. अधिक श्रावण शु ६.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी. त्रिकाल चरणांवरी मस्तक ठेऊन शिर-

---

१ विसाजी राम गोखले यांचें पत्र लष्करांतून मिरजेस. २ चिदंबर दीक्षित.

साष्टांग नमस्कार. विज्ञापना. अधिक श्रावण शु॥ १ पावेतों वर्तमान यथास्थित. कर्नेल वसलीसाहेब नगरानजीक घोडनदीवर लस्करांत होता तो पुण्यास आला. त्याजला राजश्री सदाशिवपंत भाऊ यांणीं मेजवानी केली. जेगा, कंठी, सिरपेंच, वस्त्रें एकास मात्र दिले. राजश्री बापू पटवर्धन रत्नागिरी किल्ल्यांत होते. ते सुटून घरीं आले. शंभर लोक बरोबर आहेत. चार रोज घरीं राहून पुण्यास आणावे असी सरकारची आज्ञा किल्लेदारास आहे. घराहून सत्वर येतील. पितांबर गुदस्तां परत आला. तो हल्लीं विकिला. बारा रुपये तोटा. वडिलांस कळावें. राजश्री बाबाजीपंत पटवर्धन यांचे नांवें लखोटा जासुदाबरोबर आला. त्यास मशारनिल्हे तासगांवास गेले यास्तव लखोटा परत पाठविला आहे. कळावें बहुत काय लिहिणें ? होळकर, सिंदे कडील मजकूर नवीन विशेष नाहीं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७१५६ श्री. ( २ आक्टो. )

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी. शिरसा नमस्कार विज्ञापना. तागायत भाद्रपद व. ५ पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. यंदा श्रीमंत श्रीवेंकटेशाचा उत्साह शुक्रवारचे वाड्यांत चवथ्या मजल्यास करणार. मखरास काम लाविलें. काम सुमंताकडे सांगितलें. एकंदर ××× हरदास कलावंत वगैरे विडे पान रोशनाई वगैरे झाडून लहान मोठा खर्च मिळोन रुपये वीस हजार सुमंतास द्यावयाचें ठरलें. दहा तूर्त दिले. नवरात्र नऊ दिवस उत्साह होणार. श्रीमंतांची स्वारी श्रीस्वामी कार्तिकास जाणार अशी बोलवा आहे. रा. खंडोपंत नि. होळकर हे पुण्यास आले. श्रीमंतांची भेट जाली. चार रोज जाले. वाडा विसाजीपंत लेले यांचा दिला. रावसाहेबाकडून वकील श्रीकाशीहून येणार अशी बोलवा आहे. विंचूरकर यांणीं पैक्याकरतां धरणें दोन वेळां रा. सदाशिवपंतभाऊंकडे बसविलें. चार लक्ष रुपये त्यांस द्यावे अशी सरकारची आज्ञा भाऊंस जाली याजप्रमाणें बोलतात. वडिलांस कळावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पौ छ. २९ रजब सन सबा मय्यातैन. आश्विन.

---

ऐ. ले. सं. १५–४५

नं. ७१५७ श्री. (१४ आक्टो.)

पौ छ. ४ साबान. सन सबां. मय्यातैन. आश्विन.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी शिरसा नमस्कार. विज्ञापना. आश्विन शु. ३ श्रीमंतांची स्वारी श्रीस्वामींस जावयाची राहिली असें लोक बोलतात. रा. खंडोपंत निा होळकर यांची व श्रीमंतांची भेट जाली. बोलण्याचा भाव बाहेर फुटत नाहीं. श्रीमंत श्रीवेंकटेशाचा उत्साह शुक्रवारचे वाड्यांत चवथे मजल्यास करणार. मखर केलें आहे. ब्राह्मणभोजन सरकारचे वाड्यांत थोरल्या पांचशें सातशेंपर्यंत नित्य होतें. दर असामीस रुपया एक प्रमाणें दक्षणा देतात. मिष्टान्न भोजनास असतें. शुक्रवारचे वाड्यांत कांहीं सवाष्णी घालतात. नेमणुकीचे गृहस्थ व गवई मात्र उत्साहास जातात. राा बाबजीपंत यांणीं वडिलांस लिहिलें आहे त्यावरोन कळों येईल. बहुत काय लिहिणें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७१५८ श्री. (आश्विन शु. ७–१८ आक्टो.)

राजश्रिया [1]विराजित राजमान्य राजश्री बाळासाहेब स्वामींचे सेवेशीं पोष्य गणेश बापूजी. साष्टांग नमस्कार. विनंती. येथील कुशल ताा छ. ५ साबान जाणून स्वामींनीं कुशल लिहीत असलें पाहिजे. विशेष. आपणाकडून छ. ४ साबानचें पत्र आलें तें पावलें. मिरज तालुक्यांतील गांवांस उपद्रव होऊं नये म्हणोन पत्र लिहून कारकून पाठविले असतां हल्लीं मोजे बांबवडें येथें मेस्तर टोण यांजकडून रोखा होऊन स्वारांनीं गांवकरी यांसीं हजार रुपये करितां उभे केलें आहे म्हणोन लिहिलें. त्यांस मिरज तालुक्यांतील गांवास उपसर्ग आम्हाकडून होणार नाहीं. बांबवडें गांव निम्मे डुबलाकडे दुमाला आहे. त्याऐवजीं रोखा जाहला आहे. डुबलाकडून अगर गांवकरी येऊन जाबसाल जाहला म्हणजे राऊत उठवून आणवितों. सारांश मिरज तालुक्यांत उपसर्ग होऊं नये म्हणोन आज्ञा. त्यास येथून उपसर्ग होणार नाहीं. येविषयींचा मजकूर राजश्री आण्णाजी रामचंद्र विनंती करतील. त्याजवरून ध्यानांत येईल. बहुत काय लिहिणें. लोभ असावा हे विनंती.

---

१ पत्र कारकुनाचें इंग्रजांचे लष्करांतून मिरजेस.

नं. ७१५९ श्री. (१५ नोव्हें.)

पै. छ. ६ रमजान. इंदुवार. कार्तिक. सब्बा मय्यातैन.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी. शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत कार्तिक शु॥ ५ वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजश्री खंडोपंत होळकर यांजकडील जाबसाल कांहीं समजण्यांत येत नाहीं. कांहीं उलगडे होते म्हणजे सहजच दिसतें. तो अर्थ कांहीं दिसत नाहीं. होळकर यांजकडील पत्रें येण्याजाण्यास मार्ग मोकळा जाला आहे. होळकर याणें तिकडे राजेरजवाडे सर्वत्र येक कट्टा केला. पुढें कोणीकडे जातात हें तूर्त कांहीं नाहीं. पुष्पकर तीर्थानजीक होळकर आहेत. जमावसुद्धां आहेत. सिंदे त्यास अंतर पन्नास सत्तर कोसांचें आहे असें बोलतात. कळावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७१६० श्री. (फाल्गुन शु. ६–१५ मार्च.)

पौ छ. ५ मोहरम. सब्बा मय्यातैन. फाल्गुन.

यादी. श्रीमंत राजश्री बाळासाहेब यांस वाका विनंती करावयाचा तो सन सब्बां मय्यातैन स. ११९७ पावेतों वाका.

१ सन ११९७ तागायत स. १२०८ पावेतों बारा सालें:—परगणे बरडोल येथील मामलतीची रा॥ अमृतराव गोविंद यांचे नांवची करून दिली. त्याप्रमाणें सरकारांत वहिवाट जाली. यापैकीं स. ११९७ तागायत सन १२०४ खमस अखेरपर्यंतचा आठ सालचा हिशेब रा॥ अमृतराव गोविंद गु॥ देशमुख यांचे बंधु व मी मिरजेस येऊन ताळेबंद करोन घेतला. बाकी चार सालचा हिशेब व्हावयाचा तो गु॥ देशमुख व जमीदार यांचे विद्यमानें गुंता उरकोन घ्यावा. कलम.

२ सन १२०८ सालीं मामलतीवर जिवाजीपंत फडके बोलत होते. तेव्हां वडिलांचे नांवें स्वामींनीं आज्ञापत्र पाठविलें जे दुसरे मामलतीवर बोलतात तर तुम्ही येणें. त्यावरोन वडिलांनीं मला पाठविलें. तेव्हां मी व रा. पांडुरंग गोविंद गु॥ देशमुख अमृतराव यांचे बंधु मिरजेस आलों. नारोपंत नाना यांचे विद्यमानें बोलणें होऊन स्वामींचें अभयवचन घेऊन ऐवज सरकारांत राजश्री उमाणा नाईकाकडून देविला तो—

६००० सन मजकूर रसद निम्मे.
३२०० बाकीपैकीं.
३००० खासगीचा ऐवज. यापैकीं पांचपन्नास कमी असतील. त्यामुळें अजमासें.

---

याप्रमाणें ऐवजाची चिठी नाईकाची कार्तिक मासीं देविली. मार्गशीर्ष मासीं स्वामीची आज्ञा घेऊन रेवतगांवास आलों. तेथें एक महिना स्वस्थ होत तों वसूल चालता करून दोन अडीच हजारपर्यंत सावकारांचें रदकर्ज-केलें. कलम.

३ पुढें आणखी वसूल चालता करून रद कर्जे करावीं तों पौषमासीं रा. जनार्दन शिवाजी याणीं सुरतवाले यांची फौज आणून कुटुंबसुद्धां धरावें अशी योजना करून काठे मारडीहून निघोन भंडार कवळ्यावर येऊन उतरले. हें वर्तमान समजतांच कुटुंबसुद्धां येथें राहिलें तर कुटुंबघात होईल, आणि फौज सरंजाम भारी, निभाव पडावयाचा नाहीं, असें समजोन ठाण्यांत प्यादे व कारकून ठेवून निघोन हुलेजतीस गेलों. वडिलांची मातुश्री रेवतगांवींच राहिली. काढून न्यावयाची सोय पडली नाहीं. भरलें घर व लग्नाचें साहित्य केलें होतें तें व दाणा व कागदपत्र सारें सोडून निघोन गेलों. कलम.

४ दुसरे दिवशीं त्याच्या फौजेचा मुक्काम रेवतगांवासच होऊन ठाणें घेतलें. घराची चीजवस्त व दाणा व लग्नाचें साहित्य सारें लुटलें गेलें. गाडे दोन व आणखी चीजवस्त घेऊन गेले. कलम.

५ गांवकरांनीं चडचणकर शिंदे यांचे विद्यमानें त्यासीं बोलणें करून चार रुपये कबूल करून त्याचा ऐवज देऊन ठाणें त्याजकडोन घेतलें. हें जाहलें वर्तमान सेवेशीं विनंती लिहून पाठविली. त्याचें उत्तर या खेळांत कोण कोण होते, सरकार तालुक्याचा बखेडा जाला आहे, त्याचा बंदोबस्त शिंदेसह श्रीचे कृपेनें लौकरच होईल. रेवतगांवचें ठाणें गेलें असतें तरी चिंता नव्हती. तुम्ही कांहीं चिंता न करणें म्हणोन आज्ञापत्र आलें. त्यावरून तालुक्याची व घराची खराबी चित्तांत न आणतां स्वामीचे पायाचें लक्ष धरून स्वस्थ राहिलों. कलम.

६ रेवतगांवचे ठाण्यांत कारकून व लोक ठेवून बंदोबस्त केला. कुटुंब घेऊन रेवतगांवास जावें तों पुढें प्रांतांत शिंदेशाही जाली. वरचेवर फौजा येऊं लागल्या. बाळाजी कृष्ण याचा मुक्काम फौजसुद्धां रेवतगांवास आला. खंडणीचा ठराव आठ दहा हजारांचा करून एके दिवशीं जसा ऐवज येईल तसा घेऊन निघोन गेले. गांव बेचिराख होऊन सर्व निघोन गेले. मागाहून चिंतो आत्माराम कंपू व तोफखान्यासुद्धां येथेंच येऊन उतरले. गांवांत कोणी नाहीं. परभारें गांवकरांनीं दाण्याचे व घराचे आशेनें बोलणें करावें तर द्यावयास ताकद नाहीं. त्याची मूक थोर, गळा कापणारास दया कशाची ! असें समजोन बोलणें केलें नाहीं. त्याणीं गांवचा दाणा झाडून लुटला. शेवटीं गांव जाळून निघोन गेले. आमचा दाणा व घराची चीजवस्त सारी लुटली गेली. स. १२०८ सालीं सर्वस्वें बुडालों हें स्वामींस विदितच आहे. शिंदे यांचे फौजेचा दंगा विजापूर प्रांतीं चार पांच महिने होता. कलम.

७ फौज झाडून बाया आदिकरोन माघाऱ्या फिरल्यानंतर तालुकियाची खराबी जाल्याचें विनंतीपत्र पाठविलें. त्यावरोन आज्ञापत्र आलें जे गांवच्या खराब्या पाहून कौलकरार देऊन आबादी करवणें. आज्ञेप्रमाणें आषाढ श्रावणमासीं जमीदार व आम्हीं मिळोन बंदोबस्त केला. पुढें स्वामींचे पायांजवळ येऊन खासगी खराबी दाणा वगैरे गेला त्याची वगैरे विनंती पायांजवळ येऊन करावी तों गृहकृत्य जालें. उपरांत कोणतीही गोष्ट सोईवर पडली नाहीं. पुढें मामलत सोडून दिली. कलम.

८ उपरांत अमृतराव विजापुरास गेले होते. अगोदरच आम्हीही निघोन करकंबेस गेलों. चार सहा महिने स्वस्थ होतों. तों पुढें होळकराचा दंगा होऊन गांव बुडाला. तेव्हां आम्हापासोन हजार रुपये घेतले. कोणीं अदावर्तीनें घर बुडविलें. वस्तभाव व चिरगूट पांघरूण सारें भरतीस घालून दिलें. तीन हजार रुपयेपर्यंत आम्हांस पडले. शुद्ध स्फटिक होऊन राहिलों ! पुढें परिणाम नाहीं, भिक्षा मागावी असा समय जाणोन विनंतीपत्र वडिलांनीं स्वामींस पाठविलें. त्याचें उत्तर आलें जे येथील बोढीचा विचार परस्परें ऐकण्यांत आहे. तेथें विस्तारें काय लिहावें म्हणोन आलें. कलम.

९ अशीं संकटें चहूंकडून आणिलीं. त्यांत स. १२०८ सालीं बारा हजारांचा भरणा सरकारांत केला. सावकारास ऐवज पावला नाहीं. त्यांच्या निकडी. तेव्हां तेथें राहण्याची सोय पडेना असें जाणोन मग निघोन मग श्रीचे[1] दर्शनास आलों. त्यांचे कानांवर सर्व मजकूर घातला. त्यांची आज्ञा जे शिरहट्टीस राहणें म्हणोन सांगितलें व बाळकृष्णपंत-भाऊ[2] यांसही ठेवून घेण्याविशीं सांगितलें. त्यावरोन त्यांणीं ठेवून घेतलें. शक्तीप्रमाणें कार्यकारण चालविलें. मी इकडे आल्यानंतर मागें वडिलांचा काळ जाहला. आम्हांस छत्र होतें तें गेलें. असा काळ पाठीस लागला. तेव्हां कांहीं उपाय चालेनासा जाहला. ते समर्थी स्वामींचे पाय हेंच छत्र जाणून शुभ दिवसाची मार्गप्रतीक्षा पहात जसा दिवस जाईल तसा जावो म्हणोन ही वेळपर्यंत बसलों आहें. आम्हांस स्वामींचे पायां-खेरीज चिंतन दुसरें असल्यास तेच पाय साक्ष अशी विनंती वडिलांनीं पूर्वींच लिहिली आहे. तेंच लक्ष चित्तांत आहे. कलम..

१० श्रीमंत राजश्री आपासाहेब सावनूर तालुक्यांत होते. तेथें ती। राजश्री बाबजीपंत बाबा घरचीं घोडीं घेऊन गेले होते. जितरब तेंही कालेंकरून सर्व लयास गेलें. अशी दशा होऊन अन्नवस्त्राकरितां अजीज होऊन फिरतों. परंतु लक्ष स्वामींचे पायांवर ठेवून. समग्र सर्वांस आहे. हेही दिवस जातील असें जाणोन दिवस घालवीत आहों. कलम.

११ प्रस्तुत परगणे बारडोल येथील मामलत तुमचे वडिलांकडे होती त्याचा हिशेब विल्हेस लागणें आहे. तर हिशेब घेऊन येणें आणि हिशे-बाचे ऐवजीं पांच हजार रुपये पाठवणें म्हणोन रोखे दोन श्री. राजश्री आपासाहेब यांचे घेऊन राजश्री अण्णाजीपंत यांणीं दिले. तेव्हां त्यांस बोललों जे हिशेब घेऊन सरकारांत जातों. यजमानास विनंती करून मनाई घेऊन पाठवितों असें चौघां गृहस्थांचे विद्यमानें सांगितलें. परंतु त्यांचे मर्जीस येईना. दहा गारदी यांचा व आमचा रोज द्यावा आणि पांच हजारांची सावकारी निशा द्यावी, महिन्याचे मुदतींत चिठी मनाईची आणून द्यावी. नंतर हिशेब घेऊन जाणें. नानाप्रकारें अदावतीनें

---

१ चिदंबर दीक्षित. २ बाळकृष्ण लक्ष्मण लागू.

प्रथमदर्शनीं बोलणें जाहलें. एक रोजा मोघम दहा रुपये घेतले. रुपये घरचीं जोडवीं विकून दिले ! दुसरे दिवशीं सूर्योदयापासोन प्रहर रात्रपर्यंत स्नान न करतां बसलों. रा. अण्णा स्नानसंध्या करून आलेनंतर आणखी त्यासी विनंती केली जे, जाबसाल तोडीवर घ्यावा. सरकारचें काम हिशेबाचें. त्याचा त्याचा उलगडा व्हावा व तुम्हांस यश यावें म्हणोन फार प्रकारें सांगून घेतलें आणि जोडा धरला. परंतु त्यांस कांहीं कृपा आली नाहीं. गारदी त्यांचे होते त्यांची माझी गांठ घालून दिली. तेव्हां तेही मनस्वी बोलूं लागले. डोईवर धोंडा देऊन ऐवज घेऊं, तुम्ही काय समजलां ? असें जरबेचें बोलणें पडूं लागलें. तेव्हां एकही तोड होईना. पैसा द्यावयास जवळ नाहीं असें जाणून थकलों. पांच हजारांची निशा मिळत नाहीं, रोज द्यावयास ताकद नाहीं, तेव्हां घात करून जीव द्यावा याशिवाय दुसरी तोड कांहीं सुचेनाशी जाली. तेव्हां अब्रूस भिऊन तिसरे दिवशीं परगांवीं जाऊन राहिलों. 'सतां माने म्लाने मरणमथवा दूरगमनं' असें केलें. येविशींचीं विनंतीपत्रें चि। राजश्री भाऊ सोमण याजबरोबर पाठविलीं आहेत. तीं पावलींच असतील. या समयीं स्वामींनीं उपेक्षा केल्यास कुटुंबघात होतो. कलम.

१२ मी निघोन गेलेनंतर बायकांमुलांस व मातुश्रीस तगादा सक्त केला. सारीं माणसें एके ठायीं बसवून सभोंवते गारदी बायकांजवळ बसविले. असा प्रकार केला. स्वामींचे दौलतीपासोन वडील सेवावृत्ति करीत आले. परंतु असा समय गुदरला नव्हता. तोही काल मर्यादेसारखें दैवयोगें अनुभविला. दोन प्रहर रात्रीस स्नानास पानास परवानगी दिली. अशी हरामखोरी पार्थांसी वडिलांनीं केली नव्हती व आम्हाकडूनही जाली नाहीं. असें असतां असा प्रकार जाला तो पत्रीं कोंठवर ल्याहावा ? असो. स्वामींनीं या समयीं श्रीमंत राजश्री आपासाहेब यांस लिहावयाचें तसें लिहून रा. अण्णाजीपंत यांचे नांवें मनाचिठी आणवून पाठवावयाची जे, रा. जनार्दनपंत हिशेब घेऊन येतील, त्यास ऐवजाचा तगादा न करणें व घरास व बायकांमुलांस उपद्रव करावयाचें कारण नाहीं. रोजाचे रुपये घेतले असतील ते माघारे द्यावे. मशारनिल्हे येतील त्यांस येऊं देणें असें पत्र पाठविलें तरच परिणाम आहे. या समयीं स्वामींखेरीज त्राता नाहीं.

या तगाद्याची धास्त मातुश्रींनीं घेतली आहे. तिचें अशक्तपण यास्तव मनाचिठी अगत्य अगत्य स्वामींनीं कृपा करून आणवून पाठविली पाहिजे म्हणजे सर्वांची मोकळीक होईल. मातुश्रींचे दर्शनाचा योग घडेल. कलम.

१३ सर्व प्रकारें आज नऊ सालें नष्टचर्य अनिवार सोसलें. परंतु स्वामींचे पायांचें लक्ष धरून आहें. सावकारी वगैरे नानाप्रकारें पेंच आहेत. प्रवाहीं पडलों आहों. यांत स्वामींनीं अमृतहस्तें हातीं धरून भिऊं नको म्हणोन म्हटलें असतां सारे जाबसाल उलगड्यांत येतील. धणी व मायबाप स्वामी आहेत. कलम.

१४ हिशेबाचा गुंता मी सेवेशीं येतों. जमीदार व अमृतराव गोविंद यांस आणवून आज्ञेप्रमाणें उलगडयांत येईल. गुंता ठेवीत नाहीं. हिशेब व्हावयाचा तो स्वामींचे पायांजवळच होईल. दुसरेकडे जाहला असतां अदावतीनें आमचे प्राण जातील. याचा अभिमान सर्वोपरी स्वामींसच असावा. वडिलांचा अभिमान धरून चालविलें तसें पुढें चालविणार स्वामी समर्थ आहेत. कलम.

१५ चडचणकर शिंदे याणीं आमची खराबी मनस्वीच केली. सन १२०८ सालीं सुरतवाले यांची फौज आणून हताळीचें ठाणें घेतलें. आमची जोरी दोन पेवें पंधरा खंडी होते ते जबरदस्तीनें भरून नेलें. नऊ वर्षें जालीं. पुढें धारण कशी जाली हें सर्वांस माहीतच आहे. याचा अभिमान स्वामींस असोन उगवणी व्हावयाचे रीतीनें जाहली असतां मी सरकारचे सावकारी पेंचापासोन मुक्त होतों. याचा अभिमान स्वामींस असावा. कलम.

येणेंप्रमाणें विनंती लिहावयाची शक्ती माझी नाहीं. परंतु मोठें संकट जाणून विनंती लिहिली आहे. कृपा करून मनन केलें पाहिजे. आणि मनाचेठी आणवून पाठवावयाची आज्ञा व्हावी.

---

नं. ७१६१ श्रीगणराज. ( फाल्गुन व. १३–५ एप्रिल. )

पै. छ. २६ मोहरम. सन सबा. मयातैन. फाल्गुन मास.

[१]चिरंजीव राजश्री नारायणराव माधवराव यांसी प्रती गंगाधरराव

---

१ या सालीं बाळासा. मिरजकर हे राजापुरास गंगास्नानास गेले होते. त्यांचें हें पत्र मिरजेस. नारायणराव व माधवराव हे बाळासा. चे चिरंजीव.

गोविंद आशीर्वाद. उपरी. येथील कुशल ता। छ. मोहरम जाणोन स्वकीय लिहीत जावें. विशेष. आंब्याचे घांटमाथ्याहून गुरुवारीं राजश्री केसो गणेश खाडिलकर माघारे सांगलीस गेले. त्याजबरोबर तुम्हांस पत्रें पाठविलीं आहेत. तीं पावलींच असतील. तेच दिवशीं घांट उतरून साखरप्याचे मुक्कामास आलों. तेथून निघाल्यावर तिसरे दिवशीं वा। ६ रविवारीं राजापुरास येऊन खाडी उतरून उन्हाळयाजवळ मुक्काम केला. येथून श्रीगंगा पाव कोस पर्वतावर आहे. तेथें सायंकाळीं दर्शनास जाऊन स्नान करून गोटास आलों. इंदुवारीं श्रीगंगेची पूजा केली. भोजनोत्तर तिसरे प्रहरीं श्रीधोपेश्वर पश्चिमेस दीड कोस आहे. तेथें दर्शनास जाऊन सायंकाळीं माघारे आलों. भौमवारीं गंगाराधना ब्राह्मणभोजन पात्र एक हजार जालें. श्रीगंगास्थान बहुत रमणीय आहे. असें स्थळ आजपर्यंत पाहण्यांत आलें नव्हतें. श्रीधोपेश्वरास महारुद्र अभिषेक सप्तमी इंदुवारीं चिरंजीव राजश्री रामचंद्रपंत अप्पा यांनीं करविला. ब्राह्मणभोजन पात्र तीन चारशें पर्यंत जाहलें. चि. राजश्री नाना[1] यांस भोजनास पाठविलें होतें. आम्हींही श्रीधोपेश्वरास एक महारुद्र करविला. गंगेजवळ चिरंजीवाकडील ब्राह्मणभोजन बुधवारीं जालें. पात्र एक हजार जालें. इकडील मार्ग चांगली वाट अर्ध कोस देखील नाहीं. उंच नीच जमीन. झाडी, अडचणी भारी. सर्व श्रम श्रीगंगादर्शनें करून परिहार जाले. अपूर्व स्थल आहे! सविस्तर आलेवर सांगूं. पत्रीं कोठवर लिहावें! राजापूर बंदर ही जागा चांगली. गांव पेठ चांगली. मातबर सावकार आहेत. माल जहाजावरून बहुत येतो. बहुत काय लिहिणें. लोभ करावा हे आशीर्वाद.

---

## सु॥ समान मय्यातैन व अलुफचीं पत्रें:—

*नं ७१६२ (ज्येष्ठ व. ३ इंदुवासर—२३ जून.)

उतारा—पत्र, बापूजी गणेश गोखले यांचें चिदंबर दीक्षितांस.

---

१ नाना = गोविंद गंगाधर. बाळासा. चे चवथे चिरंजीव.

* बापू गोखल्यांनीं चिदंबर दीक्षितांस लिहिलेलीं सुमारें शंभर पत्रें कै. तात्या ऐ. ले. सं. १५–४६

मु. कुडची नजीक कृष्णातीर—"सातराप्रांतीं वगैरे किरकोळ उपद्रव वासोटेकरांनीं केला आहे. प्रजापीडा बहुत होते हें वर्तमान तेथून आलें. त्यावरोन तिकडे जावयाकरितां रा. सदाशिवपंतभाऊंचा निरोप घेऊन मुक्काम मजकुरीं आलों. चार दिवस जाले. नदीस पाणी बहुत आहे. ××× करवीरास जावयाचा बेत तूर्त राहिला."

---

* नं. ७१६३ (ज्येष्ठ व. ९ इंदुवासर–२९ जून.)

उतारा...पत्र बापूजी गणेश यांचें चिदंबर दीक्षितांस.

मु. मौजे उगार कृष्णातीर— "पाणी बहुत उतरलें आणि लष्कर सुद्धां नदीपार जालों. किल्ला वासोटा येथून तेलिणीनें जमाव करोन प्रांतांत प्रजेस उपद्रव बहुत केला आहे. किल्ले घेतल्यापैकीं किरकोळ ठाणीं त्यांचे नजीक किल्ले जयगड व मोरगिरी दोनी जागा दग्यानें त्याणीं घेतल्या. यामुळें लष्करसुद्धां दरमजल जाऊन पोचतों."

---

* नं. ७१६४ (आषाढ शु. १ इंदुवार–६ जुलै.)

उतारा–पत्र बापूजी गणेश यांचें चिदंबर दीक्षितांस. मुक्काम कसबें वांगी– "श्रीकृष्णा उतरल्यावर मु. मजकुरीं आलों. आज मुक्काम आहे. उदईक कूच करोन दोन मजलांनीं श्रीकृष्णातीरीं वसंतगडानजीक जातों. किल्ले मोरागिरी वगैरे हल्लीं बंडवाऱ्यांनीं घेतले आहेत त्यांचा बंदोबस्त स्वामींचे आशीर्वादें करतों. श्रीमंतांची स्वारी श्रीपंढरपुरास आषाढीस यावयाकरितां पुण्याहून निघाली.

---

* नं. ७१६५ (आषाढ शु. ९ इंदुवार–१३ जुलै.)

उतारा–पत्र बापूजी गणेश यांचें चिदंबर दीक्षितांस.

मु.मौजे वडोली नजीक मसूर–"किल्ले मोरागिरी बंडाकडील लोकांनीं घेऊन

---

केळकर यांनीं भा. इ. सं. मंडळाच्या संग्रहांत ठेविलीं आहेत. त्यांपैकीं कांहीं महत्त्वाच्या पत्रांचे उतारे आम्हीं इ.-स. १९३५ सालीं घेतले ते पुढें (फुल्या केलेले) छापले आहेत. हल्लीं हीं सर्व पत्रें धुळ्याच्या राजवाडे सं.मंडळानें स्वतंत्र पुस्तकरूपानें छापलीं आहेत.

घेतली होती. तेथें येथून जमाव पायदळ व फौज पाठविली. त्यांची व यांची लढाई होऊन मोर्चे दोन तीन दिवस बसले. नंतर किल्ला जेर होऊन बोलणें लागोन किल्ला स्वामींचे आशीर्वादें हस्तगत जाला. "

---

* नं. ७१६६ ( आषाढ व. ८ इंदुवार—२७ जुलै. )

उतारा—बापूजी गणेश यांचें चिदंबर दीक्षितांस.

मु. कसबे मसूर—" रा. सदाशिवपंत भाऊंचें जाणें श्रीक्षेत्र पंढरपुरीं जालें. श्रीमंतांची स्वारी तेथेंच आहे. त्यांचे बंधु नानाजी माणकेश्वर आजच येथें येणार. त्यांस उदईक मेजवानी होऊन पुढें जातील. "

---

* नं. ७१६७ (आश्विन व. १० इंदुवासर—२६ आक्टो.)

उतारा—पत्र बापूजी गणेश यांचें चिदंबर दीक्षितांस.

मु किन्हई—" श्रीमंतांचें कूच श्रीक्षेत्र पंढरपुराहून सांगोल्याचा मुक्काम जाला. किल्ले वासोट्याकडील जमेत अलीकडे तीन कोसांवर होती. इकडील लोक बामणोलीस होते त्यांची त्यांची लढाई होऊन त्यांजकडील लोक पळोन वासोट्याकडे गेले. इकडील लोक जाऊन तांबीस मुक्काम जाला. दीपवाळीचे सुमुहूर्तें येथून कूच वासोट्याकडे होईल. "

---

* नं. ७१६८ (कार्तिक शु ३—२ नोव्हें. )

उतारा—पत्र बापूजी गणेश यांचें चिदंबर दीक्षितांस.

मु. किन्हई—" श्री. रा. पंतप्रतिनिधि यांची मातोश्री पुण्याहून इकडे आणविली. कऱ्हाडास बंदोबस्तानें ठेवतों. वासोट्यानजीक मौजे तांबी येथें इकडील लोकांचा मुक्काम आहे. "

---

* नं. ७१६९ ( कार्तिक व. ९—२३ नोव्हेंबर. )

उतारा—पत्र बापूजी गणेश गोखले यांचें चिदंबर दीक्षितांस.

मुक्काम कसबें मेढें खोरें. इंदुवार—" किन्हईहून कूच करोन मेढें खोरें येथें मुक्काम केला. येथून वासोटा किल्ला सहा कोस आहे. वासोट्याखालीं इंदोलीस त्यांचा जमाव आहे. आमचे लोक तांबी येथें वासोट्याअलीकडे दोन कोसांवर आहेत. एक दोन रोजांत मीही सरंजामसुद्धां जातों. इंदोलीस लोक आहेत त्यांचें पारिपत्य करतों. "

---

* नं. ७१७० (मार्ग. शु. १ इंदुवासर–३० नोव्हें.)

उतारा—पत्र बापूजी गणेश गोखले यांचें चिदंबर दीक्षितांस.

मुक्काम तांबी नजीक वासोटा– " अलीकडील मजकूर–मेल्यास बाहीर बुणगें सर्व तेथें ठेवून मौजे तांबी येथें मजकडील जमाव होता तेथें कार्तिक व. १३ स आलों. नंतर व. १४ फौज पायदळाची तयारी करोन मौजे इंदोली येथें वासोटेकराकडील जमाव होता त्याजवर स्वामींचे चरणांचें स्मरण करोन चालोन गेलों. पायदळाची व त्यांची लढाई होऊन त्यास मोडून दाणादाण केलें. बहुत करोन पळोन गेले. इंदोली गांव आम्हीं घेतला. सायंकाळीं माघारे आलों. डोंगर झाडी मनस्वी. अडचण बहुत. दुसरी चौकी घाटमाथ्यां होती तिचाही बंदोबस्त केला. किल्लेकराकडून आजच कारकून बोलावयाकारितां आले आहेत. "

* नं. ७१७१ ( मार्ग. शु. १५ इंदुवार–१४ दिसें. )

मु. कसबें मेढें—" वासोटेकराकडील बोलणें येऊन बोलणारे पुण्यास श्री. राजश्री पंतप्रतिनिधि यांजकडे रवाना केले आहेत. तेथून ठरोन देईल त्याप्रमाणें करावें असें ठरोन गेले आहेत. तूर्त त्यांजकडे किल्ले आहेत त्यांपैकीं किल्ले मकरंदगड हवालीं करावयाचें ठरोन इकडील ठाणें बसलें. श्रीमंतांची स्वारी दरमजल क्षेत्र माहुली येथें येऊन दाखल जाली."

* ७१७२ ( मार्ग. व. ३० इंदुवार–२८ दिसें. )

उतारा—पत्र बापूजी गणेश यांचें चिदंबर दीक्षितांस.

मु. कसबें मेढें स्वारें—" वासोटेकराकडील कारकून पुण्यास बोलावयाकारितां गेले होते. ते तेथें बोलोन माघारे आले. रा. पंतप्रतिनिधि यांची आज्ञा वासोटा वगैरे किल्ले हवालीं करोन घावे असें होऊन आले आहेत. आजच किल्ल्यास बोलणारे त्यांजकडील गेले आहेत. पुण्याहून श्रीमंतांची स्वारी श्रीगंगातीरास कोपरगांवास जाणार."

नं. ७१७३ ( मार्गशीर्ष–दिसें. )

[१]पुडकें नं. ३६ मध्यें बहुतेक पत्रांत बाजीराव पेशवे सन समान

१ हें टिप्पण कै. तीर्थरूपांच्या हातचें आहे.

मय्यातैनांत मार्गशीर्षमासीं ( डिसेंबर १८०७ ) सातान्यावरून मिरजेहून कर्नाटकांत कार्तिकस्वामीचे दर्शनास गेले. बरोबर पटवर्धन मंडळीपैकीं नारायणराव व रामचंद्र अप्पा हे थोड्या मजली होते. गंगाधरराव गोविंद व माधवराव रास्ते यांनीं श्रीमंतांची भेट म्हैसाळचे मुक्कामास घेतली.. श्रीमंत वाडीस नरसिंव्ह सरस्वतीचे दर्शनास गेले होते. तेथें देवापुढें एक मोहोर श्रीमंतांनीं ठेविली. कुरुंदवाडकरांनीं मेजवानीची तयारी केली होती. परंतु मेजवानीस गेले नाहींत. त्रिंबकराव अप्पा कुरुंदवाडकर यांचे चिरंजीव बाबाजी यांची मात्र भेट जाली. नांदणीस कृष्णा उतरले. तेव्हां उतारास चिखल फार झाला होता. त्यानें फार विपत्ति झाली. मजली मोठमोठ्या यामुळें घोडीं माणसें फार थकलीं. संगेलीच्या मुक्कामीं निपाणकर कित्तूरकर भेटले. नरसोबाच्या वाडीस रत्नाकरपंत राजाज्ञा करवीराहून भेटीस आले होते. वगैरे मजकूर आहे."

---

* नं. ७१७४ (पौष व. १३ इंदुवासर–२५ जाने.)

पत्र उतारा–पत्र बापूजी गणेश यांचें चिदंबर दीक्षितांस.

मु. मेढें खोरें–" वासोटेकरांचें बोलणें चालले आहे. परंतु सुप्रवृत्तीनें ताळयावर येऊन काम होईल असें दिसत नाहीं. यास्तव दोन तीन दिवशीं कूच करोन येथोन वासोट्यास जावयाचा बेत करतों."

---

नं. ७१७५ ( माघ शु. १५–१२ फेब्रु. )

उतारा–पत्र विसाजी राम गोखले यांचें मिरजेस बाळासा. स. रवाना छ. १४ जिल्हेज सन सबा– " किल्ले वासोटा येथें मोर्चे बसले आहेत. तटालगत गेले आहेत. किल्ला बहुत बाका. सात कोश अडीच मास झाडी तोडली. तेव्हां मार्ग जाला. तूर्त किल्ल्यालगत डोंगर मातबर आहेत त्यांजवर तोफा चढवावयाचा मार्ग नीट करीत आहों. डोंगरावर तोफा गेल्यावर किल्ल्यावर गोळा लागू होतो."

---

* नं. ७१७६ ( माघ व. ४ इंदुवासर–१५ फेब्रु. )

उतारा–पत्र बापूजी गणेश याचें चिदंबर दीक्षितांस.

मुक्काम तांबी नजीक वासोटा–" वासोट्यास मोर्चे दिल्याचा मजकूर

पूर्वी लिहिलाच आहे. हल्लीं मोर्चे किल्ल्यापासोन जवळ अर्धगोळीचे मारणींत गेले. जुने वासोटा म्हणोन मोठा पर्वत नजीक आहे. तेथें स्वामींचे चरणांचें स्मरण करोन महत्प्रयासानें तोफ तेथें चढविली. तेथून गोळे किल्ल्यांत जातात. श्रीमंतांची स्वारी कोपरगांवास जावयाकरितां पुण्याहून निघोन गेले."

---

* नं. ७१७७ (फाल्गुन शु. ३ इंदुवार–२९ फेब्रु.)

उतारा–पत्र बापूजी गणेश यांचें चिदंबर दीक्षितांस.

मु. तांबी नजीक वासोटा– "वासोट्यास मोर्चे आहेत ते जवळ किल्ल्यापासोन शंभर हातांत गेले आहेत. किल्ला बहुत बिकट. स्वामींच्या आशीर्वादें यथास्थित घडून देत आहे. श्री. पंतप्रतिनिधि यांचाही कांहीं खर्चाचा बंदोबस्त करोन तह रह ठरावा असेंही बोलणें बोलत आहों."

---

नं. ७१७८ (फाल्गुन व. ८–१९ मार्च)

उतारा—पत्र विसाजी राम गोखले यांचें मिरजेस बाळासाहेबांस.

रवाना छ. २१ मोहरम. सन समान मय्यातैन–" चि. रा. बापूसाहेब गोखले यांची स्वारी व. ३ सोमवारीं निघोन मसुरेपर्यंत आले. आज प्रातःकाळचे प्रहर दिवसास किल्ले वासोट्यावर उत्तरेकडील अंगें अकस्मात अग्न लागोन सदर व वाडा व चाळीस पन्नास घरें दग्ध झालीं. विझवावयाचा उद्योग करीत होती. परंतु जुने वासोट्यावरील व मोर्चातील तोफांची मारगिरी सुरू होऊन आंतील लोक जायां होऊं लागले. यामुळें तो प्र[illegible]न राहिला. नासाडी फार जाली. सुरापूरकर यांनीं इंग्रजांचीं पलटणें मोडिल्याचा मजकूर श्रुत जाहलाच असेल. हल्लीं इंग्रजांची पलटणांची जमेत चांगली होऊन सुरापूरकर यांचे बंदोबस्तास जात आहेत, म्हणोन बातमी आहे."

---

* नं. ७१७९ (वैशाख व. १३–२३ मे.)

उतारा–पत्र बापूजी गणेश यांचें चिदंबर दीक्षितांस.

मु. वाई–" श्रीमंतांची स्वारी वाईस आली. दर्शनास येण्याची आज्ञा कारकुनाजवळ जाली. त्यावरोन मसूरहून कूच करोन कालच येथें सायं-

काळीं आलों. आज अरुणोदयीं श्रीमंतांचें दर्शन जालें. मर्जी बरी आहे. एकांतीं गांठ पडोन बोलणें जालें नाहीं. एक दोन रोजांत बोलणें होऊन आज्ञा घेऊन वासोट्यास जातों. वासोटेकरांचें बोलणें संधानाचें कांहीं आलें आहे. अद्याप खचितांत नाहीं. होईल तें मागाहून लिहोन पाठवितों. "

---

* नं. ७१८० (ज्येष्ठ शु. ५-३०मे.)

उतारा—पत्र बापूजी गणेश गोखले यांचें चिदंबर दीक्षितांस.

"वासोटेकरांचें बोलणें संधानाचें आलें. अलीकडे छप्परबंदी होऊन छावणीचा बेत ठरला. तेव्हां बोलणें होऊन इकडील निशाण किल्ल्यावर आजच चढावें असा बेत ठरला. शेपन्नास लोक किल्ल्यावरील कालच उतरले. ××× महाराज राजा शाहु छत्रपति कैलासवासी जाहले. यास्तव पुत्र बुवासाहेब आहेत त्यांस राज्याभिषेक वैशाख व. ७ स इंदुवारीं जाहला. त्याजवर लग्नही जालें. नंतर श्रीमंतांची स्वारी वांईहून काल रविवारीं निघोन माहुलीस आली. आज श्रीमन्महाराज राजश्री राजा शाहू छत्रपति यांचे दर्शनास आले. महाराज पुढें आले होते. भेटी सांप्रदायाप्रमाणें होऊन अंबारींत बसोन मागें खवासखान्यांत श्रीमंत हातांत मोर्चेल घेऊन बसले. मोठे समारभानें वाड्यांत येऊन नंतर आज्ञा घेऊन श्रीमंत आपले वाड्यांत उतरावयास गेले. मी बरोबरच होतों. आतांच वर्तमान आलें. वासोटा किल्ला हस्तगत जाला."

---

**सुरु तिस्सा मय्यातैन व अलुफचीं पत्रें:—**

नं. ७१८१ श्री. (१२ जून.)

पै. छ. २१ रबिलाखर. सन तिस्सा. मय्यातैन.

[1]सेवेशीं बालाजी कासी किबे. कृतानेक साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागाईत ज्येष्ठ वद्य ४ पावेतों स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. उत्तरेकडील पत्रें आलीं. त्यांतील सारांश अंबोजी इंगले यास बेआराम होऊन देव आज्ञा जाहली. राजश्री सिंदे बहादूर जयपूर नजीक आहेत. राजे रंजेतसिंग सीख यांसी व इंग्रजांसी

१ पत्र पुण्याहून मिरजेस.

उभयपक्षीं चित्तशुद्धता नाहीं. इंग्रज सहा आणेचा मुलूख खालीं करून घ्यावा म्हणोन म्हणतात. त्यावरून सीख मजकूर बहुत हिरासा आहेत. सीख मजकुरासी व फिरंग्यासी रुबकार लढाई होणार. करनाटकांत किरिटी रामराजा[1] याचें राज्य इंग्रज याणें हस्तगत केलें. वरकड आधिकोत्तर मजकूर विशेष येथील व उत्तरेकडील नाहीं. शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

* नं. ७१८२ (ज्येष्ठ व. ५–१३ जून.)

उतारा—पत्र बापूजी गणेश यांचें चिदंबर दीक्षितांस.

मु. कसबें मसूर–"वासोटा पहावयास गेलों होतों. त्यास किल्ल्याहून मुक्काम मजकुरीं आलों. तूर्त फौजसुद्धां मुक्काम येथेंच आहे."

---

* नं. ७१८३ (श्रावण व. २–८ आगष्ट.)

उतारा—पत्र बापूजी गणेश यांचें चिदंबर दीक्षितांस.

मु कसबें मसूर–"किल्ले महिपतगड येथें कोंकणांत लोक किल्ल्याचे शहावर होतें. त्यास किल्ल्याचें बोलणें लागोन किल्ला संधानानें हस्तगत जाहला."

---

* नं. ७१८४ (आश्विन शु. ७ इंदुवार–२६ सप्टें.)

उतारा—पत्र बापूजी गणेश यांचें चिदंबर दीक्षितांस.

मुक्काम मसूर–"आम्हांस फौजसुद्धां येण्याविशीं सरकारचें आज्ञापत्र घेऊन हुजरे आजच येऊन पोंचले. ती. रा. बाळाजीपंत दादा यांचेंही पत्र निकडीचें येण्याविशीं आलें. परंतु इकडील कामकाजाचें बोलणें अद्याप कांहींच नाहीं. आणि कोणत्या कामाकरितां बोलावतात हेंही समजत नाहीं. सुरापुराकडे वगैरे जाऊन चार दिवस दिनचर्या लोटून खर्चापुरतें उत्पन्न करावें असा मनसबा होता. सरकारचे बोलावण्याची निकड बसली त्यामुळें तो मजकूर राहिला."

---

नं. ७१८५ श्रीगणराज. (आश्विन शु १२–१ आक्टो.)

[2]चि॰ राजश्री रामचंद्रपंत आपा यांसी आशीर्वाद उपरी. परवां चि॰ राजश्री चिंतामणराव आपा येथें आले होते. राजश्री पंतप्रतिनिधि

---

१ हा गावणकोरचा राजा. २ पत्र मिरजेहून जमखिंडीस.

यांच्या स्त्रियांकडून कारकून आले आहेत. खाशाची सुटका होत नाहीं. आम्ही आहों या स्थळास गोखले येऊन उपद्रव करणार. आम्हास नेलेवर लज्जा राहणें कठीण. तेव्हां प्राणत्याग करावा. यास्तव आपणाकडे येतों. आमची अब्रू राही असें करावें. म्हणोन बहुतां प्रकारें कारकून बोलत आहेत. आपणाकडेही कारकून गेलेच असतील. थोरांचे स्त्रियांची अब्रू रक्षावी हें विहित. परंतु दरबारीं आइकतो कोण ? असा प्रकार विद्यमानीं आहे. कर्णेल कलुष याजकडून बंदोबस्त होईल तर करावा. थोर ते. तुमचा आमचा स्नेह म्हणोन त्याणीं सांगून पाठविलें. यास्तव त्यांची अबरू रहावी, राजश्री पंतांची सुटका आपले विचारें व्हावी असें आपलें पत्र कर्णेल यांस जावें. अथवा माकूल माणूस पाठवावा. त्यांचे दैवानेंच होय तें खरें. नाहीं तर यत्न नाहीं. दुसरा प्रकार (बाबा.) फडके तुमचे जिम्मेस असों देणें. गड कोट किल्ले सरकारांत द्यावे असें इंग्रज म्हणाले तर तें त्यांचें स्वरूपास योग्य नाहीं. चिरंजीवांनीं आपणांस लिहिलें आहे. मनन होऊन समर्पक उत्तर यावें. छ. १० साबान. लोभ करावा हे आशीर्वाद.

---

नं. ७१८६ श्रीगजानन. (आश्विन व. ९–१४ आक्टो.)

पै. छ. २७ साबान. सन तिस्सा. मय्यातैन.

सेवेशीं दिनकरराम[1] कृतानेक साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. २३ साबान पावेतों मुक्काम मसूर येथें वडिलांचे आशीर्वादें सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींकडून पत्र येऊन सांभाळ होत नाहीं. येणेंप्रमाणें बहुत चित्त उद्विग्न आहे. तरी पत्र येऊन सांभाळावें. यानंतर इकडील मजकूर चिरंजीव राजमान्य राजश्री बापूसाहेब यांस पुण्यास येणेविशीं श्रीमंतांकडून हुजरे व कारकून येऊन बसले आहेत. फौजेचा मनस्वी गवगवा पडला आहे. पांच लाख रुपये फडशास पाहिजेत. झाडून सरंजामानिशीं जाण्याचा भाव दिसत नाहीं. सडे एक हजार स्वार व पांचशें पाईचे, एक तोफ येणेंप्रमाणें आपण घेऊन जाणार. बाकी सलतनत घेऊन तीा राजश्री विसाजीपंत दादा सुरापूरच्या मोहिमेस जाणार.

---

१ गोखले. बापू गोखल्यांचे चुलत चुलते. पत्र मिरजेस.

ऐ. ले. सं. १५–४७

याजप्रमाणें बाजारी वर्तमान ऐकिलें तें सेवेशीं लिहिलें आहे. गादीचे धनी अव्यवस्थ यांजमुळें अब्रू संरक्षणाचा विचार आहे. अहर्निशीं चित्तांत वागवून आहेत. वरकड मजकूर सर्व भेटीनंतर विनंती करीन. बापू आश्विन वद्य डेरेदाखल होणार. परजन्यानें कांहीं बाकी ठेविली नाहीं. पिकास उमली लागोन पिकें बुडालीं. याजप्रमाणें इकडील वर्तमान आहे. बहुत काय लिहिणें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ७१८७ ( आश्विन व. ९–१४ आक्टो. )

[1]उतारा–पत्र दिनकर राम गोखले यांचें मिरजेस बाळासा. स. रवाना छ. २३ साबान सन तिस्सा मय्यातैन– " चि. बापू गोखले यास भेटीस येण्याकरितां श्रीमंतांकडून पत्र आलें. परंतु फौजेमध्यें खर्चाचा गवगवा फार म्हणोन बापूचें जाणें फौजेसह होत नाहीं. फौजेच्या फडशास पांच लाख रुपये पाहिजेत याकरितां बापूबरोबर एक हजार स्वार व पांचशें पायदळ मात्र पुण्यास जाईल. बाकीची फौज घेऊन ती. विसाजी राम गोखले हे सुरापुराकडे जाणार. "

नं. ७१८८ श्री. (२३ आक्टो.)

पै. छ. ७ रमजान. सन तिस्सा. मय्यातैन.

सेवेशीं साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत. कार्तिक शु ४ रविवार-परियंत स्वामींच्या कृपावलोकनें करून वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंतांची स्वारी श्रीपंढरपुरास उदईक निघोन जाणार. करनेलसाहेब यांणीं श्रीमंतांस विनंती केली जे, बारावे दिवशीं माघारें यावें. बहुत दिवस राहू नये. श्रीमंतांनीं आज्ञा केली जे, पंधरावे दिवशीं आळंदीस परभारें स्वारी येऊन दाखल होईल. याप्रमाणें बोलणें परस्परें जाहलें आहे. दौलतबादच्या किल्ल्यास भागानगराहून व सिरूर कुकडीच्या मुक्कामाहून इंग्रजांकडील चार पलटणें जाऊन किल्ल्यास शह देऊन गोळा सुरू होऊन परस्परें लढाई चालली आहे. इंग्रज किल्ला घेऊन आपला अंमल कायम करणार. नबाब याचे दौलतींत दुही होऊन फितूर जाहले म्हणोन

१ पत्र गोखल्यांचें लष्करांतून मिरजेस.

इंग्रजांनीं भागानगरीं कुल मुत्सद्दी व सरदार व पागे वगैरे यांच्या घरीं चौक्या बसवून बंदोबस्त केला आहे. किल्ले व महाल यांचा बंदोबस्त करीत चालले आहेत. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. येथेंही परस्परें [1]बंधू त्यामध्यें कलह अती वाढला आहे. दरम्यान करनेलसाहेब बोलत असतात. श्रुत होय हें विज्ञापना.

---

नं. ७१८९ श्री. (कार्तिक शु. १०—२८ आक्टो.)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री चिंतामणराव पांडुरंग स्वामी गोसावी यांसी.

पोष्य [2]बाजीराव रघुनाथ प्रधान. नमस्कार. विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणें. विशेष. तुम्हांकडे जातीस व फौजेचे बेगमीस महाल व गांवचा अंमल सरंजामास व किल्ले मिरज चालत

---

१ बाजीराव व धाकटे बंधू चिमाजी आपा.

२ हा कागद सांगली—मिरज वांटणी प्रकरणापैकीं आहे. पटवर्धन सरदारांचीं मिरज, तासगांव आणि कुरुंदवाड अशीं तीन घराणीं प्रसिद्ध आहेत. मिरज, तासगांव आणि कुरुंदवाड यांचीं फौजेचीं पथकें निरनिराळीं होतीं आणि तिनी घराण्यांचे सरंजामाचे मुलूखही स्वतंत्र होते. पटवर्धन सरदारांत विलक्षण एकोपा नांदत होता त्यामुळें सर्व पटवर्धन सरदार एकत्र मिरज घराण्याच्या निशाणाखालीं सरकार चाकरी करीत असत आणि सर्व पटवर्धनांच्या सरंजामाचा बेहडा एकट्या मिरज घराण्याच्या नांवानें करण्यांत येत असे. या वहिवाटीस अनुसरून मिरज घराण्यापैकीं गोविंद हरि, वामनराव गोविंद, पांडुरंगराव गोविंद, हरिहरराव पांडुरंग, चिंतामणराव पांडुरंग असे पांच जणांच्या नांवानें सरंजामाचे बेहेडे झालेले आहेत. चिंतामण आपांच्या नांवानें सरंजामाचा बेहडा करण्यांत आला तेव्हां ते अल्पवयी होते. त्यामुळें मिरज घराण्याच्या सरंजामाच्या मुलखाची वहिवाट त्यांचे चुलते गंगाधरराव गोविंद हे पहात असत. चिंतामण आपा वयांत आल्यावर जहागिरीच्या लोभानें चुलत्या—पुतण्यांचें भांडण जुंपलें. इ. स. १८०१ - १८०२ सालीं रामचंद्रपंत आपा जमखिंडीकर आणि रघुनाथराव दादा कुरुंदवाडकर यांनीं मध्यस्थी करून हें भाऊबंदी भांडण तोडलें आणि गंगाधरराव गोविंद आणि

आहे त्यापैकीं महाल व गांवचा अंमल व किल्ले मिरज तुम्हाकडून दूर करोन सालमजकुरीं राजश्री गंगाधरराव गोविंद यांजकडे जातीस[1] व फौजेचें बेगमीस महाल व गांवचा अंमल व किल्ले मिरज बितपशील:—

५२ प्रांत मिरज वगैरेपैकीं.

५१ देहाय[2] येथील हिस्सेदार व नेमणुकदार खेरीज करून अंमलाचे देहे.

१ जकात प्रांत मिरज.

५२

१ कसबें रहिमतपूर संमत कोरेगांव प्रांत वांई येथील दुमाले जमीन व नेमणुका खेरीज करोन अंमल.

१ परगणे करकंब येथील दुमाले गांव, जमीन, वर्षासनें खेरीज करोन अंमल.

१ कसबें बेहट्टी येथील दुमाले, जमीन वर्षासनें नेमणुका खेरीज करोन अंमल.

१ मौजे देवरअष्टें कर्यात वांगी येथील दुमाले, जमिनी खेरीज करोन अंमल.

१ परगणे लक्ष्मेश्वर प्रांत कर्नाटकपैकीं कसबें मजकूर वगैरे गांवची बेरीज एक लक्ष तेवीस हजार चारशे साडेत्रेपन्न रुपये सव्वादोन आणे १२३४५३॥=। बेरजेचे गांव.

४ मशारनिल्हेचे सरजामांत धरून ज्याजकडे चालत आहे त्याप्रमाणें—

१ मौजे बकोरी तालुके सांडस प्रांत पुणें येथील मोकासा खेरीज करोन अमल श्रीरामचंद्रदेव तुळशीबाग कसबें पुणें.

---

[ पान ८३४३ वरून चालू ]
चिंतामण आपा यांना जहागिरीच्या वांटण्या करून दिल्या. चिंता. आपांनीं आपल्या जहागिरीचें सांगली येथें मुख्य ठाणें ठेविलें. या वेळेपासून मिरज घराण्याचे मिरज आणि सांगली असे दोन भाग झाले. पुढें इ. स. १८०-८ १८०९ सालीं पेशव्यांनीं या वांटणीला संमति दिली. या वांटणी प्रकरणाचे पुष्कळ कागद आमच्या संग्रहीं आहेत. परंतु ते महत्त्वाचे नाहींत सबब छापले नाहींत.

[1] खाजगी खर्चास. [2] देहे = गांव, देहे याचें अनेकवचन देहाय.

१ मौजें मांडवगण परगणे कर्डे पैकीं खंडोजी फराटे यांस सनद रुपये १५० दीडशे.

१ मौजें जलकें परगणे नेवासें येथील हिस्सेदार खेरीज करोन अंमल वेदमूर्ति गोविंद दीक्षित[1] पाटणकर यांजकडे.

१ मौजें वडवली तर्फ वोज तालुके नेरळ पैकीं रुपये २०० दोनशे लक्ष्मण हरि लागू यांजकडे.

४

१ किल्ले मिरज.

६२

एकूण बासष्टपैकीं एकसष्ट महाल व गांवचा अंमल व शेत सनद व दोनशे रुपये मिळोन सदरहूप्रमाणें सरंजामास व किल्ले मिरज तुम्हाकडे होता त्याप्रमाणें मशारनिल्हेकडे करार करोन दिला असे. तर वर लिहिल्याप्रमाणें महाल व गांवचा अंमल व ठाणीं व किल्ले मिरज जकीऱ्यासुद्धां[2] यांचे हवालीं करोन कबज घेतला असेल तो यांजकडे माघारा देणें. जाणिजे. छ. ७ रमजान सु।। तिस्सा मय्यातैन व अल्लफ. बहुत काय लिहिणें हे विनंती. बार.

---

* नं. ७१९० (मार्ग व. १०–१४ दिसें.)

उतारा—पत्र बापूजी गणेश गोखले यांचें चिदंबर दीक्षितांस.

मुक्काम पुणें—"सरकारांत बोलण्याचा क्रम चालला आहे. परंतु कोणतीही गोष्ट निश्चयांत नहीं. यजमानांची मर्जी बहुत नाजूक. अलीकडे माझे उजवे डोळयास जखम आहे. तिचा उपद्रव डोळयास होऊन नेहमीं फूट लागोन पाणी वाहतें. बहुत त्रास होतो. स्वामींस लिहिल्यानें संकटें परिहार होतात यास्तव विनंती केली आहे. उपायही होत आहे. परंतु गुण नाहीं."

---

*नं. ७१९१ (पौष व. १ इंदुवासर–२ जाने.)

उतारा—पत्र बापूजी गणेश यांचें चिदंबर दीक्षितांस.

---

[1] हे कायगांवकर दीक्षित. [2] जकीरा = बेगमीचे जिन्नस.

मु. पुणें—"श्रीमंतांची स्वारी कोकणांत जाणार. रायगड येथें गं. भा. येश्वदाबाई आहे. त्यांची भेट घेऊन महाडास जाऊन दहा बारा रोजांत माघारे पुण्यास येणार."

---

नं. ७१९२ श्री. (चैत्र शु. ३–१२ मार्च.)

पौ छ. ४ सफर. सन तिस्सा. मय्यातैन.

सेवेशीं सा. नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. २ सफर पावेतों स्वामींचे कृपावलोकनें वर्तमान यथास्थित असे. विशेष. हल्लीं उत्तरेकडील वर्तमान तर शिंदे बहादुर यांच्या लष्करचा मुक्काम चमेलीतीरीं आहे. सर्जेराव घाटगे येऊन शिंदे यांस भेटले. सर्जेराव कारभार करूं लागले. मेवाड प्रांतीची खंडणी दहा लाख रुपये शिंदे यांस सर्जेराव यांणीं येतांच उत्पन्न करून दिले. इंग्रजांचे वकील शिंदे याजवळ आहेत. त्यांचें म्हणणें जे सर्जेराव यांस आणों नये, असें तहामध्यें आहे. त्यास आम्हास निरोप द्यावा अगर सर्जेराव यांस घालवावें. याप्रमाणें बोलणें जाहलें. नंतर होळकराचा मुक्काम उज्जनीपासोन चवदा कोस काळीनदीवर पश्चमेस इंदुरापासोन आठ कोश पलीकडे मुक्काम आहे. त्यांचे कन्येचें लग्न माघ व. ३ जालें. त्यांची कांहीं फौज इंदुरास आली आहे. कांहीं फौज महेश्वरास आली आहे. होळकर देशीं यावयाची मंदी आहे. बादबरसात आले तर येतील. श्रीमंतांची स्वारी नाशकास श्रीरामनवमी उत्साहाकरितां जाणार. वैशाख अखेरीस पुण्यास येतील. परशरामशास्त्री याजवर बहुत कृपा आहे. दहा हजार रुपये खर्चास दिले. याप्रमाणें वर्तमान आहे. पुढें होईल तें सेवेशीं लिहीन. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७१९३ श्री. (फाल्गुन व १४–१५ मार्च.)

पौ छ. ३ सफर. सन तिस्सा. मय्यातैन.

सेवेशीं साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. २८ मोहरमपावेतों स्वामींचे कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. दिल्लीचे पत्राची नक्कल अलाहिदा सेवेशीं पाठविली आहे. त्यावरून तिकडील वृत्त ध्यानारूढ होईल. हल्लीं इकडील वर्तमान तर, श्रीमंतांची स्वारी कोपरगांवनजीक नाशकास जाणार. पंचवटीस रामनवमीचा उत्छाह

सरकारचे दहा हजार रुपये खर्च करून करणार व श्रीमंत पुत्रोत्पत्तीस्तव नाशकाजवळ संगम आहे तेथें कांहीं ब्राह्मणकरवणें अनुष्ठान कराविणार. याजकरितां नाशकास पंधरा दिवस तीन वार मुक्काम होणार. पुढें वैशाखमासीं पुण्यास यात्रें असें आहे. तेथून राजश्री सदाशिवपंत भाऊ कोपरगांवास गेले. तेथें एक कोसभर परियंत श्रीमंत सामोरे येऊन समारंभें भेटी जाहल्या. होळकर यांजकडील पत्रें [१]श्रीचे दर्शनास व स्वामीदर्शनास देशीं येतों म्हणोन आलीं होतीं. त्यासीं उत्तरें करनेल याचे विचारें गेलीं कीं, खुशाल येणें, कांहीं दिक्कत नाहीं, म्हणोन उत्तरें गेलीं. करनेल यांनीं श्रीमंतांची खातरजमा केली कीं, होळकर पांच हजारांनिशीं येवोत अगर पन्नास हजारांनिशीं येवोत. कांहीं चिंता नाहीं. घांट वगैरे कांहींएक बंद करावयाचे नाहींत, स्नेहानें येऊन जातील. बाळोबा बाबा नि विंचूरकर हे माघारे कोपरगांवास दाखल जाहले. इंग्रजांचीं पलटणें माघारी खानदेशांतून येऊन शिरूर कुकडीस दाखल जाहलीं. दादेखान बंगस वगैरे तीन असामी धरून आणिले. ते ममईस पाठविले. त्यांच्या तोफा व हत्ती चीजवस्त आली ती होळकर यांस इंग्रजांनीं लिहिलें कीं, आपली चीजवस्त कोणी पाठवून स्वाधीन करून घ्यावी. त्यावरून होळकर यांनीं इंग्रजांस लिहिलें कीं, आम्हीच बंडाच्या पारपत्यास फौज पाठविणार होतों, इतक्यांत तुम्ही येऊन पारिपत्य केलें, उत्तम केलें, असें लिहून चीजवस्त स्वाधीन करून घेण्याकारितां एकजण लहान सरदार होळकराकडून खानदेशांत आला आहे. असें होळकर व इंग्रज परस्परें स्नेहाचा भाव विशेष दाखवितात. होळकराकडील वर्तमान तरी, होळकर मुलीचें लग्न माघमासीं इंदुरास करून हुताशनीकरितां महेश्वरास येणार होते, आले असतील. मीरखानाकडील कांहीं फौज व तोफखाना महेश्वरास दाखल जाहला. मीरखान यांस व राजे महिपतराव यांस वऱ्हाडांत पोट भरावयाकारितां रवाना करणार. होळकर यांनीं रामपुऱ्याहून निघतेसमई सोळा लाख रुपये नक्त वराता फौजेस देऊन तीन महिन्यांची बेगमी केली होती. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

---

१ श्री = जेजुरीचा खंडेराव देव.

नं. ७१९४ श्री. ( चैत्र शु. २-१८ मार्च. )

विज्ञापना. तागायत छ. १ सफर मुक्काम दिल्ली. विशेष. इकडील वर्तमान तरी, कलकत्त्याहून तीनशे छकडे दारू व गोळा वगैरे सरंजाम पन्नास तोफा जंगी व दहा थोरल्या आल्या. ते करनेल आकतरलोणी-साहेबाकडे दिल्हीच्या मार्गें रवाना जाहल्या. येथें दररोज देणेंप्रमाणें गोलंदाज वगैरे सामान रवाना होत आहे. करनेल मजकूर सतलूज तीरीं मुक्काम करून आहेत. तिकडील शीख दरोबस्त हजर जाहले. राजे रंजीतासिंग लाहोरकर अमृतसरांत आहेत. त्यांजकडील फौज सतलूजपलीकडे करनेल-साहेबांच्या सामोरा मुक्काम करून आहे. मोहरमचे हंगामांत कटकलम (?) साहेबाचे लोकांसी व आकालबेगीचे शिखांसीं आपसांत कजिया जाहला. परस्परें लढाई होऊन तीस माणसें उभयपक्षीं ठार व जखमी जाहलीं. ते समयीं राजे रंजीतासिंग यांनीं येऊन शिख मजकूर व साहेबाकडील लोकांस समजोन दार मदार करून दिले. गुरु दयाळसिंग शिख यांजकडील वकील पूर्वी राजे मजकूराकडे गेला आहे. हा मजकूर जनरेल-साहेबांनीं ऐकोन कलकत्त्यास व सिंदे यांस लिहून पाठविलें. त्यावरून सिंदे बहादूर जयपुराहून माघारे चाळीस कोस कूच करून गेले व जनरेल-साहेबांस खातरजमेचीं पत्रें लिहिलीं कीं, आम्हाकडून कंपनीचे कामांत खलेल होणार नाहीं. सांप्रत सर्जेराव घाटगे यांची सवाई (?) कलकत्त्याहून होऊन आल्यानंतर घाटगे मजकूरचे विद्यमानें अंबाजी इंगळे यांचें बोलणें ठरून अगोदर सिंदे बहादुराकडे येऊन भेटले. तदनंतर इंगले मजकूर आले. उभयतांच्या भेटी झाल्या. नंतर राजश्री आण्णा व देवबा काळे दोन्ही मुखत्यार कारमारी होते. त्यांस धरून कैद केलें. सांप्रत सर्जेराव व इंगळे कारभार करितात. बाळोजी इंगळे यांच्या विद्यमानें जयपूरच्या मामल्याचा जाबसाल रुबकार असे. जयपूरप्रांतीं धान्याची महागाई दहा शेर पावेतों जाहली आहे. शहासुजा उल्मुल्क पिशोरांत दाखल आहेत व लपिष्टनसाहेब इग्रजाकडील वकील पिशोरनजीक पावला. शहाकडून कोणी सरदार सामोरा येऊन घेऊन गेला. पातशहाची बहुत सर्फराजीचें बोलणें जाहलें. मेजवानीपुढें मुलाजमत जाहल्यावर कसें बोलणें होऊन अंमलांत येईल तें मागाहून विनंती लिहूं. अजिजुल्लाखां साहेबाकडील वकील पात-

शहाचे हुजूर हजर आहे. महंमद अकरमखान वजीर याचा पुत्र मोह्-बतखां वगैरे फौज शहाकडील आटक नदी उतरून काशमीरचे रोखास आले व शहाची तयारी काशमीरप्रांतीं येण्याची आहे. इतक्यांत वर्तमान आलें कीं, महमुदशहा व फत्तेखान फौजसुद्धां कंधारांत आले. शहाजादे केशर-जाहाकडून कंधारांत होते. तो पळून गेला. त्या प्रांतीं पुन्हा बखेडा जाहला. असें हें वृत्त शाहानीं ऐकिल्यापासून बहुत चिंतेंत आहेत. आता-उल्लाखान शेर महंमदखान वजीर साबीक सुभेदार काशमीर याणें शहाची येण्याची आवई ऐकून हिरासा जाहला असे. राजश्री यशवंतराव होळकर नजीक काळीं सिद्ध येथें मुक्काम करून आहेत. छ. २४ जिल्हेजीं कन्येचें लग्न केलें. सांप्रत मीरखान पठाण यासी बिघाड जाहला. परस्परें चित्त-शुद्धता नाहीं. अशाश्वती कारभार. सरदारांची नियत शाबूत नाहीं. सबब सर्व पठाणांचा हलवा असे. संस्थानीं शिटनसाहेब हुजूरचे व अदालतीचे कारभारांत तत्पर आहेत. आजतागाईत शहाजी वकील कलकत्त्याहून आला नाहीं. प्रथम दिवस असे यास्तव हुजूरचे चित्तांत उदासीनता राहते. रांजितासिंग शीख हुताशनी जाहल्यानंतर सतलूज तीरीं येणार. जलचरांनीं लुधियान्याचे किल्ल्यांत जकिऱ्याची तयारी केली आहे व करनेल मज-कुरांनीं छावणी सतलूजतीरीं तयार केली आहे. रांजितासिंगाचा जाबसाल अंतस्थ होत आहे. पुढें पक्केपणें जाबसाल अमलांत येईल तो मागाहून विनंती लिहूं. हे विज्ञापना.

---

नं. ७१९५ श्री. ( चैत्र शु. ६–२२ मार्च.)

पौ छ. ९ सफर. सन तिस्सा.

सेवेशीं सा। नमस्कार. विज्ञापना. तागायत छ. ५ सफर पावेतों स्वामीचे कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील मजकूर तर, राजश्री गणपतराव वकील नि॥ भोसले यांजकडे शिंदे यांच्या लष्करचीं पत्रें छ. २ मोहरमचीं आलीं. त्यांची नक्कल अलाहिदा पाठ-विली आहे. त्यावरोन वृत्त ध्यानारूढ होईल. यानंतर छ. १० मोहरमचीं पत्रें शिंदे यांच्या लष्करचीं आलीं. त्यांतील सारांश अंबोजी इंगळे

ऐ. ले. सं. १५–४८

मेवाडचा बंदोबस्त करून लष्करांत आले. त्यांस आठ कोशपर्यंत सर्जेराव बापू सामोरे जाऊन इंगळे यांस घेऊन येऊन दौलतराव बाबांच्या भेटी जाल्या. इंग्रजांचा वकील शिंदे यांच्या लष्करांत आहे त्यास सर्जेराव बापू यांणीं आम्ही भेटीस येतों म्हणोन सांगून पाठविलें. इतक्यांत इंग्रजांकडील वकील आपणच न कळत सर्जेराव यास सांगोन न पाठवितां दुसरे दिवशीं सर्जेराव याच्या डेऱ्यास आला. हें वर्तमान सर्जेराव यास समजतांच डेऱ्याबाहेर सामोरे येऊन वकीलास घेऊन गेले आणि जवाहीर व कापड यांची चंगळ करोन मनस्वी मेजवानी इंग्रजांच्या वकीलास केली आणि खूष केलें. जयपूरवाले व जोधपूरवाले यांचे वकील लष्करांत खंडणी बोलत आहेत. त्यांची खंडणी ठरल्यावर कूच करोन मथुरेकडे जाणार. याप्रमाणें वर्तमान शिंदे यांच्या लष्करांतील आहे. होळकर यांजकडील नवल विशेष नाहीं. काळी नदीवर इंदूरापासोन आठ कोश मुक्काम करून आहेत. मुलीचें लग्न माघ व. ३ यशवंतराव यांणीं केलें. देशीं येण्याची तूर्त मंदी आहे. याप्रमाणें होळकरांकडील वर्तमान आहे. येथील वर्तमान तर बडोद्याहून दोन पलटणें आलीं. येथील पलटणें शिरूरकुकडीवर जाणार. यांतील व शिरूरकुकडींतील मिळोन निवड करोन तीन पलटणें चैत्र व. १ कूच करोन हिंदुस्थानांत फरांचिसांचे मोहऱ्यावर जाणार. इंग्रजांचा वकील येथें आहे त्याचें बोलणें इंग्रजी पलटणें तीन फरांचीस यांणीं शिकस्त करून कापलीं यास्तव आमचा जमाव फरांचिसांचे मोहऱ्यावर जाणार. त्यास तुमची आमची दोस्ती आहे. तरी तुम्हीं आमच्या पुस्तपन्ह्यावर असावें. लढाई आम्ही करूं. परंतु मार्गे मात्र असावें याप्रों बोलणें शिंदे याजवळ इंग्रजी वकीलाचें पडलें आहे. शिंदे यांजलाही पलीकडे जाणेचें आहे. त्यास हेंही कबूल करतील. श्रीमंतांची स्वारी कोपरगांवाहून शु. २ शनवारीं निघोन नाशीकास गेली. महिना दोन महिने कालक्षेप तिकडेच करणार. वरकड वर्तमान अधिकोत्तर नाहीं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ७१९६ श्री. (३१ मार्च.)

पौ छ. १९ सफर. सन तिस्सा. चैत्र. विज्ञापना. तागायत चैत्र

शुा १५ पावेतों सुखरूप असों विशेष. इकडील वर्तमान तरी, कर्नाटकांत किरीटी रामराजा याजपाशीं इंग्रजांचीं दोन तीन पलटणें नेहमीं चाकरीस असोन सलूख होता. त्यांत कांहीं बिघाड जाला. सबब राजे यानें इंग्रजांकडील वकील होता त्यास ठार मारिलें आणि इंग्रजांकडील कोची बंदर आहे तें राजे याणें घेतलें. नंतर इंग्रजांनीं कांहीं पलटणें पाठवून राजे यासी मोकाबला केला आणि इंग्रजांनीं दुसरा वकील राजे याजकडे दुसरा वकील पाठवून पहिला वकील राजे याणें मारला होता तो गुन्हा राजे यास बहाल करून पूर्ववत्प्रमाणें आपली पलटणांची चाकरी कायम करून कोची बंदर सोडवून घेऊन तह केला. याप्रमाणें मलबारचें वर्तमान आहे. यानंतर इंग्रजांची वखार पूर्वीपासोन होती त्यास इंग्रजांचा व फिरंग्यांचा स्नेह आहे. त्यास चिनईतील इंग्रजांची फिरंग्यांची वखार आपल्या पेट्यांत घेऊन फिरंग्यांची वखार बंद करोन इंग्रजांनीं आपली वखार कायम केली. म्हणोन चिनईवाले टोपकर याणीं विचार केला कीं इंग्रजांची वखार येथें आली आहे त्यास कालक्रम (?) आपल्या संस्थानास अपाय घडेल असें समजोन इंग्रजास वखार काढून नेणें म्हणोन सांगितलें असतां इंग्रजांनीं मान्य केलें नाहीं. सबब चिनईवाले याणीं इंग्रजांच्या बंदरांतील सावकारी वगैरे चिनईस खरेदी विक्रीस आलीं होतीं तीं अटकावून ठेविलीं होतीं. त्यांत मुंबईचे पारशी वगैरे सावकार यांचीं अठरा तारवें गुंतलीं होतीं. नंतर इंग्रज याणीं चीनवाले यांसी सलूख करून आपली वखार तेथून काढून फिरंग्यांची वखार पूर्ववत्प्रमाणें कायम केली. तारवें गुंतलीं होतीं तीं सोडवून घेतलीं. बारा तारवें मुंबईस दाखल जालीं. बाकी सहा मागाहून येत आहेत. याप्रमाणें होऊन चिनईस तारवें जाण्यायेण्याची बंदी होती ती चालूं लागलीं. याप्रमाणें चिनईचें वर्तमान मुंबईहून आलें. शिंदे याजकडील वर्तमान तरी, कारभारी मंडळ मुख्य सर्जेराव बापू व मामा आंगरे व अंबोजी इंगळे व देवबा काळे व केदारजी हुजरे व बाळोजी कुंजर व बापू निंबाळकर व बाबा पाटणकर याप्रमाणें कारभारी आहेत. माजी कारभारी अन्याजी भास्कर व मोरो हरी मुजुमदार या उभयतांस कैद करून मंदुसरास किल्ल्यास सर्जेराव बापू याणीं पाठविलें आणि असबाब पांच

लाख रुपयांचा हातीं लागला तो जप्त करून सरकारांत आणला. त्यांचीं मुलें माणसें कैद करून ठेविलीं आहेत. त्यांसही कोणीकडे पाठवितील. चिटणीस मंडळ अद्याप बहालींतही नाहीं व तगिरींतही नाहीं. पुढें पहावें. सर्जेराव कारभारांत आले सबब शिंदे यासी व इंग्रजांशीं विकल्प येत आहे. यास्तव शिंदे याणीं होळकर यांस तिकडेच राहाविलें. म्हणोन होळकर याची देशीं येण्याची मंदी जाली. होळकर याचा मुक्काम अलोट परगणे लाहपूर येथें इंदुरापलीकडे आहे. सर्व मसलतीची भिस्त मीरखान पठाण याजवर होळकराची आहे. कारभारी यांचे मसलतीनें होळकर वागत नाहींत. मीरखान करील तें प्रमाण. उज्जैनचा संन्यासी यांजकडून अनुष्ठान होळकर याणीं आपल्या प्रकृतीकारितां कराविलें आहे. कांहीं गुण आहे. श्रीमंतांची स्वारी सप्तशृंगीस चैत्र व. ५ टोक्यास जाऊन वैशाख पौर्णिमेचें ग्रहण कोपरगांवीं करून मग येणार. कर्णेल नाशिकाकडे वगैरे गेले नाहींत. कोपरगांवीं मोरबा जात आहेत. सदाशिवपंतभाऊ व मोदी वगैरे स्वारीसमागमें गेले आहेत. शिरूरकुकडीहून चार पलटणें व कर्णेल वालिससाहेब हिंदुस्थानांत चैत्र व. ९ स निघून जाणार. याचें कारण कीं हिंदुस्थानांतील राजेरजवाडे यांस आवई पडावी कीं दक्षिणेंतून इंग्रजी पलटणें येत आहेत. सबब इंग्रजांचा जोर आहे. सबब इंग्रजांस सामील असावें असें राजेरजवाडे यांस वाटावें सबब हीं पलटणें जात आहेत. भोसले कांहीं एक गडबड करतील सबब इंग्रजांनीं नागपुरापासोन चाळीस कोसांवर उमरावतीस दोन पलटणें व पूर्वेकडे बंगालच्या लगत्यास आरपूर येथें चार पलटणें टेविलीं आहेत तीं अद्याप नेहमीं तशींच आहेत. होळकर यांचे येथें भोसले यांजकडील वकील नव्हता तो हल्लीं नागपुराहून रवाना जाला. होळकराचा वकील व्यंकटराव यांचे चिरंजीव आहेत. सांप्रत भारी मसलत फराचिसांची आहे. यास्तव सर्वांसीं सभेट करीत आहेत. इस्मान म्हणोन टोपीकार आहे. त्याजपाशीं एक लाख जमाव आहे. त्याजकडे फरांचिसांचे व इंग्रजांचें दोघांचें सूत्र गेलें आहे. तो ज्यास सामील होईल त्यास यश येईल असें वर्तमान आहे. हे विज्ञापना.

नं. ७१९७ श्री. (ज्येष्ठ शु. ३–१७ मे.)

पै. छ. ४ रबिलाखर. सन तिस्सा मय्यातैन

सेवेशीं[1] बालाजी कासी किबे. कृतानेक साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत जेष्ट शुा ३ बुधवार परियंत स्वामींचे कृपावलोकनें करून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमतांची स्वारी कोपरगांवाहून वैशाख वद्य त्रयोदशीस निघोन काल मंगळवारीं सायंकाळीं येथें येऊन दाखल झाली. सर्व सरदार व मुत्सद्दी व करनेल कलुष वगैरे स्वारींसमागमें आले. शिरूरकुकडीस तीन पलटणें इंग्रजी आहेत. त्यांचा सरदार कर्नेल वालीस होता तो मृत्यु पावला. ममईहून वरचेवर दारूगोळा व तोफा लहानथोर याप्रमाणें नेहमीं इंग्रजांकडील येऊन येथें व शिरूरकुकडीवर [2]जंगी सरंजामाचा भरणा होत आहे. सिंदे यांजकडील वर्तमान तरी जयपूर प्रांतीं मुक्काम आहे. सहा शेरांची धारण होऊन महागाई शिंदे यांच्या लष्करांत जाहली आहे. होळकर याचा मुक्काम नजीक काळीं सिद्ध आहे तेथेंच आहे. मीरखान पठाण यांस खर्चास वराता मेवाडप्रांतीं वगैरे देऊन फौजसुद्धां मोहिमेस जाणें म्हणोन सरदारांचें म्हणणें. परंतु पठाण रोकड खर्चास घेतल्याखेरीज मोहिमेस जात नाहीं म्हणतो. सबब होळकर यासी व पठाणासी चित्तशुद्धता नाहीं. याप्रमाणें हिंदुस्थानांतील पत्रें आलीं. त्यांतील सारांश मजकूर सदरहूप्रमाणें आहे. अधिकोत्तर नाहीं. दिल्लीच्या पत्राच्या नकला पेशजीं आल्या त्या सेवेशीं पाठविल्या होत्या. त्या प्रविष्ट जाहल्याच असतील. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

---

## सुा अशार मय्यातैन व अल्लफचीं पत्रें:—

नं. ७१९८ श्री. (आगष्ट–सप्टें.)

विज्ञापना. इंग्रज गेल्याचा मजकूर छ. १ मिनीहूचे पत्रीं लिहिला आहे त्याजवरोन कळेल. नंतर छ. २ जमादिलाखरीं राजश्री गंगाधरशास्त्री व त्रिंबकजी डेंगळे निघोन आळंदीचे मुक्कामास गेले. डेंगळे निंबगांवास जाऊन तेथें शास्त्री यांस मेजवानी करून उभयतां मिळोन पुढें नाशिकास

---

१ पत्र पुण्याहून मिरजेस. २ लढाऊ.

जाणार. दिवाण काल प्रातःकाळीं निघोन फुलगांवास भोजन करून केनूर पाभळास मुक्कामास जाणार. प्रकृत बिघडली आहे परंतु सरकार-आज्ञेवरून तसेंच कुटुंब परिवार सुद्धां गेले. श्रीमंतांची स्वारी परभारा जाणार असा बेत होता. तो राहून सिराळाहून शिवापूरचे मुक्कामास यावें असा बेत करून मुक्कामास येऊन तेथें बुणगें ठेऊन काल आवशीचे सहा घटका रात्रीस राजधानीस आले. तेथून उदईक निघणार असें बोलतात. किंवा चार दिवसीं जाणार असेंही बोलतात. जाणेचा निश्चय कांहीं समजत नाहीं. राजश्री पंतसचिवही गेले. राजेबहादर व प्रतिनिधीही जाणार असें वर्तमान आहे. दिवाण गेले ते दिवशीं राजश्री [1]दाजीबा व हणमंतराव व मीही गेलों होतों. सर्वांस बरोबर यावें असें सांगितलें. त्यावरून आज निघणार होतों. परंतु श्रीमंतांची स्वारी आल्यामुळें याचा सुमार पाहून निघणार. दाजीबा मला बरोबर यावें असें म्हणाले. परंतु स्वामीस विनंती लिहिली आहे. उत्तर आलें म्हणजे येतों असें सांगितलें. परंतु श्रीमंत राजश्री बापूसाहेब याणीं दिवाणाबरोबर जावें असें म्हणतात. दाजीबा व बाळकृष्णपंत निघाले म्हणजे जाईन असें म्हणतों. स्वामींचें आज्ञापत्र आलें नाहीं. परंतु सर्वांचें मत जावें असें ठरलें म्हणजे जातों. पाल अगर राहुटी व तट्टू पाठवावयास आज्ञा व्हावी. दाजीबांनीं उंट व राहुटी लष्करांतून आणविली व हणमंतराव यांणींही लष्करांतून राहुटी व उंट व स्वार आणविले. मी पालें पाठविणेविसीं श्रीमंत राजश्री नानासाहेब यांस लिहिलें होतें. परंतु पाल मिरजेस गेले म्हणोन लिहिलें आलें. तर तेथूनच पाठवावयास आज्ञा व्हावी. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

---

नं. ७१९९ (आषाढ व. १३–१० जुलै.)

उतारा—पत्र बाळाजी काशी किबे यांचें बाळासा. स पुण्याहून मिरजेस रवाना छ. ३ जमादिलाखर सन अशर मय्यातैन—" शिंद्याकडून अप्पा कानडे सरदार बरोबर चार हजार फौज घेऊन भोपाळावर स्वारी करोन खंडणी मागों लागले. तेव्हां भोपाळकरांनीं त्याजवर चालोन येऊन लढाई करून त्याचा पराजय केला. फौज लुटली गेली. कानडे

---

[1] लिमये तासगांवकर. पत्र वकिलाचें पुण्याहून मिरजेस.

पळोन गेला. तेव्हां शिंद्यानें २९ तोफा व जॉन बत्ती याचा कंपू व जगोबा बापू व बापू शिंदे यांजबरोबर १५ हजार फौज देऊन भोपाळवर पाठविलें. तेव्हां भोपाळवाल्यांनीं मीरखान पठाण यास पांच लाख रुपये देऊं केले. पैकीं दोन रोख दिले. बाकी तिहीची हमी दिली./नंतर मीरखान याणें भोपाळास जाऊन भोपाळकरांची व शिंद्याची फौजेची लढाई चालली तींत भोपाळकरांस मदत केली. विंचूरकराचे महाल शिऊर अष्टें हे मीरखानानें भोपाळास जातांना जाळून लुटून टाकले. पाऊण लाख रुपये खंडणी घेतली. अलीबहादर यांस इंग्रज दरमहा १५ हजार रुपये खर्चास देत होते. अलीबहादर याणीं इंग्रजापासोन आपला सरंजाम हिसकावून घ्यावा म्हणोन कांहीं फौज जमा केली. ही बातमी इंग्रजांस कळोन त्याणीं एकदम अलीबहादर यांस कैद करोन काशीस नेल्याची बातमी आहे. इंग्रज याणीं शिद्दी याच्या मुलखावर चढाई करावयास आरंभ केला आहे. सोळा तारवें भरोन ममईच्या मार्गे इंग्रजांकडील जमाव सिद्दी याच्या मुलखावर रवाना झाला. तें राज्य घेतल्यावर इंग्रज आरबांचें राज्य घेणार. येथील वर्तमान तरी, त्रिंबकजी डेंगळ्याकडून नगदीचें काम निघोन त्याजकडील शिल्लक पांच लाख रुपये शिक्का व तीन लाख चांदवड व दोन लाखांच्या मोहरा याप्रमाणें शिलकेची मोजदाद नारोबा आवटीकडोन करवून सदाशिव नाईक वानवळे यांचे स्वाधीन केली. जमेचें काम वानवळे यांजकडे व खर्चाचें काम नारोबा आवटीकडे श्रीमंतांनीं सांगितलें आहे. खंडेराव रास्ते यांजकडील सरंजाम काढोन सदाशिवरावभाऊ याजकडे श्रीमंतांनीं दिला. श्रीमंतांची स्वारी पंढरपुराकडे जावयाचा बेत आहे."

---

नं. ७२०० (आषाढ शु. १-१३ जुलै.)

उतारा—पत्र गोविंद शेषो कडून मिरजेस बाळासाहेबास रवाना छ. २९ जमादिलावल—"बाळंभट वाटवे याणीं बापू शिंदे यांजकडे धारवाडची मामलत देऊन त्याजकडून बहिरसाल सुभेदार, दोन अडीचशे स्वार व कांहीं पायदळ व आपणही चार पांचशे आरब ठेऊन हुबळीच्या दोन तोफा बहिरसाल याजबरोबर देऊन सर्व जमाव हुलगूर सावनुरापासोन

तीन कोसांवर आहे तेथें पाठविला. त्या फौजेनें सावनुरांतील अंदुखान याचे दोघे भाऊ शेरदारखान व पीरखान यांच्या फौजेवर एका टेकडीवरोन तोफांचा मार केला. तेव्हां अंदुखानाचे भाऊ फौजेसह यांजवर चालून आले. तोफांच्या दोन्ही बाजूंस बहीरखाल यानें स्वार दबा धरून बसाविले होते. त्यांनीं एकदम होनहल्ला केली व आरबांनींही लढाई केली. तेव्हां अंदुखानाच्या भावाची फौज मोडली. पांचशेपर्यंत जखमी व ठार जाहले. दोघेही भाऊ ठार जाले. रामचंद्रपंत अप्पा हुपरीकर सावनुरांत नबाबाच्या वाड्यांत कैदेंत आहेत. चारशें आरबांचा पहारा आहे."

---

नं. ७२०१ (आषाढ शु. १३–२५ जुलै.)

उतारा—पत्र नारो रघुनाथ दातार ठाणें करकंबें याजकडून मिरजेस बाळासाहेबास.

रवाना छ. ११ जमादिलाखर.—श्रीमंतांची स्वारी नवमीस वाकरीचे मुकामाहून आषाढ शु. १० स शनवार प्रहर दिवसास चालत आली. बरोबर मुत्सद्दी मंडळी पांडुरंगपंत ढमढेरे व नारोबा आवटी व अन्याबा राहतेकर व मोरदीक्षित मराठे व त्रिंबकजी डेंगळे व आबा शेलूकर इत्यादि आहेत. सरदारांपैकीं विंचूरकर व बापू गोखले व नाना पुरंदरे आहेत."

---

नं. ७२०२ (कार्तिक शु. ७–११ नोव्हेंबर)

शके १७३४ इ. स. १८१२

उतारा—पत्र गोविंद[1] गंगाधर पटवर्धन यांचें मिरजेस बाळासाहेबांस. रवाना ६ जिल्काद बुधवार "वडिलांस औषध डाकटर इंग्रजाकडील देत असतो. दहा बारा दिवस जाले म्हणोन लिहिलें तें कळलें. गुणावह पडल्याचें लिहिलें यावें."

---

नं. ७२०३ श्रीगणपतिर्जयति. (आषाढ व. १२–८ आगष्ट.)

राजश्री मोरो बल्लाळ गोसावी यांस.

---

१ हे बाळासा. चे चवथे चिरंजीव. पत्र पुण्याहून मिरजेस.

[1]विनंती उपरी. बाबा फडके यांची स्त्री सौ. बयाबाई यांनीं अग्निप्रवेश केला तेव्हां त्याणीं श्रीमंतांस दुपेटा व श्री. राजश्री चिमाजीआपासाहेब यांचे स्त्रीस पातळ चोळी येणेंप्रमाणें दिल्याचा मजकूर पंढरपुरास वडिलांकडे लिहिला होता. त्याचें उत्तर आलें जे, सनगें पुण्यास वकिलाकडे पाठवावीं. त्याणीं राजश्री दिवाण व आलिफष्टनसाहेब यांचे विचारें करून श्रीमंतांस पावतीं करावीं. त्यांनीं न घेतल्यास माघारीं पाठवूं नयेत. तेथेंच गुरथळ चांगला ब्राह्मण पाहून त्यास द्यावीं. याप्रमाणें तुम्हांस लिहून पाठवावें असें वडिलांचें लिहिलें आलें त्यावरून लिहिलें आहे व सणगेंही पाठविलीं आहेत. सदरीं लिहिल्याप्रमाणें करावें. रवाना छ. २५ जमादिलाखर हे विनंती.

---

नं. ७२०४ श्रीगणराज. (चैत्र शु. ४–२३ एप्रिल.)

आजम[2] आमरम मेस्तर पेरसन् हारीज रेसिडेंट मुक्काम बाणकोट दामाहे बहादूर–५ अजि[3] दिल एखलास त्रिंबकराव रघुनाथ सलाम बादल सलाम. आर्कीं. येथील खैर समजून आपली षादमानी[4] हमेशा कलमीं करून दील ताजा करीत जाणें. दिगर मजकूर, तुम्हीं डाखतरसाहेब याची रवानगी करून दिली त्यास बाणकोटाहून येथें पोंचावयास उष्णकाळामुळें दहा दिवस लागले. आल्यानंतर तब्रियत पाहून औषध चालतें केलें आहे. परंतु मुंबईहून एक महिन्याचे मुदतीनें पाठविलें. त्यांस येण्यास दहा दिवस लागले. माघारे जावयास दहा दिवस लागतील असें म्हणतात. तेव्हां येथें मुक्काम जे दहा दिवस राहिले इतक्यांत औषध उपाय होऊन तनदुरुस्ती कशी होईल? वास्तव जरूर जाणोन आपल्यास लिहिलें आहे. तर येविशीं मुंबईहून जनरालसाहेब यांस लिहून डाखतरसाहेब यांस पत्र आणवून पाठवावें कीं तुम्हास अजम त्रिंबकराव यांस औषध देऊन त्यांची तनदुरुस्ती करावी. त्यास एक महिन्याचे मुदतींत जातां येतां वीस रोज मोडतात. दहा दिवसांत तनदुरुस्ती कशी होईल?

---

१ पत्रावर तारीख वगैरे अजमासानें घातलें आहे. पत्र सांगलीकरांचें पुण्यास.

२ हें पत्र सन १८१० त लिहिलेलें आहे. पत्र त्रिंबकराव कुरुंदवाडकर यांचें बाणकोटास. ३ येथून मायना. ४ खुशाली.

ऐ. ले. सं. १५–४९

यास्तव त्यांची तनदुरुस्ती होईतोंपर्यंत तुम्ही राहून औषध उपाय चांगला करून ते संतोषें जो निरोप देतील त्याप्रमाणें निरोप घेऊन येणें. मध्यें न येणें, म्हणोन आपण मुंबईचें पत्र आणून पाठवावें व आपलेंही पत्र डाखतर याचे नांवें पाठवून द्यावें. दुसरें रंगीत सूत खरेदी करून पाठवावें म्हणोन आपण राजश्री रामचंद्र रघुनाथ यांजजवळ सांगितलें होतें त्यावरून खरेदी करावयास गोकाकेकडे पाठविलें आहे. येतांच रवानगी करून देववितां येईल. हल्लीं मोसम लागली आहे. कळावें. ता. छ. १८ रबिलावल. जादा काय लिहिणें ! प्यार मोहबत असों दीजे. हे किताबत बार.

मोर्तब.

---

नं. ७२०५ श्री. (श. १७२५–इ. स. १८०३)

[१]यादी प्रांत कर्नाटक येथील मामलत बाळकृष्ण लक्ष्मण यांजकडे सांगितली आहे. त्यास ताकीदपत्रें व सनदा–सु आर्बा मय्यातैन व अल्लफ–

२ बापूजी शिंदे किल्ले धारवाड यांचे नांवें.

१ तालुका धारवाड येथील माजी मामलेदार यांचे अंमलांत तुम्हाकडून त्याची अंमलाची पायमल्ली करून कुळें वगैरे धरून नेलीं असतील तीं सोडून देणें व इतःपर तुम्ही हरएकविशींचा तालुके मजकुरीं उपसर्ग न करणें.

१ तोफा व दारूगोळा वगैरे साहित्य ठाणीं घालावयाबद्दल लागेल तें बाळकृष्ण लक्ष्मण यांचे पत्र येईल त्याप्रमाणें देऊन पुरावा करणें म्हणोन सनद.

२

---

१ शिरहट्टीचे बाळकृष्ण लागू यांना इ. स. १८०३ सालीं पेशव्यांनीं कर्नाटक प्रांताची मामलत दिली त्या वेळीं त्या प्रांतांतील अंमलदार व सरदार यांना पेशव्यांनीं ताकीदपत्रें दिलीं त्यासंबंधींची ही याद आहे. शिरहट्टीचें हें लागू घराणें सावकार व जमीनदार या नात्यानें कर्नाटकांत प्रसिद्ध आहे. या घराण्यापैकीं लक्ष्मण हरि आणि बाळकृष्ण लक्ष्मण हे इतिहासप्रसिद्ध आहेत.

[टीप पृ. ८३५९ वर चालू.

२ मल्लाप्पा देसाई नाडगौडा ता. कित्तूर यांचे नांवें.

१ तालुका मजकूरचा अंमल बाळकृष्ण लक्ष्मण करतील. त्यास अंमलास हरकत व तळीतगाद्याचा उपद्रव न करणें.

१ परगणे खानापूर येथील अंमलास हरयेकाविशीं हरकत न करणें. तेथील कुळें तुम्हाजवळ असतील तीं सोडून देणें. परगणे खानापूरची मामलत भिकाजी बाबूराव याजकडील दूर करोन बाळकृष्ण लक्ष्मण यांजकडे सांगितली आहे. तरी तुम्ही परगणें मजकुराचे अंमलास हरकत व उपद्रव न करणें.

---
२

१ रामचंद्र परशराम यांचे नांवें पत्रें—

१ परगणे मिश्रीकोट.

२ फुटगांव.

१ मौजें सूल.

१ मौजें उमजगी

---
२

---
३

महाल एक ठाणीं दोन येणेंप्रमाणें बाळकृष्ण लक्ष्मण यांचे हवालीं करणें.

१ शिदोजी नाईक निंबाळकर यांस पत्रें—

१ परगणे कंकणवाडी.

१ परगणे एकोडी.

१ बारीपलीकडील गांव.

---
३

येणेंप्रमाणें दोन महाल व फुटगांव बाळकृष्ण लक्ष्मण यांचे हवालीं करणें म्हणोन.

---

त्याचीं पुष्कळ पत्रें आम्ही आतांपर्यंत ऐ. ले. संग्रहांत छापलीं आहेत. पुढें दोन वर्षांनीं पेशव्यांनीं लागूकडील मामलत दूर करून ती आनंदराव हुपरीकर यांना दिली, हा मजकूर या ग्रंथाच्या पृ. ८०६९ वर आलेला आहेच.

१ रामचंद्र नारायण नि फडके याचे नांवें कीं परगणे जुनी हुबळी हा महाल ठाणेंसुद्धां बाळकृष्ण लक्ष्मण यांचे हवालीं तोफा वगैरे सरकार नि सरंजाम स्वाधीन करणें म्हणोन.

१ माधवराव अनंत रास्ते यांचे नांवें—परगणे जालीहाळ हा महाल बाळकृष्ण लक्ष्मण यांचे हवालीं करणें म्हणोन.

१ बापूजी गणेश गोखले यांचे नांवें.

१ देसगत तालुका गदग.

७ फुटगांव.

१ मौजें बढणी. १ मौजें सकलीपूर. १ मौजें माटिगवाड.
१ मौजें मलिकवाड. १ मौजें कोलवाड. १ मौजें पेडसूर.
एकूण सात.

येणेंप्रमाणें बाळकृष्ण लक्ष्मण यांचे हवालीं ठाणें डंबळ व गांव हवालीं करणें व यापैकीं कुळें वगैरे तुम्हाकडे असतील तीं हवालीं करणें.

१ महाराज करवीरकर यांस—

१ किल्ले वल्लभगड कर्यात सोलापूर येथील मामलत बाळकृष्ण लक्ष्मण यांजकडे सांगितली आहे. तरी किल्ले व कर्यात यांचे हवालीं करावी. तेथें कोणेविशींचा उपद्रव होऊं नये येविशीं.

१ तोरगलकर यांस पत्र—हुली तालुके धारवाड येथील ठाणें तुम्ही काटकाई करोन घेतलें आहे. तें बाळकृष्ण लक्ष्मण यांचे हवालीं करणें म्हणोन.

१ भिकाजी बाबूराव यांस—परगणे खानापूर ठाणें जकीरासुद्धां बाळकृष्ण लक्ष्मण यांचे हवालीं करणें म्हणोन.

१ यशवंतराव घोरपडे यांचे नांवें—कंकणवाडी कर्यात आडगळ ठाणें सुद्धां बाळकृष्ण लक्ष्मण यांचे हवालीं करणें म्हणोन.

१ खंडेराव घोरपडे यांस पत्र कीं, परगणे सोंडूर येथील मामलत मा निल्हेकडे सांगितली आहे. तरी महाल किल्ला जकीरासुद्धां स्वाधीन करोन कबज घेणें म्हणोन.

---

# अंतर्गत राज्यव्यवस्था

ग्रंथाच्या प्रारंभीं विषयांची यादी दिली आहे. तींत शेवटचा विषय 'अंतर्गत राज्यव्यवस्था' हा आहे. या विषयाला उपयोगी पडण्याजोगे पुष्कळ कागद पुढें छापले आहेत. प्रारंभीं पोळ घराण्याचे कागद छापले आहेत ते अत्यंत महत्त्वाचे आहेत आणि त्यामुळें तत्कालीन न्यायदान आणि दिवाणी स्वरूपाचे तंटे यांवर बहुमोल प्रकाश पडणार आहे. हे पोळांचे कागद नीट समजण्याकरितां तत्कालीन न्यायपद्धतीसंबंधीं कांहीं माहिती येथें नमूद करतों.

पूर्वी प्रांताच्या जमाबंदीमध्यें 'कमावीस जमा' असें एक सदर असे. या सदरांत नजर नजराणा, खंड गुन्हेगारी, फौजदारी स्वरूपाचे तटे व गुन्हे यांचे निर्णय वगैरे अनेक बाबींचा समावेश होत असे. या कमावीसजमेच्या बाबतींत सर्व सत्ता सरकारच्या हातांत असे. विशेषतः फौजदारी स्वरूपाचे तंटे व गुन्हे यांची चौकशी व न्याय सरकारी अंमलदार स्वतः करीत असत. त्यांत लोकमताला किंवा लोकांच्या म्हणण्याला तिलमात्र वाव नव्हता. गुन्ह्याच्या बाबतींत सर्व चौकशी व न्याय सरकार स्वतःच्या जबाबदारीवर करीत असे.

दिवाणी स्वरूपाचे तंटे यांची चौकशी व न्याय मात्र सरकारी अंमलदार सर्वस्वीं लोकमताप्रमाणें करीत असत. दिवाणी स्वरूपाच्या न्यायदानाच्या बाबतींत सर्व सत्ता प्रजेच्या हातीं असे. समजा कीं, एखादा दिवाणी स्वरूपाचा तंटा मिरज प्रांतांत उद्भवला तर अग्रवादी (वादी) आणि पश्चिमवादी (प्रतिवादी) हे मिरजेच्या सुभेदाराकडे त्या बाबतींत तकरार करीत. सुभेदार दोघांचें म्हणणें ऐकून घेऊन आपसांत राजीखुषीनें तंटा तोडण्याचा प्रयत्न करीत असे. आपसांत समजूत होण्याची गोष्ट सहसा घडत नसे. नंतर सुभेदार भोंवरगांवचे पाटील कुलकर्णी आणि देशमुख देशपांडे यांची सभा भरवून त्या सभेवर तंट्याचा न्याय करण्याचें काम सोंपविण्यांत येत असे. या सभेला 'पंचाईत' किंवा 'गोत' असें म्हणत. पंचाइतीच्या कामाला सुरवात झाली म्हणजे आपण पंचाइतीच्या निर्णयाला मान्यता देऊं अशी अग्र-

वादी आणि पश्चिमवादी यांचीं कबुलीपत्रें पंच लोक लिहून घेत. नंतर उभय पक्षांच्या तकरीरा पंचांपुढें दाखल करण्यांत येत असत. नंतर उभय पक्षांच्या पुराव्याची चौकशी पंचांतर्फें करण्यांत येत असे. नंतर वादी प्रतिवादींचें म्हणणें आणि पुरावा यांची नीट छाननी करून पंच लोक तंट्याचा निर्णय करीत असत. पंचांच्या निर्णयाची अंमलबजावणी सरकारमार्फत होत असे.

एखादे प्रसंगीं वादी किंवा प्रतिवादी यांपैकीं एकजण लांचलुचपत किंवा भीडभाड यांची सबब सांगून पंचांचा निर्णय अमान्य करीत असे. नंतर नाराज झालेला पक्षकार सुभेदाराकडे 'थळाची' (स्थळाची) मागणी करीत असे. सरकारी अंमलदार ही थळाची मागणी बहुतेक मान्य करीत असत. थळ म्हणजे दूर प्रांतांतील पंचाईत. लांचलुचपत किंवा भीडभाड अशा सबबींचा संभव राहूं नये म्हणून सरकारी अंमलदार दूर ठिकाणीं थळ नेमून देत. समजा, मिरज प्रांतांतील तंटा असला तर पक्षकाराला नाशीक, पुणें, सोलापूर अशा दूर ठिकाणीं थळ नेमून देत. थळाचा हुकूम हातीं आल्यावर तेथील सुभेदार तंट्याचा निर्णय करण्याकरितां भोंवरगांवच्या वतनदारांची पंचाईत भरवीत असे. या पंचाइतीपुढें उभय पक्षकारांना आपली सर्व फिर्याद पुन्हा मांडावी लागे आणि शेवटीं थळाचा जो निर्णय होईल तो मान्य करावा लागे. सारांश, दिवाणी न्यायदानाच्या बाबतींत सर्व सत्ता लोकांच्या हातांत होती ही महत्त्वाची बाब लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

पुढें पोळ घराण्याचे कागद छापलें आहेत. त्यांतून दिवाणी स्वरूपाचे तंटे आणि न्याय यांचे अनेक नमुने दृष्टीस पडतात. या पोळ प्रकरणाची थोडक्यांत हकीगत पुढें देतों. सिदोजी, खेतरोजी, सुभानजी आणि संभाजी हे चौघे पोळ बंधू कवठें महांकाळ येथें रहात असत. या पोळ घराण्याकडे मौजे दहिवाडी कर्यात मलवाडी येथील पाटीलकी आणि कर्यात सावळज प्रांत हुकेरी येथील देशमुखी अशीं दोन वतनें पूर्वापार चालत होतीं. शेजारचा मिरज प्रांत आणि मिरजेचा किल्ला हा मोंगलांच्या ताब्यांत होता. महंमद दिलेलखान नांवाचा मोंगल सुभेदार मिरजेत रहात असे. त्रिमलराऊ उर्फ तिमाजी वेंकटाद्री नांवाचे गृहस्थ

मिरजेचे देशमुख होते. पोळ घराण्याच्या कागदांत नमूद केलेली सर्व हकीगत इ. स. १७२५–२६ सालीं घडलेली आहे. त्या सालीं महंमद दिलेलखान यानें तिमाजी वेंकटाद्री याच्यामागें तगादा लाविला कीं, तुम्ही मिरज प्रांताचे देशमुख आहां. मिरज प्रांतांत सरकारी वसुलाची बाकी थकली आहे, ती वसूल करून द्या. असें म्हणून खानानें तिमाजीवर जबरदस्त दंड बसविला. सरकारी देणें भागविण्याकरितां तिमाजीनें वर्षाची मुदत मागून घेतली. त्या मुदतींत तिमाजीनें सरकारी बाकी वसूल करण्याची अतिशय खटपट केली. परंतु त्याला सरकारी देणें भागवितां आलें नाहीं. तेव्हां खानानें तिमाजीच्या दाराशीं पठाणांचें धरणें बसविलें. पठाणांनीं सरकारी देणें भागविण्याकरितां तिमाजीच्या मानेवर तरवार लोंबकळत ठेविली.

मौजे खलगरें प्रांत रायबाग येथील सिदोजी बिन तावजी बंडगर आणि कयाजी पांढरे या दोघांनीं तिमाजीच्या अडचणीचा फायदा घेतला. बंडगरानें दिलेलखानाशीं बोलणें लाविलें कीं, आम्ही तुम्हांस दोन हजार रुपये देतों. तुम्ही तिमाजीकडून कवठें महांकाळ येथील निम्मे देशमुखीचें खरेदीपत्र आमच्या नांवें करून द्यावें. बंडगाराच्या या संधानावरून खानानें तिमाजीला ताबडतोब कैद केलें आणि त्याचें घरदार लुटून टाकलें. या लुटींत तिमाजीचा देशमुखीचा शिक्का खानाच्या हातीं सांपडला. नंतर खानानें तिमाजीला मार देऊन त्याजकडून कवठें महांकाळचे निम्मे देशमुखीचें खरेदीपत्र आणि गोत महजर असे दोन कागद बंडगराच्या नांवें लिहून घेतले. भोंवरगांवच्या वतनदारांनीं या दोन कागदांवर साक्षी घातल्या नाहींत. कुठल्यातरी सामान्य लोकांच्या साक्षी घालून हे कागद पुरे करण्यांत आले. या दोन कागदांवर देशमुखीचे शिक्के खानानें स्वतः केले. जुलमानें घेतलेले हे दोन कागद हातीं पडल्यावर बंडगरांनीं आपला देशमुखीचा अंमल बसविण्यास सुरवात केली.

इकडे बिचारा तिमाजी देशमुख खानाच्या तुरुंगांत कुजत पडला होता. पुढें कांहीं दिवसांनीं तिमाजी तुरुंगांतून पळून कोकटनूर येथें लपून राहिला. पुढें कोकटनुराहून तिमाजी कवठें महांकाळ येथें सिदोजी पोळ यांजकडे गेला, आणि म्हणाला कीं, आम्हांवर हा दुर्धर प्रसंग

ओढवला आहे. पैशाकरितां पठाण आमचे प्राण घेत आहेत. कवठें महांकाळ पंधरा गांवचें देशमुखीचें वतन आमचें पुरातन आहे. निम्में देशमुखीचें वतन तुम्हांस विकत देतों. आम्हांस पैसे देऊन या प्रसंगांतून सोडवावें. पोळांनीं हें म्हणणें मान्य केलें आणि उभयपक्षीं करार ठरला तो असा–( १ ) कवठें महाकाळ येथील देशमुखांचा वाडा सिदोजी पोळांनीं नवीन बांधावा. त्या वाड्यांत तिमाजी देशमुख आणि पोळ बंधू या दोघांनीं मिळून राहावें. ( २ ) पोळांनीं देशमुखास २२५० रुपये, पांचशें रु. चें कापड, चार घोडीं, पंचवीस बैल, पंचवीस गाई, म्हशी दहा, जोरी खंडी दहा, येणेंप्रमाणें द्यावें. ( ३ ) मिरज प्रांताचा देसाई आहे त्याचें पोळांनीं लग्न करून द्यावें. ( ४ ) पोळांनीं तिमाजीच्या देशमुखीच्या अंमलास मदत करावी. ( ५ ) मौजें सलगरें प्रांत रायबाग येथील सिदोजी बिन तावजी बंडगर आणि कयाजी पांढरे यांनीं जुलमानें देशमुखीचें खरेदीपत्र लिहून घेतलें आहे. पोळांनीं बंडगराचा अंमल बसूं देऊं नये. याप्रमाणें करार ठरल्यावर पोळांनीं रुपयांचा भरणा केला आणि तिमाजीनें सिदोजी पोळ यांचे नांवें खरेदीपत्र करून दिलें. (नं. ७२१५।१६ पहा.) या व्यवहाराबद्दल पुढें परगणे जत व बरडोल, परगणे कोकटनूर, परगणे तेरदाळ, परगणे जंबखडी ( जमखंडी ), परगणे अथणी, कर्यात कवठें महांकाळ, दंशिंग, डफळापूर वगैरे भोवरगांवच्या वतनदारांची पंचाईत भरली आणि तिनें तिमाजी देशमुख आणि सिदोजी पोळ यांना निम्मेंनिम देशमुखीचा गोत महजर करून दिला. (नं. ७२०८ पहा.) या कागदावर दानपा बिन सातपा सुतार यानें आपली साक्ष घातली आहे. सुतारानें आपलें निशाण तासणी असें लाविलें आहे. पाटील देशमुख वगैरे मराठे वतनदारांनीं आपलें निशाण नांगर असें लाविलें आहे.

पुढें सिदोजी बंडगर साताऱ्यास गेला आणि प्रतिनिधींना म्हणूं लागला कीं, आपण तिमाजी देशमुखाला रोख रुपये दिले आहेत आणि त्याजकडून कवठें महांकाळचें निम्में देशमुखीचें वतन राजीखुषीनें विकत घेतलें आहे. तिमाजीनें दिलेलें खरेदीपत्र आणि गोत महजर आम्हापाशीं आहे. हे कागद पाहून आम्हांला सरकारांतून वतनाचें दुमालेपत्र करून

घ्यावें. बंडगराच्या पाठोपाठ संभाजी पोळ आणि तिमाजीचा चुलता तमाजी अण्णाजी हे साताऱ्यास गेले आणि त्यांनीं प्रतिनिधींकडे तक्रार केली कीं, बंडगरांनीं तिमाजीपासून जुलमानें कागद करून घेतलेले आहेत. तिमाजीनें बंडगरापासून एक पैसा देखील घेतला नाहीं. बंडगराचे कागद खोटे आहेत. पुढें तिमाजी स्वतः साताऱ्यास गेला आणि त्यानें प्रतिनिधींपुढें तक्रार केली कीं, बंडगरांनीं जुलमानें मज-कडून कागद करून घेतले आहेत ते खोटे आहेत. बंडगरापासून मीं एक पैसा देखील घेतला नाहीं. सिदोजी पोळ यांजकडून द्रव्य घेऊन आपण त्यांना निम्में देशमुखीचें वतन राजीखुषीनें विकत दिलें आहे. सरकारी देणें भागविण्याकारितां आपण निरुपायानें वतन विकलें आहे. याप्रमाणें वतनासंबंधें पोळ आणि बंडगर यांमध्यें वाद उत्पन्न झाला. आणि त्यांत बंडगर सर्व बाजूंनीं खोटा ठरला. (नं. ७२०९।१०।११ पद्य.) बंडगराचे खोटेपणाचे नमुने असे–(१) तिमाजी साताऱ्यास येऊन जें सांगेल तें आपण मान्य करूं असें बंडगरानें प्रतिनिधींना कबुलीपत्र लिहून दिलें. नंतर तिमाजी साताऱ्यास आला आणि त्यानें खरा प्रकार सांगितला तेव्हां बंडगरानें आपला शब्द पालटला आणि त्यानें तिमाजीचें बोलणें मान्य केलें नाहीं. (२) नंतर प्रतिनिधींनीं सत्यसुकृताचें स्मरण करून नरककुंडाचें मंडळ तयार केलें आणि त्या मंडळांत उभें राहून तिमाजीनें खरा प्रकार सांगितला. तिमाजीनें हें जें दिव्य केलें त्यानें बंडगराचें समाधान झालें नाहीं. (३) नंतर तिमाजी बंडगराचे हातावर सत्य स्मरून श्रीचें उदक घालण्यास तयार झाला. परंतु हातावर पाणी घेण्याची गोष्ट बंडगरानें साफ नाकबूल केली. तो उलट म्हणूं लागला कीं, आम्ही सत्य स्मरून श्रीचें उदक तिमाजीच्या हातावर घालतों. आमचें म्हणणें तिमाजीनें मान्य करावें. (४) नंतर बंडगराच्या मागणीवरून प्रतिनिधींनीं सातारा प्रांतां-तील वतनदारांची पंचाईत भरविली आणि त्या पंचाइतीपुढें बंडगर अगदींच खोटा ठरला. बंडगरानें तिमाजीकडून खरेदीपत्र आणि गोत-महजर असे दोन कागद करून घेतले होते. त्या कागदांवर मिरज प्रांतां-

तील वतनदारांच्या साक्षी नाहींत त्या अर्थी ते कागद खोटे आहेत असें पंचांनीं ठरविलें. ( ५ ) मुख्य गोष्ट, बंडगराला रुपयांचा भरणा शाबीत करतां आला नाहीं. प्रारंभीं बंडगर म्हणाला कीं, आपण तिमाजीच्या हातांत रोख पैसे दिले आहेत. पुढें बंडगर म्हणूं लागला कीं, आपण तिमाजीच्या हातांत रोख पैसे दिले नाहींत. तिमाजीच्या सावकाराकडे आपण परभारें भरणा केला आहे. सावकाराकडील तिमाजीचें कर्जखत आपण सोडविलें नाहीं. आपण सावकाराला मोघम रुपये दिले आहेत. बंडगराची वागणूक आणि त्याच्या बोलण्यांतील लटपट लक्षांत घेऊन पंचांनीं निर्णय दिला कीं बंडगराचे कागद रद्दबादल आहेत आणि त्याचा दावा खोटा आहे. तिमाजीनें पोळांना वतन विकलें ही गोष्टच खरी आहे. बंडगराचा वतनाशीं कांहींही संबंध नाहीं.

यानंतर प्रतिनिधींनीं पोळांना वतनासंबंधीं तीन कागद करून दिले. ते नं. ७२०९।१०।११ ला छापले आहेत. प्रतिनिधींनीं पोळांना वतनपत्र करून दिलें तें नं. ७२०९ ला छापलें आहे. त्या कागदावर प्रतिनिधींनीं आपला शिक्का केला आहे. शाहू छत्रपतींनीं पोळांना वतनाचे बाबतींत आज्ञापत्र दिलें तें नं. ७२१० ला छापलें आहे. या कागदावर बाजीराव बल्लाळ प्रधान आणि प्रतिनिधि यांचे शिक्के आहेत. प्रतिनिधींनीं पोळांना गोतमहजर करून दिला तो नं. ७२११ ला छापला आहे. या कागदावर प्रतिनिधींनीं आपला शिक्का केला आहे. पोळांनीं शाहू महाराजांकडून आगळगांव हा गांव इनाम मिळविला त्यासंबंधीं महाराजांचें आज्ञापत्र नं. ७२१३ ला छापलें आहे. त्या कागदावर बाजीराव बल्लाळ प्रधान आणि प्रतिनिधि यांचे शिक्के आहेत. प्रतिनिधींनीं पोळांना आगळगांवाबद्दल इनामपत्र करून दिलें तें नं. ७२१४ ला छापलें आहे. या कागदावर प्रतिनिधींचा शिक्का आहे. याशिवाय तिमाजीनें पोळांना देशिंग कर्यात नऊ गांवांच्या निम्में देशमुखीचें वतन खरेदी दिलें. त्याचा गोतमहजर नं. ७२१२ ला छापला आहे. याशिवाय तिमाजीचा मुलगा नरसो तिमाजी यानें पोळांना अंजनी कर्यात बारा गांवांच्या देशमुखीचें सर्व वतन खरेदी दिलें. त्याचा गोतमहजर नं. ७२०६ ला छापला आहे.

मिरज प्रांत आणि मिरजेचा किल्ला यांसंबंधीं शिवाजी बल्लाळाचा बेहडा नं. ७२१७ छापला आहे. हा बेहडा अत्यंत महत्त्वाचा आहे. पटवर्धनी अंमलापूर्वी मिरज प्रांताची काय स्थिति होती हें या कागदावरून दिसून येतें. मिरज प्रांत व किल्ला मोंगल सुभेदार महंमद दिलेलखान याच्या ताब्यांत होता, हें पूर्वी सांगितलेंच आहे. इ. स. १७३९ सालीं शाहू महाराजांनीं महंमद दिलेलखान याला मारून मिरज प्रांत व किल्ला कायमचा मराठी राज्यास जोडला. महाराजांनीं आपल्यातर्फे मिरज प्रांत व किल्ला शिवाजीराव डुबल यांचे स्वाधीन केला. डुबल आणि शाहू छत्रपति यांचा आप्तसंबंध होता. डुबल यांची स्त्री आणि शाहू महाराजांची स्त्री सकवारबाई या शिर्क्यांच्या मुली बहिणी बहिणी होत्या. डुबलांचा अंमल पंधरा सोळा वर्षे टिकला. इ. स. १७४९ सालीं शाहू महाराज कैलासवासी झाले. त्यानंतर इ. स. १७५४।५५ सालीं पेशव्यांनीं सावनूरच्या नबाबावर स्वारी केली. पेशव्यांची ही स्वारी मिरज प्रांतांतून गेली. या मार्गानें जातांना पेशव्यांनीं वाटेंत मिरज प्रांत व किल्ला डुबलाकडून काढून घेतला. पेशव्यांनीं आपल्यातर्फे शिवाजी बल्लाळ जोशी यांना मिरज प्रांताचे सुभेदार नेमिलें. शिवाजी बल्लाळ आणि पेशवे यांचा आप्तसंबंध होता. शिवाजी बल्लाळ यांची कन्या माधवराव पेशव्यांना दिलेली होती. जोशांची मुलगी वारल्यावर माधवराव पेशव्यांनीं दुसरें लग्न केलें. पेशव्यांची दुसरी स्त्री रमाबाई या महासती म्हणून इतिहासप्रसिद्ध आहेत. पुढें इ. स. १७६३।६४ सालीं मिरज प्रांत व किल्ला कायमचा पटवर्धनांच्या ताब्यांत आला.

याशिवाय पंचाइतीपुढें केलेलीं दिव्यें, दुर्मिळ पुस्तकें व औषधें, कुणबिणींचें पलायन, सुनांचे हाल, भाऊबंदी मानपानाचे तंटे, वतनाचे तंटे, अद्भुत चमत्कार, तुरुंग, दारू कलाली, मार्गांचा बंदोबस्त, मुसलमानी धार्मिक तंटे, शिपायांचे हजेरीपट, शिलेदार, गोलंदाज आणि हशम वगैरे पायदळी लोक यांच्या नेमणुका व पगार, सरकारी डांक, दारूगोळ्यांचे कारखाने, लढाईत ठार व जखमी झालेल्या शिपायांची व्यवस्था वगैरे अनेक प्रकारचे कागद या प्रकरणांत छापले आहेत. राज्यकारभाराचीं अंगें व उपांगें आणि तत्कालीन समाजस्थिति यांवर

या कागदांनीं पुष्कळ नवीन प्रकाश पडणार आहे. या ग्रंथाच्या सातव्या भागांत काशीयात्रा हें प्रकरण छापलें आहे. या प्रकरणाप्रमाणेंच हें प्रकरणही बहुविध माहितीनें भरलेलें आहे.

---

नं. ७२०६ शिक्का. (नक्कल.) ( इ. स. १७२४–२५ )

महजर बतारीख छ.

नृप शालीवाहन शके १६४६

नामसंवत्सरे तददीनीं

हर जागां बैसला स्थल श्रीदेव हनुमंत कसबे सावळज प्रांत हुकेरी सुरू सन XXX अशरीन मय्या अल्लफ सन ११ बहुजूर बहजीर मजालसी

दिवाण[1]

देशमुख व देशपांडे

अप्पाजी वलद संताजी खातवडे पटेल का। मनेराजोरी.

बगा विठल धनाजी कुलकर्णी. का। मा।र

संताजी पोवा।र पटेल मौजे वाठांबेर का। ना।झरे.

रुद्राजी पा।टील सूर्यवंशी मौजे बोरगांव.

आप्पाजी पाटील मौजे वडगांव [2]कर्यात मजकूर.

केदारजी पाटील मौजे करोली का। देसींग.

या विद्यमानें राजश्री शिदोजी पोळ वलद मालोजी पोळ पटेल मौजे दहिवडी कर्यात मलवडी व देशमुख कर्यात सावळज प्रांत हुकेरी यासी नरसो तमाजी देशमुख मामले मूर्तुजाबाद उरूफ मिरज कारणें लिहून दिलें मिरासपत्र ऐसिजे, आम्हास दिवाणानें वतनदारीकारणें दंड बांधलेवरी आम्हापासीं पैके द्यावयास मुतलक मवसर नाहींसे जाहलेवरी आम्ही तुम्हाजवळ आलों. तुमची भेटी जाहलेवरी काय निमित्य आला म्हणऊन विचारलें. दिवाणांतील दंडाचे मजकूर बयानवार सांगितलेवरी यासी काय तजवीज केले असे म्हणोन विचारलें. मग आम्ही बोलिलों कीं आमचे

---

१ पंचांची सभा. २ कर्यात = तालुका.

देशमुखी कर्यात ५ पांच आहे त्यापैकीं येक अंजनी कर्यातीचे देशमुखी कुलबाब देखील उंबली गांव तुम्हांस देतों. आम्ही करारबाज सांगतों त्याप्रमाणें पैके व जिनसाना देणें म्हणऊन सांगितलेवरी तुम्ही गोष्टी मान्यें करून आम्हीं सांगितले करारबाज बमोजीब कारियाती देहे बीतपशील.

कसबें अंजनी, मौजे गवाण, मौजे जायगवाण, मौजे वडगांव
१ १ १ १
मौजे वज्रचवंडी, मौजे सिरेढोण, मौजे वायफळे उंबली गांव मौजे जरंडी,
१ १ १ १
मौजे कुसुंबाडें, मौजे घाट नांदरें, मौजे बनूर, मौजे दहिवडी.
१ १ १ १

बारा गांवचा देशमुखीचा शिक्का मानपान तसरीफ व इनाम व हक्क लाजिमा कुलबाब कुलकानू तालुक देशमुखीचें देऊन करारबाज प्रमाणें पैके वगैरे जिनसाना तुम्हांपासून घेऊन आपलें आत्मसंतोषें मनपूर्वक मिरासीचे महजर करून दिल्हें असे. तुमचे वंशपरंपरा सूर्यचंद्र असीजे तव खाऊन कर्याती मजकुरीं भोगवटा करून सुखें असणें. हा महजर [1]सही.

---

नं. ७२०७ श्रीनिवासदयार्णव. (इ. स. १७२४।२५)

साक्षपत्र बतारीख ५ माहे रबिलावल [2]अजमहाल मा। किल्ले सातारा दरजागां माची किल्ले मजकूर. सुरू सन खमस अशरीन मय्या अल्लफ शके १६४६ क्रोधी नाम संवत्सरे मार्गेश्वर शुद्ध पंचमी मंगळवार हजीर मजालसी.

$\frac{१}{६}$

एकूण बंद साहा रास.

---

१ हा जातमहजर आहे. भोंवरगांवचे पाटील कुलकर्णी जमून त्यांच्या साक्षीनिशीं हें खरेदीपत्र झालें आहे. बमोजीब = प्रमाणें. तशरीफ = खुषीनें केलेले सन्मान. २ महाल = खासगी उत्पन्नाचें खातें. अज = पासून (from).

राजमुद्रा

राजश्री श्रीनिवास
परशुराम प्रतिनिधी.

(सूर्य) श्री (चंद्र)
श्रीआई आदिपुरुष
श्रीराजाशाहूछत्रपती
स्वामीकृपानिधी तस्य
श्रीनिवास परशुराम
प्रतिनिधी.

देशक हकनवारी महालानिहाय.

महादाजी गणेश आा देशमुख
व भगवंत सामराज गिरमाजी
शुगो देशपांडे परगणें वाई.

श्री राजाशाह
चरणीं तत्पर आा
देशमुख पा वाई
महादाजी गणेश
निरंतर.

प्रांत कऱ्हाड
जोती कृष्ण देशपांडे
प्रांत कऱ्हाड.

बाळोजी सालोंखी देशचौगुले
प्रांत कऱ्हाड व महाजन.

दारकोजीराऊ बिन चांदजीराऊ
पाटणकर देशमुख प्रांत दत्ता-
गिरी पाटण.

सटवोजी बाजी बिन मिराजी
पाटील कर्यात उंबरज प्रांत
मसूर, अंबाजी बिन उदाजी
मोहिते देशमुख का वांगी व
कसबे तलबीड प्रांत पन्हाळा.

मामले सिरकाण सरदेशमुखी
देवजी राजे सिरके बिन् पिराजी
राजे सिरके व मामले दाबूल
देशमुखी (शिक्का)

शिक्का चौकोनी

प्रांत सातारा.

| | |
|---|---|
| वाजोजी बिन संताजी घोरपडे देशमुख व बापूजी व्यंकटेश देशपांडे प्रांत मार | रामोजी बिन साबाजी गाढिवे देशमुख व बापूजी व्यंकटेश देशपांडे प्रांत मार |
| ( शिका ) | ( शिका ) |

महजर बदस्तूर बापोजी
व्यंकटेश देशपांडे तालुका
सातारा.
रुजू

प्रांत पन्हाळा देशक व देशपांडे व
मोकदमानी

शामजी नरसिंह ठाकर देशपांडे प्रांत मार

| | |
|---|---|
| संताजी बिन मकाजी पोळ मौजे अकलखोप का। बाजे प्रांत मार | भोजजी पटेल मौजे अकलखोप का। बाजे प्रांत मार |

( नि। नांगर )

| | | |
|---|---|---|
| वेंकटेश नारायण पटेल मौजे अरग कर्यात बेडग कुलकर्णी कसबे मने-राजुरी ( नि। नांगर ) | गोपाळ प्रल्हाद कुलकर्णी मौजे साळवी व मौजे पिसवी कर्यात सातवे प्रा। मार १ | हणग ठाकूर मौजे अकलखोप १ |
| फिरगोजी रायाजी चव्हाण देशमुख का। आटपाडी ( नि। नांगर. ) | पा। वाळवें शामजी तुलजो कुलकर्णी का। मजकूर. | |

आनंदराऊ[1] रायाजी व त्रिंबक
साबाजी व महिपतराऊ बयाजी
देशपांडे का। आटपाडी प्रांत माण
दहिगांऊ का। बाहें.

---

१ देशपांडे; कुलकर्णी हे साक्षर असत. ते कागदावर आपला दस्तुर करीत.

या विद्यमानें जाहलें साक्षपत्रीं ऐसे जे. शिदोजी पोळ बिन मालोजी पोळ देशमुख कर्यात कवठे महांकाळ हे हुजूर साताराचे मुक्कामीं राजश्री पंतप्रतिनिधी स्वामी यासी येऊन विदित केलें कीं मा। तिमाजी वेंकटाद्री देशमुख मामले मूर्तजाबाद यांनीं आपलें वतन देशमुखी पैकीं कर्यात कवठें महांकाळ देखिल देहाय सुमार १५ पंधरा कर्यात निम्में देशमुखी तिमाजी वेंकटाद्री यांनीं द्रव्य व घोडीं व ऐन जिन्नस घेऊन कर्यात पैकीं निम्में वतन देशमुखी आपणास दिल्हें. त्याचें खरीदपत्र व महजर माहलीं करून दिलें. तीं पत्रें व तिमाजी वेंकटाद्री हजर आहे याचे साक्ष गोताचे विद्यमानें मनास आणोन आपणास दुमालेपत्र निम्में देशमुखी कर्यात कवठे महांकाळ येथील देणें व गोतांचें विद्यमानें साक्ष-पत्र दिलें पाहिजे म्हणोन राजश्री पंतप्रतिनिधी स्वामीस विनंती केली त्यावरून राजश्री पंतप्रतिनिधी स्वामी यांनीं गोतसभा जाहला यास आज्ञा केली कीं, तिमाजी वेंकटाद्री देशमुख मामले मूर्तजाबाद यांनीं खुश रजावरीनें खुशखरेदी वतन पोळांनीं घेतलें असलें तरीं तुम्हीं उभययांस उभे करून साक्ष मोइयानिशीं कागदपत्रा व खरेदीपत्र व महजर मनास आणून तिमाजी वेंकटाद्री याचे मोइयानिसी शिदोजी बिन मालोजी पोळ याचें वतन खरें जाहलीया साक्षपत्र गोताचें करून देणें. त्यावरून सदरहू गोतसभा जाहला. यानीं तिमाजी वेंकटाद्री देशमुख मामले मुर्तजाबाद यास विचारलें कीं तुम्हीं सिदोजी बिन मालोजी पोळ याजपासून पैके घेऊन वतन कर्यात कवठें येथील देशमुखी निम्मी दिली आहे त्याचें खरीदी-पत्र आहे व महजर करून दिला आहे. तरी हे गोष्टी तुमचे रजावदीनें जाहली असले तरी आम्ही आपले गोताचें साक्षपत्र पोळ मजकुरास देऊं. त्यावरून तिमाजी वेंकटाद्री यांनीं गोतापुढें उत्तर दिलें कीं, आपणावरी दिवाणीचा कसाला पडिला व करारत पैके पडिले. ते आपणास द्यावयास मवसर नाहीं. या सबब आपलें आत्मसंतोषें कर्यात कवठें महांकाळ आपलें वतन देशमुखी तेथें जाऊन सिदोजी पोळ यास आपली हकी-गत व नातवानी सांगितलेवरी कसबे व कर्यात मारचे पाटील कुलकर्णी यांचे साक्षीनें खरीदीपत्र करून दिल्हें. त्यांनीं पैके कबूल केले ते पैके आपण घेऊन बीतपशील.

| नक्त रुपये, | कापड रुपये, | घोडीं सुमार, | म्हैसी सुमार, | गाई सुमार, |
|---|---|---|---|---|
| २२५० | ५०० | ४ | १० | २५ |
| साडे बावीसशे रु. | पांचशें रु. | | | |

| बैल सुमार, | जोरी खंडी, | लग |
|---|---|---|
| २५ | १० | ० |

येणेंप्रमाणें नक्त व घोडीं सुमार चार, म्हैसी सुमार दहा, गाई सुमार पंचवीस, बैल सुमार पंचवीस, जोरी खंडी दहा येणेंप्रमाणें घेऊन आत्मसंतोषें कर्यात कवठे देहाय १५ पंधरा निम्में आपण व निम्मे सिदोजी बिन मालोजी पोळ यास वतन देशमुखी करार करून खरीदीपत्र व महजर करून दिला तो खराच आहे. यास अन्यथा नाहीं. देशमुखीचे सिक्का त्याचा त्यांनीं करावे. आपला सिक्का आपण करावे. बगा, पान, तश्रीफ घ्यावे व वतनाचे हक्क लाजिमा इनाम व बाहेजमा उभामार्ग विस्वांव सिक्याचे लाजिमा जो असेल तो तारे तारे दोनी ठाईं आम्ही उभयतांनीं घ्यावे. ऐसे करार करून यास वतनपत्र करून मजहर दिला आहे. तो खरा ऐसे साक्ष तिमाजी वेंकटाद्री याचे गोताचे विद्यमानें जाहले. मग सिदोजी बिन मालोजी पोळ याचे देशमुखी कर्यात कवटे महांकाळ येथील निम्मे देशमुखी खरी व नि॥ देशमुखी तिमाजी वेंकटाद्री देशमुख मामले मूर्तुजाबाद यांणीं निम्मे देशमुखी हक्क लाजिमा व इनाम व [1]मोतर्फा व [2]विस्वा उभामार्ग व [3]फसकी व पानें बैसला तांबोळी व बाजे काईदे रुसूम जाबीताप्रमाणें कदीम व जदीद यानीं दोन्ही ठाई निम्मे निम्मे प्रमाणें उभयतांनीं खावें. दिवाणांत मान पान ताश्रिफा बा॥ घेऊन देशमुखीचा कारभार तिमाजी वेंकटाद्री व सिदोजी बिन मालोजी पोळ यांनीं देशमुखीचा कारभार उभयतांचे वंशपरंपरा लेकराचे लेकरीं वतन अनभवून सुखें असावें. यास जो कोणी उभयतांत सदर लिहिलेप्रमाणें यास जो दिगर करील तो आपले बापाचे दुखमाचा नव्हे.

१ किरकोळ करांचें उत्पन्न. २ जकात. ३ धान्यरूपानें कर.

ऐ. ले. सं. १५-५१

याप्रमाणें सदरहू गोताचे विद्यमानें जाहलें साक्षपत्र. सहीवली सुमार बेरीज सरनामा व साक्षी करून वली सुमार ७० सत्तरीं रास[1].

राजते
गोल शिक्का लेखना-
वधी.

---

नं. ७२०८ श्री. (इ. स. १७२४।२५)

महजर बतेरीख छ. १२ माहे जिल्काद नृप शालवान शके १६४७ प्रवर्तमाने क्रोधीनाम संवत्सरे श्रावण शु. त्रयोदशी इंदुवासरे तादिनीं दरजागा बैसला स्थळ श्रीदेव हणमंत का। कोकटनूर नजीकतलेसंग सरकार द्दारुलजफर बिजापूर सु॥ खमस अशरैन मय्या अल्लफ स. ११३४ बिहुजूर हर्जीर मजालसी.

दिवाण.

देशमुख व देशपांडे—येसूबाई कोम बावाजी वल्लद सेटियाजी लखमोजी चव्हाण देसाई परगणे जत व परगणे करजगी व परगणे बरडोल

---

१ सातारा प्रांतांतील वतनदारांचें हें साक्षपत्र आहे. वतन खरेदी-विक्री-व्यवहारांत प्रारंभीं खरेदीपत्र होत असे. (नं. ७२१५।१६ पहा.) पुढें भोंवर-गांवच्या वतनदारांची पंचाईत भरून ती या खरेदीपत्राला मान्यता देत असे. पंचांच्या या मान्यतापत्राला जातमहजर किंवा गोतमहजर असें म्हणत असत. (नं. ७२०८ पहा.) नंतर या वतनखरेदीच्या खासगी व्यवहाराला सरकार-दरबारीं मान्यता येण्याकरितां सरकारचें दुमालेपत्र किंवा वतनपत्र मिळवावें लागे. (नं. ७२०९।१० पहा.) सरकारी दुमालेपत्र मिळालें म्हणजे हा खरेदी-विक्रीचा व्यवहार पुरा होत असे. कवठें महांकाळच्या देशमुखीच्या बाबतींत तिमाजी देशमुख आणि सिदोजी बंडगर यांमध्यें सरकार दरबारीं वाद उत्पन्न झाला त्यामुळें सरकारी हुकमावरून सातारा प्रांतांतील वतनदारांची पंचाईत भरून तिनें तिमाजी देशमुख आणि सिदोजी पोळ यांनीं केलेल्या व्यवहाराला मान्यता देणारें हें साक्षपत्र करून दिलेलें आहे. हें साक्षपत्र म्हणजे एक प्रकारचा गोतमहजर होय.

व परगणे होनवाड. पत्र प्रमाण. साक्ष. ( शिक्का. )

परगणे कोकटनूर—राइगौडा वल्लद विठगौडा देसाई व नाडगौडा परगणे कोकटनूर व मामले तेरदळ. स्वदस्तुर ब्रिडो रायाजी कुलकर्णी.

( शिक्का. )

परगणे तेरदाळ—पासप्पा मोघपा देसाई परगणे मजकूर. हें पत्र महजर सही. गोही सही बा। कासो सामा मुजुमदार राजश्री देसाई पा। मजकूर. रायगौडा दरयागौडा पा। मजकूर बा। बिष्टो हणमाजी मुतालीक नाडगौडा पा। तेरदाळ. गोपाळ तिमाजी देशपांडे परगणे तेरदाळ. पत्रप्रमाण साक्ष.

---

(शिक्का.)

---

कृष्णो गिर्मल देशपांडे पा। जंबखडी. साक्ष.

परगणे अथणी—भोजराज सिधराज पवार देशमुख पा। मजकूर. शिक्का. आपाजी वेंकाटी देसाई. परगणे मजकूर.

पाटील कुलकर्णी देहेवदेही.

कवठें महांकाळ—हरमाजी बिन शेटियाजी पाटील. सुलतानजी बिन बाळाजी पाटील. नि। नांगर. आपाजी गंगाधर कुळकर्णी कसबें मजकूर.

मौजे कोकळें कर्यात कवठें महांकाळ. मौजें हिंगणगाऊ. रायाजी पोवार मौजें हिंगणगाऊ. मौजें रांजणी का। कवठें महांकाळ. शिवजी वल्लद विठोजी पवार पटेल नि। नांगर. रायाजी तुकदेऊ कुळकर्णी. धोंडजी वल्लद शिवजी भोसले पटेल नि। नांगर. सुभानजी वल्लद हरमाजी भोसले पटेल नि। नांगर. तमाजी शंकर कुळकर्णी.

कर्यात देशिंग—तुळजगौडा पटेल बिन पेयगौडा पटेल का। मजकूर. नि। नांगर. मौजें करोली क. देशिंग— केदारजी पटेल मौजे मजकूर नि। नांगर.

ब्रसवप्रभु वा। जखगौडा पटेल मौजें मलाबाद व अंजूर व मौजें कट-

कोड. पत्रप्रमाण साक्ष. नि नांगर. बा नरसो जाऊजी कुळकर्णी मौजे मलाबाद.

मौजे उफळापूर परगणे जत—विठोजी वल्लद मकाजी पटेल मौजे मजकूर. पत्रप्रमाण साक्ष. नि नांगर. बावाजी वल्लद शेटियाजी चव्हाण पटेल मौजे मजकूर. पत्रप्रमाण साक्ष. नि नांगर. शिवजी नीळकंठ कुळकर्णी मौजे मजकूर. खंडशेटी वल्लद पेनाशेटी शेटे पेठ मजकूर. शिवपा खेमशेटी महाजन पेठ मजकूर.

परगणे होनवाड दारुलजफर विजापूर—बसव्वा पटेलणी का होनवाड पा मजकूर. साक्ष सही. शिक्का. जाखो लिंगोजी कुळकर्णी का मजकूर.

पेयगौडा पटेल का पडवती व मौजे खाऊली. पत्रप्रमाण साक्ष सही. शिक्का. रायाजी बाबाजी कुळकर्णी मौजे मजकूर. पत्रप्रमाण साक्ष. सही.

या विद्यमानें राजश्री सिदोजी पोळ बिन मालोजी पोळ पटेल मौजे दहिवाडी का मलेवाडी व सावळज पा हुकेरी यांस तिमलराऊ वेंकटाद्रि देशमुख मामले मुर्तुजाबाद उर्फ मिरज कारणें लिहोन दिलें मिराशीपत्र

(शिक्का) ऐसा जे—आम्हांवरी दिवाणाचे कसाला पडोन करारत पैके पडिले. ते आम्हास देवयास मयसर एकंदर नाहींसें जाहलें. या सबब आम्ही कसबें कवठें महांकाळ आपलें वतन देशमुखी तेथें येऊन तुम्हापाशीं आलों. आपली नातवानी सांगोन करारनामा, मोकरर करोन कसबें कविठें महांकाळ येथील देशमुखी निमे व इनाम हक्क लाजिमा पानमान व शिक्का व कुलबाब व कुलकानू देखील कसबें देहे सुमार पंधरा तपशील— पंधरा गांवींचि नित्यानित्य देशमुखी देवोन करारनामाप्रमाणें पैके व घोडीं वगैरे जिन्नसाना घेवोन दिवाणामध्यें आपली खलाशी करोन घेतली. नित्यानित्य देशमुखी खावोन आपले वतनावरी वौशपरंपरा सूर्य चंद्र आसिजे तव भोगवटा घालोन सुखें असणें. आपलें आत्मसंतोषें पैके घेवोन वतन दिलें असे. यासी अन्यथा नाहीं. कायावाचामनें दिलें. हा महजर मिराशीचे. सही. शिक्का. बलुते—दानपा बिन सैदापा सुतार का मजकूर निशाण तासणी.

---

नं. ७२०९ श्री. (इ. स. १७२४।२५)

श्री
श्री आई आदि पुरुष
श्री राजा शाहू छत्रपती
स्वामी कृपानिधी तस्य
श्रीनिवास परशराम
प्रतिनिधी.

छ मा। अनाम सिदोजी बिन मालोजी पोळ देशमुख कर्यात कवठें महांकाळ प्रांत मिरज यासी श्रीनिवास परशराम प्रतिनिधी सुरू सन खमस अशरीन मयया व अलफ दिलें वतनपत्र ऐसाजे, तुम्ही साताराचे मुक्कामीं हुजूर येऊन विदित केलें कीं, तिमाजी वेंकटाद्री देशमुख प्रांत मजकूर यांनीं आपले घरास कोकटनूरचे मुक्कामीं येऊन बोलिले कीं, आपणास कर्जवाम झालें व दिवाणांतील कसाला पडला आहे. त्यास आपणापासी टक्का पैका सना बसरी नाहीं. आपला नातवानीचा प्रसंग आहे. ऐसीयासी आपलें देशमुखीचें वतन आहे. त्यापैकीं कर्यात कवठें महांकाळ देहे सुमारें १५ पंधरा बीतपसील.

१ कसबे कवठें. १ मौजे हिंगणगाऊ. १ मौजे घुळगाऊ. १ मौजे रांजणी. १ मौजे खिळेगाऊ. १ मौजे पांडेगाऊ. १ मौजे कोकिले. १ मौजें इरली. १ मौजें अलकोड. १ मौजें नागोल. १ मौजें अगलगाऊ. १ मौजें कुची. १ मौजें जाखापूर. १ मौजें कुंडलापूर. १ मौजें वाघोली.

एकूण देहे पंधरा पैकीं निम्मे देशमुखीचें वतन आपले आत्मसंतोषें तुम्हास विकत देतों. तुम्ही वतन घेऊन आपणास पैका देऊन कर्जापासून व दिवाणाच्या कसालियापासून मुक्त करणें. त्यावरून आम्ही मनास आणून तिमाजी वेंकटाद्री देशमुख प्रांत मजकूर यासी दिल्हें. बीतपशील.

नगद रुपये २२५०, कापड रुपये ५००, घोडे ४, म्हसी १०, गाई २५, बैल सर २५, गल्ला जोरी खंडी १०, येणेंप्रमाणें रुपये साडेबावीसशेहे व कापड रुपये पांचशाचें व घोडे चार व म्हैसी दहा व गाई पंचवीस व बैले पंचवीस व गल्ला सोळुले मापें जोरी खंडी दहा ऐसे देऊन कर्यात मजकूरचे देशमुखीचें निम्में वतन खुश रजावदीनें आपण खरेदी केलें आहे. त्याचें खरेदीपत्र तिमाजी वेंकटाद्री देशमुख याचे सिकियानिसीं व गोताचे साक्षीनसीं शके १६४६ क्रोधीनाम सवत्सरे श्रावण शु॥ त्रयोदशी इंदुवासर छ. १२ जिल्काद लिहोन घेतलें आहे व गोतांचा महजर माहालीं केला. तो ऐसे दोन कागद आपणापासीं आहेत.

तो स्वामींनीं पाहून व तिमाजी वेंकटाद्री देशमुख व त्याचे भाऊबंद हजीर आहेत त्याचे रुजू मोइया मनास आणून वतनसंबंधें आपले माथां जीवन माफिक सेरणी करार करून कर्यात मजकूरचे निम्मे देशमुखीचें वतन आपले दुमाला करून दुमालपत्र व सनदा करून घेऊन आपले वंशपरंपरेनें वतन चालविलें पाहिजे म्हणऊन विनंती केली. त्यावरून तुम्हांपासीं देशमुखीच्या वतनाचें खरेदीपत्र व गोताचा महजर होता तो तुम्हीं आणून दाखविला व तिमाजी वेंकटाद्री व त्याचे भाऊबंद याचा रुजूमोइया आणून केला. त्यावरून कर्यात मजकुरचें देशमुखीचें निम्में वतन तुम्हास त्यांनीं आपले खुश रजावदीनें विकत देऊन सदरहूप्रमाणें ऐवज तुम्हापासून तिमाजी वेंकटाद्री यांनीं घेतला; तुम्ही सदरहू लिहिलेप्रमाणें ऐवज त्यास देऊन त्यापासून खुश रजावदीनें वतन खरीदी केलें हें खरें जाणोन तुम्हावरी कृपाळू होऊन कर्यात कवठें महांकाळ देखील कसबा देह पंधरा येथील देशमुखीचें वतन तिमाजी वेंकटाद्री देशमुख याच्या खरीदीपत्राप्रमाणें निम्में वतन तुमचे दुमाला केलें असे. पेशजीं सिदोजी बिन तावजी बंडगर वा। सलगरे परगणे रायबाग याणें महंमद दिलेल मिरजेमध्यें राहतो त्याकडे आपला कारकून रामाजी नरसी पाठवून अनुसंधान केलें कीं, कर्यात कवठें महांकाळ येथील देशमुखीचें वतन आपणास देवणें. आपण टका पैका तुम्हास देऊं. त्यावरून महमद दिलेल यानें तिमाजी वेंकटाद्री देशमुख मिरजेमध्यें होता त्यास धरून नेऊन बंदीं घातला आणि त्याचें घर कैद केलें. तेव्हां देशमुखीचे सिके घेऊन गेले. ते महंमद दिलेल याणें आपणापासीं ठेविले होते त्यावरी रामाजी नरसी याणें रदबदल करून महंमद दिलेल यासी टका पैका देऊन तिमाजी वेंकटाद्री याचें नांवें खरीदीपत्र सिदोजी बंडगराचे नांवाचें लिहून घेतलें. त्यावरी महंमद दिलेल यापासीं तिमाजी वेंकटाद्री याचे देशमुखीचे सिके होते ते करून घेतले व गोताचा महजर करून घेतला त्यावरी माहालच्या व मौवरगांवचे व कसबें मिरजेतील वतनदारांच्या साक्षी घातल्या नाहीं. वस्तवादगी लोकांच्या साक्षी घालून तिमाजी वेंकटाद्री यासी बंदखानाहून न सोडवितां खरीदीपत्र व महजर रामाजी नरसिंह घेऊन सिदोजी बंडगर यांजवळी आले. तेथून सिदोजी बंडगर हुजूर साताराचे मुक्कामीं आले

आणि विदीत केलें कीं, कर्यात कवठें येथील देशमुखीचें वतन तिमाजी वेंकटाद्री देशमुख प्रांत मिरज यांणीं आपलें खुशरजावदीनें आपणांस विकत दिलें आहे. त्याचें खरेदीपत्र व मजहर आपणाजवळी आहे. तो मनास आणून देशमुखीच्या वतनाचें दुमालपत्र आपल्या नांवें करून दिल्हें पाहिजे. म्हणऊन बंडगरांनीं अर्ज केला. हें वर्तमान तिमाजी वेंकटाद्री कोकटनूरीं होते त्यांस कळलियावरी संभाजी पोळ हुजूरदर्शनास आले. त्या समागमें तिमाजी वेंकटाद्री याणीं आपला चुलता तमाजी अण्णाजी यासी हुजूर पाठविलें त्यावरी तमाजी अण्णाजी येऊन उभा राहिला आणि बोलिला कीं, आपलें वतन सिदोजी बंडगर यानें तिमाजी वेंकटाद्री यासी मिरजेमध्यें बंदखानीं घालून महंमद दिलेल यापासीं अनुसंधान करून देशमुखीचें वतन जोरावारीनें घेतलें आहे. तिमाजी वेंकटाद्री याणीं आत्मसंतोषें बंडगरापासून टका पैका व मालयेत घेऊन वतन दिल्हें नाहीं. बंडगराची आपली मनसुभी करावी. त्यावरी सिदोजी बंडगर यासी पुसिलें कीं, याचा मजकूर काय आहे तो सांगणें. त्यास सिदोजी बंडगर बोलिला कीं, तिमाजी वेंकटाद्री यास आपण दोन हजार रुपये देऊन त्याचे खुशरजावदीनें खरीदीपत्र देशमुखीच्या वतनाचें घेतलें आहे हें आपण त्याचे मुखें खरें करून देऊं म्हणून बोलिला. त्यावरी बंडगरास आज्ञा केली कीं, तिमाजी वेंकटाद्री यासी तुम्ही घेऊन येणें. त्याच्या मुखें तुम्हांस वतन दिलें हें खरें जाहलीयावरी दुमालपत्रें करून देऊं. त्यास बंडगर बोलिले कीं, आपणास तिमाजी वेंकटाद्री येत नाहीं. त्याचे चुलते आहेत त्यांस सांगोन आणवावें. त्यावरी बंडगरास आज्ञा केली कीं, तुम्ही कतबा लिहून देणें कीं, तिमाजी वेंकटाद्री आलियावरी ते सांगतील त्याप्रमाणें आपण मान्य आहों. त्यावरून बंडगरांनीं कतबा लिहून दिल्हा. त्याउपरी तमाजी अप्पाजी यासी आज्ञा करून तिमाजी वेंकटाद्री यासी कोकटनुराहून आणविलें. ते हुजूर आलियावरी तिमाजी वेंकटाद्री यासी करिना पुसिला. त्यांनीं सांगितलें कीं, बंडगरानीं आपणास मिरजेंत बांदेखानियांत घालून जोरावारीनें वतन लिहोन घेतलें आहे. आपण सिदोजी बंडगर यासी देखिलें नाहीं व त्यापासून टका पैका व मालयेत व विडा वस्त्रही घेतलें नाहीं. आपणास हा वतनाचा मजकूर ठाऊक नाहीं. आणि आपले रजा-

वदीनें वतन त्यास दिलें नाहीं म्हणऊन बोलिले. त्यावरी बंडगर बोलिले कीं, आपणास गोत देणें. गोतमुखें निवाडा होईल त्याप्रमाणें आपण वर्तणूक करूं. त्यावरून देशमुख देशपांडे परगणे वाई व परगणे कऱ्हाड व राजश्री रामराऊ दादाजी देशमुख तर्फ कडे प्रांत कडेवलीत व प्रांत सातारा येथील देसक व राजश्री शामजी नरसिंह देशपांडे प्रांत पन्हाळा वगैरे महालो महालचे वतनदार ऐसें गोत बैसऊन सिदोजी बंडगर व तिमाजी वेंकटाद्री याचा इनसाफ करावयाची आज्ञा केली. त्यावरी हरदुजणाचे करीने गोतानें लिहून घेऊन सिदोजी बंडगर यापासीं खरीदपत्र व महजर होता तो आणविला. तो पाहतां महजरावरी महालच्या व भोवरगांवच्या व कसबें मिरजेच्या वतनदारांच्या साक्षी नाहींत. मिरजेमध्यें वस्तब्रादगी लोक आहेत त्यांची साक्ष महजरावरी होती. ते पाहोन महजर लटका ऐसें जाहलें. खरीदीपत्राचा मजकूर मनास आणितां तिमाजी वेंकटाद्री यांनी तकरीर केली कीं, आपणास बंडगरांनीं मिरजेमध्यें बंदखानीं घालून जोरावारीनें महंमद दिलेल यापासून खरीदीपत्र करून घेऊन वतन घेतलें. आपण सिदोजी बंडगर देखिला नाहीं व त्याचा टका पैका व मालयेत विडावस्त्र आपण घेतलें नाहीं. आपणावरी जोरावरी केली आहे. ऐसी तकरीर केलीयावरी खरीदीपत्रही जोरावरीचें दिसून आलें. त्यावरून गोतमतें सिदोजी बंडगर खोटा जाहला. त्यासी वतनासी संबंध नाहीं. ऐसा निवाडा जाहालयावरी याचें निवाडपत्र आलाहिदा करून गोताचें दिल्हें आहे. सिदोजी बंडगर यापासीं पेशजीचें खरीदीपत्र व वस्त्रब्रादगी मिरजतील लोकांचा महजर आहे तो व या वतनाविसीं आणखी जे कागदपत्र असतील ते रद्द असत. हल्लीं तुम्हास तिमाजी वेंकटाद्री देशमुख प्रांत मजकूर यानीं आपलें आत्मसंतोषें कर्यात कवठें महांकाळ येथील पंधरा गांवांपैकीं निम्मे देशमुखीचें वतन तुम्हास खुश रजावदीनें विकत दिलें आहे त्याचें खरीदीपत्र व गोतांचा महजर तुम्हापासीं आहे त्याप्रमाणें तुम्ही सदरहू कर्यात मजकूर देशमुखीचें वतन आपले पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें अनुभवीत जाणें. देशमुखीच्या वतनास हक्क लाजिमा पानमान तश्रीफा इनाम सेव धार फसकी घरवाडा पूर्वापार चालिलेप्रमाणें निम्मे तिमाजी वेंकटाद्री घेतील व निम्में तुम्हीं घेत जाणें. वतनास सिक्का तुम्ही

आपल्या नांवें करावा. कारभार देशमुखीचा व कानू काईदे निमेनिम तुम्ही करून वतन अनुभवीत जाणें. या निम्मे वतनसंमंधें तुमच्या माथां सेरणी बा कबूल कतबा रुपये १००० एक हजार करार करून हुजूर वसूल घेतला असे. छ. ५ राबिलावल. निदेश समक्ष.

गोल शिक्का — राजते लेखना- वधी.

---

नं. ७२१० श्री. (इ. स. १७२४।२५)

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ५१ क्रोधी संवत्सरे मार्गशीर्ष बहुल नवमी मंदवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी याणीं—राजश्री

सूर्य (श्री) चंद्र राजा शाहू नरपति हर्षनिधान बाजीराव बल्लाळ मुख्य प्रधान.

सूर्य (श्री) चंद्र श्री आई आदिपुरुष श्रीराजा शाहू छत्रपति कृपानिधि तस्य श्रीनिवास परशराम प्रतिनिधि.

देशाधिकारी व लेखक वर्तमान व भावी सुभा प्रांत मिरज यांसी आज्ञा केली ऐसी जे. सिदोजी बिन मालोजी पोळ देशमुख कर्यात कविठें महांकाळ प्रांत मजकूर याणीं किल्ले साताराचे मुक्कामीं हुजूर येऊन विनंती केली कीं तिमाद्री वेंकटाद्रि देशमुख प्रांत मजकूर याणीं आपल्या घरास कोकटनूरचे मुक्कामीं येऊन बोलिले कीं आपणास कर्जवाम जाहलें व दिवाणांतीलही कसाला पडला आहे. त्यास आपणापाशीं टका पैका मवसर नाहीं. आपला नातवानीचा प्रसंग आहे. ऐसीयास आपुलें देशमुखीचें वतन आहे त्यापैकीं कविठें महांकाळ देहे सुमार बितपशील— १ कसबें कविठें, १ मौजें हिंगणगाऊ, १ मौजे धुळगांव, १ मौजे रांजणी, १ मौजें खिळेगाऊ, १ मौजें पांडेगांव, १ मौजें कोकिळे, १ मौजें इरली, १ मौजें अळकोड, १ मौजें नागोल, १ मौजें आगळगाऊ, १ मौजें कुची, १ मौजें जाखापूर, १ मौजें कुंडलापूर, १ मौजे वाघोली. एकूण

ऐ. ले. सं. १५-५२

देहे पंधरा पैकीं निम्मे देशमुखीचें वतन आपले आत्मसंतोषें तुम्हांस विकत देतों. तुम्ही वतन घेऊन आपणांस पैका देवून कर्जापासोन व दिवाणाचे कसालियापासोन मुक्त करणें. त्यावरोन आम्ही मनास आणोन तिमाजी वेंकटाद्रि देशमुख यांस दिल्हे बितपशील– नगद रुपये २२५० कापड रुपये ५००, घोडे चार, म्हैसी दहा, गाई पंचवीस, बैल सर २५, गल्ला खंडी दहा येणेंप्रमाणें रुपये साडेबावीसशे, कापड रुपये पांचशाचें, घोडे चार व म्हैसी दहा व गाई पंचवीस व बैल पंचवीस व गल्ला जोरी सोळुलें मापें दहा खंडी ऐसे देऊन कर्यात मजकूरचें देशमुखीचें निम्में वतन खुषरजावदीनें आपण खरेदी केलें आहे. त्याचें खरेदीपत्र तिमाजी वेंकटाद्रि देशमुख प्रांत मजकूर याचे शिकियानिशीं व गोताचे साक्षीनिशीं शके १६४६ क्रोधी नाम संवत्सर श्रावण शुद्ध त्रयोदशी इंदुवासर छ. १२ जिल्काद लिहोन घेतलें आहे व गोताचा महजर महालीं केला तो ऐसे दोन कागद आपणापाशीं आहेत ते स्वामींनीं पाहून व तिमाजी वेंकटाद्रि देशमुख व त्याचे भाऊबंद हालीं हजोर आहेत त्यांचे रुजू मोझ्या मनास आणोन वतनसंबंधें आपले माथां जीवन मार्फीक शेरणी करार करोन का माचें निम्मे देशमुखीचें वतन आपलें दुमाला करून दुमालेपत्र व सनदा करून देवोन आपले वंशपरंपरेनें वतन चालविलें पाहिजे. म्हणोन विनंती केली त्याजवरोन याजपाशीं देशमुखीच्या वतनाचें खरेदीपत्र व गोताचा महजर होता तो याणीं आणोन दाखविला व तिमाजी वेंकटाद्रि व त्याचे भाऊबंद यांचा रुजू मोझ्या आणोन केला त्यावरोन कर्यात मा चें निम्में देशमुखीचें वतन यास त्याणीं खुषरजावदीने विकत देवोन सदरहूप्रमाणें ऐवज याजपासोन तिमाजी वेंकटाद्रि याणीं घेतला, याणीं सदरहू लिहिल्याप्रमाणें ऐवज त्यास देवोन त्यापासोन सिदोजी पोळ यांणीं खुषरजावदीनें वतन खरेदी केलें हें खरें जाणोन सिदोजी पोळ याजवरी स्वामी कृपाळु होऊन का कविठें महांकाळ देखील कसबें देहे १५ पंधरा येथील देशमुखीचे तिमाजी वेंकटाद्रि देशमुख यांचे खरेदीपत्राप्रमाणें निम्में वतन यांचे दुमाला केलें असे. पेशजी सिदोजी बिन तावजी बंडगर वस्ती सलगारें परगणे रायबाग याणें महंमद दिलेल मिरजेमध्यें राहतो त्याकडे आपला कारकून रामाजी नरसी पाठवून अनुसंधान केलें कीं का कविठें

महांकाळचे देशमुखीचें वतन आपणास देविणें. आपण टका पैका तुम्हास देऊ. त्यावरोन महंमद दिलेल याणें तिमाजी वेंकटाद्रि देशमुख मिरजेंत होता त्यास धरोन नेऊन बंदीं घातला आणि त्याचें घर कैद केलें. तेव्हां देशमुखीचे शिक्के घेऊन गेले. ते महंमद दिलेल याणें आपणापाशीं ठेविले होते. त्यावर रामाजी याणें रदबदल करोन महंमद दिलेल यास टका पैका देऊन तिमाजी वेंकटाद्रि याचे नांवें खरीदपत्र सिदोजी बंडगराचे नांवचें लेहोन घेतलें. त्यावरी महंमद दिलेलपाशीं तिमाजी वेंकटाद्रि याचे देशमुखीचे शिक्के होते ते करोन घेतले व गोताचा महजर करून घेतला. त्यावरी म्हालच्या व भोंवरगांवच्या व का मिरजेंतील वतनदारांच्या साक्षी घातल्या नाहींत. वस्तबादगी लोकांच्या साक्षी घालोन तिमाजी वेंकटाद्रि यास बंदखान्यांतून न सोडवितां खरीदीपत्र व महजर रामाजी नरसिंह घेऊन सिदोजी बंडगर याजवळ आले. तेथोन सिदोजी बंडगार साताराचे मुक्कामीं हुजूर आले आणि विदित केलें कीं कर्यात कविटें येथील देशमुखीचें वतन तिमाजी वेंकटाद्रि देशमुख पा मजकूर याणीं आपले खुषरजावदीनें आपणास विकत दिलें आहे. त्याचें खरेदीपत्र व महजर आपणाजवळ आहे तो मनास आणोन देशमुखीच्या वतनाचें दुमालेपत्र आपल्या नांवें करोन दिल्हें पाहिजे. म्हणोन बंडगरांनीं अर्ज केला. हें वर्तमान तिमाजी वेंकटाद्रि कोकटनुरीं होते त्यांस कळलियावरी संभाजी पोळ हुजूर दर्शनास आले. त्यासमागमें तिमाजी वेंकटाद्रि याणीं आपला चुलता तमाजी आणाजी यांसी हुजूर पाठविले. त्यावरी तमाजी आणाजी उभा राहिला आणि बोलिला कीं आपलें वतन सिदोजी बंडगर याणीं तिमाजी वेंकटाद्रि यांस मिरजेमध्यें बंदखानीं घालोन महंमद दिलेल यापाशीं अनुसंधान करोन देशमुखीचें वतन जोरावरीनें घेतलें आहे. तिमाजी वेंकटाद्रि याणीं आत्मसंतोषें बंडगरापासोन टका पैका व मालयेत घेऊन वतन दिल्हें नाहीं. बंडगराची आपली मनसुबी करावी. त्यावरी सिदोजी बंडगरास पुसिलें कीं याचा मजकूर काय आहे तो सांगणें. त्यास सिदोजी बंडगर बोलला कीं तिमाजी वेंकटाद्रि यास आपण दोन हजार रुपये देवोन त्याचे खुषरजावदीनें खरेदीपत्र देशमुखीच्या वतनाचें घेतलें आहे. हें आपण त्याचे मुखें खरें करून देऊं. त्यावरी बंडगरास आज्ञा

केली कीं तिमाजी वेंकटाद्रि यांस तुम्ही घेऊन येणें. त्याच्या मुखें तुम्हास वतन दिलें हें खरें जाहलिल्यावर तुम्हास दुमालेपत्र करोन देऊं. त्यास बंडगर बोलला कीं आपणांस तिमाजी वेंकटाद्रि येत नाहीं. त्यांचे चुलते आहेत त्यांस सांगोन आणावें. त्यावरोन बंडगरांस आज्ञा केली कीं तुम्हीं कतबा लिहोन देणें कीं तिमाजी वेंकटाद्रि आलियावरी ते सांगतील त्याप्रमाणें आपण मान्य आहों. त्यावरोन बंडगरांनीं कतबा लिहोन दिला. त्यावरोन तमाजी आणाजी यांस आज्ञा करोन तिमाजी वेंकटाद्रि यांस कोकटनुराहून आणविलें. ते हुजूर आले. त्यावरी तिमाजी वेंकटाद्रि यांस करीना पुसिला. त्याणीं सांगितलें कीं बंडगरांनीं आपणास मिरजेंत बंदीखानियांत घालोन जोरावरीनें वतन लेहोन घेतलें आहे. आपण सिदोजी बंडगर यास देखलें नाहीं व त्यापासोन टक्का पैका मालयेत व विडा वस्त्रही घेतलें नाहीं. आपणांस हा वतनाचा मजकूर ठाऊक नाहीं. आणि आपले रजावंदीनें वतन त्यास दिलें नाहीं म्हणोन बोलिले. त्यावर बंडगर बोलले कीं आपणास गोत देणें. गोतमुखें निवाडा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करूं. त्यावरी देशमुख देशपांडे परगणे वांई व कऱ्हाड व राजश्री रामराव दादाजी देशमुख तर्फ कडें प्रांत कडेवलित व प्रांत सातारा येथील देशक व रा शामजी नरसिंह देशपांडे प्रांत पन्हाळा वगैरे महालोंमहालचे वतनदार ऐसे गोत बैसवोन सिदोजी बंडगर व तिमाजी वेंकटाद्रि यांचा इन्साफ करावयाची आज्ञा केली. त्यावरोन हरदू जणांचे करीने गोतानें लिहोन घेवोन सिदोजी बंडगर यापाशीं खरीदीपत्र व महजर होता तो आणाविला तो पाहतां महजरावरी महालच्या व भोवरगांवच्या व का मिरजेच्या वतनदारांच्या साक्षी नाहींत. मिरजेमध्यें वस्तवादगी लोक आहेत त्यांची साक्ष महजरावरी होती. तें पाहोन महजर लटका ऐसें जाहलें. खरीदीपत्राचा मजकूर मनास आणितां तिमाजी वेंकटाद्रि याणीं तकरीर केली कीं आपणास बंडगरांनीं मिरजेमध्यें बंदखानीं घालोन जोरावरीनें महंमद दिलेल यापासोन खरेदीपत्र करून घेऊन वतन घेतलें. आपण सिदोजी बंडगर देखिला नाहीं व त्याचा टक्का पैका व मालयेत विडा वस्त्र आपण घेतलें नाहीं. आपणावरी जोरावरी केली आहे. ऐसी तकरीर केलियावरी खरीदीपत्रही जोरावरीचें दिसोन आलें. त्यावरोन गोतमतें

सिदोजी बंडगर खोटा जाहला. त्यास वतनाशीं संबंध नाहीं ऐसा निवाडा जालियावर याचें निवाडापत्र अलाहिदा करोन गोताचें दिलें आहे. सिदोजी बंडगर याजपाशीं पेशजीचें खरीदीपत्र व वस्तबादगी मिरजेंतील लोकांचा महजर आहे तो व या वतनाविशीं आणखी जे कागद असतील ते रद्द असत. तरी तुम्ही तिमाजी वेंकटाद्रि देशमुख प्रांत मजकूर याणीं आपले आत्मसंतोषें कर्यात कविठें महांकाळ येथील पंधरा गांवपैकीं निम्मे देशमुखीचें वतन सिदोजी बिन मालोजी पोळ यांस खुषरजावदीनें विकत दिलें आहे. त्याचें खरेदीपत्र व गोताचा महजर यांजपाशीं आहे. त्याप्रमाणें पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें चालवणें आणि दंडकप्रमाणें यांजपासोन वतनाची सेवा घेत जाणें. सदरहू देशमुखीच्या वतनास हक्क लाजिमा मानपान तश्रीफ इनाम सेवा धार फसकी घरवाडा पूर्वापार चाललेप्रमाणें निम्मे तिमाजी वेंकटाद्रि घेतील व निम्मे सिदोजी बिन मालोजी पोळ यांस देणें. निम्मे वतनास शिक्का सिदोजी पोळानें आपल्या नांवें करावा. का मजकूरच्या देशमुखीचे कानुकायदे निम्मे निम्मे प्रमाणें उभयतां घ्यावे. या निम्मे वतनासंबंधें सिदोजी पोळाचे माथां शेरणीबद्दल कबूलकुतबा रुपये १००० एक हजार करार करोन त्याचा वसूल [१]जिल्हेकडे होईल. या पत्राची प्रती लेहोन घेऊन अस्सल पत्र भोगवटियास सिदोजी पोळ यासी परतोन देणें. जाणीजे. लेखनालंकार.

मर्यादेयं
विराजते.

रुजू सुरणीस. सम्मत मंत्री. सम्मत सरकार. बार. सूद. सुरु. सूद. बार. बार. बार.

लेखन
सीमा.

---

नं. ७२११    श्रीनिवासदयार्णव.    (इ. स. १७२४–२५)

महजर बतारीख ५ माहे रबिलावल. [२]अज महाल किल्ले सातारा

---

१ अज = पासून. पंचमीचा प्रत्यय. २ जिल्हा = तालुक्याचा वसूल.

सुरू सन खमस अशरीन मय्या व अलफ शके १६४६ क्रोधी नाम संवत्सरे मार्गेश्वर शुद्ध पंचमी मंगळवार सन ११३४ तदीनीं हजीर मजालसी या बे- हुजूर हजीर मजालसी.

राजमुद्रा.

राजश्री श्रीनिवास परशराम प्रतिनिधी

श्री

श्री आई आदि पुरुष
श्री राजा शाहू छत्रपती
स्वामी कृपानिधी तस्य
श्रीनिवास परशराम
प्रतिनिधी

देशक हकनवारी महालानिहाय

महादाजी गणेश अगा- देशमुख व भगवंत साम- राज व गिरमाजी झुगो देशपांडे परगणें वाई.

प्रांत कऱ्हाड.
जोती कृष्ण देशपांडे प्रांत कऱ्हाड.
बाळोजी सालोजी देशचौगुले व महजन प्रांत कऱ्हाड.

श्री राजा शाहू चरणीं
तत्पर आा देशमुख
पाा वाई. महादाजी
गणेश निरंतर.

सटवोजी बाजी पाटील बिन मिराजील कर्यात उंबरज परगणे मजकूर

द्वारकोजी राऊ बिन चांदजी राऊ देश- मुख प्रांत दत्तागिरी, पाटण.
आबाजी बिन उबाजी मोहिते देशमुख पाा वांगी व कर्यात तलबीड प्रांत पन्हाळा.

शिक्का.

प्रांत सातारा
वजोजी बिन संताजी घोरपडे देशमुख व बापूजी वेंकटेश देशपांडे प्रांत मजकूर.
( शिक्का चौकोनी. )

रामोजी बिन साबाजी गाढीवे देशमुख व बापूजी वेंकटेश देशपांडे प्रांत मजकूर.
( शिक्का गोल. )

प्रांत पन्हाळा देशक व मोकदमः—
शामजी नरसिंह ठाकरे देशपांडे प्रांत मजकूर.
संताजी बिन मकाजी पटेल मोजें अक्कलखोप.
भोजी पटेल मौजे अक्कलखोप. प्रांत मजकूर.

महजर बदस्तूर बापूजी वेंकटेश देशपांडे तर्फ सातारा रुजू पत्र प्रमाण.

गोपाळ प्रल्हाद कुलकर्णी मौजे सालसी व मौजे दिसवी कर्यात सातवे प्रांत १ मार

हणगोजी ठाकूर मौजे अक्कलखोप. १

मामले शिरकाण सरदेशमुखी. देवजी राजे सिरके बिन पिलाजी राजे सिरके व मामले दाबूल देशमुखी.

( पिलाजीराव शिरके ) शिक्का

परगणे वाळवे शामजी कुजो कुलकर्णी का मार.
( नि खास दस्तुर. )

फिरंगोजी रायाजी देशमुख कर्यात आटपाडी.
( नि नांगर )

वेंकटराव नारायण पाटील मौजे आरग कर्यात बेडग कुलकर्णी कसबे मने राजुरी.
( नि नांगर )

आनंदराऊ रायाजी व त्रिंबक साबाजी व माहिपतराऊ बयाजी देशपांडे कर्यात आटपाडी प्रांत माण दहीगाऊ का १०

---

या विद्यमानें राजश्री तिमाजी वेंकटाद्री देशमुख मामले मुर्तजाबाद उर्फ मिरज यास महजर करून दिला ऐसा जे. राजश्री सिदोजी बिन

तावजी बंडगर मौजे सलगरे प्रांत रायबाग यांनीं हुजूर साताराचे मुक्कामीं येऊन राजश्री पंतप्रतिनिधी स्वामी संनिध येऊन विदित केलें राजश्री तिमाजी वेंकटाद्री देशमुख प्रांत मिरज सरकार मुर्तजाबाद यापासून आपण खुषखरेदी रजावदीनें कर्यात कवठें महांकाळ देखील कसबें एकूण देहाय १५ आपण वतन करून घेतलें. त्याचे कागद आपणापासीं आहेत ते मनास आणून आपणास दुमालेंपत्र दिलें पाहिजे म्हणून विनंती केली. त्यावरून राजश्री पंतप्रतिनिधी यांनीं बंडगर मजकुरास आज्ञा केली कीं, वतनाचा खावंद तिमाजी वेंकटाद्री देशमुख यानें तुम्हास वतन कर्यात कवठे महांकाळ येथील देशमुखी खुशरजावदिनें महजर करून दिला असेल. त्याजवरी परगणे मजकूरचे पाटील व पटवारी यांचे साक्ष होऊन महजर करून दिला असिला तरी तिमाजी वेंकटाद्री देशमुख यांचे विद्यमानें खुशखरेदी ऐसें रुजू मोझा करून देणें. त्यावरून दुमालेंपत्र करून दिलें जाईल. त्यावरी बंडगर मजकूर सातारियास जाऊन कागदपत्र वतनाचे करून घेतात असें वर्तमान तिमाजी वेंकटाद्री देशमुख यास कळलेवरी त्यांनीं आपला चुलता तमाजी अण्णाजी यास राजश्री पंतप्रतिनिधी स्वामीपासीं पाठविलें. मग सिदोजी बंडगर यास सदरेस बोलाऊन आणून साक्ष मोझ्या मनास आणीत तमाजी अण्णाजी यानें तकरार केली कीं, कर्यात कवठें महांकाळ येथील देशमुखी खुश रजावदीनें आपण अगर आपला पुतण्या तिमाजी वेंकटाद्री यानें सिदोजी बंडगर यास वतन खुश रजावदीनें कांहीं दिलें नाहीं. यांनीं दिलेलखान यास मिळोन आपलें वतन जोरावारीनें आपले पुतण्या तिमाजी वेंकटाद्री यांजपासून बलात्कारें घेतलें. ये गोष्टीचे साक्ष मोझ्या मनास आणून बंडगर मजकुरास कागदपत्र देणें म्हणोन तकरार केली. त्यावरी राजश्री पंतप्रतिनिधी स्वामी यांनीं सिदोजी बंडगर यास विचारलें कीं, तुम्ही येऊन विदित केलें कीं आपण खुश रजावदीनें खरेदी वतन करून घेतलें हें खरें करून देऊन ऐसा बोलला होता आणि तिमाजी वेंकटाद्री याचा चुलता यानें तकरार केली कीं, आपलें वतन कर्यात कवठें महांकाळ देशमुखी आपणावरी जोरावरी करून दिलेलखानाचे पासून घेतलें. आपण याचा टक्का पैका अगर कांहीं मालयेद घेऊन आपण अगर आपला

पुतण्या यानें वतन दिलें नाहीं. ऐसी तकरार केली. ये गोष्टीचा काय विचार आहे? त्यावरून बंडगर मजकूर बोलिला कीं, वतनाचा खावंद तिमाजी वेंकटाद्री देशमुख सिकियाचा खावंद त्यानें आपणास देशमुखी दिली. ते खुषरजावदीनें दिल्हें. आतां तिमाजी वेंकटाद्री देशमुख स्वामी-पासीं येऊन सत्यपूर्वक येऊन सांगेल त्याप्रमाणें आपण वर्तोन या गोष्टीस भेदीगर करूं तरी गोतांचे अन्याई म्हणोन लिहून दिलें. त्यावरी तिमाजी वेंकटाद्री यास घेऊन येणें म्हणोन आज्ञा केली. त्यावरून सिदोजी बंडगर बोलला कीं, तो आपणापासीं नाहीं. कोकटनुरीं आहे. त्याचा चुलना तमाजी अण्णाजी हजर आहे त्यास ताकीद करून आणविलें पाहिजे. ऐसे बंडगर मजकूर बोलिलेवरून तमाजी अण्णाजी यास आज्ञा केलीं कीं, तुझा पुतण्या वतनाचा खावंद त्यास हजीर करावें. तो आपले वडिलांचे बेतालीस स्मरून सांगेल त्यास बंडगर मजकूर राजी आहेत. तुझे साक्षीस राजी नाहींत. त्यावरून तमाजी अण्णाजी यानें तिमाजी वेंकटाद्री यास आणावयास मुदत रोज १२ केली. मुदतीप्रमाणें तिमाजी वेंकटाद्री यास हजर केलें. मग सिदोजी बंडगर यास मजालसीस बोलाऊन आणून बंडगर मजकुरास पुसिलें कीं, तुम्हीं करार केला होता कीं, तिमाजी वेंक-टाद्री सत्यपूर्वक सांगेल त्याप्रमाणें आपण मान्य. तरी आतां तिमाजी वेंकटाद्री यांजवरी सत्यसुकीत नर्ककुंड वोढून त्यांत उभें करून जें तो आपले वडिलांचे बेताळीस स्मरोन सांगेल तें तुम्ही ऐकोन वर्तणें. त्यावरून निर्वा(ह) करून मग ते गोष्टी बंडगर मजकूर यानें मान्य करून तिमाजी वेंकटाद्री यांस मंडळांत उभें करून विचारलें. त्यावरून तिमाजी वेंकटाद्री यानें शपथपूर्वक तकरीर केली कीं, सिदोजी बंडगर याची आपली भेटी अथवा बोलीचाली नाहीं व त्यापासून आपण पानाचा विडा अथवा वस्त्र पांघरूण व एक रुपया अगर कांहीं एक मालयेद घेतली नाहीं. आपण यास वतन आत्मसंतोषें दिलें नाहीं. यांनीं दिलेलखान यासी अनुसंधान करून आप-णास कैद करऊन हाणमार करून जोरावारीनें वतनाचे कागद करून घेतला. आपणास बंदीखानीं घातलें ते समई आपलें घर कैद करून तमाम लुटून नेलें ते समयीं देशमुखीचा शिक्का आपला घेऊन गेले. आपणास

मार करून कागद लिहून घेतला त्यावरी त्यांनींच सिक्का केला. आपण सिक्का केला नाहीं. आणि बंडगरांनीं दिलेलखानास काय दिलें हें आपणास दखल नाहीं. कागद लिहून देतेसमयीं बंडगराकडील कारकून रामाजीपंत आला होता. त्यास आपण बोलिलों होतों कीं, तुम्ही जोरावारीनें मार करऊन कागद घेतां तो चालणार नाहीं. परंतु हे गोस्टी न ऐकतां कागद घेतला. आपणास सोडविलेंही नाहीं. आपण तैसेच बंदखानीं होतों. त्यावरी मागती सिदोजी बंडगर यांनीं दिलेलखानासी राजकारण करून कयाजी पांढरे यास देशिंग कर्यातीचे देशमुखीचे कागद जैसे आपण घेतले त्याप्रमाणें पांढरे मजकूरास कागद जोरावारीनें करून देविले. त्यावरी आपण कांहीं दिवस बंदखानी होतों. मग आपला चुलता अपाजी देशमुख कोकटनुरीं राजश्री संभाजी पोळ याजपासीं होता. त्यास सांगून पाठविलें कीं, आपणावरी जोरावरी करून बंडगरांनीं कागद घेतले आहेत तरी तुम्ही संभाजी पोळ यास सांगोन कर्यात कवठे येथील वाडा हुडा बलाऊन राखोन सिदोजी बंडगराचे पैवस्तगी होऊन न देणें म्हणोन सांगोन पाठविलेवरी आपण बंदखानीहून पळोन बाहीर पडलों. आपण खुश रजावदीनें बंडगरास वतन दिलें नाहीं अगर त्याचे पैके घेतले नाहीं. यांनीं मध्येंच दिलेलखानासी सुलुख करून वतनाचे कागद करून घेतले. यास आपले वतनासी तालुका नाहीं. ऐसें तिमाजी वेंकटाद्री यानें शपथपूर्वक मंडळांत उभे राहून आदि अवसान करीना सांगितला. मग राजश्री पंतप्रतिनिधी स्वामी यांनीं सिदोजी बंडगर यांस विचारलें कीं, तुम्ही करार करून लेहून दिलें कीं तिमाजी वेंकटाद्री शपथपूर्वक सांगेल त्याप्रमाणें आपण वर्तोन म्हणून करार केला तरी आतां तुम्हीं वतन बळें घेतलें ऐसें ठरलें. वतनाचा खावंद तिमाजी वेंकटाद्री ज्यापासून कागद घेतले त्याचे साक्ष शपथपूर्वक जाहलीं कीं, तुम्हास आपण वतन खुश खरेदी टका पैका घेऊन आपण वतन दिलें नाहीं. जोरावारीनें वतन घेतलें ऐसे शपथपूर्वक तक्रार केली. येणेंप्रमाणें मजालसी याचे विद्यमानें तिमाजी वेंकटाद्री याचे साक्ष जाहली यावरून तुम्हास वतनासी संबंध नाहीं..येविसीचें उत्तर काय तें देणें. मग सिदोजी बंडगर यानें विनंती केली कीं, आपणास गोत देणें. गोतमुखें इनसाफा होईल त्याप्रमाणें आपण रजावद असों. त्यावरून राजश्री पंतप्रतिनिधी

स्वामींनीं गोतसभा जाहला. देशमुख व देशपांडे व मोकदम परगणें वाई व परगणे कऱ्हाड व तर्फ कडे प्रांत कडेवलीत व प्रांत पन्हाळा व प्रांत सातारा यांजवरी इनसाफा टाकिला. मग सदरहू गोत हजर मजालसीस बैसून उभयतांस गोतानें विचारिलें कीं, तुम्ही गोतमुखें इनसाफा होईल त्यास राजी असलिया करीना सांगणें. त्यावरून उभयतां सिदोजी बंडगर व तिमाजी वेंकटाद्री राजी होऊन आपला करीना सांगितले. त्यावरून सदरहू करीना मनास आणून गोतानें वासपुस केली बीतपशील. की कलम सिदोजी बंडगर यानें तकरीर केली कीं, आपण पैके देऊन खुश रजावदीनें तिमाजी वेंकटाद्री याजपासून वतन घेतलें त्यावरून गोतसभा जाहला. यांनीं विचारिलें कीं, तुम्ही याचे कर्जदारास पैके देऊन वतन घेतलें तरी कर्जदारास पैके दिले. तेव्हां याचा कतबा तुम्हीं काहडून घेतला असेल तो कतबा दाखवणें म्हणोन विचारिलें. त्यास सिदोजी बंडगर बोलिला जे आपणापासी कतबा नाहीं अगर याजपासी पैका आपण दिला नाहीं. परभारें दिल्हा. ऐसें सिदोजी बंडगर याचे मुखें खरें जाहलें. तेव्हां गोताचें मत जाहलें कीं, रास्ती साहूकराचा कतबाही नाहीं अगर पैके वतनाच्या खावंदास दिल्हा नाहीं. तेव्हां यांनीं वतन घेतलें तें लटिकें. यास वतनासी निसबत नाहीं. कलम १.

की कलम सिदोजी बंडगर यांनीं कागद करून घेतला तो गोतानें मनास आणितां असें जाहलें कीं मिरजेमधील वस्तवादगी लोक यांचें साक्ष मात्र व कागद देशपांडे यांचे हातीचा नव्हे अगर देशपांडे यांचे दस्तक नाहीं व परगणें मजकूर गोत पाटील पटवारी यांचे साक्ष नाहीं व कर्यात कवठे महांकाळ कर्यातीचे मोकदमाचे गुजारतीनें घेतलें नाहीं अगर वतनाचा खावंद तिमाजी वेंकटाद्री यानें आपले हातें सिक्का करून दिले नाहीं ऐसे उभयतांचे रुजू मोझ्यानिसीं खरें जहालें. तेव्हां कागद केले ते बातील. वतनासी बंडगर मजकुरास तालुका नाहीं. कलम १.

की कलम सिदोजी बंडगर यांनीं सदरहू तकरीर केली कीं, आपण तिमाजी वेंकटाद्री देशमुख पासून खुशखरेदी वतन कर्यात मजकूरचें घेतलें तें तिमाजी वेंकटाद्री याचे साक्षीनें खरें करून देऊन जरी खरें करूं न सकों तरी वतनास निसबत नाहीं. त्यावरून तिमाजी वेंकटाद्री याजवरी

राजश्री पंतप्रतिनिधी यांनीं सत्य घालून मंडळ ओढून विचारलें. त्यात तिमाजी वेंकटाद्री आपले वडिलांचे बेताळीस स्मरोन बोलिले कीं आपण याजपासून टका पैका अगर कांहींएक मालयेद घेऊन वतन खुद्द खरेदी रजावदीनें दिलें नाहीं तेव्हां बंडगर मजकुरास वतन कर्दात मजकूरचे यास नि: नाहीं. कलम १.

मग पंचाईत गोतसभा जाहला यांनीं सदरहू कलमें उभयतांचे वियमानें मनास आणून गोतानें व सभा जाहला महापरिक्षित यांनीं चर्चा केली कीं वतन खावंद तिमाजी वेंकटाद्री याचें वतन त्यापासून वतन घेतलें. त्यास पैका दिला नाहीं अगर बंडगर बोलत होते कीं, याचे कर्जदारास पैका दिला त्याचा कतबा साहूकाराचे घरचा पैका देऊन तुम्ही कतबा घेतला असेल तो दाखवणें. त्यावरून मोइदा मनास आणून म्हणोन बोलिलेवरी सिदोजी बंडगर यांनीं बोली केली कीं, आपण कतबा काहाडिला नाहीं अगर आपणापासीं साहुकाराचे घरचा कतबा नाहीं ऐसे बोलिलेवरी दिसोन आलें कीं कर्जदाराचे पैसे लटिके. पैका दिल्हा म्हणतात तोहीं खरा लटिका. ऐसे कळत नाहीं. बोलविण्याला (!) नाहीं अगर तिमाजी वेंकटाद्री यांस बंदखानाहून सोडऊन त्यास बाहेर काहाडून त्याचे कांहींएक गोष्टीनें बहुमान वस्त्र पांघरूण दिलें नाहीं अगर पाटील पटवारी यांची साक्ष घेऊन वस्त्र पांघरूण दिलें नाहीं तेव्हां यांनीं वतन घेतलें, तिमाजी वेंकटाद्री यांनीं दिल्हें ही गोष्ट पंचाईत गोतांचे वियमानें गलत जाहली. तिमाजी वेंकटाद्री यांनीं तकरीर केली कीं आपण वतन बंडगर मजकुरास खुद्द रजावदीनें दिलें नाहीं अगर त्याचा पैका देखिला नाहीं म्हणोन श्रीचें उदक बंडगराचे हातीं घालून म्हणोन कबूल केलें आणि बंडगर मजकूर राजी जाहले. मग ते गोष्टी मागती बंडगर नाकबूल जाहले. आपण पाणी देत नाहीं आपण वतन खरेदी केलें म्हणोन पाणी घालऊन तरी मनास आणितां रुजू मोइयानें साक्षपूर्वक वतन घेतलें नाहीं. याचें पाणी घ्यावयास तिमाजी वेंकटाद्रीस संबंध नाहीं. योतांडपणें पाणी घालावयास बंडगर राजी जाहले. गोतांचे मतें सिदोजी बंडगर यांनीं पाणी तिमाजी वेंकटाद्री पाणी घ्यावयास नि नाहीं. यांनीं दिलेल्यान याचे बळें कागद जोरावरीनें घेतले. त्याचें पाणी ×× बंडगर मजकुरास वतनासी संबंध नाहीं. वतन

तिमाजी वेंकटाद्री याचें खरें. सिदोजी बंडगर यास कर्यात मजकुरचें वतन देशमुखीसी अर्थाअर्थी सबंध नाहीं व मिरजेमध्यें सिदोजी बंडगर यांनीं कागदपत्र केले ते खोटे कागद. × × येणेंप्रमाणें गोतसभा जाहला. यांचें साक्षीनें जाहला. महजर.

राजते
सही लेखना————————
वधी

---

(इ. स. १७२०।२१)

नं. ७२१२ (शिका) (¹तालीक.)

महजर बतेरीख छ — नृप शालिवाहन शके १६४१ वर्तमाने — नाम संवत्सरे — तादिनीं दरजागां बैसला श्रीहणमंत देव कसबे कोकटनूर नजीक तलेसंग सरकार दारुल जाफर बिजापूर सु अशरीन मय्या व अल्लफ स. ११ बिहुजुर मजालशी

दिवाण

देशमुख देशपांडे पाटील पटवारी
लक्षुमी आवा देसाईण नाडगौडा साकीन कोकटनूर.
नरसिंगराऊ तिमराऊ देशपांडे सा. कोकटनूर.
बिडो रायाजी कुलकर्णी क. मजकूर. राचगौडा पाटील मौजे सत्ती.
नरहरपंत कुलकर्णी. नंदीगौडा पाटील मौजे नंदेश्वर.
लखगौडा पटेल मौजे नंदगाऊ बाा तमाजी राम कुलकर्णी मौजें मजकूर.
सखप्पा पाटील मौजें शिरटी बाा कृस्णापा कुळकर्णी मौजें मजकूर.
बनवगौडा वल्लद सखगौडा पटेल मौजें म्हैसपडीगी बेाा जखप्पा कुळकर्णी मौजें मजकूर. संताजी पोवार पटेल मौजें बातंबर कर्यात नाझरें बेाा कुसाबा कुळकर्णी.

या विद्यमानें राजश्री सिदोजी बिन मालोजी पोळ पाटील मौजें दहिवाडी कर्यात मलवाडी व देशमुख कर्यात साऊळज यांसी तिमलराऊ

---

१ तालीक = नक्कल.

वेंकटाद्रि देशमुख मामले मुर्तुजाबाद उर्फ मिरज कारण लिहोन दिलें मिराशी पत्र ऐसा जे. आम्हास दिवाणानें हजूर बोलावून तकशीर लाविली जे तुम्ही मामले मजकूरचा देशमुख असा. आपले तालुकातीचे कर्यातीचे जमाबंदी चुकवणें म्हणोन जीवनमाफीकाशिवाय जबरदस्त खंडणी घातलेवरी कबूल केलों. खस्त करवून आपले जिम्मेस कर्यातींत उसूल घेतला. त्या उसुलानें दिवाणचे रुपये फारीख झाले नाहींत. मग आम्हावरी तनखा पठाणांचा झाडियानिशीं केले. त्यास आमचे प्राणांचे गिन्हायेक जाहलेवरी येक कर्यातीचें निम्मे देशमुखी विकिलेयावाचून आमचा गळा मोकळा होत नाहीं म्हणोन तजवीज करोन तुम्हापाशीं येऊन आपले करीना सांगितला जे आमचे मिराशीवरी दिवाणानं जमाबंदी जबरदस्त बांधिले. उसूलती जीवनमाफीकाशिवाय खस्त करुन उसूल घेतला. परंतु त्यानं दिवाणाचे पैका फारीख झाले नाहीं. आपुले देशमुखीचे कर्याती असत त्यापैकीं कर्यात देशिंगचे निम्मे देशमुखी तुम्हांस देतों. आम्ही करार बेरीज सांगतों त्याप्रमाणें करारदाज पैके नगद व जिन्नसाना देणें. ते दिवाणामध्यें देऊन आपुले वतनावरी काईम राहूं. म्हणोन सांगितले उपरी आम्हास तुम्हास करारनामा झालेप्रमाणें तुम्ही पैके नगद वगैरे जिन्नसाना आम्हास दिलेवरी तुम्हांस देशिंग कर्यातीचे देशमुखी निम्मे व शिक्का व पानमान तश्रीफ व इनाम हक्लाजिमा कुलबाब कुलकानू दिलें असे. देहे सुमार बितपशील—

१ मौजें देशिंग. १ मौजें हरोली. १ मौजें कोगनोळी. १ मौजें कुकटोळी. १ मौजें करोली. १ मौजें खराशिंग. १ मौजें सराटी. १ मौजें अळकोड. १ मौजें म्हैसाळ.

येणेंप्रमाणें कसबे देखील गावच नित्यानित्य देशमुखी देऊन तुम्हापासोन करारदाज बरहुकूम नगद व जिनसाना घेऊन आपले आत्मसंतोषें मनपूर्वक निम्मे देशमुखी दिलें असे. तें तुमचे वंशपरंपरा पुत्रपौत्री सूर्यचंद्र आसिजे तोपर्यंत वतनाचा भोगवटा करोन सुखी असणें. हा लिहोन दिला मिराशीचा महजर. सही.

नं. ७२१३ श्री. (इ. स. १७२४।२५)

स्वस्ती श्री राज्याभिषेक शके ५१ क्रोधी संवत्सरे मार्गशीर्ष बहुल पंचमी भोमवासरे क्षत्रिय कुलावंतस श्री राजा शाहू छत्रपती स्वामी याणीं मोकदमानी मौजे आगळगांव कर्यात कवठे महांकाळ प्रांत मिरज यासी आज्ञा केली ऐसीजे. सिदोजी बिन मालोजी पोळ देशमुख निम्मे कर्यात मजकूर याणीं स्वामी संनिध

| | | |
|---|---|---|
| सूर्य श्री चंद्र | सूर्य श्री चंद्र | |
| राजा शाहू नरपती हर्षनिधान बाजीराव बल्लाळ मुख्य प्रधान | श्री आई आदि पुरुष श्री राजा शाहू छत्रपति स्वामी कृपानिधी तस्य श्रीनिवास परशराम प्रतिनिधी | |

किल्ले साताराचे मुक्कामीं येऊन विनंती केली कीं, कर्यात मजकूर येथील निम्मे देशमुखीचें वतन आपलें आहे. वतनसंबंधी [1] दिवाणची सेवा बहुत आपणास पडते. ऐशास आपणास निम्मे देशमुखीच्या वतनास एक गांव इनाम देऊन वंशपरंपरेनें चालविलें पाहिजे म्हणून. त्यावरून मनास आणून हे वतनदार निम्मे देशमुखीचे वतनामुळें याजवरी दिवाणचे चाकरीचा कसाला पडतो. याजकरितां यांचें चालवणें अवश्यक जाणून स्वामी याजवरी कृपाळू होऊन मौजे मजकूर पेशजीच्या मुकासियांकडून दूर करून हल्लीं कुलबाब कुलकानू देखील हाली पट्टी व पेस्तर पट्टी खेरीज हक्कदार यासीं व यांचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम करून दिला असे. तरी तुम्ही याचे रजा-तलब वर्तोन मौजे मजकूरचा ऐवज आकार प्रमाणें देत जाणें. प्रतिवर्षी नूतन पत्राचा आक्षेप न करणें. या पत्राची प्रती लेहोन घेऊन हें पत्र भोगवटीयासी मशारनिल्हेकडे परतोन देणें. लेखनालंकार.

मर्यादेयं
राजते.

रुजू सुरणीस. सा मंत्री. सम्मत सरकार.
तेरीख १८
रबिलावल सुरु सन खमस अशरीन
बार सुद. सुरू सुद बार बार बार.

---

१ दिवाण = सरकार.

नं. ७२१४ श्री. ( इ. स. १७२४।२५ )

सूर्य श्री चंद्र
श्री आई आदिपुरुष
श्री राजा शाहू छत्रपती
स्वामी कृपानिधी तस्य
श्रीनिवास परशराम
प्रतिनिधी

५ मशरुल अनाम सिदोजी बिन मालोजी पोळ देशमुख कर्यात कवठें महांकाळ प्रांत मिरज यांसी. श्रीनिवास परशराम प्रतिनिधी सुरू सन खमस अशरीन मय्या व अल्लफ. तुम्ही हुजूर किल्ले सातारीयाचे मुकामों येऊन विनंती केली कीं, आपण वतनदार वतनामुळें दिवाणची चाकरी बहुत पडती. ऐशियास आपल्या निम्मे देशमुखीच्या वतनास एक गाऊ इनाम देऊन वंशपरंपरेनें चालवावें म्हणून विनंती केली त्यावरून मनास आणून तुम्ही वतनंदार दिवाण चाकरीचा कसाला बहुत पडतो. याकारितां तुमचें चालवणें अगत्य जाणून तुम्हांवरी कृपाळू होऊन मौजे आगळगाऊ कर्यात मजकूर हा गाऊ पेशजीच्या मुकासियाकडून दूर करून हल्लीं मौजे मजकूर कुलबाब कुलकानू निम्मे देशमुखीस इनाम दिला असे. तरी मौजे मजकुरीं पूर्वमर्यादेप्रमाणें चतुःसीमापूर्वक तुम्ही आपले दुमाला करून घेऊन खेरीज हक्कदार इनाम पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें अनभऊन सुखरूप राहाणें जाणीजे. छ. ५ राबिलावल. निदेश समक्ष.

राजते
सुरु सुद बार. लेखना-
वधी.

---

नं. ७२१५ श्री. (तालीक.) ( इ. स. १७२४।२५ )

राजश्री त्रिमलराऊ वेंकटाद्री देशमुख सरकार मुर्तुजाबाद गोसावी यांसी करारनामा सिदोजी पोळ व खेतरोजी पोळ व सुभानजी पोळ व संभाजी पोळ पटेल मौजे दाहिवाडी कर्यात मलवाडी व सावळज प्रांत हुकेरी सु खमस मय्या व अल्लफ स. ११३४ कारणें लिहोन दिल्हे करारपत्र ऐसा जे. कसबे मुर्तुजाबादीं तुम्ही असतां महंमद दिलेल यासी सिदोजी बंडगर व कयाजी पांढरे याणीं दोन्ही हजार रुपये द्यावे करून तुम्हास धरोन बैसवोन जुलूम करोन लिहोन घेतलेवरी तुम्ही तेथोन निघोन का कविटें

महांकाळेस येऊन आमचे भेटीस आला. आम्हावरी येणेंप्रमाणें जुलूम जाहले म्हणोन वर्तमान सांगोन आम्ही तुम्ही का कविठें महांकाळेचे देशमुखीचे मिराशी भाऊ होऊन असावें म्हणोन सांगितलेवरी आम्हास तुम्ही ज जे मुद्दे सांगितले ते आम्हीं कबूल केले बितपशील.

१ कसबें कविठें महांकाळेचे वाडाहुडा बांधोन तुम्ही आम्ही असावें. कलम.

१ कापड पांचशे रुपयेचें द्यावें. कलम.

१ देसाईचें लग्न करावें. कलम.

१ नक्त रुपये २२५० मो सव्वा दोनी हजार द्यावे. कलम.

१ घोडीं चारी द्यावें. बैल सुमार पंचवीस द्यावे. गाई सुमार पंचवीस द्यावे. म्हैशी सुमार दहा द्यावे. कलम.

१ जोरी खंडी दहा द्यावे. कलम.

१ तुमचे देशमुखीचे अंमलास मदत करावे. कलम.

१ सिदोजी बंडगर व कयाजी पांढरे यांचे अंमल चालू न द्यावे. कलम.

येणेंप्रमाणें आम्ही समाधानपूर्वक कबूल केलेवरी तुम्हीं आपले रजावंदीनें दिलें कर्यात कविठें महांकाळेचें निम्में देशमुखी इनाम व हकलाजिमा व पानमान व कुलबाब व कुलकानू नित्यानित्य देऊन तेणेंप्रमाणें आम्हास मिरासपित्र लिहोन दिलें असे. त्याप्रमाणें आम्ही मिराशी खाऊन कराराप्रमाणें कार्य करून देऊं.

---

नं. ७२१६ श्रीवेंकटेश. ( इ. स. १७२४।२५ )

खरीदीपत्र बतारीख छ. १२ माहे जिल्काद. नृप शालिवाहन शके १६४७ प्रवर्तमाने क्रोधीनाम संवत्सरे श्रावण शुद्ध त्रयोदशी इंदुवासरे तादिनीं दरजागां बैसला स्थळ का कोकटनूर नजदीक तलेसंग सरकार विजापूर बो सिदोजी वल्लद मालोजी पोळ मौजे दाहिवाडी कर्यात मलवाडी व कसबें सावळज परगणे हुकेरी वासी फुरोक्तपत्र बो तिमलराऊ वेंकटाद्री देशमुख सरकार मुर्तुजाबाद उर्फ मिर्जे सु॥ ११३४ कारणें लिहोन दिला फुरोखत पत्र ऐसाजे. कर्यात काविठे महांकाळचे देश- शिक्का

ऐ. ले. सं. १५-५४

मुखी आपले आत्मसंतोषें खुष रजावदीनें निम्मे तुम्हास विकत दिलें. आजी सबब आपणावरी दिवाणाचा दंड पाडिला, पैके द्यावयास मवसर नाहीं, आपला मामला नातवान, किती एक कसाला यामुळें तुम्हांपासोन घेतले बितपशील—

नक्त रुपये २२५० कापड रुपये ५०० घोडीं सुमार ४ म्हैशी सुमार १० गाई सुमार २५ बैल सुमार २५ जोरी कैली खंडी १० गलगा— येणेंप्रमाणें तुम्हापाशीं घेऊन आपुले देशमुखी कर्यात मजकूरची निम्मे वतन मिराशी करून दिल्हा असे. देहे बदेहे बितपशील.

१ का कविठें मजकूर. १ मौजें हिंगणगाऊ. १ मौजें रांजणी. १ मौजें धुळगाऊ. १ मौजें खिळेवाडी. १ मौजें पांडेगाऊ. १ मौजें कोकील. १ मौजें अळकोड. १ मौजें इराली. १ मौजें वाघोली. १ मौजें आगळगांव. १ मौजें कुची. १ मौजें जाखापूर. १ मौजें कुंडलापूर. १ मौजें नागोळ.

एकूण पंधरा गांवीचे देशमुखीचे हक दक रुसूम बेडकी शिक्का व नाव व इनामती व विश्वा पानमान तश्रीफ दिवाणांतील व परगणेंतील व राजिते म्हार व पडद व दरघाणेस तेल व कोष्टी याची पासोडी दर मागास व धनगराचे मागास घोंगडी व फसकी वगैरे कुलबाब कुलकानू अवघे निम्मे तुम्हास व निम्मे आम्हांस ऐसे दोनी टायीं नित्यानित्य करार करून तुम्हास निम्मे देशमुखी दिला असे. कसबा मजकुरीं वाडा हुडा बांधोन तुम्ही आम्ही राहावें. आपले भोगवटा लेकराचे लेकरीं चंद्र सूर्य असिजोपर्यंत निम्मे देशमुखी वतन मिरासी खाऊन सुखी असणें. वतनामुळें × × × मधें जें साधेल तें तुम्ही आम्ही बरोबरी घ्यावें व पडेल तें तुम्ही आम्ही बरोबरी द्यावें. आम्ही तुम्हास भाऊ करून घेतलें असे. यासी अन्यथा नाहीं. आपले भाऊबंद तुम्हास कोणी मुजाहीम जाहालिया आमचे आम्ही समजोन घेऊं. तुम्हास आमचे भाऊबंदाची तालुक तगादा नाहीं. यासी जो कोणी हासकल करील नवादगर करील त्यास गोहत्या ब्रह्महत्या गुरुहत्या काशीमधें केलेचें पातक असे व आपले कुलस्वामी व पूर्वज स्मरोन फुरोखतपत्र लिहोन दिलें. सही. सदरहू भरणा भरून पावलों छ. मजकूर.

(गोल शिक्का)

बा। नरसो बाळाजी गु। देशमुख सरकार मा। गोट्टी.

रा॰गौडा वलद विठगौडा देसाई व पडगौडा पाटील कोकटनूर व मामले तोरगल पत्रप्रमाण साक्ष असे. ( गोल शिक्का )

पेयगौडा पटेल कसबे पडवती व मौजें साऊळी पत्रप्रमाण साक्ष असे. ( गोल शिक्का )

---

नं. ७२१७ श्री. (इ. स. १७५४।५५)

( शिक्का ) तालीक $\frac{१}{१६}$

करारनामा प्रांत मिरज वगैरे नि। शिवाजी बल्लाळ सु। खमस खमसैन मय्या व अल्लफ. अजदेह.

२२६ प्रांत मिरज कर्याती २२ एकूण देहे.

२५ प्रांत रायबागपैकीं कर्यात नांद्रें व ऐनापूर एकूण कर्याती दोन देहे.

८ प्रांत हुकेरीपैकीं फुटगांव.

११ प्रांत कागलपैकीं कर्यात डिग्रज व मांजरी एकूण देहे.

१ कवठें पिरान कर्यात बाजे प्रांत पन्हाळा.

२७१ एकूण दोनशे एकाहत्तर देहे रास. पैकीं वजा परभारें गांव व दुमाले गांव.

९४ परभारें गांव.

२५ राजश्री स्वामी करवीरवासी यांजकडे प्रांत मिरज पैकीं गांव रुकडी व इचलकरंजी व उदगांव व शिरहट्टीपैकीं देहे.

४० राजश्री पंतप्रतिनिधी यांजकडे कर्यात इटे व भालवणी व खानापूर एकूण देहे. याचा तह तूर्त उपसर्ग करूं नये. पेस्तर आज्ञा होणें ती होईल.

१० तर्फ तासगांव येथील दाखला करूं नये. त्याचा ते बंदोबस्त करतील. दे देहे.

८ नि। ठाणें मजकूर नि। लिंबकराव तुकदेव.

१ श्रीशंकराचार्य स्वामी करवीर याकडे मौजे हतनूर.

१ नि रा. घनशाम नारायण मंत्री याकडे मौजे पुणदी.

८५

२ नि शामराव भीवराव १ का अष्टे प्रांत मिरज.

१ ग्रिडज प्रांत कागल.

सदरहू दोही गांवचा पांच सालांत शामराव भिमराव यांनीं तनखा भरून घ्यावा. याप्रमाणें करार केला आहे.

७ कर्यात अष्टे प्रांत मिरजपैकीं गांव.

५ नि गोपाळजी भोसले.

१ ठाणें इस्लामपूर नि राजश्री घनबा.

१ मंत्री.

७

९४

१८॥ इनाम दर देहे.

१४॥ किता ××× चा ते घेतील.

२ श्रीनरसिंव्ह सरस्वती याजकडे कर्यात शिरहट्टी प्रांत मिरज पैकीं १ मौजे औरवाड. १ मौजे गौरवाड. ॰॥॰ पेशजीप्रमाणें ॰॥॰ हल्ली निम्मे करार करून दिला.

२ श्रीआनंदमूर्ती यांजकडे गांव १ मौजे ब्रिरनाळ कर्यात सांगली प्रांत मिरज. १ मौजे तुंग कर्यात डिग्रज प्रांत कागल. ॰॥॰ पेशजी चालत होता. ॰॥॰ साल मजकुरीं नवीन करार.

१ मौजे हिंगणगांव कर्यात कवठें महांकाळ प्रांत मिरज नि रामदासस्वामी परळीकर.

१ मौजे धामणी कर्यात हवेली प्रांत मिरज नि शमनामीर पीर.

१ मौजे शहापूर कर्यात जुगूळ प्रांत हुकेरी नि श्रीशंकराचार्य स्वामी करवीरवासी ॰॥॰ बमोजीब पेशजी ॰॥॰ हाली दिला.

॰॥॰ मौजे येडूर कर्यात जुगूळ प्रांत हुकेरी श्रीवीरभद्रदेव यांजकडे.

॰॥॰ मौजे नागांव कर्यात कवठें प्रांत मिरज नि रामाजी गोसावी श्रीविन्हाडसिद्धदेव याकडे.

•।।• मौजे कर्नाळ कर्यात सांगली प्रांत मिरज नि॥ बिडोबा गोसावी कवठेकर.

•।।• मौजे चिखल गोठण कर्यात इसापूर प्रांत मिरज नि॥ रामदासी वडगांवकर भिवजी गोसावी.

३ नि॥ नारायणराव व्यंकटेश याजकडे प्रांत मिरजपैकीं १ मौजे आरग कर्यात बेडग. १ कसबे मणेराजुरी. १ मौजे करोली कर्यात देशिंग. देशमुखीबद्दल.

२ इनाम देशपांड्ये प्रांत मिरजकर प्रांत मजकूरपैकीं गांव. १ मौजे पद्माळें कर्यात सांगली नागोजीराम यांजकडे. १ मौजे चंदूर कर्यात म्हैसाळ रामराव शामजी याजकडे.

•।।• मौजे ढवळी कर्यात हवेली प्रांत मिरज नि॥ मुरातशा फकीर.

१४।।

४ किल्ता गांव यांचा साल मजकुरीं आकार होईल त्याप्रमाणें सालमजकुरापासून साल दरसाल चालवावा. पेस्तर जाजती आकार होईल तो सरकारांत घ्यावा याप्रमाणें करार. देहे मिरज प्रांत पैकीं.

१ मौजे जरंडी कर्यात अंजनी नि॥ काशीराव पंडित

१ कसबें इसापूर कर्यात मजकूर नि॥ रावोबा उपाध्ये हुजूर.

१ मौजे कौलगें प्रांत सावर्डे नि॥ संध्याभट हुजूरचे.

१ मौजे वासंबें कर्यात कवठें नि॥ घोंडोबा राजोपाध्ये.

४

१८।।

२१।। मुकासे गांव दिले आहेत त्यांचा आकार होईल तो ज्याचा त्याजकडे चालवावा. आकार होईल तो हुजूर आणून समजवावा. याप्रमाणें करार देहे.

१ नि॥ फत्तेसिंग भोसले यांजकडे मौजे कागवाड कर्यात म्हैसाळ प्रांत मिरज.

१ नि॥ राजश्री घनशाम मंत्री •।।• मौजे भिलवडी प्रांत मिरज. •।।• मौजे डिग्रज खुर्द प्रांत कागल.

१ नि। राजश्री गोविंद खंडेराव चिटणीस मौजे निंबणी कर्यात कवठें प्रांत मिरज.

१॥ नि। विठ्ठल यशवंत पोतनीस ( १ ) मौजे डोंगरसोनी कर्यात डिग्रज प्रांत कागल. इनाम. ·॥· मौजे बुधगांव कर्यात सांगली प्रांत मिरज निम्मे.

१ नि। शिवाजी डुबल मौजे गुंडेवाडी कर्यात बेडग प्रांत मिरज इनाम.

१ नि। वासुदेव नारायण हवालदार राजमंदीर व निम्मे विठ्ठल यशवंतराव मौजे खटाव कर्यात बेडग प्रांत मिरज.

१ मौजे केंपवाड कर्यात बेडग प्रांत मिरज नि। हणमंतराव सावंत हुजूर चाकरी करावी.

१ नि। रा. यमाजी शिवदेव कर्यात सावडें प्रांत मिरज.

·॥· नि। शिवराव शिंदे मौजे बेंदरी कर्यात नांदरें. प्रांत रायबाग निम्मे.

·॥· नि। केसरकर मौजे सावळवाडी कर्यात- दुधगांव प्रांत हुकेरी निम्मे.

·॥· नि। आपाजी शितोळे कसबें मांजरी प्रांत कागल निम्मे.

·॥· नि। किल्ले भूपालगडकर मौजे बणूर निम्मे कर्यात अंजनी प्रांत मिरज.

·॥· नि। गोरखी मौजे कवठें पिरान कर्यात वाजें पन्हाळा निम्मे.

२ नि। सिदोजी थोरात याजकडे १ मौजे वसगडें कर्यात कवठें प्रांत मिरज. १ मौजे बुरली कर्यात डिग्रज प्रांत कागल.

२ नि। गोपाळजी भोसले १ मौजे समडोळी कर्यात सांगली प्रांत मिरज. १ मौजे अमणापूर कर्यात नांदरें प्रांत रायबाग.

·॥· नि। न्यायाधिश व रत्नाकर विठल यांजकडे मौजे वड्ये कर्यात नांदरें प्रांत रायबाग.

---

१५॥

१४ हल्ली सरकार सनदा

१ नि॥ उदाजी चव्हाण मौजे सोनी कर्यात मनेराजुरी प्रांत मिरज.

१२ नि॥ देवराव मेघश्याम याजकडे कर्यात ढालगांव प्रांत मिरज. देहे.

१ चिंतामण तुकदेव शिवजी हरी यांचे पुत्र यांजकडे देहे. ॥ कर्यात दुधगांव प्रांत हुकेरी. ॥ मौजे चिंचणी कर्यात नांदरें प्रांत रायबाग.

१४

२९॥

१ मौजे बांबवडें कर्यात भिलवडी प्रांत मिरज खासगीबद्दल नि॥ डुबल आनंदराव सालमजकुरीं आकार होईल त्याप्रमाणें त्याजकडे द्यावा. पुढें जाजती आकार होईल तो सरकारांत द्यावा.

३ नि॥ नारायणराव व्यंकटेश यांजकडे गांव दिले आहेत त्यांचा आकार मुलुख शिरस्तेप्रमाणें कौला बमोजीब होईल तो वसूल घ्यावा. देहे मिरज प्रांत पैकीं १ कसबे बेडग. १ कसबे अंजनी. ॥ कसबे सांगली निम्मे. ॥ मौजे वाडी कसबे सांगली निम्मे.

१४६

एकूण एकशे शेचाळीस रास.

बाकी १२५ देहे एकूण एकशेपंचवीस रास.

पैकीं स्वराज्यातर्फेनें मोकासें गांव.

७ नि॥ राजश्री उदोजी चव्हाण याजकडे देहे.

६ कर्यात ऐनापूर प्रांत रायबाग पैकीं देहे.

॥ का॥ ऐनापूर निम्मे.
॥ मौजे उगार खुर्द निम्मे.
॥ मौजे इंगळी निम्मे.
॥ मौजे बणजवाड.
॥ मौजे मोळवाड निम्मे.
॥ मौजे लिंगनूर निम्मे.
॥ मौजे शेडबाळ निम्मे.
॥ मौजे कित्तूर निम्मे.
॥ मौजे कातरद्याळ निम्मे.
॥ मौजे कुसनाळ निम्मे.
॥ मौजे शिपूर निम्मे.
॥ मौजे लोकूर निम्मे.

·।।· का। कवठे महांकाळ प्रांत मिरज पैकीं निम्मै.
·।।· मौजे उगार का। म्हैसाळ प्रांत मिरज.

७

७ कित्ता गांव नि। गोपाळजी भोसले इस्लामपूरकर याजकडे आहेत. त्या गांवचा साल मजकुरीं आकार होईल त्याप्रमाणें त्याजकडे ऐवज द्यावा व पुढें जाजती आकार होईल तो सरकारांत घ्यावा. याप्रमाणें करार देहे. प्रांत मिरज पैकीं ·।।· मौजे × × ·।।· मौजे बामणी. ·।।· मौजे बोलवाड. ·।।· मौजे सावळी. ·।।· मौजे तानंग. ·।।· मौजे टाकळी एकूण तीन. कर्यात भिलवडी पैकी ·।।· मौजे नागराळें. ·।।· मौजे दुधोंडी ·।।· मौजे ताकारी. एकूण दीड. ·।।· मौजे खटाव कर्यात सांगली निम्मे ·।· मौजे आलास कर्यात शिरहट्टी पाव गांव .।. मौजे अंकली कर्यात डिग्रज पाव गांव. १ प्रांत रायबाग पैकीं ·।।· मौजे रामापूर. ·।।· मौजे बेणापूर एकूण ·।।· मौजे भडकंबें कर्यात दुधगांव प्रांत हुकेरी. निम्मे एकूण सात.

·।।।· नि। ठाणें इस्लामपूर नि। मंत्री यांजकडे प्रांत मिरजपैकीं देहे.
·।।· मौजे दुधोंडो कर्यात भिलवडी.
·।· मौजे आलास कर्यात शिरहट्टी नि। कुसाजी भोसले.

·।।।·

९।।। सिदोजी थोरात नि। कुसाजी भोसले याजकडे गांव आहेत त्यांचा सालमजकुरीं आकार होईल त्याप्रमाणें त्यास द्यावा. पेस्तर जाजती आकार होईल तो सरकारांत—

६।। प्रांत मिरजपैकीं देहे साडेसहा— दोन कर्यात कवठें ·।।· मौजे नागांव. ·।।· मौजे शिरगांव. ·।।· मौजे कवलापूर. मौजे मतकुणकी एकूण दोन. कर्यात इसापूर पैकीं अडीच गांव. ·।।· शिरगांव. ·।।· मौजे अळतें. ·।।· मौजे निंबळक. ·।।· मौजे आंधळी. ·।।· मौजे निंब कर्यात भिलवडीपैकीं दीड गांव. ·।।· मौजे घोगांव. ·।।· मौजे तुपारी ·।।· मौजे दह्यारी ·।।· मौजे बिसूर कर्यात सांगली. एकूण मिरज प्रांतपैकीं देहे ६।।.

१॥ कर्यात नांद्रें प्रांत रायबागपैकीं ॰॥॰ मौजे हतनोळी ॰॥॰ मौजे
मोराळें ॰॥॰ मौजे खुजगांव.
॰।॰ मौजे अंकली कर्यात डिग्रज प्रांत कागल चौथाई गांव.
१ प्रांत हुकेरी पैकीं गांव ॰॥॰ मौजे मंगावती कर्यात जुगूळ ॰॥॰
॰॥॰ क्त्तिा प्रांत कागलपैकीं मौजे बोरगांव कर्यात डिग्रज निम्मे.

९॥।॰

वजा देहे साडेचोत्रीस.

बाकी तालुका मिरज सुभा देहे साडेशंभर.

तपशील

हुजूर सनदे पथके याजकडे गांववार आहेत त्याचा सालमजकुरीं आकार होईल तो त्याच्याबद्दल मुशाहिरा लिहावा. पुढें जाजती कौलामुळें होईल तो सरकारांत घ्यावा. देहे.

४ खेत्रोजी शिंदे प्रांत मिरज वगैरेपैकीं देहे चार.
१ कसबे म्हैसाळ प्रांत मिरज. १ मौजे मलेवाडी कर्यात बेडग.
१ मौजे वस्तवडें कर्यात सावर्डे. १ कसबे जुगूळ प्रांत हुकेरी.
याखेरीज मौजे ढवळेश्वर इनाम परभारें.

३ महादजी शिंदे देहे तीन—दोन प्रांत मिरजपैकीं. १ मौजे नरवाड कर्यात म्हैसाळ. १ मौजे शिरगुपी कर्यात म्हैसाळ. १ मौजे कवठे प्रांत रायबाग. एकूण तीन. याखेरीज मौजे ढवळेश्वर इनाम परभारें.

६ संभाजी घोरपडे प्रांत मिरज पैकीं कर्यात देशिगचे गांव सहा—
१ कसबे देशिंग. १ मौजे सराटी. १ मौजे अलकुड. १ मौजे कुकटोळी. १ मौजे कोगनोळी १ मौजें म्हैसाळ.

१॥-मालजी चव्हाण १ कर्यात डिग्रज प्रांत कागल. ॰॥॰ मौजे कर्नाळ कर्यात सांगली. प्रांत मिरज पैकीं निम्मे.

५ अम्रोजी साळुंखे प्रांत मिरज कर्यात मणेराजुरी पैकीं.
१ मौजे भोसें. १ मौजे पाटगांव. १ मौजे कुरोली. १ मौजे उपळावी. १ मौजे धुळगांव. एकूण देहे पांच.

ऐ. ले. सं. १५–५५

४ शिवजी भोसले—प्रांत मिरजपैकीं देहे तीन—

१ मौजे रांजणी कर्यात कवठे. १ मौजे धुळगांव कर्यात कवठें.

१ मौजे दहिवाडी कसबें अंजनी. १ मौजे सलगरें कर्यात ऐनापूर. प्रांत रायबाग एकूण देहे चार.

८ संताजी शिंदे—मिरज प्रांत पैकीं देहे सात. कर्यात सावडेंपैकीं दोन. १ मौजे मांजरडें. १ मौजे बलगवडें कर्यात अंजनीपैकीं पांच. १ मौजे गव्हाण. १ मौजे शिरढोण. १ मौजे वडगांव. १ मौजे वायफळ. १ मौजे घाटनांदरें. १ मौजे मळणगाव. प्रांत कागल कर्यात डिग्रजपैकीं ·॥·

२ शिवाजी शिंदे कर्यात सावडें प्रांत मिरजपैकीं देहे—

१ मौजे आरवडें. १ मौजे डोरली मळणगांव.

३ यशवंतराव वोलेकर कर्यात कवठें प्रांत मिरजपैकीं—

१ मौजे कोमाळे. १ मौजे विरली. १ मौजे आळकुड.

याखेरीज मौजे उदनवडी कर्यात नाझरें प्रांत मानदेश.

१ मौजे बेळोंखी कर्यात बेडग प्रांत मिरज नि॥ रावजी गायकवाड.

१ मल्हारजी साळुंखे मौजे खरशिंग कर्यात देशिंग प्रांत मिरज.

१ सावजी घाटगे मौजे कुमठें कर्यात मणेराजुरी प्रांत मिरज.

·॥· संगापा राजमाने मौजे टाकळी कर्यात हवेली प्रांत मिरज निम्मे.

१ काळनाक मौजे कळंबी कर्यात हवेली प्रांत मिरज.

४१

१ यबाजी भोसले मौजे नागोळें कर्यात कवठे महांकाळ प्रांत मिरज हा गांव सदाशिव बाबाजी यास सनद होती त्यांनीं करार करून दिले सालमजकुरीं.

ऐन वसुली गाव नि॥ सुभा—देहे साडेअठ्ठावन.

३६ प्रांत मिरजपैकीं—

५ कर्यात हवेलीपैकीं—१ कसबे मिरज. १ मौजे वड्डी. ·॥· मौजे निगडी निम्मे. ·॥· मौजे बामणी. ·॥· मौजे बोलवाड ·॥· मौजे सावळी. ·॥· मौजे तानंग. ·॥· मौजे ढवळी एकूण पांच.

१॥ कर्यात सांगलीपैकीं— ॥ मौजे वाडी. ॥ मौजे बुधगांव. १ मौजे कुपवाड. ॥ मौजे खटाव. ॥ मौजे बिसूर. ॥ —— एकूण साडे तीन.

२ कर्यात कवठें पैकीं— १ कसबे कवठे. ॥ मौजे नागांव. ॥ मौजे मतकुणकी. ॥ मौजे कौलापूर. ॥ मौजे शिरगांव. एकूण तीन.

२॥ कर्यात इसावली– १ मौजे वझरयेत. ॥ मौजे शिरगांव. ॥ मौजे आळतें. ॥ मौजे —— एकूण अडीच गांव.

४ कर्यात भिलवडी— ॥ कसबे मजकूर. ॥ मौजे दह्यारी. ॥ मौजे दुधोंडी. ॥ मौजे ताकारी. ॥ मौजे तुपारी. ॥ मौजे दुधोंडी. ॥ मौजे घोगांव. ॥ मौजे नागर. एकूण चार.

१॥ कर्यात शिरहट्टीपैकीं– ॥ मौजे अलास. मौजे शेडसाळ. एकूण दीड गांव.

३ कर्यात बेडगपैकीं–१ मौजे येरंडोली. १ मौजे खंडेराजुरी. १ —— एकूण तीन गांव.

५॥ कर्यात कवठें महाकांळ—१ मौजे आगळगांव. १ मौजे कुंडलापूर. १ मौजे कुचीं. १ मौजे जाखापूर. १ मौजे वाघोली. खराब आहे. ॥ कसबे मजकूर निम्मे. एकूण साडेपांच.

१ मौजे हरोली कर्यात देशिंग.

२ कर्यात सावर्डें–१ मौजे लोंढें. १ मौजे मारुलें.

३॥ कर्यात अंजनी–१ मौजे नायगांव. १ कुस बावडें खराब आहे. १ वज्रचवडें. खराब आहे. ॥ मौजे बणूर. एकूण साडेतीन.

१ मौजे कुडची कर्यात म्हैसाळ.

॥ मौजे उयार कर्यात म्हैसाळ निम्मे.

———

३६

१०।। प्रांत रायबागपैकीं—

६।। कर्यात ऐनापूर—१ मौजे शिरगूर. ·।· मौजे शेडसाळ. ·।· मौजे उगार. ·।· मौजे कित्तूर. ·।· मौजे हिंगणी. ·।· मौजे कातरहाळ. ·।· मौजे ब्रणजवाड. ·।· मौजे कुटुनहाळ. ·।· मौजे मोलवाड. ·।· मौजे शिपूर. ·।· मौजे नांदूर. ·।· कसबे मजकूर निम्मे. एकूण साडेसहा.

४ कर्यात नांदरेपैकीं—१ कसबे मजकूर. ·।· मौजे राजापूर. ·।· मौजे वालापूर. ·।· मौजे हातनोळी. ·।· मौजे बेंदरी. ·।· मौजे मोराळें. ·।· मौजे चिंचणी. एकूण देहे चार.

१०।।

२।। प्रांत कागलपैकीं—·।· मौजे उगार खुर्द. कर्यात डिग्रज. ·।· मौजे बोरगांव, मर्यात मजकूर. ·।· कसबे मांजरी. १ मौजे गोरगाव एकूण अडीच.

३ प्रांत हुकेरीपैकीं—दोन कर्यात खुदगांव. ·।· कसबे मजकूर ·।· मौजे दुपट बोरगांव. ·।· मौजे सावळवाडी. ·।· मौजे भडकंबें कर्यात जुगूळपैकीं. ·।· मौजे येडूर. ·।· मौजे मंगावती ·।· मौजे कवठे पिरान. कर्यात बाजे प्रांत पन्हाळा.

६ कारकून किल्ले मिरज याजकडे गांव आहेत त्यांचा आका होईल तो त्याजकडे द्यावा. जमा सरकारांत समजवावी. देहे.

·।· मजमदार नि। रामराव यमाजी शिवदेव मौजे आंधळी व इस्लामपूर.

१ फडणीस नि। मंत्री मौजे निंबळक. कर्यात इस्लामपूर निम्मे

२ जमेनिस नि। यशवंतराव पोतनीस. कर्यात कवठेपैकीं १ मौ खिळेगांव. १ मौजे पांडेगांव.

·।· चिटणीस नि। गोविंदराव चिटणीस मौजे चिखलगोटण कर्यात इस्लामपूर.

·।· गणेश बाळाजी—मौजे अंकली. कर्यात डिगरज.

·।· बक्षी नि। वासुदेव नारायण मौजे लिंगनूर. कर्यात ऐनापूर.

० सदाशिव धोंडो दप्तरदार मौजे बेणापूर कर्यात नांद्रें प्रात रायबाग. तैनात १५० दीडशे.

॥ सखो नरसिंह मौजे नागांव कर्यात कवठे प्रांत मिरज ३००.

॥ नागोजी राघोजी मौजे खुजगांव कर्यात नांद्रें प्रांत रायबाग.

एकूण देहे सहा.

६

५८॥

१००॥ देहे.

एकूण देहे साडेशंभर रास.

येणेप्रमाणें दोनशेएकाहत्तर गांवांपैकीं दुमाले गांव एकशेंचाळीस. बाकी एकशेंपंचवीसपैकीं स्वराज्यतर्फेनें मुकासे देहे साडेचोवीस. बाकी गांव साडेशंभर याप्रमाणें करार करून दिले असे. जाणिजे. छ. २६ सफर. आज्ञा प्रमाण. याखेरीज अंमल मिरजकडे सरकारांत जकाती नाकें नऊ--

१ कर्यात तासगांव देखील कसबे. १ कर्यात इसापूर. १ कर्यात सावडें. १ कर्यात ढालगांव. १ कवठें महांकाळ. १ कर्यात बेडग दि आरग. १ कर्यात जुगूळ. १ कर्यात मणेराजुरी. १ कर्यात म्हैसाळ. एकूण जकातीचीं नाकें नऊ. सदरहू जकातीचा अंमल मिरजकडे सरकारांत घ्यावा. मोकासे वगैरे घेत होते त्यांस न द्यावा.

कित्ता गांव जमेस वजा केले आहेत त्यांपैकीं सरकारांत अंमल घ्यावयाचा करार केला तें गांव १——

१ मौजे खराशिंग कर्यात देशिंग दरोबस्त मल्हारजी साळुंखे याजकडे दिला होता. त्यापैकीं खालशाचा अंमल सरकारांत ठेविला.

येणेंप्रमाणें जकातीचीं नाकें नऊ व सदरहूप्रमाणें दोन्ही गांवचा अंमल सरकारांत घेत जाणें. याखेरीज तहाचीं कलमें—

१ एकंदर आकार होईल त्यापैकीं तीन हिस्से मोंगलाई, चवथाई

स्वराज्य, स्वराज्यावर साहोत्री याचा वसूल घ्यावा. त्याप्रमाणें त्यांनीं ठरवावा. याप्रमाणें करार केला असे. कलम.

१ सरदेशमुखी व नाडगौडकी — ची जमाबंदी होईल त्याप्रमाणें प्रतारणा न करतां गांवगन्ना द्यावा. त्याप्रमाणें ते वसूल घेतील. वेठ, फड, फर्मास त्यास न द्यावी. याप्रमाणें करार केला असे. कलम.

येणेंप्रमाणें दोन कलमें करार करून दिलीं असत. सदरहूप्रमाणें वर्तणूक करीत जाणें. जाणीजे छ. मजकूर. मोर्तब असे.

---

नं. ७२१८ श्री.

मौजे येळावी येथील कुलकर्णी याचे धानाई (?) निवाडेस्तव अगोदर [1]पांढर आणवून मजालसीमधें बेल तुळशी घालून श्रीचे देवालयांत पांढरीस बोलविलें. त्याची वदणूक पृथक् पृथक् लिहिली असे.

सदरहू या बोलणेवर वादी याची आशा फिटेना म्हणून श्रीचे दिव्याचा करार जाला. राजीनामे व जामीन व खुटीतपत्रें (?) उभयतांपासून घेऊन पांढरीस श्रीचे तीरीं नेऊन उभयतां वादी यांस श्रीमध्यें उभें केलें. आणि पांढरीस देवानीं आज्ञा केली जे तुमचा पुरातन कुलकर्णी जो असेल तो हातीं धरणें. त्यावरून पांढरीने श्रीमध्यें जाऊन वदणूक केली जे वेंकाजी सखे याने दोन तक्षीमा व एक तक्षीम बाजी बाळाजी व गोविंद रघुनाथ येणेंप्रमाणें वृत्ती अनुभवावी. ऐसें बोलून वेंकाजी सखे व बाजी बल्लाळ यांसीं दोघांस दोन हातीं धरून भाईर आणिलें.

---

नं. ७२१९ श्रीगणराज.

अपत्यें श्रीपतीनें सा. नमस्कार. विज्ञापना. केदारखंडाचें पुस्तक पत्रें १५५ आणाविलें होतें तें रा. लक्ष्मणपंत मराठे यांजबरोबर पाठविलें आहे. जमा धरवून उत्तर द्यावयाची आज्ञा व्हावी. चिटी आली होती. उत्तर द्यावया आज्ञा व्हावी. विदित होय हे विज्ञापना.

---

[1] पांढर = गांवांतील प्रतिष्ठित लोक.

नं. ७२२० श्रीगणराज.

कुडचीकर पीरजादे शेख इमाम काळा व शेख अमद गोच या उभयतांमध्यें सीजादगीपणाचा वडील धाकटे मानपानाचा कजिया लागोन हुजुरून पत्रें घेऊन मिरजेस आले. पंचांमतें उभयतांचा कजिया मनास आणितां कागदापत्रांविशीं शेख इमाम काळा हा वडील सीजादगीपण त्यानें करावें. धाकटा शेख अमद याने भाऊ वांटणी खाऊन असावें. वडीलपणाविशीं कजिया करावया गरज नाहीं. याप्रमाणें पंचांचे मतें करार जाला. याविशीं सरकारचीं पत्रें पाहिजेत.

१ देशमुख व देशपांडेचे नांवें
१ गांवकरास.
१ शेख इमाम काळा याचे नांवें
―
३

उत्तर—तीन पत्रें देणें.

---

नं. ७२२१ . श्री.

सेवेशीं खंडो बाजी कुलकर्णी मौजे खेड व पुणदी तालुके वाळवें व मौजे दुधोंडी का भिलवडी प्रांत मिरज विज्ञापना ऐसीजे. बालेघाटांतून विठ्ठल नारायण म्हणून ब्राह्मण आपण कुलकर्णी म्हणून तासगांवास श्रीमंत राजश्री भाऊसाहेब यांजकडे आश्विनमासीं आला होता. ते समई मौजे खेडचे मोकाशी राजश्री दलपतराव शामराव तेथें होते. त्यांस न कळतां त्यानें श्रीमंतांस गैरवाका समजावून राजश्री मंत्रीस व रघुनाथ चिंतामण ठाणें शिराळेकरांस ऐशीं दोन पत्रें घेतलीं. तें वर्तमान निवेदन केलें. मग श्रीमंतांनीं त्या ब्राह्मणास निषेध करून पत्रें माघारीं घेऊन फाडून टाकिलीं. हें वर्तमान मल्हारनिल्हे यांनीं सांगितलें. हाली तो ब्राह्मण पुण्यास जाऊन श्रीमंत राजश्री दाजीबा फडके यांचे नांवचें पत्र दलपतराव यांचे वडील भाऊ बाळाजी शामराव यांसी पाठविलें कीं, विठ्ठल नारायण येथें आला आहे. तरी मौजे मजकूरचे कुलकर्णी यास पाठवून देणें ऐसें पत्र आलें आहे. त्यास तेथें आम्हां गरीब ब्राह्मणांचा त्राता कोण आहे ? सर्व तारक धण्याचे पाय आहेत. म्हणून जाहलें वर्तमान सेवेशीं विनंती लिहिली आहे.

पूर्ववत् वतनसंबंधें त्याचें बोलणें आमचे वडील निपणजे महादाजी खंडेराव कुलकर्णी यांचे वर्त्ती जालें आहे. ते कागदपत्र सेवेशीं आणिले आहेत. तें सेवकावरी कृपाळू होऊन अक्षरशा पाहून धणी काय आज्ञा करितील त्याप्रमाणें वर्तणूक करूं. या गोष्टीस दोनशें पावणें दोनशें वर्षें होत आलीं. कुभांड घेऊन हाल्लीं उठला आहे. हें सर्व निवारण करणार धण्याचे पाय आहेत. त्याखेरीज आम्हा गरीबांस आधार नाहीं. मानाभिमाना धण्याचे पायांस आहे. विशेष लिहिणेंस शक्ति नव्हे. हे विज्ञप्ति.

नं. ७२२२ श्री.

विनंती. उपरी. माणीकभाई बंदीस होता त्याचे नांवें गुदस्ताचें पीठ व दाळ वजन पक्के पांच शेर राहिलें आहे. माणीकभाई मृत्यु पावला. त्यास अडशेरी जिलकादची ८८५ घ्यावयाची नाहीं. दाळ पीठ मात्र पांच शेर वजा करून बाकीच्या बंदीवानाची चिठ्ठी द्यावी हे विनती. याखेरीज कुपवडें येथील पुन्याची भावजई व तिचा लेंक दोन असामी सोडिल्या. सबब छ. १६ सवालपासून तीस शेर दाल पीठ जिलकादच्या अडशेरींतून वजा करून बाकीची चिठ्ठी द्यावी. जिलकादांत तीन असामी कोंडवाड्यांतील कमी करून चिठ्ठी द्यावी. हे विनंती.

नं. ७२२३ श्री.

यादी गृहस्थ बोलावून आणावे भोजन जालेनंतर

| | |
|---|---|
| १ भुजंगा डांग्या | १ मलापा आवटी |
| १ रामकृष्ण गणु | १ रुद्रापा राजमाने |
| १ बाळकोजी माने रहिमतपूरकर | १ चिटणीस मिरजकर |
| १ नागपा वडवडगीचे पुत्र | १ पायापा नाडगोंडा प्रा। तेरदाळ |
| ४ | ४ |

नं. ७२२४ श्री.

छ. २९ रमजान, सन सीत (इ. स. १७८६). गंगना चांभार दि भुजंगा चांभार याच्या मुलास पोटांतील आजार झाला. मूल सहा महिन्यांचें आहे. त्यास दोन पैसे भार दारू कलाली औषधास पाहिजे. तरी

दोन रोज दोन दोन पैसे भार द्यावयाची आज्ञा असावी. मूल जेर आहे म्हणतो.

उत्तर--देविली आहे.

नं. ७२२५ श्रीगणराज.

विज्ञापना. काल धर्मशाळेकडे रेडा तेलीयाचा रहाटास दिला होता. तो विहिरींत पडोन जायां झाला. जीव मात्र अद्यापपर्यंत आहे. त्यास तेल्यास बैल अगर रेडा कांकरापैकीं देविल्यास घेईल. अगर काय आज्ञा त्याप्रमाणें सांगूं.

उत्तर--समक्षच तुम्हास सांगूं.

नं. ७२२६ श्रीगणराज.

राजश्री नारो बाबाजी व वासुदेव सदाशीव स्वामी गोसावी यांसी.

विनंती. उपरी. वेदशास्त्रसंपन्न राजश्री लिंबकशास्त्री रायदुर्गेकर सातारीयास मुलें मनुष्यें सुद्धां जात आहेत. त्यांजबरोबर रहिमतपूरपावेतों पांच असामी पोंचवावयास देणें. ते आजच निघणार. रहिमतपूरपावेतों प्याद्यांनीं पोंचवून शास्त्रीबावांचें पत्र घेऊन यावें. तेथून सातारेपावेतों प्यादे देविले आहेत. रा छ. १६ रबिलाखर सन मयातैन व अलफ (स. १७९९).

उत्तर--सरकारचें पत्र त्यांनीं आणिलें. प्यादेची गांठ घालून देऊन चालते करवावे. हे विनंती.

नं. ७२२७ श्री.

सेवेशीं मोहीदीनसाहेब काजी अर्जे ऐसाजे. आमचे मशिदींतून दारूगोळे काढावयास साहेबांची आज्ञा जाली असतां दारू काढीत नाहींत. दारूगोळे एक जागीं रचून मेंढे आणून मशिदीचा दरवाजा बंद करितात. आम्ही बहुतप्रकारें सांगितलें. परंतु मानीत नाहींत. तसेंच दारूगोळे टाकून जातों. तुम्ही पाहून घेणें म्हणोन धमकावितात. श्रीमंत राजश्री भाऊसाहेबांचे आज्ञेशिवाय कोणाचें आम्ही ऐकत नाहीं म्हणून बोलतात. याजविशीं काय आज्ञा करणें ती करावी. सेवेशी हे अर्ज.

ऐ. ले.-सं. १५-५६

नं. ७२२८ श्री.

यादी. शिंग्यास औषधें

पोटांत.

| | |
|---|---|
| १ टांकणखार पैशाचा | १ मुसबार पैशाचें |
| १ डिकेमाली अधेल्याची | १ भांग अधेल्याची |
| १ सुंठ अधेल्याची | १ अधेल्याची अफु |
| १ कडू कारलें अधेल्याचें | ॥· वडाचें पान. |
| १ वेखंड पैशाचें | |

सदरहू औषधें हरबा राजमाने सांगतील तितके पैसे लिहोन पाठवावे. पाठवून देऊं: छ. २४ जमादिलाखर. सन इसने ( इ. स. १७९१ ).

चोपड करावयाचें ओखद.

| | |
|---|---|
| ๑๑๑९ आंबे हळद पक्के घई मोघाभर. | ๑๑๑= मीठ व डांगरकैली. |
| | ๑๑।· कडू कारलें वजन पक्के सहा टांक. |

येणेंप्रमाणें कुटून वस्त्रगाळ करून धर्यांत कालवून अंगास घोड्याच्या लावावें.

---

नं. ७२२९ श्री.

आज्ञाधारक देवराव शिंगाडे दंडवत. विनंती विज्ञापना. कालचे हजेरीस पीरखान नव्हता. त्यास धण्यांनीं कृपा करून ठेवावा. इतःपर चुकणार नाहीं. मर्जीस न येई तरी बाहेर घालतों. काय आज्ञा?

उत्तर—तुम्हीं लिहिलेवरून एक वेळ क्षमा केली. अतःपर सारे भले लोकांस तुम्हीं ताकीद करावी. ही चिठ्ठी नारोपंत व वासुदेवपंत यांस दाखविणें.

श्रीगणराज.

राजश्री नारोपंत व वासुदेवपंत स्वामींस

विनंती. उपरी. देवराव बावांनीं लिहिलेवरून पीरखानास क्षमा केली. लाऊन न देणें. इतःपर कोणीही चुकलीयास मुलाजा होणार नाहीं. हे विनंती.

---

नं. ७२३० श्री.

वासुदेव सदाशीव मराठे यांची कुणबीण घरांतून पळोन गेली. ती राजापुरास रानड्यांचे घरीं उमगली आहे. त्याविशीं पत्रें गंगाधरपंत[1] सुभेदार यांस दोन पत्रें द्यावयाची आज्ञा.

उत्तर—दोन पत्रें देणें.

---

नं. ७२३१

सेवेशीं अर्जी गुलाम मोहीदीन काजी ऐसी जे. आमचे हक्क काजी-पणाचे मुसलमानांचे लग्नकार्याचे कसबे मिरज येथें रुपये २॥ घेत असतों. त्यांत रु. २ सुदामत आमचे मुतालीक घेतात. ऐसें चालत असतां हल्लीं कसबे अथें येथें भाईखान नाईकवडी मिरजकर याचे लेक सुलतान याणीं राजश्री केसोपंत मामास[2] गैरवाका समजावून आमचे मुतालिका-संगें कजिया करितो. रु. १ घेत जाणें म्हणून सांगतो. हक्कास अडथळा करविला आहे. याजकरितां सेवेशीं अर्ज रा मामास कृपा करून पत्र. हे अर्ज.

---

नं. ७२३२ श्री.

विज्ञापना. मानाजी जासूद राहाटावर आहे. त्याचे लेकीचा खटला मागें पडला. त्या समईं लेकीस मानाजीचे हवालीं केली. दादल्यानें मारली डागलेली सर्वांनीं पाहिलीच होती. आतां मानाजीची लेकी कोलापुराहून पीठ आणीत असतां वाटेस मानाजीचें पीठ आणीत होती. तें टाकून देऊन मिरजेस दादल्यानें आणिली. दोनप्रहरपावेतों दादल्याचे घरीं होती. मानाजी फिर्याद आला म्हणून त्याजकडे माणूस पाठविला. तों ती घरीं नाहीं. तिचा सासरा जाबसालास आणिला. तो दादल्यानें नेली असेल असें म्हणतो. सरकारांत विनंती करून मग न्यावी असें जालें होतें. म्हणून महादजी पावडा सासरा आणिला आहे. आज्ञेप्रमाणें करूं.

उत्तरः—मानाजीचे पोरीस आणून द्यावी. तेल तापवून आंग जाळिलें

---

१ गंगाधर गोविंद भावे, सुभेदार, विजयदुर्ग. २ केसो बल्लाळ काळे, मामलेदार, अथें.

मार्गे. आतां न्यावयास कारण नाहीं. न आणिली तर मुलाजा होणार नाहीं. जाब काय करितो ? लिहिणें.

विज्ञापना--आज प्रातःकाळींच दादल्यानें आणिली. दोनप्रहरीं भाकर घरीं खादली. सायंकाळची घेऊन गेला. जाबसाल मात्र करितो. मीं सांगितलें कीं तुझा लेक तुझेच घरीं जाळिली. सरकारपावेतों बोभाट असोन तूं कसें आपले लेकास सांगितलें नाहींस ? तूं तिजला आणून देणें. नाहीं तरी चौकीवर ठेवितों. याप्रमाणें सांगोन चौकीवर ठेविला. आज्ञेप्रमाणें करूं.

उत्तर--ठीक केलें.

---

नं. ७२३३ श्रीगणराज.

यादी. सिलेदार मिरजकर यांस सालाबाद दसऱ्याचे खर्चास दर असामीस रु. २ दोन प्रमाणें खेरीज मुशाहिरा[1] पावत असतात. सालमजकुरीं सालगुदस्त प्रमाणें.

उत्तर--तीर्थरूप नाना कैलासवासी आलेकडे पावत असेल तें पुसावें. नवीन न पुसावें.

---

नं. ७२३४ श्री.

याद. गंगाजी बंडगर व मालोजी बंडगर सिलेदार यांसी टाणें कसबें जालनापुरीं पावती इा छ. ७ रमजान ता छ. ७ जिल्हेज माहे ३ आठवडे ९

दर आठवडा रु. १०५ प्रमाणें.

९४५ रोजमरेपैकीं रोजमरे ९
६५८ नालबंदीपैकीं
१६०३

---

१ बदल मुशाहिरा आणि खेरीज मुशाहिरा अशीं जमाबंदीमध्यें खर्चाकडे दोन स्वतंत्र सदरें होतीं. खेरीज मुशाहिरा = हंगामी तात्पुरता खर्च.

जामदारखान्यापैकीं आंख सुमार
४४०।

रुपये.
१७६

याशिवाय मल्हारजी कोळेकर स्वार ३ आठवडा ७॥ प्रमाणें बरहुकूम बंडगर.

६७॥। रोजमरे ९ दर बा। सदर ६७॥ व ईजाफा[1]
३० नालबंदीपैकीं ।

९७॥।

जामदारखान्यापैकीं आंख २७ किंमत ११
येणेंप्रमाणें पावती मशारनिल्हेची जाहली. मा। रावोपंत हे विज्ञापना.

नं. ७२३५ श्री.

चवाणाकडील कारकुनास आज्ञेप्रमाणें सांगितलें. त्यास त्याचें बोलणें एक वेळ पहिली गणती जाली ती व हाल्लींची अशी एक वेळ दृष्टीस घालावी. पाहून विनंती करूं. त्यास दोन्ही गणत्या त्यास दाखवावयाच्या जाल्यास पाठवितों.

श्रीगणराज.

चवाणाकडील कारकून पाठावणें. दोन्ही गणत्या त्यांनीं पहाव्या. छ. २७ रावाल. सन सीत. तिसैन. हे विनंती (स. १७९६).

नं. ७२३६ श्री.

छ. १० जिल्हेज. सन खमस. नाईकजी घाटगे याजकडे प्यादा गेला. तो घरीं बसला आहे. मना चिठी जाल्याशिवाय येत नाहीं. चाकरीचा व स्वारांचा जाबसाल मामास रुबरू[2] पुसावा. मामा लष्करांतून येतांच स्वार कामाचे कसे नाहींसे जाले ? गणती जाहली तेच स्वार आहेत. आमचा बोभाट न व्हावा या अर्थें कर्जें काढून ऐवज पोंचवीत गेलों म्हणतात. प्याद्यास मनाचिठीची आज्ञा. उद्यां श्राद्ध

१ इजाफा – जादा (Extra). २ समक्ष.

आहे याजकरितां आज जाऊन परवां येतों म्हणतात. आज्ञा करणें ती करावी.

---

नं. ७२३७ श्री.

विज्ञापना. डांकेच्या माणसास पांच रुपये दरमाहे द्यावे लागतात. कमी होत नाहीं. अखेरीचे दिवस माणसें सहा म्हणतात. पांच रुपये आज्ञा जाल्यास कबूल करितों. आज्ञा काय ?

उत्तर—साडेचार करावे. त्याद्यांत लिहावें. नाहीं तर जासुदांचा शेरा बिघडतो.

---

नं. ७२३८ श्रीनरहरी.

राजश्री नारोपंत नाना व वासुदेवपंत स्वामीचे सेवेशीं.

पोष्य बाळाजी विठ्ठल नमस्कार विनंती. उपरी. हलगे व कर्णेकरी व शिंगे यांसीं निरोप देऊन पाठविले आहेत. हे विनंती.

---

नं. ७२३९ श्री.

सैख हुसेन हशम किल्ले मिरज जमातदार बहुत दिवसांचा. त्याजकडील दोन असामी बरतरफ केली म्हणून विनंती करावयास आला. मर्जीनुरूप विनंती करावी ती न केली. सबब बाहेर घालविला. त्यास चाकरीवर ठेवावें ऐसी बहुतांची रदबदल आहे. आज्ञेप्रमाणें सांगों. माणूस् चांगला आहे.

उत्तर—त्यास चौकीत बसाविणेविशीं सांगितलें असतां बाहेर कोणाचे परवानगीनें गेला हें कळलें नाहीं. धनी जो मनास न ये त्यास बरतरफ करितील. आम्हासच निरोप देणें म्हणाला तेव्हां ×× झाली. किल्लेंत जमादारही फार आहेत. असी गैरचाल कार्यास येणार नाहीं. हे विनंती.

---

नं. ७२४० श्री.

कैकाडी एक असामी—मानाजीकडे आला आहे. पाहून ठेवावयाचा जाल्यास आज्ञा.

उत्तर—उदैक पाहूं. छ. १५ सवाल.

---

नं. ७२४१ श्री.

चंदावरकर चार असामी आली आहे. पैकीं राठोड एक व मराठे तीन असामी आहेत. बैरागीबावा रदबदल करितात आहेत. आंत येऊन भेटोन जातील म्हणतात. आज्ञा काय ?

उत्तर—उदैक प्रातःकाळींच येऊं द्यावे.

---

नं. ७२४२ श्री.

नवे गोलंदाज असामी तीन भाऊ [1]कबिल्यासुद्धां आहेत. आज ता। दहा रुपये दिले आहेत येविशीं विनंती केली होती. निशाण पाहून चांगले असिल्यास तैनात होईल. तूर्त दोन रोज आणखी पोटास ५ रुपये दिले पाहिजेत. आज्ञेप्रमाणें करूं.

उत्तर—तूर्त खर्चास देवणें आठ चार दिवसांत निशाणही पहावयास सांगतों. छ. १० रा खर.

---

नं. ७२४३ श्री.

जुन्या गोलंदाज याचा सोइरा विलायतचा गोरा गोलंदाज आला. त्याविशीं त्याणें विनंती केली होती. त्यास खर्चास देऊन करवीरास पाठवितों म्हणून आज्ञा होती. त्यास ठेवावयाचा जाल्यास थोडेंबहुत खर्चास देऊन ठेवावा. कबिल्यासुद्धां आला आहे. आज्ञेप्रमाणें सांगों.

उत्तर—दोन चार रुपये खर्चास देणें म्हणजे करवीरास फौजेंत वडीलांकडे पाठवितों.

---

नं. ७२४४ श्री.

विनंती. उपरी. गोलंदाजाकडे नळे चंद्रजोतीस वगैरे सामान सोरमीठ वजन ।। कच्चें, गंधक ८—। वजन कच्चें.

---

1 कबिला = बायकामुलें.

सवासहा मण द्यावयाची आज्ञा जाहली आहे. सवासहा मण वजनाचें द्यावें. छ. २६ साबान, सन आर्बा (इ. स. १७८४).

नं. ७२४५ श्रीगणराज.

यादी. विजयदुर्गकरी गोलंदाज आले आहेत! त्यांजकडे तोफेंत घालावयास गर्भछावास सामान ता। अलीखान जमातदार

| वजन कचें | सुमारी |
|---|---|
| ८८॥ सूत पक्कें ८८।' | १०० गोळया सीसें भार ८८८ |
| चीवट १ | १॥ खादी पासोडी हात. |
| ८८॥ कोळसे | १ दाभण. |
| ८८॥ गंधक | १०२॥ |
| ८८१ खरर (?) पक्कें | |
| ८८२॥ | |

येणेंप्रमाणें देणें

छ. ३ रजब.

---

नं. ७२४६ श्री.

बाणाच्या छड्या सातशें तयार जाल्या. कोटीपुढें आहेत. आशी जाल्यास तोफखान्याच्या सोप्यांत गोळयांचे हौद बांधिले आहेत, त्यांजवर ठेवावयाच्या जाल्यास नेवितों. अगर जिकडे ठेवावयाच्या असतील तिकडे ठेऊं.

श्रीगणराज.

विनंती उपरी. छड्या मोजून ठेवणें. छ. १२ सवाल हे विनंती.

श्री.

यादी कलंदरखान बाण साज बाणाचे कारखान्याची दारू व सामान तयार बाण अजमासें ४० एकूण किंमत सामान रुपये. दारू बाणाची तयार व्हावयाची त्यास रु.

वजन पक्कें–सोरा रांधावयास.

| | | |
|---|---|---|
| ᵕ२ | सोरा ९।।।॰ | सुमारी सुमार |
| ᵕ२ | लांकडें ॰।।।॰ | |
| ᵕᵕ३ | साबण | १ᵕ= |
| ᵕᵕ१।। | तुर्टी | ॰।= |
| ᵕᵕ२ | दारू कलाली | १ |
| ᵕ।। | सिंदी | २।। |
| | | १५।। |
| १५० | निंबें | ॰।।= |
| | | १६ᵕ= |

वजन पक्कें.

| | | |
|---|---|---|
| ᵕ१ | सोरा ᵕ२ पैकीं. | |
| | उतारा | ० |
| ᵕ।≡ | गंधक | २।॰ |
| ᵕ।≡ | कोळसे | १।। |
| ᵕᵕ१।। | पारा | ५।।= |
| ᵕᵕ१।। | ऊद | १।। |
| ᵕᵕ।। | दारू कलाली | १० |
| ᵕ। | लसूण | १।।। |
| ᵕᵕ।९ | | १।। |
| | | २४ᵕ= |

१६ᵕ= दारूचा सोरा रांधावयास.
२४ᵕ= दारूचा मसाला.
४०।.

सव्वाचाळीस अजमासें लागतात. दोन रुपये × × × होतील. आज्ञा काय ?

---

## जखमी मयत वगैरेविशीं.

नं. ७२४७

राजश्री नारोबा नाईक स्वामी गोसावी यांस विनंती. उपरी. रघोजी चिलाजी मयत जाला. त्याची बायको समागमें जात्ये. सबब खर्चास रुपये पंचवीस पैकीं पावले पांच. बाकी वीस.

उत्तर—वीस रुपये देणें. छ. ८ जमादिलावल.

---

नं. ७२४८

राजश्री नारोबा नाईक स्वामी गोसावी यांस विनंती उपरी. मिराजी उपार शिरोळावर ठार जाला. त्याचे बायकोस खर्चास रुपये दोन देणें. छ. ९ जिल्काद.

---

ऐ. ले. सं. १५–५७

नं. ७२४९

राजश्री नारोबा नाईक स्वामी गोसावी यांस विनंती उपरी. बंदेखानाकडील दऱ्यापा ठार जाला. त्याचे कफनास पांच रुपये देणें. छ. ५ जमादिलावल.

---

नं. ७२५०

राजश्री नारोबा नाईक स्वामी गोसावी यांस विनंती उपरी. हिम्मत दमनसिंग यांजकडील सैद हबीब याचीं सणगें शिरोळावर हल्ला जाला त्या दिवशीं जळालीं. सबब अदमासें रुपया एक देणें. छ. ८ जिल्काद. सन तिस्सा (स. १७८९).

---

नं. ७२५१

राजश्री नारोबा नाईक स्वामी गोसावी यांस विनंती उपरी. खंडापा पाटील यांजकडील म्हाळापा ठार जाला. त्याचे कफनास पांच रुपये देणें. छ. ५ जमादिलावल.

---

## कैदखाना–सुटका–बंदोबस्त वगैरे:–

नं. ७२५२

राजश्री [1]नारोपंत व [2]वासुदेवपंत स्वामी गोसावी यांस विनंती. उपरी. नायकू व लक्ष्मण बिन आपाजी मोहिता पाटील मौजे कर्नाळ असामी दोन कैदेंत आहेत त्याणीं जामीन बिसूरकर मोकदम यास दिले त्यावरून मोकळीक केली असे. तर किल्ल्याबाहिर जाऊं देणें. दरवाजास चिठी अलाहिदा आहे. रवाना छ. ११ जमा. खर. सन आर्बा समानीन (स. १७८४). मया व अल्लफ. दोन असामींपैकीं एकच असामी कैदेंत आहे तो जाऊं देणें.

---

नं. ७२५३

रा. वासुदेव सदाशिव स्वामी गोसावी यांस विनंती उपरी. आवाई जाधव पाटील मौजे रेटरें ही बाकीचे रुपयाकरितां कैदेंत होती. तिला

---

१ उपनांव दामले. २ यांचें उपनांव अभ्यंकर.

माणको मल्हार कुळकर्णी सोनीकर जामीन जाहले. त्यावरोन मोकळीक केली असे. तर माणको मल्हार याचे हवालीं करणें. दरवाजास परवानगी चिठी अलाहिदा आहे. छ. १५ सफर. इहिदे समानीन (स. १७८१). हे विनंती.

---

नं. ७२५४

रा. नारोपंत व वासुदेवपंत स्वामी गोसावी यांस विनंती उपरी. मौजे देवर अष्टेकर मैंद कैदेंत आहेत त्यांकडे बोलावयास चि. राजश्री केसोपंत काळे यांजकडोन राणोजी चव्हाण आले आहेत त्यांस एक वेळ बोलोन बेऊं देणें. छ. १८ साबान. सन सल्लास समानीन हे विनंती (स.१७८३).

---

नं. ७२५५

[1]राजश्री दिवाणजी स्वामीचे सेवेशीं—सा. नमस्कार विनंती उपरी. जखमी लोक मिरजेस पाठविले आहेत. त्यांस रामाप्पा अगर खानाजी नाईक अगर हरकोणी तबीब मेळवून जखमी लोकांकडे नेमून द्यावा. जखमी लोक (त्याचे) पोटास परभारें देतील. आपण उत्तम ताकीद करून रोजबरोज ताकीद अशी कीं रोजचे आठ आणे अशी करावी. तबीब रुपया घेतात याविशीं ताकीद असावी. हे विनंती.

---

नं. ७२५६

कारखानाः— विज्ञापना. बाणांचा कारखाना चालत आहे. त्याचे बाण तयार छ. ४ सफर सन खमस पावेतों ५७ सत्तावन जाहले. पैकीं तपशील—

३० स्वारींत एक कैची नवी.
५ सोडिले.
२२ शिल्लक.

---

१ हरकोणी = दुसरा कोणी. रोजबरोज = दररोज. तबीब = जखमा शिवणारा व निगादास्त करणारा वैद्य. वैद्याचे पोटास जखमी लोकांनीं परभारें द्यावें, त्यांची मजुरी फक्त सरकारांतून मिळेल, वैद्य दर असामीस दररोज रुपया घेतो, परंतु त्यास रुपयाऐवजीं फक्त आठ आणेच मिळतील अशी ताकीद द्यावी असा या हुकमाचा अर्थ आहे. चिठी वासुदेवपंत अभ्यंकर उर्फ दिवाणजी यांस.

पुढें कारखाना चालतो याप्रमाणें चालूं अगर, आणखी ५० बाणांचें साहित्य द्यावें अगर यास काय सांगावयाचें त्याप्रमाणें करूं.

उत्तरः—तूर्त सामान पावलें असेल तितके बाण होऊं देणें. पुढें सांगावयास येईल.

---

नं. ७२५७

बंदोबस्तः—विज्ञापना. वेशीवर ताकीद केली होती कीं ब्राह्मण कोणी असो. रुजू केल्याशिवाय जाऊं देऊं नये म्हणून जाली होती. आतां आज्ञा काय ?

उ०– परवानगी द्यावी हे विनंती.

---

नं. ७२५८ श्री.

निमजग्यापलीकडे दिवट्या दिसतात म्हणून बुरुजावरील टेळ्या सांगतो.

उत्तरः—स्वारी तीर्थस्वरूप राजश्री आपांचे घरास गेली कीं काय लिहिणें. कचीं कुलपें स्वारी किल्लेंत आलेनंतर पक्कीं करणें. छ. ६ सवाल.

---

अद्भुत चमत्कार.

नं. ७२५९ श्रीगणराज.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेशीं विनंति उपरी......... तुम्ही कुरुंदवाडकर ब्याह्म.बराबर पत्र पाटविलें तें तिसरे प्रहरीं पावलें. पिरानकवठ्याजवळ वारणेस प्रवाह तीन दिवस उफराटा वाहिला याप्रमाणें बहुतांनीं पाहिलें म्हणोन लिहिलें हें आश्चर्य आहे. परंतु या गोष्टीस फार दिवस झाले म्हणतात. शांत सरकारांतून करणार. उत्तम आहे. ब्राह्मण सांगतील तें करावें.

---

नं. ७२६० चितारी

नरसापा चितारी तेथें आहे त्यास दोन दिवस निरोप देऊन पाटवून

द्यावा. अगत्य पाठवून द्यावा. वटसावित्री काढावयाची आहे. बहुत काय लिहिणें. लोभ असों दीजे हे विनंती. (कुरुंदवाडकरांचे कारभारी महादाजी बल्लाळ यांचें पत्र.)

नं. ७२६१

नोकरी ठेवणूक.

कारकून.

श्रीपांडुरंग प्रसन्न.

सेवेशीं विनंती--माधवराव श्रीनिवास उमेदवार आहेत. स्वामी कृपाळू होऊन आज्ञा करणार धणी समर्थ आहेत हे विज्ञापना.

उत्तर—

श्रीगणराज.

नारोपंत दामले यांजवळ नेमणूक करून देतों. जेथें पाहणीस वगैरे पाठवितील तेथें जावें.

विनंति उपरी. ही चिठी घेऊन येणें. नेमणूक करून देऊं. घरचें घोडें असावें. रोजमरा नक्त एकमाही आठ रुपये. हरकाम सांगतील तें करावें. येणेंप्रमाणें करार. हाजिरीचे तारखेपासून रोजमरा द्यावा.

नं. ७१६२ गोलंदाज व कारागीर

श्री.

शेख बखत्यार वलद शेख अफजल वतन बंगाला—

१ तोफांचें मळसूत्र तयार करीन.

१ एक तोफ तीनशेरी. त्याचा गाडा सुद्धां तीन घोडेचे जिलबीमध्यें चालवूं.

१ सावळीचा गोळा चार तोफांचा एक्या बारामध्यें उडवीन.

याप्रमाणें हुनर आम्हापाशीं आहेत. वरकड हुनर आहेत ते जसा जसा प्रसंग पडेल त्याप्रमाणें करूं. हें (खालीं लिहिलेलें) कांहीं आपले हातून होणें नाहीं.

| कासार | चांभार | लोहार | सुतार |
| --- | --- | --- | --- |
| १ | १ | १ | १ |

हे चार माझे हवालीं करावे. काम घ्यावें. आतां तूर्त पोटास द्यावें. कापड द्यावें हे हुनर करून दाखविलेवरी मुशाहिरा दरमहा साहेबांचे मर्जीस येईल तें करावें.

नं. ७२६३ श्रीगणराज.

विजेदुर्गचे गोलंदाजाचे भाऊ दोन आले आहेत त्यांस आंत जेवावयास आणावयाची रदबदल करितात. आज्ञा काय ?

उ०—जेवावयास येऊं देणें. राहावयाचे असलेस ठेवूं.

नं. ७२६४ हशम ठेवणूक.

श्री.

बाबाखान म्हणून रत्नागिरीकडील मुसलमान बरा शहाणा माणूस जमातदारी केलेला कांहीं माणूस घेऊन आला आहे. पांच सात असामी एक पहारा ठेवण्याचा जाहल्यास सांगों. आज आठ दिवस जाहले आहेत.

श्रीगणराज.

उ०——चांगला असला तर कचा चेहरा लिहिणें. उदैक पाहूं. गडबडीमुळें जे लोक सही केले आहेत त्यांस निरोप जाला असें सांगणें. मग पाहून कांहीं ठेवणें तर ठेवूं. छ. ७ रमजान. हे विनंती.

नं. ७२६५ बटवडे चिठ्या.

राजश्री नारोबा नाईक गोसावी यांस. विनंति उपरी. गोलंदाज फिरंगी दीमा जुजेऊ वट असामी ५ एकूण खर्चास———

| | |
|---|---|
| | रु. २५ |
| मलरुद्रीग | ५ |
| | ३० |

तीस रुपये देणें. छ. २ जमादिलावल.

नं. ७२६६

राजश्री नारोबा नाईक स्वामी गोसावी यांस——विनंति उपरी लुईस गोलंदाज यास रु. १० दहा जिलकादचे ऐवजीं देणें. छ. १८ जिलकाद तिस्सा (स. १७८९).

नं. ७२६७ श्री.

दमनासिंग जमातदार कृष्णास्नानास जाऊं म्हणतात. देवराव बावा दरवाजांत आहेतच. मलाही जा म्हटल्यास जाऊन येईन.

उ०—जाऊन उभयतांनींही लौकर यावें. कामकाज पडतें. सावंता नाहीं तर तुमचे लेकांपैकीं एकजण आम्हाजवळ उभा राहावयास पाठवणें आणि शीघ्र येणें.

---

नं. ७२६८ श्री.

विज्ञापना—हाजि-यांविशीं विनंति केली आहे. आज कांहीं होतशा असल्यास ताकीद करीन.

उ०—आम्ही जेऊन उठतांच लोक यावे. दोनशें लोकांची हजेरी आज घेऊं. हे विनंती.

---

स्वप्न.

नं. ७२६९ श्री.

फाल्गुन वद्य द्वादशी बुधवारीं पहाटेस निजून उठायाचे समयीं—तैजस श्रीमंत कैलासवासी धाकटे रावसाहेबांची स्वारी ओढेतीरीं बाग आहे तेथें आली म्हणून गेलों. एक बैठक बंगला होता तेथें चिरंजीव राजश्री दादासह गेलों. तों यवनांतील महापुरुष पीरजादे व धाकटीं मुलें दोन दोन चार वर्षांचीं दोनच मुलें पाहिलीं. दादा येथें कोठें आलों असें म्हटलें. नंतर श्रीमंतांकडे गेलों. सफेत पोषाख केशरी गंध उभें कस्तुरीच्या अक्षता लाविल्या आहेत. किंचित् श्मश्रु आलेली पाहिलें. एक मोहोर नजर केली. ते घेतली भेटून पायांवर डोई ठेविली. चिरंजीव बापू लहान होता त्याचा विनोद केला. नंतर एक पिस्तुलाची जोडी दिली. महाराज चांगली आहे म्हणून विनंति केली. आरबस्थानची आहे असें म्हणाले. चिरंजीव त्रिंबकपंत आपास बोलले तुमचे वडिलांस पिस्तुलें दिलीं तीं चांगलीं कीं यांस दिलीं हीं चांगलीं पाहणें असें म्हणाले. नंतर सावध जाहलों.

---

नं. ७२७० श्री. (शुद्धता.)

यादी. गोविंदा कुमठेकर याचे शुद्धतेविशीं सांवरडेकर यांस आज्ञापत्र सादर जाहलें. त्यास सांवरडेकरांचें म्हणणें आपणांस चार मौंवरगांवचें दैव (पंचायत) असलें पाहिजे. येविशीं आज्ञा ?

नं. ७२७१ श्री. (माघ शु. ७ श. १७३४–७ फेब्रु. १८१३)

यादी. सौ. लक्ष्मीबाई प्रसूत जाहली. पुत्र जाहला. सबब बारावे दिवशीं ब्राह्मणभोजनाकडे रोजकरी सु सल्लास अशर मय्यातैन व अल्लफ. छ. २३ माहे मोहरम.

२। ब्राह्मण.

।।। आचारी असामी १ वाड्यांत आचारी असामी.

१।। खटपटे व पुरणवाटे असामी ३.

२।

३।।। पोळ्या करणाऱ्या बाया असामी १५ दर चार आणे प्रों पावणेपांच रुपये [1]रुजू पन्हाळी ६ रुपये देणें. छ. ५ सफर. माघ.

नं. ७२७२ डाक्तर.

श्रीगणपति.

चिरंजीव[2] राजश्री बळवंतराव यांस परशुराम रामचंद्र आशीर्वाद. उपरी. राजश्री रामचद्रपंत[3] मामा यांचा प्रस्तुत वास्ता आहे. पोट फुगतें, याकरितां तेथें आपण फिरंगी वैद्य आणिला आहे त्यास एका दिवसाचे अवकाशें पाठवून द्यावा. रा छ. ८ जिल्हेज. बहुत काय लिहिणें. हे आशीर्वाद.

पौ छ. ९ जिल्हेज. सीत समानीन (स. १७८६). आश्विन मास.

समाप्त

---

१ मजकूर दुरुस्त करतांना रुजू लिहून पुढें दुरुस्ती करीत असत. २ चिठी परशुरामभाऊंची मिरजेस बाळासाहेबांस. ३ जोशी दुपरीकर.

# महत्त्वाच्या व्यक्ति व स्थळें यांची सूची.

[ प्रारंभीं व्यक्तींचीं नांवें, पुढें माहिती आणि शेवटीं पृष्ठांक दिले आहेत. ]


**श्रीरंगपट्टण**—७९९७, ८१९९, ८२२१, २२, ७७, ८३.

**श्रीनिवासराव परशराम उर्फ भवानराव प्रतिनिधि**-७९८८, ८०१४, ८२२६, ८२२७, ८३६४-९९.

**श्रीमंत**--बाजीराव रघुनाथ पेशवे, पूर्वी पेशव्यांचा उल्लेख श्रीमंत या एकेरी नांवानें करीत असत-७९७५, ७८, ८४, ८६. प्रति. वर जुलूम ८०१८-२२. स्वभाववर्णन ८०५८. देणग्या धर्मादाय ८०५९. राखी पौर्णिमा, वेंकटेशोत्सव, पुत्रोत्पत्तीचें अनुष्ठान ८०५९, ६०. स्वाऱ्याशिकाऱ्या ८०६१, ६२. नाशिक, कोपरगांव, वांई येथें प्रवास ८०६२, ६३. चिमा. आपाशीं वितुष्ट ८०६४. इंग्रजांशीं घसघस ८०७१. यापुढें फक्त महत्त्वाचे पृष्ठांक दिले आहेत-८१५१, ६३-६५, ९९, ८२४३, ४५, ५५, ७१-७५, ७९, ८१, ८४, ८९, ९४, ९९, ८३००, ०२, ०५, ०७, ०९, १०, १३, १८, २२, २५, २६, ३४, ३६-३८, ४२, ४६, ५०, ५३, ५४, ५७.

**अमृतराव पेशवे**-रघु. दादांचे दत्तक चिरंजीव-भुस्कुटे घराण्यापैकीं ७९८१, ८२, ८०२२. इंग्रजांचा आश्रय, काशीयात्रा, वाटेंत पेंढाऱ्यांची लूट वगैरे-८०५६, ५७, ८१२४, ३१, ३२, ६८, ८३, ८२३४-३६, ३८, ३९, ५२, ८३२५.

**अंबोजी इंगळे**-शिंद्यांचा सरदार-७९८३, ९६, ९८, ८०००, ०९, ८१, ८१७६, ७७, ८४, ८२५७, ८८, ९१, ८३१९, ३९, ४८, ४९, ५१. होळकराची कैद व शिंद्यांचा कारभार ८०७८, ७९, आजार ८०८१.

**अहंमदनगर**-७९९७, ८२५०-५५, ५६, ७५, ७७, ८२.

**अचेबीसिंग**-होळकराचा सरदार-७९९८, ८१३१.

**अंतर्वेदी प्रांत दिल्ली**-८००५, ०९, ८१६७, ८२३५, ४७, ८३०३.

**अंताजी हरि कानिटकर**–सांगलीकरांचा सेनापति–कासेगांवची लढाई. ८०२७. म्हसवड व रेटेरें येथील लढाया ८०२९, ३०. किन्हईची लढाई व दाणादाण ८०३०, ३१. रहि.ची लढाई ८०३०–३३, ८११६, ६७, ९०, ९१, ८२०२, ०३–०९, २९, ६०, ६२, ६४, ८१, ८३.

**आकतरलोणी**–जन. आक्टरलोणी–८३४८.

**आग्रा प्रांत दिल्ली**–८००१, ०५, ०९, १०, ८१६७, ८२४९, ५२, ९३.

**आबा काळे**–पेशव्यांचा पलटणावरील सरदार–८०१८–२०, ६९, ८१७०.

**आबाजी हरि किबे**–८१५५, ८२८५.

**आपा देसाई निपाणकर**–सिदोजी नाईक निंबाळकर–८०५२, ९४, ९६, ८१६२, ७२, ८२, ९२, ९५, ८२५९, ६४, ७५, ८१, ८३०१, ०५, ०९, ३७, ५९.

**आल्पिष्टनसाहेब, लिपिष्टनसाहेब**– मौंट स्टुअर्ट एल्फिस्टन–इंग्रजांचा पुण्याचा वकील–८३४८, ५७.

**आनंदराव होळकर**–होळकरांचा वकील–८०६८, ८१७०

**आनंदराव भाऊ हुपरीकर जोशी**–कर्नाटकची सुभेदारी ८०६९, ८२८६, ९१, ९६, ८३२४.

**इंग्रज**–होळकराशीं युद्ध ७९८५, ८०१५. पेशवे व जुने मुत्सद्दी व सरदार यांमध्यें मध्यस्थी ८०४७–५९. समेटाचें धूर्त राजकारण ८०७९–८५. रजपूत व जाठ राजाशीं केलेला विश्वासघात ८०८२–८३. राजकीय-दृष्ट्या पीछेहाट ८०८१, ९१, ८१२३, २९, ३९, ७०, ७७, ८३, ८४, ९७, ९८, ८२११–१२, १९, २०, २४, २५, ३८, ४१, ४२, ४६, ४७, ४९, ५२, ५६, ५९, ६५, ७५, ७६, ८०, ८२, ८४, ९२, ९३, ८३०१, १२, २०, २६, ४८–५३, ५५, ५७.

**इंदूर प्रांत माळवा**– होळकरांची राजधानी ७९९६, ८३४६, ४७, ५०, ५२.

**इस्त्रंचीसाहेब–मि. स्ट्रैची**––वेलस्लीचा वकील–८०४७, ८१०८, ३०, ३३, ३९, ४३, ४४, ४८, ५२, ८२२२, २७, २८.

**करवीरकर** = पन्हाळेकर— ८०१५, ८१२५–२७, ८१, ९९, ८२००, ०१, २०, ४१, ७५, ७७, ८५, ८७, ८३०५, ०९, ४४, ४७, ५२, ५३, ६०.

**कऱ्हाड प्रांत सातारा**—माग्याची धामधूम ८०२३ ची लढाई–८०३४–३८, ८२१३, ८३०९–१५.

**कलुष** = कर्नल क्लोज–इंग्रजांचा पुण्याचा वकील–८०१३, ८०७१, ८९, ९८, ८११३, २४, ३२, ३७, ४३, ५७, ७०, ९२, ८२२३, २७, ३७, ४२, ५३, ५८, ७३, ७५, ७६, ८१–८५, ९३, ८३००, ११, १९, ४१.

**काशीराव होळकर**– तुकोजीरावाचा थोरला मुलगा ७९८०, ८३, ८१३१, ८२३४, ८८.

**काशीबाई**–भवानराव प्रतिनिधींची थोरली स्त्री– ८०१४, १८, २३, ३१, ३३. पुण्यांत कैद–८०३७, ८२०४, ०५, ०६, ०९, १३, ३०, ८३११, १४, १५, २०, २१, २३, ३५.

**काल्पी प्रांत अयोध्या**–मीरखानाचा हल्ला ८०००, १२.

**काळीसिद्ध प्रांत माळवा**–७९९८, ८३४६, ४९, ५०, ५३.

**काशी** = बनारस– ८००७, ८१३०, ३२, ३५, ६७, ६८, ७०, ८३, ८२४९, ५२.

**कासेगांव प्रांत सोलापूर**–ची लढाई ८०२६–२७.

**कान्होजी गायकवाड**–८०४९, ८१८४, ८२३८.

**किन्हईची लढाई**–८२०२–१०.

**कित्तूरकर सरदेसाई**– मल्लाप्पा देसाई नाडगौडा–सांगलीकरांची स्वारी ८०४६, इंग्रजांची उलट ८०५४, ८२४०, ४१, ४४, ५०, ५३, ५४, ६०, ६९, ७०, ८९, ९०, ९१, ८३०५, ३७, ५९,

**किरीटी रामराजा**–त्रावणकोरचा राजा–८०७०, ८१०९, ८४, ८३४०, ५१.

**कोळ्यांचा दंगा**–८१३७, ८२३९, ४६.

**कृष्णाजी भवानी** = पेशव्यांचा मुत्सद्दी—८०६२, ९०, ८१९९, ८३००, ०२, १३.

खंडेराव होळकर–मल्हाररावाचा अस्तवयी मुलगा– ७९८०, ८३, ८२४६

खंडेराव घोरपडे–सोंडूरकर–८३६०

खंडेराव रास्ते–८०५९. पुण्याचा कारभार ८०९१, ८१९१, ८२४६, ६८, ८१, ८७, ८९, ९०, ९२, ८३०२, ५५.

खंडोपंत–होळकराचा विश्वासू मुत्सद्दी–८०७०, ८११४, ८२७१, ८४, ९९, ८३१९, २५–२७.

गंगाधरराव गोविंद उर्फ बाळासाहेब मिरजकर–८२५०, ५४, ९७, ८३०४, २७, ३२, ३३, ३७, ४३–४५.

गणेशपंत कात्रे–प्रति.च्या दौलतीचा कारभारी–८०१५, ८२२०.

गोविंदराव परांजपे–पेशव्यांचा मावसभाऊ–८०६५, ८१३३.

गोरख–नेपाळचा राजा–७९९९, ८१७५.

गोहदचा राणा–७९९८, ८००८, ८०८२–८३, ८१७७, ८२३५, ९३.

गंगाधरशास्त्री पटवर्धन–गायकवाडाचा वकील–पेशव्याकडे दिवाई–८०५०, ५१, ८०६९, ८१०१, ८३५३.

ग्वाल्हेर–शिंद्यांची राजधानी ८००८, ८१७७.

गायकवाड बडोदेकर–७९८५, ८७.

ग्रांट डफ–इंग्रज इतिहासकार–७९९१–९३.

चिदंबर दीक्षित–वास्तव्य मुरगोड प्रांत कर्नाटक–हे याज्ञिक आणि साधू म्हणून उत्तर पेशवाईत प्रसिद्ध होते–८०९७, ८२९८, ८३२४, ३३–४०, ४५.

चिमाजी अप्पा–चिमणाजी रघुनाथ पेशवे–७९७८, ८०९१, ८२५५, ९०, ९९, ८३०२, ०७, १८, ४३, ४७.

चिंतामणराव अप्पा सांगलीकर–फक्त महत्त्वाचे पृष्ठांक पुढे दिले आहेत–७९८६. सरंजामाची वांटणी ८०४५. कर्नाटकांत स्वारी, नरगुंदकरांचा वेढा ८०४६–४७, ८१९१, ९४, ८२०२, ०७–१०, ८२२९–३१, ३९–६०, ६३, ६६, ७४, ८३४०, ४३, ४५.

चिंतोपंत देशमुख-पेशव्यांचा मुत्सद्दी-७९८२, ८०६९, ९०, ८१०१, ८२४६, ८३.

छत्रपति सातारकर-७९८७, ८०१५.

जईबाई-मल्हाररावाची स्त्री-७९८०.

जयवंत रघुनाथ मंत्री-इस्लामपूर येथील इनामदार ८०९५, ८२८८.

जाफराबाद प्रांत अयोध्या-७९९७.

जालीमसिंग-कोट्याचा महाराणा-८००२.

जिउबा अण्णा-जिवाजी रामचंद्र जोशी उत्तुरकर-८०२६, २७, ३०, ३१, ८१९३, ८२०२, ०३, ०५, ०९, १३, २०, ३०.

जिवलालसिंग-होळकराचा सरदार-७९९८, ८००७, ८१२९, ३७, ६४, ८४, ८२३४, ३५.

जेंकिन्स-इंग्रजांचा शिंद्यांकडील वकील-बेअब्रू व कैद ८०७८.

जोनाथ डंकिण- जोनाथन डंकन-मुंबईचा गव्हर्नर-८०१३, ८९, ८१४६, ८१७०, ८२७६, ९३, ९९, ८३५७.

टोंक रामपुरा किल्ला-८००१, ०२.

ताई तेलीण-प्रतिनिधींची मैत्रीण-८०१७, २०. बंड ८०३८-४१, ८२१६, १८, ८३३४.

तुकोजी होळकर-७९८०.

तिमाजी वेंकटाद्री-देशमुख प. मुर्तुजाबाद उर्फ मिरज ८३६२-९९.

त्रिंबकजी डेंगळे-पेशव्यांचा खिजमतगार व मुत्सद्दी-८०५१, ६९, ८१०१, १०, २९, ३१, ८२८२, ८३१०, ५३, ५५, ५६.

दाजी मैराळ-होळकरांचा मुत्सद्दी-८०६९, ८१७०

दादा गद्रे-पुण्याचा प्रसिद्ध सावकार- ८०८९.

दिल्ली—८००५, ०८, ८३०१, ०५, १०, ८३४६, ४८, ५३.

दिनकरराम गोखले-बापू गोखल्याचे चुलत चुलते-८३१५, ४१, ४२.

दीगची लढाई व वेढा-८००५, ०७, ०९, १०, ८२४२, ४९, ७६

दुआब प्रांत अयोध्या-८०००, ०५

दिनकरपंत पटवर्धन-पेशव्यांचे मुत्सद्दी-८१५१

**दौलतराव शिंदे**–फक्त महत्त्वाचे पृष्ठांक पुढें दिले आहेत–शिंदेशाही वरवंटा ७९७५, ७६. किळसवाणा अत्याचार ७९७९. होळकराशीं चुरस ७९८०, ८६, ९३–९६. अव्यवस्थित कारभार ८०१०, १४. युद्धांत अजागळ लुडबूड ८०७७. मुत्सद्दी मंडळ ८०७०, ७७. होळकराची भेट ८०७८. दरबारांतील दोन पक्ष व होळकराचा विश्वासघात ८०७८–७९. इंग्रजांशीं तह ८०८२. अजागळ लष्करी हालचाली ८१००, १२, १५, ६१, ७०, ७५, ८२३४–४०, ४२, ४६, ४९, ५२, ५६, ७४–७६, ८०, ८४, ८८, ९९, ८३४६–५२, ५४

**धोंडोपंत निरसुरे**–नानांचे विश्वासू मुत्सद्दी–७९८१

**धोंडोपंत गोडबोले**–८२४३, ४४, ८७, ८८, ९२–९७, ८३०५, ०८, १६, १७

**धर्मसिंग**–पंजाबी शीख सरदार–७९९८, ८०७१

**धुरपतराव यादव**–करवीरकरांचा सरदार–पटवर्धनांची कैद ८०९२

**धोंडजी वाघ**–७९८५, ८६

**धोंडो बापूजी जोशी**–र. कासें ता. सावडें जि. रत्नागिरी–पुण्याचीं सर्व बातमीपत्रें यानें लिहिलेलीं आहेत–फक्त महत्त्वाचे पृष्ठांक पुढें दिले आहेत–८१०९, ८२४२, ५५, ६७, ७९, ८८, ८३०२

**नरसिंगराव अन्या– नरसिंह खंडेराव विंचूरकर**–८०७०, ८१०८, १३, ३१, ३७, ४७, ७२, ८४, ९२, ८२०१, ४३, ७४, ७५, ८२, ८३, ८७, ९०, ८३०७, ०८, १०, २२, २५, ४७, ५५, ५६

**नागो जिवाजी**–होळकराचा सरदार–७९९८, ८००७, ८१२१, २४, ३०, ८२३७

**नारोपंत चक्रदेव**–नानांचे विश्वासू मुत्सद्दी–७९८१, ८०८९

**नाना फडनवीस**–बाळाजी जनार्दन भानू–राज्यनाशाचें मन्वंतर ७९७४. भविष्यवाणी ७९७५. घोटाळा व तारांबळ ७९७६–७७. महाडचें कारस्थान ७९७८. शेवटचे दिवस ७०७६, ७८, ८४, ८०१५–१७

**नारोपंत आपटे**–सांगलीकरांचा शहापूरचा कमावीसदार–दगाबाजी व बंडावा–८१५०, ६६, ७७–७९, ८२७९, ९५

**नारोबा आवटी**–पेशव्यांचा मुत्सद्दी–८३५५, ५६

**नानाजी माणकेश्वर**–सदा. माणकेश्वराचा बंधु–८०५५, ८१८२, ८३३५

**नाथाजी शेडगे**–८०३०, ३१, ८२०६, ०९, १०

**निंबाजी भोसले रांजणीकर**–८०३०, ३१, ८१८४, ८९, ८२०४, ०५, ०६, ०९

**नॉरफोर्ड कॅप्टन**–८००६

**निजामअल्ली**–७९७८, ८७

**नेगीनहाळचा वेढा**–८२४७–५२, ५३, ५४

**प्रतिनिधि किंवा पंत**–परशराम श्रीनिवास प्रतिनिधि–पुण्यांत कैद व हाल ७९८४–८७, ८०१६–२१. सातारा प्रांतीं पलायन व दंगा ८०२३–२५. वांईवर धाड ८०२५. सरदारांचीं नांवें ८०२७. भागवत मामावर छापा ८०२८. किन्हईची लढाई ८०३०, ३१. रहिमतपूरची लढाई व पराजय ८०३०–३३, ८०३५. कन्हाडची लढाई, दौलतीचा नाश ८०३४–३७. पुण्यांत पुनः कैद ८०३७, ४१. यापुढें फक्त महत्त्वाचे पृष्ठांक पुढें दिले आहेत–८०८७, ८१०३, ०५, १६–२०, ५२, ५४, ६१, ६८, ९०, ९१, ९३, ९४, ९६, ८२०२, ०६, ०८, ०९–१२, १३–२१, ४४, ५९, ६२, ८६, ८८, ८३०६, ११–१७, २०, २१, ३५, ३६, ३८, ५४

**परशुराम भाऊ**–परशराम रामचंद्र पटवर्धन तासगांवकर–७९७७–७८

**पटणें** = पाटणा प्रांत अयोध्या–८००८, ८१३५

**परीट चाबुकस्वार**–८०५९, ८२८९

**पटवर्धन सरदारांची दैना**–आपापसांत वितुष्ट, सावकारी कर्जाचा तगादा, सांगली-मिरज वांटणी, तासगांव व कुरुंदवाड सरंजामांत वांटण्या–८०४१–४५

**पंत सचिव**–७९८७

**पाटलोजी माने**–फत्तेसिंगाचा सरदार–८०२३

पांडुरंग भास्कर—रामचंद्र आपाशीं कटकट, जमखंडी ठाण्यांत बंड ८०४४—४५, ८१२२, ४५, ४९

पाळेगारांचा दंगा— ८१४४, ८२२९, ४०, ६०.

फकीरजी गाढवे—शिंद्याचा सरदार—७९७८

फत्तेसिंग माने—होळकराचा सरदार—७९८२, ८०२२—८०२४. सरदारांचीं नांवें ८०२३. कासेगांवची लढाई, फत्तेसिंग, पाटलोजी, सुभानजी वगैरे माने ठार—८०२७, ८७, ९४, ८१११, १६, २०. माने मंडळी-चीं घरेंदारें जप्त ८१६८, ९४, ८२६२

फासेट ले. कर्नल— ७०९९, ८०००

बडोद्याचे गायकवाड—शेलूकराशीं तंटा, अहंमदाबादेची सुभेदारी, कान्होजी व मल्हारराव यांचे दंगे, पेशव्यांशीं घसघस, गायकवाडींत इंग्रजांचा प्रवेश वगैरे ८०४९—५१

पुणें दरबार—फक्त महत्त्वाचे पृष्ठांक पुढें दिले आहेत—पुण्यांत महागाईचा हाहा:कार ८०६७—६८. कारभाऱ्यांत वितुष्ट ८०६८. वार्ता ८१०९, १२,२१, २५. श्रावण दक्षिणा ८१२९, ३२, ३४, ४६, ५१, ५८, ६४,९९, ८२९५, ८३०२, १३, १७, १८, २२, २५, २६, ४१, ४७.

बळवंतराव फडणीस—प्रतिनिधींच्या दौलतीचे कारभारी ८०१५, २५—२७ किन्हईची लढाई ८०३०—३१. रहिमतपूरची लढाई ८०३१—३३. पुण्यांत कैद ८०३७, ८१०३, ८११८—२०, ५४, ८२०३, ०४, ०५, ०९, १३, १८, २०, २९, ३१, ४३, ४४, ४६, ५९, ६०, ८८, ८३११, १४, १५, २०, २१, २३.

बळवंतराव नागनाथ—पेशव्यांचे आवडते दरबारी—८२८१, ८३१९.

बाळाजी महादेव दामले—हा अनेक वर्षे पटवर्धनांचा रहिमतपूरचा कमाविसदार होता. सातारा प्रांताचीं सर्व बातमीपत्रें यानेंच लिहिलेलीं आहेत. याचे फक्त महत्त्वाचे पृष्ठांक पुढें दिले आहेत— ८१०३, ५२, ५४, ६८, ७४, ८०, ९६, ८२०७, ०८, १०.

बाबा फडणीस—रामचंद्र श्रीधर काळे, जमखंडीकरांचा पुण्याचा वकील—महत्त्वाची याद ८०४८, ८१४१, ४३.

बाळकृष्णपंत भाऊ बाळ—नानांचे विश्वासू मुत्सद्दी ८३२२.
बाळकृष्ण लक्ष्मण लागू—शिरहट्टीकर—८३५८—६०
बाळंभट बाटवे—८३५५.
बाजीराव बल्लाळ पेशवे—८३६६, ८१, ९५
बापूजी शिंदे—शिंद्यांचा सरदार—७९९८, ८००२, ०३, ०९, ७७, ८११४, ८३०३, ०४, ५५
बापूजी शिंदे—धारवाडचा किल्लेदार—८३५५, ५८
बाणाजी शेट्या—शिंद्याचा मुत्सद्दी—७९७८
बाळोबातात्या पागनीस—शिंद्यांचे कारभारी—७९७६, ७८
बाळोजी कुंजर—बांगापूरच्या पाटलाचा लेकावळा व पेशव्यांचा दिवाण—७९७७, ९१, ८००८, २१, ८२५६, ८४, ८५, ९०, ९१, ९४, ९९, ८३०२, ०५, १९, ५१
बाबा फडके—पेशव्यांच्या हुजरातीवरील सरदार. नांव रामचंद्र हरि फडके—७९८१, ८२, ८०२३. इंग्रजांशीं कटकट, वसई किल्ल्यावर कैद व मृत्यु ८०५७, ५८, ८२५८, ८३१९, ४१, ५७
बापू गोखले—बापूजी गणेश गोखले—प्रांत. वर चढाई, रहिमतपूरची लढाई ८०३१—३३. कन्हाडची लढाई ८०३४—३७. ताई तेलिणीचें बं. व वासोट्याचा वेढा ८०३८—४१. ९७.पुण्याचा कारभार ८१४७, ७३, ७५, ८२, ८३, ८७, ९२, ८२०९—१२, १३—२०, ३३, ३९, ५५, ५९, ७५, ८१, ८२, ८७, ९०, ९२, ९६, ८३००, ०२, ०७—१७, २०, २३, ३३—४०, ४१, ४२, ४५, ५६, ६०
बाजीबा मोघी—पेशव्यांचा मुत्सद्दी, इंग्रजांचा हस्तक—८०६८, ८१०१, ८२५६, ८३, ८३११, ५२
बाळाजी काशी किवे—८३५३, ५४
बाळशास्त्री टोकेकर—पेशव्यांचा दरबारी—८१६३
भगवंतराव शिंदे नाझरेकर—८०२९, ८२०१
भवानजी घाटगे—८०३४—८३५९

**भरतपूरचा वेढा**–८००१, १०, ७३–७७, ८१४७, ४९, ५६, ५७, ८२९२

**भिल्लांचा दंगा**–८०६१, ८२३३, ८३०८

**भीमराव मुंढरगी**–८०४६, ८२७४, ७८, ७९

**मथुरा प्रांत दिल्ली**–८००५, ०९, ८१६७, ८२, ८३, ९९, ८३०२, ४९

**मंदोसर प्रांत माळवा**–७९९६, ८००७, ८१३०, ३५, ३६, ८२९४, ९९

**महादजी शिंदे**–७९७६, ७९, ८४

**मखसुदाबाद**–मुर्शिदाबाद प्रांत अयोध्या–८००८, ८१३६

**मद्रास**–चेनापट्टण–७९९७, ८१९९, ८२१४

**मल्हारराव होळकर**–तुकोजीरावाचा धाकटा चिरंजीव–७९८०, ८३

**मल्हारजी बोडके सरनोबत**–प्रातिनिधींचा सरदार–८०२५. सांगलीकरांचा छापा, रेटऱ्याच्या लढाईंत मृत्यु ८०२९–३१, ८१८४–९०, ९७

**महंमद दिलेलखान**–मिरजेचा मोंगल सुभेदार–८१७१, ८३६२-९९

**महिपतराव राजे**–होळकराचा सरदार–८०६९, ७१, ८१७०, ८३४७

**मानसन**–ब्रिगे. जनरल–होळकरावर चढाई व पीच्छेहाट–८०००, ०४

**माधवराव फाळके**–८०६९, ८१७०

**माधवराव रास्ते**–७९८७, ८१०९, १०, ८२१९, ७८, ७९, ९७, ८३०५, ०७, ३७, ६०

**मालोजीराजे घोरपडे**–कुमठेकर, पेशवाईतील नामांकित शिलेदार होते––८१९५

**मिर्झापूर प्रांत आयोध्या**–८००७, ०८, ८१३०, ३३, ३५

**मीरखान**–होळकराचा सरदार–७९८२, ९०, ८०००, ०२, ०६, ०८, ०९, ७१–७४, ८१२१, २४, ३०, ३३, ३५, ६८, ८३, ९२, ८२४७, ४९, ५२, ५३, ५४, ५५

**मुकुंदरा घांट**–८००१, ०३

भरतपूरचा वेढा–८००९, १०, ७३–७७, ८१४७, ४९, ५६, ५७, ८२९२

भिल्लांचा दंगा–८०६१, ८२३३, ८३०८

भीमराव मुंढरगी–८०४६, ८२७४, ७८, ७९

मथुरा प्रांत दिल्ली–८००५, ०९, ८१६७, ८२, ८३, ९९, ८३०२, ४९

मंदोसर प्रांत माळवा–७९९६, ८००७, ८१३०, ३५, ३६, ८२९४, ९९

महादजी शिंदे–७९७६, ७९, ८४

मखसुदाबाद–मुर्शिदाबाद प्रांत अयोध्या–८००८, ८१३६

मद्रास–चेनापट्टण–७९९७, ८१९९, ८२१४

मल्हारराव होळकर–तुकोजीरावाचा धाकटा चिरंजीव–७९८०, ८३

मल्हारजी बोडके सुरनोवत–प्रतिनिधींचा सरदार–८०२५. सांगलीकरांचा छापा, रेटऱ्याच्या लढाईत मृत्यु ८०२९–३१, ८१८४–९०, ९७

महंमद दिलेलखान–मिरजेचा मोंगल सुभेदार–८१७१, ८३६२·९९

महिपतराव राजे–होळकराचा सरदार–८०६९, ७१, ८१७०, ८३४७

मानसन–ब्रिगे. जनरल–होळकरावर चढाई व पीच्छेहाट–८०००, ०४

माधवराव फाळके–८०६९, ८१७०

माधवराव रास्ते–७९८७, ८१०९, १०, ८२१९, ७८, ७९, ९७, ८३०५, ०७, ३७, ६०

मालोजीराजे घोरपडे–कुमटेकर, पेशवाईतील नामांकित शिलेदार होते—८१९५

मिर्झापूर प्रांत आयोध्या–८००७, ०८, ८१३०, ३३, ३५

मीरखान–होळकराचा सरदार–७९८२, ९०, ८०००, ०२, ०६, ०८, ०९, ७१–७४, ८१२१, २४, ३०, ३३, ३५, ६८, ८३, ९२, ८२४७, ४९, ५२, ५३, ५४, ५५

मुकुंदरा घाट–८००१, ०३

**मुंबई**–ममई–७९९७, ८१०१, ७०, ७७, ८४, ८२४६, ५३, ५८, ५९, ७६, ८३, ९३, ८३५१, ५३, ५७, ५८

**मोरो अनंत पेंढारकर**–प्रतिनिधींच्या दौलतीचे कारभारी ८०१५, १९, २०, २३, २५. किन्हईच्या लढाईत जखमी व पाडाव ८०३०–३३. पुण्यांत कैद ८०३७, ८१०३, ५४, ८२०४, ०५, ०९, १०, ८३२०, २१

**मोरोबाद्‌दा**–मोरो बाबूराव फडणीस–७९८१, ८२, ८०२३. मृत्यु ८०५५, ८७, ८१३२

**मोरोबादादा फडके**–८०६९, ८१७०

**यशवंतराव होळकर**–तुकोजीरावांचे दासीपुत्र–यांचे फक्त महत्त्वाचे पृष्ठांक दिले आहेत–दक्षिणेवर स्वारी ७९७३, ८०–८२ इंग्रजाशीं युद्ध ७९८५–८०१४. तहाची वाटाघाट ७९९३, ९४–९९. पूर्वतयारी ७९८५–९२. बुंदेलखंड ७९९९, ८०००. गानमी कावा व इंग्रजांची त्रेधा ८०००–०४. मानसनची पीच्छेहाट ८००१–०४. फितूर ८०११. एक राजकारणी पत्र ७९८८, ८९. देशाभिमान ७९९०. भरारी ८००४. दीगची लढाई ८००५–०७. इंग्रजांचा छापा ८००६. भरतपूरचा वेढा, इंग्रजांची दुर्दशा ८०७४–७७. मुलीचें लग्न ८०७०. आजार ८०७१. अंबोजीस शिक्षा व शिंद्यांची उठावणी ८०७९. इंग्रजाशीं तह ८०८३. योग्यता व युद्धशास्त्राचें अपूर्व ज्ञान, अलौकिक व्यक्तिमत्व ८०८४–८६. पराक्रम व लष्करी हालचाली ८१००, १२, १४, २१, २३, ३०, ३४–४०, ६७, ६८, ७०, ७५, ७७, ८३, ८४, ९७, ९८, ८२०१, १९, २०, २१, २४–२६, ३४–४०, ४५, ४८, ६५, ७५, ७६, ८०, ८४, ८८, ९१, ९२, ९९, ८३०२–५, ११, १२, २७, ४७, ४९, ५२, ५३

**यशवंतराव घोरपडे**–गजेंद्रगड घराण्यापैकीं–हे नामांकित शिलेदार आणि शिंद्यांचे इंग्रजांकडील वकील होते–८१३१, ९५, ८२८०, ८१, ८४, ९९

**यशोदाबाई**–सवाई माधवरावांची दुर्दैवी स्त्री–७९७५, ८३४६

**रघोजी भोसले नागपूरकर**–७९७८, ८२, ८७, ८१६८, ८२३४, ३९, ५३, ७४, ७५, ८३, ८४, ९३, ८३०२, १०, १९, ४९, ५२

**रघुनाथराव माने**–भीमबहाद्दरीचा किताब–८२८५, ८७, ८८, ९५

**रतनसिंग राठोड**–भरतपूरचा जाठ राजा–७९९८–८०११, ७१, ८२२५

**रणजितसिंग**–लाहोरचा शीख सरदार–हा पुढें स्वपराक्रमानें 'पंजाबचा सिंव्ह' या नांवानें प्रसिद्धि पावला–८३३९, ४०, ४८, ४९

**रहिमतपूर जि. सातारा**–ची लढाई ८०३२–३४. दुर्दशा ८०२८, ८११८, ६२, ६८, ९६, ८२०८, १३–२०, ४४

**रंगराव राजेबहाद्दर**–सरंजामाची जप्ती–८०६२, ८१०८, ८३१०, ५४

**रघूत्तमराव**–निजामाचा दिवाण–सरकारची गैरमर्जी व कैद ८११५, ८२१५

**राजकुंवरबाई भोसले सरदेसाई वाडीकर**–८२३२

**रामचंद्रपंत आपा**–रामचंद्र परशराम पटवर्धन–यांचे फक्त महत्त्वाचे पृष्ठांक दिले आहेत–कर्जफेडीचा तगादा ८०४३. जमखिंडीचें बंड ८०४४, ४५. इंग्रजांचा तगादा ८०४७, ४८, ९७, ९८, ८१०६, २२, ४९, ५२, ५६, ५९, ६०, ८२२२, ५९, ७७, ८३०९, ३७, ४०, ५९

**रामचंद्र शिवाजी**–सोलापूरचा किल्लेदार–फितूर, कैद व जप्ती–८०५५, ८१७२, ८२०१, ३८, ३९, ४३, ५३

**रामचंद्र गोसावी पैठणकर**–पेशव्यांचा आवडता गवई–८०५९, ८१३७, ७२, ८२९०

**रामाजी अनंत**–हे तेरदाळचे फडणीस–८१२२

**लक्ष्मीबाई**–प्रति. थोरली स्त्री–दंगा–८०३८, ८३२४, ४०

**लाखेरीची लढाई**–७९८०

**लासवारीची लढाई**–७९८३

**लीकसाहेब**, लिखासाहेब=जन. लेक–इंग्रजांचा सरसेनापति–७९९१, ८०००–१४. युद्धाचा नकाशा ८०७३. भरतपूरचा वेढा–हल्ले, त्रेधा व दाणादाण ८०७४–७७, ८११४, ७६, ८४, ८२२१, ४८, ५६, ८०, ८३, ९३, ९९, ८३०३, ११

**लॉर्ड कार्नवालीस** = करणवालीस– गव्हर्नर जनरल– सभेटाचें धूर्त राजकारण–८०८०–८४. मृत्यु–८०८१, ८१७६

**वसलीसाहेब**–जनरल वेलस्ली–७९८७, ८००१,०७, ५४,८०८७, ८८, ९४, ८११०, ११, १४, ३२, ३९, ४८, ८४, ९९, ८२१४, २१, २८, ५८, ८३, ९३, ८३३५

**वसंतगड**–८०२३, ८३३४

**वसईचा तह**–७९८१

**वासोटयाचा किल्ला**–८०२३, ३८–४१, ८३३४–४०

**वाडी प्रांतीं दंगा**–खेम सावंताचा करवीरकराशा तंटा, अल्पवयी मुलाचा खून, लक्ष्मीबाई–दुर्गाबाई या राण्यांचें शौर्य, फोंड सावंताची त्रेधा, करवीरकराची स्वारी वगैरे ८०५१–५४. खेम सावंत मृत्यु ८०८७, ८२३२, ६१, ८७, ८३०६

**वाळव्याचे थोरात**–शिवाजीराव थोरात–सरंजामाची जप्ती ८०५५, ८१०२, ७३, ७४

**विठ्ठल महादेव बक्षी**–शिंद्यांचे दिवाण–८१३६

**विठ्ठलराव बापू**–विठ्ठलराव पांडुरंग, सांगलीकरांचे धाकटे बंधु—८२३१, ६०, ६२, ६३, ८३००, ०३, १९, ५४

**विठोजी होळकर**–तुकोजीरावाचे थोरले दासीपुत्र–७९८०–८३

**विसाजी राम गोखले**–बापू गोखल्यांचे चुलत चुलते–८०३६, ३७, ८२१३, ३३, ८२, ८६, ८९, ९६, ८३०७–१२, १४–१६, २०, २१, २३, ३७, ३८, ४१, ४२

**वैजनाथभट मामा भागवत**–पेशव्यांचा आवडता आश्रित–प्रतिनिधींचा छापा ७९८१–८२, ८१८२, ९५

**व्यंकटराव भास्कर भावे**–नरगुंदकर–८२६६

**शामली**–प्रांत अंतर्वेदींतील ठाणें–८००५

**शामतखान पठाण**–होळकराचा सरदार–७९९८, ८००७, ११, ८११२, १४, २१, ३०, ८२२४, ६५

**शाहूमहाराज**–सातारकर छत्रपति–८३६६, ८१, ९५

**शिरूरकुकडी प्रांत पुणें**-येथें इंग्रजी फौजेचा मोठा तळ होता-७९९७, ८३४२, ४७, ५०, ५२, ५३

**शिवाजीराव डुबल**-कऱ्हाडचे इनामदार-८३६७, ८४०२

**शिवाजी बल्लाळ जोशी**-मिरज प्रांताचा बेहडा ८३६७, ९९, ८४१०

**श्वेतपति राजे**-हा कोचीनचा राजा-८०७०

**शिंदे बाया**-महादजी शिंद्याच्या स्त्रिया-७९७९

**सवाई माधवराव पेशवे**-७९७४, ८०१६, १९

**सखो रुद्र**-निजामाचा सेनापति-८१६४, ८२१५

**समशेरबहाद्दर**-बांद्याचा नबाब-८१७३

**सदाशिवराव बक्षी**-शिंद्याचा सरदार-७९९६, ९८, ८००३, ८०७७, ८११४, ६३.

**सदाशिव नाईक वानवळे**- पुण्याचे नवकोटनारायण सावकार—८१५३, ५६, ५९, ६०, ८२५७, ८३५५

**सदाशिव माणकेश्वर**-पेशव्यांचे दिवाण-८०६९, ८८, ९०, ८१०१, ३७, ६३, ६८, ९२, ८२०१, २३, ३८. कफक्षयाची भावना ८२४३, ४९, ८१-८३, ८९, ९०, ९३, ९४, ८३००, ०२, १३, २५, ३५, ४७, ५२, ५३, ५५, ५७

**सर्जेराव घाटगे**-शिंद्यांचा सासरा व सरदार-नांव सखाराम घाटगे-सर्जेराव. घराणें कागल-७९७७, ९५, ८०१९-२०, ९४, ९६, ८१४९, ७६, ८२४१, ५७, ८८, ९४, ९९, ८३११, ४६, ४८, ५०-५२

**सर जॉर्ज बार्लो**-गव्हर्नर जनरल-८०८१-८५. धूर्त राजनीति ८०८३-८४

**सालबाईचा तह**-शिंद्यांची मध्यस्थी-७९७५

**सांगली-मिरज वांटणी**-८०४५

**सावनूरचा नबाब**-८०५४, ८३५५

**सिद्धेश्वरराव महिपतराव विनिवाले**- बेळगांवचे किल्लेदार-८१५०, ७७, ८२६९, ७९

**सिदोजी मालोजी पोळ**-पाटील मौजे दहिवाडी ८३६२, ६८-९९

सिदोजी बिन् तावजी बंडगर-पाटील मौजे सलगरें-८३६३, ९९
स्वराज्य व स्वधर्म-७९८९
सुभानजी माने म्हसवडकर- प्राति. सरदार-८०२५. म्हसवडची लढाई व मृत्यु-८०२९, ९४, ८१३९, ६२, ६६, ९४, ९९.
हडपसरची लढाई-७९८१, ९६, ८०२२.
हरनाथसिंग-होळकराचा सरदार-७९९८, ८००१, ०७, १०, ११, ८१११, १२, १५, २१, ३०, ८२२४, ३५, ७१, ९२, ८३१९
हरीपंत भावे-होळकराचा सरदार-७९९८, ८००२, ०८, २३, ८१११, ८२४५, ४६, ५०, ५२, ५४, ५६, ८५, ८८

# ऐतिहासिक-लेख-संग्रह
## आणि
# मिरजमळा दप्तर

मिरजमळा दप्तर— पटवर्धन सरदारांचें मिरजमळा दप्तर हें एक मराठ्यांच्या ऐतिहासिक साधनसामुग्रीचें अपूर्व भांडार होय. या दप्तरांतील कागद म्हणजे तत्कालीन राजकीय आणि सामाजिक घडामोडींचें चालतेंबोलतें चित्रच होय. मराठी राज्याच्या उत्तरार्धातील अनेक राजकीय घडामोडी, अनेक राजकारणांचे धागेदोरे, ज्यांनीं हा अपूर्व इतिहास घडविला त्यांचीं बहुरंगी स्वभावचित्रें, अनेक राष्ट्रपुरुषांचे हर्षामर्षांचे प्रसंग, अनेक राष्ट्रवीरांनीं स्वराज्यरक्षणार्थ केलेले युद्धप्रसंग, तत्कालीन व्यापार व उद्योगधंदे, करपद्धति आणि करवसुली, सामाजिक व धार्मिक समजुती व तंटे, दिवाणी व फौजदारी न्यायनिवाडे अशा अनेक गोष्टींची वास्तविक माहिती मिळण्याचें मिरजमळा दप्तर हें एकच साधन होय. असो. आमचे वडील कै० वासुदेवशास्त्री खरे यांनीं आणि त्यांच्या पश्चात् आम्हीं या दप्तरापैकीं चिटणिशी आणि फडणिशी दप्तरें तपासून त्यांपैकीं महत्त्वाचे कागद ग्रंथरूपानें प्रसिद्ध करीत आहों. कै० तीर्थरूपांचा हा ग्रंथ म्हणजे—

ऐतिहासिक-लेख-संग्रह हा होय. पानिपतोत्तर मराठी इतिहासाबद्दल हा ग्रंथ प्रमाणभूत समजला जातो. या ग्रंथांत आतांपर्यंत सुमारें आठ हजार ऐतिहासिक पत्रें छापलीं गेलीं आहेत. सर्व पत्रें प्रकरणवारीनें आणि कालानुक्रमानें छापलेलीं आहेत. प्रत्येक पत्रावर शक, सन, मिति, तारीख आणि चंद्र हीं सर्व काळजीपूर्वक दिलेलीं आहेत. प्रत्येक प्रकरणाचे प्रारंभीं पुढें छापलेल्या पत्रांचा सारांश आणि त्यासंबंधीं इतरत्र उपलब्ध होणारी माहिती जमेस धरून विस्तृत प्रस्तावना लिहिलेली असते. अशा या प्रस्तावना म्हणजे उत्तरकालीन मराठी राज्याचा स्वतंत्र इतिहासच

होय. ज्यांनीं हा इतिहास घडविला त्यांच्याच शब्दांनीं हा इतिहास या ग्रंथांत वर्णिला गेला आहे हा या ग्रंथाचा विशेष होय. सहाशें पृष्ठांचा एक भाग याप्रमाणें या ग्रंथाचे आतांपर्यंत पंधरा भाग प्रसिद्ध झाले आहेत. या भागांतून आलेले विषय पुढें दिले आहेत. पुढील यादींपैकीं फुल्या केलेले ग्रंथ आतां आम्हाकडे शिल्लक नाहींत.

---

# ऐतिहासिक-लेख-संग्रहांतील विषयानुक्रम.

* **भाग पहिला**—सन १७६० जानेवारी ते १७६३ मेपर्यंत. नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दीची अखेर—माधवरावास पेशवाईचीं वस्त्रें—मोंगलांची पुण्यावर स्वारी—लढाया व तह—माधवराव व दादासाहेब यांमध्यें वितुष्ट—घोडनदीची लढाई—समेट—राघोबाची पटवर्धन वगैरे सरदारांवर गैरमर्जी—मिरजेचा वेढा—मोंगलांची पुण्यावर दुसरी स्वारी—पुण्याचा विध्वंस—पेशव्यांची मोंगलाईवर स्वारी. डे. अ. पृ. ४८०. किं. तीन रुपये.

* **भाग दुसरा**—सन १७६३ मे ते १७६४ डिसेंबरपर्यंत. राक्षसभुवनची लढाई—मोंगलांशीं तह—हैदरअल्लीचें मनोवेधक चरित्र—पेशव्यांची हैदरअल्लीवर पहिली स्वारी—रटेहळ्ळी, अनवटी, हावेरी येथील लढाया—सावनूरचें रक्षण— धारवाडचा वेढा. डे. अ. पृ. ४८०. किंमत तीन रुपये.

* **भाग तिसरा**—सन १७६४ डिसेंबर ते १७६९ ऑक्टोबरपर्यंत. अनंतपूर व बिदनूर येथील लढाया—हैदरअल्लीशीं तह—भोंसल्यावर पहिली स्वारी—तोतयाप्रकरणाचा उद्भव—राघोबाची गोहद वगैरे उत्तरप्रांतीं स्वारी—पेशव्यांची हैदरअल्लीवर दुसरी स्वारी—शिरें, मदगिरी, चेनरायदुर्ग येथील लढाया—तह—माधवराव व राघोबा यांची आनंदवल्लीस भेट—धोडपची स्वारी व राघोबास कैद—भोंसल्यावर दुसरी स्वारी. डे. अ. पृ. ४८०. किं. तीन रुपये.

* भाग चवथा—सन १७६९ ऑक्टोबर ते १७७३ ऑगस्टपर्यंत. भोंसल्यांशीं तह—हैदरअल्लीवर तिसरी स्वारी—कोल्हार, बाळापूर, नंदीदुर्ग वगैरे ठिकाणीं लढाया—हैदराचा गोपाळरावावर छापा—निजगलचा वेढा—पेशवे देशीं येतात—गोपाळरावाचा मृत्यु—त्रिंबकराव मामाचे पराक्रम—मोतीतळावाची लढाई—श्रीरंगपट्टणचा वेढा—तह—बिनीवाल्यांची फत्तरगडावर स्वारी—जाटांशीं लढाई—बादशहाची स्थापना—दिल्लीची लढाई—रोहिल्यांवर सूड—पेशव्यांचा आजार व त्यांतील अनेक हृदयद्रावक प्रसंग—मृत्यु—रमाबाईचें सहगमन—नारायणरावाची पेशवाईवर स्थापना—छोटी कारकीर्द व खून. डे. अ. पृ. ६००. किंमत तीन रुपये.

* भाग पांचवा—स. १७७३ ऑगस्ट ते १७७५ जुलईपर्यंत. बारभाईचें कारस्थान—निजामअल्लीशीं लढाई व भेट—गंगाबाईची स्थापना—कासेगांवची लढाई—राघोबाचा पाठलाग—समेटाची खटपट व राघोबाचें पलायन—गुजराथची मोहीम—इंग्रजांशीं लढाया—पुरंदरचा तह—कोळ्यांचा दंगा—प्रतिनिधींचा दंगा—कोल्हापूरकरांशीं लढाया—तोतयाच्या बंडाची सुरुवात. डे. अ. पृ. ६००. किं. तीन रुपये.

* भाग सहावा—१७७६ ऑगस्ट ते स. १७७८ एप्रिलपर्यंत. तोतयाच्या बंडाचा बीमोड—परशुरामभाऊंची कोल्हापुरावर मोहीम—पांडुरंगरावांची धारवाडप्रांतीं स्वारी—सावशीची लढाई व सैन्याची वाताहत—परशुरामभाऊ कुमकेस जातात—त्यांच्या गनिमी हालचाली—पाळेगारांचें पारिपत्य—भाऊ व हरिपंत यांची धारवाडप्रांतीं छावणी—हैदरअल्लीवर पांचवी स्वारी—महादजी शिंद्याची कोल्हापुरावर स्वारी—मोरोबादादाचें कारस्थान—उभारणी व चलती—कर्नाटकच्या फौजा देशीं येतात. डे. अ. पृ. ६००. किं. ३ रु.

* भाग सातवा—सन १७७८ एप्रिल ते १७८४ एप्रिलपर्यंत. मोरोबादादाचें कारस्थान ( उत्तरार्ध ) व पारिपत्य—दरबारची हळहळ—परशुरामभाऊ स्वारीस निघतात—बेरड बंडखोरांचा दंगा—भाऊंची सुरापुरावर स्वारी—इंग्रजांची पुण्यावर स्वारी—पराजय व वडगांवचा तह—करवीरकरांचा बंदोबस्त—कित्तूरकरांचें पारिपत्य—इंग्रजांशीं तिसरा बिघाड—इंग्रज गुजराथ व्यापितात—वसई व कल्याण घेतात—पुण्यावर चालून येतात—

पटवर्धनांशीं निकरानें लढतात–रसदेची लूट व पीछेहाट–सालबाईचा तह –स्वस्थतेचीं दोन वर्षे–काशीयात्रा–करवीरकरांचा पुन्हां बंदोबस्त व तह. डे. अ. पृ. ६१०. किंमत तीन रुपये.

**भाग आठवा**— स. १७८४ मेपासून १८९१ फेब्रुवारीपर्यंत-मराठे व मोंगल यांच्या यादगीर येथें भेटी–टिपूचा नरगुंदास वेढा–नरगुंदकरांची मर्दुमी–परशुरामभाऊ कुमकेस येतात–झटपटी–तह–टिपू दगा करून नरगुंद व कित्तूर घेतो–टिपूवर पहिली मोहीम–होळकर व बेहरे कित्तूर प्रांतीं येतात–मराठे व मोंगल यांच्या पुनः भेटी–बदामी–अदवानी–टिपू मराठे व मोंगल यांस छापे घालून हैराण कारितो–तह–स्वस्थतेचीं पुनः तीन वर्षे–पेशवे नाशिकास जातात–परभू ग्रामण्यप्रकरण पुन्हां उद्भवतें–सोनार व वेदोक्त–टिपूवर दुसरी मोहीम–मराठे, मोंगल व इंग्रज एकत्र होतात–परशुरामभाऊंचा धारवाडास वेढा–निकराच्या लढाया–इंग्रजांची मर्दुमी–बातेऱ्या, पेठ, रेवणी व खंदक यांजवर हल्ले. डे. अ. पृ. ६००. किं. ३ रुपये.

**भाग नववा**—स. १७९१-मार्च ते १७९६ नोव्हेंबरपर्यंत. धारवाड काबीज होतें–म्हैसूरच्या राज्यावर स्वारी–बांकी नबाबांचा पराजय–इंग्रजांची श्रीरंगपट्टणवर स्वारी व पीछेहाट–इंग्रज व मराठी लष्करांच्या भेटी–इंग्रजांचा पट्टणास वेढा–घाशीराम कोतवाल–पाटीलबावा देशीं येतात–श्रीमंतांची कृष्णास्नानार्थ स्वारी–साताऱ्यास महाराजांची भेट–टिपूशीं तह–पाटीलबावांचा पुण्यास मुक्काम–वकीलमुतलखी–नानांशीं वैमनस्य–सचिव प्रकरण–गायकवाडाची सरदारी–पाटीलबावांचा मृत्यु–आळत्याची लढाई-करवीरकरांवर मोहीम–खर्ड्याची लढाई-सवाई रावसाहेबांचा मृत्यु–बाजीरावसाहेब पुण्यास येतात–शिंद्यांचें प्राबल्य–नाना साताऱ्यास जातात–शेणवी कारभारी व पटवर्धन सरदार यांचा मिलाफ–चिमणाजीआप्पाची स्थापना व छोटी कारकीर्द–नाना वांईस जातात–महाडकडे पळतात–महाडचें कारस्थान–शेणवी व पटवर्धन यांचा पाडाव–परशुरामभाऊंस कैद. डे. अ. पृष्ठें ६००. किं. तीन रुपये.

**भाग दहावा**—स. १७९६ डिसेंबर ते १७९८ डिसेंबर अखेर. बाजीरावसाहेबांची स्थापना–नबाब, भोसले, शिंदे, होळकर यांच्या

लष्करांचा पुण्यास मुक्काम—पेशवे व शिंदे यांजविषयीं नानांचा बेभरंवसा—शिंद्यांकडून नानांच्या द्रव्यहरणाची सुरुवात—नबाब, शिंदे व भोसले यांचे लढे व समजूत—काशीराव होळकरास सरदारीचीं वस्त्रें—खुन्या मुरलीधर—मल्हारराव होळकरावर छापा व त्याचा मृत्यु—नाना व शिंदे यांत द्रव्यमूलक वितुष्ट—मुशीराची दगलबाजी—नानांचा कारागृहवास—घाटगेशाहीच्या राक्षसी लीला—अव्रूदार धनिकांचा अमानुष छळ—शेणवी सरदारांवर साडेसाती—शिंदे बायांचें बंड उद्भवतें—बंड जोरावतें—घाटग्याचा अमृतरावावर छापा—पेशवे व शिंदे यांत बेबनाव—सातारकर महाराजांचा दंगा—रास्त्यांची त्रेधा—परशुरामभाऊची सुटका—नानांची सुटका—भाऊंच्या सातारकरांशीं लढाया—साताऱ्यावर हल्ला व लूट—महाराजांचा बंदोबस्त—पेशव्यांकडून नानांची पायधरणी—नाना पुन्हां कारभारी होतात—परशुरामभाऊंची शेवटची स्वारी—सुरापुरची खंडणी—कर्नाटकची मुलूखगिरी. डे. अ. पृष्ठें ६००. किं. ४ रुपये.

भाग अकरावा—सन १७९८ सप्टेंबर ते सन १८०० फेब्रुवारी. मागच्या दोन प्रकरणांची अधिक तपशीलवार माहिती—चतुरसिंगाचा रास्त्यांच्या लष्करावर छापा—रास्ते चतुरसिंगाचें बंड मोडतात—विश्रामबाग राजवाडा—शितोळे व निपाणीकर—पंढरपुरीं डुकरांचें कौतुक—दक्षिणप्रांतीं बायांच्या फौजेचा दगा—बाया व करवीरकर यांचा मिलाफ—पेशवाईतले नामांकित वैद्य—बाळोबातात्यांची सुटका व पुन्हां कारभारावर स्थापना—पेशव्यांकडून परशुरामभाऊंस सरंजामाची मोकळीक, बहुमान व धारवाडचा किल्ला मिळतो. नाना, भाऊ व बाळोबा यांचा मिलाफ—बाळोबांच्या मध्यस्तीनें बायांची समजूत—भाऊ करवीरच्या बाजूस येतात—गोकाक, हुकेरी, चिकोडी वगैरे ठाणीं घेतात—भाऊंवर जारणमारणाचा प्रयोग व त्यामुळें शरीराची हैराणगत—साताऱ्च्या संस्थानाकरितां चतुरसिंगाचा आणखी प्रयत्न—इंग्रज टिपूचें राज्य घेतात—बाघाच्या बंडाची सुरवात—भाऊ व करवीरकर यांच्या हालचाली—पट्टणकुडीची लढाई—भाऊंचा मृत्यु व त्यांच्या सैन्याची वाताहात—पुणें दरबार कह्यांत आणण्याविषयीं इंग्रजांचा कावा—घाटग्याची सुटका—घाटग्या शिंदे बायांवर मारेकरी घालतो—रामचंद्र परशुराम करवीर राज्यावर स्वारी करितात—पुण्याहून फौज पलटणें कुमकेस आणितात—

शिराळें काबीज करितात–करवीरच्या फौजेवर छापा घालून नासधूस करितात–करवीरावर चालून जातात–करवीरची लढाई. डे. अ. पृ. ६००. किं. चार रुपये.

**भाग बारावा** (संपा० वा. वा. खरे आणि य. वा. खरे)—सन १८०० मार्च ते डिसेंबरपर्यंत. करवीरचा वेढा–हल्ले–प्रतिहल्ले–तोफांचा भडिमार–पलटणवाल्यांची दगाबाजी–वेढा उठतो. मराठी फौजांची पांगापांग–नाना फडनवीस यांचा मृत्यु–बाळोबातात्यांस पुन्हां कैद–सर्जेरावी राक्षसी लीला–जुन्या मुत्सद्यांवर संक्रांत–पुण्यांत आरब रोहिल्यांचा सुळसुळाट–शिंदे बायांची मर्दुमकी–हिंदुस्थानांतील राजकारण–शिंदे कंपूची आवाडाव–सातारकर छत्रपति, यशोदाबाई, पंतप्रतिनिधि यांवर गहजब–धोंडजी वाघाचें बंड–वाघाचें धाडस आणि गनिमी कावा–इंग्रजांची तारांबळ–डवनीवाल्याची लढाई–वाघाच्या बंडाचा शेवट–जुन्या राजिकाचा नाश–शेणवी सरदार व मुत्सद्दी यांचा संहार–श्रीमंतांचें कारस्थान–लोचटपणाबद्दल इंग्रजांस प्रायश्चित्त–श्रीमंतांचें स्वभाववैचित्र्य–शिंद्यांचें हिंदुस्थानांत प्रयाण. डे. अ. पृ. ६००. किंमत चार रुपये.

**भाग तेरावा** (संपा० य. वा. खरे)—सन १८०१ जाने. ते १८०२ जूनपर्यंत. शिंदे होळकरांचीं प्रचंड झुंजें–शिंदे पलटणांची दाणादाण–यशवंतराव होळकराचा झपाट्यानें अभ्युदय–रास्त्यांची कैद–पाटणकर, भोसले, कुंजर, पुरंदरे, पानशे, गोखले, पटवर्धन वगैरे सरदारांचे लष्करी डावपेच–श्रीमंतांचें स्वभाववैचित्र्य–बारभाईची दाणादाण व विठोजी होळकराचा खून–बेकार शिलेदारांची दैना–सावनूर प्रकरण–गोखले व पटवर्धन यांच्या लढाया–पटवर्धनांचा पराजय–सर्जेराव घाटगे, आपा देसाई व करवीरकर यांची धामधूम–अमृतराव व इंग्रज यांच्या कारस्थानाचा पूर्वरंग–होळकराची दक्षिणेवर स्वारी. ड. क्रा. पृ. ५५०. किंमत चार रुपये.

**भाग चवदावा** (संपा० य. वा. खरे)—स. १८०२ जुलै ते स. १८०४ जुलैपर्यंत. यांतील विषय–होळकराच्या दक्षिणेवरील स्वारीचीं कारणें व हेतु–होळकराच्या अकरा मागण्या–अमृतराव वगैरे नानापक्षीय मुत्सद्यांचें शिंद्यांविरुद्ध कारस्थान–होळकरांचें दक्षिणेंत आगमन–खानदेश, नगर, नाशिकप्रांतीं दंगा–पेशव्यांची लष्करभरती आणि लटपटे सरदार आणि

खुबसूरत तोफा–होळकरापाठोपाठ शिंद्याची फौज दक्षिणेंत येते–बारामतीची लढाई–हडपसरचा तुंबळ रणसंग्राम–पेशवे व शिंदे यांच्या फौजांची दाणादाण–पेशव्यांचें महाडास पलायन–इंग्रजांची कुटिल राजनीति–राज्यरक्षणाचे होळकराचे प्रयत्न–वसईचा तह आणि मराठी दौलतींत इंग्रजांचा प्रवेश–नव्या मुद्रेची मसलत–पुण्यांत पठाणांचा दंगा, शिंदे-होळकरांच्या समेटाचा बोजवारा–होळकर माळव्याकडे परत जातो–इंग्रजांचें शिंदे-भोसल्यांशीं युद्ध–कारणें व हेतु–शिंद्यांचे पराजय–शिंदे फौजेंतील युरोपियन अंमलदाराची निमकहरामी–इंग्रजांच्या पराक्रमाच्या पोकळ वल्गना–शिंदे-भोसल्यांचा नादानपणा–शिंद्याच्या दौलतीचा नाश वगैरे अनेक विषय यांत वर्णिले आहेत. ड. क्रा. पृ. ६००. किंमत चार रुपये.

**भाग पंधरावा** (संपा० य. वा. खरे)–स. १८०४ ते स. १८१० पर्यंत. यांतील विषय–होळकर व इंग्रज यांमधील रणसंग्राम–युद्धाचीं कारणें–होळकराच्या तहाच्या अटी–पूर्वतयारी–इंग्रजांची चढाई व होळकराची पीछेहाट–होळकराचा गनिमी कावा व इंग्रजांची त्रेधा–मानसनची पीछेहाट व इंग्रजी फौजेची दुर्दशा–दीगची लढाई व होळकराची दाणादाण–होळकराच्या भराऱ्या आणि इंग्रजी मुलखाची लूटमार–शिंदे होळकरांची भेट–भरतपूरचा वेढा व इंग्रजी फौजेची दाणादाण–राजकीयदृष्ट्या इंग्रजांची पीछेहाट–रजपूत व जाठ राजांचा इंग्रजांनीं केलेला विश्वासघात–शिंद्यांच्या अकलेची कोलांटी–इंग्रजांचा शिंदे-होळकराशीं तह–होळकराचा देशाभिमान, स्वार्थत्याग, योग्यता, रणकौशल्य आणि अपूर्व व्यक्तिमत्व–पंतप्रतिनिधि प्रकरण–मातुश्री काशीबाई आणि फडणीस–पेंढारकर कारभारी यांशीं पंतांचा तंटा आणि पंताचा दंगा–फत्तेसिंग मान्याचें बंड– कासेगांवची लढाई व माने मंडळीची कत्तल–म्हसवड व रेटरें येथील लढाया–सुभानराव माने व मल्हारजी बोडके यांचा मृत्यु–किन्हईची लढाई आणि सांगलीकर व फडणीस यांच्या फौजांची दाणादाण–बापू गोखल्यांची मर्दुमकी–रहिमतपूर व कऱ्हाड येथील लढाया–पंतांचे थोटे पंत कसे झाले–पंतांच्या दौलतीचा नाश–भिल्ल, कोळी व पाळेगार यांचे दंगे–नारोपंताची दगाबाजी–पंतांची स्त्री लक्ष्मीबाई आणि सावंतांच्या राण्या लक्ष्मीबाई व दुर्गाबाई यांचे पराक्रम–ताई तेलिणीचें बंड

व वासोट्याचा वेढा—सांगलीकरांची कर्नाटकावर स्वारी—पटवर्धनांची दैना—सांगली-मिरज वांटणी—जातमहजर वगैरे पोळांचे कागद—महत्त्वाच्या चिठ्या व ताकिदी—शिवाजी बल्लाळाचा बेहडा—पेशव्यांचा भरमसाट राज्यकारभार आणि इंग्रजांची धूर्त राजनीति वगैरे अनेक महत्त्वाचे विषय आलेले आहेत. ड. क्रा. पृ. ५००. किंमत आठ रुपये.

## आमचीं इतर ऐतिहासिक पुस्तकें.

**अधिकारयोग** अथवा नाना फडनवीस यांस राज्याधिकार मिळाल्याचा इतिहास (संपा० वा. वा. खरे)— 'खूब शर्तीनें राज्य राखणाऱ्या' नाना फडनविसांनीं राज्य बुडविणाऱ्या एकाहून एक बलिष्ठ अशा प्रतिस्पर्ध्यांवर मात करण्यासाठीं लढविलेलीं कारस्थानें, तीं लढवितांना त्यांवर आलेलीं दुर्धर संकटें, त्या संकटांतून पार पडतांना त्यांनीं प्रकट केलेली निस्सीम स्वामिभक्ति, उज्ज्वल देशाभिमान व अलौकिक चातुर्य यांचें सप्रमाण वर्णन सरदार परशुरामभाऊ पटवर्धन वगैरेंच्या लेखांतून जागोजाग भरपूर उतारे देऊन या ग्रंथांत केलें आहे. किं. ८१०. पोस्टेज ८१.

* **हरिवंशाची बखर** अथवा पटवर्धन सरदारांच्या हकीगती (संपा० वा. वा. खरे)— या पुस्तकांत पेशवाईंतील पटवर्धन वगैरे प्रसिद्ध सरदार व थोर थोर मुत्सद्दी यांचे अद्भूत पराक्रम, चातुर्य, धाडस, स्वाभिमान, गुरुजनांविषयीं आदर, औदार्य व निस्सीम स्वामिभक्ति वगैरे सद्गुणांचें उत्तम प्रकारें आविष्करण करणाऱ्या आणि वीर, करुण व हास्य या रसांनीं ओथंबलेल्या आख्यायिका असून लढाईंतले, छावणींतले दरबारचे व नानाप्रकारचे घरगुती प्रसंग फार मनोरंजक प्रकारें वर्णिले आहेत. किं. ८१०. ट. ख. ८१.

* **हैदरअल्लीवर तिसरी स्वारी** (संपा० वा.वा.खरे)— ऐ. ले. संग्रहाच्या तिसऱ्या भागापैकीं फुटकळ प्रकरण. किं. ८६. ट. ख. ८८६.

* **इचलकरंजी संस्थानचा इतिहास** (संपा० वा. वा. खरे)— यांत प्रारंभीं कापशीकर, प्रसिद्ध सेनापति संताजी घोरपडे यांचा वृत्तान्त सांगून नंतर त्यांच्या दौलतींतून इचलकरंजी संस्थान कसें उद्भवलें, कसें फैलावलें व नानाविध संकटांतून आजपर्यंत कसें पार पडत आलें याचें सविस्तर

विवेचन केलें आहे व त्याच्या अनुषंगानें संस्थानचे मूळ संपादक नारो महादेव यांजपासून तों विद्यमान नारायणराव गोविंद यांजपर्यंतच्या सर्व अधिपतींचीं चरित्रें वर्णिलीं आहेत. या पुस्तकांत विशेष हा आहे कीं, शाहू महाराजांच्या मरणापूर्वीचे व त्यानंतरचे प्रसंग, राजसत्ता भोसल्यांच्या घरांतून निघून पेशव्यांच्या हातीं कशी गेली तो प्रकार, मराठी राज्याची घटना व तिचे मोगल सत्तेशीं संबंध वगैरे अत्यंत महत्त्वाच्या विषयांची चर्चा अन्यत्र कोठेंही न केलेली या पुस्तकांत वाचावयास मिळेल. इचलकरंजी संस्थानच्या प्राचीन दप्तरांतील ज्या पत्रें, यादी वगैरे अस्सल लेखांच्या आधारें हा इतिहास लिहिला ते लेखही याच पुस्तकांत छापिले आहेत. डे. अ. पृष्ठ ५३०. किं. ३ रु. पोस्टेज ८३.

सदरहू संस्थानचा फक्त इतिहास, पत्रें यादीविरहित. डे. अ. पृ.१८७. किं. १८८. पोस्टेज ८२.

* **मालोजी व शहाजी** (संपा० वा. वा. खरे)—मालोजी राजे व शहाजीमहाराज भोसले यांविषयींची जेवढी माहिती बखरींतून व मुसलमानी तवारिखांतून मिळणारी आहे तिच्या ग्राह्याग्राह्यतेबद्दल चिकित्सक पद्धतीनें विचार करून आम्हीं हें बुक तयार केलें. यांत मनोरंजक नवी माहिती पुष्कळच आली असून याच्या वाचनानें शिवाजीमहाराजांच्या अद्भुत चरित्राच्या पूर्वभागाची उपपत्ति चांगली कळते. किं. ८५ ट. ख. ८८६.

**सांगलीकरांचा वाका** ( संपा० य. वा. खरे )—पेशवाईतील प्रसिद्ध सरदार कै. चिंतामणराव आपासाहेब सांगलीकर यांनीं लिहून ठेवलेलें आत्मचरित्र या पुस्तकांत छापिलें आहे. धोंडजी वाघाशीं झालेल्या लढायांचें यांत मनोवेधक आणि मार्मिक वर्णन करण्यांत आलें आहे. हें पुस्तक मुंबई सरकारच्या विद्याखात्यानें लायब्ररीच्या व बक्षिस यांसाठीं मंजूर केलें आहे. ड. क्रा. पृ. ६०. किंमत चार आणे.

**मराठी राज्याचा उत्तरार्ध—खंड पहिला** (संपा० य. वा. खरे)—ऐ. ले. संग्रहाच्या दुर्मिळ झालेल्या पहिल्या चार भागांतील प्रस्तावना एकत्र करून छापिल्या असून यांत थोरले माधवराव बल्लाळ आणि नारायणराव बल्लाळ या दोन पेशव्यांच्या कारकीर्दीचा समावेश करण्यांत आला आहे.

रोहिले, पठाण, निजाम, हैदर अशांसारख्या शत्रूंना नामोहरम करून पानिपतानंतर मराठी राज्याचा दरारा पुनः प्रस्थापित करणाऱ्या पराक्रमी काळाचा साद्यंत इतिहास यांत वर्णिलेला असून सर्व मजकूर कै. वासुदेवशास्त्री खरे यांच्या लेखणींतून बाहेर पडलेला आहे. ड. क्रा. पृ. ३००. किंमत दीड रुपाया.

**नाना फडनविसांचें चरित्र—सुधारलेली तिसरी आवृत्ति** (संपा० वा. वा. खरे आणि य. वा. खरे)—कै. तीर्थरूपांनीं हा ग्रंथ मूळ ग्रांट डफ आणि थोडीशीं ऐतिहासिक पत्रें यांच्या आधारानें तयार केला होता. हें पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर ऐ. ले. संग्रहांतून आणि इतरत्र नानांसंबंधीं पुष्कळ माहिती प्रसिद्ध झाली. या माहितीच्या आधारानें हा ग्रंथ नवीन तयार करून त्याची नवी आवृत्ति प्रसिद्ध करावी असा कै. तीर्थरूपांचा संकल्प होता. त्यांच्या पश्चात् आम्हीं हें काम हातीं घेतलें आणि सर्व उपलब्ध माहिती जमेस धरून आणि बहुतेक सर्व ग्रंथ नवीन तयार करून आम्हीं ही आवृत्ति प्रसिद्ध केली आहे. ड. क्रा. पृ. ३००. किंमत दीड रुपाया.

## ती. कै. वासुदेवशास्त्री खरे यांचें काव्य आणि नाट्यग्रंथ

* **समुद्रकाव्य**—समुद्र या विषयावरील मराठींतील हा एकच काव्यग्रंथ होय. खलाशांचें जीवन, समुद्रप्रवास, व्यापार व व्यापारी, हिंदभूमीची होणारी नागवणूक, समुद्रांतील प्राणी, समुद्राचें विशाल व भयानक स्वरूप वगैरे अनेक विषय यांत वर्णिलेले आहेत. किंमत तीन आणे.

* **यशवंतराव महाकाव्य**—यशवंतराव होळकरांवर एक काल्पनिक कथानक रचून कै. तीर्थरूपांनीं हा काव्यग्रंथ लिहिला आहे. हें काव्य १७२६ श्लोकांचें असून त्याचे चोवीस वर्ग आहेत. हा काव्यग्रंथ प्रसिद्ध आहे. मुंबई युनि. च्या अभ्यासक्रमांत याचा समावेश झालेला आहे. दक्षिणा प्राइझ कमिटीनें या ग्रंथास मोठें बक्षिस दिलें आहे. या ग्रंथांत वीररस हा प्रधान रस असून कथाप्रसंगानें शांत, भयानक, अद्भुत, हास्य आणि शृंगार या रसांचाही परिपोष जागोजाग केलेला आहे. महाकाव्य

ज्याला म्हणतां येईल असा हा एकच मराठी भाषेंतील ग्रंथ होय. किंमत एक रुपया.

**फुटकळ चुटके**—यांत स्फुट विषयांवर कविता छापिल्या आहेत. यांतल्या कांहीं कविता सरकारी क्रमिक पुस्तकांत आल्या आहेत व शाळाखात्यानें हें बुक बक्षिसांकरितां पसंत केलें आहे. किं. ८४. ट. ख. ८८६.

**गुणोत्कर्ष**—(गद्य. आवृत्ति पांचवी) शककर्ते श्रीशिवाजीमहाराज यांच्या चरित्राच्या आधारावर एका स्वामिभक्ताचें वीरकरुणरसात्मक उज्ज्वल चित्र या नाटकांत रेखाटलें आहे. किं. ८१२. ट. ख. ८१.

**तारामंडळ**—(गद्य, सचित्र. आवृत्ति तिसरी) यांत एका देशभक्ताचा अपूर्व स्वार्थत्याग, देशभक्ति व पितृभक्ति यांत विरोध आला असतां दुसरीनें पहिलीचें साचवर पतकरिल्यामुळें झालेले सुपरिणाम, भगवद्भक्तांचें साफल्य, सत्यव्रताचा बाणा, श्रीमंतीचा तोरा, दुर्जनाचें गूढ निष्ठुर दौर्जन्य इत्यादि गोष्टी मनोवेधक प्रकारानें दाखविल्या आहेत. नाटकांतील प्रसंग विविधरसात्मक कल्पिले असून ते जागोजाग उदात्त विचार व रमणीय कल्पना घालून सुशोभित केले आहेत. किं. १ रुपया ट. ख. ८१.

**शिवसंभव**—(गद्य, सचित्र. आ. दुसरी) यांत शिवाजीमहाराजांच्या जन्माची रमणीय अद्भुत कथा वर्णिली असून त्यांच्या धीरोदात्त मातापितरांनीं महाराष्ट्रांत स्वराज्याचा चैतन्यचंद्रोदय व्हावा म्हणून कोणतीं दुर्धर संकटें सोशिलीं हें नानाविध हृदयस्पर्शी रोमहर्षण प्रसंगांनीं दाखविलें आहे. किं. १ रुपया ट. ख. ८१.

**कृष्णकांचन**—(संगीत, सचित्र) यांत राष्ट्रधर्माच्या उदात्त भावना नवीन प्रकारें उद्दीपित करणारे विस्मयोत्पादक प्रसंग साधले असून त्यांच्या द्वारें वीर, करुण, शांत व हास्य या रसांचा परिपोष केला आहे. पदांच्या चाली प्रसंगपरत्वें प्रेमळ, गोड व गंभीर असून त्यांची निवड रा. टेंबे यांनीं केली आहे. किं. १ रुपया ट. ख. ८१.

* **उग्रमंगल**—(संगीत सचित्र. आवृत्ति दुसरी) हें नाटक सुप्रसिद्ध 'बलवंत संगीत नाटक मंडळी'करतां लिहिलें असून यांतले प्रसंग फारच

बहारीचे व विविध रसांनीं परिप्लुत असेच आहेत. हें नाटक म्हणजे 'शठं प्रति शाठ्यं' या लोकमान्यांच्या वचनाचाच दृष्टान्तरूपानें अवतार होय. किं. १ रुपया. पो. ८१.

※ **चित्रवंचना**—(संगीत, सचित्र)-यांत बुद्धिवान् व सुशिक्षित परंतु भिन्न स्वभावांच्या दोन मुलींच्या संसारावर निर्व्याज व कृत्रिम प्रेमाचे भिन्न परिणाम कसे घडले हें दाखविलें आहे. यांत शृंगार व हास्य हे प्रधान रस असून वीर व करुण याही रसांची छटा प्रसंगविशेषीं साधली आहे. किंमत बारा आणे.

**संगीत देशकंटक नाटक** (सचित्र)- कै. राजाराम महाराज यांच्या कारकीर्दीतील परिस्थिति विशद करणाऱ्या एका काल्पनिक प्रसंगावर कै. तीर्थरूपांनीं हें नाटक रचलें आहे. त्यांच्या प्रतिभासंपन्न लेखणींतून बाहेर पडलेलें हें शेवटचें नाटक होय. यांत हास्यरसाचा भरपूर परिपोष होईल अशाच रीतीनें कथानकाची सर्व मांडणी करण्यांत आली आहे. इंग्रजी नाटक-कादंबऱ्यांप्रमाणें या नाटकाची अत्यंत स्वस्त किंमतीची ही आवृत्ति आम्हीं मुद्दाम प्रसिद्ध केली आहे.

**आठ चित्रें-ग्लेज कागद-ड. क्रा. पृ. १२५. किंमत फक्त पांच आणे.**

**विशेष सूचना** — वर पुस्तकांची यादी दिली आहे त्यांपैकीं फुल्या केलेले ग्रंथ आतां आम्हांकडे विक्रीसाठीं शिल्लक नाहींत. सर्व पुस्तकांना टपाल खर्च निराळा पडेल.

**यशवंत वासुदेवशास्त्री खरे, मिरज.**

## प्रसिद्ध होणारे आमचे दोन नवीन ग्रंथ.

**मराठी राज्याचा उत्तरार्ध— खंड दुसरा**— सवाई माधवराव या वैभवशाली पेशव्यांची कारकीर्द यांत छापली जाणार आहे. या खंडांत नाना फडनवीस, महादजी शिंदे, तुकोजी होळकर, हरीपंत फडके, परशुरामभाऊ पटवर्धन या राष्ट्रपुरुषांनीं स्वराज्यरक्षणार्थ केलेले विश्वप्रयत्न, इंग्रज, निजाम, हैदर व टिपू यांशीं झालेले मराठ्यांचे रणसंग्राम, दंगे–बंडें–छापे–वेढे–लूट–लढाया–कारस्थानी डावपेंच–मंत्रिसभेंतील खलबतें–दरबारी प्रसंग–पेशव्यांच्या स्वाऱ्या–शिकाऱ्या–शिंद्यांची दिल्ली प्रांतावर स्वारी वगैरे अनेक महत्वाचे विषय या खंडांत छापले जाणार आहेत.

**योगशास्त्र**— योगशास्त्राची तात्त्विक आणि सशास्त्र माहिती देणारा हा पहिलाच ग्रंथ प्रसिद्ध होणार आहे. मराठी भाषेंत अशा प्रकारचा ग्रंथ आतांपर्यंत प्रसिद्ध झालेला नाहीं. योगाचीं अंगें व उपांगें, मानवी शरीराची योगदृष्ट्या माहिती, कुंडलिनीमार्ग वगैरे विषयांची सचित्र माहिती या ग्रंथांत छापली जाणार आहे.

हा ग्रंथ प्रकाश मुद्रणालय, २९५/४ सदाशिव पेठ, पुणें २, येथे
द. कृ. काकनूरकर यांनीं छापिला आणि मिरज येथे
यशवंत वासुदेवशास्त्री खरे यांनीं प्रसिद्ध केला.